एम. ए. भाग एक
अभ्यासपत्रिका क्र. तीन
मराठी वाङ्मयाचा इतिहास
(१८७४ ते १९६०)

© UNIVERSITY OF MUMBAI

डॉ. संजय देशमुख
कुलगुरू,
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

डॉ. अंबुजा साळगावकर
प्रभारी संचालक
दूर व मुक्त अध्ययन संस्था,
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

डॉ. धनेश्वर हरिचंदन
अभ्यास साहित्य प्रभारी,
दूर व मुक्त अध्ययन संस्था,
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

समन्वयक/संपादक : **प्रा. डॉ. पुष्पलता राजापुरे-तापस**
मराठी विभाग, मुंबई विद्यापीठ.

लेखन : **डॉ. भारती तेंडुलकर**
: **डॉ. शरयू आसोलकर**
: **डॉ. गोविंद काजरेकर**
: **डॉ. सुरेखा सबनीस**
: **डॉ. अंजली जोशी**
: **प्रा. संध्या शहापुरे**
: **प्रा. समीर जाधव**
: **प्रा. वैशाली जावळेकर**
: **प्रा. संदीप कदम**
: **डॉ. सूर्यकांत आजगांवकर**
: **डॉ. सुहासिनी कीर्तीकर**
: **डॉ. भारती निरगुडकर**

सप्टेंबर २०१५, एम. ए. भाग एक, अभ्यासपत्रिका क्र. तीन, मराठी वाङ्मयाचा इतिहास (१८७४ ते १९६०)

प्रकाशक : प्राध्यापक-नि-संचालक, दूर व मुक्त अध्ययन संस्था,मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी, मुंबई-४०० ०९८.

अक्षर जुळणी : अश्विनी आर्टस्,
गुरुकृपा चाळ, एम्. सी. छगला मार्ग, बामणवाडा,
विलेपार्ले (पूर्व), मुंबई - ४०० ०९९.

मुद्रण :

अनुक्रमणिका

क्रमांक	अध्याय	लेखन	पृष्ठ क्रमांक
१)	निबंधवाङ्मय १८७४ ते १९६०	- डॉ. भारती तेंडुलकर	०१
२)	कविता १८७४ ते १९२०	- डॉ. शरयू आसोलकर	४७
३)	कविता १९२० ते १९६०	- डॉ. गोविंद काजरेकर	६०
४)	कथा १८७४ ते १९२०	- डॉ. सुरेखा सबनीस	८६
५)	कथा १९२० ते १९६०	- डॉ. अंजली जोशी	१०७
६)	कादंबरी १८७४ ते १९२०	- प्रा. संध्या शहापुरे	१२९
७)	कादंबरी १९२० ते १९६०	- प्रा. समीर जाधव	१३९
८)	नाटक १८७४ ते १९२०	- प्रा. वैशाली जावळेकर	१४८
९)	नाटक १९२० ते १९६०	- प्रा. संदीप कदम	१६२
१०)	चरित्र-आत्मचरित्र १८७४ ते १९६०	- डॉ. धनाजी गुरव	१९५
११)	ललित गद्य १८७४ ते १९६०	- डॉ. सूर्यकांत आजगांवकर	२०५
१२)	नियतकालिके १८७४ ते १९६०	- डॉ. सुहासिनी कीर्तीकर	२२५
१३)	साहित्यविचार आणि साहित्य समीक्षा १८७४ ते १९६०	- डॉ. भारती निरगुडकर	२६०

❖❖❖❖

१

निबंधवाङ्मय (१८७४ ते १९६०)

डॉ. भारती म. तेंडुलकर

उद्दिष्टे :

- १८७४ ते १९२० या कालखंडातील निबंध वाङ्मयाचा आढावा घेण्यापूर्वी १८१८ ते १८७४ या पूर्वकालखंडातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक परिस्थितीचा थोडक्यात परिचय करून घेणे.
- महाराष्ट्रातील राष्ट्रवादाच्या उदयासाठी कारण ठरलेल्या घटनांची थोडक्यात माहिती करून घेणे.
- इंग्रजी शिक्षणाच्या माध्यमातून परिचित झालेल्या पाश्चिमात्य विचारवंतांच्या नवविचारांची ओळख करून घेणे.
- निबंधमालेचे स्वरूप व कार्य समजावून घेणे.
- प्रस्तुत कालखंडातील प्रमुख निबंधकार व त्यांच्या निबंधवाङ्मयाचा सविस्तर परिचय करून घेणे.
- या काळातील नियतकालिकांचे वाङ्मयनिर्मितीशी असलेले नाते लक्षात घेऊन निबंधवाङ्मयासंदर्भात नियतकालिकांनी केलेल्या कामगिरीची संक्षिप्त माहिती करून घेणे.
- १९२० ते १९६० या कालखंडातील प्रमुख निबंधकार व त्यांच्या निबंधवाङ्मयाचा सविस्तर परिचय करून घेणे.

प्रास्ताविक :

१८७४ ते १९२० या काळातील निबंधवाङ्मयाचा विचार करताना १८७४ पूर्वीच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक परिस्थितीचा थोडक्यात परिचय करून घेणे आवश्यक आहे. इ०स० १८१८ साली पेशवाईची अखेर झाली. पेशवाईच्या अंताची कारणमीमांसा करताना प्रामुख्याने नारायणरावांचा वध, सवाई माधवरावांची आत्महत्या, पानिपतला मराठ्यांचा झालेला भीषण पराजय इत्यादी घटना लक्षात

घ्याव्या लागतात. तसेच अठराव्या शतकातील महाराष्ट्राचे स्वरूप पाहिले तर लक्षात येते की मराठा सरदारांमधील दुही-भांडणे-विश्वासघात-क्षुद्र महत्त्वाकांक्षा हेच याकाळातील वास्तव होते. त्याचप्रमाणे प्रस्तुत काळातील वाङ्मयाची मीमांसा करायची झाली तर संतकाव्याला ओहोटी लागली होती. पंतकाव्य परंपरेत गुरफटले होते आणि तंतकाव्य व्यवसायाभिमुख झाले होते, असे म्हणता येईल. थोडक्यात या काळात राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात महाराष्ट्राचा ऱ्हास झालाच होता. त्यामुळे इंग्रजांऐवजी दुसरी एखादी प्रबळ सत्ता आली असती तरी आपला पराजय निश्चित होता, एवढे नक्की होते.

१८१८ साली इस्ट इंडिया कंपनीची म्हणजेच पर्यायाने इंग्रजांची सत्ता महाराष्ट्रावर आली. शैक्षणिक, सांस्कृतिक तसेच राजकीय क्षेत्रात प्रगत असलेल्या इंग्रजांना कोणत्याही देशातील सुजाण प्रजेवर राज्य करणे अधिक सोपे असते, हे माहीत होते. परिणामी त्यांनी सांस्कृतिक क्षेत्रात उदारमतवादी धोरण अवलंबिले. या देशातील जनतेला इंग्रजी भाषा शिकविली. जीवनाकडे बघण्याची नवीन ज्ञानाची दृष्टी दिली. गुणवंतांना नव्या संधी दिल्या. थोडक्यात, १८१८ नंतरच्या सुरुवातीच्या तीसएक वर्षांत येथील प्रस्थापितांच्या स्थानांना धक्का न लावता, राजनिष्ठ असा नवा नोकरदार वर्ग कसा तयार होईल याकडे त्यांनी लक्ष पुरविले.

सांस्कृतिक क्षेत्रातील इंग्रजांचे धोरण उदारमतवादी असले तरी राजकीय क्षेत्रात मात्र लॉर्ड डलहौसीचे धोरण आक्रमक असेच होते. याचीच प्रतिक्रिया म्हणजे १८५७चे स्वातंत्र्ययुद्ध होते असे सांगता येईल. १८५७च्या स्वातंत्र्ययुद्धानंतर ब्रिटिश सरकारने कंपनीचे राज्य स्वत:कडे घेतले. आणि लगेचच दुसऱ्या वर्षी राणीचा जाहिरनामा जारी करण्यात आला. या घटनाही येथे लक्षात घ्याव्या लागतील.

१८१८ ते १८७४ या काळात इंग्रजांनी सांस्कृतिक क्षेत्रात उदारमतवादी धोरण स्वीकारले. विद्यापीठाची स्थापना ही यातील एक महत्त्वाची घटना मानावी लागते. कारण इंग्रजी शिक्षण, इंग्रजी भाषा आणि इंग्रजी लेखन-साहित्य इत्यादींतून नवशिक्षित वर्गाला पाश्चात्य संस्कृतीचा परिचय झाला. पाश्चात्य संस्कृतीच्या संपर्कातून आपल्याकडे दोन प्रमुख विचारप्रवाह निर्माण झाले. या विचारप्रवाहांना राजकीय व सामाजिक असे संबोधले गेले. १८७४ ते १९२० या काळातील निबंधवाङ्मयाचे भरणपोषण वरील दोन विचारप्रवाहांनी केलेले दिसते. या दोन विचारप्रवाहांच्या उदयामागील घटनांचा संक्षिप्त आढावा घेणे आवश्यक ठरेल.

पाश्चात्य शिक्षणपद्धती आणि पर्यायाने पाश्चात्य संस्कृतीच्या संपर्कातून आपल्याकडे 'राष्ट्र' ही संकल्पना उदयाला आली. प्रस्तुत कालखंड हा राष्ट्रभावनेच्या पायाभरणीचा काळ आहे असे म्हटले तर वावगे ठरू नये. या काळात राष्ट्रभावनेच्या पायाभरणीला प्रामुख्याने चार घटक प्रेरक ठरले आहेत. ते पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) ब्रिटिश राजसत्तेने हिंदुस्थानची आरंभलेली लूट. त्यामुळे हिंदुस्थानच्या अर्थव्यवस्थेचे झालेले खच्चीकरण. परिणामी हिंदुस्थानचे वाढत जाणारे दारिद्र्य.

२) या देशातील जनतेची राजसत्ता सहभागामधील नाकारली गेलेली संधी.

३) ख्रिस्ती मिशनऱ्यांचे धार्मिक आक्रमण.

४) राष्ट्रभावनेला, स्वातंत्र्याच्या क्षमतेला बाधक ठरणाऱ्या अनेक घटकांचा निरास करण्याची जाणवलेली आवश्यकता.

वरील जाणिवांच्या क्रियाप्रतिक्रियांमधून याकाळात राष्ट्रभावनेचे भरणपोषण होऊ लागलेले दिसते. याचीच प्रतिक्रिया म्हणून काही महत्त्वाच्या घटनांची नोंद करावी लागेल.

१) ३० जुलै १८४१ पासून 'बॉम्बे गॅझेट'मध्ये 'ए हिंदु' या नावाने भास्कर पांडुरंग तर्खडकर यांची प्रसिद्ध झालेली पत्रे.

२) १८४३ साली रामकृष्ण विश्वनाथ यांनी केलेली हिंदुस्थानच्या आर्थिक दुरावस्थेची चिकित्सा. ही चिकित्सा करताना त्यांनी असे म्हटले आहे की मुसलमानांनी येथील केवळ संपत्ती लुटली पण इंग्रजांनी संपत्तीची साधने लुटली आणि हिंदुस्थानचे आर्थिक खच्चीकरण केले.

३) १८५९ साली व्यापार व व्यवसाय यांच्यावर कर बसविण्यासाठी लायसेन्स बिल आले. या बिलाविरुद्ध देशभर चळवळ करण्यात आली. १० ऑक्टोबर १८५९ रोजी मुंबईला निषेधसभा घेण्यात आली.

४) दादाभाई नौरोजी यांनी ईस्ट इंडिया फिनन्स कमिटीसमोर दिलेल्या निवेदनात ब्रिटिशांनी चालविलेल्या लुटीबद्दलची आकडेवारीसह चिकित्सा केली.

५) जातिभावनेमुळे राष्ट्रभावनेची हानी होते, म्हणून राजकीय हित व सामाजिक सुख यासाठी तरी हिंदूंच्या धर्मात काही बदल होणे आवश्यक आहे, हा राजाराम मोहन रॉय यांनी मांडलेला विचार.

६) 'दर्पण'च्या रूपाने महाराष्ट्रात वृत्तपत्रांचा झालेला प्रारंभ. वृत्तपत्राच्या माध्यमातून लोकसत्ताक राज्यपद्धतीचा बाळशास्त्री जांभेकर, भाऊ महाजन, लोकहितवादी इत्यादींकडून झालेला पुरस्कार.

७) लोकहितवादींचे सर्वांगीण सुधारणावादाचा पुरस्कार करणारे धोरण. त्यांनी महाराष्ट्रातील सांस्कृतिक जीवनाला विज्ञानसन्मुख करण्याचा वैचारिक प्रयत्न केला. राष्ट्रभावना, सामाजिक ऐक्य यांच्या आड येणाऱ्या घटनांचा निरास करताना इंग्रजी राज्यापासून फळ, स्वदेशी, बहिष्कार, स्वराज्य इत्यादींचे त्यांनी केलेले सूतोवाच.

८) १८४८ साली झालेली ज्ञानप्रसारक सभेची स्थापना. १८५० पासून 'ज्ञानप्रसारक' या नियतकालिकातून विद्वानांनी सभेत वाचलेले निबंध प्रसिद्ध होणे.

९) १८५२ साली दादाभाई नौरोजींनी जगन्नाथ शंकरशेट मुर्कुटे व डॉ० भाऊ दाजी लाड यांच्या साहाय्याने 'बॉम्बे असोसिएशन' या पहिल्या राजकीय संस्थेची केलेली स्थापना. या माध्यमातून संस्थात्मक, सनदशीर राजकारणाचा झालेला जन्म.

१०) १८६१ साली सरकारने केलेली कायदे-कौन्सिलची नवीन घटना. या घटनेत लोकमताला मिळालेला मर्यादित वाव. मर्यादित स्वरूपात का होईना पण मिळालेल्या संधीचा जास्तीत जास्त फायदा आपण करून घेतला पाहिजे असा समाजधुरिणांनी केलेला प्रचार.

११) १८६७ साली विष्णुशास्त्री ब्रह्मचारी यांनी लिहिलेला 'सुखदायक राज्यप्रकरणी निबंध'. या निबंधातून घडणारे स्वराज्य, लोकसत्ता, साम्यवादी प्रजासत्ताक यांचे दर्शन. तसेच 'वेदोक्त धर्मप्रकाश' या ग्रंथात त्यांनी मांडलेली अत्यंत पुरोगामी मते. या मतांतून व्यक्त होणारे सुधारणावादी विचार.

१२) १८७० पासून खऱ्या अर्थाने झालेला न्या० महादेव गोविंद रानडे यांच्या सार्वजनिक कार्याला प्रारंभ.

न्या. रानडे यांनी सार्वजनिक सभेची स्थापना करून या सभेला राजकीय स्वरूप दिले. आणि नेमस्त, सनदशीर राजकारणाला व्यापक संस्थात्मक अधिष्ठान प्राप्त करून दिले.

१३) सार्वजनिक काकांनी 'प्रेस ॲक्ट' विरुद्ध सर्व देशभर चालविलेली चळवळ. १८७२ पासून स्वदेशीच्या व्रताचा प्रत्यक्ष झालेला अवलंब.

१४) मिशनरी लोकांच्या धर्मप्रसारामुळे हिंदु धर्मियांच्या मनात हिंदुधर्मरक्षणाची उत्पन्न झालेली प्रबळ प्रेरणा. मोरशास्त्री दांडेकर, कृष्णशास्त्री चिपळूणकर, गंगाधरशास्त्री फडके इत्यादींचे या संदर्भातील कार्य महत्त्वाचे ठरते. यादृष्टीने कल्याणोन्नायक सभा, मानवधर्मसभा, परमहंस मंडळी, प्रार्थना समाज इत्यादींचे कार्य. हिंदुधर्मात राहूनच प्रार्थनासमाजाने धरलेला परिवर्तनाचा आग्रह. प्रार्थनासमाजी व्यक्ती स्वतःला 'हिंदु प्रॉटेस्टंट' म्हणवून घेत असत. तसेच प्रार्थनासमाजी व्यक्तींची बंगालमधील ब्राह्मोसमाजाप्रमाणे स्वतंत्र, वेगळी जात असावी या कल्पनेला न्या० रानडे, भांडारकर यांनी कसून केलेला विरोध.

१५) १८५७ साली झालेली मुंबई विद्यापीठाची स्थापना. विद्यापीठाच्या अभ्यासक्रमातून इतिहासाच्या अध्ययनाची लाभलेली नवी दृष्टी. तसेच

विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांतून अभ्यास करणाऱ्या नवशिक्षित तरुणांना मिल्, स्पेन्सर, मेकॉले, बटलर इत्यादींच्या विचारांचा झालेला परिचय.

१६) महात्मा जोतीराव फुले यांच्या कार्याचा परिचय. म० फुले यांनी महाराष्ट्रात अस्पृश्यता निवारणाची चळवळ सर्वांत प्रथम सुरू केली. १८४२ साली पुण्यात मुलींची पहिली शाळा काढून स्त्रीशिक्षणाला सुरुवात केली. १८६३ मध्ये बालहत्याप्रतिबंधगृह काढले. तर १८६४ मध्ये पुण्यात सारस्वत जातीतील पहिला पुनर्विवाह घडवून आणला. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे बहुजनांच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक अशा प्राथमिक शिक्षणाकडे त्यांनी लक्ष पुरविले.

मुंबई विद्यापीठाच्या अभ्यासक्रमातून मिल्, स्पेन्सर, मेकॉले, बटलर इत्यादींच्या विचारांचा नवशिक्षितांना झालेल्या परिचयाचा थोडक्यात आढावा घेणे आवश्यक आहे. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी निबंधमाला सुरू करण्यापूर्वी सात-आठ वर्षे आधी मिल्चा 'ऑन लिबर्टी' हा ग्रंथ प्रकाशित झाला होता. मिल्चा हा ग्रंथ म्हणजे 'स्वातंत्र्याचे स्त्रोत्र' आहे. या ग्रंथात राजकीय शासन व सामाजिक रूढी या दोन शक्ती समाजातील कोणत्याही घटकावर स्वामित्व गाजवितात, हा त्याने मांडलेला विचार महत्त्वाचा आहे. तसेच 'सब्जेक्शन ऑफ वुइमेन्' हा त्याचा ग्रंथ नवीन पदवीधरांमध्ये प्रिय असा ग्रंथ होता.

मिल्च्या ग्रंथांचे अवलोकन केले तर शिक्षण सक्तीचे असावे, सरकारने शिक्षणाचा खर्च सोसावा, विवाह योग्य पण प्रौढ वयात व्हावा, बहुसंख्य लोकांनी आपली मते अल्पसंख्य लोकांवर लादणे नेहमीच न्यायाचे नसते, व्यक्तीचे स्वातंत्र्य अबाधित राखणारे संकेत समाजाने कटाक्षाने पाळले पाहिजेत यांसारखे विचार पाहावयास मिळतात.

मिल्च्या विचारसरणीबरोबर अज्ञेयवादी हर्बर्ट स्पेन्सरच्या विचारांचाही, त्याकाळच्या कॉलेज तरुणांवर मोठा प्रभाव होता. धर्म, रीतिरिवाज या संदर्भात महाराष्ट्रात जी वादळे निर्माण झाली त्यांच्या मुळाशी हे विचार कार्यरत होते.

मेकॉले चार वर्षे (१८३४-३८) हिंदुस्थानात होता. मेकॉलेने स्वतःच्या देशाचा इतिहास स्वाभिमानाने आणि पूर्वग्रहरहित वृत्तीने लिहिला आहे. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या लेखनपद्धतीवर व वर्णनशैलीवर मेकॉलेचा प्रभाव पाहावयास मिळतो.

१८१८ ते १८७४ या काळात सर्वच स्तरांवर राष्ट्रवादाचा ठळक प्रवाह कार्यरत असलेला दिसतो. अगदी परंपरानिष्ठ विचारप्रवाहाच्या मुळाशीही हीच राष्ट्रवादी प्रेरणा होती असे म्हणता येईल. उदाहरणार्थ, ख्रिस्ती मिशनरी यांनी हिंदुधर्मावर केलेले हल्ले परतवून लावणे, स्वधर्माचे रक्षण करणे, या कृष्णशास्त्री

प्रभृतींच्या विचाराच्या मुळाशीही प्रबळ राष्ट्रवादी प्रेरणाच कार्यरत असलेली दिसते. तसेच सामाजिक सुधारणांना महत्त्व देणाऱ्या विचारांची पाठराखण करणाऱ्या बाळशास्त्री जांभेकर, भाऊ महाजन, दादोबा पांडुरंग, लोकहितवादी इत्यादींनीही राष्ट्रवादी विचारांचीही पाठराखण केली आहे. या सर्वांनी आपल्या समाजातील व धर्मातील अनिष्ट व दुष्ट आचारविचारांचे उच्चाटण होणे हेच आपले जीवनसर्वस्व मानले.

१८१८ ते १८७४ हे प्राधान्याने 'भाषांतर युग' आहे. या काळाला 'शालेय वाङ्मयाचा काळ' असेही म्हणतात. या काळातील निबंध वाङ्मयाचा विचार केला तर प्रबोधनाच्या ऊर्मीतून झालेली प्राथमिक स्वरूपाची निबंधरचना हेच या काळातील निबंधांचे स्वरूप होते. साहजिकच, तत्कालीन काळातील राष्ट्रवादाच्या विचारभावनेला उद्‌गार देण्याचे प्रमुख कार्य या काळातील निबंधांनी केले असे म्हणता येईल. यादृष्टीने 'दर्पण', 'प्रभाकर', 'ज्ञानप्रकाश' इत्यादींमधील निबंध पाहाता लक्षात येते की, प्रजेचे मनोगत व्यक्त करणे, सरकारास समजावणे, असेच या निबंधांचे स्वरूप आहे. भाऊ महाजन यांनी ब्रिटिशांची लाचलुचपत, नेटिव्हांना मिळणारी तुच्छतापूर्वक वागणूक, पाश्चात्यांचे अंधानुकरण करण्याची प्रवृत्ती इत्यादींवर तीव्र व स्पष्ट टीका 'प्रभाकरा'तून केली. लोकहितवादींनी 'शतपत्रां'तून लोकसत्ताक जबाबदार राज्यपद्धतीचा आग्रह सर्वांत प्रथम धरला. १८५० साली सुरू झालेल्या 'ज्ञानप्रसारक' नियतकालिकांतून ज्ञानप्रसारक सभेत वाचले जाणारे उदाहरणार्थ, 'स्वभाषेतून व इंग्रजीतून विद्या शिकविणे' इत्यादी विषयांवरचे निबंध प्रसिद्ध होऊ लागले. चंद्रिका मासिकाने नव्या विचारांच्या प्रकटीकरणाला साहाय्य केले. 'शिक्षणपद्धतीविषयी विचार, राजसत्ताक व लोकमतानुसारी राज्य, गोऱ्या लोकांचा काळेपणा' इत्यादी चंद्रिका मासिकातील लेखांतून निबंधमालेतील विषयांचे सूतउवाच झालेले दिसते. कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनी 'पुणे पाठशाळापत्रक' काढून त्यात 'इंग्रजांचे सर्वांशी अनुकरण करणे अयोग्य होय' अशा धर्तीवरील लेख लिहिले. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्यावर या लेखाचा संस्कार होता, हे लक्षात घ्यावे लागते. प्रो० केरोपंत छत्रे यांनी 'वैज्ञानिक प्रगतीशिवाय तरणोपाय नाही' ही राष्ट्रोद्धाराला अत्यंत आवश्यक असणारी मांडलेली कल्पना, ज्ञानप्रसारक सभेपुढे म० गो० रानडे यांनी 'नाना फडणिसावर' वाचलेला निबंध, विठ्ठलराव पाठक यांनी 'इतिहासाचे स्फूर्तिदायक सार' काढून ते लोकांपुढे मांडणे, नी० ज० कीर्तने यांनी ग्रँट डफवर टीका करून त्याने साधनभूत कागदपत्रांचा योग्य उपयोग केला नाही हे सप्रमाण सिद्ध करणे. इत्यादी सर्वांनीच स्वकार्यक्षमतेनुसार प्रबोधनाचे कार्य केले. तर १८६६ मध्ये सुरू झालेले 'अरुणोदय' हे पत्र राष्ट्रवादी राजकारण व परकीय सत्तेचा दंभस्फोट यांना महत्त्व देणारे होते. मोरशास्त्री दांडेकर, भाऊ महाजन, कृष्णशास्त्री चिपळूणकर, गंगाधरशास्त्री फडके यांनी चालविलेली उपदेशचंद्रिका, विचारलहरी, सद्‌धर्मदीपिका इत्यादी नियतकालिके, १८७१ साली सुरू झालेले 'दंभहारक' हे पत्र

व त्यातून व्यक्त होणारे विचारस्वातंत्र्य, लोकशाही जीवननिष्ठा व स्वत्वाची जाणीव, विष्णुबुवा ब्रह्मचारींचा 'सुखदायक राज्यप्रकरणी निबंध' या सर्वांच्याच मुळाशी प्रबोधनाची नवी दृष्टी होती, हे खरे असले तरी या काळातील बहुतांश विचारवंतांच्या विचारांमध्ये ब्रिटिश सत्तेविषयीची राजनिष्ठा, तिच्या न्यायबुद्धीबद्दलचा विश्वास व ब्रिटिशांच्या संपर्कातूनच आपला उद्धार होणार आहे, अशा प्रकारची धारणा दिसून येते. याचे कारण महाराष्ट्रीयांच्या सांस्कृतिक न्यूनगंडाच्या भावनेत व पराभूततेच्या जाणिवेत शोधावे लागते. महाराष्ट्रातील प्रबोधनाच्या विचारांना असलेली मर्यादा लक्षात घेऊनही याकाळात लोकशिक्षणाचे एक समर्थ माध्यम म्हणून नियतकालिकांनी केलेले लोकशिक्षणाचे भरीव कार्य नजरेआड करून चालणार नाही. कारण याचा परिणाम म्हणूनच पुढील काळात महात्मा फुले, विष्णुशास्त्री चिपळूणकर, लोकमान्य टिळक, गोपाळ गणेश आगरकर, कृष्णाजी खाडिलकर, महादेव परांजपे, न. चिं. केळकर, इतिहासाचार्य राजवाडे इत्यादी निबंधकार व निबंधवाङ्मय निर्माण झाले आहे.

निबंधमालापूर्वकाळात भारतीयांमधील लोप पावलेला स्वाभिमान जागृत करण्याचे कार्य निबंधमालेने केले. हे करताना विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी परंपरारक्षणाबरोबरच पाश्चात्य विद्येच्या ग्रहणावरही भर दिला. यातूनच महाराष्ट्रात दोन ठळक व वैचारिक संप्रदायांचा जन्म झाला. हेच परंपरावादी व प्रगतीवादी संप्रदाय म्हणून ओळखले जातात. मात्र या दोन्ही संप्रदायांच्या मुळाशी असलेली प्रेरणा ही प्रखर राष्ट्रहिताचीच होती, हे लक्षात घेऊन १८७४ ते १९२० या पुढील काळातील निबंधवाङ्मयाचा विचार करावा लागतो.

१८७४ ते १९२० या काळातील निबंधवाङ्मय :

१८१८ ते १८७४ या काळात व्यक्त झालेल्या न्यूनगंडाच्या, ब्रिटिशांबद्दलच्या राजनिष्ठेच्या, ब्रिटिश धार्जिणेपणाच्या आणि ब्रिटिशच आपले उद्धारक आहेत या विश्वासाविरुद्ध व्यक्त झालेली तीव्र प्रतिक्रिया विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या भावनात्मक, आक्रमक, जहाल, परंपरानिष्ठ राष्ट्रवादात दिसून येते. त्यांनी आपल्या निबंधमालेतून परंपरारक्षणावर जितका भर दिला तितकाच पाश्चात्य विद्येच्या ग्रहणावरही दिला. त्यांच्या निबंधमालेने स्वदेशीयांमधील न्यूयनगंड नाहीसा करून त्यांच्यामध्ये स्वत्वजागृती केली. पण याचवेळी पाश्चात्य संस्कृतीचा स्वीकार करायचा, पण तो कोणत्या मर्यादेपर्यंत करायचा? हा मतभेदाचा विषय झाला. या मतभेदातून आधुनिक महाराष्ट्रामध्ये परंपरावादी व प्रगतिवादी अशा दोन संप्रदायांचा जन्म झाला. या दोन संप्रदायींनी आपआपल्या विचारांचे वाहक म्हणून 'निबंध' या साहित्यप्रकाराचा अत्यंत समर्पक व समर्थ अवलंब या काळात केलेला दिसतो. प्रस्तुत काळातील सर्व निबंधकार हे मूलतः राजकीय व सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्ते व नेते होते, साहजिकच त्यांच्या कार्यकर्तृत्वामुळे त्यांच्या विचारांना जबरदस्त सामर्थ्य प्राप्त झाले होते. विष्णुशास्त्री चिपळूणकर, गोपाळ गणेश

आगरकर, लोकमान्य टिळक, पुढे आपल्या वैशिष्ट्यपूर्ण शैलीने निबंध लिहिणारे शि० म० परांजपे, अच्युत बळवंत कोल्हटकर इत्यादी सर्व निबंधकारांनी वृत्तपत्रीय निबंधलेखन करून राष्ट्रभावनेचा आविष्कार केला. वृत्तपत्रातील अग्रलेख/लेख हेच या काळातील निबंधाचे स्वरूप होते. या काळातील निबंधकार हे वृत्तपत्रांनी घडविले आहेत. तसेच या काळात वृत्तपत्रामध्ये राजकीय विचारधारेला प्राधान्य मिळाले होते. याशिवाय वि. घो. विजापूरकर, कृ. प्र. खाडिलकर, इतिहासाचार्य राजवाडे, भालाकार भोपटकर अशा अनेकांचा निबंधलेखनाच्या संदर्भात येथे उल्लेख करणे आवश्यक आहे. तसेच या निबंधकारांच्या जीवितकार्याची व त्यामागील राजकीय-सामाजिक तत्त्वज्ञानाची माहिती करून घेणेही आवश्यक आहे. या सर्व व्यक्तींच्या जीवनकार्यामधून राजकीय राष्ट्रवादाचा प्रवाह पुढे गेलेला दिसतो.

मागील कालखंडातील ब्रिटिशांबद्दलची राजनिष्ठा. त्यांच्या न्यायबुद्धीवरील विश्वास, ब्रिटिशांच्या मार्फतच आपला उद्धार होणार आहे ही धारणा व या सर्वांमागील सांस्कृतिक न्यूनगंडाची व पराभूततेची भावना, या सर्वांवर कठोर आघात करून भावनात्मक, आक्रमक, जहाल परंपरावादी राष्ट्रवादाचे बीजारोपण विष्णूशास्त्री चिपळूणकर यांनी केले. 'शोषक जेते' हे ब्रिटिशांचे स्वरूप त्यांनीच प्रथम ओळखले. म्हणून त्यांच्यापासून महाराष्ट्रातील सांस्कृतिक इतिहासात राष्ट्रवादाचे एक नवे पर्व सुरू झाले असे मानण्यात येते. निबंधमालेतून व्यक्त झालेल्या विचारांबरोबरच ''केसरी'', मराठा, न्यू इंग्लिश स्कूल, चित्रशाळा, किताबखाना, आर्यभूषण छापखाना, काव्येतिहाससंग्रह अशा अनेक संस्थांच्याद्वारा शिक्षण व लोकशिक्षणाच्या माध्यमातून समाजाच्या आत्मप्रत्ययाचे स्फुलिंग चेतविण्याचे अभूतपूर्व कार्य त्यांनी केले. 'स्वातंत्र्यनाश हेच सर्वात मोठे दु:ख, सर्व रोगांचे कारण, स्वातंत्र्य हीच कोणत्याही समाजाची मूलभूत स्वाभाविक स्थिती असते. आम्ही स्वातंत्र्याला लायक आहोतच व समाजाच्या लायकीवर स्वातंत्र्य अवलंबून नसते' हे त्यांच्या विचारांचे सूत्र होते.

'प्राचीन हिंदु लोकांचे ज्ञान' हा विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी लिहिलेला पहिला निबंध होय. हा निबंध त्यांनी कॉलेजमध्ये असताना लिहिला होता. पुढील कालखंडामध्ये त्यांनी हिंदुविद्या व हिंदुलोक यांविषयी जी मते प्रकट केली आहेत, त्याची बीजे त्यांच्या या निबंधात सापडतात. बी०ए० होण्यापूर्वीच वडिलांच्या म्हणजे कृष्णशास्त्री चिपळूणकर यांच्या सांगण्यावरून त्यांनी 'शालापत्रका'तून 'रासेलस'च्या अठरा-वीस भागांनंतरच्या भागांचे भाषांतर पूर्ण केले. यानंतर 'शालापत्रका'तूनच त्यांनी कालिदास, भवभूती, बाण, सुबंधु व दंडी या संस्कृत कवींवर पाच निबंध लिहिले. हेच निबंध पुढे 'संस्कृत कविपंचक' या पुस्तकात प्रसिद्ध झाले आहेत. या निबंधातून चिपळूणकरांची देशहिताची व्यापक कल्पना, वीरोचित प्रांजळपणा, श्रममहात्म्य व अभिजात रसिकता या विशेषांचे दर्शन घडते.

विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी १८७४ मध्ये निबंधमाला सुरू केली, तेव्हा त्यांचे वय २४ वर्षे होते. सात वर्षांत निबंधमालेचे एकूण ८१ अंक निघाले. 'निबंधमालेचे स्वरूप व कार्य' या पुस्तकात श्री. ल. व. पांगारकर यांनी मालेतील निबंधांचे पुढीलप्रमाणे वर्गीकरण केले आहे.

१) भाषाविषयक निबंध – 'मराठी भाषेची सांप्रतची स्थिती', 'भाषादूषण', 'लेखनशुद्धी', 'भाषापद्धती', 'भाषांतर व इंग्रजी भाषा'.

२) वाङ्मयविषयक व चर्चात्मक निबंध – 'इतिहास', 'वाचन', 'वक्तृत्व', 'विद्वत्व आणि कवित्व', 'ग्रंथावर टीका', 'डॉ० जॉन्सन', 'मोरोपंतांची कविता'.

३) परमतखंडनात्मक निबंध – 'लोकहितवादी'.

४) सामाजिक निबंध – 'संपत्तीचा उपभोग', 'लोकभ्रम'.

५) राजकीय निबंध – 'आमच्या देशाची स्थिती'.

६) मानसशास्त्रीय निबंध – 'गर्व'.

तत्कालीन सुशिक्षितांच्या सांस्कृतिक न्यूनगंडांचे निराकरण करून स्वाभिमानी राष्ट्रवाद जागविण्याचे महत्त्वाचे कार्य चिपळूणकर यांनी मालेतील निबंधांद्वारे घडवून आणले. अशा निबंधमालेची सुरुवात 'आमच्या भाषेची स्थिती' या निबंधाने झाली आणि मालेचा शेवट 'आमच्या देशाची स्थिती' या निबंधाने झाला. निबंधमालेतून व्यक्त झालेले विचार विष्णूशास्त्री चिपळूणकरांच्या गुणविशेषांचा परिचय करून देतात. 'निबंधमाला' ही चिपळूणकर यांच्या अपूर्व कर्तृत्वाचे प्रतीक आहे. केवळ एका व्यक्तीने सर्व स्तरांवर केलेले हे कार्य असल्याने ते अनन्यसाधारण असेच आहे. या कार्यासंबंधी विष्णूशास्त्र्यांना सार्थ अभिमान वाटत होता.

विष्णूशास्त्री चिपळूणकर यांच्या निबंधमालेतील निबंध वाचले की सर्वात प्रथम दर्शन घडते ते त्यांच्या ठायीच्या युयुत्सू वृत्तीचे होय. या स्वभावविशेषामुळेच ते 'बोलके सुधारक', 'परके शासक' आणि 'खोडसाळ ख्रिस्ती प्रचारक' या विरोधकांचा यथार्थ परामर्श घेतात. कुशल, कोटिक्रम हा चिपळूणकर यांच्या शैलीचा महत्त्वाचा गुणधर्म 'मोरोपंतांची कविता' या निबंधात पाहावयास मिळतो. या निबंधात त्यांनी न्या० महादेवराव रानडे यांनी मोरोपंतांच्या केकावलीवर घेतलेल्या आक्षेपांना उत्तर दिले आहे. निबंधांतून त्यांनी केलेले युक्तिवादचातुर्य यशस्वी होण्यासाठी त्यांच्याठायीचा खुपरा उपहासही साहाय्यकारक ठरला आहे, असे म्हणता येईल. तर त्यांच्या अंगी वसणारा देशाभिमान हा केवळ निबंधमालेच्याच निर्मितीला आधारभूत ठरला नाही, तर तो त्यांच्या समग्र जीवनाचाच प्रेरक भाव होता. त्यांच्या देशाभिमानाला त्याग व मुत्सद्देगिरीची जोड होती. चिपळूणकर यांच्या सर्वच लिखाणात देशभक्तीचे सूत्र गोवलेले होते. निबंधमालेतील 'मराठी भाषेची सांप्रतची

स्थिती' या पहिल्या निबंधाच्या प्रारंभी त्यांनी 'भाषेची अभिवृद्धी ही देशाच्या उत्कर्षाचे मोठे साधन असून ते प्रयत्नांनी साधणारे आहे' असा सिद्धान्त मांडला आहे. निबंधमालेतील कोणताही निबंध वाचला तरी त्याद्वारे वाचकांच्या मनातील देशभक्तीची भावना जागवली जाईल, अशाच हेतूने त्यांची मांडणी केलेली दिसते. निबंधमालेतील पहिला निबंध 'मराठी भाषेची सांप्रतची स्थिती' हा असून 'आमच्या देशाची स्थिती' हा तिच्यातील शेवटचा निबंध आहे. निबंधमालेतील आपले लिखाण इंग्रज सरकारच्या डोळ्यांवर येऊ नये आणि वाचकांनीही सुरुवातीलाच भांबावून जाऊ नये, असा विचार करून त्यांनी सुरुवातीला मालेतून भाषाविषयक प्रश्नांवर निबंध लिहिले. मात्र या निबंधांतूनही त्यांनी देशाभिमानाच्या भावनेचा जेवढा शक्य होईल तेवढा आविष्कार केला आहे. यानंतर मात्र पारतंत्र्याबद्दल उघड उघड द्वेष उत्पन्न करणारा व जनतेची स्वातंत्र्याकांक्षा जागृत करणारा निबंध त्यांनी लिहिला.

मुत्सद्दीपणा हा चिपळूणकरांच्या व्यक्तित्वाचा विशेष गुण होता. तत्कालीन सुधारकांवर, मिशनऱ्यांवर, हिंदुस्थानच्या द्वेष्ट्यांवर त्यांनी जी झोड उठविली त्यातून त्यांच्यावरील गुणविशेषांचे दर्शन घडते. याचबरोबरीने बहुश्रुत रसिकता हाही त्यांचा व पर्यायाने निबंधमालेचा एक महत्त्वाचा गुणधर्म सांगता येतो. मालेतील प्रत्येक निबंधाच्या प्रारंभी येणारी समर्पक अवतरणे नानाविध दृष्टान्त व तळटीपा इत्यादींतून त्यांच्याठायीच्या वरील गुणधर्माचे दर्शन घडते. उदाहरणार्थ, 'भाषापद्धति' या निबंधात 'थोरले माधवराव', 'जयपाल' व 'मनोरमा' ही नाटके उत्कृष्ट आहेत असे सांगताना त्यांनी दिलेली तळटीप यादृष्टीने पाहाता येईल. निबंधमालेच्या लोकप्रियतेला चिपळूणकर यांच्या बहुश्रुत रसिकतेबरोबर त्यांची मनोवेधक वर्णनशैली व भावनोदीपक भाषाशैलीही कारण ठरली आहे. 'भाषापद्धति' या निबंधात त्यांनी चांगल्या वर्णनशैलीबद्दलचे आपले विचार व्यक्त केले आहेत. चटकदार, खुमासदार, डौलदार व भावनाशील भाषेचा प्रत्यय त्यांच्या निबंधांतून येतो. त्यांच्या भाषाशैलीला भावनेचा स्पर्श लाभल्यामुळेच तत्कालीन सुशिक्षितांची मराठी भाषेविषयीची उपेक्षा नष्ट करून त्यांच्या मनात मराठी भाषेविषयी यथार्थ अभिमान उत्पन्न करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य निबंधमालेने केले. देशसेवेचे एक अंग म्हणून आपल्या मातृभाषेत जास्तीत जास्त लेखन करायचे. या राष्ट्रीय महत्त्वाकांक्षेने प्रेरित होऊन चिपळूणकरांनी निबंधमाला सुरू केली. निबंधमाला सुरू करताना 'प्रस्तुत मालेचा उद्देश' या लेखात म्हटल्याप्रमाणे त्यांनी मालेद्वारे मायभाषा आणि पर्यायाने मायभूमीची सेवा निर्धारपूर्वक, अपूर्व निष्ठेने व आदर्श परिश्रमशीलतेने केली. यासाठी त्यांनी संस्कृत आणि इंग्रजी भाषेतील ज्ञानभांडार मराठीत आणून मराठी भाषा वैचारिक दृष्ट्या समृद्ध करण्याची मनिषा बाळगली. इंग्रजी भाषेतील ज्ञानभांडार मराठीत आणल्यानेच मराठीला उज्ज्वल भविष्यकाळ प्राप्त होणार आहे, याची त्यांना स्पष्ट कल्पना होती. आपल्या भाषेचे स्वत्व कायम राखून इंग्रजीतील विचार, विविध वाङ्मयप्रकार, वाक्यरचनापद्धती आणि काही शब्दही मराठीने स्वीकारले पाहिजेत

अशी त्यांची व्यापक व उदार भूमिका होती. त्यांची ही भूमिका 'भाषादूषण' व 'भाषापद्धती' या निबंधमालेतील निबंधात आणि 'परभाषेतील शब्दांची योजना' या 'केसरी' तील निबंधातून स्पष्ट होते. आधुनिक मराठीत जी गद्यलेखनपद्धती रूढ झाली ती इंग्रजीतून घेतलेली आहे, हे इंग्रजीचे ऋण त्यांनी मोकळ्या मनाने मान्य केले आहे.

भाषापद्धतीप्रमाणेच लेखनशुद्धीच्या बाबतीतही चिपळूणकरांची वृत्ती अत्यंत प्रगत स्वरूपाची होती. भाषेची जी रूपे, जे प्रयोग समाजात बराच काळपर्यंत रूढ झाले असतील, ते त्याच स्वरूपात भाषेत आत्मसात करायला हरकत नाही असे त्यांनी 'लेखनशुद्धी' या निबंधात म्हटले आहे.

चिपळूणकर यांनी आपल्या निबंधमालेकडे महाराष्ट्राला राष्ट्रवाद शिकविणारे एक हत्यार किंवा माध्यम म्हणून पाहिले. विशेष म्हणजे ही राष्ट्रभक्ती जनमानसाच्या मनात सहजतेने उत्पन्न होण्यासाठी त्यांनी मालेतील मुख्य निबंधाबरोबरच भाषापरिज्ञान, चमत्कारिक माहिती, विनोद, महदाख्यायिका, सुभाषिते इत्यादी उद्‌बोधक व चटकदार सदरे सुरू केली. आधुनिक मराठीत निबंध, चरित्र आणि टीका हे वाङ्‌मयप्रकार सर्वप्रथम निबंधमालेने आणले. विष्णूशास्त्री चिपळूणकरांपूर्वी लोकहितवादींनी मराठीत निबंधलेखन केले आहे. पण एक वाङ्‌मयप्रकार म्हणून त्यांनी निबंधांकडे पाहिले नाही. म्हणून एक वाङ्‌मयप्रकार म्हणून निबंधांची रचना आधुनिक मराठीमध्ये सर्वप्रथम चिपळूणकर यांनी केली असेच म्हणावे लागते. 'डॉ० जॉन्सन' या त्यांच्या चरित्रलेखनपर निबंधाने आधुनिक मराठीत चरित्रलेखनाचे एक नवे दालन सुरू केले. 'ग्रंथावर टीका' हा स्वतंत्र लेख लिहून आदर्श टीका आदर्श टीकाकार यासंदर्भात त्यांनी विवेचन केले. आणि याचे उपयोजन त्यांनी 'टेम्पेस्ट', 'वेदार्थयत्न', 'रसायनशास्त्र', 'ज्ञानेश्वरी परिभाषा', 'तारा नाटक', 'ब्राह्मणांची गुलामगिरी' इत्यादी पुस्तकांची परीक्षणे लिहून केले.

निबंधमालेने महाराष्ट्रात लेखक, टीकाकार यांची एक उज्ज्वल परंपरा निर्माण केली. ह० ना० आपटे, शि० म० परांजपे, वि० का० राजवाडे, श्री० कृ० कोल्हटकर, न० चिं० केळकर, ल० रा० पांगारकर इत्यादी लेखकांनी निबंधमालेपासून प्रेरणा घेऊन लेखन केले आहे.

निबंधमाला बंद करण्यापूर्वी विष्णूशास्त्री चिपळूणकर यांनी लोकमान्य टिळक व गोपाळ गणेश आगरकर यांच्या सहकार्याने 'केसरी' व 'मराठा' ही दोन वर्तमानपत्रे सुरू केली. विष्णूशास्त्री चिपळूणकर यांनी जानेवारी १८८१ ते १४ मार्च १८८२ याकाळात 'केसरी' त एकूण पंधरा लेख (निबंध) प्रसिद्ध केले आहेत. ते पुढीलप्रमाणे, 'नवनीताची नवीन आवृत्ती', 'लॉर्ड बेकन', 'ज्याचा त्याचा ब्राह्मणावर कटाक्ष', 'आपल्या देशातील सभा व मंडळ्या', 'मराठी ग्रंथोत्तेजक मंडळी', 'परभाषेतील शब्दांची योजना', 'अनुकरण', 'देशभाषीय ग्रंथसंग्रहाची आवश्यकता',

'नाटके करावी की करू नयेत?', 'सिंहावलोकन', 'भोजनगृह', 'मुद्रणस्वातंत्र्य' आणि 'देशोन्नति' हे होय. 'देशोन्नति' या विषयावरील दुसरा लेखांक १४ मार्च १८८२ रोजी लिहिल्यानंतर तीनच दिवसांनी १७ मार्च १८८२ रोजी विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचे निधन झाले.

थोडक्यात, विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या निबंधात राष्ट्रवादाचे, राष्ट्रीय विचारांचे अत्यंत ऊर्जस्वल, तेजस्वी, उत्तेजक स्वरूप पाहावयास मिळते. 'आमच्या देशाची स्थिती' हा त्यांचा एक निबंध पाहिला तरी याचा प्रत्यय येतो. तसेच 'निबंध' या वाङ्मयप्रकाराचे अत्यंत प्रगल्भ व प्रौढ रूप विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या निबंधात सर्वप्रथम विकसित झालेले दिसते. समाजप्रबोधनाच्या उद्देशाने 'निबंध' या साहित्यप्रकाराचा अत्यंत समर्पक व समर्थ वापर त्यांनी व इतर निबंधकारांनी या काळात केलेला दिसतो. मराठीतील आधुनिक गद्याचे जनकत्व विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्याकडे जाते. आणि आधुनिक मराठीतील प्रभावी गद्यलेखनाची परंपरा निर्माण करण्याचे श्रेयही विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचेच आहे.

विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या भावनात्मक, जहाल, आक्रमक, परंपरानिष्ठ राष्ट्रवादाला प्रथम टिळक-आगरकर व नंतर एकटे टिळकच अनुयायी लाभले व त्यांचाच प्रभाव पुढील ३०-३५ वर्षांच्या कालखंडभर जाणवत राहिला. लोकमान्य टिळकांनी विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचा वारसा पुढे चालविला. हे करताना त्यांना स्वातंत्र्याच्या अग्रक्रमाच्या संदर्भात गोपाळ गणेश आगरकरांशी तर दुसऱ्या बाजूने स्वातंत्र्याच्या व्याप्तीबद्दल व मार्गाबद्दल न्या० महादेव गोविंद रानडे यांच्याशी तीव्र संघर्ष करावा लागला. वास्तविक पाहाता लोकमान्य टिळक व गोपाळ गणेश आगरकर यांच्या विचारांच्या मुळाशी असलेली प्रेरणा एकच होती. पण राष्ट्रवादाच्या व त्याद्वारा प्राप्त होणाऱ्या स्वातंत्र्याच्या स्वरूपासंदर्भात मात्र त्यांच्यात तीव्र मतभेद होते. यातूनच 'आधी राजकीय की आधी सामाजिक' हा प्रश्न अनेक वर्षे महाराष्ट्रात ऐरणीवर राहिला. आगरकरांचे अज्ञेयवादी वैचारिक व्यक्तित्व स्पेन्सरच्या तत्त्वज्ञानावर पोसले होते. यामुळे व्यक्तिवाद, इहवाद व वैज्ञानिकता यांचा आग्रह त्यांनी धरला. समाजरचनेत आणि समाजधारणेत आमूलाग्र बदल आल्याशिवाय येणाऱ्या स्वातंत्र्याला काहीही अर्थ नाही या विचारातून जहाल राष्ट्रवादाला सर्वांगीण सुधारणावादाचे भक्कम अधिष्ठान देण्याची आवश्यकता त्यांनी आग्रहाने मांडली. तर राजकीय स्वातंत्र्यप्राप्ती हे अग्रक्रमाचे ध्येय असले पाहिजे ही लोकमान्य टिळक यांची आग्रहाची भूमिका होती. टिळक व आगरकर यांचा वाद हा प्राधान्याने अग्रक्रमाचा वाद होता. या पार्श्वभूमीवर गोपाळ गणेश आगरकर आणि लोकमान्य टिळक यांच्या निबंधलेखनाचा विचार करता येईल.

गोपाळ गणेश आगरकर यांनी १८८१ ते १८८७ या काळात 'केसरी' चे संपादन केले. १८८८ साली त्यांनी 'सुधारक' हे स्वतंत्र वर्तमानपत्र काढले.

'केसरी' आणि सुधारकाच्या संपादकाच्या भूमिकेतून त्यांनी जे लेखन केले त्यातून त्यांच्या बुद्धिप्रामाण्यवादी, नवमतवादी व्यक्तित्त्वाचे दर्शन घडते. 'केसरी' तील निवडक निबंध' या पुस्तकात त्यांनी 'केसरी' त लिहिलेले निबंध एकत्र छापलेले आहेत. मात्र या पुस्तकातील 'अनुकरण', 'भोजनगृह', 'नाटके करावी की करू नये?' आणि 'मुद्रणस्वातंत्र्य' हे निबंध बेलसरे संपादित विष्णूशास्त्री चिपळूणकर यांच्या किरकोळ लेखसंग्रहातही समाविष्ट आहेत.

वरील निबंधांशिवाय ''केसरी'' तील निवडक निबंध' या पुस्तकात 'आम्ही आमच्या दारिद्र्यातून कसे सुटू', 'व्यापाराशिवाय तरणोपाय नाही' यांसारखे आर्थिक विषयावरील निबंध, 'दागिन्यांचा सोस', 'सासुरवास', 'हिंदुस्थान देश बुडाला हो बुडाला', 'सास्वांस नोटीस' यांसारखे सामाजिक विषयांवरील निबंध, 'कै० विष्णु कृष्ण चिपळोणकर' असा व्यक्तिप्रधान निबंध, 'शेक्सपिअर, भवभूति व कालिदास', 'कवि, काव्य, काव्यरति' यांसारखे वाङ्मयविषयक निबंध इत्यादी निबंधांचा समावेश आहे.

वरील निबंधांपैकी 'हिंदुस्थान देश बुडाला हो बुडाला' हा निबंध स्त्रीशिक्षणामुळे सर्व समाज रसातळाला जाईल, या सनातनी लोकांच्या समजुतीवर हल्ला करणारा आहे. प्रस्तुत निबंधात आगरकरांच्या सुधारणावादी, पुरोगामी व्यक्तित्वाचे जसे दर्शन घडते तसेच 'शेक्सपिअर, भवभूति व कालिदास' या निबंधात त्यांच्या नाट्याभ्यासाचे दर्शन घडते. आगरकर यांना नाट्यगुणांच्या दृष्टीने भवभूति हा कालिदासापेक्षा श्रेष्ठ आणि भवभूतिपेक्षा शेक्सपिअर श्रेष्ठ वाटतो. 'कवि, काव्य, काव्यरति' या निबंधात ते' काव्यवाचनाने आनंद का होतो?' 'काव्य या संज्ञेची व्याप्ती किती?' यांसारख्या 'काव्य' या वाङ्मयप्रकारासंदर्भातील संज्ञांचे मूलग्राही विवेचन करतात. असे विवेचन करताना ते शास्त्रीय ज्ञान व काव्यनिर्मिती या दोन परस्परप्रतिकूल गोष्टी नाहीत असा विचार व्यक्त करतात. तर 'गुरूगोविंद' यासारख्या त्यांच्या निबंधावरून त्यांना सर्वसामान्य जनतेच्या क्रांतिकारी शक्तीची स्पष्ट जाणीव होती, हेही लक्षात येते.

समाजामध्ये आमूलाग्र बदल करून समता प्रस्थापित करता आली नाही तर येणाऱ्या स्वातंत्र्याला काही अर्थ राहाणार नाही, असे आगरकर यांचे ठाम मत होते. म्हणून जहाल राष्ट्रवादाला सर्वांगीण सुधारणावादाचे भक्कम अधिष्ठान दिले पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता. भावी समाजस्थितीचे समग्र चित्र मांडल्याशिवाय तत्कालीन सुधारणा व अंतिम उद्दिष्ट यांच्यात मेळ निर्माण होऊन सुधारणेला दिशा व गती प्राप्त होणार नाही ही त्यांची पक्की धारणा होती. याचा परिणाम म्हणून आगरकरांनी १८८८ मध्ये 'सुधारक' हे स्वतंत्र वर्तमानपत्र काढले. 'सुधारका'तील निबंधांतून आगरकरांची जीवनदृष्टी प्रकट झाली आहे.

'सुधारका'तील आगरकरांचे निबंध स्थूल स्वरूपात चार प्रकारांत विभागता येतात.

१) व्यक्तिजीवनातील नित्यनैमित्तिक स्वरूपांच्या विषयांवरील निबंध. उदाहरणार्थ, 'आमच्या स्त्रियांचा पेहराव', 'सोवळ्याची मीमांसा', 'आमचे प्रेत संस्कार', 'हजामत', 'ग्रहण', 'जोडा' इत्यादी. या निबंधांतून आगरकर यांचे समाजजीवनाचे निरीक्षण किती सूक्ष्म व मार्मिक होते हे लक्षात येते. तसेच समाजातील रूढ आचारविशेषात त्यांनी सुचविलेल्या सुधारणा, उपयुक्ततावाद व सौंदर्यवाद यांचा त्यांनी घातलेला मेळ इत्यादींचाही प्रत्यय येतो.

२) संशोधनात्मक व ऐतिहासिक स्वरूपाचे निबंध. उदाहरणार्थ, 'देवतोत्पत्ती', 'मूर्तिपूजा', 'बहुपत्नीकत्वाची चाल', 'मरणोत्तर आत्म्याची स्थिती', 'बळी देण्याची पद्धती', 'विजयलांछने', 'भारतीय कलांचे पुराणत्व' इत्यादी. यांपैकी 'भारतीय कलांचे पुराणत्व' ही चार लेखांची लेखमाला आगरकर यांच्या बहुश्रुततेची व व्यासंगशीलतेची साक्ष पटविते.

३) मतभेदांच्या विषयावरील लेख. उदाहरणार्थ, 'सामाजिक सुधारणा आणि कायदा', 'संमतिवयाचे बिल', 'जात का करीत नाही ?', 'इष्ट असेल ते बोलणार व साध्य असेल ते करणार!', 'होऊच द्या तर दोन हात!', 'मि० अशबरनर आणि हिंदू विधवा', 'आणखी एक शाहाण्याचा कांदा' यांसारख्या निबंधांतून आगरकरांच्या ठायी वसणारा उद्दाम आणि युयुत्सू आत्मविश्वास प्रकट झाला आहे.

४) स्त्रीजीवनासंदर्भात लिहिलेले निबंध. उदाहरणार्थ, 'स्त्रियांना चरितार्थ संपादक शिक्षण देण्याची आवश्यकता', 'विवाहनिराकरण अथवा घटस्फोट', 'स्वयंवर', 'प्रियाराधन', 'वल्लभोपासना', 'स्त्रीपुरुषांना शिक्षण द्यावे व तेही एकत्र द्यावे' इत्यादी. आगरकरांचे हे निबंध वाचले की लक्षात येते की, युगानुयुगांच्या सामाजिक गुलामगिरीच्या अनेक बंधनांच्या जाचांतून स्त्रीला मुक्त करण्यास व तिच्या व्यक्तिमत्त्वाच्या सर्वांगीण विकासास अनुकूल असे वातावरण निर्माण करण्यास साहाय्यकारक ठरतील असे निबंध मराठीत प्रथम आगरकरांनीच लिहिले. आगरकरांचे हे निबंध म्हणजे 'भारतीय स्त्रीच्या स्वातंत्र्याची सनद आहेत' असे म्हटले तर वावगे ठरू नये.

आगरकर यांच्या निबंधवाङ्मयाचा विचार करता या निबंधांतून त्यांना अभिप्रेत असलेला बुद्धिप्रामाण्यवाद, व्यक्तिस्वातंत्र्य, मनुष्यतेचे ऐहिक सुखवर्धन आणि सामाजिक सुधारणेच्या अंगाने येणारी पाश्चिमात्य संस्कृती इत्यादींचे दर्शन घडते. जॉन स्टुअर्ट मिल आणि हर्बर्ट स्पेन्सर यांच्याकडून आगरकर यांनी सर्वंकष बुद्धिप्रामाण्यवाद घेतला आणि महाराष्ट्राला प्रखर बुद्धिवाद सर्वांत प्रथम आगरकर यांनीच शिकविला. येथे हे लक्षात घेतले पाहिजे की आगरकर यांना अभिप्रेत असलेला बुद्धिवाद हा केवळ ऐहिक सुखाची अपेक्षा धरणारा एवढ्याच अर्थाने

मर्यादित नसून तो उच्च प्रकारचे मानसिक आणि नैतिक सुख देणारा आहे. 'सुधारक काढण्याचा हेतू' या 'सुधारका'तील पहिल्याच लेखात त्यांनी व्यक्तिस्वातंत्र्याच्या पुरस्काराचा हेतू स्पष्ट शब्दांत प्रकट केला आहे. त्यांच्यामते 'समाजाची जास्तीत जास्त उन्नती साधण्याकरता आवश्यक असतील तेवढी बंधने व्यक्तीजीवनावर घातल्यावर मग व्यक्तीला जास्तीत जास्त स्वातंत्र्य दिले पाहिजे' याचा अर्थ आगरकर यांचा व्यक्तिस्वातंत्र्याचा विचार एकांगी नसून जीवनाच्या सर्व अंगांना व्यापणारा होता. उदाहरणार्थ, 'तरुण सुशिक्षितांस विज्ञापना' या निबंधात त्यांनी समाजातील व्यक्तींचे तीन वर्ग कल्पिलेले आहेत. विचार करणाऱ्या व्यक्ती, सुखदु:खाचा अनुभव घेणाऱ्या व्यक्ती आणि कृती करणाऱ्या व्यक्ती. या तीन वर्गातील असमानता कायम राहिली तर समाजात आपत्ती ओढवेल, असे सांगताना ते साम्यवादाला अभिप्रेत असलेल्या समतेचा निर्देश करतात. तर 'फेर जमाबंदी आणि लष्करी खर्च' या सुधारकातील अग्रलेखात त्यांनी सामाजिक सुधारणेच्या जोडीने राजकीय स्वातंत्र्य व आर्थिक समानता या गोष्टीही तेवढ्याच महत्त्वाच्या आहेत, असे सांगितले आहे. याचा अर्थ आगरकर यांना सामाजिक सुधारणांबरोबर राजकीय व आर्थिक सुधारणांविषयीही तळमळ वाटत होती. म्हणजेच आगरकर यांना सर्वंकष सुधारणा अपेक्षित होती असे म्हणता येईल. 'सुधारणा आणि कलह' या निबंधात त्यांनी 'माणसाचे ऐहिक सुखवर्धन' याविषयी लिहिताना माणसाचे ऐहिक सुखवर्धन हा 'भावी सार्वत्रिक धर्म' आहे म्हणून सांगितले आहे. आगरकरांना अभिप्रेत असलेली ऐहिकता ही परोपकार, सदाचार, सत्यनिष्ठा आणि आत्मसंयम या पायांवर उभी आहे. त्याचबरोबरीने परलोक, देव-दानव, भूतपिशाच्च, पूर्वजन्म, पुनर्जन्म यांसारख्या भ्रामक अज्ञानी संकल्पना बाजूला सारून माणसांनी ऐहिक उन्नतीवर लक्ष केंद्रित केले पाहिजे, असेही त्यांनी आग्रहाने प्रतिपादिले आहे.

आगरकर यांनी पाश्चात्य शिक्षणाचा व त्याद्वारे येणाऱ्या नवीन विचारांच्या स्वीकृतीबद्दलचा आग्रह धरला. 'सुधारक काढण्याचा हेतू' या 'सुधारका'तील पहिल्याच निबंधात त्यांनी भारतीय संस्कृतीला पाश्चिमात्य विद्येची जोड दिली पाहिजे असे सांगितले आहे. कारण पाश्चिमात्य विद्येत असलेल्या सामाजिक सुधारणांच्या तत्त्वांचा समावेश त्यांना महत्त्वाचा वाटत होता. पण याचवेळी पाश्चिमात्य संस्कृती आत्मसात करताना आपले भारतीयत्व जपले पाहिजे, असेही त्यांनी आवर्जून सांगितले आहे. 'इष्ट असेल ते बोलणार व साध्य असेल ते करणार' या निबंधात भारतीयत्वात आजच्या समाजहिताला उपकारक असणाऱ्या गोष्टी पाश्चात्य विद्येच्या स्वीकृतीनंतरही राहातील असे त्यांनी निक्षून सांगितले आहे. म्हणूनच आचार्य जावडेकर त्यांच्या या विचारांना 'विवेकनिष्ठ' राष्ट्रवाद म्हणून गौरवितात.

थोडक्यात, पाश्चिमात्य विद्येचा अंगिकार करताना राजकीय प्रांतात फक्त तिचा विचार करायचा आणि सामाजिक व धार्मिक क्षेत्रात मात्र बुरसटलेले प्रतिगामी आचरण ठेवायचे, ही विसंगती आगरकरांना मान्य नव्हती. म्हणूनच पाश्चात्यांच्या

राजकीय कल्पनांचे अनुसरण करून राष्ट्रसभा उभारायची पण सामाजिक स्तरावर मात्र रूढ आचारविचारांचेच काटेकोर पालन करायचे. या महाराष्ट्रीयांच्या दुटप्पी वृत्तीवर त्यांनी आपल्या निबंधांतून कठोर प्रहार केले आहेत.

गोपाळ गणेश आगरकर यांचे निबंध विचारांबरोबर वाङ्मयीन गुणांनीही समृद्ध आहेत. उदाहरणार्थ, पाश्चात्य विचार इंग्रजीतून मराठीत आणताना त्यांनी मराठीत नवीन पर्याय शब्द तयार केले आणि भाषेच्या शब्दसंग्रहात मोलाची भर घातली. उदाहरणार्थ, सुखावस्थेची परमावधी (मॅक्झिमम ऑफ हॅपीनेस), लिंगविशिष्ट नीती (सेक्शुअल मोरॅलिटी), झगेदार बायका (गाऊन्ड वुमन), अस्तित्वतत्त्व (लॉ ऑफ लाईफ) इत्यादी. संस्कृतप्रचुर भाषेचा वापर हाही त्यांच्या लेखनशैलीचा महत्त्वाचा गुण सांगता येईल. उदाहरणार्थ, उपायन, कृष्णरेषा इत्यादी शब्दांचा त्यांनी केलेला वापर तसेच स्वामी-सेवक, श्रेष्ठ-कनिष्ठ, जित-जेते, नियामक-नियत अशा शब्दांच्या जोड्यांचाही ते निबंधांमध्ये सढळ हस्ते वापर करताना दिसतात. नेटीव, कोर्ट, प्रोफेसर, आर्टिकल यांसारख्या इंग्रजी शब्दांचा जसाच्या तसा केलेला वापरही त्यांच्या निबंधात पाहावयास मिळतो.

आगरकर यांची वाक्यरचना मात्र लांबच लांब पल्लेदार अशी असून ती वक्तृत्वगुणांनी नटलेली आहे. याचे कारण निबंधाचे लेखन करताना आगरकरांनी आपल्या नजरेसमोर समूह ठेवत होता. साहाजिकच 'विषयलंपट नि:शक्त वाचाळ बाबूंनो', 'निर्दय वंचका' अशी वाक्यरचना त्यांच्या निबंधात पाहावयास मिळते. तसेच प्रतिपाद्य विषय लोकमाणसाच्या गळी उतरविण्यासाठी त्यांनी विषयपरत्वे निबंधातून शृंगार, वीर, करुण, बीभत्स, भयानक अशा विविध रसांचाही परिपोष केला आहे. उदाहरणार्थ, 'होऊच द्या तर दोन हात' या निबंधातील वीररसाचा उठाव, 'शहाण्याचा मूर्खपणा अथवा आमचे प्रेतसंस्कार' या निबंधांतील बीभत्स आणि भयानक रसाचा आविष्कार इत्यादींचा उल्लेख करता येईल. आगरकरांचे निबंध अलंकार सौंदर्यानेही नटलेले आहेत. उदाहरणार्थ, नव्या सुनेचे वर्णन करताना सासू, सासरा, नणंद इत्यादींसाठी त्यांनी योजलेले व्याघ्राचे रूपक आणि सुनेवर केलेले बाळकुरंगीचे रूपक करुण रसाला उठाव देणारे आहे. आगरकरांच्या लेखनशैलीवर विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या निबंधमालेच्या लेखनशैलीचाही प्रभाव आहे. उदाहरणार्थ, 'आमची एक दुष्ट खोड : आळस' हा निबंध.

आगरकर यांच्या निबंधाचा विचार करता लक्षात येते की आगरकरांच्या व्यक्तित्वाचे सारे गुणविशेष त्यांच्या निबंधात स्पष्टपणे दिसतात. स्वार्थत्याग व नि:स्पृहता या अनुषंगाने येणारे निर्भयता, सत्यनिष्ठा, विनोदपरता, सडेतोडपणा हे गुण जसे त्यांच्या व्यक्तित्वाचे आहेत तसेच ते त्यांच्या निबंधांचेही आहेत, असे म्हणता येते. दुर्दम्य आशावाद हा त्यांच्या समग्र जीवनाचा स्थायीभाव होता. तोच आशावाद त्यांच्या विचारातही प्रतित होत राहातो. 'सुधारकांस जातीतून हुसकून'

काढण्याचा प्रयत्न सनातनी लोकांकडून होत असला तरी अंतिम विजय हा सुधारणेचाच होईल, असा ठाम विश्वास त्यांना वाटत होता. 'महाराष्ट्रीयांस अनावृत्त पत्र' या निबंधाचा समारोप करताना त्यांनी लिहिलेला आत्मचरित्रपर मजकूर यादृष्टीने बोलका आहे. थोडक्यात, त्यांनी निबंधांतून मांडलेल्या विचारांबद्दलच्या आत्यंतिक आस्थेमुळे आणि कळकळीमुळे त्यांचे सर्व निबंधलेखन वाचनीय झाले आहे.

आगरकर यांच्या वैचारिकतेच्या पातळीवरील संघर्षाला काळाच्या व समाजस्थितीच्या मर्यादा असल्या तरी ते क्रांतिकारक विचारवंत होणे हे विसरून चालणार नाही. व्यक्तिवाद व इहवादाच्या उदयाची युरोपमधील कारणे आणि हिंदुस्थानातील परिस्थिती यामध्ये बरीच मोठी तफावत असल्याने ही तत्त्वे येथे लगेचच स्वीकारली गेली नाहीत. असे असले तरी तत्कालीन कालखंडात सामाजिक, धार्मिक आणि विशेषकरून स्त्रीप्रश्नांविषयक जनजागृती करण्याचे जे महान व महत्त्वपूर्ण कार्य आगरकर यांच्या निबंधवाङ्मयाने केले आहे, त्याचे मोल असाधारण असेच आहे.

लोकमान्य टिळकांच्या मते आगरकरांचे विचार कल्पनानिष्ठ बुद्धिवादाचे होते. अशा प्रकारच्या विचारांतून सहसा कोणतीही नवीन मूल्ये रूजण्याची शक्यता नसते. म्हणून इंग्रजांशी कराव्या लागणाऱ्या स्वातंत्र्य संघर्षात समाजाच्या शक्ती सामाजिकतेसारख्या इतर प्रांतात खर्च करणे हिताचे ठरणार नाही. उलट या सर्व शक्ती एकवटून राजकीय पारतंत्र्यावर आघात केला तरच राजकीय स्वातंत्र्य प्राप्त करणे शक्य आहे. आणि पारतंत्र्यात राजकीय स्वातंत्र्यप्राप्ती हेच अग्रक्रमाचे ध्येय असले पाहिजे, अशी त्यांची मनोमन धारणा होती.

लोकमान्य टिळक हे परंपरावादी संप्रदायाचे प्रमुख आणि अत्यंत प्रभावशाली पुरस्कर्ते होते. भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामाच्या इतिहासात लोकमान्य टिळक यांच्या ''केसरी''तील निबंधांना' स्वतंत्र आणि महत्त्वाचे स्थान आहे. लोकमान्य टिळक यांनी 'केसरी' त लिहिलेल्या निबंधांचे (लेखांचे) एकूण चार खंड प्रसिद्ध झालेले आहेत. या निबंधांपैकी तीन-चतुर्थांश निबंध राजकीय विषयांना वाहिलेले असून उरलेल्या एक चतुर्थांश निबंधांत समाज, धर्म, तत्त्वज्ञान, चरित्र, भाष्य, संशोधन, शिक्षण, आर्थिक प्रश्न अशा भिन्न भिन्न विषयांसंदर्भातील विचार व्यक्त केले आहेत.

'महाराष्ट्र भाषेची वाढ' या विषयावरील तीन निबंधांमध्ये त्यांनी भाषेच्या विकासासंबंधीचा एक सर्वमान्य सिद्धान्त मांडला आहे. हा सिद्धान्त मांडताना त्यांना मराठी भाषेच्या विकासाची मर्यादाही ज्ञात होती. तसेच हिंदी राष्ट्रभाषा झाल्यानंतर मराठीच्या विकासाचे कार्यक्षेत्र संकुचित होईल, हेही त्यांना माहीत होते.

लोकमान्य टिळक यांची प्रखर राष्ट्रवादी जीवनदृष्टीवर उदंड श्रद्धा होती. या श्रद्धेतून त्यांनी 'केसरी' त जे निबंध (लेख) लिहिले आहेत ते केवळ राज्यकर्त्यांकरिता नसून त्यांच्या मनातले विचार, मनातील तळमळ किंवा जळफळ सर्व वाचकांच्या मनात उतरावी हाही त्यामागे उद्देश होता. लोकमान्य टिळक यांचे स्वातंत्र्या संदर्भातील विचार निश्चित स्वरूपाचे आणि आग्रही होते. परिणामी 'आमची अशी खात्री आहे', 'हे स्पष्ट सिद्ध होते' अशा तऱ्हेची वाक्यरचना त्यांच्या निबंधात येते. लोकमान्य टिळक यांच्या मर्द, निर्भीड व लढाऊ व्यक्तिमत्त्वाचा भाग म्हणूनच त्यांच्या निबंधांना कडक, जलाल स्वरूप प्राप्त झालेले आहे. या निबंधांतून त्यांनी जे विचार मांडले ते साधार, सप्रमाण, तर्कशुद्ध आणि बिनतोड असेच आहेत. उदाहरणार्थ, 'रा० रानडे यांचे अपूर्व युक्तिचापल्य' हा त्यांचा निबंध रानड्यांप्रमाणेच त्यांच्याही अपूर्व युक्तिचापल्याचा उत्कृष्ट नमुना आहे.

लोकमान्य टिळक यांच्या व्यक्तित्वाचा 'पांडित्य' हाही एक महत्त्वाचा विशेष होता. 'खाल्डियन व भारतीय वेद', 'सांडलेली सांख्यकारिका', 'वेदान्त ज्योतिष' हे त्यांचे तीन निबंध त्यांच्या अंगी असलेल्या पांडित्याचे निदर्शक आहेत. असे असूनही त्यांचे लिखाण मात्र जड किंवा दुर्बोध झालेले नाही. उलट त्यांच्या निबंधांनी मराठी लेखकांसमोर सुबोध निबंधलेखनाचा एक उत्तम आदर्श नमुना ठेवला. उदाहरणार्थ, 'केसरी' तील लेखांच्या पहिल्या भागात 'सोन्यारूप्याचे नाणे' या विषयावरील त्यांचे पाच निबंध यादृष्टीने पाहाता येतील. समर्पक शब्द, संस्कृत भाषेविषयीचे प्रेम, महाभारताच्या भाषाशैलीचा प्रभाव हे त्यांच्या शैलीचे विशेष असून त्यांचा मूळ पिंड हा पंडिताचा आणि त्यांनी स्वीकारलेल्या व्रताच्या प्रचारकाचा होता. साहाजिकच त्यांनी या निबंधांकडे विचार व्यक्त करण्याचे एक प्रभावी साधन या अर्थानेच पाहिले, हेही येथे लक्षात घेणे आवश्यक आहे.

लोकमान्य टिळक यांच्या 'केसरी' तील निबंधांनी मराठी भाषा शुद्ध व भारदस्त कशी लिहावी हे शिकविले. तसेच त्यांनी आपल्या लेखणीने व कार्याद्वारे महाराष्ट्राला परंपरावादाची शिकवणही दिली. उदाहरणार्थ, शिवजयंति उत्सव, गणेशोत्सव इत्यादींना त्यांनी अत्यंत उत्साहाने दिलेली चालना, त्याचप्रमाणे इ०स० १९०३ मध्ये प्रो० जिनसीवाले यांच्या मृत्यूनंतर त्यांनी 'केसरी' त त्यांच्यावर लेख लिहिला. या लेखात त्यांनी प्रो० जिनसीवाले यांच्या हिंदुत्वनिष्ठेचा उल्लेख करून, त्यांच्या चरित्रापासून तरुण मंडळींनी बोध घ्यावा, अशी सूचना केली आहे.

लोकमान्य टिळक यांनी राजकीय सुधारणांचा अत्यंत हिरहिरीने पुरस्कार केला. सामाजिक सुधारणांच्या बाबतीत मात्र ते माघार घेताना दिसतात. याचे कारण राष्ट्रीय उन्नतीला सामाजिक सुधारणा कोणत्याही प्रकारे उपकारक ठरत नाहीत असा त्यांचा ठाम विश्वास होता. 'सामाजिक सुधारणेचे मार्ग' या 'केसरी' तील निबंधात त्यांच्याठायीचा परंपरावाद स्पष्ट स्वरूपात प्रकट झालेला आहे. येथे १८९६ साली

प्रथम सयाजीराव गायकवाडांच्या बाबतीत व १९०० मध्ये राजर्षी शाहु छत्रपतींच्या बाबतीत उद्‌भवलेल्या 'वेदोक्त प्रकरणात' त्यांनी नकारात्मक भूमिका घेतली होती, हा संदर्भही लक्षात घ्यावा लागेल.

लोकमान्य टिळक यांनी विष्णुशास्त्री चिपळूणकरांचा जहाल राष्ट्रवादी वारसा पुढे चालविला, हे करताना त्यांना एका बाजूला स्वातंत्र्याच्या अग्रक्रमाच्या संदर्भात आगरकरांशी तर दुसऱ्या बाजूला स्वातंत्र्याच्या व्याप्तीबाबत व मार्गाबाबत न्या० रानडे यांच्याशी तीव्र संघर्ष करावा लागला. असा तीव्र संघर्ष करीत त्यांनी आपल्या विचारांभोवती जनसंघटना बांधीत नेली आणि अव्याहत ४० वर्षे आपल्या राजकीय तत्त्वज्ञानाचा पाठपुरावा केला.

लोकमान्य टिळक यांच्या निबंधांतून प्रकट होणारा 'परंपरावाद' आणि आगरकरांच्या निबंधांतून प्रकट झालेला 'प्रगतिवाद' हे आधुनिक महाराष्ट्रातील १८८५ ते १९२० या काळातील अत्यंत प्रभावशाली असे वैचारिक संप्रदाय आहेत. १८८५ ते १९२० या कालखंडात मराठीमध्ये जे निबंधलेखन झाले ते वरील दोन संप्रदायांना जाणता वा अजाणता प्रतिसाद देणारे होते, हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

तसेच प्रस्तुत कालखंडातील राजकीय घटनांचीही येथे नोंद घेणे अगत्याचे ठरेल. राजकारणाच्या दृष्टीने या काळातील सर्वात महत्त्वाची घटना म्हणजे न्या० रानडे, ह्यूमसाहेब, दादाभाई नौरोजी, सुरेन्द्रनाथ बॅनर्जी यांच्या प्रेरणेतून इ०स० १८८५ मध्ये झालेली 'राष्ट्रसभे'ची स्थापना होय. यापुढील सर्व राजकारण या राष्ट्रसभेच्याद्वारे झालेले दिसते. व तत्कालीन राष्ट्रवादाच्या विचारधारेतील सर्व प्रवाहांचे प्रतिबिंब राष्ट्रसभेच्या वाटचालीत दिसून येते. दादाभाई नौरोजी, लोकमान्य टिळक, कृ० प्र० खाडिलकर व शि० म० परांजपे यांचा जहाल पक्ष हा इंग्लंडमधील रॅडिकल लिबरल पक्षाचे प्रतीक होता. तर न्या० रानडे, ना० गोखले, फिरोजशहा मेहता इत्यादींचा मवाळ पक्ष हा मॉडरेट लिबरचा प्रतीक होता. याचबरोबरीने काँग्रेसची स्थापना व तिची वाटचाल उदाहरणार्थ, इ०स० १९०६ कलकत्ता काँग्रेस, इ०स० १९०७ सुरतेची काँग्रेस व इ०स० १९१४ नंतरची परिस्थिती उदाहरणार्थ, इ०स० १९१६ सालचा लखनौकरार इत्यादींचे संदर्भही याकाळातील निबंधवाङ्मय अभ्यासताना विचारात घेणे आवश्यक आहेत.

या काळातील निबंध वाङ्मयाचा आढावा घेताना गोपाळ गणेश आगरकर व लोकमान्य टिळक यांच्यानंतर प्रामुख्याने नाव घ्यावे लागते ते 'काळ'कर्ते शि० म० परांजपे यांचे होय. शि० म० परांजपे हे विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचे विद्यार्थी. साहाजिकच त्यांच्या अंत:करणात देशाभिमानाची भावना प्रथम विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीच प्रज्वलित केली.

शि० म० परांजपे यांनी २५ मार्च १८९८ रोजी 'काळ' पत्र सुरू केले. पारतंत्र्याविषयीचा संताप, स्वातंत्र्यप्राप्तीची आकांक्षा, दुर्दम्य देशभक्ती आणि

अभिजात सौंदर्यासक्ती हे शिवराम परांजपे यांच्या व्यक्तिमत्त्वाचे प्रमुख गुण होते. शिवरामपंत परांजपे यांनी लोकमान्य टिळकांच्या जहाल राजकीय क्रांतीच्या तत्त्वज्ञानाचे अनुसरण केले. दोन वर्षांच्या फेलोशिपच्या काळात त्यांनी जे वाचन केले त्यातून त्यांची वैचारिक भूमिका पक्की होत गेली. या काळात त्यांनी अनेक पूर्वकालीन कवी, इतिहासकार, तत्त्ववेत्ते व साहित्यिक यांच्या ग्रंथांचे वाचन केले. मोरोपंत, ज्ञानेश्वर, मुक्तेश्वर, वामन, कबीर इत्यादींच्या काव्याचा त्यांनी सूक्ष्म अभ्यास केला. तसेच प्लेटो, सॉक्रेटिस, गिबन, बायरन, बर्क, होमर, कार्लाइल, शेक्सपिअर इत्यादींच्याही ग्रंथांचे त्यांनी वाचन केले. रूसो, व्हाल्टेअर, टॉलस्टॉय इत्यादींच्या प्रभावामुळे ते समाजवादी विचारसरणीकडेही वळताना दिसतात. उदाहरणार्थ, 'राज्यापहार आणि न्याय', 'इन्कमटॅक्स आणि सोशॅलिझम', 'आमच्या इंग्रजांच्या इंपीरिॲलिझमचा शेवट काय होणार?' इत्यादी. 'काळा'तील निबंधांवर समाजवादी विचारसरणीचा प्रभाव पाहावयास मिळतो.

शिवरामपंत परांजपे यांनी जगातील ज्या ज्या परतंत्र राष्ट्रांनी आपले गमावलेले स्वातंत्र्य परत मिळविले त्या त्या राष्ट्रांचे इतिहास अभ्यासले. यांतून त्यांच्या लक्षात आले की पारतंत्र्यातून मुक्तता मिळविण्याकरिता या सर्व राष्ट्रांना सशस्त्र क्रांती करावी लागली होती. 'काळ'मध्ये त्यांनी गतेतिहासाचे दाखले देणारे अनेक निबंध लिहिले. या सर्व निबंधांतून त्यांनी कधी उपरोध तर कधी व्याजोक्ती यांचा आधार घेत सशस्त्र क्रांतीचा संदेश दिला.

रँड-आयर्स्टनच्या खुनाच्या प्रकरणाच्या अनुषंगाने त्यांनी 'चाफेकर आणि रानडे' हा निबंध लिहिला. परिणामी राहात्या वाड्यावरील पोलिसांच्या जप्तीला त्यांना सामोरे जावे लागले. इ०स० १९०५ ते इ०स० १९०८ या कालावधीतील 'काळा'तील निबंध अतिशय दाहक असेच होते. अगदी 'दगडी कोळसा' यासारख्या विषयावरील निबंधातूनही ही दाहकता प्रकट होताना दिसते. इ०स० १९०८ मध्ये बंगालमधील मुझफरपूर येथे खुशीराम बोस व प्रफुल्लचंद्र चाकी यांनी बाँबगोळा फेकून मिसेस कनेडी व त्यांची मुलगी यांचे प्राण घेतले. या घटनेवर शिवरामपंतांनी १५ मे १९०८च्या अंकात 'हिंदुस्थानात बाँबगोळे येण्याला मूळ कारण इंग्लिश लोकच!' हा लेख लिहिला. या लेखामुळे त्यांच्यावर राजद्रोहाचा खटला भरण्यात आला व त्यांना एकोणीस महिन्यांची कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली. इ०स० १९१० मध्ये सुटून आल्यावर सरकारने 'काळ' संदर्भात त्यांच्याकडे दहा हजारांची जामिनकी मागितली. त्यांना ती देता आली नाही. परिणामी त्यांना 'काळ'पत्र कायमचेच बंद करावे लागले. याचवेळी 'काळा'तील निवडक निबंधांचे दहाच्या दहा भाग आक्षेपार्ह ठरवून सरकारने जप्त केले. यामुळे त्यांना ज्या असह्य मानसिक यातना-वेदनांना सामोरे जावे लागले त्याचे प्रतिबिंब 'भासाची भवितव्यता' या त्यांच्या निबंधात उमटले आहे.

इ०स० १९१० ते इ०स० १९२० या काळात शिवरामपंतांच्या हातून राजकीय जागृतीची कामगिरी झालेली दिसत नाही. मात्र या काळात संशोधनात्मक वेदान्तविषयक आणि साहित्यविषयक असे बरेच लेखन त्यांनी केले आहे.

१२ ऑगस्ट १९२० रोजी शिवरामपंतांनी 'स्वराज्य' पत्राचा पहिला अंक प्रसिद्ध केला. या अंकांतून लिहिलेल्या निबंधांचे स्वरूप 'काळ'पत्रातील निबंधांपेक्षा वेगळे आहे. 'स्वराज्य'मधील निबंध असहकारितेचे समर्थन करणारे आहेत. म्हणून शिवरामपंतांच्या लेखणीचे सर्व गुण प्रकर्षत्वाने त्यांच्या 'काळा'तील निबंधांतून प्रकट झाले आहेत, असेच म्हणावे लागते.

'काळा'तील निबंधांच्या ठळक वैशिष्ट्यांचा येथे आढावा घेणे संयुक्तिक ठरेल. 'काळा'तील निबंधांचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे पारतंत्र्यात जनमानसांच्या मनात देशाभिमान जागृत करण्याची कामगिरी या निबंधांनी उत्कृष्टतेने पार पाडली. परकीय शासनाबद्दल जळजळीत द्वेष उत्पन्न करण्यावर दिलेला भर आणि सशस्त्र क्रांतीचे सूचन या दोन विशेषांमुळे या निबंधांत दाहकता व गूढता निर्माण झालेली दिसते. उपरोध, उपहास, वक्रोक्ती, व्याजोक्ती आणि रूपक या साधनांचा कौशल्याने वापर करून अन्याय, जुलूम, गुलामगिरी यांविरुद्ध चीड उत्पन्न करण्याचे कार्य त्यांनी अत्यंत यशस्वीरीतीने पार पाडले. आधुनिक मराठी लेखनात उपहास, उपरोध, उपरोधाचे अस्त्र प्रथम विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी वापरले. शिवरामपंतांच्या लेखनशैलीवर विष्णुशास्त्रांच्या वरील शैलीचा जसा प्रभाव आहे तसा स्विफ्टच्या ग्रंथांचाही आहे, हेही येथे लक्षात घेतले पाहिजे. उदाहरणार्थ, 'विषासाठी कंठशोष', 'फक्त अर्धा उपास', 'खडी फोडणाऱ्याची गोष्ट', 'एक नवीन कारखाना', 'प्रार्थना', 'अर्जुनाचा वेडेपणा', 'एक चमत्कारिक खेडे' इत्यादी निबंधांचा यादृष्टीने विचार करता येतो.

शिवरामपंतांनी स्वजनांच्या मनात स्वातंत्र्यप्रेम उत्पन्न करण्याकरिता आपल्या देशाच्या आणि अन्य देशांच्या इतिहासाचा उपयोग करून घेतला आहे. 'दिल्लीचे तख्त आणि भाऊसाहेबांचा घण', 'शिवाजीची एक रात्र', 'शिवजीचे पुण्याहवाचन', 'रामदासांच्या शब्दांत स्वराज्यासाठी प्रार्थना', 'भारतभू ही माता नव्हे का?' इत्यादी निबंधातून त्यांनी स्वदेशाचा इतिहास कल्पकतेने रंगविलेला आहे. तर 'ग्रीस देश स्वतंत्र कसा झाला?', 'टायरोल', 'वुल्फटोन', 'रॉबर्ट एमेट यांचा शतसांवत्सरिक उत्सव', 'स्वित्झर्लंडची स्वतंत्रता' इत्यादी निबंधांतून त्यांनी परदेशीय स्वातंत्र्य चळवळींचे इतिहास रोमहर्षकरीत्या वर्णन केले. या सर्वांतून त्यांनी आपल्या देशातील जनतेच्या मनात स्वातंत्र्यप्राप्तीची ज्योत प्रज्वलित करण्याचा प्रयत्न केला.

शिवरामपंत यांचे निबंध जसे देशाभिमानाच्या उत्कट व उत्फुल्ल भावनेने बहरलेले होते, तसेच ते काव्यात्मकतेने व कल्पकतेनेही नटलेले होते. उदाहरणार्थ, 'प्रभाकरपंतांचे विचार', 'कवित्वाची साक्ष', 'सह्याद्रीच्या तावडीत सापडलेली

कल्पनाशक्ती' इत्यादींचा येथे उल्लेख करता येईल. तर त्यांच्या निर्मळ आणि राजकारणनिरपेक्ष कविमनाचा उदात्त आणि रमणीय आविष्कार त्यांच्या 'सापडलेले संपुष्ट' या निबंधात पाहावयास मिळतो.

शिवरामपंत परांजपे यांच्या 'साहित्य संग्रहा'तील लेखांवर त्यांच्या संस्कृत वाङ्मयाच्या सखोल व मार्मिक व्यासंगाचा प्रभाव आहे. त्यांचा 'भासाची भवितव्यता' हा लेख म्हणजे एक गद्यकाव्यच आहे. तर 'मेघदूतावरून कालिदासाविषयी' हा माहितीपूर्ण व वाचनीय असा निबंध आहे. 'चारूदत्त आणि मृच्छकटिक' हा त्यांचा निबंध चिकित्सक अभ्यासकास मार्गदर्शक ठरेल असाच आहे. त्याचप्रमाणे 'प्रियदर्शिका व नागानंद ही नाटके कोणाची?', 'श्रीमत् भगवदगीतेतील एक शंकास्थान', 'शाकुन्तल नाटकाचा चौथा अंक', 'विष्णुसहस्त्रनाम' इत्यादी निबंधांवरून त्यांच्या संस्कृत ग्रंथांच्या अभ्यासाची साक्ष पटते. तसेच 'अर्थसंग्रह, तर्कसंग्रह व तर्कभाषा' यावरील मार्मिक व विस्तृत टीका आणि 'भामिनीविलास', 'प्रसन्नराघव' इत्यादी ग्रंथांच्या सटीप इंग्रजी आवृत्त्या, त्यांच्या संस्कृत वाङ्मयाच्या व्यासंगावर अधिक प्रकाश टाकतात. 'सूर्याच्या गैरसोयी' व 'ठाकूरसिंगांच्या प्रणयिनीचा मनोभंग' या चित्रावर त्यांनी 'रत्नाकरा'त लिहिलेल्या टीकालेखाला आधुनिक मराठीतील कलात्मक, काव्यमय आणि सृजनशील समीक्षेचा नमुना म्हणून अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे.

हे सर्व लक्षात घेताही शिवरामपंतांच्या जीवनदृष्टीचा आविष्कार प्राधान्याने उत्कट स्वरूपात 'काळा'तील निबंधांमध्येच झालेला आहे, असेच म्हणावे लागते. त्यांच्या निबंधांत निर्भेळ स्वातंत्र्याचा पुरस्कार, सामाजिक सुधारणेचा कुचेष्टागर्भ तिरस्कार, (उदाहरणार्थ, एका पूजेच्या गणपतीचे चित्र, अहो मला दारू पिता येत असती तर किती बरे झाले असते, एका सोमवतीची हकीकत) व आर्थिक विषमतेबद्दलची मनस्वी चीड (उदाहरणार्थ, गरिबांची उपासमार, संपत्तीचा दुरूपयोग इत्यादी) तर समाजवादाच्या विचारांचा पगडा (इन्कमटॅक्स आणि सोशॅलिझम) असे काही निबंध विषमतेसंदर्भात भाष्य करणारे असले तरी ते त्यांच्याठायीच्या भूतदयेच्या भावनेवर आधारित होते असे दिसते. तर त्यांची राजकीय क्रांतीची कल्पना परंपरेच्या अभिमानाने भारलेली होती. त्यामुळे ते वृत्तीने व विचारांनी परंपरावादी होते, असेच म्हणावे लागते.

थोडक्यात, शिवरामपंतांनी समाज भावनांचे प्रक्षोभन करणारे गद्य लेखन कसे लिहावे हे प्रथम महाराष्ट्राला शिकविले. तसेच उपरोध, उपहास, वक्रोक्ती, व्यंग्योक्ती, व्याजोक्ती, रूपक इत्यादी साधनांचा कौशल्यपूर्ण वापर कसा करावा याचा उत्तम आदर्श त्यांच्याच निबंधांनी प्रथम निर्माण केला. त्याचप्रमाणे आज ज्यांना लघुनिबंध किंवा ललित निबंध म्हटले जाते त्याच्याशी बऱ्याच अंशी साम्य असलेले अनेक निबंध त्यांनी लिहिले. उदाहरणार्थ, 'सापडलेले संपुष्ट', 'विषासाठी

कंठशोष', 'एका खडी फोडणाऱ्याची गोष्ट' इत्यादी कथात्मक निबंधही त्यांनी लिहिले. त्यांचे निबंध म्हणजे मराठी गद्यवाङ्मयाचे एक 'तेजस्वी लेणे' आहे, असे म्हटले तर वावगे ठरू नये.

लोकमान्य टिळक, गोपाळ गणेश आगरकर, शि० म० परांजपे यांच्याप्रमाणेच कृ० अ० केळुसकर आणि अच्युत बळवंत कोल्हटकर यांच्याही वृत्तपत्रीय लेखांना निबंधाची प्रतिष्ठा प्राप्त झालेली आहे. म्हणून या दोन निबंधकारांच्या निबंधांचा येथे आढावा घ्यावा लागेल.

कृ० अ० केळुसकर यांनी चरित्रकाराप्रमाणेच निबंधकार म्हणूनही यश संपादन केलेले आहे. 'विचारसंग्रह' पुस्तकातून तसेच 'सुबोधपत्रिका' आणि 'इंदुप्रकाश' या वर्तमानपत्रांतून त्यांनी निबंधलेखन केले आहे. तत्कालीन सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व धार्मिक प्रश्नांचे पुरोगामी दृष्टीने समतोल राखत तीन-चार पानांच्या आटोपशीर अवकाशात केलेले साधार विवेचन असे त्यांच्या निबंधांचे स्वरूप आहे. उदाहरणार्थ, 'आमच्या देशाची स्थिती', 'आमच्या समाजातील दुही', 'नशीब', 'अन्नोदक–व्यवहारनिर्बंध', 'सामाजिक सुधारणा', 'दौलतीचा योग्य उपयोग', 'शास्त्रीय ज्ञानाच्या प्रसारावाचून गती नाही' इत्यादी. 'विचारसंग्रहा'तील निबंधांतून व्यक्त झालेली राजकीय, सामाजिक व आर्थिक प्रश्नासंबंधीची मते आगरकरांच्या विचारांची आठवण करून देतात.

कृ० अ० केळुसकर यांनी आपल्या निबंधांतून तत्कालीन राष्ट्रीय सभा, सामाजिक परिषद इत्यादी संस्थांच्या विचारांचाच पुरस्कार केला. त्यांच्या सर्व निबंधांतून व्यक्त होणारा उत्कट देशाभिमान, दु:खितांविषयीची कळकळ, सरकारच्या बेपर्वाईमुळे जनतेच्या योग्य मागण्या पूर्ण होऊ शकत नाहीत म्हणून वाटणारी तळमळ आणि या सर्वांना असलेले देशहिताचे व विवेकनिष्ठेचे अधिष्ठान इत्यादी गोष्टी असूनही त्यांचे निबंधलेखन दुर्लक्षित राहिले, याविषयी खंत व्यक्त करावीशी वाटते.

अच्युतराव कोल्हटकर यांनी इ०स० १९१२ साली 'संदेश' पत्र सुरू केले. आणि इ०स० १९१८ साली सरकारने जबर जामीन मागितल्यामुळे त्यांना 'संदेश' पत्रे बंद करावे लागले. अच्युतरावांचे निबंधलेखन वृत्तपत्रलेखनातून उदयास आले आहे. कोल्हटकरपूर्व निबंधांकडे पाहिले तर हे निबंध प्रामुख्याने राजकीय व सामाजिक विषयांना अनुसरणारे होते, असे दिसते. अच्युतरावांनी हा रूढ प्रघात मोडला. आणि वाचकांची अभिरुची लक्षात घेऊन वाचकांचे मनोरंजन होईल अशी निबंधरचना केली. उदाहरणार्थ, 'नाटक मंडळ्यांचे गॅझेट', 'बेटा गुलाबच्या कानगोष्टी',' वत्सला वहिनींची पत्रे' इत्यादी मथळ्यांखाली संदेशमध्ये आलेले सदरलेखन. अशा वैचित्र्यपूर्ण सदरलेखनामुळे त्यांनी वाचकांमध्ये वृत्तपत्रवाचनाची आवड निर्माण केली.

महाराष्ट्रातील राजकीय-सामाजिक प्रांतातील जहाल-मवाळ वाद ऐन भरात असण्याचा कालखंड हा 'संदेश'च्या भरभराटीचा काळ होता. या काळातील त्यांचे निबंधलेखन पाहिले तर ते सरळ सरळ दोन प्रवाहांमध्ये विभागता येते ते म्हणजे, सश्रद्ध, उत्कट जिव्हाळ्याने भरलेले आणि उच्छृंखल, उपहासाने युक्त असे निबंध होय.

अच्युतराव कोल्हटकर यांचे निबंधलेखन वृत्तपत्रलेखनामधून उदयास आल्याने त्यांच्या वृत्तपत्रलेखनातील सारे गुणदोष त्यांच्या निबंधांमध्येही उतरलेले दिसतात. स्वातंत्र्यप्रेम, धर्मप्रेम व स्वदेशप्रेम हे त्यांच्या निबंधांचे मध्यवर्ती सूत्र आहे. संत रामदास, छत्रपती शिवाजी महाराज व लोकमान्य टिळक यांच्यावर त्यांची अपार श्रद्धा असल्याने त्यांना अनुलक्षून त्यांनी अनेक निबंध लिहिले आहेत. उदाहरणार्थ, 'विष्णुशास्त्री, आगरकर, टिळक', 'हिंदुस्थानातला पहिला बोल्शेविक' इत्यादी. तसेच महाराष्ट्रीय राजकारणातील जहालमवाळ वादालाही त्यांच्या निबंधांनी प्रतिसाद दिलेला दिसतो. 'नेमस्त' व 'सुधारक' यांची टर उडविण्याच्या उद्देशाने त्यांनी संदेशमध्ये लेखन केलेले दिसते. उदाहरणार्थ, 'वत्सलावहिनींची पत्रे'.

कोल्हटकर यांचे निबंध वक्रोक्तीपूर्ण, चमत्कृतीपूर्ण, चेष्टेखोर, चुरचुरीत व चटकदार असे आहेत. उदाहरणार्थ, 'वत्सलावहिनींची पत्रे', 'चहा, चिवडा, चिरूट', 'मोतीचुराचे लाडू', 'राजाला माकड चावले' इत्यादी निबंधांचा येथे उल्लेख करता येईल. तसेच उपमा, अतिशयोक्ती, चेतनागुणोक्ती इत्यादी अलंकारांच्या साहाय्याने निबंध वाचनीय बनवायचे आणि वाचकांच्या मनावर इच्छित परिणाम साधायचा, हाही त्यांच्या निबंधांचा विशेष सांगता येईल. उदाहरणार्थ, उत्प्रेक्षेचा वापर–'कोळसा, लोखंड आणि बर्फ', रमणीय व वेधक शैलीचा रोचक नमुना–'लालबदामाची तिरी', समर्पक शीर्षकांची योजना–'पुणेरीजोडे', 'मुंडावळी बांधून बसले', 'बोंबाबोंब', 'हे तात्या आणि ते तात्या', 'शेम होम पुराण', 'नाटक झाले जन्माचे', 'प्राणनाथ काय आज्ञा आहे?' कल्पकता, कारुण्य यांचा साधलेला सुंदर मेळ–'शेवटची वेल सुकली', 'जिजा तू का रडतेस?' इत्यादी. यांपैकी अनेक निबंध कल्पकता, सरसता, मार्मिकता, रसिकता, सहृदयता, गुणग्राहकता इत्यादी गुणांनी समृद्ध आहेत. त्याचप्रमाणे यातील काही निबंध आपण हिंदुस्थानात जन्माला आलो, हे आपले खरोखर भाग्य होय, हा भाव वाचकांच्या मनात निर्माण करण्याएवढे सशक्त आहेत.

अच्युतराव कोल्हटकर यांनी 'वत्सलावहिनींची पत्रे' लिहून विनोदी टीकालेखन केले. यांतील प्रतिपक्षावरील टीकेचे स्वरूप बरेच समतोल व सहानुभूतीपर असे आहे. पण काहीवेळा ते विरोधकांवर टीका करताना विवेकशीलतेच्या सद्भिरुचीच्या मर्यादा तोडताना दिसतात. उदाहरणार्थ, फंडगुंड, प्रकरणाच्या संदर्भात 'टिळक बाळंतीण झाले', 'हाय हाय गंगापूर' इत्यादी निबंध सांगता येतात.

विष्णुशास्त्री चिपळूणकर, लोकमान्य टिळक, गोपाळ गणेश आगरकर, शिवरामपंत परांजपे या निबंधकारांच्या निबंधात गांभीर्य व उपहास यांचा जो योग्य समन्वय पाहावयास मिळतो, तो अच्युतराव कोल्हटकरांच्या निबंधांत पाहावयास मिळत नाही. त्यांच्या निबंधातून येणाऱ्या ग्राम्य विनोदामुळे स्वातंत्र्य, धर्म व स्वदेश यांविषयीचे उदात्त प्रेम झाकोळताना दिसते.

राजारामशास्त्री भागवत यांच्या 'निवडक लेखांचा संग्रह' दुर्गा भागवत यांनी प्रसिद्ध केला आहे. यामध्ये त्यांनी भागवत यांच्या निबंधांचे मराठी निबंधवाङ्मयात स्वतंत्र, अढळ व उच्च स्थान आहे, असेही म्हटले आहे.

राजारामशास्त्री भागवत यांचे जीवन अनेक विरोधी वृत्तींनी व्यापलेले दिसते. तसेच त्यांच्या अनेक मतांमध्ये वेळोवेळी परिवर्तनही घडून आलेले दिसते. त्यांचे निबंध सामान्यतः सुधारणावादाचा पुरस्कार करताना दिसतात. पण त्यांचा सुधारणावाद हा शास्त्रशरण प्रवृत्तीचा होता. कारण त्यांनी कोणतीही सामाजिक सुधारणा केवळ बुद्धिवादाच्या भूमिकेवरून स्वीकारली होती, हे सिद्ध करणे कठीण आहे.

भागवत यांनी लिहिलेल्या निबंधांमध्ये पुराणवस्तुशास्त्रसंशोधन (या विषयाला मराठीत भागवत यांनीच प्रारंभ केला), गोंडी भाषेतील लेखन, 'स्तेफेन्स' या मराठीच्या कॅथॅलिक भक्ताबद्दल पहिला गौरवपर लेख 'महाभारताची विचिकित्सा', 'भगवद्गीतेतील बुड्या', 'एकपाद कळी', 'वेदार्थयत्नाची गुरुकिल्ली' हे संशोधनात्मक निबंध इत्यादी विषयांवरचे अनेक लेख विविधज्ञानविस्तार, सुधारक, ज्ञानप्रकाश, पुणेवैभव, दीनबंधु, सुबोधपत्रिका, इंदुप्रकाश इत्यादी मासिकांतून आणि वृत्तपत्रांतून निबंधरूपाने प्रसिद्ध झालेले आहेत.

महाराष्ट्र, मराठी भाषा याबद्दलच्या अभिमानातून त्यांनी सतत पस्तीस वर्षे लेखन केले. त्यांनी जे पाहिले, वाचले किंवा अनुभवले ते जशास तसे वाचकांसमोर ठेवायचे या भूमिकेतून केलेले आहे. हे लेखन करताना अनेकदा त्यांच्या पूर्व मतांमध्ये परिवर्तनही घडून आले. असे असले तरी बहुजनसमाजाबद्दल त्यांना वाटणारी आस्था, कळकळ फसवी नव्हती. मात्र अनेकदा या आस्थेला शास्त्रमान्यतेचा आसरा शोधण्याची त्यांची धडपड त्यांच्या सामाजिक सुधारणेच्या विचारांची मर्यादा ठरते, असे म्हणावे लागेल.

प्रस्तुत काळातील निबंधलेखनाचा विचार करताना भारताचार्य चिं० वि० वैद्य यांचाही निबंधकार म्हणून उल्लेख करणे आवश्यक आहे. वैद्य यांनी कादंबरी, नाटक, चरित्र यांच्याबरोबरच निबंधलेखनही केले आहे. वैद्य यांच्या 'अबलोन्नति लेखमाला' व 'निबंध आणि भाषणे' यांतील निबंधांचा स्थूलमानाने निबंध या वाङ्मयप्रकारात समावेश करता येईल.

'अबलोन्नति लेखमाले'तील निबंध विवाहविषयक पुरोगामी विचार मांडणारे असून ते पुढील चार लेखांकामध्ये आले आहेत.

१) सामाजिक सुधारणेच्या प्रयत्नांची हकीकत आणि सुधारणा यशस्वी करण्याचे मार्ग.
२) लग्नाच्या चालीरीतींचा संक्रमणेतिहास व लग्नाचे खरे उद्देश व महत्त्व.
३) बालविवाहापासून होणारे दुष्परिणाम.
४) बालविवाहाला शास्त्राची संमती नसणे.

'अबलोन्नति लेखमाले'मधून त्यांनी वरील चार मुद्द्यांचे धर्मशास्त्रविषयक ग्रंथांच्या आधाराने सुंदर विवेचन केले आहे. त्यांच्या 'निबंध आणि भाषणे' या पुस्तकातील निबंध हे मुख्यतः महाराष्ट्र, मराठी भाषा व मराठी वाङ्मयासंबंधी आहेत. यातील 'ज्ञानेश्वरी–मराठीचे व्याकरण' या विषयावरील पाच निबंध मराठी भाषा व वाङ्मयाचा इतिहास यासंदर्भातील अत्यंत मौलिक असे निबंध आहेत. याचबरोबरीने त्यांनी 'श्री ज्ञानेश्वरीतील मराठी भाषेचे व्याकरण', 'मुक्तेश्वराचे वनपर्व' इत्यादी परीक्षणात्मक निबंध, 'मराठी भाषा आणि तिच्यावर इतर भाषांचा परिणाम', 'महाराष्ट्रदेश', 'महाराष्ट्रभाषा व महाराष्ट्र वाङ्मय', 'मराठी भाषेचा इतिहास' व 'मराठी गद्यरचना' हे विद्वत्तापूर्ण व मराठी भाषेच्या अभ्यासकांना उपयुक्त निबंध, 'मराठी गद्यरचना' हा मराठी गद्यरचनेच्या विकासाचा आणि वैशिष्ट्यांचा परामर्श घेणारा महत्त्वपूर्ण निबंध, मराठी भाषेच्या उत्पत्तीसंबंधी प्रसिद्ध असलेल्या 'वैद्य-गुणे' वादामधील त्यांची भूमिका इत्यादींतून त्यांच्या अभ्यासपूर्ण, व्यासंगी व्यक्तित्वाची साक्ष पटते.

विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्याकडून स्वभाषा व स्वसंस्कृतीच्या जळजळीत अभिमानाची दीक्षा घेऊन ज्यांनी राष्ट्रजागृतीचे कार्य केले असे निबंधकार म्हणजे वि० का० राजवाडे हे होत. त्यांनी तेजस्वी इतिहासदर्शनावर आधारलेल्या स्वाभिमानी राष्ट्रवादाची दीक्षा देण्याचा, कष्टाचा, त्यागाचा वसा संपूर्ण जीवनभर सांभाळला. याचाच एक भाग म्हणजे इ०स० १८९४ मध्ये त्यांनी सुरू केलेले 'भाषांतर' हे मासिक होय. पाश्चिमात्य देशात जे निरनिराळ्या शास्त्रांमध्ये अगाध ज्ञान निर्माण होत होते त्याचे महत्त्व त्यांना ज्ञात होते. तसे स्वतंत्र ज्ञानभांडार निर्माण करण्याची कुवत सध्या आपल्यामध्ये नाही, याचीही त्यांना जाणीव होती. म्हणून तूर्तास भाषांतराद्वारे ते मराठी भाषेत आणणे गरजेचे आहे, असा मूलगामी विचार करून त्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत सदतीस महिने 'भाषांतर' मासिक चालविले. आणि या मासिकाद्वारे प्लेटो, ॲरिस्टॉटल, झेनोफेन, बर्क, मिल इत्यादींचे ग्रंथ भाषांतर रूपात छापून त्यांनी महाराष्ट्रीयांना वरील विचारवंतांच्या विचारांचा परिचय घडविला.

ज्या भौतिकशास्त्राच्या ज्ञानाच्या बळावर पाश्चिमात्यांनी पौरात्यांवर मात करून त्यांना पराभूत केले, ते ज्ञान प्राप्त करण्यास भारतीयांनी पुढे सरसावले पाहिजे, आणि संन्यासप्रवण मनोवृत्तीचा त्याग करून प्रवृत्तिपर धर्माचा अंगीकार केला पाहिजे, ही त्यांची भूमिका होती. या भूमिकेला अनुसरून त्यांनी पुण्यास 'पूना सायन्स असोसिएशन' या नावाची संस्था स्थापन केली. या संस्थेच्या मासिक सभेमध्ये भौतिकशास्त्रविषयक संशोधनात्मक लेख वाचले जात असत, हे लक्षात घेतले की भौतिकशास्त्राच्या ज्ञानाचे महत्त्व जाणण्याऱ्या त्यांच्या द्रष्ट्या व्यक्तित्वाची साक्ष पटते.

वि० का० राजवाडे यांनी इ०स० १८९७ ते १९१८ या वीस वर्षांच्या काळात 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने' असलेल्या अस्सल ऐतिहासिक पत्रांचे संशोधन आणि प्रकाशन करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. त्यांनी 'साधना'च्या एकवीस खंडांच्या साडेपाच हजार पृष्ठांत एकूण ४४१७ एवढी ऐतिहासिक पत्रे प्रसिद्ध केली आहेत. तसेच 'साधना'च्या खंडांना विवेचक आणि विचारप्रवर्तक अशा महत्त्वपूर्ण प्रस्तावनाही जोडल्या आहेत. उदाहरणार्थ, पहिल्या खंडाची १२७ पृष्ठांची प्रस्तावना, सहाव्या आणि आठव्या खंडाच्या प्रस्तावना म्हणजे त्यांच्या प्रतिभाशाली आणि कल्पक लेखणीतून उतरलेले उत्कृष्ट ऐतिहासिक प्रबंधच आहेत. आठव्या खंडाची प्रस्तावना ही भाषाविषयक विचारांच्यादृष्टीने महत्त्वाची आहे. तसेच 'राधामाधवविलास चंपू', 'महिकावतीची बखर' या ग्रंथांच्या प्रस्तावनांचाही येथे उल्लेख करावा लागेल.

वि० का० राजवाडे यांनी भाषाशास्त्रविषयक आणि व्याकरणविषयक विपुल लेखन केलेले असून ते विद्वत्तापूर्ण, मूलगामी स्वरूपाचे असेच आहे. त्यांच्या या लिखाणात बीड पाटांगण येथील मठांतून मिळविलेल्या ज्ञानेश्वरीच्या मुकुंदराजी प्रतीला लिहिलेली प्रदीर्घ प्रस्तावना, ज्ञानेश्वरीतील मराठी भाषेचे व्याकरण, गुणवृद्धी, सुबंत विचार व तिङ्गंत विचार', 'संस्कृत भाषेचा उलगडा, मराठी धातुकोश, नामादि शब्दव्युत्पत्तिकोश यांचा मुख्यत्वेकरून समावेश होतो. तसेच महानुभावीय वाङ्मयाचे सांकेतिक लिपित बंदिस्त असलेले समृद्ध दालन त्यांनीच सर्वांत प्रथम त्या सांकेतिक लिपीचा उलगडा करून मराठी संशोधकांसाठी खुले केले, हेही आवर्जून लक्षात घेतले पाहिजे.

राजवाडे यांनी इतर विषयांवर लिहिलेल्या निबंधांमध्ये 'हिंदू समाजात हिंदुतरांचा प्रवेश', 'भारतीय विवाहपद्धती', 'चातुर्वर्ण्य', 'चित्पावनांचा इतिहास' इत्यादी समाजशास्त्रीय विषयांवरील निबंध, 'पहिल्या शारदोपासक संमेलनाच्या अध्यक्षपदावरून केलेले भाषण', 'श्रीसमर्थ रामदास' व 'कादंबरी' हे वाङ्मयविवेचनात्मक निबंध, यांचा उल्लेख करता येईल.

'पहिल्या शारदोपासक संमेलनाच्या अध्यक्षपदावरून केलेले भाषण' या निबंधात त्यांनी जीवनाच्या सर्व क्षेत्रांतील मराठी भाषेच्या संकोच्याचे वर्णन केले

आहे. तर त्यांच्या 'श्रीसमर्थ रामदास' या निबंधाने समर्थांविषयक महाराष्ट्रीयांच्या दृष्टिकोनात क्रांतिकारक परिवर्तन घडवून आणले. 'दासबोधा'तील वेदांतविवेचनात समर्थांनी एकदेशीपणा टाळला असल्याने तो सर्वदेशीय व उपयुक्त असा ग्रंथ झाला आहे, असे मार्मिक प्रतिपादन त्यांनी केले आहे. 'कादंबरी' या निबंधात ते मराठी कादंबरीचे ऐतिहासिक आणि तात्त्विक विवेचन करतात. असे विवेचन करताना ते ह्यूगो, झोला, टॉलस्टॉय, बॅल्झाक, ड्यूमास इत्यादी पाश्चिमात्य कादंबरीकार इंग्रजी कादंबरीकारांपेक्षा अधिक प्रभावी का आहेत याचीही मीमांसा करतात. आणि वरील कादंबरीकारांच्या तोडीचे कादंबरीकार मराठीत निर्माण होण्याकरिता मराठी कादंबरीकारांना काय करावे लागेल याचेही मार्गदर्शन करतात.

वि० का० राजवाडे हे जाज्वल्य मनोवृत्तीचे चाहते होते. त्यांचे समग्र जीवनच याचे प्रतीक आहे. त्यांच्या समग्र लेखनातून प्रकटणारा आक्रमक राष्ट्रवाद त्यांच्या जाज्वल्य मनोवृत्तीचाच भाग होता. मराठी भाषेचा, इतिहासाचा अभिमान असणे हा याच राष्ट्रवादाचा आविष्कार आहे. त्यांनी आपले सारे विचार फक्त मराठी भाषेतून मांडले. असे मराठीतून विचार मांडणारे ते एकमेव विचारवंत होते, हे विशेष आहे. तसेच कर्तव्यनिष्ठा हाही त्यांच्या व्यक्तित्वाचा महत्त्वाचा गुण होता. 'भाषांतर' मासिक याच कर्तव्यनिष्ठेतून त्यांनी सुरू केले. या मासिकातील 'गतवर्ष' हा एक निबंध पाहिला तरी त्यांच्या कर्तव्यनिष्ठ व्यक्तित्वाचा प्रत्यय येतो. राजवाडे यांच्या निबंधांची भाषाशैली प्रौढ व गंभीर प्रवृत्तीची आहे. आणि तरीही त्यांचे निबंध वाचनीय झाले आहेत. याचे कारण त्यांच्या निबंधांतून व्यक्त झालेला अस्सल जातिवंत देशाभिमान व निर्भिड विचार, हेच सांगावे लागेल.

यानंतर प्रार्थनासमाजाची निगडित असलेल्या डॉ० रामकृष्ण गोपाळ भांडारकर, न्या० महादेव गोविंद रानडे व वामन आबाजी मोडक यांच्या निबंधवाङ्मयाचा थोडक्यात आढावा घ्यावा लागेल. त्यांच्या निबंधवाङ्मयाचे स्वरूप पाहाताना हे लक्षात घेतले पाहिजे की हे तिघेही प्रार्थनासमाजाचे कार्यकर्ते आहेत. प्रार्थना समाजाचे कार्यकर्ते या भूमिकेवरून त्यांनी जे लेख लिहिले, जी भाषणे दिली ती सर्व एकत्र करून संपादित करण्यात आली आहेत.

डॉ० रामकृष्ण गोपाळ भांडारकर हे संस्कृततज्ज्ञ, पंडित आणि प्राचीन इतिहास संशोधक होते. 'श्रीकृष्णासंबंधाचे उल्लेख', पतंजलीच्या महाभाष्यात आढळणारे 'पतंजलीचा व त्याच्या महाभाष्याचा काळ', 'हिंदुस्थानातील वेदपठण' हे इंडियन अँटिक्युरी या संशोधनविषयक मासिकातील लेख, 'महाभारताचा काळ' हा कर्नल एलिस या युरोपियन व्यक्तीच्या लेखाला उत्तर देण्याकरिता लिहिलेला व मुंबईच्या रॉयल एशियाटिक सोसायटीच्या त्रैमासिकात प्रसिद्ध झालेले लेख, इ०स० १८७६ मध्ये लंडन येथे भरलेल्या प्राच्यभाषा विशारदांच्या परिषदेकरिता नाशिक जिल्ह्यात मिळालेल्या शिलालेखावर आधारित निबंध, विल्सन फायलालॉजिकल

लेक्चरशिपमध्ये 'मराठी व प्राकृत भाषांची भाषाशास्त्राप्रमाणे रचना व उपपत्ती' या विषयावर दिलेली पाच विद्वत्तापूर्ण भाषणे, देशातील प्राचीन हस्तलेख जमवून, काळजीपूर्वक तपासून त्यातील मजकूरांवरून त्या त्या काळातील देशाच्या राजकीय, सामाजिक व धार्मिक परिस्थितीसंबंधी विवरण करणारे सहा तपशीलवार अहवाल, इ०स० १८८९ मध्ये व्हिएन्ना येथे भरलेल्या प्राच्यभाषाविशारदांच्या परिषदेत 'यज्ञयागाविधि व पंचरागविधि' या विषयावर वाचलेला महत्त्वपूर्ण तसेच मनोरंजक निबंध, इत्यादींमधून भांडारकरांठायीचे प्रगाढ, सापेक्षशील पांडित्य, चिकित्सक बुद्धी, सत्यप्रीती आणि भक्तिपरता इत्यादी गुण प्रतिबिंबित होतात.

त्यांच्याठायी वसणाऱ्या भक्तिपरता या गुणाचा दाखला त्यांनी इ०स० १८७८ ते ८२ या काळात सुबोध पत्रिकेतून लिहिलेल्या धर्मविषयक लेखातूनही मिळतो. उदाहरणार्थ, 'ईश्वरविषयक ज्ञान', 'देवाची प्राप्ती', 'भक्तसहवास', 'देवाची आणि प्रतिमांची पूजाअर्चा', 'सनातन एकांतिक अथवा एकेश्वरी धर्म', 'तुकोबा आणि प्रार्थनासमाज', 'प्रार्थनासमाजाचे ध्येय', 'प्रपत्तियोग', 'जेणे घातले संसारी । विसरला तोचि हरी ।।' इत्यादी व्याख्याने व लेखांचा येथे उल्लेख करता येईल. तसेच 'सणांत जसा शिमगा तशी आमच्या ग्रंथात पुराणे' या लोकहितवादींच्या मताचे त्यांनी दोन निबंधांतून संयुक्तिक व साधार खंडन केले आहे.

द्वा० गो० वैद्य यांनी संपादित केलेला त्यांच्या लेखांचा व व्याख्यानांचा ग्रंथ वाचकांस शांती, समाधान व आनंद या गोष्टींचा लाभ करून देणारा असाच आहे.

न्या० महादेव गोविंद रानडे यांनी इ०स० १८७० साली सार्वजनिक कार्याला प्रारंभ केला. ब्रिटिशांबद्दलची राजनिष्ठा असल्याने ब्रिटिश साम्राज्यांतर्गत स्वायत्तता एवढीच त्यांची राजकीय आकांक्षा होती. न्या० रानडे यांना उदारमतवादाच्या मुळाशी असलेला व्यक्तिवाद मान्य होता. परंतु व्यक्तिवादी प्रेरणेला आध्यात्मिक अधिष्ठान देऊन ती नैतिक बनविल्याशिवाय समाजाचा व व्यक्तीचा विकास होणार नाही ही त्यांची धारणा होती.

न्या० रानडे यांची धर्मपर व्याख्याने द्वा० गो० वैद्य यांनी प्रकाशित केली आहेत. यातून त्यांच्या उदात्त व संजीवक विचारप्रणालीचे दर्शन घडते. उदाहरणार्थ, 'योगमार्ग व भक्तिमार्ग', 'ज्ञानमार्ग व भक्तिमार्ग', 'कर्ममार्ग व भक्तिमार्ग', 'भक्तिमार्गाची सुलभता', 'भक्तिमार्गातील समाधी', 'भागवत धर्माचे रहस्य', 'भक्तिमार्ग पंगुपणाचा आहे का?', 'देवाचे मोक्षाचे गाठोडे नाही' इत्यादींचा येथे उल्लेख करता येईल.

न्या० रानडे यांनी संत एकनाथ यांची वचने घेऊन भागवत धर्माचे उपपादन केले आहे. त्यांच्या मते भागवतमार्ग हा श्रेष्ठ मार्ग असून तो सर्वसामान्य व्यक्तींना सहजसाध्य असा आहे. देवाच्याठायी शुद्ध भावाने लीन होणे आणि मन:पूर्वक त्याचे

भजन व पूजन करणे, हाच भागवत मार्ग आहे. या धर्माचे अनुसरण करणाऱ्यांच्या अंगी प्रेम, दया, क्षमा, शांती इत्यादी गुणांचा विकास आपोआपच होतो. न्या० महादेव गोविंद रानडे हे या मार्गाचे पायिक होते, असे मानले तर वावगे ठरू नये.

प्रार्थना समाजाचे आणखी एक थोर कार्यकर्ते म्हणजे वामन आबाजी मोडक हे होत. त्यांचेही धर्मपर व नीतिपर व्याख्यानांचे पुस्तक प्रसिद्ध झाले आहे. यामध्ये 'क्षमा', 'धर्माचरण', 'सत्यभाषण', 'सौम्यता अथवा शांती', 'ईश्वरनिष्ठा', 'जीवात्मपरमात्मयोग', 'बालविवाहाच्या संबंधाने हिताहितविचार', 'युरोपाच्या इतिहासापासून काय शिकावे?', 'हिंदू लोकांत ऐक्याची वृद्धी होण्यास उपाय' इत्यादी धार्मिक, नैमिक व सामाजिक विषयांवरील व्याख्यानांचे संकलन केले आहे. तर 'गीतार्थसार' या निबंधात त्यांनी भगवद्गीतेचे थोडक्यात पण उत्तम सार मांडले आहे.

वामन मोडक यांच्या सामाजिक विषयांवर आधारलेल्या व्याख्यानांमध्ये त्यांच्या सावध व विवेकशील वृत्तीचा प्रत्यय येतो. तसेच पारंपरिक विचारांतील ग्राह्य गोष्टी कालाप्रमाणे सुधारणा करून स्वीकारल्या पाहिजेत आणि जरुर पडली तरच नवीन गोष्टींचा स्वीकार केला पाहिजे, हे त्यांच्या विचारांचे सार सांगता येईल.

कृ० प्र० खाडिलकर

नाटककार खाडिलकर यांनी 'केसरी' तून जे लेख लिहिले त्यांचा येथे विचार करावा लागेल. आवेशपूर्ण शैली, सोप्या भाषेतील निवेदन आणि सशस्त्र क्रांतीवरील श्रद्धा हे त्यांच्या निबंधलेखनाचे महत्त्वाचे विशेष आहेत. इ०स० १८९६ मध्ये खाडिलकर यांची लोकमान्य टिळकांशी भेट झाली. खाडिलकर यांची मनोवृत्ती टिळक परंपरेला अनुकूल होती. यामुळे ते टिळकांच्या मनोवृत्तीशी व परंपरेशी फार झपाट्याने समरस झाले. 'राष्ट्रीय महोत्सवांची आवश्यकता' या 'केसरी' तील त्यांच्या अग्रलेखातून प्रतीत होणारे स्वदेशप्रेम टिळक यांच्या मनोवृत्तीशी असलेले त्यांचे नाते दर्शविते. इ०स० १८९७ साली म्हणजे खाडिलकरांनी 'केसरी' त प्रवेश केल्यानंतर एका वर्षातच टिळकांवर राजद्रोहाचा खटला भरण्यात आला. त्यामुळे इ०स० १८९७ ते ४ जुलै १८९९ याकाळात न० चिं० केळकर यांनी 'केसरी' चे संपादक म्हणून जबाबदारी पार पाडली. या काळात 'केसरी' त संपादकीय अग्रलेख मात्र खाडिलकर लिहित होते. टिळकांना शिक्षा झाल्यानंतर बाराच दिवसांनी खाडिलकरांनी 'प्रजापक्षाची सांप्रतची स्थिती' हा लेख लिहिला. खाडिलकर यांच्या लेखनशैलीची कल्पना येण्याकरिता एवढा एकही लेख पुरेसा आहे. एकच गोष्ट सातत्याने पण सोप्या भाषेत ठाशीवपणे सांगणे हा त्यांच्या शैलीचा महत्त्वाचा गुण होता. खाडिलकर यांची सशस्त्र क्रांतीवर श्रद्धा होती. म्हणूनच पुढे इ०स० १९०३ ते ०५ या काळात याचा प्रत्यक्ष अनुभव घेण्यासाठी टिळकांनी त्यांना नेपाळला पाठविले. चळवळीसाठी शस्त्रास्त्रे निर्माण करणारा कारखाना नेपाळला गुप्तपणे काढण्याची

जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली. तिथे त्यांनी 'केसरी' साठी 'गनिमी काव्याची लढाई' या विषयावर एकूण नऊ लेख लिहिले. लढाई आणि राजकारणाच्या डावपेचात 'गनिमी काव्या'चे महत्त्व हे या लेखांचे सूत्र आहे. ३१ डिसेंबर १९०७ रोजी 'केसरी' त 'सुरतची राष्ट्रीय सभा' हा उल्लेखनीय अग्रलेख त्यांनी लिहिला. हा अग्रलेख खाडिलकरांच्या 'विभूतीपूजक' मनोवृत्तीवर व नेत्यावरील कडव्या निष्ठेवर प्रकाश पाडणारा आहे. इ०स० १९०८ साली लोकमान्य टिळकांवर जहाल लेखन केले म्हणून राजद्रोहाचा खटला भरण्यात आला. हे जहाल लेखन एकूण आठ लेखांतून केलेले होते. या आठ लेखांपैकी पहिले तीन लेख टिळकांचे व पुढचे पाच लेख खाडिलकरांचे होते. जुलै १९०८ ते डिसेंबर १९०९ या काळात खाडिलकर यांनी 'केसरी' चे संपादक म्हणून काम पाहिले. तसेच मे १९१९ ते जून १९२० या काळातही त्यांनी 'केसरी' चे संपादक म्हणून काम पाहिले आहे. इ०स० १९०८ ते १९०९ या काळातील त्यांचे संपादकीय लेख सरकारवरील जहाल टीकेचे व जहाल पक्षाच्या प्रचारकार्याचे मुख्य वाहक ठरले आहेत. विभूतीपूजेशिवाय देशप्रेम आणि देशोन्नती या गोष्टी अशक्य आहेत, अशी त्यांची श्रद्धा होती. ही श्रद्धा त्यांनी टिळकांच्या सर्व प्रकारच्या प्रचार कार्याशी एकजीव करून टाकली. म्हणूनच न० चिं० केळकर यांनाही त्यांच्या व टिळकांच्या लेखांना वेगळे करता आले नाही. उदाहरणार्थ, 'टिळकांचे 'केसरी' तील लेख–खंड१' या पुस्तकांत खाडिलकरांच्या प्रारंभीच्या दोन लेखांचा समावेश आहे.

५ जानेवारी १९०९ रोजी त्यांनी 'केसरी' त 'सुराराध्य आणि दुराराध्य' हा वाचनीय असा अग्रलेख लिहिला आहे. याठिकाणी खाडिलकर उत्कृष्ट दर्जाचे प्रचारक होते, श्रद्धाळू अनुयायी होते, साहजिकच प्रतिपक्षांच्या मतांची ते चिरफाड करीत पण स्वपक्षाच्या तत्त्वांची मात्र ते कधी चिकित्सा करीत नसत हेही लक्षात घेतले पाहिजे. हे सर्व लक्षात घेऊनही त्यांच्या निबंधांनी वाचकांच्या मनात स्वधर्म, स्वदेश व स्वभाषा यांबद्दलचा अभिमान जागृत केला व वाढीस लावला. आणि निबंधात तार्किक विचारांची मांडणी करताना ओज, रस व भावनेबरोबरच त्यांच्यातील नाटककाराने नाट्यात्मकतेचीही जोड दिली. यामुळे त्यांचे निबंध वाचनीय झाले आहेत.

न० चिं० केळकर हे खाडिलकर 'केसरी' त येण्यापूर्वी सहा महिने आधी 'केसरी' त आले होते. बहुश्रुतता, व्यासंग हे त्यांच्या व्यक्तित्वाचे प्रमुख गुण सांगता येतील. मार्च १८९६ मध्ये ते पुणे येथे 'मराठा'चे संपादक म्हणून कार्यरत झाले. पुढे इ०स० १९२० पर्यंत त्यांनी 'मराठा' पत्रात संपादक म्हणून सतत इंग्रजीतून लेखन केले आहे. केळकर यांनी 'मराठा'बरोबर 'केसरी' चीही धुरा वाहिली, ही गोष्ट विशेष उल्लेखनीय आहे. मराठा पत्रात इंग्रजीतून लेखन करण्यासाठी केळकरांनी सतत इंग्रजी वाङ्मयाचे व त्यातल्या त्यात ॲडिसन, स्टीलपासून सी० पी० स्क्रॉटपर्यंतच्या वृत्तपत्रलेखकांचे वाचन केले. या लेखकांमधील बहुश्रुतपणा आत्मसात झाल्यामुळे

त्यांची लेखनपद्धती त्यांना 'केसरी' साठी उपयोगी पडली. इ०स० १९१०च्या आरंभापासून ते पुढे सामान्यतः १९३२ पर्यंत ते 'केसरी' चे संपादक म्हणून कार्यरत होते.

१२ डिसेंबर १९११ साली दिल्ली दरबारासाठी राजे पाचवे जॉर्ज सार्वभौम सम्राट म्हणून दिल्लीस आले. या घटनेवर त्यांनी 'केसरी' त खोचक अग्रलेख लिहिला. या अग्रलेखातून त्यांनी हजारो वर्षांचा इतिहास मार्मिकतेने उलगडून दाखविला आहे. इ०स० १९१२ मध्ये सर हारकोर्ट बटलर यांच्या प्रोत्साहनाने सिमल्याला आर्य विद्येच्या पुनरुद्धारार्थ तिच्या पुरस्कर्त्यांचे एक संमेलन भरले होते. 'संस्कृत विद्येचे पुनरुज्जीवन' या त्यांच्या प्रदीर्घ लेखमालेला हे संमेलन निमित्तमात्र ठरले. यामध्ये त्यांनी दोन अडीच हजार वर्षांतील विद्येचा आर्य इतिहास जिवंतपणाने वर्णन केला. हे करताना प्राचीन परंपरा व आधुनिकता यांचा त्यांनी सुमेळ साधला. यांतून त्यांच्या प्रगल्भ सामाजिक जाणीवेचा प्रत्यय येतो.

केळकर यांच्या लेखनाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी समोर येईल त्या विषयावर लिहिले. त्यात आपल्या शैलीचे वैशिष्ट्य सतत जपले. सभोवतालच्या सामाजिक व राजकीय जीवनातील विविध-गोष्टींचा परामर्श घेतला. औचित्य, सद्भिरुची आणि प्रमाणबद्धता या गुणांचा मिलाप त्यांच्याइतका दुसऱ्या कुणाही वृत्तपत्रनिबंधकाराला साधता आलेला नाही. उदाहरणार्थ, प्रत्येकाच्या इच्छेप्रमाणे समाजस्थिती राहावी हे परमेश्वराने मान्य केले तर या कल्पनेवरील 'भविष्यकथन' हा निबंध किंवा हाऊस ऑफ कॉमन्सचे वर्णन करणारा 'विलायती बातमीपत्रे' हा निबंध. तसेच 'संस्कृत विद्येचे पुनरुज्जीवन', 'हे कोण आले', 'बादशहांचे काका', 'भविष्यकथन' इत्यादी निबंध त्यांच्या प्रवाही भाषेचा परिचय घडवितात.

मराठी निबंधलेखनात लालित्य आणि उद्बोधन यांची सांगड घालणाऱ्या केळकरांना आपले सामर्थ्य व मर्यादांची नेमकी जाणीव होती. वस्तुतः साहित्यिक असणाऱ्या केळकर यांची जागा मात्र राजकारणाच्या आखाड्यात कायम राहिली एवढे नक्की.

संत वाङ्मयाचे थोर अभ्यासक असणाऱ्या लक्ष्मण रामचंद्र पांगारकर यांनी इ०स० १९०७ साली धुळे येथे 'मुमुक्षु' नावाचे साप्ताहिक सुरू केले. साप्ताहिक सुरू केल्यानंतर चार महिन्यांतच ते पुण्याला आले व तेथे त्यांनी या साप्ताहिकाचे मासिकात रूपांतर केले. या मासिकातून त्यांनी जे निबंध लिहिले ते 'मुमुक्षूतील निवडक निबंध भाग १, २ व ३' या ग्रंथांतून त्यांनीच प्रसिद्ध केले आहेत. त्यांच्या निबंधशैलीचा महत्त्वाचा गुणधर्म म्हणजे गद्यभाषेला लालित्यपूर्ण व चटकदार रूप देणे. उदाहरणार्थ, 'एका अडाणी वारली माणसाच्या जीवनावरील त्यांचा निबंध.'

विष्णु गोविंद विजापूरकर यांनी एप्रिल १८९४ मध्ये 'ग्रंथमाला' व एप्रिल १९०६ मध्ये 'विश्ववृत्त' अशी दोन नियतकालिके सुरू केली. स्वदेश, स्वधर्म व

स्वभाषा यांची यथाशक्ती सेवा करावी व स्वकीय बांधवांत स्वाभिमानाची वृत्ती जागृत करावी, हे उद्दिष्ट नजरेसमोर ठेवून त्यांनी वरील नियतकालिकांतून विपुल व विविध स्वरूपाचे लेखन केले. त्यांच्या लेखनात लालित्याची उणीव असली तरी ते जिव्हाळ्याने ओतप्रोत भरलेले आहे. उदाहरणार्थ, 'सरकारी शाळांतून धर्मशिक्षण', 'राष्ट्रीय शिक्षण स्वदेशी चळवळीचे प्रधान अंग आहे काय?', 'बाँबगोळा प्रकरण', 'सामाजिक सुधारणा व राजकीय सुधारणा', 'हिंदुधर्म–सनातन धर्म' इत्यादी त्यांच्या राजकीय व सामाजिक चळवळींना अनुलक्षून लिहिलेल्या लेखांचा उल्लेख करता येईल. येथे एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे ती म्हणजे त्यांचे वाङ्मयीन विषयांवरचे लेख मात्र वेगळे व उठावदार असेच आहेत. विशेषत: चिपळूणकर, जिनसीवाले, गोखले, स्पेन्सर, मॅक्समुल्लर इत्यादींचे त्यांनी केलेले मार्मिक मूल्यमापन उल्लेखनीय आहे.

'भालाकार' भास्कर बळवंत भोपटकर यांनी इ०स० १९०५ साली 'भाला' हे वर्तमानपत्र सुरू केले. त्यांच्या 'नरकाचा दरबार' या लेखामुळे त्यांना फेब्रुवारी १९०६ मध्ये शिक्षा झाली. इ०स० १९१० मध्ये त्यांचे 'भाला' हे वर्तमानपत्र बंद पडले. पुढे ते इ०स० १९२४ साली पुन्हा सुरू करण्यात आले. 'भाला'मध्ये लिहिलेले त्यांचे लेख इ०स० १९०८ साली 'भाल्याच्या फेकी' (भाग १ व २) या नावाचे प्रसिद्ध झाले. सरकारने ते जप्त केले. भालाकार भोपटकर हे टिळकपक्षाचे अनुयायी होते. पण त्यांचा म्हणून एक वेगळा पंथ होता. निर्भयपणापेक्षा निडरपणाने लिहिण्यावर त्यांचा भर होता. आपल्या लेखनातून त्यांनी 'बोलूकाका', 'घट्ट अनुयायी' इत्यादी शब्द रूढ केले.

पुण्यातील हिंदुमहासभेचे पुढारी असलेल्या लक्ष्मण बळवंत भोपटकर यांनी इ०स० १९२० पूर्वी 'लोकसंग्रह' हे साप्ताहिक चालविले. ते स्वत: चांगले लेखक होते, तसेच खोचदार शैलीत लिहिण्याविषयी व मर्मभेदी संभाषण कौशल्याबद्दल त्यांची ख्याती होती.

श्री० रा० ग० प्रधान हे नाशिक येथून प्रकाशित होणाऱ्या 'भारतसेवक' पत्राचे संपादक तसेच ते राज्यशास्त्र व अर्थशास्त्र या विषयांचे मार्मिक अध्यापक होते. प्रतिगामी व पुरोगामी या दोन्ही पक्षांकडे ओढा असलेल्या प्रधानांचे 'भारत सेवकातील निवडक लेख' प्रसिद्ध आहेत.

पुढील काळातील म्हणजे इ०स० १९२० नंतरच्या नागपुरातील 'महाराष्ट्र' वृत्तपत्रांचे संपादक असलेल्या गो० अ० गोखले यांनी इ०स० १९०६ साली 'देशसेवक'मध्ये लेखन करून वृत्तपत्रसृष्टीत प्रवेश केला होता. तसेच लोकमान्य टिळक यांच्या 'केसरी' तून प्रि० वा० शि० आपटे व प्रो० वा० वा० केळकर यांनीही निबंधलेखन केले आहे. यांतील प्रो० वा० वा० केळकरांचे काही लेख आज टिळकांच्या नावावर आहेत.

म० रा० बोडस यांनी इ०स० १८९३ ते इ०स० १९०८ पर्यंत अधेमध्ये 'केसरी' तून संपादकीय लिहिले आहे. विद्वत्ता व मार्मिकता ही त्यांच्या निबंधलेखनाची वैशिष्ट्ये सांगता येतील.

याकाळात स्वतंत्रपणे निबंधलेखन करणारे निबंधकारही दिसतात. उदाहरणार्थ, म० शि० गाळे, हे० म० पंडित, वासुदेवशास्त्री खरे, गो० स० सरदेसाई, श्री० ना० भ० पावगी, का० बा० मराठे, खं० भि० बेलसरे, वा० दा० मुंडले, बा० ना० देव, बा० अ० भिडे, ग० कृ० आगाशे, द० वि० आपटे, श्री० ना० कर्नाटकी, शां० मो० रानडे, भाऊशास्त्री लेले, म० ह० मोडक, रा० भि० जोशी, कृ० के० गोखले, प्रो० चिं० ग० भानू, प्रो० गं० बा० लेले इत्यादी सांगता येतील. यांपैकी ह० म० पंडित, वा० दा० मुंडले, द० वि० आपटे, शं० मो० रानडे, भाऊशास्त्री लेले इत्यादींनी वृत्तपत्रांचे व नियतकालिकांचे संपादन केले आहे. तर शं० मो० रानडे यांनी 'नाट्यकथार्णवा'चे संपादन केले आहे. वासुदेवशास्त्री खरे यांनी इतिहासावर अभ्यासपूर्ण व जबाबदारीने लेखन केले आहे. बाळकृष्ण अनंत भिडे यांनी इ०स० १८९४ ते ९६ याकाळात मुंबई येथे 'प्रभाकर' नावाचे दैनिक चालविले. संत वाङ्मयाचे मार्मिक टीकाकार म्हणून ते प्रसिद्ध आहेत.

इ०स० १८७४ ते १९२० या काळातील निबंधवाङ्मयाचा आढावा घेतला तर असे म्हणता येईल की महाराष्ट्रातील वृत्तपत्रव्यवसाय आणि नियतकालिके यांतून निबंधवाङ्मयाचा जन्म व विकास झाला. साहाजिकच वृत्तपत्रीय संपादकीय किंवा वृत्तपत्रीय लेख हे या निबंधांचे स्वरूप होते. प्रस्तुत काळात महाराष्ट्रात प्रचंड विचारमंथन झाले. राजकीय व सामाजिक जीवनात तट आणि पक्ष पडले. स्वातंत्र्याची जाज्वल्य भावना यातूनच जन्माला आली. बुद्धिवादाच्या कसोटीवर पुराणे व इतिहास यांची छाननी केली गेली. या सर्वांतून महाराष्ट्राने या काळात स्वतःची नवी, आधुनिक आणि तात्त्विक घडण घडविली. अशा या राजकीय-सामाजिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण काळात विचारप्रवाहाचे एक महत्त्वाचे साधन म्हणून निबंधवाङ्मयाने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

मराठी निबंधवाङ्मयाचे जनकत्व विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्याकडे जाते. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी हा वाङ्मयप्रकार इंग्रजीतून घेतला. चिपळूणकरांच्या निबंधमालेतील निबंधांचा विचार केला तर या निबंधांमध्ये भावनात्मकता व विचारप्रवर्तकता यांचा समतोल आढळून येतो. परंतु त्यांच्यानंतरच्या निबंधकारांच्या निबंधात मात्र यांपैकी एकाच गुणाला महत्त्व प्राप्त झालेले दिसते. उदाहरणार्थ, लोकमान्य टिळक, गोपाळ गणेश आगरकर, वि० का० राजवाडे यांच्या निबंधांत विचाराला महत्त्व तर श्री० म० परांजपे व अच्युतराव कोल्हटकर यांच्या निबंधांत भावनात्मकतेला महत्त्व दिसते. मात्र निबंधवाङ्मय हे लोकजागृतीचे व लोकशिक्षणाचे एक प्रभावी साधन आहे, या विचारातून सर्वांनीच समाजजागृती करणे हे

निबंधलेखनाचे उद्दिष्ट ठेवले. महाराष्ट्रात सामाजिक व राजकीय जागृती घडवून आणण्याचे श्रेय या काळातील निबंधांनाच द्यावे लागते. थोडक्यात सांगायचे तर लोकमान्य टिळक यांच्या निबंधांनी राजकीय जागृती, गो० ग० आगरकरांच्या निबंधांनी व्यक्तिस्वातंत्र्य व समानता, श्री० म० परांजप्यांच्या निबंधांनी पारतंत्र्याविषयी संताप उत्पन्न करून स्वातंत्र्यप्राप्तीची अभिलाषा प्रज्ज्वलीत केली. तर वि० का० राजवाडे यांच्या निबंधांनी मराठी भाषेचा अभिमान, समर्थांच्या बिजिगीषु प्रवृत्तिमार्गाचा प्रचार केला.

प्रस्तुत काळातील निबंधेतर वाङ्मयाचा विचार केला तर या वाङ्मयप्रकारांच्या निर्मितीच्या मुळाशी या कालखंडातील लोकमान्य टिळक, गो० ग० आगरकरादिकांचे निबंध व या निबंधांमुळे झालेली राजकीय व सामाजिक आंदोलने यांची प्रेरणा दिसते. उदाहरणार्थ, नाटक हे जनजागरणाचे प्रभावी माध्यम होऊ शकते ही जाणीव 'केसरी' तील 'नाटके करावी की करू नयेत?' यासारख्या निबंधात किंवा 'इंदुप्रकाश व नेटिव ओपिनियन'मधील किर्लोस्करांच्या नाटकांवरील चर्चेत व्यक्त होताना दिसते. नाटकाप्रमाणे काव्य, कादंबरी या वाङ्मयप्रकारांच्या निर्मितीलाही या कालखंडातील निबंधामुळे झालेल्या राजकीय व सामाजिक आंदोलनांनी हातभार लावलेला आहे.

१८७४ ते १९२० या काळातील निबंधवाङ्मयाच्या मर्यादेचाही येथे उल्लेख करावा लागेल. प्रस्तुत काळातील निबंधाजवळ प्रबोधनाचे म्हणजेच लोकजागृतीचे व लोकशिक्षणाचे एक महत्त्वाचे प्रभावी साधन म्हणून पाहिले गेल्याने या काळात एक कलात्म वाङ्मयप्रकार यादृष्टीने निबंधाची जाणीवपूर्वक जोपासना झालेली दिसत नाही. ही या काळातील निबंधवाङ्मयाची मर्यादा सांगता येईल. मात्र महाराष्ट्रात अभूतपूर्व स्वरूपाची वैचारिक क्रांती घडवून आणणाऱ्या थोर कार्यकर्त्यांचे आणि नेत्यांचे मौल्यवान विचारधन या काळातील निबंधवाङ्मयातच संग्रहित झालेले आहे. म्हणून या काळातील निबंधांना महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक इतिहासात अनन्यसाधारण असे महत्त्व आहे.

निबंधवाङ्मय १९२० ते पुढे :

मराठी निबंध म्हटला की विष्णुशास्त्री चिपळूणकर, लोकमान्य टिळक, गोपाळ गणेश आगरकर, शि० म० परांजपे, न० चिं० केळकर यांच्या निबंधांची आठवण होते. इ०स० १८७४ ते १९२० या काळातील निबंधवाङ्मयाने वैचारिक व भावनात्मक जागृतीचे एक महत्त्वाचे साधन म्हणून कामगिरी पार पाडली आहे. देशभक्ती, समाजसुधारणा व वाङ्मयविकास या तिन्ही प्रेरणा या काळातील निबंधलेखनामागे कार्यरत दिसतात. या काळात निबंध हा नाटक व कादंबरी या प्रकारांपेक्षाही लोकमान्य असा वाङ्मयप्रकार होता. प्रस्तुत काळात वृत्तपत्रांतल्या अग्रलेखांच्याद्वारे बरेचसे निबंधवाङ्मय निर्माण झाले. प्रभावी पत्रकाराचे व श्रेष्ठ

साहित्यिकाचे गुण अंगी असलेल्या आणि समाजाचे पुढारीपण करणाऱ्या व्यक्ती या काळात प्रमुख वृत्तपत्रांचे संपादन करीत होत्या. विष्णुशास्त्री चिपळूणकर, लोकमान्य टिळक, गोपाळ गणेश आगरकर, श्री० म० परांजपे हे प्रखर राष्ट्रीय वृत्तीच्या जागृतीचे प्रेरक संचालक व प्रभावी प्रचारक होते. निबंधलेखनाकडे त्यांनी आपल्या लोकजागृतीच्या कार्याचे साधन म्हणून पाहिले. वरील चारही निबंधकारांनी आपण स्वत: चालविलेल्या नियतकालिकांतून लेखन केले आणि लोकजागृतीचे हे साधन अत्यंत ध्येयनिष्ठ वृत्तीने व परिणामकारक रीतीने वापरले.

इ०स० १९२० नंतरच्या कालखंडात मात्र वृत्तपत्रीय अग्रलेख म्हणजे निबंध हे समीकरण संपुष्टात आले. तसेच निबंधाच्या स्वरूपातही महत्त्वाचे परिवर्तन घडून आलेले आहे. लोकमान्य टिळक-आगरकरांच्या हाती निबंधाला लोकजागृतीची व लोकजीवनसंपर्काची जी कार्यक्षम बैठक होती ती पुढे हळूहळू सुटत गेली. न० चिं० केळकर यांच्या निबंधांपासून या बदलाची चिन्हे उमटू लागलेली दिसतात.

लोकशिक्षण आणि वाङ्मयीन गुणांचा आविष्कार ही निबंधाची दोन महत्त्वाची अंगे मानली तर स्थूलमानाने असे दिसून येते की, इ०स० १९२०च्या पूर्वीच्या निबंधात पहिले अंग विशेष उठावदार राहिलेले आहे. मात्र विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या निबंधांत या दोन्ही अंगांचा सारखाच लोभनीय उत्कर्ष साधलेला आहे. हा एक अपवाद मानावा लागतो. इ०स० १९२० नंतर निबंधाचे दुसरे अंग विशेष महत्त्वाचे ठरले. साहजिकच या काळातील निबंधांत विचार, भावना व कल्पना यांचा मिलाफ पाहावयास मिळतो. तसेच या काळातील निबंध, लघुनिबंध, ललित निबंधामध्ये परावर्तित झालेला दिसतो. या निबंधाने स्वत:मध्ये 'प्रवासवर्णन' या साहित्यप्रकारालाही सामावून घेतलेले दिसते. प्रस्तुत भागात इ०स० १९२० नंतरच्या काळातील काही प्रमुख निबंधकारांच्या निबंधवाङ्मयाचा विचार करावयाचा आहे.

या काळात वा० म० जोशी यांनी लिहिलेल्या निबंधाचे स्वरूप प्राधान्याने विचारप्रधान होते. त्यांच्या निबंधलेखनाची 'सत्यशोधन' ही प्रमुख प्रेरणा होती. उदाहरणार्थ, 'ज्ञान हे विष की अमृत?', 'ध्येय हाच देव', 'माझ्या अनुभवाचे सार' इत्यादी निबंधांचा येथे उल्लेख करता येईल. वाचकांना मूलगामी विचार करावयास लावण्याचे सामर्थ्य त्यांच्या निबंधांत आहे. तसेच त्यांचे निबंध एकाचवेळी विचारप्रेरित आणि विचारप्रेरक असे आहेत. त्यामुळेच मराठी निबंधवाङ्मयात त्यांचे स्थान वैशिष्ट्यपूर्ण आहे. 'विचारविलास' (१९२७), 'विचार-लहरी' (१९४३) व 'विचारविहार' (१९४४) या संग्रहांतील त्यांच्या निबंधांनी मराठीतील विचारप्रधान निबंधवाङ्मयात मोलाची भर घातली आहे, असे म्हटले तर वावगे ठरू नये.

दत्तात्रय बाळकृष्ण ऊर्फ काका कालेलकर यांच्या निबंधांचे स्वरूप प्रामुख्याने चिंतनशील व काव्यात्मक असे आहे. तसेच त्यांच्या निबंधांतून समाजहित व

जीवनविकासाची आस्था प्रकट होताना दिसते. उदाहरणार्थ, 'जीवनातील आनंद' (१९४६) या पुस्तकातल्या 'निसर्गाचे हास्य', 'निवृत्तीतील निरीक्षण' व 'अनंताचा विस्तार' या तीन खंडांतील लहान-मोठ्या निबंधांत वरील गुण साकार झालेले आहेत. त्याचबरोबरीने अभिजात वाङ्मयाचा प्रभाव, निसर्गसौंदर्याविषयी श्रद्धा, माणसाला निष्काम, निर्मम व निरहंकार करून निर्लोभतेने जगण्याचे सामर्थ्य कला देते इत्यादींचे चित्रणही त्यांच्या निबंधांत येते. उदाहरणार्थ, 'मध्यान्हाचे काव्य' हा निबंध तसेच 'चिखल', 'वटवाघुळा'वरचे त्यांचे निबंधही यादृष्टीने पाहाता येतात. त्यांचा 'हिंडलग्याचा प्रसाद' (१९३४) हा संग्रह पौष्टिक विचारांनी संपन्न असाच आहे.

थोडक्यात, भारतीय संस्कृतीचे रहस्य नीट समजून ते निबंधरूपाने लोकांपुढे मांडण्याचे कार्य ज्यांनी केले आहे, त्यात कालेलकरांचे स्थान उच्च आहे. 'हिंदुधर्मातील अवतारवाद', 'ॐ नमो नारायणाय पुरुषोत्तमाय', 'गौरक्षा', 'धर्मसंरक्षण' इत्यादी त्यांचे निबंध उल्लेखनीय आहेत.

१९२० नंतर निबंधाने 'प्रवासवर्णन' या साहित्यप्रकाराला स्वत:मध्ये सामावून घेतलेले दिसते. कालेलकरांच्या प्रवासवर्णनात्मक निबंधांचा येथे उल्लेख करता येईल. त्यांच्या निबंधात प्रवासातील माहिती आहे, ज्ञान आहे, पांडित्य आहे आणि या सर्वांला लालित्याची जोड आहे. 'उत्तरेकडील भिंती', 'लोकमाता', 'भक्तिसुमने' ही त्यांच्या लेखसंग्रहांची पुस्तके या दृष्टीने पाहाता येतील.

श्री० म० माटे यांच्या निबंधवाङ्मयात सौंदर्यनिष्ठा व समाजनिष्ठा यांचा एकत्र संयोग दिसतो. तसेच समाजनिष्ठेमध्ये त्यांच्याठायीच्या सुजाण विज्ञाननिष्ठेचाही अंतर्भाव आहे. उदाहरणार्थ, 'साहित्यधारा' (१९४३), 'विज्ञानबोधाची प्रस्तावना' (१९४७) व 'विचारशलाका' (१९५०) या पुस्तकांतून विज्ञाननिष्ठ आणि प्रपंचनिष्ठ सामाजिकतेचे तत्त्वज्ञान मांडून मराठी निबंधाच्या वैचारिक अंगावर विलोभनीय लेणे चढविण्याचे जे कर्तृत्व त्यांनी प्रकट केले आहे, ते विशेष महत्त्वाचे आहे.

कालेलकरांच्या तुलनेने माट्यांच्या निबंधात काव्य कमी आहे. माटे हे विचारवंत असले तरी त्यांच्याठायी रसिकता, सूक्ष्म निरीक्षण, सामाजिक जिव्हाळा आणि अस्सल मराठी भाषाशैली इत्यादी गुण वसत होते. 'ही भगवद्गीता अपुरी आहे', 'शृंगार-रसांचा राजा', 'लहान लहान वशीकरणे', 'राम गणेशाला माझा मुजरा', 'माझे मनोराज्य' इत्यादी निबंध पाहिले की विषय निवडीतील वैविध्य लक्षात येते. माटे यांनी शुद्ध लघुनिबंधापासून शुद्ध चिंतनपर निबंधापर्यंत सर्व प्रकारचे निबंधप्रकार हाताळलेले दिसतात. चिंतनशीलता, समतोलवृत्ती, सत्यान्वेषणाची इच्छा आणि डौलदार शैली या गुणधर्मांमुळे केळकरांनंतर अव्वल दर्जाचे निबंधकार म्हणून त्यांचाच उल्लेख करावा लागतो.

पु० ग० सहस्त्रबुद्धे यांनी विज्ञाननिष्ठ समाजरचनेला आवश्यक असणाऱ्या मूल्यांचे अत्यंत तडफदार आणि युक्तिवादसंपन्न विवेचन आपल्या 'विज्ञानप्रणीत समाजरचना' या पुस्तकातील निबंधांत केलेले आहे. सर्व मानवी समाजाचे सुख, समाधान हे त्यांना महत्त्वाचे मूल्य वाटते. त्याचप्रमाणे अतींद्रिय तत्त्वांवर आधारलेल्या समाजरचनेत जे दोष संभवतात तेच बहुसंख्याकांचे सुख या ध्येयावर आधारित समाजातही संभवतात, हेही त्यांना ज्ञात होते. प्रयोगनिष्ठा, बुद्धिवाद, समता व व्यक्तिस्वातंत्र्य ही पाश्चात्य संस्कृतीची महातत्त्वे आहेत. तसेच पूर्वेची प्रगती ही तिचे पाश्चिमीकरण होण्यावरच अवलंबून आहे असा त्यांचा विश्वास आहे. साधी सरळ पण आत्मविश्वासपूर्ण विचारांची मांडणी हे त्यांच्या निबंधलेखनाचे वैशिष्ट्य सांगता येईल.

द० के० केळकर यांचे निबंध भौतिक शास्त्रांवरील जाणत्या श्रद्धेतून लिहिले गेले आहेत. त्यांच्या निबंधलेखनाचे सर्व गुणविशेष त्यांच्या 'वादळीवारे' (१९४०) यामध्ये पाहावयास मिळते. भोगवाद किंवा सुखवाद या भ्रामक कल्पनेला त्यांच्या विचारसृष्टीत मुळीच थारा नाही. अहिंसा, सत्य, अस्तेय, शौच व इंद्रियनिग्रह या पाच मूलभूत व स्थिर अशा नैतिक मूल्यांवर त्यांनी प्रगाढ निष्ठा व्यक्त केली आहे. यांतूनच समाजात सुखशांती नांदण्यासाठी विलोभनीय वस्तूंकडे समाजाने खेळकर व निःस्वार्थी वृत्तीने पाहिले पाहिजे, म्हणून ते सांगतात.

माधव दामोदर अळतेकर यांचा 'पाने व फुले' (१९३८) हा संग्रह त्यांच्या प्रगतिवादी विचारसरणीचा दाखला देतो. 'धर्माचे कैवारी कां सुधारणेचे वैरी' या निबंधातून त्यांनी शारदा बिलाला विरोध करणाऱ्या डॉ० मुंजे, न० चिं० केळकर, अणे, दादासाहेब खापर्डे इत्यादींचा परामर्श घेतला आहे. यात त्यांनी आपल्या समाजातील परंपरागत निरर्थक रूढींवर कोरडे ओढले आहेत. तसेच त्यांनी मराठी वाङ्मयाच्या परंपरेतील जितेंद्रियत्व अनुकरणीय मानले आहे.

विज्ञाननिष्ठ ऐहिकतेप्रमाणे अध्यात्मनिष्ठ जीवनदृष्टीचा प्रभावी पुरस्कार करणारेही निबंधकार या कालखंडात झाले. यात विनोबा भावे यांचे स्थान वरचे आहे. विनोबांच्या व्यक्तित्वात कर्मयोग, ज्ञानयोग व भक्तियोग हे तिन्ही योग एकाच वेळी सामावलेले होते. वाचकास सत्कर्म करण्यास प्रवृत्त करण्याच्या हेतूने त्यांनी निबंधलेखन केले. व्यक्तीचे आणि समाजाचे सर्व व्यवहार, शास्त्राचे अध्ययनसुद्धा, धर्माच्या म्हणजे उच्च, सनातन नैतिक मूल्यांच्या अध्यक्षतेखाली झाले पाहिजेत याबद्दल ते विशेष दक्ष असत. साहाजिकच त्यांचे सर्व निबंधलेखन हे उदात्त जीवनमूल्यांवरील श्रद्धेतून उदयास आलेले आहे. 'मधुकर' (१९३६) हा त्यांचा उत्कृष्ट निबंधसंग्रह आहे. 'मधुकर', 'जीवनदृष्टी', 'कान्तदर्शन' इत्यादी पुस्तकांतील त्यांचे निबंध 'धर्म' या एकाच संकल्पनेची विविध रीतीने चर्चा करणारे आहेत. विनोबांच्या निबंधांची दोन महत्त्वाची वैशिष्ट्ये सांगायची तर सत्कार्यप्रेरकता व विचारांची मौलिकता ही सांगता येतील. उदाहरणार्थ, 'सिंहावलोकन' या

पुस्तकातील निबंध. सुसूत्रता, सुबोधता, अर्थवाहकता आणि निश्चयात्मकता ही लेखनशैलीची वैशिष्ट्ये त्यांच्या निबंधांना वाचनीय बनवितात.

प्रस्तुत काळात विनोबा भावेंप्रमाणे साने गुरुजी यांनीही निबंधलेखन केले आहे. साने गुरुजी यांचे निबंध म्हणजे त्यांच्या व्यक्तित्वाचा आरसा आहे. त्यांची रसाळशैली, उच्च विचारसरणी व उत्कट जिव्हाळा यांचा सुंदर संगम 'भारतीय संस्कृती' या संग्रहातील निबंधात पाहावयास मिळतो. साने गुरुजी आणि विनोबा भावे हे दोघे गांधीवादी असले तरी या दोघांची मूलप्रवृत्ती भिन्न आहे. साने गुरुजी भक्तियोगी तर विनोबा ज्ञानयोगी म्हणता येईल. यामुळे दोघांचेही निबंध वेगळ्या स्वरूपाचे झाले आहेत.

पंडित श्री० दा० सातवळेकर हे अध्यात्मप्रवण वर्गातले मातब्बर निबंधकार. 'जीवनप्रकाश' (१९३९) या संग्रहातील निबंधांतून त्यांनी मुख्यतः आर्यसंस्कृतीला आधारभूत असलेल्या जीवनमूल्यांवर साधार प्रकाश टाकलेला आहे. त्यांचे 'अत्रि ऋषींचा कारागृहवास', 'लक्ष्मीचा एकच प्रश्न', 'वामनावताराचा संदेश' हे त्यांचे बोधप्रद निबंध आहेत.

येथे श्री० म० माटे व पं० सातवळेकर यांच्या आर्यत्वाच्या व भारतीयत्वाच्या अभिमानामध्ये फरक आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. 'बळी व वामन' यांच्या कथांचा दोघांनीही लावलेला अर्थ वेगवेगळा आहे. पं० सातवळेकर यांचा अभिमान हा बहुजनसमाजाच्या दृष्टीने प्रतिगामी ठरणारा वाटतो, हेही येथे नोंदवावे लागेल.

मा० श्री० अणे, ज० स० करंदीकर व ग० वि० केतकर यांनी राजकीय विषयांवरील निबंध लिहिले. या तिघांच्याही निबंधांत 'टिळक भक्ती' हे समान सूत्र पाहावयास मिळते.

'लोकनायक अणे यांचे लेख व भाषणे' (१९३१) या संग्रहांतील निबंधांवर अभिजात वाङ्मयाच्या अभ्यासाचे सखोल संस्कार पाहावयास मिळतात. युयुत्सू वृत्ती, उच्च नैतिक मूल्यांवरील अढळ भक्ती, सूक्ष्म व मुद्देसूद विवेचकशक्ती या गुणविशेषांनी अणे यांचे लेख विभूषित झालेले आहेत. 'नवीन पंथ' म्हणजे 'निःशस्त्र ऊर्फ संरक्षक प्रतिकार' या विषयांवरील त्यांचे सात लेख महत्त्वाचे आहेत. 'मराठी वाङ्मयाचा जयजयकार' हा त्यांचा दहा भागांत विभागलेला प्रदीर्घ लेख त्यांच्या चौफेर व चौकस वाङ्मयाभ्यासाची साक्ष पटविणारा आहे. वाङ्मय हे केवळ एक मौजेचे साधन नाही, कल्पनाशक्ती, सहानुभूती, प्रेमळपणा व विविध नैतिक संवेदना यांचा व्यवस्थित विकास करण्याचे ते एक प्रबळ साधन आहे ही त्यांची समजूत त्यांच्या निकोप वाङ्मयीनदृष्टीची साक्ष पटविते. मात्र त्यांचे लेखन मर्यादित स्वरूपात आहे.

ज० स० करंदीकर यांनी 'केसरी' च्या संपादकीय विभागाची जबाबदारी अनेक वर्षे स्वीकारली होती. या काळात त्यांनी विपुल निबंधलेखन केले आहे. त्यातील काही निबंध श्री० ज० स० करंदीकर यांचे निवडक लेख व निबंध' (१९५०) या संग्रहातून प्रकाशित झालेले आहेत. राष्ट्रीय जीवनाशी तादात्म्य, सडेतोडपणा, समयोचित संस्कृत वचनांचा समर्पक उपयोग, प्रतिपाद्य विषय नीट समजावून सांगण्याची हातोटी, बोचकपणाची झाक आणि मुख्य विषयाचा न्याय परामर्श काढणे ही त्यांच्या निबंधलेखनाची ठळक वैशिष्ट्ये सांगता येतील. करंदीकर यांच्यावर टिळकांच्या लेखनशैलीची व जीवनदृष्टीची छाप होती. त्यांचे सर्व निबंधलेखन पत्रकार या नात्याने झालेले आहे. साहाजिकच पत्रकाराच्या सामाजिक व राष्ट्रीय उत्तरदायित्वावर त्यांनी विशेष भर दिलेला आहे. नीतिला धक्का बसेल अनीतिला प्रोत्साहन मिळेल, राष्ट्रीयत्वाचा लोप होऊ लागेल अशी शिकवण वर्तमानपत्राने देऊ नये असे त्यांनी स्पष्ट बजावले आहे. कलेपेक्षा नीति महत्त्वाची असल्याने कलेने नीतिचे बंधन पाळावे आणि नीतिने जगत्कल्याणाचे बंधन पाळावे, ही त्यांची जीवनदृष्टी त्यांच्या सर्व निबंधांतून प्रतीत होते.

ग० वि० केतकरांनीही राजकीय विषयांवरच निबंधलेखन केले. 'मर्मभेद' (१९५०) ह्या त्यांच्या संग्रहातील निबंध पाकिस्ताननिर्मिती आणि संघावरील बंदी या दोन विषयांवरील आहेत. जळजळीत तर्कशुद्ध विवेचन हे त्यांच्या निबंधांचे प्रमुख वैशिष्ट्य सांगता येईल. यादृष्टीने त्यांचे 'आधी फाशी : मग चौकशी' हे संघबंदीवरील तीन मार्मिक लेख पाहाता येतात. तसेच युक्तिवादचातुर्याच्या साहाय्याने आपले विवेचन वाचकांना पटविणे हाही त्यांच्या निबंधलेखनाचा महत्त्वाचा विशेष सांगता येईल.

एस० एम० जोशी यांनीही राजकीय कार्यकर्त्याच्या भूमिकेतून काही निबंधलेखन केले आहे. त्यांच्या 'ऊर्मि' (१९४७) संग्रहातील 'काँग्रेसने माझ्यासाठी काय केले ?' व 'तुरुंगांतील दिवाळी' यांसारख्या लेखांचे स्वरूप राजकीय क्षेत्रातील एका कळकळीच्या कार्यकर्त्याच्या प्रांजळ भावोर्मी असेच आहे. त्यांच्या ध्येयवादी आणि चिंतनशील मनोवृत्तीचा प्रत्यय हे निबंध वाचकांना देतात.

आचार्य दादा धर्माधिकारी यांच्या निबंधांनी मराठी निबंधाची वैचारिक बाजू समृद्ध केली. तसेच एका नव्या समर्थ गद्यलेखन शैलीचीही ओळख करून दिली. या दृष्टीने त्यांचे 'क्रांतिनिष्ठा' (१९४८) हे महत्त्वाचे पुस्तक आहे. या पुस्तकातील सर्व लेखांतून त्यांच्या ठायीची 'विधायक विचारशीलता' व्यक्त झालेली आहे. 'उपकरणवाद', 'प्रभुत्ववाद', 'शस्त्रवाद', 'यंत्रवाद', 'पोटवाद', 'कल्पतरूवाद' असले वाद निर्माण करण्याची दादांच्या लेखणीला विशेष हौस आहे.

त्र्यंबक शंकर शेजवलकर यांनी प्रगति साप्ताहिकातून लेखन केले आहे. या लेखांचा संग्रह 'शेजवलकरांचे लेख' (१९४०) या नावाने प्रसिद्ध आहे. या पुस्तकांत

काही व्यक्तिचित्रे, पुस्तकपरीक्षणे यांचाही समावेश आहे. या पुस्तकाला त्यांनी लिहिलेली प्रस्तावनाही निबंध स्वरूपातच आहे. मात्र समाजाला सत्कार्यप्रवृत्त करू इच्छिणाऱ्याने कसे लिहू नये, याचे उदाहरण म्हणून या प्रस्तावनेचा उल्लेख करावा लागेल. विचारप्रचुर निबंध असा जर निबंधाचा एखादा प्रकार मानला तर त्या प्रकाराचे एक उत्कृष्ट उदाहरण म्हणून ही प्रस्तावना उपयोगी पडण्यासारखी आहे.

ग० त्र्यं० माडखोलकर हेही या काळातील एक प्रमुख निबंधकार आहेत. माडखोलकर यांच्यावर विष्णूशास्त्री चिपळूणकरांच्या निबंधमालेचा प्रभाव होता. तसेच श्री० कृ० कोल्हटकर व न० चिं० केळकर या दोन गुरूंकडूनही त्यांनी निबंधलेखनाचे धडे गिरविले होते. त्यांच्या निबंधलेखनाचे विशेष 'स्वैर विचार' (१९३८) या त्यांच्या संग्रहातील निबंधांत उत्तम रीतीने उमटले आहेत.

'नयनचुंबन', 'सांची येथील पाषाणपुरी', 'कृतानेक साष्टांग नमस्कार', 'मराठी टीकापद्धती', 'केळकरांची लेखनशैली', 'उर्वशी' इत्यादी त्यांचे निबंध सरस आहेत. येथे हेही लक्षात घेतले पाहिजे की माडखोलकर यांच्याकडे उदरनिर्वाहाचे दुसरे कोणतेही साधन उपलब्ध नसल्याने त्यांनी निबंधलेखन केले आहे. साहाजिकच त्यांच्या काही निबंधांची रचना सौंदर्यपूर्ण असली तरी त्यातील भावात्मकता मात्र बेताचीच आहे, असे म्हणावे लागेल.

'हिंदुत्वनिष्ठा' ही प्रमुख प्रेरक शक्ती असलेल्या पु० भा० भावे यांचा 'रक्त आणि अश्रु' हा संग्रह इ०स० १९४२ साली प्रकाशित झाला. त्यांचे काही उल्लेखनीय निबंध. उदाहरणार्थ, 'विमल, तुला काय झालं?', 'बंगाल! करपून गेलेले कुसुम!', 'आमच्या मासाहेब इतक्याच सुंदर असत्या' इत्यादी. वरील निबंधांत अनुक्रमे करुण, वीररसांच्या बरोबरीनेच उदात्त भावनेला महत्त्व मिळालेले आहे. तर 'मुस्लिम स्त्रियांची करुण किंकाळी' आणि 'पिंजऱ्यातील मैनांचा तडफडाट' हे त्यांचे निबंध खोडसाळपणाची साक्ष देणारे आहेत. त्यांनी वाचकांच्या भल्याबुऱ्या भावना कडाडून चेतविणारे त्यांच्या इष्टनिष्ट विकारांचा पेटता प्रक्षोभ घडवून आणणारे निबंध लिहिले. त्यांच्याठायीचे शब्दप्रभुत्व व भावपूर्ण लेखनशैलीमुळे त्यांचे निबंध वाचनीय ठरले.

भ० श्री० पंडित यांच्या 'सवडीचे क्षण' (१९४८) या संग्रहातील निबंधात त्यांच्यातील बहुश्रुतपणाचे दर्शन घडते. आरसा, छत्री, जोडे, अंगठी, उखाणे, वाहने इत्यादी नित्य परिचयाच्याच वस्तूंविषयी, गोष्टींविषयी मनोरंजक माहिती वस्तुनिष्ठतेने सांगितलेली आहे. चटकदार, माहितीपर व आनंददायक असे त्यांचे निबंध लघुनिबंधापेक्षा गंमतीदार लघुलेखांच्या स्वरूपाचे आहेत. म्हणून त्यांच्या निबंधाचे वर्णन 'गंमतीदार लघुलेख' असे करावे लागेल.

प्रस्तुत कालखंडात र० धों० कर्वे, श्री० के० क्षीरसागर, वा० ल० कुलकर्णी, न० वि० गाडगीळ, इरावती कर्वे, भास्करराव जाधव, डॉ० केतकर, ना०

सी० फडके, न० र० फाटक, कुसुमावती देशपांडे, आचार्य जावडेकर, पां० वा० गाडगीळ, प्रभाकर पाध्ये, ह० रा० महाजनी, केशवराव भोळे, रा० भि० जोशी, बा० सी० मर्ढेकर, वा० ना० देशपांडे, पु० म० लाड, आचार्य भागवत इत्यादींनी निबंधलेखन करून निबंधाचे दालन समृद्ध केले आहे.

र० धों० कर्वे यांची शैली साधी पण खोचदार आहे. 'समाजस्वास्थ्य' व 'प्रगति' या नियतकालिकांतून त्यांनी निबंधलेखन करून बौद्धिक जनजागृतीचे प्रयत्न केले. कर्वे यांच्या निबंधांचा आणखी एक गुणधर्म म्हणजे तर्कशुद्ध विवेचनपद्धतीने केलेली निबंधांची मांडणी होय.

वा० ल० कुलकर्णी यांच्या निबंधांचे स्वरूप प्रामुख्याने वाङ्मयीन टीका असे आहे. तर श्री० के० क्षीरसागर यांच्या निबंधांत मात्र द० के० केळकरांप्रमाणे विविधता आहे. 'वादळी वारे' व 'सुवर्णतुला' या लेखसंग्रहांचा येथे उल्लेख करता येईल. न० वि० गाडगीळ यांनीही निबंधलेखन केले आहे. 'सातगुदस्त', 'अनगड मोती' या संग्रहांचा येथे उल्लेख करता येईल. तर महादेवशास्त्री जोशी यांनी कीर्तनकाराच्या शैलीत निबंधलेखन केले आहे. 'तीर्थरूप महाराष्ट्र' यातील निबंध यादृष्टीने पाहाता येतील.

या कालखंडातील इरावती कर्वे यांचा निबंध माटे-माडखोलकर यांच्या तोलाचा आहे. 'परिपूर्ती' या पुस्तकातील निबंध नुसते वाङ्मयीन ललित निबंध नाहीत तर त्यांना सूक्ष्म जीवनदर्शनाची व समाजशास्त्रीय विचारांची बैठक लाभली आहे. या संग्रहातील 'वाटचाल' हा त्यांचा निबंध अविस्मरणीय आहे.

प्रस्तुत काळात विनोदी निबंधलेखनाचेही एक दालन पाहावयास मिळते. या प्रकारामध्ये य० न० केळकर, वा० रा० टिपणीस, वि० मा० दी० पटवर्धन, फिरस्ता इत्यादींनी निबंधलेखन केलेले आहे. वि० मा० दी० पटवर्धन यांचा 'साहित्यगुदाम' (१९३१) हा संग्रह तपकीरबाज, वक्तृत्वोत्तेजक, पत्तेबाज, प्रसिद्धिप्रिय लाडुबहाद्दर इत्यादी नगांनी भरलेला आहे. कोटीबाजपणा, काल्पनिक व्युत्पत्ति इत्यादी त्यांच्या विनोदाचे गुणधर्म सांगता येतील.

य० न० केळकर यांच्या 'विनोदलहरी' संग्रहातील निबंध रमणीय आहेत. त्यांच्या निबंधांतील रमणीयता ही प्रामुख्याने कल्पनाविस्तारावर आधारित आहे. उदाहरणार्थ, त्यांनी केलेले 'विरामचिन्हांचे वर्णन!' तर 'काळ आणि घड्याळ' हा निबंध विनोदातील काव्यात्मतेची प्रतीती देणारा आहे. वा० वि० जोशी यांच्या 'नरमगरम' (१९३८) या संग्रहातील निबंधही काव्यात्मकतेमुळेच वाचनीय झाले आहेत. वा० रा० टिपणीस यांच्या 'खिसमिस'मधील लेख उत्कृष्ट आहेत. 'काळेपणाचे गोरे गुण' यांमध्ये त्यांच्या विनोददृष्टीचे गुण स्पष्ट उमटले आहेत.

फिरस्ता यांचे निबंध 'फिरस्त्याचे निवडक लेख' (१९३४) मध्ये प्रकाशित झाले आहेत. विसंगती, विरोध, अतिशयोक्ती, उपरोध इत्यादींच्या आधारे फिरस्ताने आपला खुसखुशीत मेवा तयार केला आहे. शब्दनिष्ठ, प्रसंगनिष्ठ, कल्पनानिष्ठ व स्वभावनिष्ठ विनोदाची पखरण या निबंधांमध्ये पाहावयास मिळते. या संग्रहाला लाभलेली प्रादेशिक पार्श्वभूमी हे या संग्रहाचे एक वैशिष्ट्य सांगता येईल. त्यामुळे या निबंधांत हैदराबादी वातावरण, नबाबी आयुष्य, मुसलमानी भाषा व तेथील राहाणीचे मजेदार पडसाद पाहावयास मिळतात. उदाहरणार्थ, 'आमच्या गावांतील मोटारसर्व्हिस', 'जलसे बिदाई' इत्यादी निबंधांचा येथे उल्लेख करता येतील. त्यांच्या काही निबंधांत व्यापक भूमिकेवरून विनोद साधलेला दिसतो. उदाहरणार्थ, 'दांपत्यकलह' हा त्यांचा निबंध विनोदी रूपकाचे उत्तम उदाहरण म्हणून सांगता येईल. प्रस्तुत निबंधात त्यांनी धर्म, नीति, रूढी, सद्सद्विवेकबुद्धी यांच्या साहाय्याने साधलेली रूपकता, सामाजिक व्यवस्थेवर भाष्य करणारी आहे.

दत्तू बांदेकर यांचा 'अतिप्रसंग' हा विडंबनात्मक टीकेचा नमुना असून दंभस्फोट करणे हा या लेखनामागील हेतू आहे. चटकदार व आकर्षक शैलीतील त्यांचे निबंध आधुनिक तरुण स्त्रियांच्या दिखाऊ पुरोगामित्वाचा उपहास करणारे आहेत. काहीवेळा तर हा उपहास लैंगिक विकारांच्या आसपास घोटाळताना दिसतो. तर 'आजकालचे गुन्हेगार' या लेखमालेत त्यांनी भिकारी, ड्रायव्हर, फेरीवाला, पतिता, बेकार, भोंदुबाबा, वेश्या यांच्या कोर्टापुढे कैफियत मांडताना समाजातील कित्येक शिष्ट लोक व त्यांचे धंदे या आरोपींसारखेच आहेत हे त्यांनी प्रच्छन्न टीकेद्वारे यांनी वरील लेखमालेतून दाखविले आहे. काँग्रेस कार्यकर्त्यांवर त्यांनी काही लोकापवादाच्या आधारे चेष्टेची झोड उठविलेली आहे. याठिकाणी बांदेकरांनी विनोदाच्या साहाय्याने साधलेली टीका हेतुपुरस्सर विकृत व एकांगी आहे, हेही नमूद केले पाहिजे. त्यामुळे बांदेकर यांनी आपल्या अभिजात विनोदबुद्धीचा राजकीय प्रचारासाठी दुरुपयोग केला असेही म्हणता येईल. 'तंगी'सारख्या शब्दचित्रांतून साधलेला विनोद शुद्ध स्वरूपाचा असून, तो अपवादात्मक आहे.

ह० वि० वाडेकर यांनी 'हरि विनायक'मध्ये आपली विडंबनशक्ती प्रचारकी कार्यासाठी राबविली आहे. 'भालाकार कॉलिंग' लिहिताना त्यांनी भालाकारांच्या लकबी आत्मसात करण्याचा बराच यशस्वी प्रयत्न केला आहे.

पु० ल० देशपांडे यांचा 'खोगीरभरती' हा कल्पनानिष्ठ विनोदाचा भरणा असलेला लेखसंग्रह आहे. 'एका नूतन अमूल्य ग्रंथावरील अभिप्राय' हा लेख म्हणजे अभिप्राय लेखनाचे केलेले बहारीचे विडंबन आहे. तर 'पानवाला' यामध्ये पदवीधरांचा बोचक उपहास केलेला असून क्षुद्र वस्तूच्या अंगी गांभीर्याचा आव आणून खोटा मोठेपणा चिकटविलयाने उत्पन्न होणारा हास्यरस असे याचे स्वरूप आहे. तर 'आणखी एक रस' हे उत्तम विनोदी अनुकरणाचे उत्तम उदाहरण आहे.

या काळातील विनोदी निबंधलेखनाचा विचार करता असे म्हणता येईल की, आधुनिक मराठीतले बरेचसे विनोदी वाङ्मय हे मुख्यतः कथारूपाने किंवा व्यक्तिचित्ररूपाने लिहिले असल्याने, निबंधलेखन कमी स्वरूपात आहे. या निबंधांचे स्वरूप सामाजिक टीकात्मक निबंध असेच आहे. या निबंधांमधील विनोद हा हास्यास्पद किंवा अनिष्ट प्रवृत्तींचे उपहासपर विडंबन या स्वरूपाचा आहे. अगदी विनोदी म्हणून लिहिलेल्या 'आणखी एक रस' या निबंधातही सूक्ष्म टीका आहेच. तसेच शुद्ध कल्पनानिष्ठ स्वरूपाच्या विसंगतीचे दर्शन घडविणारे विनोदी निबंधलेखन त्या मानाने कमी आहे. याचे कारण शुद्ध कल्पनानिष्ठ विनोदासाठी उच्च दर्जाची सूक्ष्म, सुसंस्कृत व सहृदयतासंपन्न कल्पकता असणे आवश्यक असते. कुचेष्टा मात्र सोपी असते. असे असले तरी दंभस्फोटासारखे उपयुक्त सामाजिक कार्य अंशतः का होईना पार पाडण्याचे श्रेय या निबंधांना द्यावे लागते.

इ०स० १९२० नंतरच्या काळातील निबंध वाङ्मयाचे दालन न० चिं० केळकर, वि० दा० सावरकर, वा० म० जोशी, श्री० म० माटे, पु० ग० सहस्त्रबुद्धे, विनोबा भावे, काका कालेलकर, दादा धर्माधिकारी, ज० स० करंदीकर, ग० वि० केळकर, शेजवलकर, ग० त्र्यं० माडखोलकर, द० के० केळकर, पु० भा० भावे इत्यादींनी आपल्या निबंधलेखनाने समृद्ध केले. मात्र चिपळूणकर युगात निबंध हेच विचारप्रदर्शनांचे व समाजप्रवर्तनाचे एकमेव साधन होते. प्रस्तुत कालखंडात यामध्ये बरेच परिवर्तन झाले. वि० दा० सावरकरांच्या निबंधाचा अपवाद वगळता टिळक-आगरकर-परांजपे यांच्या निबंधांतील लढाऊवृत्ती ही या काळातील निबंधांत बरीचशी दिसेनाशी झालेली आहे. मात्र या निबंधकारांनी मराठी निबंधाचे वैभव अन्य दिशांनी निश्चित वृद्धिंगत केलेले आहे.

निबंधाचे विचारप्रधान, कल्पनाप्रधान व भावनाप्रधान असे तीन प्रकार कल्पिले तर वरील निबंधकारांच्या निबंधलेखनांत या तिन्ही प्रकारांचे आल्हाददायक दर्शन घडते. एकेकाच्या निबंधात प्राधान्याने एक किंवा दोन तर कधी कधी तीनही प्रकारची वैशिष्ट्ये प्रकट झालेली आहेत. वा० म० जोशी, ज० स० करंदीकर, पु० ग० सहस्त्रबुद्धे, ग० वि० केतकर, दादा धर्माधिकारी यांच्या निबंधांत मुख्यतः विचारविलास आहे. पु० भा० भावे यांच्या निबंधात कल्पकता आहे, तर विनोबा भावे यांच्या निबंधांचा व्यापक विचारशीलता हा प्रमुख गुण आहे. द० के० केळकर यांच्या निबंधांत प्रगतशीर विचार आकर्षक अलंकारांनी सजविले गेले, माटे यांचे निबंध विज्ञाननिष्ठा व स्निग्ध सहृदयतेने भरलेले आहेत. माडखोलकर यांच्या निबंधांतील कल्पकतेला बुद्धिनिष्ठेचे वळण लाभले आहे. तर परमार्थप्रवण विचार, रम्य कल्पना व उदात्त भावना यांचा सुंदर व सौम्य त्रिवेणी संगम कालेलकरांच्या निबंधांत पाहावयास मिळतो. य० न० केळकर, वि० मा० दी० पटवर्धन, वा० रा० टिपणीस, फिरस्ता व पु० ल० देशपांडे यांची कल्पकता विनोदविलासात रमली असे म्हणता येईल. थोडक्यात, या निबंधकारांनी मराठी निबंधाचे विचारात्मक, कल्पनात्मक व

भावनात्मक असे त्रिविध सौंदर्य अभिवृद्ध केले. असे असूनही या काळात वैचारिक निबंधाचा प्रवाह क्षीण झालेला दिसतो. याचे कारण याकाळात लघुनिबंधाचा झालेला जन्म हे सांगता येईल. शिवरामपंत परांजपे यांचा 'चंद्राचा वाडा', वा० ब० पटवर्धन यांचा 'थोडे वेडे व्हा वेडे' हा निबंध इत्यादींमध्ये लघुनिबंधाचे विशेष पाहावयास मिळतात.

१९२० नंतरच्या दशकात शिक्षणक्रमात 'लघुनिबंध' हा अभ्यासघटक अंतर्भूत केला गेला ही घटनाही लघुनिबंध लेखनाच्यादृष्टीने विचारात घ्यावी लागेल. याचा परिणाम म्हणून पुढील दोन तपे लघुनिबंध हा वाङ्मयप्रकार मराठीत रूढ व प्रिय झाला. नावीन्य, प्रयोगशीलता, फडके-काणेकर यांच्यासारखे प्रतिभावान निबंधकार यांच्यामुळे हा कालखंड लघुनिबंधाचा मानावा लागतो. 'नवे लेणे' आणि 'वासंतिक' हे दोन लघुनिबंध संग्रह यादृष्टीने पाहाता येतील.

पुढील काळात लघुनिबंधही ओहोटीला लागला. आनंद यादव, यशवंत, कुसुमाग्रज, बोरकर, विंदा करंदीकर, मंगेश पाडगावकर इत्यादी लघुनिबंध लिहिताना दिसतात. तरीही फडके-काणेकर यांच्या तोडीचा एकही लघुनिबंधकार दिसत नाही. पाठक, सरदेसाई, दामले, रघुवीर सामंत इत्यादी हौसेने आणि निष्ठेने लिहिणारे निबंधकार कमी होत गेले. आणि कथा, कादंबरी, काव्य या प्रकारांत कालानुरूप जसे प्रयोग झाले तसे निबंधात करता आले नाहीत. साहाजिकच कथा, कादंबरीच्या तुलनेने याकाळात लघुनिबंध मागे पडत गेला.

समारोप :

मराठीमध्ये 'निबंध' हा वाङ्मयप्रकार कलापूर्ण संवर्धनाच्या दृष्टीने उपेक्षित राहिलेला वाङ्मयप्रकार आहे. एक कलात्मक वाङ्मयप्रकार यादृष्टीने मराठी निबंधाची जाणीवपूर्वक जोपासना झालेली दिसत नाही. मराठीमध्ये चिपळूणकर, टिळक, आगरकर, परांजपे, केळकर, माटे, माडखोलकर, फडके, काणेकर, विनोबा भावे, इरावती कर्वे इत्यादींच्या निबंध-लघुनिबंध लेखनाचा विशेष उल्लेख करूनही विषय, शैली व जीवनदर्शन यादृष्टींनी मराठी निबंध इंग्रजी निबंधाशी तुलना करता मागे पडतो, असे म्हणावे लागते.

स्व-अध्ययन :

१) विष्णुशास्त्री चिपळूणकर आणि निबंधमालेचे स्वरूप व कार्य समजावून सांगा.

२) १८७४ ते १९२० या कालखंडातील प्रमुख निबंधकार व त्यांच्या निबंधवाङ्मयाचा सविस्तर परिचय करून द्या.

३) १९२० ते १९६० या कालखंडातील निबंध वाङ्मयाचा आढावा घ्या.

४) १८७४ ते १९६० या कालखंडात निबंध वाङ्मयाच्या स्वरूपात झालेल्या ठळक बदलांचे सोदाहरण विवेचन करा.

५) '१८७४ ते १९२० या काळातील निबंधवाङ्मयाने लोकजागृतीचे व लोकशिक्षणाचे महत्त्वाचे कार्य केले' या विधानाची सोदाहरण चर्चा करा.

संदर्भ ग्रंथ :

१) 'मराठी वाङ्मयाचा इतिहास', (संपा०) गो० म० कुलकर्णी, व० दि० कुलकर्णी, मसाप, पुणे.

२) 'मराठी वाङ्मयाचा इतिहास', खंड सहावा, भाग पहिला, (संपा०) गो० म० कुलकर्णी, व० दि० कुलकर्णी, मसाप, पुणे, मे १९८८.

३) 'आधुनिक मराठी वाङ्मयचा इतिहास', अ० ना० देशपांडे, भाग पहिला (१८७४ ते १९२०), व्हीनस प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती, ऑक्टोबर १९९२.

४) 'मराठी वाङ्मयाचा इतिहास', खंड ५वा, भाग १, (संपा०) रा० श्री० जोग, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ पुरस्कृत, आवृत्ती पहिली, १९७३.

५) 'आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास', भाग २, (१९२०-१९५०), अ० ना० देशपांडे, व्हीनस प्रकाशन, पुणे, आवृत्ती पहिली, पुनर्मुद्रण, जानेवारी १९७०.

६) 'महाराष्ट्रातील राष्ट्रवादाच्या उदयाचा वाङ्मयावर झालेला परिणाम (१८१८-१९२०)' चर्चासत्रात वाचलेला निबंध.

❖❖❖❖

२

कविता (१८७४ ते १९२०)

डॉ. शरयू आसोलकर

उद्दिष्टे :

- १९२०-१९६० या कालखंडातील कवितेच्या इतिहासाचा परिचय करुन देणे.
- १९२०-१९६० या काळातील काव्य मंडळांनी केलेल्या वाङ्मयीन कार्याचे महत्त्व पटवून देणे.
- नवकाव्याचे विशेष आणि नवकविता यांचे मराठी काव्य प्रवाहातील महत्त्व पटवून देणे.
- या कालखंडातील कवितेला असलेले सामाजिक, राजकीय सौंदर्यातील संदर्भ उलगडून दाखवणे.
- या काळातील विडंबनकाव्य खंडकाव्य इत्यादी काव्यप्रयोगांची ओळख करुन देणे.

मराठी वाङ्मयाच्या उन्मेष, उद्बोधन आणि विस्तरण पर्वामध्ये जे मराठी वाङमय चार-पाच शतकामध्ये निर्माण झाले त्यापेक्षा वेगळे साहित्य १९ व्या शतकामध्ये लिहिले गेलेले दिसून येते. हे वेगळेपणा समजून घेण्यासाठी उपरोक्त पर्वामध्ये कोणते वाङ्मय लिहिले गेले हे पाहणे आवश्यक ठरते. प्राचीन काळातील वाङ्मय हे प्रामुख्याने पद्यमय आहे. महानुभाव वारकरी समर्थ आणि अन्य पंथियांनी भक्तिप्रधान काव्य लिहिले. त्यासाठी त्यांनी अभंग आणि ओवी हे पारंपरिक छंद योजलेले दिसतात. सर्वसामान्याना नैतिकतेची शिकवण देणे व त्यांना भक्तिमार्गाची गोडी लावणे हे कार्य संतवाङ्मयाने पार पाडलेले दिसून येते. या संतकाव्याचा मराठी समाजमनावर फार मोठा प्रभाव पडला आहे.

प्राचीन मराठीमध्ये पंडित कवी मुक्तेश्वर ते मोरोपंत असा पंडितीकाव्याचा एक महत्त्वाचा प्रवाह आहे. आख्यानकाव्य, कथाकाव्य, स्वयंवर काव्य, चंपूकाव्य, कूटकाव्य अशा प्रकारातील हे पंडिती काव्य अभिजनवर्गात लोकप्रिय झाले. चातुर्मासामध्ये कथा सांगण्यासाठी, ऐकण्यासाठी प्रामुख्याने ते लिहिले गेले. पौराणिक देवदेवतांच्या कथा रसाळपण रंगवून सांगणारे हे काव्य आहे. रामायण, महाभारत,

भागवत आदि संस्कृत ग्रंथातील कथा, आख्यानकाव्य स्वरूपात त्यांनी श्रवणीयरीत्या कथन केल्या. ओवीबरोबर त्यांनी श्लोकरचनेचाही वापर केला. संस्कृतमधील कालिदास, माघ यासारख्या महाकवींच्या काव्यांच्या आधारे त्यांनी आपले काव्य रचले. ओवी या मराठमोळ्या छंदाबरोबरच संस्कृतप्रमाणे श्लोकरचनाही पंडित कवींनी केलेली दिसून येते. आर्यावृत्ताचा वापर मोरापंतांनी केला. पंडिती कविता ही निर्दोष असली तरी संतकाव्याप्रमाणे ती सर्वसामान्यांपर्यंत पोहचली नाही. संस्कृतप्रचुरता, अलंकारिकता व क्लिष्टता यामुळे ही कविता विशिष्ट वर्गापुरतीच राहिलेली दिसून येते. बहुतेक पंडितकवींना राजाश्रय लाभलेला असल्यामुळे द्रव्यार्जनाच्या हेतूनेही हे काव्य लिहिले गेले. चातुर्मासामध्ये कथा सांगणे व ऐकणे यासाठीच ही कविता निर्माण झाली.

मराठेशाहीच्या काळात शाहिरी काव्य लिहिले गेले. संत पंत आणि तंत म्हणजेच, संतकाव्य, पंडितीकाव्य आणि शाहिरी काव्य होय. तंतुवाद्याच्या सहाय्याने सादर केले जाणारे काव्य म्हणून शाहिरी काव्याला तंतकाव्य असे संबोधले जाते. लावणी आणि पोवाडा अशा दोन मुख्य काव्यप्रकारांचा उदय या काळात झाला. 'मराठी कवितेची प्रभात' असे या काव्याला श्री. कोल्हटकर यांनी संबोधले. कारण अस्सल मराठमोळी संस्कृती या कव्यातून आविष्कृत झाली. मराठी शाहीर लोकांबरोबर हसले, लोकांबरोबर रडले. इतकी मराठी कविता लोकांजवळ आली ती शाहिरी कवितेच्या काळात होय. पराक्रमी वीरांचे स्तवन करणारा पोवाडा म्हणजे वीररसाचा उत्स्फूर्त आविष्कार होय. 'शर मर्दाचा पोवाडा शूर मर्दाने गावा' असे पोवाडे या काळात रचले गेले. लावणी हा शृंगाररसप्रधान काव्यप्रकारात सादरीकरणाला महत्त्व आहे. नृत्याच्या साथीने सादर होणाऱ्या लावणीचे स्वरूप रंजनपर आहे. बैठकीच्या लावणीपासून आध्यात्मिक लावणीपर्यंत असंख्य प्रकारच्या लावण्या लिहिल्या गेल्या. अठरापगड जातिधर्मातील शाहीर कवी लिहीत होते. शाहीर रामजोशींपासून ते शाहीर सगनभाऊंपर्यंत अनेकांनी लावण्यापोवाडे रचले. शाहीर अनंतफंदींनी उपदेशात्मक लावणी म्हणजेच 'फटका' या काव्यप्रकाराची निर्मिती केली. शाहीर होनाजी बाळा यांनी 'भूपाळी' लिहिली. पण लावणी ही मुख्यतः शृंगारप्रधान आहे. शाहिरांनी आपल्या भवताली जे पाहिले, अनुभवले ते ते सारे लौकिक काव्यातून व्यक्त केले. या लौकिकतेच्या मर्यादा काही वेळा ओलांडल्या गेल्यामुळे लावणीवाङ्मय काही प्रमाणात भडक आणि उत्तानही झालेले दिसते. मात्र अठरापगड जाति धर्मामधून आलेल्या या शाहिरी कवींनी मराठी कविता समृद्ध करण्यामध्ये हातभार लावला आहे.

मराठी कवितेची ही पूर्वपरंपरा आहे. पेशवाई संपल्यानंतर समाजस्थितीमध्ये मोठाच बदल झाला. इंग्रजी अंमल सुरू झाल्यानंतर इंग्रजी शिक्षणाच्या परिचयामुळे इंग्रजी, संस्कृत भाषेतील काव्यांचे अनुवाद मराठीत होऊ लागले. पंडिती काव्याच्या

अनुकरणाबरोबर नव्या प्रकारची कविता लिहिली जाऊ लागली. या संदर्भात प्रा.गं.ना. जोगळेकर म्हणतात, 'कृष्णशास्त्री चिपळूणकर, चिंतामणी पठेकर लेंभे, मोगरे, पारखीशास्त्री यासारख्या अनेक कवींच्या काव्यलेखनात जुनेच वळण दिसत असले तरी काही नवीन खुणाही जाणवतात. वि. मो. महाजनी, गोविंद वासुदेव कानिटकर आणि ग.ज.आगाशे यांसारख्या अनेकांनी इंग्रजी काव्याच्या अनुकरणातून स्वतंत्र स्वरूपाची कविता लिहिलेली दिसते. या कवीच्या ठिकाणी पद्यरचनेचे कौशल्य असले तरी त्यांची प्रतिभा प्रबळ नसल्यामुळे काव्यात क्रांती करण्याचे श्रेय त्यांना मिळू शकत नाही'. याच काळात महात्मा जोतिबा फुले यांनीही काव्यरचना केलेली दिसून येते. त्यांनी लिहिलेल्या अखंडांमधून विचारप्रबोधन आणि विचारप्रकटीकरण हे दोन विशेष दिसून येतात. मात्र काव्यविशेषांच्या दृष्टीने हे लेखन मराठी काव्याच्या परंपरेत काहीसे बाजूला पडले. आशयाच्या दृष्टीने हे लेखन महत्त्वाचे असले तरी काव्य म्हणून त्याला मर्यादा पडलेल्या दिसतात.

मराठी काव्याला पूर्वपरंपरा लाभल्यामुळे पंडित कवींच्या कवितेप्रमाणे काव्यलेखन होत राहिले. या काळात इंग्रजी काव्याची ओळख झाल्यामुळे नवीन स्वरूपाची कविताही हळूहळू लिहिली जाऊ लागली. त्यात पद्यरचनेचे कौशल्य असले तरी प्रतिभेची प्रबळता दिसत नव्हती. काव्यात क्रांती करण्याचे सारे श्रेय केशवसुतांना जाते. बालकवी, गोविंदाग्रज यांनी स्वतःचा उल्लेख केशवसुतांचे शिष्य असाच केला आहे. त्यामुळे केशवसुतांनंतर केशवसुत संप्रदाय सुरू झालेला दिसून येतो.

अर्वाचीन मराठी कवितेचे जनक कवी केशवसुत (१५ मार्च १८६६ ते ६ नोव्हेंबर १९०५)

अर्वाचीन मराठी कवितेचे जनक, क्रांतिकारक कवी, नव्या युगाचा धुरंधर अशा शब्दात केशवसुतांचा उल्लेख केला जातो. काव्य एका पारंपरिक आवर्तामध्ये सापडलेले असताना केशवसुतांनी मराठी कवितेमध्ये आशय-अभिव्यक्तीच्या दृष्टीने नवप्रवाह आणला. लौकिक विषयावरही उत्तम काव्यनिर्मिती होऊ शकते हे त्यांनी दाखवून दिले. शिक्षकी पेशा स्वीकारलेल्या केशवसुतांची ३९ वर्षाची ह्यात सारखी फिरती, अस्थिरता, दारिद्र्य यांनी व्यापलेली आहे. प्राप्त, प्रतिकूल परिस्थितीशी संघर्ष करीत त्यांचे काव्यलेखन सुरू राहिले. त्यांच्या मृत्यूनंतर बारा वर्षानी १९१७ मध्ये त्यांची कविता ह. ना. आपटे यांनी प्रसिध्द केली.

या काळात कविता टोपणनावाने लिहिली जात होती. हा इंग्रजी अनुकरणाचाच भाग होता. कृष्णाजी केशव दामले अर्थात 'केशवसुत' या नावानेच केशवसुतांनी काव्यलेखन केले. इंग्रजी कवी पॉलग्रेव्हच्या 'गोल्डन ट्रेझरी' या काव्यसंग्रहाचा प्रभाव भाषेतील उत्तम गीते आणि गीतात्म कवितांचा मोठाच प्रभाव पडला. या काळातील

कविंनी कवितेचे पारंपरिक रूप बदलवून टाकले. त्यात केशवसुतांचा वाटा मोठा होता. म्हणूनच त्यांना अर्वाचीन काव्याचे जनक संबोधण्यात येते. त्यांच्या काव्याचे वळण पूर्णतः निराळे आहे. विचारप्रकटीकरणासाठी आणि भावनाविष्कारासाठी त्यांनी आत्मनिष्ठ शैलीचा वापर केला. सुलभ आणि लवचीक अशा मात्रावृत्तांचा स्वीकार त्यांनी केलेला दिसून येतो. केशवसुतांवर इंग्रजी कवी इमर्सनच्या काव्यविषयक विचारांचाही प्रभाव आहे. त्यांच्या अनेक कवितांचे भाषांतरही त्यांनी केले आहे. त्यांच्या काव्याचा उगम तीव्र भावनेच्या पोटी असून त्यात त्यांच्या व्यक्तित्वाचे स्पष्ट प्रतिबिंबही दिसतो. अनुभवाचा लयबध्द अविष्कार त्यांच्या काव्याचा विशेष आहे.

'क्लृप्ती' हेही केशवसुतांच्या काव्याचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. क्लृप्तीला त्यांनी सरस आणि सुरस असे संबोधले आहे. काव्यातील आशयाचा (content) प्रतिमेशी (image) संयोग झाला की त्यातूनच 'क्लृप्ती' (poetic imagination) आणि 'विचार' यांचा संभव होतो असे त्यांनी म्हटले आहे. कविता ही अशा उदात्त क्लृप्तींनी आणि तात्त्विक विचारांनी युक्त असली पाहिजे आणि कवीने नेहमीच या क्लृप्तीच्या विश्वात संचार करीत राहिले पाहिजे असेही त्यांनी नमूद केले आहे.

'स्फूर्ती' या त्यांच्या कवितेत सुधारणेच्या 'स्फूर्ती' साठी सोमरसाच्या पेल्याची प्रतिमा योजली आहे. आपण सुधारणावादी असून आपल्या काव्याने निद्रिस्त समाजाला जागे करून रूढीपरंपरांचे जोखड भिरकावून देऊ. या आशयाशी सुसंगत स्फूर्ती च्या सोमरसाची प्रतिमा योजल्याने वेगवेगळ्या क्लृप्त्या आणि तात्त्विक विचार त्यांना सुचले आहेत. एका क्लृप्तीमध्ये त्यांनी अज्ञानात गुरफटलेल्या, भाबड्या जगाला उच्च, उदात्त, तेजस्वी विचारांनी समृध्द करण्याचा मानस व्यक्त केला आहे. क्लृप्तीचीच नौका करून आकाशसागरावर जाऊन तेथील उडूरत्ने दीन धरेवर उधळण्याची त्यांची कल्पना आहे. काव्यपंक्तीची तरफ जी विधात्याने हातात दिली आहे तीच जनताशीर्षावर टेकवून जग उलथवून देण्याची, समाजपरिवर्तन करण्याची क्लृप्तीही सांगितली आहे. जग जड, अचेतन, धोंड्यासारखे जड आणि मूढ आहे, त्या जगात हालचाल, सजीवता निर्माण करावयाची आहे. देव दानवा नरे निर्मिले हे सत्य सांगण्याची अनिवार इच्छा आहे. बसूनी का वाढविता मेदा ? विक्रम काही करा चला तर, असे आवाहनही केले आहे. केशवसुतांच्या कवितेत प्रतिभेच्या शक्तीला जसे महत्त्व आहे तसे शब्दशक्तीलाही आहे. नैसर्गिक प्रतिभेचा गौरव त्यांनी केला आहे. ज्या एकोणिसाव्या शतकाचे केशवसुत प्रतिनिधी आहेत. त्या शतकामध्ये जॉन स्टुअर्ट मील, हर्बट स्पेन्सर, डार्विन यांच्या तत्त्वज्ञानाचा इंग्रजी काव्यावर प्रभाव होता. केशवसुतांच्या काव्यलेखनाला प्रारंभ झाला. त्यावेळी परिवर्तन होऊ घातले होते. राष्ट्रीयता, ईश्वराचे विश्वजनकत्व, विश्वबंधुत्व, स्त्रीवर्गाची प्रगती, अंत्यजाची उन्नती या सामाजिक विचारांच्या छटा त्यांच्या कवितेत आढळतात.

'गोष्टी घराकडील मी वदता गड्या रे', 'नैऋत्येकडील वारा' या कवितांमधून नातेवाईकांचा उल्लेख येत असला तरी कुणाही वाचकास ते आपलेच मनोगत वाटते. कारण केशवसुतांच्या कवितेत आत्मनिष्ठा असली तरी ती व्यापक स्वरूपाची आहे. सुधारणावादाचे प्रोत्साहन त्यांच्या कवितेत उमटले आहे. 'मजुरावर उपासमारीची पाळी', 'पण लक्षात कोण घेतोच्या कर्त्यास', 'अंत्यजाच्या मुलाचा पहिला प्रश्न' यासारख्या कवितांमधून त्यांच्या सामाजिक सहानुभावाचे दर्शन घडते. स्त्रीदाक्षिण्याची नवी जाणीव समाजात नुकतीच रूजत होती. समाजातील विषमता व अस्पृश्यता या दोन अन्यायाकडे केशवसुतांनी आपल्या काव्यातून लक्ष वेधले. 'गावी गेलेल्या मित्राची खोली', 'बळवंत अप्पाजी दाते यांस', 'भारतीयाचे उद्‌गार', या कवितांमधून त्यांच्या राष्ट्रप्रेमाचे दर्शन घडते. 'तुतारी', 'मूर्तीभंजन' या कवितांमधून सामाजिक रूढीवर त्यांनी शस्त्र उगारले आहे.

इंग्रजी कवी वर्डस्वर्थच्या निसर्गविषयक कवितांचे अनुकरण त्यांच्या 'सृष्टी आणि कवी,' 'भृंग,' 'पुष्पाप्रत,' 'फुलपाखरू' या कवितांमधून दिसून येते. त्यामधून त्यांची चिंतनशील वृत्ती जाणवते. मात्र त्यात पुरेशी व्यापकता किंवा सखोलता आढळत नाही. निसर्गाच्या सान्निध्यात स्वतःला विसरणे होत नाही. केशवसुतांनी कवितेचे रूढ स्वरूप पालटण्यासाठी प्रयत्न केले. त्याच त्याच विचारांची पुनरूक्ती केली नाही. 'हरपले श्रेय', 'झपुर्झा', 'कोणीकडून कोणीकडे' या कवितांमधून गूढ अनुभूतीचे दर्शन घडते. 'झपुर्झा' ही कविता महत्त्वाची आहे. या कवितेत कवीच्या दिव्य दृष्टीचे, निःसंगवृत्तीचे दर्शन घडविले आहे. 'व्यर्थी अधिकाची अर्थ वसे तो त्यास दिसे ज्या म्हणती पिसे' असे कवीचे वर्णन करीत त्याच्या प्रतिभासामर्थ्याचा गौरव केला आहे. सनदी तेथे कोण वदा - हजारांतूनी एखादा, असे त्याचे वीरलत्व वर्णन केले आहे. शेवटी रसिकही तर असा निःसंग झाला तर त्यालाही सुंदर दृश्य, मधुर संगीत ऐकू येईल म्हणजेच कवितेचा रसास्वाद घेता येईल असे म्हटले आहे. केशवसुतांनी असे मोजकेच काव्य लिहिले असले तरी प्रभावी कसे होईल याकडे लक्ष पुरविले आहे. भाषा गद्यप्राय असली तरी त्यातील तेजस्वी विचारांमुळे तिच्यातील ओबडधोबडपणा जाणवत नाही. उलट त्यात नादमधुरता आढळते.

केशवसुतांनी विचारप्रकटीकरणासाठी आणि भावाविष्कारासाठी सॉनेट हा इंग्रजी काव्यप्रकार मराठीत आणला. त्यासाठी त्यांनी विविध वृत्तांचाही अवलंब केला. मिल्टन आणि शेक्सपिअर अशा दोनपैंकी मिल्टनच्या सॉनेटपध्दतीच्या सॉनेटचे सुनीत हे नामकरणही केले. यमकयोजनेमुळे, चौदा चरणांची त्यांची सुनीते वैशिष्ट्येपूर्ण आहेत. केशवसुतांनी स्वतःचा 'वाग्देवीसुत' असा उल्लेख केला असून आपले सरस काव्य पुढील पिढ्या आवर्जून आस्वादतील असा आत्मविश्वास व्यक्त केला आहे. केशवसुतांच्या या गुणांमुळे त्यांना 'आधुनिक कविकुलगुरू' असे

संबोधण्यात येते. 'तुतारी', 'स्फूर्ती', 'निशाणाची प्रशंसा' या कवितांमधून ओजस्वी वृत्ती प्रकटते. नव्या मनुचा साक्षात्कार त्यांच्याच कवितेत प्रथमतः झाला म्हणून ते नव्या कवितेचे प्रवर्तक ठरले. केशवसुतांच्या या श्रेष्ठ कवितेतील प्रतिमासृष्टी त्या दृष्टीने लक्षणीय ठरते. ही प्रतिमासृष्टी भारतीय परंपरेतील असून भारतीय तत्त्वज्ञानामध्ये आणि भारतीय पुराणकथांमध्ये (mythology) तिची पाळेमुळे आहेत. सकृतदर्शनी ही प्रतिमासृष्टी पारंपरिक वाटत असली तरी केशवसुतांच्या कवितेत तिला नवा संदर्भ लाभताना दिसतो. हा नवा संदर्भ त्या प्रतिमातील रोमँटिक बिजांचा विकास करणारा आहे. देव, ब्रह्मा ह्या रूपात त्यांनी पाहिलेला कवी, 'ऋण' कल्पनेतून व्यक्त झालेली सामाजिक बांधिलकी, वेदिका, ज्वाला, चिद्घनचपला या प्रतिमांतून व्यक्त होणारी अनिष्टांच्या संहाराची कल्पना ह्या सर्व प्रतिमा अस्सल भारतीय परंपरेतील आहेत. म्हणूनच पाश्चात्य रोमँटिसिझमच्या संस्कारातून केशवसुतांच्या जाणीवविश्वात भारतीय परंपरेतल्या जाणिवा पुनर्संघटित झाल्या आहेत असे म्हणावे लागेल. असे प्रतिपादन सुधीर रसाळ यांनी केले आहे. 'पद्यपंक्तीची तरफ' वापरून सामाजिक दंभाला उलथून टाकण्याचा प्रयत्न 'स्फूर्ती', 'मूर्तिभंजन', 'गोफण', 'नवा शिपाई' या कवितांमधून करीत केशवसुतांनी मराठी कवितेत नवेपणा आणला.

नारायण वामन टिळक (१८६१ - १९१९)

'फुलामुलांचे कवी' असे ना. वा. टिळक यांना म्हटले जाते. त्यांच्या मुलांविषयीच्या कवितेमध्ये बोधपरता आहे. उपदेशाची झालर आहे, त्यात त्याकाळाची नाविन्यत आहे. त्यांच्या फुलांविषयीच्या कविता अधिक लोकप्रिय झाल्या. त्यांच्या स्वभावधर्माशी त्या अधिक जवळच्या आहेत. केशवसुतांप्रमाणेच त्यांनाही सामाजिक दुःखाची जाण आहे. त्यांच्या काही कवितांमधून घराचे चित्रही आढळते. प्रीतीचे साफल्य खेळकर विनोदातून त्यांनी रंगविले आहे. 'माझी भार्या' या कवितेतील प्रेम प्रामाणिक आहे. प्रेमाच्या उत्कटतेला घरगुतीपणाची जोड मिळवून दिली आहे.

केशवसुतांच्या आणि टिळकांच्या कवितेमध्ये निसर्गप्रेम, सामाजिकता, प्रासादिकशैली ही साम्ये जशी दिसतात तसे काही भेदही आढळतात. केशवसुतांच्या कवितेत आढळणारी प्रतिमेची उत्तुंग भरारी टिळकांच्या कवितेत नाही. ती गृहजीवनाच्या प्रेमळ आनंदात रमणारी कविता आहे. ती अधिक आशावादी आहे.

अंधारातून उजेड ये
तत्त्व नवे हे सदा नवे
अशुभ निराशेच्या उदरी
देवी आशा जन्म वरी

असा विश्वास हे व्यक्त करतात. त्यांच्या काव्यात वैचारिकतेचे दर्शन घडते. मात्र रचना अत्यंत साधी व सहजस्फूर्त आहे. साधी, सोपी वृत्ते, अभंग अशा छंदात त्यांची कविता अधिक खुलते. ख्रिस्ती धर्माचा त्यांनी केलेला स्वीकार हा पूर्ण विचारांनी होता. ख्रिस्ती मिशनऱ्यांना त्यांनी मराठी भाषेचे धडे दिले. तिची अभिमानाने जोपासना केली. 'ख्रिस्तायन' हे त्यांचे अपुरे राहिलेले काव्य त्यांनी ओवीछंदात लिहिले आहे. भावविषयक कवितेसाठी त्यांनी अभंगाचा वापर केला. त्यांच्या 'वनवासी फूल' या कवितेत ते म्हणतात.

असा जरी तुज रसिक जगी या पहावयास झाला
तरी फुला तू भेट येऊनी असेन तेथे मजला
पुन्हा सांगतो, जीवन आणि प्रेम भिन्न नच एक
प्रेमहीनता मृति केवळ स्वार्थाचा तो अतिरेक

काहीशी संस्कृतप्रचुरता असली तरी ती खटकत नाही. ती अस्सल मराठमोळी व रांगडी कविता वाटते. 'केवढे हे क्रौर्य', या कवितेमधील मुक्त पाखराची करूण कहाणी चटका लावणारी आहे. नव्या माणुसकीचे ते दर्शन आहे. भावनेचा ओलावा असलेली 'पाखरा येशील कधी परतून' ही कविता बालकवी वरची. कविता खरेतर त्यांच्या मृत्यूपूर्वीच ते नगर सोडून पुण्याला गेले म्हणून लिहिलेली कविता. परंतु त्यांच्या मृत्यूच्या संदर्भाने ती अधिक गहिरी वाटते. केशवसुतांच्या 'तुतारी' चा प्रभाव टिळकांवरही आहे. त्यांच्या 'रणशिंग' या कवितेत त्यांची साक्ष पटते. मात्र त्यातील आवेश मवाळ आहे. 'ब्राह्मण आणि महार' या कवितेत धार्मिक असहिष्णुतेमुळे राष्ट्रात राष्ट्रे उत्पन्न होऊन राष्ट्राचे तुकडे पडण्याची भीतीही त्यांनी व्यक्त केली आहे. रूढीविषयीची चीड त्यांच्या 'पुरे जाणतो मीच माझे बल' या कवितेत टिळकांच्या समर्थ शैलीचा प्रत्यय येतो. विचारांचे तेज शब्दाशब्दांतून जाणवते.

कवी विनायक (विनायक जनार्दन करंदीकर) १८७२ -१९०९

आधुनिक कवितेत देशप्रेम राष्ट्रनिष्ठा आढळत नाही असा एक आक्षेप घेतला जातो. परंतु केशवसुतांनी 'आम्हा डोळे नसती बघण्या पारतंत्र्यामुळे हो । ऐकायला श्रुतीही नसती पारतंत्र्यामुळे हो। अशी भावना व्यक्त केली त्यामागे देशप्रेमाचीच कळकळ होती. विनायकांची कविता ही या देशप्रेमाच्या कक्षेमध्ये येणारी कविता आहे. मराठी भाषा व महाराष्ट्र यांविषयी त्यांना विलक्षण प्रेम वाटत असे. धर्मप्रेम आणि इतिहासविषयक आकर्षण त्यांच्या कवितेत आढळते. त्यांच्या कवितेतील नवता ही कवितेच्या बहिरंगामध्ये आहे. त्यामुळे ती मर्यादित ठरते. शीघ्रकवित्व, सहजता, रचनाचातुर्य हे गुण त्यांच्या कवितेत दिसून येतात. काव्यातील अनुभूतीचे स्थान महत्त्वाचे आहे हे विनायकांनी जाणले होते. मात्र त्यांच्या कथाकाव्यातून वैचारिक

अनुभूतीचा स्पर्श नाही. कोणत्याही काव्याविषयाच्या अंती बोध सांगणाऱ्याचा कवीमनाला मोह होतो. 'उत्तेजन द्या विनायकाला बोधाची गाया गाणी' ही या कवीची काव्यलेखनामागची भूमिका आहे.

गतकालीन इतिहासाचे, पूर्ववैभवाचे ते आता आढळत नसल्याविषयीची खंत त्यांच्या कवितेत दिसून येते. त्यामागे स्वप्नाळूपणा आहे. मात्र त्यातील स्वातंत्र्याविषयीची तीव्र लालसा ह्रदयाला भिडणारी आहे.

पूर्वदिव्य ज्यांचे त्यांना रम्य भावी काळ
बोध हाच इतिहासाचा सदासर्वकाळ

असा इतिहासापासून बोध घेऊनच पुढे जायला हवे, असे हा कवी आवर्जून सांगतो. 'महाराष्ट्रलक्ष्मी' त्यांची एक प्रसिद्ध कविता असाच आशय प्रकट करणारी आहे. अनामिक हूरहूर जी केशवसुत, बालकवी यांच्या काव्यात आढळते अशी हूरहूर व्यक्त करणारी कविताही विनायकांनी लिहिली. 'स्त्री आणि पुरूष', 'सहवास प्रीती निघाली तर' यासारख्या कवितेमधून ती व्यक्त झालेली दिसते. 'संयोगीता' हे कथाकाव्यही त्यातील नाट्यमयतेमुळे लक्षात राहते. एकूण त्यांची कविता म्हणजे इतिहासप्रेम, बोधपूर्णता आणि ओघवतेपणा या वैशिष्ट्यांनी युक्त असलेली कविता आहे.

गोविंदाग्रज (राम गणेश गडकरी - १८८५ ते १९१९)

केशवसुतांनंतर अर्वाचीन कविता सर्वसामान्य वाचकांपर्यंत घेऊन जाण्याचे महत्त्वाचे कार्य गोविंदाग्रजांनी पार पाडले. 'प्रेमाचे शाहीर' म्हणून गोविंदाग्रज तरूणवर्गात विशेष लोकप्रिय होते. तरूणांमध्ये काव्याची आवड त्यांनी निर्माण केली. किर्लोस्कर नाटकमंडळीत शिक्षकाचे काम करता करता त्यांनी मराठी साहित्याचा व्यासंग केला. प्राचीन मराठी कवितेचे संस्कार त्यांच्या कवितेवर झालेले दिसतात. अभंग, लावण्या, पोवाडा, पंडिती कविता हे सर्व प्रकार त्यात येतात.

गोविंदाग्रजांच्या काळात कवितेच्या बहिरंगाचे महत्त्व पुन्हा एकदा वाढलेले दिसते. केशवसुतांच्या काळात बहिरंगाला दुय्यम स्थान होते. गोविंदाग्रजांनी या काव्याच्या बहिरंगाला प्रतिष्ठा दिली.

केशवसुताचा महशूर
गोविंदाग्रज चेला सच्चा

असे त्यांनी स्वत:ला केशवसुतांचे सच्चे चेले म्हणवून घेतले असले तरी त्यांची कविता केशवसुतांच्या कवितेहून भिन्न ठरते. ढंगदार शैली हे त्यांच्या कवितेचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. गोविंदाग्रजांची प्रेमकविता प्रसिद्ध आहे. त्यांच्या प्रेमविषयक कवितामध्ये 'प्रेम आणि मरण' ही कविता एक उत्कृष्ट प्रेमकविता म्हणून ओळखली जाते. प्रेमविषयक कल्पना या कवितेतून अत्यंत तटस्थपणे तरीही

परिणामकारकरीत्या प्रकटते. अलौकिक प्रेमासाठी जळून जाणाऱ्या वृक्षाचे रूपक या कवितेत आहे. आकाशीच्या वीजेवर प्रेम करणाऱ्या, तिच्यासाठी झुरणाऱ्या वृक्षाची ही प्रेमकहाणी विलक्षण नाट्यमय आहे. गोविंदाग्रजांची प्रेमविषयक कल्पना, स्वप्नील, काव्यात्म आणि भावमय आहे. 'जीविंच्या जिवाची बाला, इष्काचा जहरी प्याला, गगनातील चंचल बाला' अशी अनुप्रासात्मक रचना वाचकांच्या मनाला आकर्षून घेते. 'क्षण एक पुरे प्रेमाचा वर्षाव पडो मरणांचा' किंवा 'तो योग खरा हटयोग प्रीतीचा रोग लागला ज्याला लाभते मरणही त्याला हे असे' या ओळी अजरामर झाल्या आहेत. या कवितेत गोविंदाग्रजांच्या काव्यलेखनाची सर्व वैशिष्ट्ये एकवटली आहेत. असाच अनुभव त्यांच्या 'कृष्णाकाठी कुंडल' या अपूर्ण कवितेतही येतो. मात्र त्यांच्या सर्वच कवितेमध्ये याचा अनुभव येत नाही. 'रसोत्कटता आणि प्रमाणबद्धता' यांचा अभाव त्यांच्या कवितेत अनेक स्थळी आढळतो. कल्पनेला फुलविता फुलविता त्यांनी तिला पिंजून काढल्याची उदाहरणे सापडतील'', असे वि. स. खांडेकर यांनी म्हटले आहे.

गोविंदाग्रजांनी अनामिकाचे दहा अभंग लिहिले आहेत. संतसाहित्याच्या व्यासंगामुळे अत्यंत लीलया त्यांनी ही रचना केली आहे. देवाचा धावा करणारे हे अभंग आहेत. अनामिक असल्यामुळे नाममुद्रा नाही. 'तुम्ही यावे आम्हासाठी । कवित्वही न ऐसे गाठी ।' असा स्वतःचा पामरभाव व्यक्त करणाऱ्या या अभंगांमधून पारंपरिक भावदर्शन आढळते.

पूर्वी नाव झाले फार । नको त्याचा बडिमार ।
दावी मज प्रत्यय काही । नको संतांची ती ग्वाही ।

असा रोखठोकपणाही दिसतो. अडीच हजार अभंग लिहिण्याचा या कवीचा संकल्प होता. प्रत्यक्षात दहाच अभंग लिहिले गेले.

गोविंदाग्रजांच्या भाषिक कौशल्याचा नमुना म्हणून 'राजहंस माझा निजला' ही कविता पाहता येईल. आईचा, मृत पावलेल्या मुलाकरता शोक हा या कवितेचा विषय आहे. मृत पावलेल्या मुलाला मांडीवर घेऊन आई हे शोकगीत गाते आहे. त्यात नाट्य आहे. पण संयमाचा अभाव असल्यामुळे ही कविता पुढे कृत्रिमतेच्या जगात शिरते. करूणरसाला आवश्यक असलेला सूचकपणाही पुढे पुढे कमी होत जातो. मात्र कवितेत एक प्रकारचा आकर्षकपणा आहे, अलंकारचमत्कृती आहे. भ्रमिष्टावस्थेतील ती आई म्हणते

नमनांच्या शिंपामधुनी । अश्रुंचे मौक्तिकसुमणी
मी दिले तया काढोनी ।
मोत्यांचा चारा असला राजहंस खाऊनी निजला ।

यासारख्या ओळी मधून भाषेची चमक सहज जाणवते मात्र त्यातील कृत्रिमता दडत नाही.

गोविंदाग्रजांच्या 'दसरा' कवितेवर केशवसुतांच्या 'तुतारी' ची छापही सहज जाणवते. मात्र केशवसुतांचा आवेश क्वचितच जाणवतो. रूढींचे सीमोल्लंघन हाच खरा दसरा असे रूपक गोविंदाग्रजांनी योजले आहे. आशयापेक्षा शाब्दिक कलाकुसरच अधिक जाणवते. उदा.

नव्या दमाचे जे राऊत
खरेखुरे मायेचे पूत
येऊ द्या धैर्याचा ऊत - नका हातचा दवडू दसरा

मात्र 'तुतारी' या कवितेचे हे प्रामाणिक अनुकरण आहे असे वाटते.

बालकवी (त्र्यंबक बापूजी ठोमरे) १८९० - १९१८

कविवर्य ना.वा.टिळक म्हणजेच 'फुलामुलांचे कवी' असे ज्यांना म्हटले जाते त्यांनी त्र्यंबक बापूजी ठोमरे यांना 'बालकवी' असे संबोधले. लक्ष्मीबाई टिळक यांच्या 'स्मृतिचित्रे' या आत्मचरित्रात "ठोमरे बालकवी होता, पण कवीपेक्षाही तो बाल अधिक होता" असे त्यांनी म्हटले आहे. टिळकांच्या घरीच बालकवी चे अधिक वास्तव्य होते. आपल्याच तंद्रीत चालत असताना आगगाडीखाली सापडून ते वयाच्या अवघ्या अठ्ठाविसाव्या वर्षी मरण पावले. त्यांचा मृत्यू मराठी रसिकांना चटका लावून गेला.

सतत एका उन्मनस्क अवस्थेत असलेले, विलक्षण मनस्वी, बालसुलभता आणि सौंदर्यासक्त असे त्यांचे व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या कवितेतील सौंदर्य हे सहजस्फूर्त आहे. सौंदर्याचे त्यांच्या कवितेला वरदानच लाभले होते. बालकवी, निसर्गकवी म्हणून विशेष प्रसिद्ध आहेत. त्यांच्या कवितेतील सृष्टीवर्णन अत्यंत वेधक आहे. बालकवींचे मन निसर्गाशी, एकरूप होत असे. 'जणू कवीच झाला सृष्टी' अशी प्रतीती त्यांचे काव्य वाचताना येत राहते. बालकवींना वेड होते ते सौंदर्याचे. 'सुंदरतेच्या सुमनावरचे दव चुंबुनि घ्यावे' ही त्यांची लालसा, पण पूर्ण सौंदर्य आणि आपण यांच्याआड या जडदेहाची आवरणे येतात. 'अंधाराचे पाश मनाचे हे गळूनी जावे' याची त्यांना तळमळ लागते. वयाबरोबर ही तळमळ वाढली असे म.वि. राजाध्यक्ष म्हणतात.

बालकवींच्या जवळजवळ दिडशे कविता उपलब्ध आहेत. त्यापैकी 'अरूण', 'फुलराणी', 'निर्झरास', 'श्रावणमास', 'तारकांचे गाणे', 'संध्यातारका' इ. कवितांमधून सुंदर निसर्गचित्रे प्रत्ययास येतात. निसर्गाशी तन्मय पावून ते निसर्गाचे चित्रण करताना अरूणोदयाच्या उत्सवात रंगून जातात. त्यात उत्प्रेक्षा असली तरी हळूवार आहे. उदा.

पूर्वसमुद्री छटा पसरली रम्य सुवर्णाची
कुणी उधळली मूठ नभी ही लाल गुलालाची
किंवा
की नवभुवनी उषासुंदरी दारी येवोनी
रंगवल्लिका रम्य रेखते राजस हस्तांनी ?

अशा सुरम्य कल्पना या कवितेत जागोजागी आढळतात. 'निर्झरास' या कवितेमध्ये निर्झर हा काव्यदेवीचा प्राण, अक्षय संगीताची मूर्ती असून ज्या दिव्य सौंदर्याचा ध्यास कवीमनाला जडला आहे त्याचे रहस्य जणू त्यालाच ठाऊक आहे असे निर्झरमय होऊन जाणे व्यक्त होते. 'फुलराणी' या बालकवींच्या लोकप्रिय कवितेमध्ये सूर्यकिरणांनी गवतफूल फुलले या निसर्गातील साध्या गोष्टीतून बालकवींच्या प्रतिभेने एक नाजूक प्रेमकाव्य निर्माण केले आहे. पौगंडावस्थेतील मानवी मनातील भावना अत्यंत तरलतेने आणि उत्कटतेने एका विवाहसोहळ्याच्या मंगलमय वातावरणाच्या पार्श्वभूमीवर रंगवल्या आहेत.

तो रविकर का गोजिरवाणा
आवडला अमुच्या राणीला ?

यासारख्या शब्दशैलीमधून एकप्रकारची निरागसता, मुग्धता कवितेवर पसरून राहते. छंद, शब्द, कल्पना यांचा सुमेळ या कवितेत अप्रतिम जमून आला आहे. या कवितेची लयबद्धता हा तर स्वतंत्र्य विषय ठरावा. बाल्य व तारूण्य यांच्या सीमारेषेवरचे एक भावकाव्य म्हणजे ही कविता होय. 'श्रावणमास' या कवितेतही श्रावणमासाचे सुरम्य चित्र येते. 'क्षणात येते सरसर शिरवे क्षणात फिरूनी उन पडे' किंवा 'वरती बघता इंद्रधनुचा गोफ दुहेरी विणलासे' यासारख्या ओळी चित्रमयतेचे दर्शन घडवितात. या कवितेत नादमयता आहे आणि निसर्गाचे सुक्ष्म वर्णनही आहे. 'बालविहग' व 'पाखरास' या कवितांमधूनही असे वर्णन आढळते. केशवसुतांप्रमाणेच पण काहीशा वेगळ्या अशांतीचे दर्शन बालकवींच्या काही कवितांमधून घडते. आनंदाची जागा विषण्णतेने घेतलेली दिसते. काव्यजीवनातील मनोरथ पूर्ण होत नाही. अपूर्णतेची बंधने तुटत नाहीत. जिवाची तगमग अशा कवितेतील ओळीओळींमधून जाणवते. पारव्यावरची त्यांची खिन्न कविता किंवा कविबाळे यामधून जीवनातील भेसूर दु:खाची ओळख होते. या मुग्धमधुर आत्म्यांना चित्तात काय बोचते तेच उमगत नाही. पहिल्या आनंदाची जागा विषण्णतेने घेतली. त्यातून ही गूढगीते लिहिली गेली आहेत.

'औदुंबर' या चिमुकल्या कवितेत केवळ एक निसर्गचित्र नाहीतर मानवी जीवनाचे समग्र चित्रण सामावले आहे. 'पाय सोडूनी जळात बसला असला औदुंबर' या शेवटच्या ओळीने उभे केलेले स्थिरचित्र रोमांच उभे करते. बालकवींची 'धर्मवीर' ही कविता इतर कवितांहून भिन्न आहे. रूढींविरूद्ध आणि रूढींच्या भक्तांविरूद्ध

केलेले एक आवाहन आहे. बालकवींसारख्या सौंदर्यवादी कवीला जाणवलेले हे समाजाचे विरूप आहे. मात्र ही कविता कृत्रिम होत नाही. उलट त्यातील कळकळ सहज जाणवते.

हा कालखंड मराठी कवितेतील क्रांतीचा काळ आहे. नव्या पद्धतीने काव्यरचना करणारी कवींची एक पिढी या काळात निर्माण झाली. केशवसुत व त्यांचे समकालीन यांची ही पिढी होय. केशवसुतांच्या कविवृत्तीचे ज्या इंग्रजी काव्यावर पोषण झाले होते. त्याचा या काळातील कवींच्या कवितेवर प्रभाव पडलेला दिसतो. त्यातूनच त्यांना स्फूर्ती मिळाली व त्याला एक ठसा आधुनिक कवितेवर उमटलेला दिसतो.

या आधुनिक कवितेत स्त्रीविषयक व समाज विषयक नवा दृष्टिकोन दिसून येतो. स्त्रीविषयक भूमिकेत अमुलाग्र बदल या कवितेत आढळतो. स्त्रीच्या बाह्यरूप वर्णनापेक्षा आंतरिक प्रेमभावनेला विशेष महत्त्व आलेले दिसून येते. प्रेमभावना त्रयस्थपणे मांडण्याऐवजी कवी स्वतःच सांगू लागला. आणि त्यामुळे त्यात वास्तवताही आली. प्रेमभावना व्यक्त करण्यातील तोपर्यंतचा संकोच नाहीसा झाला आणि कविता अधिक मोकळी लिहिली जाऊ लागली. स्त्रीकडे माणूस म्हणून पाहण्याची, तिच्या भावना, विचार यांची दखल घेतली जाण्याची स्वागतार्ह भूमिका कवितेत व्यक्त होऊ लागली. स्त्री ही पुरूषाच्या अध्यात्मिक उन्नतीला कारणीभूत ठरणारी त्याची स्फूर्ती देवता आहे अशी कल्पना करून तिच्या विषयीचा आदर या कवितेतून व्यक्त होऊ लागला.

स्त्री-पुरूष समतेच्या विचारांचा प्रभाव या कवितेवर होता. केशवसुतांची 'नवा शिपाई', 'स्फूर्ती', गोविंदाग्रजांची 'दसरा', बालकवींची 'धर्मवीर', टिळकांची 'रणशिंग', कवी बी यांची 'डंका' या कवितांमधून स्वातंत्र्य, समता, बंधुता या तत्त्वांचा उद्‌घोष ऐकू येतो. स्त्री-पुरूष समता आणि रूढींच्या दास्यत्वाविषयीचा निषेध स्वाभाविकपणे व्यक्त झाला.

लौकिक जीवनातील आजूबाजूची परिस्थिती, वास्तव हाही या काव्याचा विषय झालेला दिसून येतो. स्वधर्म, स्वभाषा, स्वदेश यावरही काव्य लिहिले गेले. निसर्गविषयक कविता हेही या काळाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. स्त्रीकडे पाहण्याच्या दृष्टिकोन जसा बदलला तसा सृष्टीसौंदर्याकडे पाहण्याचा दृष्टिकोनही पार बदलला. सृष्टीतील साध्यासाध्या, लहान-सहान गोष्टींना काव्यात महत्त्वाचे स्थान मिळू लागले. निसर्गाकडे एक व्यक्ती म्हणूनच पाहिले गेले. पाश्चात्य कवितेतील ही दृष्टी या नव्या कवींनी आत्मसात केली. केशवसुतांच्या कवितेतून पुष्पामध्ये प्रगट न होय जे जराही । सृष्टीत एकही रहस्य असे न काही । असे सांगितले आहे. टिळकांना तर 'फुलामुलांचे कवी' असेच म्हटले गेले. बालकवी तर निसर्गकवी म्हणून प्रसिद्ध झाले. निसर्गातील वैधिध्यपूर्ण सौंदर्य या काळातील काव्यात

रूप रस गंधा सहित आले. या कवींनी आपल्या भावनांचे प्रतिबिंब निसर्गात पाहिले. कोणी त्याचे दैवीकरण केले कोणी संसारश्रमापासूनची सुटका त्यात शोधली. बालकवीं तर निसर्गाशी तादात्म्यच पावले.

या काळात गूढगुंजनपर कविताही लिहिली गेली. अशा गूढवादी कवितेचा आढळ संतकाव्यातही होतो. पाश्चात्य कवी वर्डस्वर्थ, शेली यांच्या भावकवितेतही गूढार्थाच्या छटा दिसतात. आधुनिक मराठी कवींनाही या गूढवृत्तीने भारावून टाकलेले दिसते. या गूढगुंजनपरतेला सायुज्यवाद, प्रतीतीधर्म, शून्यशोधन अशाही पर्यायी संज्ञा योजल्या जातात. केशवसुतांच्या 'झपुर्झा' 'क्षणात नाहीसे होणारे दिव्य भास' यासारख्या कवितेमध्ये मनाच्या वेगळ्याच अस्वस्थतेचा प्रत्यय येतो. गोविंदाग्रज, रेंदाळकर, टिळक, बालकवी, बी यांनीही अशी गूढगुंजनपर कविता लिहिली. "या चिरंतन तत्त्वाला कोणी ईश्वर म्हटले, कोणी निसर्ग, कोणी त्यात परमसौंदर्य पाहिले, कोणी प्रेमब्रह्म, त्याच्याशी मीलनाचा सायुज्याचा ध्यास घेणाऱ्या वृत्तीला लागलेल्या हुरहुरीतून असले काव्य निर्माण होते", असे मं.वि. राजाध्यक्ष यांनी म्हटले आहे.

आधुनिक कवितेच्या आविष्कारातही नाविन्य आहे. निव्वळ कारागिरीपासून ही कविता दूर आहे. घोटीव रचना, तांत्रिकता, क्लिष्टता, कृत्रिमता, यमकांचा हव्यास यातून ती बाहेर पडलेली दिसते. केशवसुतांच्या कवितेत विषयानुरूप रचनेचे वैचित्र्य आढळते. त्याचाच अंगीकार पुढील अनेक कवींनी केला. केशवसुतांनी 'सुनीत' हा काव्यप्रकार आणला. पुढच्या काळात या काव्यप्रकाराला खूपच बहर आलेला दिसतो.

संदर्भ :-

१. मराठी वाङमयाचा अभिनव इतिहास (१८००-१८२०) डॉ. गं.ना.जोगळेकर, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, द्वितीय आवृत्ती १९९५ पृष्ठ क्र.१२

२. काही मराठी कवी, जाणिवा व शैली, सुधीर रसाळ, प्रतिमा प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती १९९६ पृष्ठ क्र.४७.

३. ५ कवी, मं.वि. राजाध्यक्ष, केशव भिकाजी ढवळे प्रकाशन, श्रीसमर्थ सदन, गिरगाव, मुंबई, प्रथमावृत्ती १९७६, पुनर्मुद्रण १९८९.

४. प्रदक्षिण खंड १ ला कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे ३०. पुनर्मुद्रण १९९३.

५. मराठी कविता आकलन आणि आस्वाद, प्राचार्य डॉ. पंडिराव पवार, दास्ताने रामचंद्र आणि कं. पुणे ३०.

६. मराठी काव्याचे मानदंड खंड पहिला, डॉ.स.रा. गाडगीळ, पद्मगंधा प्रकाशन, पुणे ३८ ण

❖❖❖❖

३

कविता (१९२० ते १९६०)

डॉ. गोविंद काजरेकर

उद्दिष्टे :

- १९२०-१९६० या कालखंडातील काव्याच्या इतिहासाचा परिचय करुन देणे.
- १९२०-१९६० या कालखंडातील काव्यमंडळांनी केलेल्या वाङ्मयीन कार्याचे महत्त्व पटवून देणे.
- १९२०-६० या कालखंडातील कवितेला असलेले सामाजिक, राजकीय, सौंदर्यनिष्ठ संदर्भ उलगडून दाखवणे.
- या काळातील कवितेच्या आशय रुपात झालेले बदल विचारात घेणे.
- नवकाव्याचे विशेष आणि स्वरुप उलगडून दाखवणे.

विषय प्रवेश :

प्रस्तुत विवेचानात १९२० नंतरच्या आणि साठपूर्व काळाच्या दरम्यान मराठी काव्यप्रवाहात ज्या कवीनीं आपल्या काव्यलेखनाने महत्त्वाचे योगदान दिले त्यांच्या लेखनाचा काव्यवैशिष्ट्यांसह परामर्ष घेतला आहे. या काळातील कवींच्या काव्यप्रवृत्ती, कवितेने घेतलेली विविध वळणे आणि आवश्यक तेथे बदलत्या सामाजिक वास्तवाचा कवितेच्या आशयरूपांवर झालेला परिणाम या अंगाने काव्यवैशिष्ट्ये विचार घेतली आहेत. कारण कोणत्याही काळातील कवितेचा ऐतिहासिक परिप्रेक्षातून विचार करतानाही या बाबी तपासणे क्रमप्राप्तच ठरते.

केशवसुतांच्या काव्यलेखनाने मराठी काव्याची संकल्पना बदलली. त्यांच्या काव्यप्रभावाने मराठी कवितेच्या अंतरंगात आणि बाह्यांगातही स्पष्ट बदल दिसू लागले. कवितेच्या आशय अभिव्यक्तीत अभिन्नत्व असावे हा काव्यसंकेत रूढ झाला व कविता आत्मनिष्ठतेकडे झुकली. सौंदर्यवादी जाणिवांचा पुरस्कार या काळातल्या कवितेते केला गेला. यादृष्टीने केशवसुतांची कविता लौकिकतावादी कविता होती. हाच लौकिकतावादाचा प्रवाह पुढील काळात अधिकाधिक वास्तवाभिमुख करण्याचे कार्य अनेक कवींनी केले.

केशवसुतांनंतर त्यांच्या कवितेचे प्रभाव पचवून काही कवी स्वतंत्र जाणिवेने काव्यलेखन करू लागले, तर काही कवींना त्यांच्या प्रभावातून मुक्त होणे शक्य झालेले दिसत नाही. म्हणूनच केशवसुत हे अर्वाचीन कवितच्या केंद्रस्थानी असलेले दिसतात. 'सौंदर्याच्या सान्निध्यातील थरथरती संवेदनशीलता व्यक्तविणारा पहिला, युगप्रवर्तक' म्हणून केशवसुतांचा उल्लेख केला जातो. केशवसुतांनंतर त्यांचे समकालीन बालकवी (१९१९), गोविंदाग्रज (१९१९), रेंदाळकर (१९२०), कीर्तीकर (१९१९) इत्यादी कवी कालवश झाले. मात्र त्यांनी आपली ठळक अशी काव्यमुद्रा जनमानसावर उटवलेली दिसते.

१९२० पूर्व कालखंडात काव्यलेखन करणारे काही कवी नंतरच्या काळात काव्यलेखन करताना दिसतात. भा.रा.तांबे, वि.दा.सावरकर, चंद्रशेखर उर्फ शिवराम गोऱ्हे हे कवी संधिकालातील कवी होते. हे केशवसुतांच्या प्रभावातून मुक्त असलेले दिसतात. कवी नागेश, नवरे, काव्यविहारी उर्फ दिनकर, विठ्ठल गद्रे असे काही कवी मात्र केशवसुतांच्या कवितेपासून मुक्त झालेले दिसत नाहीत.

काव्यमंडळांचे वाङ्मयीन कार्य

१९२० नंतर मराठी काव्यनिर्मिती, काव्यप्रसार आणि काव्यविकास यासाठी संस्थात्मक पातळीवरून प्रयत्न सुरू झालेले दिसतात. काव्यप्रेमी लेखक-वाचकांनी विविध काव्यमंडळांची स्थापना करून वा घोषणा करून काव्यवाचन, चर्चा अशा उपक्रमांना प्रारंभ केला. पुणे शारदा प्रसाद मंडळ, तुतारी मंडळ, रविकिरण मंडळ, धुळे येथील काव्यकौमुदी तसेच मुंबई येथील गोविंदाग्रज मंडळ, देवास येथील शारदोपासक मंडळ इत्यादी मंडळांनी काव्यनिर्मितीला गती देण्याबरोबर काव्यसंग्रहांच्या प्रकाशनाचे मौलिक कार्य पार पाडले. या सर्व मंडळांमध्ये रविकिरण मंडळाने काव्यप्रांतात आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली असे म्हणता येईल. म्हणून रविकिरण मंडळाविषयी अधिक विस्ताराने जाणून घेणे आवश्यक आहे.

रविकिरण मंडळ

बालकवी, गडकरी यांच्या नंतर मराठी काव्यप्रांतात काहीसे थांबलेपण येते आहे, असे रसिकांना वाटत असतानाच रविकिरण मंडळाची कविता उदयास आली. पुण्यातील काही काव्यप्रेमी मंडळींनी एकत्र येऊन उत्स्फूर्तपणे हे कविमंडळ स्थापन केले. दर रविवारी चहापानाच्या निमित्ताने एकत्र जमणे आणि कवितेचे सादरीकरण व काव्यचर्चा करणे सुरू झाले. 'सन टी क्लब' असे प्रारंभी संबोधलेल्या ह्या मंडळाचे पुढे रविकिरण मंडळ असे नामांतर झाले. या मंडळात एकुण आठ सदस्य होते. माधव त्रिंबक पटवर्धन (माधव ज्यूलियन) श्री.श्री.बा. रानडे, सौ. मनोरमाबाई रानडे, गजानन त्र्यंबक माडखोलकर, द.ल.गोडसे, शंकर केशव कानेटकर (गिरीश), यशवंत दिनकर पेंढारकर (यशवंत) आणि शंकर काशिनाथ गर्गे (दिवाकर) इत्यादी. पुढे दिवाकर या मंडळातून बाहेर पडले आणि वि.द.घाटे यांनी त्यांची जागा घेतली.

या मंडळाची रीतसर स्थापना ६ संप्टेंबर १९२३ या दिवशी झाली. मंडळातील सारेच कवी पुरोगामी सुधारणावादी विचारांचे होते. प्रेम, सौंदर्योपासना, त्यातून आलेली उत्कटता ही त्यांच्या वृत्तीचा एक भाग होती. उत्कट काव्यप्रेम आणि आधुनिकतेची जाणीव हे या कवींचे बलस्थान होते. पाश्चात्य साहित्याचा परिचय आणि संस्कार यातून रोमँटिक वृत्तीचा प्रभाव यांच्या कवितेवर दाट सावलीसारखा पसरून राहिलेला दिसतो.

'किरण' हे रविकिरण मंडळाचे पहिले पुस्तक गद्यपद्यात्मक असून ते केवळ ३२ पृष्ठांचे आहे. यात उत्कट सौंदर्याचे आविष्कार असल्यामुळे परंपरावादी विचारांच्या समीक्षकांनी त्यावर टीकाही केलेली दिसते. 'काव्यविचार' (किरण २) या ग्रंथात मात्र समकालात जे नवे काव्यप्रकार रूढ झाले त्याविषयी तात्त्विक व टीकात्मक विवेचन आले आहे. भावगीत हा रचनाप्रकार रविकिरण मंडळाच्या काळात सुरू झाला, हे त्यांचे कार्य लक्षणीय आहे. शिवाय पूर्वसुरींच्या कवितेची समीक्षाही या मंडळातील काही सदस्यांनी केली आहे. संघटनात्मक पातळीवरून साहित्यानिर्मिती करून वाङ्मयीन संस्कृती बळकट करणे हा या मंडळाचा उपक्रम अभिनव असाच होता. म्हणून रविकिरण मंडळाचे कार्य मौलिक ठरते.

माधव ज्युलियन (१९९४ - १९३७)

माधव त्रिंबक पटवर्धन उर्फ माधव ज्युलियन हे रविकिरण मंडळाचे अर्ध्वयु कवी होते. प्रेम आणि प्रणयाचा आशय असलेल्या त्यांच्या गझलकवितेवरून बा.अ.भिडे यांनी त्यांना 'प्रणयपंढरीचे वारकरी' अशी उपाधी दिली. फार्सी भाषेचा त्यांचा विशेष अभ्यास होता. सौंदर्यासक्ती, उत्कट प्रेमभावनांचे चित्रण, ध्येयवादी वृत्ती, सामाजिक दांभिकतेवर प्रहार करणे या काव्यवैशिष्ट्यांमुळे माधव ज्युलियन हे या काळातील अग्रणी कवी ठरले. 'विरहतरंग' (१९२६), 'सुधारक' (१९२८), 'उमरखय्यामच्या रूबाया' (१९२९), 'द्राक्षकन्या' (१९३१), 'गज्जलांजली' (१९३३), 'स्वप्नरंजन' (१९३४), 'तुटलेले दिवे' (१९३८), 'नकुलालंकार' (१९३९), आणि 'शेवटचे मधुलहरी' (१९४०) ही त्यांची काव्यसंपदा होय.

'विरहतरंग' मध्ये त्यांनी महाविद्यालयातील विमुक्त प्रेमभावनांचा आविष्कार केला आहे. २३८ श्लोकांच्या या खंडकाव्यात प्रेमातील उत्कटता भरून राहिलेली दिसते. पटवर्धनांचा लेखनकाळ हा सुधारणावादी विचाप्रवाहांचा काळ होता. मात्र समाजात सुधारणेचा बुरखा पांघरून अनेकजण वावरत होते. आतून दांभिक आणि बाहेरून सुधारणावादी अशा बोलघेवड्या सुधारकांचा सुळसुळाट झाल्यामुळे पटवर्धनांनी सुधारक हे काव्य लिहिले. हे त्यांचे खंडकाव्य असून समाजातील सुधारक म्हणून मिरविणाऱ्या मात्र दांभिक प्रवृत्तीच्या व्यक्तींच्या वर्तनातील विसंगतीवर पटवर्धनांनी प्रहार केलेला दिसतो. उपरोध व उपहासाच्या आधारे कवी-

व्यक्ती, संस्था व रूढी-परंपरंमधल्या वृत्तींचा दंभस्फोट करताना दिसतो. यात भाषेचा कठीण तडाखा आहे असे त्यांनी स्वत:च सांगितले आहे.

'उमरखय्यामच्या रूबायां'चे मराठी भाषांतर करून पटवर्धनांनी मराठीत एक नवा रचना प्रकार आणला. 'स्वप्नरंजन' आणि 'मधुलहरी' या संग्रहातून प्रेम, राष्ट्रप्रेम, काव्य, सौंदर्यजीवन असे विषयवैविध्य दिसते. गझललेखनाची विपुलता हा माधव ज्यूलियनांच्या काव्याचा लक्षणीय विशेष होय. गज्जलांजलीत प्रेम याच आशयाभोवती फिरणाऱ्या, एकसूरी वाटतील अशा अनेक गझला त्यांनी लिहिल्या आहेत. 'नकुलांकार' हे वाङ्मयीन क्षेत्रात अकारण लुडबूड करणाऱ्या व्यक्तीचे चित्रण करणारे १०९० आर्याचे खंडकाव्य आहे. काव्यात उपहास आहे मात्र हे काव्य तितकेसे प्रभावी असलेले दिसत नाही. तरी माधव ज्यूलियनांचे वाङ्मयीन कार्य मोलाचे ठरते. प्रेम, आसक्ती, विरह अशा भावनांना अधिक मोकळेपणाने अभिव्यक्त करून कवितेला त्यांनी लौकिकतेकडे आणि व्यक्तिनिष्ठतेकडे नेले. रुबाया, खंडकाव्य, गझल हे रचनाप्रकार त्यांच्या कार्यकर्तृत्वाची साक्ष काढण्यास पुरेसे आहेत. आधुनिक काळात गझल हा रचनाप्रकार खूप लोकप्रिय झाला, त्याचे संपूर्ण श्रेय पटवर्धनांना जाते. तसेच आशयाचे एक समान सूत्र ठेवून, एकाच विषयाचे अनेक पैलू उलगडून दाखवणारे खंडकाव्य ही विशेष निर्मिती म्हणावी लागेल. म्हणून अत्र्यांनी त्यांना रविकिरण मंडळातील 'खरे रवी' असे का म्हटले आहे, त्यांचे उत्तर सापडते.

कवी गिरीश

खेड्यातील निसर्गदृश्ये आपल्या कवितेतून तन्मयतेने आणि नादमधुरतेने रेखाटणारे कवी गिरीश हे रविकिरण मंडळातील दुसरे महत्त्वाचे कवी होत. कवी गिरीश यांची दृष्टी स्वच्छंदतावादी होती. काव्यगायन लोकप्रिय करण्याचे श्रेय गिरीशांनाच द्यावे लागते. वीणाझंकार (१९२२), 'अभागी' (१९२३), 'कला' (१९२६) ही सामाजिक आशयाची खंडकाव्ये, आंबराई (१९२८) हे ग्रामीण खंडकाव्य, तर 'कांचनगंगा' (१९३०), 'फलभार' (१९३४), 'मानसवेध' (१९४३) व 'चंद्रलेखा' हे सर्व स्फुटकाव्यसंग्रह प्रसिद्ध आहेत.

सुनित, गझल हे रचनाप्रकार गिरीश यांनी प्राधान्याने हाताळले. त्याचप्रमाणे माळ्याचे गाणे, दौल्याची दिवाळी, भलरी ही जानपद गीते लिहून गिरीशांनी अमाप लोकप्रियता मिळवली. ग्रामीण जीवन आणि तेथील माणसे याविषयी आत्मीयता आणि इंग्रजी कवी टेनिसनच्या काव्यप्रभावामुळे आकर्षक घोटीव काव्यरचना हे कवी गिरीश यांच्या काव्यलेखनाचे विशेष होत.

यशवंत दिनकर पेंढारकर

रविकिरण मंडळातील सर्वात लोकप्रिय कवी. 'यशवंती' (१९२१), 'वीणाझंकार' (१९३२), 'इंदुकला' (१९२३), 'यशोधन' (१९२९), 'भावमंथन' (१९३०) हे स्फुटकाव्यसंग्रह. तर 'जयमंगला' (१९३१), 'बंदिशाळा' (१९३२), 'काव्यकिरीट' (१९४०) ही खंडकाव्ये गिरीश यांनी लिहिली. छत्रपती शिवराय हे महाकाव्य त्यानी रचले हा पाणपोई (१९५१) हे त्यांचे अखेरचा कवितासंग्रह होय.

यशवंतांच्या आई, न्याहारीचे गाणे या कविता मराठी मनावर दीर्घकाळ अधिराज्य करणाऱ्या ठरल्या. सांसारिक जीवनातील खिन्नता, विफलता, तत्कालीन सामान्य मध्यवर्गीय जीवनानुभव यावर यशवंतांची कविता उभी असलेली दिसते. जयमंगला हे त्यांचे प्रेमकाव्य आहे. बंदिशाला या काव्यात बालगुन्हेगार व त्याची आई यांच्या जीवनातील करुण नाट्य उभे केले आहे. वास्तवता, उत्कटता ही त्यांच्या काव्याची महत्त्वाची लक्षणे सांगता येतील.

मनोरमा रानडे

रविकिरण मंडळातील ही एकमेव कवयित्री. श्री.बा.रानडे यांच्याशी त्यांचा त्याकाळात प्रेमविवाह झाला. त्यामुळे त्यांचे खूप कौतूकही झाले. अभिजात काव्याच्या संस्कारांमुळे त्यांची काव्यशैली आधुनिक रोमँटिक काव्यपरंपरेशी मिळतीजुळती राहिली.

'डोळ्यांनी देखिल बोलू नको माझ्याशी'

असा प्रेमानुभव त्यांनी नेमक्या शब्दांत व्यक्त केलेला दिसतो.

वि.द.घाटे, गोखले व गं.त्र्यं.माडखोलकर.

घाटे व माधव ज्यलियन यांचा रविकिरण मंडळातर्फे 'मधुमाधव' (१९२४) हा काव्यसंग्रह प्रसिध्द झाला. देशभक्तीपर, सुनिते व स्फुटकाव्य अशा एकूण पंचवीस कविता घाटे यांनी लिहिल्या.

गोखले हे कवी नव्हते. माडखोलकरानींही कवितेचा मार्ग पत्करला नाही. मात्र त्यांनी पुढे कादंबरी लेखन व काहीसे समीक्षा लेखन केले. हे मंडळातील दुय्यम सदस्य होते. चर्चा, समीक्षा, मतप्रदर्शन यात सहभागी होऊन काव्यनिर्मितीला प्रोत्साहन देण्याचे कार्य यांनी केले.

रविकिरणमंडळाचे वाङ्मयीन कार्य

काव्यनिर्मितीच्या बाबतीत रविकिरण मंडळाचे कार्य उल्लेखनीय आहे. मराठी काव्यप्रवाहात सांकेतिकता येत असताना, प्रवाह काहीसा क्षीण होत असताना या

मडळातील कवींनी सामान्यांच्या जाणिवांना शब्दरूप देण्याचा प्रयत्न केला. जानपद गीतांतून लोकभावनाना स्पर्श केला. प्रेमानुभुतीचा अतिशय धीट आविष्कार करून भावगीत रचनेचे वैभव द्विगुणित केले. सुनित, विलापिका, गझल, रूबाया, शिशुकाव्ये, जानपदगीते, गद्यगीते, विडंबनात्मक रचना, सामाजिक खंडकाव्ये इत्यादी काव्यरचनाप्रकारांना त्यांनी प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. सामाजिक दंभस्फोट करून सुधारणावादी जाणिवांचा आग्रह धरला. जीवनानुभवांकडे गंभिरपणे पाहता येते तसे विक्षिप्तपणेही पाहता येते ही जाणीव या कवींन आग्रहाने जोपासली. त्यामुळे पुढील कवींनी लिहिलेल्या मुक्तछंदातील आणि मुक्तशैलीतील कवितेला आधीच सुपीक भूमी यांनी तयार करून दिली. त्यामुळे 'रविकिरण मंडळ' हे त्या काळातील अनेक काव्यविषयक चळवळींचे केंद्र होते. हे मंडळ एकाच वेळी अनेक गोष्टी साधण्याचा प्रयत्न करत होते.' हे रमेश तेंडुलकरांचे मत यथोचित वाटते.

मात्र रविकिरण मंडळाच्या कवितेने कवितेला व्यक्तिगत पातळीवर आणले. प्रसंगी खाजगी वाटावेत असे अनुभवही व्यक्त केले. सामान्यांच्या दु:खाचा तलस्पर्शी वेध या कवितेने क्वचितच घेतला. त्यामुळे आधीच्या केशवसुत बालकवींच्या कवितेची उंची या कवितेला गाठता आली नाही. पुन्हा मराठी कविता नव्या आवर्तात सापडण्याची चिन्हे निर्माण झाली.

आणखी काही कवी

रविकिरण मंडळाचे केंद्र पुणे हे होते. पण त्या शहराच्या बाहेर महाराष्ट्रातल्या अन्य भागांत राहून काव्यनिर्मिती करणारे कवी होते. त्यांचा उल्लेख करणे येथे आवश्यक आहे. कवी काव्यविहारी, अज्ञातवासी, वा.गो.मायदेव, कवी माधव, ना.के.बेहरे, आ.कृ.टेकाडे, ज.के.उपाध्ये, श्री.रा.बोबडे, ब.ग.खापर्डे इत्यादी कवी काव्यप्रवाहात भर घालताना दिसतात.

काव्यविहारी यांनी आपल्या 'काव्यविहार' या संग्रहात समाजसुधारणेची कळकळ व्यक्त केली आहे. प्रांजळ अभिव्यक्ती, साधी पण जोरकस, भाषा, बोधपरता हे त्यांच्या काव्याचे विशेष सांगता येतील. काव्यविहारींच्या कवितेवर केशवसुतांच्या काव्याचा प्रभाव असलेला दिसून येतो.

अज्ञातवासी उर्फ दिनकर गंगाधर केळकर

यांनी केवळ 'अज्ञातनाद' आणि 'अज्ञातवासींची कविता' असे दोन कवितासंग्रह लिहिले. इतिहासातील काही घटनाप्रसंगावर त्यांनी काही कविता लिहिल्या आहेत. त्यामुळे राष्ट्रीय कविता या सदरात त्यांची कविता समाविष्ट करता येईल. मात्र त्यांनी मुलांसाठी लिहिलेल्या कविता उदाहरणार्थ बाहुलीचे लगीन, शेवंतीचे फूल इत्यादी गीतांमधून त्यांच्या भावनांची कोवळीक प्रत्ययाला येते.

कवी माधव केशव काटदरे यांनी मराठ्यांच्या इतिहासातील नाट्यमय प्रसंग आपल्या रेखिव शब्दकळने वाचकांसमोर मांडले. पानपताचा सूड, गोकलखाँ बापू, शनिवारवाड्यापुढे, मस्तानी इत्यादी कविता नाट्यमय झाल्या आहेत. 'सह्याद्रीच्या तळी शोभते हिरवे तळकोकण, राष्ट्रदेवीचे निसर्गनिर्मित केवळ नंदवन' ही त्यांची कविता कोकणच्या निसर्गसौंदर्याचा काव्यमय अविष्कार करणारी आहे. सूक्ष्म निरीक्षणशक्ती आणि व्यासंग यामुळे त्यांची अन्य निसर्गगीतेही मोहक झाली आहेत.

ना.के.बेहरे यांनी आपल्या 'मोत्यांची माळा' काव्यसंग्रहात शिशुगिते, निसर्ग कविता, राष्ट्रीय कविता आणि कवींचे तत्त्वज्ञान असे विविधस्वरूपी अनुभवविश्व प्रकट केले आहे.

आनंदराव कृष्णाजी टेकाडे

'आनंदकंद ऐसा हा हिंद देश माझा' हे अजरामर गीत लिहिणारे आनंदराव कृष्णाजी टेकाडे हे कवी आपल्या 'आनंदगीत' या कवितासंग्रहात आपली कविता समाविष्ट करतात. याच संग्रहाचे तीन भाग त्यांनी प्रसिद्ध केले आहेत. उत्कट देशप्रेम, शिवाजी महाराजांविषयी तीव्र अभिमान, अवनत सामाजिक स्थितीविषयी हळहळ ही त्याच्या काव्याची वैशिष्ट्ये सांगता येतील.

ज.के.उपाध्ये

आपल्या विडंबन गीतांनी रसिकांची मने जिंकून घेतलेले ज.के.उपाध्ये हे कवी याच काळात लेखन करताना दिसतात. 'पोपटपंची', 'चालचलावून' 'भगवतगीता' अशा संग्रहात त्यांनी आपली विनोदी कविता प्रसिद्ध केली आहे. शिवाय लोकमान्य चरितामृत आणि उमरखय्यामच्या रूबायांचे मराठीत भाषांतरही त्यांनी केले आहे. युद्धास तयार न होणाऱ्या अर्जुनाला कृष्ण म्हणतो "कृष्ण म्हणे रे अर्जुना! हा कोठला बे ! बायलेपणा ? / पहिल्याने तर टणाटणा उडत होतास लढाया / ... तू तर बेट्या मुळचाच ढिला, पूर्वी पासून जाणतो तुला / परि आता तुझ्या बापाला सोडणार नाही बच्चमजी / ... कशास जमविले आपले बाप ? नसता बिचाऱ्यांसि दिला ताप, / घरी डारदुर झोप, घेत पडले असते./" या चालचलावू गीतेमधील ओळींतून उपाध्ये यांची विनोदी वृत्ती प्रत्ययाला येते. त्यातून त्यांचा एक खास वाचकवर्गही तयार झाला होता.

वरील कवीं बरोबर श्री.रा.बोबडे, बळवंत गणेश खापर्डे इत्यादी कवी काव्यनिर्मिती करीत होते. पुढे इंग्रजी राजवटीच्या अस्तकाळाला प्रारंभ झाला. सामाजिक लढे तीव्र स्वरूप धारण करू लागले. याचे पडसाद नंतरच्या कवींच्या कवितेत उमटले. मात्र या मधल्या काळात विडंबन काव्याचे पेव मराठी कवितेत फुटलेले दिसते. कवितेला नवे वळण लागण्याआधी या कवितेनेच रसिकांच्या मनाची

भूक भागवली. त्यामुळे विडंबन काव्य हा नवा काव्यप्रकार आकाराला आला. हा १९२० नंतरच्या कवितेचा महत्त्वाचा पैलू ठरतो.

विडंबन काव्य

राम गणेश गडकरी यांच्या हुकमेहुकूम, चिंतातूर जंतू, विहिणींचा कलकलाट या कवितांचे स्वरूप विनोदी कवितेचे होते. हे खरे असले तरी प्र.के.अत्रे यांच्या 'झेंडूची फुले' या कवितासंग्रहाने विडंबनकाव्याच्या बहराला खऱ्याअर्थी प्रारंभ केला असे म्हणता येईल. विडंबनकाव्य म्हणजे विदुषकी अंगाने केलेला उपहास होय. अत्रे यांनी इंग्रजीतील Parody या शब्दाच्या अर्थाच्या आधारे विडंबन याचा अर्थ स्वीकारला आहे. एखाद्या मूळ काव्याचा नमुना आधाराला घेऊन त्यातील लय, ताल यांचे आधीचे वळण शक्यतो तसेच ठेवून त्याला विनोदी, उपहासगर्भ, विदुषकी साज चढविणे म्हणजे विडंबन, अशी विडंबन काव्याची व्याख्या करता येईल. मात्र कवितेच्या आयत्या साच्यात केवळ शब्दांचा भरणा करून उत्तम विडंबन साधता येणार नाही. उत्तमप्रकारच्या विडंबनासाठी विडंबनकाराकडे तितक्याच ताकदीची मिश्किल वृत्ती, कल्पकता, बेधडकपणा, विसंगतीचे आणि कवित्वाचे भानही आवश्यक असते. विडंबनकाराकडे केवळ शिवराळपणा असेल तर विडंबन बाष्कळ, अश्लिल आणि ओंगळवाणे होण्याची शक्यता असते. विडंबनकाराला हे टाळता आले पाहिले. विडंबन काव्याला या काळात अधिक बहर आला याबाबत काही निवडक कवींच्या कामगिरीचा आढावा घेणे आवश्यक आहे.

प्रल्हाद केशव अत्रे उर्फ केशवकुमार

'झेंडूची फुले' या विडंबन कवितासंग्रहाच्या रूपाने अत्रे यांनी आदर्श विडंबनाचा मानदंड निर्माण केला असे म्हणता येईल. त्यांच्या मिश्कील वृत्तीचा आणि खट्याळपणाचा तो वाङ्मयीन आविष्कार आहे. आपल्याला रविकिरण मंडळाच्या कवितेने विडंबनकार बनविले असे अत्रे यांनी म्हटले आहे. अत्र्यांचा सारा रोष रविकिरण मंडळावर होता याचे मुख्य कारण त्यांना गडकऱ्यांच्या कवितेविषयी वाटणारी आत्मीयता हे होय.

'झेंडूची फुले' ही अनेक अर्थाने मराठी काव्यक्षेत्रातली एक अपवादात्मक व अनन्यसाधारण घटना होती. केशवकुमाराच्या प्रतिभेला तिचा प्रकृतिपालट (मॅटाबॉलिझम) घडवून आणिल असा झालेला हा एक अपघात होता. विनोद आणि विडंबनपर काव्यरचनेचे एक स्वतंत्र दालन त्यामुळे मराठीत तयार झाले. झेंडूची फुले ही निर्मिती त्या पद्धतीच्या रचनेचा मेरूदंड म्हणून आजही एकमेवाद्वितीय स्थान मराठी कवितेत मिळवून राहिली आहे' हे रमेश तेंडुलकरांचे उद्‌गार त्यामुळेच यथार्थ वाटतात.

अनंत काणेकर

अनंत काणेकर यांनी विडंबन काव्यलेखनामध्ये आणखी भर घातलेली दिसते. 'चौकोनी आकाश' हा त्यांचा विडंबन गीतांचा कवितासंग्रह होय. या संग्रहात काही सामाजिक आशयाच्या कविताही असलेल्या दिसतात. पगारातला शेवटचा पैसा संपल्यावर, बेगमेच्या विरहगीताला शिवाजीचे उत्तर, प्रेम आणि पतन, नळावर तणतणणाऱ्या बाईस इत्यादी त्यांच्या कविता त्याकाळी बऱ्याच लोकप्रिय असलेल्या दिसतात.

दत्तू बांदेकर

दत्तू बांदेकर हे विनोदी लेखक म्हणून रसिकांना परिचित आहेत. त्यांनी विडंबन गीतेही लिहिली आहेत. मनमोहन या नावाने त्यांनी विडंबन गीते लिहिलेली दिसतात. 'शंखध्वनी' अथवा 'बोंबाबोंब', (१९३२) 'अफूच्या गोळ्या' (१९३३) आणि 'दर्यातील खसखस' (१९३६) या तीन कवितासंग्रहात त्यांची विडंबन कविता समाविष्ट झाली आहे. तर 'आदित्य' आणि 'युगायुगाचे सहप्रवासी' या दोन कवितासंग्रहात त्याची भावगीत स्वरूपाची कविता एकत्रित असलेली दिसते.

वा.ना.देशपांडे

आराधना आणि अनामिका हे दोन कवितासंग्रह वामन नारायण काळे यांच्या नावे प्रसिद्ध असलेले दिसतात. वा.ना. हे साम्यवादी विचारांचे कवी होते. त्यामुळे त्यांच्या कवितेत विचार, नाट्य यांचा संगम झालेला दिसतो. 'कोरकू' हे खंडकाव्यही त्यांनी लिहिले आहे. सातपुड्यातील आदिवासींच्या जीवनातील एका दंतकथेवर हे त्यांचे कारूण्यपूर्ण खंडकाव्य आधारलेले आहे.

ना.घ.देशपांडे

'शीळ' आणि 'अभिसार' या कवितासंग्रहातील ना.घं.च्या भावगीतांनी मराठी रसिकमनाला मोहिनीच घातली. 'रानारांनात गेलि बाई शीळ' या त्यांच्या भावगीताला चाल लावून संगीतकारांनी सादर केल्यामुळे भावगीतगायन लोकप्रिय झाले. तांबे, माधव ज्युलियन इत्यादीच्या कवितांना चाली लावून त्यांच्या ध्वनिमुद्रिका काढण्यात आल्या, याचे श्रेय मात्र देशपांडे यांच्या 'शीळ' या भावगीताला द्यावे लागेल. प्रेम म्हणजे स्त्री पुरूषांना परस्परांविषयी वाटणारे नैसर्गिक आकर्षण हाच त्यांच्या कवितेचा मध्यवर्ती भाव असलेला दिसतो. भावसौंदर्याबरोबर नादसौंदर्य आणि अर्थसौंदर्य हे ना.घ.देशपांडे यांच्या कवितेचे विशेष आहेत. 'नदीकिनारी नदीकिनारी नदीकिनारी ग... ' किंवा 'फार नको वाकू' / 'जरी उंच बांधा' / 'फार नको झाकू' / 'जरी गौरी खांदा' या त्यांच्या गीतांमुळे त्यांचे नाव सर्व परिचित झाले. प्रेमातील

गोडवा, धुंदी, बेहोशी, वेदना व्याकुळता अशा भावछटांचे ह्यदयस्पर्शी चित्रण त्यांनी आपल्या कवितेतून केले. आपल्या कवितांना लोकशैलीची डूब दिल्यामुळे त्याना जानपद कवी म्हणूनही ओळखले जाते.

आत्माराम रावजी देशपांडे (अनिल)

कवी अनिल उर्फ आत्माराम रावजी देशपांडे यांचा 'फुलवात' हा कवितासंग्रह १९३२ साली प्रसिद्ध झाला त्यानंतर 'भग्नमूर्ती' (१९४०), 'निर्वासित चिनी मुलास' (१९४३), 'पेर्ते व्हा' (१९४७) आणि 'सांगाती' इत्यादी कवितासंग्रह प्रसिद्ध झाले. मराठी कवितेचे एक प्रयोगशील वळण अनिलांच्या कवितेतून प्रकट होताना दिसते. तांबे आणि रविकिरणमंडळाच्या प्रभावकाळात अनिलांनी काव्यलेखनाला प्रारंभ केला तरी 'मराठी कवितेचा प्रवाह आधुनिक आणि गतिमान करण्यात अनिलांच्या कवितेचा वाटा महत्त्वाचा आहे' अनिलांच्या कवितेतील सौंदर्यदृष्टीचाच भाग होती.

'फुलवात' या काव्यसंग्रहातील प्रेमकविता व्याक्तिगत जिव्हाळा, प्रेमाची ओढ, आर्तता, हळुवारपणा, संययमी उत्कटता, साधी ओवी अभंगादी रचनेतून आली सोज्वळ शब्दकळा, प्रतीकात्मकता अशा वैशिष्ट्यांनी समृद्ध झाल्या आहेत. भाव कवितेचे हे नवे वळण रसिकांना विलोभनीय वाटावे यात आश्चर्य वाटण्यासारखे काहीच नाही कारण ही कविताच अस्सल होती. उदाहरणार्थ 'गगनि उगवला सायंतारा', 'चढली शिशिर ऋतूची कळा, पसरली सृष्टीवर अवकळा' किंवा 'थकले रे डोळे माझे वाट तुझी पाहता' या फुलवात मधील कविता पाहिल्यास गेयते बरोबरच भाव संपृत्कता या कवितेत शिगोशीग भरलेली दिसते.

भग्नमूर्ती - पुरातन शिल्पकलेविषयी आणि एकूणच सांस्कृतिक संचिताविषयी समाजाला वाटणारी अनास्था कशी विपरित आहे, या बाबतचे वास्तव अनिलांनी 'भग्नमूर्ती' या दीर्घ काव्यात मांडली आहे. या काव्यातील चिंतन सुजाण रसिकांना विचारप्रवृत्त करणारे आहे. ही संपूर्ण रचना मुक्तछंदात असून काहीशी प्रचारकी झाली आहे.

निर्वासित चिनी मुलास - अनिलांनी खंडकाव्य लेखनाचा प्रयत्न निर्वासित चिनी मुलास या काव्याच्या आधारे केला आहे. चीन भारत युद्धाची पार्श्वभूमी असलेल्या या काव्यात युद्ध पेटवणारे स्वार्थी लोक शस्त्रांचा बाजार करून सामान्य माणसांच्या जीवनाशी, भावनांशी खेळतात. त्याचा नव्या पिढीवर विपरित परिणाम होतो याविषयी अनिल मानवतावादी भूमिकेतून लिहितात. अन्याय घडो कोठेही, चिडून उठू आम्ही, घाव पडो कोठेही तडफडू आम्ही अशी कवीची सहवेदना हा या काव्याचा गाभा असलेली दिसते. जीवनाला उपयुक्त असणारे तत्त्वज्ञान भावपूर्ण शब्दांतून व्यक्त करणे हा या खंडकाव्याचा प्रमुख उद्देश येथे दिसतो.

पेर्ते व्हा - या संग्रहात त्यांची प्रेमकविता आली आहे, तर 'सांगती' या कवितासंग्रहात मात्र अनिलांच्या सौंदर्यदृष्टीचा, कल्पकतेचा आणि प्रयोगशीलतेचा प्रत्यय येतो.

'अजून यौवनात मी जगात जागत्या अशा
जगावयास गावया पहावया उषानिशा
इथे निसर्गचारूता इथे प्रयत्न मानवी
उचंबळोनि वृत्ति ये उमेद घेऊनि नवी' (पृ.३०)

निसर्गसौंदर्य आणि मानवी प्रयत्न यात रममाण होणारी वृत्ती अनिलांकडे होती याची साक्ष वरील ओळींतून प्रत्ययाला येते.

मुक्तछंद आणि दशपदी :

मुक्तछंद हा शब्द निर्यमक कवितेसाठी अनिलांनी मराठीत रूढ केला आणि त्यानी तशा कविताही लिहिल्या. हे त्यांचे कार्य मराठी साहित्यप्रवाहात मौलिक म्हणावे लागेल. इंग्रजीतील कवी वॉल्ट व्हिटमनच्या फ्री व्हर्स या कवितेने प्रभावित होऊन हा रचनाप्रकार अनिलांनी स्वीकारला. वृत्त आणि अलंकार तसेच सुनितासारख्या बंदिस्त रचनाप्रकारातून मराठी कविता मुक्त झाली. मात्रांचे बंधन नसलेली ही कविता होती. प्रत्येक चरणात ठराविक अक्षरगण, मात्रागण असणे, ओळींची समसंख्या असणे आणि अत्य यमक असणे या पारंपरिक छंद कल्पानांना मुक्तछंदाने झुगारून दिले. प्रारंभी सात मात्रांचे चरण आणि पाच मात्रांचा विरामाचा चरण अशी मुक्तछंदाची रचना केली गेली. तालाचे बंधन असावे असे अनिलांनी प्रतिपादन केले आहे. अन्यथा तालहीन रचनेस छंद म्हणता येणार नाही असे त्यांचे म्हणणे होते. या आधारे छंदाच्या पुष्कळशा बंधनातून मुक्त झाला तो मुक्तछंद अशी मुक्तछंदाची व्याख्या त्यांनी केलेली दिसते. पण पुढे ओळींच्या विषम संख्येमुळे नादसाम्य, ताल यांनाही मुक्तछंदात स्थान राहिले नाही. कवीच्या मनातील सहजस्फूर्त आशयाला मुक्तछंद अधिक जुळणारा ठरला. ज्या आशयाला बद्ध छंदाचा अडसर होतो त्या आशयअभिव्यक्तीला मुक्तछंद पोषक ठरला. अनिलांबरोबर पु.शि.रेगे, वा.ना.देशपांडे, व्यंकटेश वकील असे काही कवी आपल्या कवितांतून अशा रचनेचे प्रयोग करीत होते. अनिलांच्या प्रेम आणि जीवन व नंदनवन मुकल्यावर या कवितांतून मुक्तछंदातील रचनेला उभारी मिळाली. त्यातून ही संज्ञा निश्चित झाली.

'दशपदी' ह्या दहा ओळींच्या कवितेचा रचनाप्रकार अनिलांनी आपल्या काव्यलेखनात योजला. हा प्रकार इंग्रजी वा अन्य कोणत्याही भाषेतील नसून नवाच रचनाप्रकार अनिलांनी शोधला. कवितेत कोठेही विरामचिन्ह नसते तर शेवटच्या ओळीनंतर उद्‌गारचिन्ह दिले जाते. कारण अनिलांच्या मते दशपदी हा संपूर्ण उद्‌गार आहे... दशपदीतील आशय दहा चरणातच संपूर्णपणे अभिव्यक्त होईल असाच असतो. 'सचेतन मनाने प्रेरित मनातील स्फूर्तीच्या चैतन्यक्रियेमुळे तसाच, तितकाच

आशय अचेतन अबोध मनातून ओढलेला असतो. त्याचे स्वरूप, निजरूप, रूपाकार, रूपाकृती आणि रूपबंध तसाच असतो'. अनिलांच्या या दशपदीबाबतच्या विचारांकडे पहिल्या ही कविता भावकविता असते. कवीच्या आंतरिक व्यक्तिमत्त्वाचे प्रकटन होत असते. अनिल दशपदीच्या रचनेविषयी स्वत:च आग्रही असलेले दिसतात.

कुसुमाग्रज (वि.वा.शिरवाडकर)

आधुनिक मराठीत काव्यप्रवाहात अढळ स्थान प्राप्त केलेल्या कुसुमाग्रजांनी आपल्या काव्यलेखनाला १९३० नंतर प्रारंभ केलेला दिसतो. पारतंत्र्याच्या धगधगत्या पार्श्वभूमीवर त्यांची तेजस्वी कविता अवतरली आणि मराठी काव्यविश्वात पुन्हा एकदा चैतन्यदायी वातावरण निमार्ण झाले. त्यांनी विसाव्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंत म्हणजेच आयुष्याच्या अंतापर्यंत काव्यलेखन केले. त्यांच्या काव्यलेखनाचा यथोचित गौरव म्हणून भारत सरकारने त्यांनी 'ज्ञानपीठ' हा सर्वोच्च पुरस्कारही दिला. प्रस्तुत विवेचनात त्यांच्या १९६० पर्यंतच्या काव्यलेखनाचा विचार करावयाचा आहे.

कुसुमाग्रजांचे या काळात चार संग्रह प्रसिद्ध झाले. 'जीवनलहरी' (१९३३), 'विशाखा' (१९४२), 'किनारा' (१९५२) तसेच 'मराठी माती' (१९६०) या चार संग्रहांनी कुसुमाग्रजांना सर्वमान्य कवी म्हणून मान्यता मिळाली.

'**जीवनलहरी**' हे त्यांचे छोटेसे ओवीसदृश अष्टाक्षरी पादाकुलक रचनाबंधात केलेले काव्य केवळ १४३ ओव्यांचे आहे. गझलेचे शेर असतात त्याप्रमाणे प्रत्येक जीवनलहरी स्वतंत्र आहे. भावकणिका आणि विचारकणिका आहेत. स्वप्नाळूपणा, सौंदर्यवृत्ती यांचा प्रत्यय या लहरीमधून येतो.

विशाखा - कुसुमाग्रजांच्या काव्यलेखनाला खरी झळाळी प्राप्त झाली ती विशाखा कवितासंग्रहाच्या प्रसिद्धी नंतर. या कवितासंग्रहातील कवितेने कुसुमाग्रजांना मराठी काव्यविश्वात अढळ ताऱ्याचे स्थान प्राप्त करून दिले. क्रांतिनिष्ठा, अदम्य अशी जीवननिष्ठा, स्वातंत्र्याविषयीचे प्रेम, असहाय्य दुर्बल घटकांकडे पाहण्याची मानवतावादी दृष्टी आणि अमर्याद ध्येय्यासक्ती ही त्यांच्या 'विशाखा' कवितासंग्रहाची काही ठळक वैशिष्ट्ये सांगता येतील. विशाखा कवितासंग्रहातील 'पृथ्वीचे प्रेमगीत', 'क्रांतीचा जयजयकार', 'कोलंबसचे गर्वगीत', 'अहिनकुल', 'हिमलाट' इत्यादी कवितांनी मराठी रसिकांच्या मनाला आकर्षित केले.

किनारा - किनारा हा त्यांचा संग्रह विशाखा कवितासंग्रहातील वास्तवता पुढे नेणारा ठरला. स्वातंत्र्यप्राप्तीची वेळ समीप आल्याचे समाधान, समतेचा पुरस्कार, मानवतावाद, सामान्यांच्या सामर्थ्याची जाणीव ही या संग्रहातून प्रकटली.

'सरायास संग्राम आला अता
तपांची समोरी उभी सांगता
युगांच्या श्रमांचा दिसे हा किनारा
आला किनारा' (किनारा)

या संग्रहात एकूण ६१ कविता असून 'निळे चक्र', 'निळा पक्षी', 'प्रीतीसाठी प्रीती' इत्यादी काही कविता लक्षणीय आहेत.

मराठी माती - कुसुमाग्रजांच्या प्रतिभेला भूमिनिष्ठ जाणिवांचे व्यापक संदर्भ प्राप्त करून देणारा हा संग्रह होय. या संग्रहात त्यांनी माणसांच्या नैसर्गिक, प्राकृतिक जीवनासाठी माती ही प्रतिमा वापरली आहे. माणूस हा मातीचा पूत्र आहे. तरी त्याला आकाशाचा वेध लागलेला असतो. आकाशाच्या स्पर्शाने माणसाच्या जीवनाला अर्थ प्राप्त होतो. येथे ते माती ही मानवी प्रकृतीची प्रतिमा आणि आकाश ही मानवी मूल्यांची प्रतिमा वापरतात. मानवी मूल्यांच्या स्पर्शानेच जीवनाला खराअर्थ प्राप्त होत असतो. अशी मूल्ययुक्त जाणीव ते या संग्रहात प्रकट करताना दिसतात. या संग्रहात 'मराठी माती', 'अलौकिक', 'स्मरण', 'वीज', 'तळे देव्हारा' इत्यादी लक्षणीय कविता आहेत.

मानवी जीवनाला अर्थपूर्ण बनविणारी काव्यदृष्टी कुसुमाग्रजांच्या कवितेतून व्यक्त झाली. मानवी जीवनात मूल्यांचे स्थान महत्त्वपूर्ण आहे, हे त्यांनी आपल्या कवितेतून अधोरेखित केले. त्यांच्या कवितेविषयी सुधीर रसाळ म्हणतात - "काव्यात अनुभवांची संघटना बांधताना ते काही वेळा मूल्यात्मक पातळीवर उभे राहून संघटित होणाऱ्या अनुभवांकडे पाहतात, म्हणजेच ते एखाद्या मूल्यात्मक पातळीवरून अनुभवांची संघटना साधू पाहतात. काही वेळा ते श्रद्धायुक्त सामान्य माणसांच्या भूमिकेवरून ते मूल्यात्मकतेची, मूल्यात्मकतेने अथपूर्ण बनलेल्या अनुभवांची संघटना घडवू पाहतात. कुसुमाग्रजांच्या कवितेतून मराठी काव्यसृष्टी समृद्ध झाली. मानवतेचा पुरस्कार, क्रांतीचा जयजयकार, प्रेमाची उदात्तता, असीमता, सामाजिक दंभावरील प्रहार ह्या वैशिष्ट्यांमुळे त्यांची कविता उत्तरोत्तर वाढत विकसत गेली".

बा.भ.बोरकर

'बालकवींच्या नंतर मराठी काव्यप्रांतात सळसळत्या निसर्गसंवेदनांची प्रचिती देणारे कवी' असा बा.भ.बोरकर यांचा उल्लेख करावा लागेल. रमणीय निसर्गसौंदर्याने सजलेल्या गोमंतकाच्या प्रदेशात बारेकरांच्या प्रतिभेला धुमारे फुटले. त्यामुळे ही कविता अधिकच स्वाभाविकपणे प्रकटली असे म्हणता येईल.

१९६० पर्यंत बोरकरांचे पाच संग्रह प्रसिद्ध झाले. 'प्रतिभा' (१९३०), 'जीवनसंगीत' (१९३७), 'दूधसागर' (१९४७), 'आनंदभैरवी' (१९५०) आणि 'चित्रविणा' (१९६०) इत्यादी संग्रहातून त्यांच्या प्रतिभेचे विविध पैलू प्रकटलेले दिसतात.

प्रतिभा - बोरकरांच्या पहिल्या प्रतिभा या कवितासंग्रहावर भा.रा.तांबे यांच्या गीतबद्ध कवितेचा मोठा प्रभाव होता. कवी आणि कविता, कवितेचे प्रयोजन, प्रतिभेचे दिव्यत्व हे त्यांच्या कवितेचे विषय होते. माधुर्ययुक्त रचना करण्याचे त्यांचे कौशल्य या संग्रहातच प्रत्ययाला येते.

जीवनसंगीत - या संग्रहाला वि.स.खांडेकरांची दीर्घ प्रस्तावना लाभली आहे. बोरकरांच्या प्रतिभेचे सर्व पैलू उलगडून दाखवणारा हा संग्रह आहे. सागरा, सांजवेळ, जपानी रमलाची रात्र, वारूणी रात्र, मुशाफिरा, तेथे कर माझे जुळती, तीन सांजा अशा कितीतरी कविता प्रेम, निराशा, ईश्वरभक्ती, शृंगार, सामाजिक विषमतेचा धिक्कार, मानवता, पावित्र्याची ओढ, आशावाद, यासह निसर्गअनुभूतीचे विलोभनीय दर्शन ते घडवितात. बोरकरांच्या व्यक्तिमत्त्वात असलेला विरोधाभास येथे दिसतो. ते शृंगारिक अनुभवांबरोबर ईश्वरभक्तीच्या कविता एकाच वेळी लिहिताना दिसतात. 'यज्ञी ज्यांनी देऊन-निज-शिर' / 'घडिले मानवतेचे मंदिर' / 'परी जयांच्या दहन-भूमीवर' / 'नाही चिरा नाही पणती' / 'तेथे कर माझे जुळती' अशा मानवतावादाच्या तत्त्वज्ञानाने बोरकर प्रभावित झाले होते.

दूधसागर आणि आनंदभैरवी - या संग्रहातील कृतार्थ जीवित, जीवन त्यांना कळले हो या कवितांतून बोरकरांची जीवनदृष्टी अभिव्यक्त झालेली दिसते. सृष्टी हे चिरंतन आनंदाचे विलसित आहे. आनंद हीच जगाची प्रकृती आहे. दृःख हे क्षणभंगूर असते असे जीवनविषयक तत्त्वज्ञान त्यांच्या या संग्रहातून गोचर होते.

चित्रवीणा - चित्रवीणा या संग्रहात बोरकरांची कविता प्रेम, निसर्ग, जीवन, ईश्वर या आशयकेंद्रांभोवती फिरते. 'काळी माया', 'मीलनक्षेत्र', 'ज्ञानदेव गेले तेव्हा', 'फांद्यामधुनी चंद्र दिसावा' अशा अनेक कविता बोरकरांच्या सामर्थ्यशील प्रतिभाची साक्ष देणारी आहे.

लौकिक आणि पारलौकिक अशा दोन्ही अनुभूतीत रमलेल्या बोरकरांनी गोमंतकातील निसर्गाचे अनेक विभ्रम तन्मयतेने रेखाटले. या दृष्टीने त्यांची कविता भूमीनिष्ठ जाणिवांची कविता होती. 'माझ्या गोव्याच्या भूमीत गड्या नारळ मधाचे' किंवा 'तिखट कढीने जेवुनी घ्यावे', 'मासळिचा सेवित स्वाद दुणा' इत्यादी कवितांतून बोरकरांनी गोमंतकाच्या संस्कृतीचे चित्र रेखाटलेले दिसते. गांधीच्या विचारांचा प्रभाव त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर पडल्यामुळे शोषितपीडितांना तारणाऱ्या मानव्याचा ध्यास त्यांनी आपल्या कवितेतून घेतलेला दिसतो.

वा.रा.कान्त

उग्र, क्रांतिदर्शी कविता लिहिणारे वा.रा.कान्त रसाळ वामन, अभिजित अशा टोपण नावांनी काव्यलेखन करताना दिसतात. पहाटतारा हा त्यांचा पहिला कवितासंग्रह १९३० साली प्रसिद्ध झाला. त्या नंतर त्यांचे फटत्कार (१९३३), 'रूद्रवीणा' (१९४७), 'शततारका' (१९५०) आणि 'वेलांटी' (१९६२) इत्यादी काव्यसंग्रह प्रसिद्ध झाले. त्यांनी प्रारंभी उग्र, भडक जाणिवांची कविता लिहिली.

रूद्रवीणा ह्या कवितासंग्रहात दाहक वास्तव ते अधोरेखित करतात. जुलमी, अन्यायी राजवटीच्या दाबाखाली राहून असह्य ताण सहन केल्यानंतरच्या भावनिक उद्रेकाची ही कविता होती.

पु.शि.रेगे

पुरूषोत्तम शिवराम रेगे यांची या काळातील समग्र कविता वेगळ्या वाटा चोखाळताना दिसते. रेग्यांनी आपल्या कवितेला प्राचीन काव्यातील प्रतिमांनी संस्कारित केले आहे. त्यांची कविता स्त्रीच्या अस्तित्वाचा पुरूषमनाने घेतलेला अनुभव गोचर करताना दिसते. साधना आणि इतर कविता (१९३१), 'फुलोरा' (१९३७), 'हिमसेक' (१९४३), 'दोला' (१९५०), 'गंधरेखा' (१९३५), 'पुष्कळा' (१९३०) इत्यादी कवितासंग्रहातून रेग्यांची कविता रसिकांसमोर आली. त्यांचे बहुतांश काव्यलेखन साठपूर्व काळातच झालेले दिसते. त्यांची कविता मानवी जीवनातील सृजनशक्ती आणि जीवनोत्सुकता यांचा समन्वय साधू पाहते. मानवी मनातील वासना ह्या सनातन आहेत. सृजनशीलतेच्या या मानसरूपांतून प्रेम, शृंगार आणि करूणा ह्या भाववृत्ती निमार्ण होतात. रेग्यांची कविता याच भाववृत्तींना केंद्रिभूत ठेवून काव्यलेखन करतात. स्त्रीच्या सौंदर्याच्या तसेच मानसिक आणि शारीरिक विकासाच्या विविध अवस्था रेग्यांच्या कवितेत दिसतात. रेषा, पुष्कळा, मस्तानी, अहल्या, शहनाज, राधा, चाफेगौरी, तेजोगर्भा अशा अर्थवाही प्रतिमांमधून रेगे स्त्रीपुरूष संबंधांची सनातन रूपे उलगडू दाखवतात. आधिबंधात्मक स्त्रीप्रतिमा हा रेग्यांच्या प्रतिभाधर्माचा विशेष म्हणावा लागेल. प्रेमभाव, कामभाव, सृजनभाव, कलाभाव यातील अन्योन्यता रेगे व्यक्त करतात.

'विमुक्त वृत्तीचा एकाकी कवी' असा रेगे यांचा उल्लेख करून गंगाधर पाटील त्यांच्या अनुभव विश्वाविषयी म्हणतात, - "आपल्या भावविश्वातील स्त्रीस्वरूप शक्तीकेंद्रातून अनेक स्त्री-प्रतिमा निर्माण करीत रेग्यांचे कवीमन बाह्य विश्वाला गवसणी घालण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यामुळे त्यांच्या काव्यसृष्टीत अनुभवविश्व एककेंद्री असूनही एकांगी झालेले नाही. ते आत्मनिष्ठ असूनही आत्मकेंद्री झालेले नाही. ते द्वंद्वरूप असूनही संघर्षमय झालेले नाही. ते एकाकी असूनही दु:खमय झालेले नाही. ते अनेकांगी, एकात्म, सर्वस्पर्शी व आनंदमय झाले आहे. म्हणूनच ते

प्रकृतीने एककेंद्री असले तरी बालकवी व इंदिरा संत यांच्या अनुभवविश्वाच्या जातीचे नाही.” (सुह्यदगाथा पृ.७१)

काही अन्य कवी

याच काळात कृ.ब.निकुंभ, वि.म.कुलकर्णी, ग.दि.माडगूळकर, लक्ष्मीबाई टिळक, साने गुरूजी, राजा बढे, अन्नपूर्णाबाई देसाई, वि.भा.कोलते इत्यादी कवी लिहिताना दिसतात. हे सर्व कवी आपापल्या परीने मराठी काव्यप्रांतात भर घालताना दिसतात. या प्रत्येक कवीने आपले भावविश्व कवितेतून प्रकट केलेले दिसते. ग.दि.माडगूळकर यांनी मराठी गीतकाव्यात मोलाची भर घातलेली दिसते. सानेगुरूजींनी लिहिलेली गीतेही अमर झालेली दिसतात.

बहिणाबाई चौधरी

बहिणाबाई चौधरी यांची कविता ‘बहिणाबाईंची गाणी’ या कवितासंग्रहात त्यांचे पूत्र सोपानदेव चौधरी यांनी संग्रहित केली आहे. निरक्षर असूनही कृषिसंस्कृतीचे आणि आपल्या अनुभवसिद्ध जीवनाचे संचित त्यांनी आपल्या कवितेतून साध्या पण अर्थसमृद्ध शब्दांतून व्यक्त केले. यातून त्यांच्या प्रतिभाधर्माचे अनोखे रूप रसिकांसमोर आले. ‘अरे संसार संसार, जसा तवा चुल्यावर, आधी हाताला चटके तव्हा मियते भाकर’ ही कविता किंवा ‘बिना कपाशीन उले त्येला बोंड म्हनू नही, हरिनामाईना बोले त्येला तोंड म्हनू नही’ अशा सहजसाध्या शब्दांत तत्त्वज्ञान भरण्याची कला त्यांच्या कवितेत दिसते. ‘माझी माय सरसोती माले शिकविते बोली’ किंवा ‘अरे घरोट घरोट, ज्याच्यातून येतं पीठ त्याले जातं म्हनू नही’. अशी काव्यनिर्मितीची सहजता त्या व्यक्त करतात. रूशी बसे वरमाय, तिचा रूसवा केवढा, म्हणे पापड वाढला कसा वाकडातिकडा असा विनोदही त्यांच्या कवितेत दिसतो.

बहिणाबाईच्या कवितेला लोकगींतांची ढब आहे. विविध सणाउत्सवाप्रसंगी मनात आलेले, शेतीत वावरताना आलेले भावतरंग त्यांनी आपल्या गीतांतून शब्दबद्ध केले आहेत. परेणी, कापणी, मळणी, उपणणी करताना परमेश्वराची करूणा भाकणे अशी सश्रद्धता त्यांच्या मानसिकतेतच एकवटलेली दिसते. आशयघनता, लोकव्यवहारतील दृष्टान्त, निरीक्षणातून प्रकट होणारा लोकस्वभाव, खानदेशी बोलीतील मार्मिक शब्दकळा आणि प्रांजळता यामुळे बहिणाबाईची कविता लोभस रूप धारण करताना दिसते.

इंदिरा संत

इंदिरा संत यांनी १९३१ मध्ये आपल्या काव्यलेखनाला सुरूवात केली. नवकवितेच्या बहराच्या काळात त्यांनी आपले विशुद्ध कवितचे विश्व रसिकांसमोर

आणले. त्यांचे सहवास (१९४०), 'शेला' (१९५१), 'मेंदी' (१९५५), 'मृगजळ' (१९५७) इत्यादी कवितासंग्रह १९६० पर्यंत प्रसिद्ध झाले.

सहवास - सहवास हा इंदिरा संत आणि त्यांचे ना.मा.संत या दोघांच्या कवितांचा एकत्रित संग्रह आहे. ही कविता एकमेकांच्या निकट सहवासाचे उत्कट चित्र रंगविते. परस्परांना परस्परांविषयी वाटणारी आत्यंतिक ओढ, मनात दाटून येणाऱ्या ऊर्मी, प्रेमभावना, आणि संवेदना यांचे साक्षात्कारी अनुभव ही कविता देते. 'मम ह्रदय जाणतां दिसते तुमच्या नयनीं' / 'अन् मलाही येतं तुमच्या मनिंचे कळुनी' अशी ही उत्कट देवघेव हा या कवितेचा गाभा आहे.

शेला - मनातील उत्कटता, नाजूक हळूवार भावनांना इंदिरा संतांनी या कवितेत वाट करून दिलेली दिसते. विवाहानंतरच्या अनुभवांचे हे संघटन आहे. मातृत्वाची आणि वात्सल्याची भावना या संग्रहातल्या कवितांतून प्रकटली आहे.

मेंदी - या संग्रहात एकूण बासष्ट कविता आहेत. निसर्गप्रतिमांचा उत्सव असे या संग्रहाचे रूप आहे. 'मेंदी', 'मोरपीस', 'हिरवे पिवळे तुरे उन्हाचे' अशा कविता पाहिल्यास निसर्गानुभुतीचे आकार घेताना दिसते. 'इंदिरा संतांच्या कवितेत निसर्ग बाहेरून येत नाही. तर तो कवितेच्या आतून उमलून येतो. तो कवितेचेच एक अंगरूप असतो.... त्यामुळे इंदिरा संतांची कविता म्हणजे निसर्गप्रतिमांची संरचना असे म्हणणे जास्त योग्य ठरेल' हा पुंडे यांचा अभिप्राय मार्मिक ठरतो.

पती अकाली निधन पावल्यामुळे इंदिरा संतांची कविता दुःख हा स्थायीभाव घेऊन अवतरली. एकाकीपणाचे दुःख आणि विरहाच्या वेदनांमुळे त्यांच्या कवितेने एक वेगळेच वळण घेतलेले दिसते. 'मृण्मयी' या कवितेत त्यांनी आपल्या अधुऱ्या, अधांतरी जीवनाची खंत व्यक्त केली आहे. किंबहुना वैधव्यतेमुळे निर्माण झालेली सांसारिक अभावग्रस्तता व्यक्त करणे हे त्यांच्या कवितेचे प्रमुख सूत्र बनून राहते.

मृगजळ - संतांच्या कवितेतील आधीच्याच जाणिवा या संग्रहात आल्या तरी त्यांची तीव्रता काहीशी कमी झालेली दिसते. दुःख विसरण्याच प्रयत्न करून आपले अस्तित्व त्या निसर्गघटकांशी भिडवताना दिसतात. त्यामुळे मृगजळ मधील कविता व्यापक जाणिवा व्यक्त करताना दिसते.

साध्या वाटणाऱ्या अभिव्यक्तीतच इंदिरा संतांच्या कवितेचे मर्म सापडते. भावनांचे अत्यंत तरल, सूक्ष्म आणि संमिश्र रूप त्यांच्या कवितेत सापडते. विशुद्ध भावकवितेची निर्मिती हा संतांच्या कवितेचा मौलिक असा विशेष होय.

श्रीकृष्ण पोवळे

वेदना, एकाकीपण आणि भावनांचा आवेग व्यक्त करणारा कवी असा पोवळे यांचा उल्लेख करावा लागेल. त्यांनी 'अग्निपराग' (१९४६), 'जळमाती' (१९४९)

आणि 'बुलबुल' (१९५९) असे कवितासंग्रह लिहिले आहेत. उत्कटता, क्रांतिप्रवणता, हळवी भावूकता हे त्यांच्या काव्याचे विशेष. जुन्या, पारंपरिक कवितचे रचनाबंध स्वीकारून पोवळे यांनी काव्यरचना केलेली दिसते. जळमाती या काव्यसंग्रहात रूबायांचे लेखन त्यांनी केले आहे. काही समकालीन कवींच्या काव्याचा प्रभावही त्यांच्या काव्यावर पडलेला दिसतो.

पद्मा गोळे

आधुनिक स्त्रीमनाचा अविष्कार आपल्या कवितेतून करणाऱ्या नव्या जाणिवेच्या लेखिका. 'प्रीतिपथावर' (१९४७) आणि 'नीहार' (१९५४) हे त्यांचे दोन कवितासंग्रह या काळात प्रसिद्ध झाले. स्त्रीचे भावविश्व त्यांनी आपल्या कवितेच्या केंद्रस्थानी आहे. बदलत्या सामाजिक सांस्कृतिक वास्तवात होणारी स्त्रीमनाची घुसमट, त्यातील ताणतणाव त्यांनी रेखाटले. त्याचबरोबर प्रेमभावनेचा आविष्कार त्यांच्या कवितेत होताना दिसतो. 'युगंधरा मी नव्या युगाची' अशी नवस्त्रीप्रतिमा त्या घडवू पाहतात.

संजीवनी मराठे

संजीवनी मराठे यांची कविता प्रेम आणि कौटुंबिक भावविश्वाभोवती फिरते. भा.रा.तांबे यांच्या भावगीतांसारखी लयबद्ध कविता त्यांनी लिहिली. त्यांचे 'संजीवनी' (१९३२), 'राका' (१९३९), 'संसार' (१९४३) 'छाया' (१९४९) 'चित्रा' (१९५७) इत्यादी कवितासंग्रह या काळात प्रसिद्ध झाले आहेत. राका या कवितासंग्रहात तर त्यांनी विविध रागदारीतील कविता लिहिल्या आहेत.

शांता शेळके

'वर्षा' (१९४७), 'रूपसी' (१९५६) या दोन संग्रहांनी मराठी रसिकांना शांता शेळेक परिचित झाल्या. शांता शेळके यांची कविता साधी ऋजू काव्यशैली घेऊन अवतरते. त्यांच्या प्रारंभीच्या कवितेवर माधव ज्यूलियनांच्या काव्यशैलीचा प्रभाव पडलेला दिसतो. 'मी विद्युल्लतिका नसे कुणी उर्वशी' / 'मी साधी भोळी तुळशीची मंजिरी' अशा आपल्या ऋजू स्वभावाचे आरेखन त्या करतात. 'प्रीतीचा प्रतिकार', 'सात्वंन', 'याचना' अशा काही कविता त्यांनी पुरूषी भावनेतून लिहिलेल्या दिसतात. निसर्ग आणि प्रेम यांच्या अनुभूतीतून त्यांचे हे काव्यविश्व साकार झालेले दिसते. मराठमोळी शब्दरचना, चित्रमयता, रेखीव रचना ही भावगीत रचनेची कौशल्ये शांताबाई शेळके यांच्या लेखनशैलीचा विशेष म्हणावा लागतो. त्यामुळे त्यांच्या कविताना खूप लोकप्रियता लाभली.

याच दरम्यान मराठीत नवकवितेचे युग सुरू झाले. या कवितेचा विचार करणे क्रमप्राप्त आहे.

नवकविता

१९४०-४५ पासून नंतरच्या काळात प्रामुख्याने केशवसुतांपासून चालत आलेले काव्यसंकेत झुगारून देणारी, यंत्रजीवनाचे आणि नव्या सामाजिक बदलाचे चित्र नव्या शब्दकळेच्या माध्यमातून रेखाटणारी कविता ही नवकविता ठरली. केशवसुतांनी मराठी कवितेला आधुनिकतेचे वळण दिले. इंग्रजी काव्याच्या आकलन आस्वादातून त्यांनी पारमार्थिक संस्कारात गुरफटलेली मराठी कविता मोकळी केली. त्यामुळे आधुनिक काव्याचे जनक म्हणून केशवसुतांचा गौरव रास्तच ठरतो. परंतु त्यांच्या काव्यापासून सुरू झालेला काव्यप्रवाह बालकवी, गडकरी, रेव्हरंड टिळक पुढे सावरकर आणि अन्य राष्ट्रीय प्रेमाची, इतिहासप्रेमाची कविता लिहिणारे, आणि रविकिरण मंडळातील शिलेदार, बोरकर, कुसुमाग्रज, अनिल पु.शि.रेगे यांच्यापर्यंत हा काव्यप्रवाह अनेक वळणे घेत आलेला दिसतो. मात्र नवकवितेचे वळण पूर्णतः वेगळे होते. या कवितेने आशयरूपाच्या बाबतीत काव्यक्रांती घडविली असे म्हणावे लागेल.

या नवकवितेचे काही ठळक विशेष नोंदवता येतील.

१) ही कविता यंत्रयुगांच्या जळजळीत जाणिवा व्यक्त करणारी होती. तिला महायुद्धाच्या विदारक परिणामांची पार्श्वभूमी होती.

२) म्हणूनच आधुनिकेतेच्या हव्यासातून घडणाऱ्या विनाशाला एक राजकीय भानातून प्रतिक्रिया देणे हे या कवितेचे मुख्य उद्दिष्ट होते.

३) साहजिकच मराठी कवितेच्या आशयारूपाच्या सांकेतिक कल्पनांना उधळून त्या जागी नवी असांकेतिक शब्दघडण करण्याचे काव्यात्म कार्य या कवितेच्या आधारे केले गेले. अनुप्रास, यमक या सारखे जुने अलंकार, शब्दांचा हव्यास, निसर्गसंवेदनांच्या ठरीव प्रतिमांना या कवितेने मूठमाती दिली.

४) एकाकीपण, भांबावलेली मानसिकता, पिचलेल्या श्रद्धा, अगतिकता, भयाकुलता, संवेदनहिनता, संभ्रग, कुजलेपण, परात्मता, अशाश्वतता अशा कुंठित करणाऱ्या मनोवस्थांचे चित्र या कवितेने जगासमोर आणले.

५) आविष्कारासाठी ओवी, अभंग, पादाकुलक असे सोपे छंदप्रकार वापरले तरी रोबो, पायलन्स, पिस्टन, तंग हवेली, मुंग्या, ओल्या पिंपात मेलेले उंदीर अशा अपरिचित प्रतिमा वापरल्या.

६) संज्ञाप्रवाह आणि माणसांच्या सुप्त-अर्धसुप्त मनोवस्थांचे चित्रण या कवितेने केले.

७) ही कविता काही अंशी अनाकलनीय होती म्हणून तिला दुर्बोध कविता असे म्हटले गेल.

८) बा.सी.मर्ढेकर हे या प्रकारच्या कवितेचे पाहिले उद्गाते होते.

बा.सी.मर्ढेकर

मर्ढेकरांनी जी मराठी कविता लिहिली ती केशवसुतांपासून जो प्रवाह काव्यजाणिवा घेऊन वाहत होता त्याला खंडित करणारी होती. त्यांची कविता एका नव्या काव्यविश्वाचा प्रारंभ करणारी म्हणूनच नवयुगाची कविता होती. भारतीय जनतेने स्वातंत्र्यपूर्व काळापासून जपलेला आशावाद, समतेचे आणि विश्वबंधुत्वाचे स्वप्न या साऱ्यांचे स्वातंत्र्यप्राप्ती नंतर झालेले विरूपीकरण यामुळे आलेली परात्मता, उदासीनता, स्वप्नभंगाची जाणीव आणि श्रद्धाहिनता या कवितेतून व्यक्त झाली. या अर्थाने ही कविता भारतीय कविता होती. 'शिशिरागम' (१९३८), 'काही कविता' (१९४७), 'आणखी काही कविता' (१९५१) ह्या कवितासंग्रहात त्यांची कविता समाविष्ट आहे.

शिशिरागम : या काव्यसंग्रहात त्यांच्या स्वप्नाळू भावविश्वाची जाणीव प्रकटली आहे. या संग्रहातील कवितेत त्यांचे सौंदर्यासक्त मन दिसते. केवळ वीस कविता या संग्रहात आहेत. या कवितांवर बालकवी, गोविंदाग्रज, माधव ज्युलियन यांच्या कवितेचा प्रभाव जाणवतो. या संग्रहातल्या कविता म्हणजे असफल प्रेमाच्या कविता आहेत. प्रियकर आपल्या प्रेमभावना प्रेयसीला उत्कटपणे कथन करतो आहे. मात्र प्रेयसी त्याच्या प्रेमाची स्वीकार करीत नाही, अशी कथनशैली येथे दिसते. या संग्रहाचा प्रारंभ आणि शेवट शिशिरागम या कवितेने होतो. मर्ढेकरांचे भावूक, सौंदर्यशील मन या संग्रहात प्रकटले आहे.

काही कविता : या संग्रहापासून मर्ढेकरांची वरील नवकाव्याचा वैशिष्ट्यांनी युक्त असलेली कविता प्रखर रूप घेऊन आली. प्रेमाचे महायुद्धाच्या परिणामामुळे हताश झालेले कवीमन येथे वास्तवाला प्रखरपणे भिडताना दिसते. प्रेमाचे लव्हाळे, 'पिपात मेले ओल्या उंदीर', 'फलाटदादा', 'न्हालेल्या जणू गर्भवतीच्या', 'दणकट दंडस्नायू जैसे', 'हाडाचे सापळे', 'त्रुटीत जीवनी सुटी कल्पना', 'पंक्चरली जरि रात्र दिव्यांनी' इत्यादी या संग्रहातील कविता मर्ढेकरांच्या कवितेचा गाभाच ठरतात. 'प्रेमाचे लव्हाळे', 'सौंदर्य नव्हाळे शोधू' / 'आसपास मुडद्यांची रास' किंवा 'पृथ्वीची तिरडी' (एरव्ही परडी फुलांनी भरली) 'जळो देवा भली अशी विदारकता' ते व्यक्त करतात. या संग्रहात भांडवलशाहीचे अपयश, विज्ञानावरची निष्ठा, बुद्धिवंतांची निष्क्रियता, शोषितपीडितांविषयीची सहानुभूती आणि समकालीन वास्तवातील विरूपता अशी आशयसूत्रे आली आहेत. नव्या अर्थवाही प्रतिमा आणि भाषचे अपारंपरिक उपयोजन यामुळे ही कविता नवकविता ठरली. 'माझा अभंग माझी ओवी नतद्रष्ठ गाथा गोवी', 'इंजिनावीण गाडी जेवी', 'घरंगळे'. अशा ओळीतूनच त्यांच्या काव्यजाणिवांचा प्रत्यय येतो.

आणखी काही कविता या कवितासंग्रहात मर्ढेकरांच्या काव्यजाणिवा अध्यात्मिक जाणिवांकडे झेपावताना दिसतात. ही कविता अधिक चिंतनशील झालेली दिसते. 'भंगु दे काठिण्य माझे', या 'गंगेमधि गगन वितळले' या त्यांच्या कविता याला साक्षिभूत म्हणता येतील. आधीच्या संग्रहातील कवितांमधून ज्या आक्रमकतेचा, विस्कटलेपणाचा अनुभव ते येथे मांडतना दिसत नाहीत. 'भंगु दे काठिण्य माझे' / 'आम्ल जाऊदे मनीचे', / 'येऊ दे वाणीत माझ्या' / 'सूर तुझ्या आवडीचे असे आर्त' उद्‌गार कवितेत काढताना दिसतात. मर्ढेकरांची दुसऱ्या दोन संग्रहातील कविता मराठी काव्यप्रवाहाला नवे चैतन्यदायी प्रवाहित्व देणारी ठरली. या कवितेने अनोखे प्रतिमाविश्व आणि शब्दविश्व साकार केले. हे खरेच होते. मात्र ही कविता खेडयांच्या जीवनवास्तवापासून दूर होती. या अर्थाने ती महानगरी कविता होती.

"मर्ढेकरांच्या कवितेचा आशय विदारक होता. यंत्रयुग, विज्ञान आणि दोन महायुद्धांनी उद्‌ध्वस्त केलल्या विश्वाच्या पार्श्वभूमीवर तो अर्थशून्यतेचा प्रत्यय प्रकट करीत होता. त्यामागे वैश्विक जाणीव होती. दोन अर्थाने तिला विशिष्ट देशाच्या वा राष्ट्राच्या सीमा नव्हत्या. आजच्या युगाचा, आजच्या जगाचा आशय त्या जाणिवेत भरलेला होता. दुसरी गोष्ट ती जाणीव केवळ मानवकेंद्री नव्हती मानव आणि विश्वाच्या भव्य संदर्भातून ती अध्यात्मकेंद्री बनली होती. आजच्या जगाचा ताण, अंतर्विरोध, दुभंगलेपण तिच्यात सामावलेले होते." मर्ढेकरांच्या कवितेविषयीचा रमेश तेंडुलकरांचा हा अभिप्राय येथे रास्त वाटतो.

शरदच्चंद्र मुक्तिबोध

मुक्तिबोधांची कविता 'नवी मळवाट' (१९४९) आणि 'यात्रिक' (१९६४) या दोन कवितासंग्रहातून रसिकांपुढे आली. मुक्तिबोध हे मार्क्सवादी जाणिवेचे कवी होत. साम्यवादावर त्यांची अविचल निष्ठा होती याचे प्रत्यंतर त्यांच्या कवितेतून येते.

'माझी सर्वावरी प्रीत, माझा सर्वावरी लोभ
परि तो ना बांधु शके अशा जीवनाचा क्षोभ
जीवनाचा क्षोभ करी धरित्री आकांत
पाषाणाशी निर्झराची झुंज अविश्रांत' (नवी मळवाट)

अशा व्यापक मानुषतेचे आणि गतिशील संघर्षाचे चित्र त्यांनी आपल्या कवितेतून रेखाटले. 'नवी मळवाट', 'रूधिराच्या लाल सड्यातच', 'भविष्याच्या गर्भातल्या बाळाचे रूदन', 'त्रिशंकूचे स्वप्न', 'जीवाची प्रचंड फेक', 'मी परदेशी पांथ' ह्या त्यांच्या काही लक्षणीय कविता होत. नव्या, अफाट क्षितिजांचा शोध घेण्याची कवीची वृत्ती येथे दिसते. भूक, उपासमार या विषयीच्या घटनांनी त्यांचे मन उद्‌विग्न होते. मुक्तिबोधांचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोण कमालीचा आशावादी असलेला दिसतो.

यात्रिक - यात्रिक हा मुक्तिबोधांचा दुसरा कवितासंग्रह माणसांच्या श्रमाचे कौतुक करणारा आहे. माणसाने आपले हळवे दुबळेपण सोडले पाहिजे असा संदेश ते या कवितेतून देतात.

विंदा करंदीकर (गोविंद विनायक करंदीकर) :

गांधीवाद आणि मार्क्सवाद अशा देशी आणि पाश्चात्य विचारधारांचा संयोग आपल्या कवितेतून घडवू पाहणारा व्यापक जाणिवेचा मानवतावादी कवी म्हणून करंदीकरांचे नाव घ्यावे लागते. १९६० पर्यंत विंदा करंदीकरांचे 'स्वेदगंगा' (१९४९), 'मृद्‌गंध' (१९५४), 'धृपद' (१९५९) असे तीन कवितासंग्रह प्रसिद्ध झालेले दिसतात.

स्वेदगंगा : हा करंदीकरांचा पहिला कवितासंग्रह. या संग्रहातील रक्तसमाधी ही शारीरसंवेदनेचे अनुभव उत्कटपणे मांडणारी कविता सोडल्यास बाकी कविता सामाजिक, मानवतावादी परिप्रेक्षातून लिहिलेल्या कविता आहेत. मानवतेचा आणि स्वातंत्र्याचा उद्‌घोष ही कविता करते. साम्यवादी तत्त्वज्ञानावर त्यांची श्रद्धा बसल्यामुळे सामाजाच्या पारंपरिक रूढीकल्पनांना त्यांनी झोडपून काढले. त्यामुळे ही कविता वक्तृत्वपूर्ण आणि अभिनिवेशी झाली. 'स्वेदगंगा', 'जगण्यामध्ये ब्रह्मानंद', 'मृत्यूलाही लाज आहे', 'कालीचे संदेश', 'सरोज नवा नगरवाली', 'ध्वजगीत' इत्यादी कविता लक्षणीय आहेत. 'सगळे मिळून सगळ्यांसाठी मरण्यातही मौज आहे / सगळे मिळून सगळ्यांसाठी जगण्यामध्ये ब्रह्मानंद' अशा समर्पणशीलतेचे आणि समूहभावनेचे चित्र करंदीकरांनी रेखाटले.

मृद्‌गंध : या दुसऱ्या संग्रहात करंदीकरांची कविता व्यापक, क्रांतीकारी जीवनाशय व्यक्त करताना दिसते. सामाजिक चिंतनाची सखोलता या संग्रहातून प्रकट झाली. मर्ढेकरांच्या कवितेचा परिचय करंदीकरांना झाला, त्यामुळे त्यांच्या जाणिवा अधिकच समृद्ध होत गेल्या. मानवतेवरच्या अविचल श्रद्धेमुळे त्यांचे अनुकरण न करता साम्यवाद आणि विज्ञान याविषयीच्या अनुभवांना त्यांनी आपल्या कवितेत अग्रक्रम दिलेला दिसतो. 'माझ्यामना बन दगड', 'ती जनता अमर आहे', 'तेच ते', 'दातापासून दातांकडे', 'कावेरी डोंगरे', 'धोंड्या न्हावी' अशा कितीतरी कविता करंदीकरांच्या चिंतनशील मनाचे दर्शन घडवितात. भारतीय जीवनमूल्यांनी संस्कारित झालेले त्यांचे मन या कवितांतून प्रकट झाले. मात्र घातक आणि मूलतत्त्ववादी प्रवृत्तींवर तितकेच कठोर प्रहार करून करंदीकरांनी आपली जीवनदृष्टी व्यक्त केली. या संग्रहात काही प्रेमानुभवाच्या कविता सुद्धा त्यांनी लिहिलेल्या दिसतात. परंतु ती जनता अमर आहे. या कवितेत त्यांनी आपल्या समग्र जीवनदृष्टीचा भेदक आविष्कार केला आहे. मातीतल्या माणसांन मातीतच कुजावे लागते. पोलादी कणा घेऊन ताठ उभे असलेले सुद्धा जीवनाच्या ॲसिडात विरघळून

जातात. जानवी घातलेली मानवी गिधाडे, विधवेच्या केसांचा विटाळ मानणारा भटाळ समाज न्हाव्याच्या एकांतातून जन्मलेले विधवा लेकीबाळींचे गोपाळकृष्णासारखे मूल भेंड्यातील डोहात फेकतो, कित्येक औरतोंके प्राण पडद्यात गुदमरतात. शोषकांच्या स्खलानाचे हे राक्षसी रूप करंदीकरांच्या एकूणच जीवनदृष्टीचे प्रत्यंतर देणारे आहे.

धृपद : या तीसऱ्या कवितासंग्रहातही करंदीकर आशय आणि रूपाचे प्रयोग करताना दिसतात. देणाऱ्याने देत जावे घेणाऱ्याने घेत जावे ही व्यापक जाणीव ते याच संग्रहात व्यक्त करतात. 'आकाशाचे वजन भयंकर', 'विज्ञानाचा द्रोह', 'चिंधी', 'उगाच गळते थोडे पाणी' या त्यांच्या कविता लक्षणीय आहे.

थोडक्यात मानवता, विज्ञाननिष्ठा, साम्यवादावरचा विश्वास, पीडितांविषयीचे प्रेम आणि प्रयोगवादी दृष्टी यामुळे मराठी काव्यविश्वात करंदीकरांची कविता आपली ठळक मुद्रा उमटवताना दिसते.

वसंत बापट (विश्वनाथ वामन बापट)

वसंत बापट यांनी राजकीय आणि सामाजिक भानाची कविता लिहिली. 'बिजली' (१९५२), 'सेतु' (१९५७) हे त्यांचे दोन संग्रह या काळात प्रसिद्ध झालेले दिसतात. प्रेमानुभुती हा बापटांच्या कवितेचा गाभा आहे. मात्र महात्मा गांधीच्या व्यक्तिमत्वाने आलेले भारलेपण, राष्ट्रसेवादलाचे संस्कार यामुळे त्यांची कविता भावपूर्ण तितकीच परिवर्तनासाठी जहाल रूप धारण करणारी झाली आहे. मराठी मनाला मोहित करेल अशी लावणीसदृश्य लयबद्ध रचनाही त्यांनी केली आहे. त्यामधून शृंगारपूर्ण कविता साकार केली. शतकानंतर, 'झेलमचे अश्रू', 'गांधी मंदिर', 'केवळ माझा सह्यकडा', अशा अनेक रचनांतून बापटांनी भावपूर्ण कविता रसिकांपुढे आणली. नादमयाता, खटकेबाज संवाद शृंगारिकरता हे त्यांच्या काव्याचे ठळक विशेष होत. कवितेच्या सादरीकरणाच्या प्रयोगातून कविता रसिकाभिमुख करण्यात करंदीकर, पाडगावकर यांच्या बरोबर वसंत बापटाचे मौलिक असे योगदान आहे.

मंगेश पाडगावकर

मंगेश पाडगावकर हे मूलतः सौंदर्यवादी जाणिवेचे कवी होत. त्यांचा 'धारानृत्य' हा पहिला कवितासंग्रह होय. त्यांचे या काळात केवळ तीन कवितासंग्रह आले. 'धारानृत्य' (१९५०), 'जिप्सी' (१९५२) आणि 'छोरी' (१९५४) या तीन संग्रहातून पाडगावकरांच्या अत्यंत संवेदनशील, हळूवार मनाचे दर्शन घडते. आत्मनिष्ठता, निसर्गसंवेदनाची रेलचेल, भावूकता, सौंदर्यासक्ती, प्रेमनिष्ठा, संवादीशैली असे सौंदर्यवादाचे सारे विशेष पाडगावकरांच्या कवितेत दिसतात.

धारानृत्य : धारानृत्य या काव्यसंग्रहावर बोरकर आणि कुसुमाग्रज यांच्या कवितेचा दाट प्रभाव असलेला दिसतो. त्यामुळे निसर्गसंवेदनांबरोबर ही कविता दु:खीतांविषयी कळवळा व्यक्त करणारी कविता आहे. अश्रू, माती, जीवन हे त्यांच्या कवितांचे विषय राहिले. 'धारानृत्य मधील कविता वाचून कवीच्या कल्पनासामर्थ्याबद्दल त्यांच्या शब्दप्रभूत्वाबद्दल त्यांच्या चोखंदळ सौंदर्यदृष्टीबद्दल आणि जीवनातील श्रेष्ठ मूल्यांवरील त्यांच्या प्रबळ श्रद्धेबद्दल जरी रसिकांना उदंड कौतुक वाटले तरी... त्यात खऱ्याखुऱ्या व्यक्तित्वाच्या प्रकटीकरणातून अवतरणारी अभिनवता अद्याप यायची होती. आपले स्वत:चे असे कल्पनाविश्व अद्याप कवीच्या प्रतिभेला सापडावयाचे होते.' हा वा.ल.कुलकर्णी यांचा अभिप्राय या संग्रहाच्या बाबतीत रास्त वाटतो.

जिप्सी - पाडगावकरांच्या काव्याला खरा बहर 'जिप्सी' या काव्यसंग्रहापासून आला. या संग्रहातील बहुतांश कविता ही विशुद्ध प्रेमकविता आहे. प्रेमभावनेच्या विविध विभ्रमांचे दर्शन त्यांनी या कवितेत घडविले आहे. या अभिव्यक्तीत ओढ आणि उत्कटता आहे. निसर्गाशी आणि प्रेयसीशी साधलेला भावपूर्ण संवाद आहे. शारीर अनुभव आणि भावानुभवाचे संयोगचित्र येथे पाहावयास मिळते. जवळपणाचे झाले बंधन, 'गहन तुझ्या डोळ्यात', 'तुझी निराळीच तऱ्हा', 'सुंदर आहे माझी वासना' इत्यादी कवितांतून कवीने प्रेमानुभुतीचे चित्र रेखाटले आहे. 'दु:खी जीवन कळावे इतुकी न विकसली प्रीती' / 'तुझ्या संगतीत वाटे मला माझ्या वेदनांची भीती' असे अविकसित प्रेमाचे अनुभवही पाडगावकर सहज व्यक्त करतात.

जिप्सी म्हणजेच कलंदर मनाचे दर्शन घडवितानाच आपल्या आंतरिक विश्वात दडून असलेल्या विचारानुभवांचे प्रकटन त्यांनी केले आहे. मात्र हे विचार निसर्गसंवेदनांच्या वेष्ठनातूनच वेढून येतात. गंधातून गूढ उकलते अशी ही अनुभूती आहे. खंत, विषाद, दु:ख, साक्षात्कार, अहंता, दडपण, दूरता, एकटेपणा, शांतता, असे कितीतरी मूडस या कवितेत दिसतात. त्यामुळे निखळ भावकवितेची सारी वैशिष्ट्ये या कवितेला प्राप्त झाली आहेत.

छोरी - 'छोरी' या नंतरच्या काव्यसंग्रहात पाडगावकर उपरोध, उपहास आणि आवेशी वक्तृत्वाचा बाज कवितेला देताना दिसतात. पाडगावकरांच्या कवितेचा विलास म्हणजे एका भावजीवी व सौंदर्यजीवी मनाचा आविष्कार आहे. हा अभिप्रायही समर्पक ठरतो.

निसर्ग संवेदना आणि नाजूक प्रेमभावना यांचा गहिरा अनुभव पाडगावकरांच्या कवितेने दिला. मराठी कविता अर्थसुलभ केली आणि बापट आणि करंदीकरांसह कवितेला रसिकांभिमुख करण्यासाठी मोठे योगदान दिले.

सदानंद रेगे

साठोत्तरी काळात आपल्या अनोख्या, तिरकस अभिव्यक्तीने सर्वपरिचित झालेले सदानंद रेगे यांचे साठपूर्व काळात केवळ दोन संग्रह प्रसिद्ध झालेले दिसतात. 'अक्षरवेल' (१९५७) आणि 'गंधर्व' (१९६०) या त्यांच्या प्रारंभीच्या काव्यसंग्रहात त्यांच्या नंतरच्या विकासाची सुस्पष्ट चिन्हे उमटली आहेत. रेगे यांचे काव्यविश्व विलक्षण अशा अनुभवांचा प्रत्यय देते. मानवी जीवनातील दु:ख, निरर्थकता, परंपराशरणता आणि विसंगती याकडे रेगे यांनी तिरकसपणे पाहिले आणि आपली कविता साकार केली. आशयाची समृद्धता आणि सूक्ष्मता ही रेग्यांच्या काव्याची वैशिष्ट्ये आहेत. पाश्चात्य आणि पौराणिक संदर्भामुळे त्यांच्या कवितेला अर्थसमृद्धता प्राप्त झालेली दिसते.

अक्षरवेल - या संग्रहात एकूण ७१ कविता असून अभिव्यक्ती अतिशय तिरकस आहे. विदुषकी जाणिवेतून सामाजिक वास्तवाकडे पाहणे हे रेग्यांच्या प्रतिभेचे मूलभूत लक्षण आहे. त्याचबरोबर ते पाश्चात्य साहित्य आणि संस्कृतीमधील प्रतीक प्रतिमा आपल्या काव्याच्या आशयघनतेसाठी योजतात. या त्यांच्या काव्यवैशिष्ट्यांचा प्रत्यय अक्षरवेल मधूनही येतो. उन्हाची पक्षी, ज्युडास, आकाशाची जखम अशा अनेक कविता लक्षणीय आहेत.

गंधर्व - ह्या संग्रहातही रेग्यांच्या प्रतिभेचा विकास सहज प्रत्ययाला येतो. वास्तवांची विपरित जाणीव त्यांच्या कवितेतून सहज प्रत्ययाला येते. निरर्थकता, चैतन्यशून्यता हे भाव त्यांनी या संग्रहातही व्यक्त केलेले दिसतात.

शिरीष पै

कस्तुरी : (१९५९) हा शिरीष पै यांचा कवितासंग्रह माता आणि मूल यांच्यातील प्रेमपूर्वक संवादांची गुंफण करणारा आहे. प्रेम, वात्सल्य यांतून केले जाणारे संस्कार असे या काव्यानुभवाचे स्वरूप आहे. एका पावसाळ्यात, एकतारी या संग्रहातील त्यांच्या कविताना चिंतनाचे रूप लाभले आहे. उत्कटता, ऋजुता, आणि अनुभवांचा स्वकेंद्रीपणा यामुळे शिरीष पै यांच्या कविता प्रभावी भावकविता म्हणून रसिकांना भावतात.

सारांश :

येथेपर्यंत आपण साठपूर्व काळातल्या कवितेचा काहीसा धावता आलेख मांडला. केशवसुतांच्या कवितेनंतर मर्ढेकरांची कविता हे एक नवे वळण आहे असे मानले तरी या काळात आधीच्या काळापेक्षा जाणिवांचे विस्तारलेपण आले आणि रूपाचे अनेक प्रयोग कवींनी केले. नवी प्रतिमासृष्टी घडवली गेली. हेही तितकेच खरे आहे. साठनंतर मराठी कविता अधिक व्यापक होऊ लागली. दलित आदिवासी

ग्रामीण अशा अनेककेंद्री अनुभविश्वाची कविता पुढे आली. नव्या बंडखोर, उग्र तरूणांची कविता लघुअनियतकालिकांच्या माध्यमातून आली आणि केशवसुत वा मर्ढेकर या सारख्या एका व्यक्तीच्या बंडखोरीपेक्षा साऱ्या समाजघटाकांच्या सामूहिक बंडखोरचा उद्घोष करणारी कविता समोर आली. अशी अनेक वळणे मराठी कविता आजवर घेत आली आणि पुढे अशीच वळणे अनुभवास येत राहतील. तूर्तास येथे थांबणे क्रमप्राप्त आहे.

स्व-अध्ययन :

१) रविकिरण मंडळाचे वाङ्मयीन कार्य स्पष्ट करा.
२) १९२०-१९६० या काळातील विंडबनकाव्याचा आढावा घ्या.
३) खंडकाव्याचे स्वरुप सांगून १९२०-१९६० या काळातील खंडकाव्याचा आढावा घ्या.
४) नवकाव्याचे विशेष सांगून मर्ढेकरांच्या काव्याची वैशिष्ट्ये थोडक्यात सांगा.
५) करंदीकर, बापट व पाडगावकर यांच्या काव्याचे विशेष सांगा.

संदर्भग्रंथ

१) प्रदक्षिणा, खंड १ ला व २ रा कॉटिनेन्टल प्रकाशन, आ. १ ली. १९९१.
२) मराठी वाङ्मयाचा इतिहास, (खंड सहा भाग दोन) काव्य, रमेश तेंडुलकर.
३) काही मराठी कविता : जाणिवा आणि शैली, रसाळ सुधीर, प्रतिमा प्रकाशन, आ.२री १९९६.
४) आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास, आ.ना.देशपांडे.
५) सुहृदगाथा, संपा. गंगाधर पाटील, कॉटिनेन्टल प्रकाशन, आ.२ री १९९४.
६) कवी अनिलांची साहित्यसृष्टी, संपा. प्राचार्य डॉ. पंडितराव पवार, प्रतिमा प्रकाशन, आ. १ ली २०००.
७) तीन अर्वाचीन कवी, स.त्र्यां. कुल्ली, लोकवाङ्मयगृह प्रकाशन आ. १ ली १९८९.
८) बोरकर काव्यसमीक्षा (१९३७ ते २००८) संपा.एस.एस.नाडकर्णी, कला व संस्कृती संचलनालय, गोवा, आ.१ली २०१०.
९) जिप्सी - मंगेश पाडगावकर, मौजप्रकाशन, आ.११ वी, १९९७.
१०) त्रिदल, संपा. डॉ.द.दि.पुंडे, स्नेहल तावरे, प्रतिमा प्रकाशन, पुणे.

❖❖❖❖

४

कथा (१८७४ ते १९२०)

डॉ. सुरेखा सबनीस

उद्दिष्टे

- इ.स. १८७४ ते १९२० या कालखंडातील कथेचा इतिहास समजून घेणे.
- समकालीन स्थितिगती व कथा यांचा अन्योन्य संबंध अभ्यासणे.

प्रास्ताविक:

वाङ्मयाचा इतिहासाचा अभ्यास करताना मराठी कथा - वाङ्मयाचा स्वतंत्रपणे विचार करणे आवश्यक ठरते. १८७४ ते १९२० असा वाङ्मयेतिहासाचा दृष्टीने कालखंडाचा एक विशिष्ट टप्पा अभ्यासासाठी निवडताना त्याची पार्श्वभूमी समजून घेणेही आवश्यक ठरते. यादृष्टीने मराठी कथेची नेमकी पार्श्वभूमी जाणून घेतली तर १८७४ ते १९२० या कालखंडातील कथा नेमक्या कोणत्या पायावर उभी राहिली आणि लघुकथा म्हणून तिचा विकास कसा कसा होत गेला याचे आकलन नेटकेपणाने होऊ शकते. १८७४ ते १९२० या कालखंडातील मराठी कथेची मुळे संस्कृत वाङ्मयात आहेत. प्राकृत वाङ्मयात आहेत, तसेच देशी परंपराही या लेखनामागे आहे. ही परंपरा प्राधान्याने मौखिक परंपरा आहे. कहाणी वाङ्मय, लोककथा, दैवतकथा, परीकथा, नीतिकथा, आध्यात्म निरूपण करणाऱ्या कथा या पार्श्वभूमीवर आधुनिक मराठी कथा उभी राहिलेली दिसून येते.परकीय भाषांतील कथांचे संस्कारही या कथेवर आहेत.

कथेची पार्श्वभूमी

लिखित मराठी कथेचा प्रारंभ १९ व्या शतकाचा सुरूवातीस झाला. संस्कृत, अरबी, फारसी आणि इंग्रजी कथांच्या भाषांतरांतून मराठी कथेला प्रेरणा मिळाली असे स्पष्टपणे दिसून येते. लिखित मराठी कथेची सुरूवातच भाषांतराने झाली. तंजावरच्या सर्फोजीराजे भोसले या मराठी राजाने १८०६ मध्ये 'बालबोध मुक्तावली' हा कथासंग्रह प्रसिद्ध केला. हे 'इसापनीती' चे भाषांतर होते. इंग्रजी कथा मराठीत येण्याचा हा प्रारंभ होता. त्यानंतरच्या काळात विल्यम कॅरी या ख्रिस्ती

धर्मोपदेशकाच्या प्रयत्नांतून संस्कृत भाषेतील कथाभांडार मराठी वाचकांसाठी खुले झाले. 'पंचतंत्र', 'हितोपदेश', 'वेताळपंचविशी', 'सिंहासनबत्तीशी', 'शुक्रबहात्तरी' यांची मराठी भाषांतरे झाली. धर्मप्रसाराच्या हेतूने फादर फेरार व मिसेस फेरार यांनी 'मुलांसाठी बोधाच्या गोष्टी' लिहिल्या. हा बायबलमधील कथांचा अनुवाद होता. 'बोधकथा - भाग १' ही स. का. छत्रे यांनी केलेला इंग्रजी कथांची भाषांतरे होती तर 'बोधकथा भाग २' मधील भाषांतरे बाळशास्त्री जांभेकर यांनी केली होती. 'बालमित्र - भाग १ व भाग - २' ही छत्रे यांनी केलेली फ्रेंच कथांची भाषांतरे होती. रघुनाथ नाना यांचे 'गोष्टी शतक' हे 'गोष्ट' या प्रकाराची जाण दाखवणारे पुस्तक होते. या सर्व भाषांतरांमधील उद्देश वाचकांना नीतिपाठाची शिकवण देणे हा होता.

या भाषांतरित कथा प्रारंभी बोधप्रधानतेचा दृष्टिकोन समोर ठेवून लिहिल्या जात होत्या. कालांतराने अशा भाषांतरांमागे मनोरंजनाचा हेतूही स्पष्ट दिसू लागला. कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनी १८६० मध्ये भाषांतरित केलेल्या 'अरबी भाषेतील सुरस आणि चमत्कारिक गोष्टी' मागील मुख्य उद्देश वाचकांचे मनोरंजन हाच होता. मनोरंजनापोटी भडक, उत्तान, शृंगारिक कथा भाषांतरित होण्याचे प्रकार यांनतर घडून आले. डॉ. रामजी गणोजी यांनी सिद्ध केलेला 'स्त्री - चरित्र' हा कथासंग्रह उत्तात शृंगारिक कथांवर आधारित होत्या. फारसी भाषेतील अशाच प्रकारच्या कथा 'गुलबकावली', 'गुल व सनोबर', 'बहारदानिष' यांचीही मराठी भाषांतरे झाली. शृंगारिकता आणि अद्‌भुतता यांची त्यांत रेलचेल होती. अशाच प्रकारच्या इंग्रजी कथांचीही भाषांतरे आणि रूपांतरे मराठीत आली. रावजी वासुदेव साठे यांनी बोकॅशिओ या कथाकाराच्या शृंगारिक कथांची रूपांतरे 'रसिक - प्रिया' या नावाने मराठीत आणली आणि ती लोकप्रिय झाली. ही सवंग लोकप्रियता होती असे मानले तरी कथावाचनाची सवय मराठी भाषक समाजाला याच काळात विशेषत्वाने लागली हे नजरेआड करता येत नाही. शिवाय अशा कथा समाजातील विसंगती आणि दांभिकता यांचे उपरोधिक दर्शनही घडवित होत्या आणि किमान सुजाण वाचकांपर्यंत तो उपरोध पोहोचत होता हे ही महत्त्वाचे आहे. मराठी साहित्याच्या दृष्टीने याच काळात दोन महत्त्वाच्या गोष्टी घडल्या. एक म्हणजे कथावाचनाची आवड निर्माण झाली. हा परिणाम वाचकनिष्ठ ठरला. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे भाषांतरे करण्यास प्रोत्साहन मिळत गेले. हा परिणाम लेखकनिष्ठ ठरला. या दोहोंचा एकत्रित विचार करता मराठी वाङ्‌मयाच्या क्षेत्रात 'कथा' या वाङ्‌मयप्रकाराच्या भविष्यातील भरभराटीचे हे सुतोवाच ठरले.

१८७४ च्या पूर्वकाळात नीतिकथा, दंतकथा, चातुर्यकथा असे स्वरूप असणारे 'चमत्कारिक गोष्टीं'चे आठ भाग पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाले. 'मनोवेचक गोष्टीं' चे चार संग्रह याच कालखंडात प्रकाशित झाले. याच काळात ऐतिहासिक कथाही लिहिल्या जाऊ लागल्या होत्या. मात्र त्यांचे स्वरूप 'आख्यायिका' पद्धतीचे होते. याला अपवाद लोकहितवादी यांच्या कथांचा. 'ताई तेलीण', 'रामशास्त्री',

'थोरले माधवराव' अशा बहुतेक पेशवेकालीन व्यक्तीविषयींच्या गुणदर्शन करणाऱ्या या छोट्या छोट्या गोष्टी होत्या. 'ऐतिहासिक कथांचा संग्रह' या नावाने या गोष्टी पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाल्या. 'कथा' या वाङ्मय प्रकाराची जाण नसली तरी त्या प्रकाराविषयी रूची निर्माण करण्याचे काम या काळात घडून आले. आणि त्या पार्श्वभूमीवर १८७४ ते १९२० या कालखंडाची कथा उभी राहिली.

१८७४ ते १९२० मधील कथेची पायाभरणी

१८७४ ते १९२० हा कालखंड मराठी वाङ्मयाच्या दृष्टीने फार महत्त्वाचा आहे. १८७४ हा विष्णुशास्त्री चिपळुणकरांच्या 'निबंधमालेंची सुरूवात झाली तो काळ' त्यापूर्वी एकच वर्ष आधी १८७३ मध्ये 'सत्यशोधक समाज' स्थापन झाला होता. १८७५ मध्ये आर्यसमाजाची मुंबईत शाखा उघडली गेली. १८८२ मध्ये संमतिवयाचे बिल मान्य झाले. स्त्रीशिक्षणाच्या दृष्टीने, स्त्री स्वातंत्र्याच्या दृष्टीने विशेष जनजागरण झाले ते याच कालखंडात हा काळ थोर विचारवंत आणि सुधारक यांनी महाराष्ट्राला जनजागृतीच्या उंबरठ्यावर आणून ठेवल्याचा काळ आहे. प्रबोधनाचा काळ आहे. वैचारिक जागृती, जाणीवांची समृद्धी, सांस्कृतिक पुनरूत्थानाकडील वाटचाल, भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील जनसामान्यांचा सहभाग या सर्वांचे प्रतिबिंब वाङ्मयात कसे आणि कितपत उमटले ते तपासून पाहण्याच्या दृष्टीनेही हा कालखंड लक्षणीय ठरतो. १९२० नंतर लोकमान्य टिळकांचा मृत्यूनंतर राजकीय चळवळीचे एक नवे पर्व सुरू झाले. याच सुमारास मराठीतील अनेक महत्त्वाचे लेखक, कवी मरण पावले.परिणामी समाजात एक पोकळी निर्माण झाली. वाङ्मयीन दृष्ट्या अवस्थांतर झाले. म्हणून मराठी वाङ्मयाच्या दृष्टीने १८७४ ते १९२० हा एक स्वतंत्र कालखंड मानून विचार केला जातो.

एकोणिसावे शतक आणि विसाव्या शतकाचा प्रारंभ हा महाराष्ट्रासाठी सर्वार्थाने वैचारिक समृद्धीचा काळ ठरतो. हाच कालखंड मराठी कथेसाठी हा महत्त्वाचा ठरला आहे. या कालखंडात जीवनाचा आणि वाङ्मयाचा संबंध पूर्वीच्या कोणत्याही कालखंडापेक्षा अतूट ठरला. या काळात सहेतुक वाङ्मयनिर्मिती होत गेली. मराठी कथालेखनही शिक्षण, उद्‌बोधन, धर्मप्रसार, रंजन अशा विविध हेतूंनी होत गेले. त्यासाठी भाषांतरे झाली. रूपांतरेही झाली आणि हळूहळू कथा स्वतंत्रही होत गेली. मात्र एक स्वतंत्र वाङ्मयप्रकार म्हणून कथेच्या रूपबंधाची जाण या काळातील कथेत दिसून येत नाही. 'सांगणे' आणि 'दाखवणे' अशा कथनाच्या दोन मुख्य पद्धती आहेत. यापैकी 'सांगणे' याच पद्धतीने या काळातील मराठी कथेमधील कथन होत राहिले. 'गोष्ट सांगणे' हाच या कथेचा मुख्य उद्देश राहिला. 'कथा' किंवा 'लघुकथा' या रूपबंधाची जाणीव मराठी साहित्यात रूजण्यास मोठा अवधी जावा लागला. तरीही उद्‌बोधन, विचारदर्शन, जाणीवजागृती किंवा केवळ रंजन अशा हेतूंनी या काळात लिहिली जाणारी कथा भविष्यातील मराठी कथेचा भक्कम पाया ठरली. हे निश्चित

नियतकालिके आणि मराठी कथा

१८७४ ते १९२० या मराठी कथेच्या प्रारंभिक वाटचालीत नियतकालिकांचा मोलाचा वाटा आहे. 'करमणूक' आणि 'मनोरंजन' या दोन नियतकालिकांचे महत्त्व तर विशेषच आहे. १८९० ते १९१० 'करमणूक कालखंड' आणि १९१० ते १९२० 'मनोरंजन कालखंड' या नावांनी हे दोन कालखंड ओळखले जातात. अर्थात 'करमणूक'पूर्व काळातच विविध नियतकालिकांनी कथेला स्थान दिले होते ते विचारात घेण्याजोगे आहे. 'ज्ञानोदय', 'ज्ञानप्रसारक', 'विविधज्ञान विस्तार', 'ज्ञानसंग्रह', 'स्त्रीज्ञान प्रदीप', 'अरण्यपंडित', 'निबंधचद्रिका', 'केरळकोकिळ' अशा नियतकालिकांचे १८५० ते १८९० या काळातील कार्य उल्लेखनीय आहे. या नियतकालिकांचा मुख्य उद्देश ज्ञानप्रसारण हा होता. मात्र कथेलाही त्यात स्थान होते. ह्या कथा अर्थातच बोध देणाऱ्या स्वरूपाच्या होत्या. ज्ञानप्रसारणाचे साधन हेच खरे त्या कथांचे विशेष रूप होते. कालांतराने त्यात रंजकतेचा विचार आला आणि सर्वसामान्यांचे चित्रणही झाले. १८५४ मध्ये 'ज्ञान प्रसारक' मध्ये प्रसिद्ध झालेली विष्णू घनश्याम यांची कथा पहिली स्वतंत्र कथा असल्याचे अभ्यासकांनी नमूद करून ठेवले आहे. 'निबंधचंद्रिका' (१८८३) या नियतकालिकात प्रसिद्ध झालेल्या 'प्रेक्षकाची गोष्ट' मध्ये सर्वसामान्यांचे वास्तव अनुभवकथन प्रथमच आलेले दिसून येते. 'केरळकोकिळ' हे त्याकाळातील विशेष लोकप्रिय असे नियतकालिक होते. १८८९ मध्ये या नियतकालिकातून साहसी, वीरपुरूषांच्या गोष्टी प्रसिद्ध होऊ लागल्या. प्रारंभी त्या इंग्लंड आणि अन्य युरोपीय देशांच्या इतिहासावर आधारित होत्या. मात्र १९०९ मधील अकांतून 'ऐतिहासिक कथामाला' सुरू झाली, त्या सदरात प्रसिद्ध झालेल्या गोष्टी एतद्देशीय इतिहासावर आधारित होत्या. 'मल्हारराव होळकर' यांची 'भिष्म प्रतिज्ञा', 'जयाजी शिंदे यांचा खून' इत्यादी कथांचा या संदर्भात उल्लेख करता येईल. बजाबा रामचंद प्रधान, एन् . जी. दामले हे त्यावेळचे विशेष लोकप्रिय कथाकार होते. त्यांचा भर प्रामुख्याने भाषांतरांवर होता. मराठी कथेच्या प्रारंभिक वाटचालीत या नियतकालिकांचे कार्य महत्त्वाचे ठरले आहे. 'करमणूक' पूर्व काळापासून अस्तित्वात असलेली 'केरळकोकिळ', 'निबंधचंद्रिका' ही व अशी अन्य काही नियतकालिके 'करमणूक कालखंड' आणि 'मनोरंजन कालखंड' या दोन्ही कालखंडात आपले कार्य करीत राहिली. एकूणच या सर्व नियतकालिकांनी मराठी कथेचा पाया रचण्यास, वाचकांच्या मनांत कथेची आवड रूजविण्यास, विविध लेखकांना कथालेखन करण्यासाठी प्रोत्साहन देण्यास आणि पुढे मराठी कथेची विकासाकडे वाटचाल सुरू होण्यास मोलाचा वाटा उचलला.

करमणूक - कालखंड

१८९० ते १९१० हा कालखंड मराठी कथेच्या दृष्टीने 'करमणूक - कालखंड' म्हणून ओळखला जातो. हरिभाऊ यांनी म्हणजे हरि नारायण आपटे यांनी

१८९० मध्ये 'करमणूक' नावाचे साप्ताहिक सुरू केले. त्यापूर्वी १८८५ पासून ते लिहित होतेच.आणि मराठी कथाही लिहिली जात होती. परंतु 'कथा' या वाङ्मयप्रकाराला विशेष मान्यता लाभलेली नव्हती. 'कादंबरी' हाच महत्त्वाचा ठरलेला आणि लोकप्रिय असणारा वाङ्मय प्रकार होता आणि ह. ना. आपटे मान्यवर कादंबरीकार म्हणून ओळखले जाऊ लागले होते. नियतकालिकांतून कथा छापल्या जात होत्या परंतु त्यांचे आकर्षणकेंद्र कादंबरीच होते. मात्र 'करमणूक' ने हे चित्र बदलले. लहानापासून थोरापर्यंत सर्व स्त्रीपुरूषांचे मनोरंजन करून ज्ञानदान देणारे पत्र हे 'करमणूक' चे ब्रीदवाक्य होते. त्यानुसार या साप्ताहिकाने मनोरंजनाचे व ज्ञानदानाचे कार्य समर्थपणे केले. ह्यात कादंबरीच्या बरोबरीनेच कथेचा वाटाही मोठा होता. १८९० ते १९१० या कालखंडावर 'करमणूक - कालखंड' अशी छाप उमटली.

'करमणूक' मधून प्रसिद्ध होणाऱ्या कथेमागील प्रयोजन 'ज्ञान व मनोरंजन' असे दुहेरी होते. 'करमणूक' मधील कथेचे स्वरूपही दोन प्रकारचे होते. एक म्हणजे 'दोनचार अंकात संपणाऱ्या चटकदार गोष्टी' आणि दुसरे म्हणजे 'आळीपाळीने दोन मोठाल्या गोष्टी'. 'दोन चार अकांत संपणाऱ्या' चटकदार गोष्टींना हरिभाऊंनी 'स्फुट गोष्टी' असे नाव दिले आणि त्याहीपेक्षा 'मोठाल्या गोष्टी' ते करमणूक मधून आळीपाळीने प्रसिद्ध करीत राहिले यावरून कथारूपाची हरिभाऊंना नेमकी जाण नव्हती हेच स्पष्ट होते. शिवाय ते 'करमणूक' मधून क्रमशः कादंबरी प्रसिद्ध करीत असत. कादंबरीलेखनात त्यांचा हातखंडा होता. त्यामुळेच कांदबरीचीच थोडी लहान आवृत्ती म्हणजे 'कथा' अशीच त्यांची समजूत असावी. 'कथा' या वाङ्मयप्रकाराकडे स्वतंत्र वाङ्मयप्रकार म्हणून पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन निश्चितच नव्हता. मात्र कथेविषयीची त्यांची आस्था अधिक मोलाची होती. हे ध्यानात घेणे आवश्यक आहे. वाचक आणि लेखक या दोन्ही स्तरांसाठी हरिभाऊंनी 'करमणूक' द्वारे केलेले कार्य म्हणूनच महत्त्वाचे ठरले. 'करमणूक'मुळे मराठी कथेला सर्व थरांतील वाचकवर्ग मिळाला. अनेक कथाकार 'करमणूक' मधून पुढे आले, नावारूपाला आले. कृष्णाजी गोखले, सहकारी कृष्ण ही त्यांपैकी काही ठळक नावे. विशेष म्हणजे हरिभाऊंनी स्त्रियांना लिहिते केले. काशीताई कानिटकर, आनंदीबाई शिर्के, लक्ष्मीतनया ही त्यांपैकी काही वैशिष्ट्यपूर्ण नावे. पुढे 'मनोरंजन' काळात त्यांच्या हातुन भरीव लेखन झाले. त्याखेरीज 'करमणूक' मधून 'हितेच्छु', 'एका मित्राकडून', 'राजारामीय' आदी टोपणनावांनी कथालेखन झालेले आढळते. परंतु त्यांकडे अपवाद म्हणूनच पाहता येते. 'करमणुकीतील बहुसंख्य गोष्टी खुद्द हरिभाऊंनीच लिहिल्या होत्या.'

हरिभाऊंची कथा

हरिभाऊंनी मराठी कथेच्या संदर्भात सर्वात महत्त्वाचे कार्य केले ते म्हणजे, कथेला अद्‌भुतरम्यतेपासून मोकळे केले. 'करमणूक' पूर्व काळातील कथा ही

मुख्यतः भाषांतरित होती. ही भाषांतरे सामान्य स्वरूपाची होती. नीतिबोध आणि कल्पनारम्यता यांचा अवाजवी पगडा त्या कथांवर होता. अतिरिक्त शृंगारिकता आणि भडक उत्तात वर्णने यांचीही त्यात भर पडली होती. हे दोष हरिभाऊंच्या कथेने दूर केले. उद्‌बोधन आणि रंजन या हेतूंना ढळ न पोहोचवता समाजजीवनाची खरीखुरी कथा त्यांनी वाचकांसमोर ठेवली. या कथेने प्राधान्याने मध्यमवर्गीय पांढरपेशा जीवनाचे यथार्थ चित्रण केले. 'सदाशिवपेठी कथा' म्हणून कालांतराने त्यावर उपहासात्मक शेरेबाजी झालेलेही दिसून येते. मात्र मर्यादित परिघातले का होईना सर्वसामान्य समाजजीवनाचे मार्मिक चित्रण हरिभाऊंच्या कथेनेच सर्वप्रथम केले हे विसरून चालणार नाही.

नीतिबोध हा त्या कथेचा महत्त्वाचा विशेष होता. हरिभाऊंनी कलात्मकतेपेक्षा नीतिबोधाकडे अधिक लक्ष पुरविल्याने रसदृष्ट्या त्यांच्या कथेची हानी झाली असे म्हटले जाते. 'सत्याचा व नीतीचा आनंद बोध' हा कोणत्याही कलेचा प्रधानहेतू असल्याचे हरिभाऊंचे मत होते. त्यामुळेच त्यांच्या कथेच्या बाबतीत असे घडले असावे. त्यांच्या कथा ह्या कथानक पसरटपणे मांडणाऱ्या, वर्णने पाल्हाळाने करणाऱ्या, निवेदनाचा ओघ न सांभाळणाऱ्या, घटना - प्रसंगांची अनावश्यक गर्दी असणाऱ्या, अतिरिक्त योगायोगांचा आधार घेणाऱ्या आणि पात्रांची ठरीव, सांकेतिक चित्रणे करणाऱ्या होत्या. या उणिवांची नोंद करणे आवश्यक असले तरी त्यामुळे कथाकार म्हणून हरिभाऊंनी केलेल्या कार्याला कोठेही बाधा येण्याची गरज नाही. स्वतःच्या समजुतीनुसार आणि कथेवरील निष्ठेने हरिभाऊंनी 'करमणूक' मधून ज्या 'स्फुटगोष्टी' लिहिल्या. त्यामुळे भविष्यातील मराठी कथेसाठी स्थिर पाया रचण्याचे फार महत्त्वाचे कार्य घडले हे निश्चित.

हरिभाऊ कथेकडे केवळ नीतिबोधाचे साधन म्हणूनच पाहात होते असेही नाही. वाङ्‌मयप्रकार म्हणून कथेकडे पाहण्याची नेमकी दृष्टी नसली तरी या वाङ्‌मयप्रकाराची दखल घेण्याची अतीव आस्था त्यांच्यापाशी होती. म्हणूनच त्यांनी त्यांच्या परीने कथालेखनात विविधता आणण्याचा प्रयत्नही केलेला दिसून येतो. 'काळ तर मोठा कठीण आला' सारख्या गंभीर आशयाच्या करूण कथा लिहिणाऱ्या हरिभाऊंनी त्याच तोलाने 'पुरी हौस फिटली' सारख्या विनोदी अंगाने जाणाऱ्या कथाही लिहिल्या. 'काळ तर मोठा कठीण आला' ही दीर्घकथा त्या काळाच्या तुलनेत वैशिष्ट्यपूर्ण ठरावी अशीच आहे. भीषण दुष्काळाचे आणि त्यात होरपळलेल्या माणसांचे करूणरम्य चित्रण हरिभाऊंनी मोठ्या ताकदीने रंगविले आहे. या कथेत आलेले ग्रामीण जीवन आणि त्याचे तपशील म्हणजे त्या काळाच्या संदर्भात मराठी कथेत दिसून आलेला लक्षणीय अपवाद म्हणता येतो. बोध आणि कला यांचा उत्तम तोल राखणारी कथा म्हणून जाणकारांनी या कथेची वेळोवेळी प्रशंसा केली आहे. 'दुर्गाताईची ओवाळणी' सारखी कथा सामाजिक सुधारणेचा स्पष्ट पुरस्कार करणारी ठरली. 'चिक्कणमामाचे वुईल' या कथेला हरिभाऊंनी रहस्या बरोबरीने विनोदाची

जोड दिली होती. शिवाय या कथेत पुनर्विवाहाचा उल्लेख, नर्सिंगचे शिक्षण घेणारी स्त्री असे समाजसुधारणेशी निगडित संदर्भही होते. 'गेलेला आनंद', 'तीन फुले' अशा रूपकात्मक कथा लिहिण्याचा प्रयत्नही हरिभाऊंनी केलेला दिसतो. उत्तम ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिणाऱ्या हरिभाऊंनी काही मोजक्या ऐतिहासिक कथाही लिहिल्या. 'मराठ्याचा शब्द', 'मानिनी', 'अद्‌भुतबैरागी' अशी काही नावे उदाहरणादाखल देता येतात. या कथा घटनाप्रधान स्वरूपाच्या आणि दंतकथांचा अतिरिक्त आधार घेणाऱ्या ठरल्या. ऐतिहासिक कादंबरीलेखनाचे हरिभाऊंचे सामर्थ्य ऐतिहासिक कथांत दिसून आले नाही.

'करमणूक' मधून हरिभाऊंनी दीर्घ पल्ल्याच्या ऐसपैस कथा लिहिल्या. 'सरस्वतीचा संसार', 'घटकेचा उतावीळपणा', 'उपकार फळास आला' अशांसारख्या कथांचा निर्देश घटनांची आणि पात्रांची अनावश्यक गर्दी असणाऱ्या, प्रदीर्घ - ऐसपैस पसरलेल्या कथा म्हणून करता येईल. काही कथांचा प्रदीर्घतेचा अतिरेक म्हणून विशेष उल्लेख करावा लागेल. १८९३ मधील 'शाबास रामभाऊ' ही कथा एकूण पाच प्रकरणात विभागलेली, 'करमणूक'च्या पाच वेगवेगळ्या अंकांतून क्रमशः प्रसिद्ध झालेली कथा होती. 'उपकारांची फेड रूपकारांनीच' या कथेची मांडणी अशीच क्रमशः सहा प्रकरणांतून झाली होती. 'दिवस असे होते' ही एक कथा स्वतंत्र पुस्तकरूपाने छापली गेली एवढा तिचा विस्तार दीर्घ ठरला.

कथा लिहिताना हरिभाऊंनी कादंबरीप्रमाणे छोटी छोटी उपकथानके गुंफली. रसाविष्काराकडे विशेष लक्ष पुरविले. पात्रांचे उत्तम स्वभावलेखन केले. व्यक्तिमनांची सूक्ष्म वर्णने करण्याचा प्रयत्न केला. कथा वाचनीय करणे याकडे हरिभाऊंचा विशेष कटाक्ष राहिला. शेवटपर्यंत रहस्य टिकवून वाचकांची उत्कंठा वाढविणे, कथेला कलाटणी देणे हे त्यांना उत्तम साधले. 'डिस्पेशिया', 'खाशीतोड', 'पक्की अद्दल घडली' सारख्या अनेक कथांतून स्वभावनिष्ठ व प्रसंगनिष्ठ विनोदाची मांडणीही त्यांनी कौशल्याने केली. बोधप्रदता, वास्तवता आणि भावोत्कटता हे हरिभाऊंचा कथेचे खास विशेष ठरले. या सर्व गोष्टींचा एकत्रितपणे विचार करता हरिभाऊंनी खऱ्या अर्थाने मराठी कथेची पायाभरणी केली असे म्हणता येते.

मनोरंजन कालखंड

'करमणूक' पाठोपाठ आलेले महत्त्वाचे नियतकालिक म्हणजे 'मनोरंजन'. 'करमणूक' कालखंडातच जानेवारी १८८५ मध्ये काशिनाथ रघुनाथ मित्र यांनी 'मनोरंजन' चा पहिला अंक काढला. 'मनोरंजन' हे मासिक होते. १९३५ पर्यंत हे मासिक चालले. त्यापैकी १९१० ते १९२३ हा कालखंड मराठी कथेच्या दृष्टीने 'मनोरंजन - कालखंड' म्हणून गाजला. 'मनोरंजनने जाणीवपूर्वक कथालेखनामध्ये बादल घडविण्याचा नवीन गोष्टी आणण्याचा प्रयत्न केला. मात्र कादंबरी वाङ्‌मयाचा पगडा मराठी वाचकांवर कायम होता त्यामुळे 'करमणूक' प्रमाणेच 'मनोरंजन'

मासिकातही प्रकरणशः गोष्ट लिहिण्याची प्रथा होतीच. प्रारंभी 'मनोरंजन' मधील कथेच्या विषयाचा परीघही मर्यादित होता. मध्यमवर्गीय समाज जीवनाची चित्रे रंगविली जात होती. पाल्हादिक वर्णने केली जात होती. स्त्रीशिक्षणाचा प्रश्न, हुंडा समस्या असे समाजसुधारणेच्या अंगाने जाणारे विषय कथानक म्हणून मांडले जात होते. त्यामागील हेतू स्तुल्य असला तरी ही प्रारंभीची कथा ठोकळेबाजपणे लिहिली जात होती. सत् आणि असत् प्रवृत्तींमधील संघर्ष आणि अखेरीस सत्प्रवृत्तीचा विजय असे कथानकाचे बेतलेले रूप सर्रास आढळत असे. 'सुवासिनी' या टोपण नावाने अशा तऱ्हेच्या कथा 'मनोरंजन' मासिकात लिहिल्या जात होत्या. 'करमणूक' मधून उदयाला आलेले सहकारी कृष्ण - कृष्णाजी अनंत एकबोटे ह्यांच्या कथा 'कुटुंब शिक्षणमाला' सदरात मनोरंजन मधून प्रसिद्ध झाल्या. मध्यमवर्गीय जीवनाचे चित्रण, त्यातील समस्यांचे दर्शन, उपदेशपरता, बोधप्रधानता असे या कथाचे स्वरूप होते. त्यातील लोकजागृतीचा उद्देश महत्त्वाचा होता. मात्र वर्णनांचे पाल्हाळ आणि गोष्टीत येणारी व्याख्याने यामुळे त्या कथा नीरस ठरल्या 'निष्काम कर्ममठ', 'पाश्चात्य सुधारणा', 'संसार की नरकवास' या आणि अशाच शीषर्कांवरूनही सहकारी कृष्णांच्या कथेचे स्वरूप व प्रयोजन कळून येते. एकूणच मनोरंजनमधील प्रारंभीच्या कथांवर हरिभाऊंच्या 'स्फुटगोष्टींची' छाप स्पष्टपणे दिसून येते. या कथा मध्यमवर्गीयांच्या सांसारिक सुखदुःखाच्या कथा आहेत. 'बिचारी गुलाब', 'भला डॉक्टर', 'चांडाळ राक्षसी सासू' ह्यांसारख्या कित्येक कथांतून दारूचे व्यसन, पुनर्विवाह, विधवांचा छळ आदी कौटुंबिक, सामाजिक समस्यांचे चित्रण झाले आहे. सुधारणावादी मतांचे सूचनही झालेले आढळते. अतिरिक्त पाल्हाळ आणि बोधप्रधानता हे दोषही ठळकपणे दिसून येतात.

'मनोरंजन' चे वेगळेपण

एकीकडे संसारचित्रे रंगविताना 'मनोरंजन' मधील कथेने प्रेमभावनेचे चित्रण करण्यास सुरूवात केली. हे चित्रण बाळबोध असले तरी विषयाचे नाविन्य शोधण्याची 'मनोरंजन' ची जमेची बाजू यामुळे स्पष्ट होते. 'रूसवा की प्रेम', 'वसंतलीला', 'अभिमान' यांसारख्या कथांचा उल्लेख यासंदर्भात करता येतो. भविष्यात लिहिल्या गेलेल्या वि. सी. गुर्जर आणि ना. सी. फडके ह्यांच्यासारख्या नामवंत कथाकारांच्या लोकप्रिय कथांचा पाया येथेच घातला गेला असे म्हटले जाते. 'आवडती ताई', 'अक्षय्य प्रेम' सारख्या प्रेमभंगाचे चित्रण करणाऱ्या कथाही 'मनोरंजन' मध्ये लिहिल्या गेल्या. विशेष म्हणजे खुद्द का. द. मित्र यांची 'मी चतुर्भुज कसा झालो' ही योगायोगावर आधारलेली वैशिष्ट्यपूर्ण प्रेमकथाही यात आढळते.

याच काळात 'मनोरंजन' मध्ये अधूनमधून विनोदी - कथा देखील आढळतात. १८९५ मध्ये प्रसिद्ध झालेली 'हिंमतबहादूर' ही मनोरंजनमधील पहिलीच विनोदी कथा स्वभावनिष्ठ विनोदाचा उत्तम नमुना आहे. मात्र इतर बहुतेक विनोदी

कथा प्रसंगनिष्ठ विनोद व अतिशयोक्तीवर आधारित असल्याचे आढळते. 'जावईबुवा' हे विशेषत्वाने विनोदाचा विषय ठरल्याचे दिसून येते. आणि त्यांची विनोदपूर्ण चित्रणे करताना समाजात रूढ असलेल्या लोककथांचा आधार घेतलेला दिसून येतो. अपवाद म्हणून काही उत्तम विनोदी कथांचा उल्लेख करण्यास जागा आहे. यामध्ये वा. गो. आपटे यांची 'पैसा मिळविण्याची पेटंट युक्ती' ही जाहिरात बाजीवर मार्मिक टीका करणारी कथा आहे. वा. म. जोशी यांची 'बायकांना उजव्या डोळ्याने दिसत नाही' ही उपरोधिक कथा आहे. वि. सी. गुर्जर यांच्या 'प्रेमाचे स्वरूप', 'दंडधारीचा प्रसाद', 'शोकक्षोभ' यांसारख्या निखळ विनोदी कथा आहेत. या कथा अभिजात विनोदाची उत्तम उदाहरणे मानल्या जातात.

विषयवैविध्याच्या दृष्टीने मनोरंजनने रहस्यकथा, चातुर्यकथा यांनाही स्थान दिले. या कथा बहुतांशी अनुवादित आहेत आणि गुप्त - पोलिसी चातुर्याच्या - डिटेक्टिव्ह - कथा आहेत. प्रख्यात इंग्लिश कथाकार ऑर्थर कॉनन् डायल यांच्या सुप्रसिद्ध 'शेरलॉक होम्स' ची भाषांतरे यात अधिक आहेत. 'लीला' या टोपणनावाने अशी अनेक भाषांतरे झालेली आढळतात. रहस्य आणि अद्‌भुतता ह्यांचा आविष्कार मनोरंजनमधील ऐतिहासिक आणि पौराणिक कथांतूनही आढळतो. गुर्जरांबरोबर 'मनोरंजन' च्या संपादनाचे काम पाहणाऱ्या ए. पां. रेंदाळकर ह्यांनी राजपुतांच्या इतिहासाची पार्श्वभूमी घेऊन बऱ्याच ऐतिहासिक कथा लिहिल्या. मात्र त्यांचे स्वरूप प्रामुख्याने प्रेमकथा असेच राहिले. त्यांच्या 'जोधाबाई', 'फुलजानी बेगम', 'महाराणा देविसिंग' अशांसारख्या कथा दंतकथांवर आधारित आहेत. ऐतिहासिक व रहस्यमय वातावरण उभे करण्यात त्या यशस्वी ठरल्या आहेत. पौराणिकतेचा संदर्भात 'मनोरंजन' मधून 'महर्षि रत्नमाला' गुंफली गेली. ह्या मालेत 'महर्षिनारद', 'महर्षि कश्यप', 'महर्षि वसिष्ठ' असा पद्धतीच्या कथा गुंफल्या गेल्या. त्यांचे स्वरूप ढोबळ, माहितीपट असेच राहिले.

'स्फुटगोष्टी' च्या वाटेने जात असता 'मनोरंजनांची कथा हळूहळू निराळेपणाही स्वीकारत गेली. कथारचना, निवेदन, काही प्रमाणात मनोविश्लेषण याबाबतीत हा निराळेपणा स्पष्ट होऊ लागला होता. पात्रांच्या भावानुभवांचे नेमके चित्रण करण्यासाठी प्रथमपुरूषी निवेदन पद्धतीचा वापर होऊ लागला. कृष्णाजी केशव गोखले यांची 'मंतरलेले पाणी' किंवा गिरिजाबाई केळकर यांची 'आमचा प्रवास' या कथा प्रथमपुरूषी निवेदनपद्धतीमुळे वैशिष्ट्यपूर्ण ठरल्या. पत्ररूपाने कथा लिहिण्याचे काही वैशिष्ट्यपूर्ण प्रयोगही त्या काळात झाले. सौ. जानकीबाई मराठे ह्यांची 'अभागी यमुना', वि. कृ. नेरूरकर ह्यांची 'मोटारीचा नंबर', वि. सी. गुर्जर ह्यांची 'सत्रा पत्रे', अशी काही पत्रात्मक कथेची यशस्वी उदाहरणे सांगता येतात. मराठी कथेच्या विकासाच्या दृष्टीने असे तुरळक आढळणारे प्रयोगही महत्त्वाचे मानणे इष्ट ठरेल.

'मनोरंजनं' चे विशेषांक

विशेषांक काढण्याची प्रथा 'मनोरंजन' ने सर्वप्रथम सुरू केली. या गोष्टीचा फार मोठा हातभार कथेची वाट समृद्ध करण्यास लागला. १९०९ मध्ये 'मनोरंजन' ने मराठी साहित्यविश्वातील पहिला 'दिवाळी अंक' काढला. तो सर्वार्थाने परिपूर्ण होताच. पण त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे त्याने निर्माण केलेली आणि आजतागायत चालत आलेली 'दिवाळी अंका' ची समृद्ध परंपरा एकूणच साहित्यविश्वात वैशिष्ट्यपूर्ण ठरली. विशेषत: कथेसाठी उपकारक ठरली. कथेच्या लोकप्रियतेचे ते एक हुकुमी व्यासपीठ ठरले हे सर्वज्ञात आहे. 'दिल्ली दरबार अंक', 'हरिभाऊ आपटे अंक', 'आगरकर अंक' इत्यादी खास अंक काढून मनोरंजनने 'विशेषांक' प्रथा महाराष्ट्रात रूजवली. या विशेषांकांच्या संपादनाच्या कामात वि.सी. गुर्जर आणि ए. पा. रेंदाळकर हे का. र. मित्रांना साहाय्य करू लागले. रेंदाळकरांमुळे कविता आणि गुर्जरांमुळे कथा या वाङ्मय प्रकारांच्या बाजू अधिक भक्कम झाल्या. 'मनोरंजन' चा १९०९ मधील दिवाळी अंक हा मराठी कथेच्या दृष्टीने महत्त्वाचा टप्पा मानला जातो. याच अंकापासून 'करमणुकी' तील 'स्फुटगोष्टी'चे संपूर्ण गोष्टीत्त रूपांतर झाले असे मानले जाते.

विशेष म्हणजे तोवर कथेवर कथालेखकाचे नाव देण्याची सर्रास प्रथा नव्हती. 'मनोरंजन' च्या या पहिल्या 'दिवाळी अंका' तील तिन्ही कथांवर कथाकारांची नावे आहेत. सौ. काशीबाई कानिटकर विमला आणि वामनसुता अशी ही नावे आहेत. ह्या दिवाळी अंकापूर्वी म्हणजे १८९५ ते १९०९ पर्यंत बहुतेक कथांवर लेखकांची नावे नाहीत. नावे आढळलीच तर ती टोपणनावे आहेत आणि तीदेखील स्त्रियांची नावे आहेत. यापैकी प्रत्यक्षात किती नावे खरोखरीच स्त्रीकथाकारांची आहेत आणि किती स्त्रीनावे पुरूषांनी धारण केली आहेत हे समजण्यास नाव नाही. सौ. शांताबाई, वामनसुता, लीला, सुवासिनी अशा टोपणनावांनी दिवाळ अंक - पूर्व कथा प्रसिद्ध झालेल्या आहेत. इतकेच काय पण १९०८ व १९०९ मध्ये 'मनोरंजन'मधील निवडक कथांचे 'दोन घटका मनोरंजन - भाग पहिला', 'दोन घटका मनोरंजन - भाग दुसरा', व 'संसाररंजन' असे कथासंग्रह प्रसिद्ध झाले, ह्या तिन्ही संग्रहातील कथांवर लेखकांची नावे नाहीत. कथाकाराला या काळात स्वतंत्र प्रतिष्ठा प्राप्त झाली नव्हती असा अर्थ यातून निघू शकतो. मात्र 'दिवाळी अंका' ने ही उणीव दूर केली. पुढे जून १९२० ला 'मनोरंजन' च्या रौप्यमहोत्सवी अंकांतील गोष्टींचा संग्रह 'दोन घटका मनोरंजन - भाग तिसरा' प्रसिद्ध झाला. त्यांत कथाकारांची नावे आहेत. मनोरंजनने पाडलेला हा चांगला पायंडा म्हणता येईल.

४.१० 'मनोरंजन' चे कथाकार

नव्या नव्या कथाकारांना प्रोत्साहन देण्याची प्रथा 'करमणूक' प्रमाणेच 'मनोरंजन' नेही राबवली. यातूनच मराठी वाङ्मय क्षेत्राला अनेक समर्थ कथाकार लाभले. 'करमणूक' मधून लेखन करणारे सहकारी कृष्ण 'मनोरंजन' मध्येही लिहीत होते. 'करमणूक' मधूनच कथालेखनाचा प्रारंभ करणारे कृष्णाजी केशव गोखले कथाकार म्हणून नावारूपाला आले ते 'मनोरंजन' मुळेच. वा. गो. आपटे, ना. के. बेहेरे, श्री. बा. रानडे, दर्भ, नारायण हरि आपटे, वाग्भट, गिरिजाबाई केळकर, नारायण देशपांडे, कॅप्टन गो. गं. लिमये, वि. सी. गुर्जर ही आणि अशी कितीतरी नावे सांगता येतात. ना. के. बेहेरे यांची 'कालमापन' ही कथा 'प्रयोगशील ठरणारी कथा होती', विनोदी ढंगाच्या कथा लिहिणाऱ्या कॅप्टन गो. गं. लिमये यांची 'मेकॅनो' ही कथा 'पुढील काळात प्रस्थापित होणाऱ्या नवकथेची सूचना होती.' किंवा 'श्री. ना. रानडे यांची 'तारेचे रहस्य' ही कथा मराठीतील पहिली विज्ञानकथा ठरते' असे अभिप्राय मराठी कथेच्या जाणकारांनी नोंदवले आहेत, 'मनोरंजन' ने मराठी कथेला काय दिले याच्या त्या महत्त्वपूर्ण खुणाच आहेत. गुर्जरांच्या 'संपूर्णगोष्टी' ने तर मराठी कथेच्या विकासात आणि लोकप्रियतेत कमालीची भर घातली.

मराठी कथेच्या विकासाचे असे कार्य १९१० पासून 'मनोरंजन' ने केले. 'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवता:' हे 'मनोरंजन' चे ब्रीदवाक्य होते. मासिकाच्या मलपृष्ठावर ते छापलेले असे. या ब्रीदवाक्याला 'मनोरंजन' मधील कथा पुरेपूर जागली. असे म्हटले जाते की 'करमणुकी' च्या काळात माजघरात असलेली स्त्री हळूहळू दिवाणखान्यात येऊ लागली ती 'मनोरंजन' च्या कथांमधून. सोशिक 'लक्ष्मीबाई' किंवा 'गंगाबाई' यांच्या जागी पुरूषांशी धिटाईने वादविवाद करू शकणाऱ्या सुशिक्षित 'कालिंदी' किंवा 'सुधा' सारख्या तरूणी 'मनोरंजन' च्या कथेचे विशेष ठरल्या. त्या काळच्या सुधारणावादी विचारसरणी आणि समाजाचा स्त्रीविषयक बदललेला - पुरोगामी दृष्टिकोन 'मनोरंजन' मधील कथा चित्रित करीत होती हे फार मोठे श्रेय मनोरंजन च्या गाठी बांधले गेले आहे.

स्त्री - कथाकार

प्रत्यक्षात खुद्द स्त्रीने पुढे येऊन स्वतंत्रपणे कथालेखन करण्याला 'मनोरंजन' ने मोठेच प्रोत्साहन दिले. मुळात हरिभाऊंनी 'करमणूक'द्वारे स्त्रीपुरूषांनी एकत्र येऊन वाचन करण्याचे दार खुले केलेच होते. महाराष्ट्रातील सुधारणावादी विचारसरचणीचा परिणाम म्हणून स्त्री मर्यादित प्रमाणात का होईना स्वतंत्रपणे विचार करू लागली होती. स्वत:ला किमान विशिष्ट मर्यादेत व्यक्त करण्याचा आत्मविश्वास तिला आला होता. सुशिक्षित स्त्रिया वाचन करू लागल्या होत्या. मुख्य म्हणजे कथावाचन करू लागल्या होत्या. त्यांपैकी काहीजणी लिहू लागल्या. त्यांची संख्या अत्यल्प असली आणि त्यांच्या कथाचे स्वरूप फारसे

गुणवत्तापूर्ण नसले तरी स्त्रियांनी कथालेखन करण्याचा आरंभकाळ म्हणून त्यांचे महत्त्व आहेच. 'करमणूक'चे हे कार्य 'मनोरंजन' ने समर्थपणे पुढे नेले. १९०९ च्या 'मनोरंजन' च्या पहिल्या दिवाळी अंकात पुरूषांच्या बरोबरीने स्त्रियांच्या लेखनाला स्थान मिळालेले दिसून येते. या अंकात एकूण अकरा स्त्रियांनी लिहिले आहे. १९१० च्या दिवाळी अंकात ही संख्या पंधरा आहे. तर १९१२ च्या दिवाळी अंकात 'स्त्रियांचे लेख' असा स्वतंत्र विभागच आढळतो. काशिनाथ रघुनाथ मित्र यांनी स्त्रियांना लेखनासाठी विशेषत्वाने कथालेखनासाठी जे उत्तेजन दिले त्यातून मराठी कथालेखिकांची एक परंपराच निर्माण झाली असे म्हटले जाते. काशिबाई कानिटकर, गिरिजाबाई केळकर, आनंदीबाई शिर्के, वामनसुता, काशिबाई देवश्वर, सौ. सावित्रीबाई कोरान्ने, सौ. ताराबाई तर्खड, लक्ष्मी, शिवतनया, सौ. यमुनाबाई अशी अनेक नावे आहेत. त्यापैंकी काहींच्या लेखनात पुढे सातत्य राहिले नाही. तरी काशिबाई कानिटकर, गिरिजाबाई केळकर, आनंदीबाई शिर्के, पुढे १९२० च्या नंतरही लिहित राहिल्या. अपवाद वगळता बहुतेक स्त्रियांच्या कथांचे स्वरूप बाळबोध राहिले. बोधप्रधानतेचा पगडा असणारे ठरले. सामाजिक प्रश्नांवर निबंधलेखन असेच काहीसे त्यांच्या कथांचे स्वरूप राहिले. त्याखेरीज हरिभाऊंच्या आणि गुर्जरांच्या कथांचे अनुकरण करण्याचा प्रयत्नही त्यात विशेषत्वाने दिसून आला. कसेही असले तरी स्त्रिया धिटाईने कथालेखन करू लागल्या हे महत्त्वाचे पाऊल ठरले आणि हे पाऊल उचलण्याला 'मनोरंजन' कालखंड पोषक ठरला हे महत्त्वाचे आहे.

काशिबाई कानिटकर १८९८ च्या 'विविधज्ञानविस्तार' मधूनच लिहू लागल्या होत्या. पुढे त्यांच्या काही मोजक्या कथा 'करमणूक' मधून प्रसिद्ध झाल्या. 'मनोरंजन' मधून त्यांनी भरीव कथालेखन केले. त्यांच्या कथेचे स्वरूप वैविध्यपूर्ण आहे. 'मारूतीचा प्रसाद' सारख्या व्यसनाचे दुष्परिणाम दाखवणाऱ्या बोधपर कथा त्यांनी लिहिल्या. 'लावण्यवती' सारख्या अद्‌भुतरम्य कथाही लिहिल्या. 'शिसवी पेटी' सारख्या कथेत त्यांनी प्रेमाचे आदर्शरूप चित्रित केले तर 'सारसबाग' सारख्या कथेत करूणरसाचे दर्शन घडविले. त्यांच्या कथांचे दोन संग्रह 'चांदण्यातल्या गप्पा' आणि 'शिळोप्याच्या गोष्टी' या नावांनी प्रसिद्ध झाले. गुंतागुंतीची आणि रहस्यप्रधान कथानके रचण्यावर त्यांचा भर दिसतो. बोधप्रधानता आणि निसर्गवर्णनपरता हे त्यांच्या कथेचे मुख्य विशेष दिसून येतात.

गिरिजाबाई केळकरांनी मनोरंजन कालखंडात कथालेखनाला प्रारंभ केला. त्यांच्या कथेचा विकास मात्र १९२० नंतर झाला. आनंदीबाई शिर्के त्यांच्या बाबतीतही हेच घडले. मात्र 'मनोरंजन' मधून प्रसिद्ध झालेल्या या दोन्ही कथालेखिकांच्या कथा वैशिष्ट्यपूर्ण होत्या. गिरिजाबाईंच्या कथांतून सामाजिक प्रश्नांची चर्चा मोठ्या प्रमाणावर झालेली आढळते. उपदेश आणि पाल्हाळही प्रकर्षाने दिसून येतात. त्यांची कथा स्त्रीच्या व्यक्तिमत्त्व विकासाचे प्रतिपादन करणारी आहे. त्यांच्या कथेने विवाह आणि संसार यांच्याविरोधात बंड करणाऱ्या स्त्रियांचा निषेध

केला आहे. 'समाजचित्रे' आणि 'केवळ विश्रांतीसाठी' असे त्यांच्या कथांचे दोन संग्रह प्रसिद्ध झाले. आनंदीबाईंच्या कथाही बोधपरच आहेत. मात्र गुंतागुंतीची कथानक रचना आणि रहस्यप्रधानता यांमुळे त्यांच्या कथा विशेष रंजक ठरल्या. 'गुप्तमंजूषा', 'प्रभावती', 'बेगम दिल आरा' ह्या आणि ह्यांसारख्या त्यांच्या अन्य कथा 'मनोरंजन' चे आकर्षण ठरल्या होत्या.

प्रत्येक अंकात किमान एक संपूर्ण गोष्ट देऊन मासिक 'मनोरंजन'ने वाचकाच्या मनात कथेविषयी निर्माण केलेली आवड, विविधता, रंजकता आणि कल्पकता साधून मराठी कथेची वाढविलेली गुणवत्ता, त्यासाठी परभाषेतील कथांच्या भाषांतरांच्या घेतलेला आश्रय, नव्यांना आणि नामवंतांना दिलेली लेखनाची संधी यांमुळे १९०९ पासून तो पुढे थेट १९२५ पर्यंत मराठी कथेचा अनेकांगी विकास 'मनोरंजन' मुळे झाला असे म्हणता येते. मनोरंजन संदर्भातील अत्यंत महत्त्वाचे नाव म्हणजे वि.सी. गुर्जर हे होय. 'मनोरंजन' साठी गुर्जरांनी भरभरून कथालेखन केले, एवढेच नाही तर या कालखंडातील अनेक कथाकारांनी गुर्जरांचेच अनुकरण केले. संपूर्ण 'मनोरंजन - कालखंड' गुर्जरांनी गाजवला आणि नंतरही दीर्घ काळ ते लिहित राहिले. या कालखंडाच्या अगदी अखेरच्या टप्प्यावर दिवाकर कृष्ण लिहू लागले. 'लघुकथा' हे रूप खऱ्या अर्थाने मराठी कथेला १९२२ सालच्या 'अंगणातील पोपट' या दिवाकर कृष्णांच्या कथेनेच प्राप्त करून दिले. मराठी कथेच्या क्षेत्रातील या दोघांचे योगदान खूप मोठे मात्र सातशेहून अधिक कथा लिहिणाऱ्या गुर्जरांचा 'द्राक्षाचे घोळ' हा एकमेव कथासंग्रह प्रसिद्ध व्हावा आणि विलक्षण प्रतिभेच्या दिवाकर कृष्णांनी अतिशय मोजक्या कथा लिहाव्यात हे दोन विचित्र योग म्हणता येतील. त्याचप्रमाणे 'मनोरंजन' मधील कथालेखनाचे दोन महत्त्वाचे टप्पे म्हणूनही या कथाकारांकडे पाहता येईल.

वि.सी. गुर्जर आणि संपूर्ण गोष्ट :

मराठी कथेच्या एकूणच इतिहासात वि. सी. गुर्जर हे नाव फार महत्त्वाचे आहे. विठ्ठल सीताराम गुर्जर हे त्यांचे संपूर्ण नाव. १८८५ मध्ये जन्मलेल्या गुर्जरांनी १९०८ पासून कथालेखन सुरू केले आणि आपल्या आयुष्याच्या अखेरपर्यंत म्हणजे १९६२ पर्यंत ते सातत्याने चालू ठेवले. त्यांनी पन्नास वर्षांहून अधिक काळ सातत्याने कथालेखन करणे आणि सातशेहून अधिक कथा लिहिणे हे त्यांचे कथालेखनाचे कार्य आवर्जून दखल घ्यावी असे आहे. परंतु मराठी कथेच्या इतिहासात गुर्जरांचे नाव सन्मानाने घेतले जाते ते केवळ सातत्य आणि संख्या ह्यांमुळे नव्हे तर गुर्जरांनी मराठी कथेला खरोखरीच काही तरी वेगळे, वैशिष्ट्यपूर्ण दिले म्हणून ते या क्षेत्रात मोठे ठरतात. गुर्जरांनी मराठी वाङ्मयाला 'संपूर्ण गोष्ट' दिली. हरिभाऊंच्या 'स्फूट गोष्टींनी मराठी कथेचा पाया घालण्याचे काम केले तर गुर्जरांच्या 'संपूर्ण गोष्टी' ने मराठी कथेचा विस्तार करण्याचे बहुमोल कार्य केले. मराठी कथेला नियतकालिकांत

स्वतंत्र, प्रतिष्ठेचे स्थान मिळून देणे, वाचकांच्या मनात कथेविषयी आवड निर्माण करणे, परभाषेतील्या कथाविश्वाचा मराठी वाङ्मयाला परिचय करून देणे, त्याद्वारे मराठी कथालेखनाच्या कक्षा विस्तारणे, नवनव्या लेखकांना कथा लिहिण्यास प्रोत्साहित करणे अशी भरीव कामगिरी वि. सी. गुर्जर यांनी बजावली, कथालेखनाच्या क्षेत्रात त्यांनी आपला प्रभावी ठसा उमटवला.

गुर्जर १९०८ पासून १९६२ पर्यंत सातत्याने कथालेखन करीत असले तरी त्यांचा विचार 'मनोरंजन - कालखंडातील' कथाकार म्हणूनच केला जातो. कारण त्यांच्या कथेची सर्व वैशिष्ट्ये १९१० ते १९२५ चा कालखंडातील कथालेखनातून स्पष्ट झाली आहेत. १९२५ नंतर त्यांच्या कथा मोठ्या संख्येने प्रसिद्ध झाल्या असल्या तरी त्यांत वेगळेपण किंवा नवेपण आले नाही. गुर्जरांच्या कथा महत्त्वाच्या सर्व नियतकालिकांतून प्रसिद्ध झाल्या. 'विविधवृत्त' या साप्ताहिकातून त्यांच्या सर्वाधिक म्हणजे दोनशे दहा कथा प्रसिद्ध झाल्या आहेत. त्या खालोखाल 'मनोरंजन' मासिकातून एकशे तेवीस कथा प्रसिद्ध झाल्या आहेत. 'मनोरंजन' साठी तर ते का. र. मित्रांना संपादन साहाय्यही करीत असत आणि 'मनोरंजन' मधील किंवा एकूणच 'मनोरंजन - कालखंडातील' कथेवर त्यांच्याच कथेची छाप पडलेली होती. 'मनोरंजन' मधून प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या कित्येक कथांवर त्यांचे नावही नाही. हा इतिहास आहे. त्यामागे संपादकीय जबाबदारीही असावी. परिणामी गुर्जरांच्या कथेचे मूल्यमापन नंतरच्या कालखंडात त्यांच्या 'द्राक्षाचे घोस' या एकमेव कथासंग्रहातील केवळ अकरा कथांच्या आधारे होत राहिले. यामुळेच त्यांच्या कथेची समीक्षकांकडून थोडी उपेक्षाही झाली असे दिसते. मात्र 'मनोरंजन' कालखंडावर उमटलेला त्यांच्या कथेचा ठसा मिटला नाही हे महत्त्वाचे आहे.

गुर्जरांनी स्वतंत्र आणि भाषांतरित अशा दोन्ही स्वरूपात कथालेखन केले. १९०८ सालच्या 'मनोरंजन' च्या अंकांतून त्यांच्या 'प्रेमाचा परिणाम', 'दंडधारीचा प्रसाद', 'चंद्रिका' आणि 'शोकक्षोभ' या चार कथा प्रसिद्ध झाल्या. या चारही कथांचे स्वरूप स्वतंत्र नसून परकीय कथांची ती रूपांतरे वाटतात. या चारही कथांतील व्यक्तिरेखा या परकीय वाङ्मयातून आल्याप्रमाणे वाटतात. पुढील काळात गुर्जरांनी अनेक परकीय कथांची भाषांतरे केली किंवा अनुवादस्वरूप अनुकरणे केली किंवा रूपांतरे केली. त्यामुळे मराठी वाचकांना वेगवेगळ्या, मोठ्या लेखकांचा परिचय झाला. नीतिबोध, उपदेश अशा पठडीबद्धतेतून किंवा अगदी प्रारंभीच्या भाषांतरित अशा कल्पनारम्य, चमत्कृतीपूर्ण कथालेखनातून मराठी कथा बाहेर पडली ती अशी मुख्यत: गुर्जरांच्या कथांमुळेच.

गुर्जरांचे अनुवाद कौशल्यही अशा कथांतून दिसून आले. मार्कट्वेन, डब्लू. डब्लू. जेकब ह्यांसारख्या इंग्रजी कथालेखकांचा त्यांच्यावर प्रभाव असावा असे म्हटले जाते. त्याकाळी इंग्लंडमधून 'स्ट्रँड', 'लंडन', 'पिअरसन' अशी मासिके

प्रसिद्ध होत. गुर्जरांवर त्या मासिकांतील कथांचाही प्रभाव असावा. त्याहून महत्त्वाचे म्हणजे त्यांना पडलेला प्रभातकुमार मुखर्जी या बंगाली कथालेखकाच्या कथांचा विलक्षण मोह. त्यांच्या कथा मूळ बांगला भाषेतून वाचता याव्यात म्हणून गुर्जरांनी बांगला भाषेचा अभ्यास केला. प्रभातकुमार मुखर्जींच्या अनेक कथांची रूपांतरे त्यांनी मराठीत केली. इतकेच नव्हे तर त्यांच्या कथानकाचे, शैलीचे अनुकरणही आपल्या लेखनातून केले. मराठी कथेचा साचेबंद तोंडवळाही यामुळे बदलला गेला.

रंजकता हा प्रभातकुमार मुखर्जी यांच्या कथेचा फार मोठा विशेष होता. त्यासाठी कथानकात रहस्यांची योजना केली जात असे व शेवटी कथेला अनपेक्षित कलाटणी दिली जात असे. गुर्जरांनी ह्या दोन्ही गोष्टी आत्मसात केल्या. प्रभातकुमार मुखर्जींचा गुर्जरांवर एवढा परिणाम झाला की त्यांच्या स्वतंत्र कथाही त्याच पद्धतीने लिहिल्या जाऊ लागल्या. 'कोण त्रेधा', 'दाभणकाळ', 'टॉनी' अशा अनेक कथा गुर्जरांनी अनुवाद किंवा रूपांतरे म्हणून लिहिल्या तर 'दागिन्यांचा डबा', 'लाजाळूचे झाड', 'टीकाकार', 'कळिकाळ', 'वनविहार' अशासारख्या अनेक स्वतंत्र कथा लिहिल्या. गुर्जरांच्या कथांची यादी खूपच मोठी आहे.

गुर्जरांच्या कथा अनुवादाच्या अंगाने जाऊन आशयदृष्ट्या वैविध्यपूर्ण झाल्या. रोचक ठरल्या असल्या तरी पाल्हाळाच्या बाबतीत त्या क्वचित हरिभाऊंच्या 'स्फूट गोष्टी' च्या पुढेच होत्या. वाचकांना आरंभापासून अखेरपर्यंत सर्व तपशील पुरवित गोष्ट सांगणे हा 'स्फूटगोष्टीं' चा विशेष गुर्जरांच्या 'संपूर्ण गोष्टीत' तरी प्रकर्षाने दिसून आला. हा त्या काळाचाही प्रभाव असेल पण वाचकांना गुर्जरांच्या अशा प्रदीर्घ 'संपूर्ण गोष्टी' आवडत असत. त्यांच्या समकालीन लेखकांनाही तेच अनुकरण करावे असे वाटत असे. गुर्जरांच्या अनेक कथा प्रकरणशः विभागलेल्या आहेत. 'दागिन्यांचा डबा' या कथेत आठ प्रकरणे आहेत. 'वनविहार' ही कथा पाच भागांत, तर 'लाजाळूचे झाड' ही कथा आठ भागांत विभागलेली आहे. थोडक्यात, रचनेच्या बाबतीत गुर्जरांची कथा हरिभाऊंच्या कथेपेक्षा वेगळी ठरली नाही.

गुर्जरांच्या कथेने वेगळे काय केले? मराठी कथेचा विकास कोणत्या अर्थाने केला? असे प्रश्न उपस्थित झाल्यास त्यांचे समाधानकारक उत्तर म्हणजे कादंबरीपेक्षा कथा हा निराळा वाङ्मयप्रकार आहे आणि तो कादंबरी इतकाच महत्त्वाचा आहे याची जाणीव वाचकांना सर्वप्रथम गुर्जरांच्या कथेने करून दिली. बोध व नीतितत्त्वाची भूमिका सोडून रंजनाची भूमिका स्वीकारली. त्यासाठी रहस्यप्रधान कथानके निवडली, त्यांची गुंतागुंतीची मांडणी केली, कथेच्या शेवटास अनपेक्षित कलाटणी देण्याचे तंत्र व भाषाशैली कथेला मिळवून दिली. मिश्किल भाषा, खेळकर विनोदी व चटपटीत संवाद, संवादचातुर्यातून प्रगट होणाऱ्या विविध विषयावरील चर्चा प्रसंगनिष्ठ विनोदाची उत्तम मांडणी हे गुर्जरांच्या कथेचे लक्षवेधी विशेष ठरले. स्वप्नरंजन आणि सुखवाद हेही गुर्जरांच्या कथेचे वेगळेपण ठरले. त्यांच्या बहुतेक

कथांमधील योगायोग आणि त्यातून साधणारी सर्व प्रश्नांची सोडवणूक, कथेचे सुखपर्यवसायी रूप त्या काळातील वाचकांना विशेष आवडले.

'द्राक्षाचे घोस' या आपल्या एकमेव कथासंग्रहात कथेविषयीची आपली भूमिका स्पष्ट करताना 'सौंदर्यरसनिर्मिती' व 'वाचकांचे सात्त्विक मनोरंजन' हे हेतू डोळ्यांसमोर ठेवून आपण कथालेखन करीत आल्याचे गुर्जरांनी नमूद केले आहे. थकल्याभागल्या मनाला काही क्षण आनंद देण्याचे कार्य आपल्या कथा करतात, असेही गुर्जरांनी म्हटले आहे. त्यांची ही भूमिका निश्चितच सफल झालेली आहे. 'मनोरंजन' - कालखंडात कथेत रंजकत्व आणून ती वाचकांपर्यंत पोहोचविण्याचे व कथेला स्वतंत्र वाङ्मयप्रकार म्हणून प्रतिष्ठा मिळवून देण्याचे मोठे कार्य गुर्जरांनी केले.

काही वेगळे कथालेखक :

श्रीपाद कृष्ण कोल्हटकर ह्यांनी 'मनोरंजन' कालखंडात कथालेखन केले आहे. वास्तविक त्यांचे नाव नाटककार, विनोदी लेखन करणारे सिद्धहस्त लेखक आणि वाङ्मयीन टीकाकार म्हणून प्रख्यात आहे. मात्र 'मनोरंजन' मध्ये त्यांनी मोजक्याच पण भावपूर्ण कथा लिहिल्या. 'गाणारे यंत्र', 'संपादिका', 'पति हाच स्त्रीचा अलंकार', 'गरीब बिचारे पाडस' अशा त्यांच्या काही कथांचा उल्लेख करावा लागेल. रहस्य आणि अतिरंजित प्रसंगांचे चित्रण हा कोल्हटकरांच्या नाटकांचा विशेष त्यांच्या कथांतूनही दिसून येतो. पाल्हाळ हा त्या काळाचा दोषपूर्ण विशेष कोल्हटकरांच्या कथेतही दिसून येतो.

वामन मल्हार जोशी हे तत्त्वचिंतक, कादंबरीकार म्हणून महाराष्ट्राच्या वाङ्मयीन इतिहासात सुपरिचित आहेत त्यांनी 'दोन स्वदेशींचा लढा', 'चारित्र्यक्रांती' अशा प्रदीर्घ कथा लिहिल्या. मात्र या दीर्घकथांपेक्षा त्यांच्या छोट्या कथा अधिक चांगल्या उतरल्या आहेत. त्यात विनोद आणि शैलीची वैशिष्ट्ये उमटली आहेत. 'बायकांना उजव्या डोळ्याने दिसत नाही', 'दुसरा एक शोध', 'नाटककार', 'नाव बदलीन', 'अप्रकाश किरणांचा दिव्य प्रकाश' अशा कथांत उपहास, उपरोध, विसंगती अशा विनोदाच्या अनेक छटा उत्तम उमटल्या आहेत. रचनेच्या दृष्टीने मात्र त्यांच्या कथा सामान्य आहेत, आणि तरीही त्या वाचनीय ठरल्या आहेत.

न. चि. केळकर हे अष्टपैलू लेखक होते. पत्रकार आणि चरित्रकार म्हणून ख्यातकीर्त होते. त्यांनी मोजक्याच आणि पाल्हाळिक अशा कथा लिहिल्या. मात्र मानवी स्वभावातील विसंगती टिपणारा विनोद व सूक्ष्म अवलोकन ह्यांमुळे त्या कथा वैशिष्ट्यपूर्ण ठरल्या. 'माझी आगगाडी कशी चुकली', 'गीताराव' आणि 'सामाजिक चालीरीतींचा फरक' एवढ्या तीनच कथा त्यांनी १९२० पर्यंत लिहिल्या. त्यानंतरच्या काळात त्यांनी अधिक कथा लिहिल्या.

शि. म. परांजपे, हे काळ कर्ते म्हणून ओळखले जातात. महाराष्ट्रातील श्रेष्ठ पत्रकार म्हणून ते ख्यातकीर्त आहेत. राजकीय मतप्रचाराचे साधन म्हणून त्यांनी 'कथा' या माध्यमाचाही आधार घेतला हे विशेष. त्यांच्या 'एक कारखाना', 'परशराम व पोपट', 'प्रभाकरपंतांचे विचार', 'एका यात्रेकरूचा प्रवास' इत्यादी कथांचा विचार करता निबंधकार शि. म. परांजपे यांनी कथाही यशस्वीपणे लिहिल्या असे म्हणता येते. भावोत्कटता, कल्पनाविलास, रूपकात्मकता, वक्रोक्ती या विशेषांबरोबरीनेच उत्कट देशाभिमान हा त्यांच्या कथेचा सर्वांत मोठा विशेष ठरला. रूपके, स्वप्ने, निसर्गदृश्ये, वर्तमानपत्रातील बातमी, इतिहासातील प्रसंग अशा साधनांचा वापर करीत कथेला आवश्यक ते वातावरण निर्माण करण्याचे कौशल्य त्यांनी सहज साधले. 'सापडलेले संपुष्ट' सारख्या त्यांच्या कथेत कविमनाचा विलास आढळतो.

४.११ नियतकालिके आणि कथासंग्रह

विविध नियतकालिके ही मराठी लघुकथेच्या विकासाची पायवाट ठरली आहेत. प्रथम 'करमणूक' मधून आणि नंतर १९०९ ते १९२५ पर्यंत 'मनोरंजन' मधून मराठी कथेचा विकास होत गेला. १९२६ मध्ये 'रत्नाकर' मासिक निघाले आणि मराठी कथेच्या विकासाचा तिसरा कालखंड सुरू झाला. मराठी कथेच्या दृष्टीने तो अतिशय भरभराटीचा होता याची नोंद वाङ्मयाचा इतिहासाने घेतली आहेच. १८९० पासूनचे 'करमणूक' साप्ताहिकाचे आणि १९२५ पर्यंतचे 'मनोरंजन' मासिकाचे कार्य मराठी कथेच्या पायाभरणीच्या आणि विकासाच्या दृष्टीने अनमोल ठरले आहे. कथेला प्रतिष्ठा आणि लोकप्रियता देण्याचे 'मनोरंजन' चे कार्य चालू असतानाच म्हणजे १९१० ते १९२० या काळात अन्य नियतकालिकांचाही उदय झाला, त्यांनी 'मनोरंजन' प्रमाणेच कथेला महत्त्वाचे स्थान देण्याचे कार्य केले. 'विविधवृत्त', 'प्रभात', 'केरळ - कोकिळ', 'उद्यान', 'चित्रमयजगत', 'नवयुग' इत्यादी नियतकालिकांची कामगिरी 'मनोरंजन'ला पूरक ठरली. या नियतकालिकांचा वाटा कथा लोकप्रिय करण्याच्या संदर्भात फार मोठा ठरणारा आहे.

नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेल्या कथांचे संग्रहही याच कालखंडात निघाले. 'करमणूक - कालखंडा' तील हरिभाऊंच्या निवडक 'स्फुटगोष्टींचे' 'स्फुटगोष्टी भाग १ ते ४' असे चार संग्रह याच काळात निघाले. 'करमणूक' मधून पुढे आलेल्या आणि नंतर 'मनोरंजन' मध्ये विपुल लेखन केलेल्या कृष्णाजी केशव गोखले यांचा कथासंग्रह 'खूप केलीत सूनबाई' या नावाने प्रसिद्ध झाला. वामन मल्हार जोशी यांचा 'नवपुष्पकरंडक' हा कथासंग्रह आला. काशिबाई कानिटकर, गिरिजाबाई केळकर यांचेही कथासंग्रह आले. मात्र याच कालखंडात विपुल कथालेखन करण्याच्या वि.सी. गुर्जरांसारख्या लोकप्रिय कथाकाराचा एकही कथासंग्रह या काळात प्रसिद्ध होऊ शकला नाही. 'द्राक्षाचे घोस' हा त्यांचा एकमेव कथासंग्रह पुढे १९३६ मध्ये प्रसिद्ध झाला. याचा अर्थ या काळात कथेला महत्त्व

आले असले तरी कथासंग्रह मोजकेच निघाले. मराठी कथा वाचकांप्रत नियतकालिकांच्या माध्यमातूनच पोहोचली. कथावाचनाची आवड निर्माण करणे, कथालेखनाला दिशा देणे, कथेविषयीची समज जोपासणे या गोष्टी 'करमणूक' आणि 'मनोरंजन' कालखंडात नियतकालिकांमधूनच घडल्या. त्यांत 'उद्यान', 'चित्रमय जगत', 'नवयुग' या नियतकालिकांची कामगिरी विशेष ठरली.

उद्यान : 'उद्यान' हे मासिक १९०९ मध्ये सुरू झाले. ह्यातील सुरूवातीच्या कथा भाषांतरित स्वरूपाच्या आहेत. चांगल्या विनोदी कथा हेही उद्यानचे वैशिष्ट्य ठरले. प्रसंगनिष्ठ आणि स्वभावनिष्ठ विनोदाचे उत्तम नमुने या कथांतून दिसून आले. 'आम्र' या टोपणनावाने लिहिणाऱ्या कथाकारांच्या 'मजेचे मासले' या सदरात आलेल्या 'हिरवा दरवाजा', 'दांपत्यकलह', 'हुशार खरे' यांसारख्या कथांनी विनोदाचे नेमके दर्शन घडविले. एकूणच 'उद्यान' मधील विनोदी कथांनी मराठी विनोदीकथा वाङ्मयात वैशिष्ट्यपूर्ण भर घातली. ह्या मासिकातील बरेचसे कथालेखन टोपणनावांनी झालेले आढळते. आम्र, भ्रमर, राधासुत, आनंदी, पुरूषोत्तमतनय, सदाशिवात्मजा, एक सांवतवाडकर, अशी ही टोपणनावे आहेत. ह्याखेरीज भीमराव खंडेराव कोरान्ने, य. म. केणी, कु. आवडाबाई जयवंत, स. मं. धुमे अशा प्रत्यक्ष नावांनी लेखन करणारे कथाकारही आढळतात. कौटुंबिक भावनांची गुंतागुंत चित्रित करणाऱ्या आणि ऐतिहासिक, पौराणिक कथाही 'उद्यान' ने प्रसिद्ध केल्या. एकूण 'उद्यान' मधील कथांचे स्वरूप वैविध्यपूर्ण ठरणारे होते.

चित्रमय जगत :

'चित्रमयजगत' हे मासिक १९१० ला सुरू झाले. १९२० पर्यंत ह्या मासिकात नियमितपणे कथा प्रसिद्ध होत असत. 'चित्रमय जगत' चे वैशिष्ट्य असे की कथालेखनाखेरीज अन्य क्षेत्रांत नामवंत ठरलेल्या अनेक महत्त्वाच्या व्यक्तींनी या मासिकातून कथालेखन केले. शि. म. परांजपे, न. चिं. केळकर, वामन मल्हार जोशी, सी. के. दामले, त्र्यं. सी. कारखानीस, ल. ब. भोपटकर, विद्याधर वामन भिडे ही त्यांपैकी काही नावे. कौटुंबिक कथा, रहस्यकथा, ऐतिहासिककथा, विनोदीकथा अशा विविध प्रकारच्या कथा 'चित्रमयजगत' मधून प्रसिद्ध होत राहिल्या. विनोदीकथांच्या दालनात 'चित्रमयजगत' ने भरच घातली. न. चिं. केळकरांच्या, 'माझी आगगाडी कशी चुकली', 'गीताराव' अशा विनोदी कथा, शि. म. परांजपे यांच्या 'मदनदहन', 'पुरणांतरी सापडलेली नवी गोष्ट' ह्यांचा विशेष उल्लेख करणे योग्य ठरेल. 'चित्रमयजगत' मधील ऐतिहासिक कथांचे स्वरूप सामान्य आहे आणि रहस्यकथा भाषांतरित किंवा पाश्चात्य कथांवर बेतलेल्या आहेत. त्या तुलनेने सौ. सावित्रीबाई कोरान्ने, सौ. यमुनाबाई, सी. के. दामले, त्र्यं. सी. कारखानीस, शं.ना. सहस्त्रबुद्धे यांच्या कुटुंबकथा उल्लेखनीय ठरल्या आहेत.

नवयुग :

'नवयुग' हे मासिक नोव्हेंबर १९१३ ला सुरू झाले. विठ्ठल जिवाजी नाडकर्णी हे 'नवयुग' चे संपादक. 'मनोरंजन' चा आदर्श समोर ठेवून 'नवयुग' ने कथेला महत्त्व दिले. ह्या कथांचे स्वरूप प्रामुख्याने रहस्यप्रधान व पाल्हाळिक असे होते. कृष्णाजी केशव गोखले, र. वि. दामले, सौ. इंदिराबाई सहस्त्रबुद्धे, गिरिजाबाई केळकर हे या मासिकाचे काही प्रमुख कथालेखक होते. पुढे कथालेखक म्हणून ख्यातनाम झालेल्या चिं. वि. जोशी यांच्या सुरूवातीच्या कथा 'नवयुग' मधूनच प्रसिद्ध झाल्या. त्र्यं. ब. रायरीकर, वाग्भट नारायण देशपांडे यांनीही आपल्या कथालेखनाचा प्रारंभ 'नवयुग' मधूनच केला. १९१३ ते १९२० मध्ये 'नवयुग' मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या बहुतेक कथा टोपण नावांनी प्रसिद्ध झाल्या. आनंदीरमण, शारदाभक्त, चंडातप, भालचंद्र, विवेक, लक्ष्मी, गतानुगताग्रणी, रामाग्रज इत्यादी टोपणनावांनी हे कथालेखन झाले. विशेष म्हणजे अनेक कथा निनावी प्रसिद्ध झाल्या.

'मनोरंजन' आणि 'मनोरंजन' कालखंडातील प्रमुख नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेल्या कथांचा विचार करता काही गोष्टी ठळकपणे जाणवतात. एक म्हणजे वि. सी. गुर्जर यांच्या कथालेखनाची छाप जवळपास सर्वच कथाकारांवर आहे. त्याचबरोबर त्या काळातील लोकप्रिय अशा पाश्चात्य देशांतील मासिकांतून प्रसिद्ध होणाऱ्या कथांचाही पगडा या कथाकारांवर आहे. स्वतंत्र कथा लिहिण्यापेक्षा भाषांतरे व रूपांतरे करण्याकडे कथाकारांचा कल अधिक आहे. टॉलस्टॉय, मोपांसा, ऑर्थर, कॉनन् डायल. अशा जगप्रसिद्ध कथाकारांच्या कथांची भाषांतरे वा रूपांतरे या नियतकालिकांतून मोठ्या प्रमाणावर आढळतात. संस्कृत नाटकांच्या कथानकांवरूनही बरेचसे कथालेखन झालेले आढळते. प.ल.वैद्य, चंद्रगुप्त, संस्कृत नीतिकथांची भाषांतरे करणारे वि. ना. देव अशी काही नावे यासंदर्भात उल्लेखता येतात. अरबी - फारसी दंतकथांचा अनुवाद - ल. वि. परूळेकर, प्रेमचंद ह्यांच्या हिंदी कथांचा अनुवाद ह. बा. अत्रे इत्यादींचा विचार भाषांतरित कथेसंदर्भात करणे आवश्यक ठरते. गुर्जरांनी आणि अन्य लेखकांनी मराठीत आणलेल्या बंगाली कथेचे वर्चस्व तर ह्या कालखंडातील कथेवर आहेच. 'करमणूक' काळातील 'स्फुटगोष्ट', 'संपूर्ण गोष्ट' म्हणून 'मनोरंजन' कालखंडात स्थिरावण्याचे फार मोठे श्रेय या विविध नियतकालिकांचे आहे, हेच ह्यावरून स्पष्टपणे दिसून येते. मराठी कथेला वैविध्य लाभण्याचे कारणही ह्यातच सापडते.

१८७४ ते १९२० 'गोष्ट' ते 'लघुकथा' ही वाटचाल

दिवाकर कृष्ण यांची 'अंगणातील पोपट' ही कथा १९२२ साली प्रसिद्ध झाली. मराठी 'लघुकथे' ची ही खरीखुरी सुरूवात मानली जाते. इंग्रजी 'शॉर्ट - स्टोरी' च्या धर्तीवर मराठी कथेचे रूप येथूनच खऱ्या अर्थाने आकाराला येऊ लागले. आशय आणि अभिव्यक्ती ह्यांचा योग्य मेळ साधला जाऊ लागला.

कथानकाबरोबरच व्यक्तिरेखा, घटना, प्रसंग, वातावरणनिर्मिती, भाषाशैली, निवेदन पद्धती अशा कथेच्या विविध घटकांचे नेमके भान आले. एक स्वतंत्र आणि स्वयंपूर्ण वाङ्मयप्रकार म्हणून कथेकडे पाहण्याची दृष्टी, कथाकार, वाचकवर्ग व समीक्षक ह्यांना आली. सनावलीचा विचार करता मराठी कथेचा हा विकास १९२० नंतरच्या काळात झाला आहे हे स्पष्ट आहे. परंतु कोणतीही विकासाची प्रक्रिया ही अचानक घडत नसते. ती विशिष्ट पायावर आधारलेली असते. काळाच्या ओघातील अनेक टप्प्यांशी निगडित असते. गतकाळातून अनेक पोषक गोष्टी घेऊनच घडलेली असते. अनेक व्यक्तींचा हातभार लागूनच आकाराला आलेली असते. ह्या आणि अशा गोष्टींची जाणीव ठेवून विचार केला तर मराठी 'लघुकथे' च्या विकासाची बीजे १८७४ ते १९२० या कालखंडातच पेरली गेली होती हे मान्य करावे लागेल. भाषांतरित गोष्टी आणि विविध 'माला' रूपाने प्रसिद्ध झालेल्या गोष्टी यांनी 'कथा' या वाङ्मयप्रकाराचा प्रारंभिक परिचय करून दिला होता. पुढे नियतकालिकांनी विशेषतः 'करमणूक', 'मनोरंजन' यांनी हा वाङ्मयप्रकार मराठीत खऱ्या अर्थाने रूजवला हे चित्र स्पष्ट आहे. दिवाकर कृष्णांपासून पुढे आजतागायत होत राहिलेली मराठी कथेची भरभराट १८७४ ते १९२० या कालखंडाच्या पार्श्वभूमीवरच पाहता येते, हे स्पष्ट आहे. मराठी सारस्वतातील 'लघुकथा' या संपन्न वाङ्मयप्रकाराची जडणघडण होण्याचा महत्त्वपूर्ण काळ म्हणूनच १८७४ ते १९२० या कालखंडाची नोंद निर्विवादपणे करता येते.

स्व-अध्ययन :

१. १८७४ ते १९२० या कालखंडाचे मराठी कथेच्या संदर्भातील महत्त्व विशद करा.

२. मराठी कथेच्या वाटचालीतील नियतकालिकांचे योगदान स्पष्ट करा.

३. 'करमणूक - कालखंडात' मराठी कथेची खऱ्याअर्थाने पायाभरणी झाली, विवेचन करा.

४. 'हरिभाऊं'च्या 'स्फूटगोष्टीं' चे मराठी कथेच्या इतिहासातील स्थान स्पष्ट करा.

५. 'मनोरंजन - कालखंड' कोणत्या अर्थाने मराठी कथेच्या विकासाचा कालखंड ठरतो ते सांगा.

६. 'मनोरंजन' मासिकाची मराठी कथेच्या वाटचालीतील कामगिरी विशद करा.

७. वि. सी. गुर्जर यांच्या 'संपूर्ण गोष्टी' ची वैशिष्ट्ये सांगा.

८. १८७४ ते १९२० मधील कथालेखनातून सामाजिक सुधारणेचे भान कसे व्यक्त झाले आहे ते सांगा.

९. 'स्फुट गोष्ट' ते 'संपूर्ण गोष्ट' या मराठी कथेच्या वाटचालीचा आढावा घ्या.

संदर्भ ग्रंथ

अदवंत म. ना. - प्रदक्षिणा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, (६ वी आवृत्ती).

जोग रा. श्री. (संपादित) - मराठी वाङ्मयाचा इतिहास (खंड ५, भाग १) - महाराष्ट्र साहित्य परिषद प्रकाशन.

जोशी सुधा - कथा संकल्पना आणि समीक्षा - मौज प्रकाशन.

जोशी सुधा, पुरोहित के. ज. - मराठी कथा - विसावे शतक, मॅजेस्टिक.

देशपांडे अ. ना. - आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास, व्हीनस.

पुरोहित के. ज. - बीजाक्षरे - कौस्तुभ प्रकाशन.

भागवत, श्री. पु. रसाळ सुधीर व अन्य (संपा.) 'साहित्य अध्यापन आणि प्रकार' (प्रा. वा. ल. कुळकर्णी गौरव ग्रंथ - पॉप्युलर व मौज प्रकाशन).

शेवडे इंदुमती - मराठी कथा उगम आणि विकास, सोमय्या पब्लिकेशन.

❖❖❖❖

५

कथा (१९२० ते १९६०)

डॉ. अजंली जोशी

उद्दिष्टे :

- १९२० पूर्वीच्या कथाकारांची ओळख करुन घेणे.
- १९२० ते १९६० या काळातील कथा य साहित्यप्रकारातील कामगिरीची माहिती करुन घेणे.
- १९२० ते १९४५ मधील महत्त्वाच्या कथाकारांची सविस्तर माहिती करुन घेणे.
- १९४५ ते १९६० मधील महत्त्वाच्या कथाकारांचा परिचय करुन घेणे आणि कथेचे बदलते स्वरुप स्पष्ट करणे.

१९२० ते १९६० या कालखंडातील मराठी कथेचा इतिहास पाहता तिचे अव्वल इंग्रजीतील कथा, लघुकथा, नवकथा कसे तीन ठळक कालखंड पडतात. हे कालखंड जसे कालवाचक आहेत तसेच ते गुणवाचकही आहेत. मराठी कथेचे बदलते स्वरुप यांमधून स्पष्ट होते. कथालेखक हा समाजाचा एक घटक आहे आणि समाजातील अनेकविध प्रश्न, समस्या त्याच्या कथाप्रेरणा ठरत असतात. त्यामुळे बदलत्या समाजवास्तवाचे साद-पडसाद कथेच्या प्रवासात प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे उमटलेले दिसतात.

इंग्रजी राजवट सुरु झाल्यावर छापण्याची कला भारतात आली व त्यामुळे मराठी गद्याला निराळे वळण लागले. खरी मराठी कथा १८९० पासून म्हणजे करमणुकीच्या जन्मापासून - सुरु झाली असे मानले जाते. पण त्यापूर्वी ७० वर्षे ज्या कथा लिहिल्या गेल्या त्याचे स्वरुप बहुतांशी भाषांतरित, अनुकरणात्मक व अद्‌भुतरम्य असेच होते. इ. स. १८०६ मध्ये तंजावर येथील सरफोजी राजे यांनी इसापनीतीचे मराठी भाषांतर करवून 'बालबोध मुक्तावली' या नावाने प्रसिद्ध केले. हे मराठीतले पहिले गोष्टीचे पुस्तक. त्यानंतर 'हितोपदेश' (१८१५), 'पंचतंत्र' (१८१५), राजा प्रतापदित्याचे चिरत्र (१८१६), 'सिंहासन बत्तीशी' (१८२४) यांची भाषांतरे छापली गेली.

१९२० पर्यंतचे महत्त्वाचे कथाकार :

मराठी कथेला खरी सुरुवात झाली ती हरिभाऊंच्या 'करमणुकी' पासून. हरिभाऊ आपटे हा मराठी कथेच्या जडणघडणीचा एक महत्त्वाचा टप्पा होय. 'करमणूक' मध्ये हरिभाऊंनी आजकालच्या गोष्टी या सदरामध्ये त्यांच्या स्वतःच्या कादंबऱ्या प्रकाशित करत होते. त्याच अंकात शिल्लक जागेत वाचकांचे मनोरंजन होईल आणि त्यांचे प्रबोधन देखील होईल असा काही मजकूर असावा या हेतूने हरिभाऊंनी स्फुट गोष्टींची सुरुवात केली. त्यावेळेस कथा लिहायची म्हणून त्यांनी कथा लिहिलेली नाही, तर अंकाच्या गरजेतून ते गोष्टीकडे वळले आहेत. तरीही त्यांनी या गोष्टींतून कथेचे वेगवेगळे प्रकार हाताळले. व्यक्तिचित्रण करणाऱ्या कथा त्यांनी लिहिल्या तशा संवादातून कथाशय फुलविणाऱ्या गोष्टीही त्यांनी लिहिल्या (उदा. दोन पेले). पात्रांचे स्वभावदर्शन करताना त्यांच्या स्वभावातील विसंगती मोठया नर्म विनोदाच्या अंगाने त्यांनी दाखवून दिल्या आहेत. (उदा. डिस्पेशिया, आजीबाईची गोष्ट, चिक्कणमामाचे वुइल) याचबरोबर ऐतिहासिक कथारचनेचे प्रयोगही त्यांनी केले. अद्‌भूतकथा, चातुर्यकथा, भयकथा या विविध प्रकारांचे अनुवाद हरिभाऊंनी 'करमणूक' मध्ये छापले. मराठी कथेला अद्‌भुताच्या व अवास्तवतेच्या तावडीतून सोडवून वास्तवाच्या सृष्टीत आणण्याचे कार्य करमणूक पत्रांतून हरिभाऊंनी लिहिलेल्या स्फुट गोष्टींनी केले. म्हणून मराठी लघुकथेच्या आद्य जनकत्वाचा मान हरिभाऊंनाच द्यावयास हवा. हरिभाऊंच्या बहुतेक सर्व कथा त्यांनी स्वतः काढलेल्या करमणूक या नियतकालिकात प्रसिद्ध झाल्या. त्यांनी ज्या काळात लेखन केले तो काळ सामाजिक प्रबोधनाचा असल्यामुळे विधवाविवाह, बालविवाह, जरठबालविवाह, केशवपनाची चाल, सासुरवास इत्यादी तत्कालीन समाजाला ग्रासणारे प्रश्न हरिभाऊंच्या कथांत या ना त्या स्वरुपात आलेले दिसतात. आपल्या कथांमधून जीवनाचे वास्तवदर्शन घडवण्याचा प्रयत्न हरिभाऊंनी केलेला असला तरी कथेतील वास्तवदर्शनाला त्यांनी अभिरुचीची मर्यादा घातली होती. त्यांच्या कथेच्या काही मर्यादा मान्य करुनही मराठी कथेच्या इतिहासात हरिभाऊंना प्राप्त झालेल्या महत्त्वपूर्ण स्थानाला उणेपणा येत नाही. अद्भुतरम्यता व शृंगारिकता यांनी पछाडल्या गेलेल्या अव्वल इंग्रजीतील कथात्म वाङ्‌मयाला हरिभाऊंनीच प्रथम जीवनस्पर्शी बनवले. हरिभाऊंनी स्वीकारलेल्या आदर्शवादी वास्तववादाचे दूरगामी परिणाम मराठी कथेवर झालेले दिसतात. इ. स. १९४० पर्यंत म्हणजे नवकथेच्या उदयापर्यंत वास्तववादाचे बरेचसे असेच स्वरुप मराठी कथेने स्वीकारले.

हरिभाऊंच्या स्फुट गोष्टीने समकालीन कथाकारांना आणि उत्तरकालीन कथाकारांना स्फूर्ती दिली. लक्ष्मीतनया, काशीबाई कानिटकर, आनंदीबाई शिर्के, कुसुमाकर, बापू आपटे इत्यादी समकालीन आणि सहकारी कृष्णांसारख्या उत्तरकालीन लेखकांवर हरिभाऊंच्या स्फुट गोष्टींचा प्रभाव पडलेला दिसतो. अशा

प्रकारे खोलवर परिणाम करणारी हरिभाऊंची कथा म्हणजे मराठी कथेच्या तंत्रविचारातील एक महत्त्वाचा टप्पा म्हणता येतो.

१८९५ साली मनोरंजन सुरु झाले आणि या मासिकाने कथेच्या विकासाला या काळात विशेष हातभार लावला. १९११ ते १९२५ हा कालखंड मनोरंजन कालखंड म्हणता येईल, याच काळापासून म्हणजे १९१० पासून वि. सी. गुर्जरांनी कथालेखनाला सुरुवात केली. त्यांनी जवळजवळ ५०० ते ६०० कथा लिहिल्या. सुरुवातीच्या त्यांच्या गोष्टी स्फुट गोष्टीच्या वळणाच्या होत्या. मराठी कथेला वाङ्मयप्रकार म्हणून आकार देण्याचे कार्य गुर्जरांनी केले. कथेचे, तिच्या लेखनाचे स्वरुप कादंबरीपेक्षा वेगळे असते ही जाणीव प्रथम गुर्जरांनी आपल्या कथालेखनातून व्यक्त केली. गुर्जरपूर्वकाळातील स्फुट गोष्टीचे रुपांतर गुर्जरांनी संपूर्ण गोष्टीत केले. हरिभाऊंकालीन कथेतला बोधवाद कमी होऊन गुर्जरकालीन कथा रंजकतेकडे वळाली. लोकरंजन हाच प्रधान हेतू धरुन गुर्जरांनी कथा लिहिल्या. साध्यासुध्या घटनांची रहस्यमय गुंतागुंत करुन तिला अनपेक्षित पण सुखकारक असा गोड धक्का देण्याची गुर्जरांची कथालेखनाची धाटणी होती. डॉ. अंजली सोमण यांनी गुर्जरांच्या कथेबाबत म्हटले आहे, की "कथेमधील साध्यासुध्या घटनांची रहस्यमय गुंतागुंत करुन शेवटी त्या गुंतागुंतीला अनपेक्षित, तरीही सुखकारक अशी कलाटणी देण्याची गुर्जरांची धाटणी बघितली की त्यांच्या कथेला ना. सी. फडके यांच्या कथेची अग्रदूती म्हणावेसे वाटते."

या काळात काही कथालेखिकांनीही मराठी कथा समृद्ध करण्यात हातभार लावला आहे. काशीबाई कानिटकर, वामनसुता, गिरिजाबाई केळकर, आनंदीबाई शिर्के या काही महत्त्वाच्या कथालेखिका आहेत. त्यांचा 'चांदण्यातल्या गप्पा' हा संग्रह १९२१ मध्ये प्रसिद्ध झाला असला तरी यातील कथा १८१८ मध्ये 'विविधज्ञानविस्तार' मधून प्रसिद्ध झाल्या होत्या. 'शिळोप्याच्याा गोष्टी' या संग्रहातील कथा १९२० नंतर 'मनोरंजन' मधून प्रसिद्ध झाल्या. त्यांच्या कथांचे स्वरुप साधेसरळ आहे. त्यांच्या कथांवर हरिभाऊंच्या लेखनाचा मोठा प्रभाव दिसून येतो. त्यामुळे काशीबाईच्या कथा देखील बोधप्रधान झालेल्या दिसतात. त्या कालखंडातल्या कथांचा प्रधान दोष पाल्हाळिकपणा तो थोडाफार काशीबाईच्या कथांमधूनही आढळतो. तरीही त्यांच्या कथांतून जीवनदर्शन घडते. त्यांनी आपल्या कथांची रचना चॉसरच्या पद्धतीने केली आहे. त्यामुळे कथेतील पाल्हाळ काही प्रमाणात खपून जातो, असे म. ना. अदवंत यांनी म्हटले आहे. वामनसुता या टोपणनावाने कथा लिहिणाऱ्या लेखिकेने तुरळकच कथा लिहिल्या आहेत. १९०९ च्या मनोरंजनमधून या लेखिकेने कथालेखनास सुरुवात केली. त्यांनी लिहिलेल्या कथा तशा सामान्यच आहेत. या कथांतून प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष बोधवाद डोकावतो. त्यामुळे त्यांनी आपल्या कथांतून आदर्शवादी पात्रांची निर्मिती केलेली दिसते. कथनशैली साधीसरळ आहे. ओघवती भाषा आहे. मधूनमधून जीवनविषयक भाष्यही

लेखिकेने केलेले आहे. एकंदर वामनसुता यांची कथा फारशी प्रभावशाली नसली तरी त्या कालखंडाचे गुण-दोष घेऊन उभी आहे. गिरिजाबाई केळकर यांच्या कथालेखणाची सुरुवात या कालखंडात झाली असली तरी त्यांच्या कथेचा विकास मात्र १९२० नंतरच झाला आहे. दोन-तीनच कथा या कालखंडात प्रसिद्ध झाल्या आहेत, तरीही या कथांमधून त्यांची कथावैशिष्ट्ये दिसून येतात. या कथांमधून गिरिजाबाईनी सामजिक समस्यांबद्दल चर्चा केलेली आहे. आनंदीबाई शिर्के यांच्या कथालेखनाची सुरुवात देखील १९२० पूर्वीच झालेली होती, मात्र त्यांच्या कथेचा विकास १९२० नंतरच झालेला दिसतो. आनंदीबाई आपल्या कथेची मांडणी बोधवाद, रहस्यावर केलेली आहे. १९१७ च्या मनोरंजनमधील 'गुप्त मंजूष' ही कथा त्याच्या नंतर १९२० मधील 'प्रभावी', 'बेगम दिल आरा' , 'आमची दिवाळी', 'हे स्वप्न तर नाही ना ?' अशा अनेक कथा आनंदीबाईंची कथावैशिष्ट्ये दाखवतात. या कालखंडातील या महत्त्वच्या लेखिका होता. यांच्याबरोबरीने इतर अनेक नावे सांगता येतील. काशीबाई देवधर, सौ. सावित्रीबाई कोरान्ने, सौ. ताराबाई तरवड, सौ. यमुनाबाई, शिवतनया ही काही नावे होत. एकंदरीत या काळात स्त्रियांचे कथालेखन हा एकंदरीत कौतुकाचा विषय होता.

१९२० पर्यंतच्या कथेचे तंत्र :

१८९० मध्ये 'करमणूक' सुरु झाले आणि १९१७ मध्ये बंद झाले. या कालखंडात हरिभाऊंनी मोठया गोष्टींबरोबरीने स्फुट गोष्टी मोठया प्रमाणावर लिहिल्या. या गोष्टींपैकी संग्रहरुपाने त्यातील केवळ २१ गोष्टी चार भागांतून प्रसिद्ध झाल्या. या 'स्फुट गोष्टी' तील काही गोष्टी इतक्या प्रदीर्घ होत्या की त्या लघुकादंबऱ्याच वाटाव्यात. म्हणूनच डॉ. भिंगारे यांनी हरिभाऊंच्या या 'स्फुट गोष्टी' ना उपकथा किंवा लघुकादंबऱ्या असे म्हटले आहे. हरिभाऊंनी कथालेखनाची सुरुवात जाणीवपूर्वक केली नसली तरी त्यांच्या 'स्फुट गोष्टी' मध्ये त्यांनी अनेक प्रकार योजलेले दिसतात. व्यक्तिचित्रणावर भर देणाऱ्या कथा, कथेतील पात्रांच्या स्वभाववैशिष्टयांचे दर्शन घडवणाऱ्या कथा, ऐतिहासिक कथारचना, गुप्त-पोलिसांच्या चातुर्यकथा व भयकथा अशा विविध प्रकारच्या कथा हरिभाऊंनी 'करमणूक' मधून प्रसिद्ध केल्या. त्यांच्या या स्फुट गोष्टी तंत्रदृष्टया जास्त परिणामकारक ठरल्या आहेत. या कथांमध्ये प्रसंगांची गर्दी, पाल्हाळ आढळत नाही. वेगवेगळ्या घटना घेऊन त्यांची मनोरंजक गुंफण न करता एखादा मध्यवर्ती प्रसंग घेऊन किंवा एखाद्या लहानशा रहस्याभोवती कथेची उभारणी करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. फडके यांनी जिला कथेचा आत्मा मानले ती वाचकांची उत्कंठा शेवटी कलाटणी देण्याची पद्धत हरिभाऊंनी देखील अवलंबिलेली आहे. बोधवादी भूमिका, योगायोगाला प्राधान्य, विस्कळीतपणा किंवा पाल्हाळ हे दोष हरिभाऊंच्या काही कथांमधून दिसत असले तरी आधुनिक जनकत्वाचा मान त्यांच्याकडेच जातो.

'करमणूक' मधून प्रसिद्ध झालेल्या हरिभाऊंच्या गोष्टी विस्ताराने मोठ्या व घटना-प्रसंगांची गर्दी असलेल्या होत्या. कथानिवेदन परिणामकारक होण्यासाठी व कथेत वास्तवता निर्माण होण्यासाठी हरिभाऊंनी कथेतील तपशील विस्ताराने रंगवलेले दिसतात. संथपणे व ऐसपैसपणे कथानुभवाचे चित्रण करणारी हरिभाऊंची कथा बाह्यतः कादंबरीशी जवळीक साधणारी होती, तर तिचे अंतरंग बोधवादाने प्रभावित झालेले होते. अलंकारिक व संस्कृतप्रचुर भाषेचा सोस न बाळगता साध्यासुध्या व दैनंदिन व्यवहारातील भाषेचा किती कलात्मक उपयोग करता येतो, हे आपल्या कथांच्याद्वारा त्यांनी दाखवून दिले. आपल्या कथालेखनाने हरिभाऊंनी केवळ वाचकवर्गाला प्रभावित केले असे नव्हे, तर स्वकालीन व उत्तरकालीन कथाकारांवर हरिभाऊंच्या कथांचा दूरगामी परिणाम झालेला दिसतो. आनंदीबाई शिर्के, कुसुमाकर व बापू आपटे या समकालीन कथाकारांवर, तसेच सहाकारी कृष्ण, कृ. के. गोखले व ना. ह. आपटे या उत्तरकालीन कथाकारांवर हरिभाऊंच्या कथालेखनाचा पडलेला प्रभाव सहज लक्षात आल्याशिवाय राहत नाही. त्यामुळे १८९० पासून १९१९ पर्यंतची कथा 'स्फुट गोष्टी' च्याच वळणावर गेली आहे. समाजाला काही तरी शिकवून लोकजागृती करण्याच्या उद्देशाने सहकारी कृष्ण यांनी जे लेखन केले ते स्फुट गोष्टीच्याच स्वरुपाचे होते. या कालखंडात करमणुकीतून प्रसिध्द झालेल्या कथांपैकी पुष्कळच कथा अनुवादित व रहस्यावर आधारलेल्या होत्या. काही ऐतिहासिक कथाही त्यातून प्रसिद्ध झाल्या होत्या. बऱ्याच कथा उपदेशपर व बोधपर अशा स्वरुपाच्या असत. पाल्हाळिक वर्णने त्यात जागोजाग येत. निवेदन सरळ असे. काही वेळा गोष्टीच्या पार्श्वभूमीसाठी नायक किंवा नायिकांचे पूर्वीचे सर्व जीवन वर्णन करण्याची पद्धत असे. त्यामुळे कथेला आकार नसे. खूप घटना एका गोष्टीत कोंबण्याच्या त्यांच्या वृत्तीमुळे कथा अस्ताव्यस्त पसरलेली असे. या असा कथांना काहीसा आकार व कलात्मक वळण देण्याचे कार्य केले वि. सी. गुर्जर यांनी. मनोरंजन या मासिकाने कथेच्या विकासाला या काळात विशेष हातभार लावला. कथानकामध्ये वाचकांची उत्कंठा वाढवण्यासाठी कोणते ना कोणते तरी रहस्य निर्माण करावयाचे, त्यातील गुंतागुंतीने वाचकांचे कुतूहल शेवटपर्यंत जागृत ठेवावयाचे व शेवटी कथानकाला अनपेक्षित कलाटणी देऊन, वाचनकांना विस्मयाचा धक्का द्यावयाचा या तंत्राचा गुर्जरांनी आपल्या संपूर्ण गोष्टीत अवलंब केला. त्यांच्या 'शेवटचे हास्य', 'मामाचा वारसा' किंवा 'कमलासना' या गोष्टी गुर्जरतंत्र म्हणून अभ्यासण्यासारख्या आहेत. याच्या जोडीला त्यांनी चुरचुरीत संवाद आणले. नर्म विनोद आणला. 'करमणुकी'तल्या स्फुट गोष्टीत निवेदनपद्धतीचा अवलंब केला होता. त्याच निवेदनाला गुर्जरांनी संवादाची जोड देऊन कथेत नाविन्य आणले. १९१० ते १९२५ या कालखंडातील मध्यमवर्गीय जीवन गुर्जरांनी कथेत चित्रित केले होते. हा कालखंड सुधारणेचा होता. स्त्रिया शिक्षण घेऊ लागल्या होत्या. या कालखंडातल्या स्त्री-पुरषांमधला मोकळेपणा, अवखळपणा, नर्म विनोद, विविध विषयांवर त्यांच्यात घडणाऱ्या चर्चा या साऱ्याचे चित्रण गुर्जरांच्या कथांमध्ये आढळते.

चर्चेच्या ओघात येणारा हास्यविनोद, कोट्या, प्रतिकोट्या याचेही दर्शन त्यांच्या संपूर्ण गोष्टीत दिसून येते. 'डोळ्यातील मुसळ', 'लाजाळूचे झाड', 'पुरुषाची जात', 'बायकांची जात', 'योगायोग' अशा कित्येक कथांमधून गुर्जरांचे संवादकौशल्य दिसून येते. त्यामुळे त्यांच्या 'संपूर्ण गोष्टी' ची लोकप्रियता एकदम वाढली. कथानकात रहस्य निर्माण करुन वाचकांची उत्कंठा वाढवण्याचे तंत्र गुर्जरांनी अगदी सुरवातीपासूनच अमलात आणलेले दिसते. 'टीकाकार', 'कळीकाळ', 'हरवलेली आंगठी' यांसारख्या कथांतून घटनांची गर्दी आढळते. त्यामुळे अतिरंजितता आणि कृत्रिमता हे दोष गुर्जरांच्या काही कथांमधून प्रामुख्याने आढळतात. तसेच जीवनातील तीव्र संघर्ष व त्यातील उकल गुर्जरांच्या कथांतून फारशी दिसत नाही. त्याच्या कथांतील रहस्ये चमत्कृतिपूर्ण असतात आणि योगायोग नेहमी सुखपर्यवसायी असतात. त्यामुळे वाचक देखील त्यांची कथा सहजपणे वाचतो. हरिभाऊंच्या कथा वाचून वाचक जसा अंतर्मुख होतो तसा होत नाही. कारण हरिभाऊंच्या कथांमधून जे प्रखर जीवनदर्शन घडते तसे ते गुर्जरांच्या कथांमधून घडत नाही. मानवी जीवनातील काही समस्या त्याच्या कथांतून दिसतात परंतु त्याही कथांचा शेवट सुखान्तच असतो. रहस्याप्रधान कथानकाच्या आवडीमुळे गुर्जरांच्या कथांना काही मर्यादा आल्या आहेत. कथानकात रहस्य आणण्याच्या हव्यासामुळे त्यांच्या कथारचनेतही एकप्रकारचा साचेबंदपणा आलेला दिसतो, असे असले तरी त्यांच्या कथेने वाचकांची वाचन भूक भागवली, हेच गुर्जरांच्या संपूर्ण गोष्टीचे महत्त्वाचे ऐतिहासिक कार्य म्हणता येईल.

या कालखंडात 'संपूर्ण गोष्ट' लोकप्रिय झाली तरी ती संग्रहरुपाने फारशी लोकांच्या नजरेसमोर येऊ शकली नाही. या कथा केवळ घटनाप्रधान व रंजनप्रधान असल्याने त्या पुढे फारशा टिकू शकल्या नाहीत. रहस्यावर आधारलेल्या व गुंतागुंतीची रचना असणाऱ्या कथांचे स्वभावरेखनाकडे स्वाभाविकपणे दुर्लक्ष होते आणि त्यामुळे काही काळ लोकप्रिय झालेल्या कथा शेवटी इतिहासजमा होतात. पण या काळातील कथांनी महत्त्वाचे कार्य केले ते विसरता येणार नाही. कथेवरील बोधाचे जोखड फेकून देऊन कथा अधिकाधिक रंजनप्रधान बनत चालली होती. संपूर्ण गोष्टीने केलेले कार्य ऐतिहासिक टप्पा म्हणून महत्त्वाचे आहे. लघुकथा हा शब्द याच काळात रुढ झाला व तिच्या तंत्राची, स्वरुपाची सर्व बाजूंनी चर्चा होऊ लागली. कथानकाच्या अभिव्यक्तीसाठी अनेक तंत्रपद्धतीचा अवलंब करण्यात येऊ लागला आणि त्याबरोबर व्यक्ती हा जो कथानकातील महत्त्वाचा घटक त्याच्याकडे कथालेखकाचे अधिकाधिक लक्ष जाऊ लागले.

या काळात कथावाङ्मयाला प्रतिष्ठा मिळू लागली होती. 'करमणुकी' तून निर्माण झालेली स्फुट गोष्ट आता संपूर्ण गोष्ट म्हणून विकसित झालेली दिसते. कथेला मानाचे स्थान नसले तरी प्रमुख स्थान देण्यात येऊ लागले. कथा हा वाङ्मयप्रकार महत्त्वाचा आहे याची जाणीव लेखकाबरोबर वाचकालाही होऊ लागली

होती. मनोरंजन मासिक आणि वि. सी. गुर्जर या दोघांच्या परस्परांच्या सहकार्याने 'संपूर्ण गोष्टी' ला विलक्षण लोकप्रियता मिळवून दिली.

सुरुवातीच्या काळातील बोध करण्याचे उद्दिष्ट मागे पडून कथा रंजनवादाकडे झुकली. बोध व रंजन यांमुळे या कालखंडातील कथा घटनाप्रधान झाली. ही कथा हळूहळू जीवनदर्शनाकडे वळू लागली होती. त्याच्या पाऊलखुणा १९२० च्या सुमारास काही कथांमधून दिसत होत्या. १९२२ मधल्या मे च्या 'मनोरंजन' च्या अंकातून दिवाकर कृष्णांची 'अंगणातील पोपट' ही प्रसिद्ध झाली आणि तिथून कथावाङ्मयाच्या विकासाच्या टप्प्याची सुरुवात झाली असे म्हणता येईल.

१९२० ते १९४५ मधील महत्त्वाचे कथाकार :

१९१० ते १९२६ या काळात लघुकथा प्रगतीची वाटचाल करत होती. १९२६ नंतरची एकोणीस वर्षे हा लघुकथेच्या आत्यंतिक उत्कर्षाचा काळ होता. १९२६ साली 'रत्नाकर' सुरु झाले आणि दोनच वर्षानी १९२८ मध्ये 'यशवंत' मासिक सुरु झाले. 'यशवंत' हे मासिक प्राधान्याने लघुकथेला वाहिलेले होते. या दोन मासिकांनी आणि 'ज्योत्स्ना', 'किर्लोस्कर', 'समीक्षक', 'संजीवनी', 'ध्रुव', 'प्रतिभा' इत्यादी मासिकांनी लघुकथा विकसित करण्यात हातभार लावला. १८९० ते १९२६ हा मनोरंजन कालखंड मानला तर १९२६ ते १९४४ या कालखंडाला यशवंत-किर्लोस्कर कालखंड मानायला हवा. या दोन मासिकांचे मराठी लघुकथा विकसित करण्यात मोलाचे योगदान आहे.

१९१० ते १९२६ या कालखंडात कादंबरीपेक्षा लघुकथा अधिक लोकप्रिय झालेली दिसते. पूर्वीचे सारे दोष लोष पावून ती अधिकाधिक उजळ होऊ लागली असे दिसते. ना. सी. फडके आणि वि. स. खांडेकर हे दोन मोठे लेखक या काळातले मानकरी असले तरी दिवाकर कृष्ण या लेखकाने या काळावर आपला वेगळा ठसा उमटवला आहे. दिवाकर कृष्णांनी १९२२ पासून कथालेखनाला सुरुवात केली. त्यांचे कथालेखन मोजकेच आहे. 'समाधी व सहा गोष्टी' हा त्यांचा पहिला कथासंग्रह १९२७ मध्ये प्रसिध्द झाला. १९४१ साली त्यांचा 'रुपगर्विता आणि सहा गोष्टी' हा संग्रह आणि १९५५ मध्ये 'महाराणी आणि इतर कथा' हा संग्रह प्रसिध्द झाला. त्यांच्या कथा संख्येने कमी असला तरी गुणवैशिष्टयांनी खूप मोठ्या आहेत. दिवाकर कृष्णांनी आपटे, गुर्जर यांच्याइतके विपुल लेखन केले नसले तरी जे मोजके लेखन केले. त्यातून असे दिसते, की गुर्जरकालीन चाकोरीत अडकलेली मराठी कथा त्यांनी मनोविश्लेषणाकडे वळवली. त्यांच्या कथेत गुंतागुंत, उकल, रहस्य खेळते ठेवण्याची पद्धत, अनपेक्षित-अकस्मात गोड धक्का असे काही नव्हते. मानवी जीवनातील हळुवार कोपरे सूक्ष्मतेने रंगवून वाचकांना अंतर्मुख व चिंतनशील बनवणे आणि जीवनाच्या अनाकलनीयतेविषयी विचार करायला लावणे हे त्यांच्या कथेचे उद्दिष्ट होते.

दिवाकर कृष्णांच्या पार्श्वभूमीवर ना. सी. फडके यांची कथा गुर्जरकालीन कथेचेच अनुकरण करताना दिसते. दिवाकर कृष्णांची कथा व्यक्तिमनाची आंदोलने व्यक्त करु लागली पण फडक्यांची कथा मात्र मागच्या कालखंडातच रेंगाळत होती, हे फडक्यांच्या कथा पाहता लागलीच लक्षात येते. वाचकांना आनंद देणे आणि मनोरंजन करणे हीच साहित्याची प्रमुख प्रयोजने असतात, अशीच फडे यांची साहित्यनिर्मितीची भूमिका होती, हीच त्यांची भूमिका त्यांच्या कथालेखनाची मर्यादा बनली. त्यांचा एकच कथासंग्रह पाहिला तरी याची कल्पना येते. फडके यांनी १९२६ च्या सुमारास कथालेखनाला सुरुवात केली. त्याचे २९ संग्रह प्रसिद्ध आहेत. एकंदरीत त्यांनी साडेतीनशे कथा लिहिल्या आहेत. त्यांच्या कथासंग्रहात परदेशातील गाजलेल्या कथाकारांच्या अनुवादित कथाही समाविष्ट झालेल्या आहेत. फडके यांनी जे जे वाङ्मयप्रकार हाताळले त्याच्या तंत्रावर त्यांनी अधिक भर दिला. म्हणजे असे, की साहित्यासाठी कोणता विषय घ्यावा, साहित्यकृतीची सुरूवात, मध्य आणि शेवट कसा असावा, साहित्यकृतीत संघर्ष दाखवायचा तो कसा दाखवावा, वाचकांची उत्कंठा कशी वाढवावी, गुंतागुंत-निरगाठ-एकल या त्रयीचा वापर कसा करायचा, अनुलोम-विलोम निवेदनपद्धती सारख्या निवेदनपद्धती कशा योजाव्यात याचे विवेचेन फडके यांच्या कोणत्याही कृतीत सापडेल. त्यांचा समीक्षात्मक ग्रंथ असो, कथा असो, कादंबरी असो; वाङ्मयप्रकारानुसार या तंत्राचे स्वरुप बदलते इतकेच! कथा-कादंबरीसारख्या कृतीतून या तंत्राचे उपयोजन प्रत्यक्ष पाहायला मिळते, तर प्रतिभासाधन, प्रतिभाविलास व इतर अन्य ग्रंथातून या तंत्राचे विवेचेन पाहायला मिळते. त्याचे हे ग्रंथ पाहिल्यावर साहित्यनिर्मितीची प्रक्रिया ही यांत्रिक प्रक्रिया आहे, असा वाचकाचा गैरसमज होऊ शकतो.

फडके यांच्या लेखनाचा वाचकानुरंजन हा प्रधान हेतू होय. कथा असो, कादंबरी असो, लघुनिबंध असो, ही त्यांची वाङ्मयविषयक भूमिका स्पष्ट झालेली आहे. 'मेणाचा ठसा' ही त्यांची पहिली कथा १९१२ च्या 'केरळकोकिळ' च्या अंकात प्रसिद्ध झाली होती. मात्र रत्नाकर-यशवंत कालखंड हा फडक्यांच्या कथालेखनाचा बहराचा काळ मानला जातो. प्रेम आणि विवाहपूर्व प्रेम हा फडके यांच्या कथांचा स्थायिभाव होय. इतरही विषयांवर त्यांनी कथा लिहिल्या आहेत. सामाजिक समस्या, राष्ट्रीय भावनाविष्कार, तात्कालिक राजकीय-सामाजिक घटना हे ते विषय होत. 'इंदूताईंचा चातुर्मास', 'सावित्रीचे नवे आख्यान', 'तुरुंगातून सुटका', 'माझा देश', 'चंद्रा', 'हिशेब चुकता', 'काश्मीर कहानी', यांसारख्या अनेक कथांतून त्यांनी वरील विषय मांडले आहेत. नंतरनंतरच्या कथांतून त्यांनी काही निराळे विषय मांडले होते, त्याबाबत म. ना. अदवंतांनी म्हटले आहे, "ते खरे फडके नव्हेत. फडक्यांच्या कथांचा खरा बहर १९२६ ते १९४५ याच कालात झाला. तरुण-तरुणींच्या मुग्ध प्रेमभावाचा लालित्याने व मोहकपणाने आविष्कार करुन त्यांच्यासमोर प्रणयाची एक स्वप्नसृष्टी निर्माण करणारे फडकेच खरे

कथाकार फडके म्हणून ओळखले जातात. त्यामुळे आशयाचा विचार करताना प्रा. फडके यांच्या कथासृष्टीतील मर्यादा स्पष्टपणे जाणवतात. त्यात जीवनाचे सखोल दर्शन नाही, अनुभवाची विविधता नाही, संघर्षाची तीव्रता नाही किंवा भावनांची उत्कटता नाही." फडक्यांच्या या मर्यादा असूनही ते महत्त्वाचे लेखक ठरतात. याबाबत अंजली सोमण म्हणतात, "फडक्यांच्या कथेचा टप्पा मधे आला नसता तर कदाचित दिवाकर कृष्णांच्या कथेनंतरच नवकथेचा उदय झाला असता. तिला १९४५ पर्यंत थांबावे लागले नसते. हरिभाऊ किंवा दिवाकर कृष्ण यांच्या कथेच्याही काही मर्यादा होत्या. नव्या समीक्षकांनी व नव्या कथाकारांनी त्या नाकारल्या, परंतु हरिभाऊ आणि दिवाकर कृष्ण यांना, त्यांच्या ऋणाला नाकारले नाही. फडक्यांच्या बाबतीत मात्र त्यांच्या कथेला समग्रतेने नाकारल्याशिवाय मराठी कथेला पुढे जाताच येत नाही," फडक्यांनी मराठी कथेला समृद्ध केले नसले तरी मराठी कथेच्या इतिहासात त्यांचे नाव घेतल्याशिवाय मराठी कथेचा इतिहास पुढे जात नाही इतके त्यांचे योगदान मान्य करावे लागते.

या कालखंडातले वि. स. खांडेकर हे दुसरे मान्यवर लेखक होत. १९२३ मध्ये 'घर कुणाचे' ही त्यांची पहिली कथा प्रसिद्ध झाली, मात्र खऱ्या अर्थी त्यांचे कथालेखन १९२५ पासून सुरु झाले. १९२५ ते १९४१ पर्यंत त्यांचे कथालेखन अखंडपणे चालू होते. १९४६ पर्यंत त्यांनी कथालेखन केलेले दिसत नाही. पुन्हा त्यांनी १९४७ पासून कथालेखन करण्यास सुरुवात केली. त्यांच्या कथालेखनाचे साधरणपणे तीन कालखंड मानता येतील. १९२५ ते १९३० हा त्यांचा कथालेखनाच्या दृष्टीने उमेदवारीचा कालखंड होय. या कालखंडातील त्यांच्या लेखनातून हरिभाऊंच्या कथेतील पाल्हाळ आणि गडकरी-कोल्हटकर यांच्यातील अद्‌भूतरम्यता यांचे मिश्रण दिसून येते. या काळात त्यांच्याबरोबरीने दिवाकर कृष्ण, कृ. के. गोखले इत्यादींसारखे इतरही काही लेखक कथालेखन करत होते. मात्र यांच्या लेखनपद्धतीचा खांडेकरांवर फारसा परिणाम झालेला दिसत नाही. या पाच वर्षातील त्यांची कथा दिवाकर कृष्ण आणि वि. सी. गुर्जर यांच्या नव्या-जुन्या तंत्रामध्ये उभी आहे, असे दिसते. त्यांच्या 'आंधळ्याची भाऊबीज', 'भावाचा भाव', 'जांभळीची शाळा-तपासणी', 'शिष्याची शिकवण' या लोकप्रिय कथा उदाहरण म्हणून पाहता येतील.

१९३० नंतरच्या काळातील खांडेकरांच्या कथेने वळण बदलले. १९३० ते १९४० मधल्या कथांमध्ये पूर्वी दिसून येणारे दोष सौम्य होत गेलेले दिसतात. विषयाचे वैचित्र्य, तंत्राची विविधता यांची एकरुपता दिसून यायला लागली. मात्र त्यांच्या कथा त्यांच्या कथालेखन वैशिष्टयांमुळे लोकप्रिय झाल्या नाहीत, तर त्यांच्या कथांमधील सामाजिक जाणिवेने आणि जीवनदर्शनामुळे त्या लोकप्रिय झाल्या.

१९४० मध्ये त्यांनी एकही कथा लिहिलेली दिसत नाही. एकदम १९४६ मध्ये 'तीन जगे' ही त्यांची कथा प्रसिद्ध झाली. त्यानंतर त्यांचे 'सांजवात', 'हस्ताचा पाऊस' व 'प्रीतीचा शोध' हे तीन संग्रह आले, तेव्हा वाचकांच्या लक्षात आले की खांडेकरांचे कथालेखनाबाबत धरलेले मौन आता सुटले आहे. खांडेकर पुन्हा लिहिते झाले.

फडके-खांडेकरांबरोबरीने य. गो. जोशी, वि. वि. बोकील, अनंत काणेकर, लक्ष्मणराव सरदेसाई, भा. वि. वरेरकर, कुमार रघुवीर, द. र. कवठेकर, खं. सा. दौंडकर अशा अनेकांनी कथेच्या दालनात प्रवेश केला. मध्यमवर्गीयांचे कौटुंबिक जीवन हे य. गो. जोशींच्या कथालेखनाचे क्षेत्र होते. त्यांच्या 'शेवग्याच्या शेगा', 'कोथिंबिरीच्या काडया', 'सुपारी', 'अन्न' आणि 'अन्न', 'आई', यांसारख्या अनेक कथा त्यांचे हे वैशिष्ट्य दाखवणाऱ्या आहेत. बोकीलांनी 'यशवंत' मासिकातून आपले कथालेखन सुरु केले. त्यांचे १७-१८ संग्रह प्रकाशित झाले आहेत. त्यांच्या कथांतून नुकत्याच संसार करु लागलेल्या तरुण पतिपत्नीच्या संसाराचे अवखळ चित्रण, त्यांचे लटके कलह, त्यांच्या मुग्ध प्रणय, त्यांच्यातील गैरसमज त्यामुळे होणारे भांडण या साऱ्याचे एकरुप चित्रण आलेले आहे. अनंत काणेकरांनी १९२५ पासून लघुकथालेखनाला सुरुवात केली. 'जागत्या छाया', 'मोरपिसे', 'दिव्यावरती अंधेर। 'काळी मेहुणी', 'सावल्याची राई' हे त्यांचे काही महत्त्वाचे कथासंग्रह अद्‌भूतरम्यता, योगायोग, भाषेची आतषबाजी आणि पाल्हाळ ही वैशिष्ट्ये त्यांच्या कथांमधून दिसून येतात.

अद्‌भूतरम्यता आणि वातावरणनिर्मितीचे कौशल्यासाठी र. वा. दिघे व ग. ल. ठोकळ हे दोन लेखक प्रसिद्ध होते. ताजमहाल, लकाकणारे पाणी, अमावस्येला पौर्णिमा अशांसारख्या कथा त्यांच्या प्रतिभेचा निराळाच पैलू दाखवतात. त्यातील कल्पनारम्य वातावरणामुळे कथेला अधिकच उठाव मिळतो. दिघे यांच्याप्रमाणे ठोकळांच्या कथेतही अद्‌भूतरम्यता आढळते. त्यांच्या कथांना ग्रामजीवनाची पार्श्वभूमी आहे. त्यांच्या कथांत नाट्य आहे आणि ते साकार करणारी सरसरशीत भाषाशैली त्यांच्याजवळ आहे. त्यामुळे त्यांच्या कथा खुलतात आणि वाचकांनाही त्या भावतात.

खं. सा. दौंडकर यांच्या कथांतून आकर्षक मांडणी दिसून येते. 'मोत्याची कुंडी', 'कुत्र्याचा पट्टा' यांसारख्या त्यांच्या काही कथा उल्लेखनीय आहेत. अद्‌भूततेच्या पातळीवरुन त्यांची कथा वास्तवतेच्या पातळीवर आलेली दिसते. प्रादेशिक कथालेखनही याच काळात सुरु झाले. गोमंतकाच्या पार्श्वभूमीवर कथांची उभारणी करुन कथेला नटवण्याचे कार्य लक्ष्मणराव सरदेसाई यांनी प्रामुख्याने केले. गोमंतकीय पार्श्वभूमीवर कथा लिहिणारे सरदेसाईप्रमाणे वि. स. सुखटणकर, जयवंतराव सरदेसाई, बा. द. सातोस्कर, रायकर हे काही महत्त्वाचे लेखक होत.

१९३५ च्या काळात वामन चोरघडे या लेखकाने कथानकाच्या काचेतून कथेला मुक्त केले. याचे पहिले श्रेय चोरघडे यांना जाते. 'समुद्राचे पाणी', 'भाकरी', 'गोरी बायको', 'नव्या रुढी' सारख्या कथांमधून उपेक्षितांच्या जीवनातील कारुण्य मोठ्या भावपूर्णतेने रंगवले आहे. 'अतिथी देवो भव', 'भाकरी', 'ज्योतिर्मयी', 'काव्याद', 'हरीख' यांसारख्या कथांतून त्यांनी जानपदजीवनातील विविध रंग नाजूकपणे रेखाटले आहेत. लोकजीवनाविषयी आस्था व लोकवाङ्मयाचा त्यांनी केलेला सूक्ष्म अभ्यास यांमुळेही त्यांच्या कथांना मोठे रम्य स्वरुप प्राप्त झाले आहे.

१९२० नंतर स्त्रियांच्या लेखनाची वाटचाल झपाट्याने होऊ लागली. काशीबाई कानिटकरांचा वारसा घेऊन पुढे अनेक लेखिकांनी लेखन केले. १९२० ते १९४० या कालखंडातील महत्त्वाच्या लेखिका कमलाबाई टिळक होत. त्यांच्या पहिल्या दोन कथा १९२९ साली प्रसिद्ध झाल्या. 'ह्रदयशारदा' हा त्यांचा पहिला कथासंग्रह १९३२ मध्ये प्रसिद्ध झाला. कमलाबाईंच्या कथांमध्ये मनोविश्लेषणाला महत्त्वपूर्ण स्थान आहे. त्यामुळे दिवाकर कृष्णांच्या कथेशी त्यांचे याबाबतीत साम्य आढळून येते. या कालखंडातील दुसरे केवळ महत्त्वाचेच नव्हे, तर कथेला समृद्ध करणारे नाव म्हणजे विभावरी शिरुरकर हे होय. त्यांचे 'कळ्यांचे निःश्वास' आणि 'दोघांचे विश्व' हे कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. 'कळ्यांचे निःश्वास' ह्या त्यांच्या पहिल्याच संग्रहाने मराठी कथेचे दालन समृद्ध केले. स्त्रीमनाचे सखोल चित्रण, तत्कालीन स्त्री समस्या, स्त्रीची होणारी परवड या साऱ्याचे अतिशय ह्रदय परंतु वास्तव चित्रण या संग्रहातून केले आहे. विभावरींच्या कथांमुळे स्त्री व्यक्त व्हायला शिकली. यांच्याबरोबरीने शांताबाई नाशिककर, कुमुदिनी रांगणेकर, आनंदीबाई किर्लोस्कर, मालतीबाई दांडेकर यांच्यासारख्या अनेक लेखिका कथा लिहीत होत्या. या लेखिकांपैकी बहुतेकींच्या कथा ह्या घटनाप्रधान आहेत, मनोव्यापार रंगवणे हे फारसे कुणाला जमलेले दिसत नाही. याच काळातल्या क्षमा राव या लेखिका मात्र अपवाद आहेत. कोळी, कोष्टी, कामकरी अशाप्रकारच्या निरनिराळ्या जमातीतील व्यक्तींच्या जीवनावर त्यांनी कथा लिहिल्या. त्यामुळे समाज, व्यक्ती, कथानक यादृष्टीने त्यांच्या कथेत नाविन्य दिसुन येते.

१९३० ते १९४० या कालखंडात मराठी कथेच्या तंत्राला अवास्तव महत्त्व प्राप्त झाले. फडकेप्रणीत तंत्राविरोधात कुसुमावती देशपांडे यांनी बंडाचा झेंडा उभारला. जीवनाच्या वेगवेगळ्या स्तरांतील अनुभवांनी कुसुमावतीबाईंना कथाबीजे पुरवली. 'दीपकळी', 'दीपदान' 'मोळी' या संग्रहात ३५ च्या आसपास कथा लिहिल्या, पण कथेचा पारंपरिक साचा बाजूला सारुन स्वतःचे स्वतंत्र रूप कथेला दिले. दरिद्री समाजातील उपेक्षित बालिका (चिंधी, दमडी, इंद्रा), पतीच्या मृत्यूनंतर त्याचा धंदा चालू ठेवणारी धोबीण (कला धोबिणीचे वैधव्य), हरिजन कुटुंबात जन्म घेऊनही शिक्षण घेणारी जाई (जाईबाई), समाजातील विषमता (अप्सरांची भेट), समाजाची स्वार्थलोलुपता (भाऊ भाऊ), बालकांच्या निरागस मनोविश्वाचे दर्शन

घडविणाऱ्या कथा (सवंगडी, वादळ, पिठोरी अमावस्या), स्त्रीमधील वात्सल्य अशाप्रकारे आशयदृष्ट्या कथेला नवे क्षितिज दाखवून देण्याचा प्रयत्न कुसुमावती देशपांडे यांनी केला आहे.

१९४५ पर्यंतच्या कथेचे तंत्र :

हरिभाऊ व वि. सी. गुर्जर यांच्या कथालेखनतंत्राचा पगडा पुढील काही लेखकांवर बराच काळ टिकून राहिलेला होता. मात्र दिवाकर कृष्णांनी स्वतःचे तंत्र अवलंबिले. त्यांनी गुर्जरांनी मराठी कथेच्या क्षेत्रात निर्माण केलेली कोंडी फोडण्याचा प्रयत्न केला. भावनेचा हळुवार आविष्कार हा त्यांच्या कथेचा मोठा विशेष होय. नाट्यमय प्रसंगांची निवड, योग्य वातावरणनिर्मिती आणि भाषाशैली यांचा उत्तम मिलाफ ही दिवाकर कृष्णांची कथेतून दिसणारी प्रतिभाशक्ती आहे. याचा वापर ते पात्रांच्या चित्रणासाठी आणि जीवनाचा वेध घेण्यासाठी करत होते त्यामुळे त्यांची कथा आशयधन झालेली दिसते. 'अंगणातील पोपट' ही त्यांची पहिलीच कथा याचे निदर्शक आहे आणि तत्कालीन कथाकारांच्या तुलनेत दिवाकरांचे वेगळेपण दाखवून देणारी आहे. त्यांच्या कथामुळे बाह्य घटनांमध्ये रमणारी व रहस्यावर आधारलेली कथा अधिक अंतर्मुख होऊन व्यक्तिमनाची आंदोलने चित्रित करू लागली. घटनाप्रधान कथेकडून स्वभावप्रधान कथेकडे होणारा बदल दिवाकर कृष्णांच्या कथांमधून विशेषत्वाने जाणवतो. 'अंगणातील पोपट', 'मृणालिनीचे लावण्य', 'संकष्ट चतुर्थी', 'समाधी' यांसारख्या कथांमधून भावनांची नाजूक भावबंध दिवाकर कृष्णांनी मोठ्या कोमलतेने उलगडून दाखवले आहेत. समाजात राहूनही समाजापासून वेगळे पडल्याची भावना बाळगणारी, जीवनविषयक कर्तव्ये पूर्ण करण्यात आपण कमी पडतो आहोत अशी टोचणी सतत मनाला लागणारी त्यांच्या कथेतील पात्रे पुढच्या काळातील नवकथेतील भाववृत्तीशी किंवा अस्तित्त्ववादी प्रवृत्तीशी जवळीक साधताना दिसतात. मानवी मनाच्या विशेषतः स्त्रीमनाच्या गूढतेचा सखोल वेध घेण्याचा प्रयत्न दिवाकर कृष्णापूर्वी मराठी कथेत झालेला आढळत नाही. त्यांच्या 'महाराणी' आणि 'कैलासाचा निर्माता' ह्या दोन कथा कल्पनाविलास आणि भावनांचे तांडव या दृष्टीने वैशिष्ट्यपूर्ण आहेत. कथेचा आरंभ आणि शेवट कलात्मकतेने, परिणामकारकतेने करण्याचे त्यांचे कौशल्य वाखाणण्यासारखे होते. या दृष्टीने 'दंडकारण्यातील प्रणयिनी', 'अंगणातील पोपट', 'संकष्ट चतुर्थी' किंवा 'समाधी' या कथांचा शेवट पाहण्यासारखा आहे. म. ना. अदवंत दिवाकर कृष्णांच्या कथेचे मोठेपण आणि मर्यादा सांगताना म्हणतात, "त्यांच्या कथेला काव्यात्म शैलीचे लेणे लाभले आहे. जीवनातील साधेसुधे प्रसंग घेऊन त्यांतून रसोत्कर्ष साधण्याचे सामर्थ्य त्यांच्या लेखणीला लाभले आहे, पण आत्यंतिक हळव्या व दुबळ्या नायक - नायिका व त्यामुळे कथानकात आलेले कारुण्य ह्यांमुळे त्यांच्या कथा काहीशा एकांगी व नैराश्यप्रधान झालेल्या आहेत. पण हे दोष लक्षात घेऊनही मराठी कथेला त्यांनी नवे वळण लावले, हे आपण विसरुन चालावयाचे नाही. स्थूल व बाह्य

घटनांच्या चमत्कृतिमय वर्णनापेक्षा सूक्ष्म कलात्मक भावदर्शन किती प्रभावी होऊ शकते हे त्यांनी आपल्या लधुकथांच्या द्वारे पटवून दिले. नव्या मराठी लघुकथेचे पहिले यशस्वी प्रवर्तक म्हणून श्री. वि. स. खांडकेर यांनी त्यांचा जो गौरव केला आहे तो यथायोग्यच वाटतो."

दिवाकर कृष्णांची कथा पाहता त्यातील विषय, व्यक्ती - प्रकृती, त्यांची मनोआंदोलने हे सारे फडक्यांनी आपल्या कथेत नाकारले. तसेच फडके लेखन करत होते तो काळ स्वातंत्र्यप्राप्तीच्या ध्यासाने भारलेला काळ होता. सामाजिक सुधारणा, स्त्रीशिक्षण या गोष्टी त्या काळात वेगाने घडत होत्या, परंतु या साऱ्याचे कोणतेच दर्शन फडक्यांच्या कथांमधून घडताना दिसत नाही. या घडामोडी त्यांच्या कथामधून तुरळक दिसतात पण त्या केवळ पार्श्वभूमी म्हणून, कथाविषय म्हणून नव्हे. त्यांच्या कथांचा विषय केवळ न केवळ स्त्री - पुरूषांमधील प्रणय हाच होता. त्यांनी आपल्या कथेचे स्वत:चे तंत्र बनवले. सर्वसामान्य वाचकांना शृंगार आवडतो म्हणून साहित्यात शृंगार, वाचकांना प्रश्नांची गंभीर आणि मूलगामी चर्चा आवडत नाही म्हणून साहित्यात संघर्षाला आणि गंभीर प्रश्नांना नकार अशी चौकट फडक्यांनी आपल्या साहित्यसाधनेसाठी आखून घेतली. वाचकांचा अनुनय करण्याचे तंत्रही त्यांना पहिल्याच संग्रहात सापडले. याच्या स्पष्ट खुणा त्यांच्या पहिल्या संग्रहातील 'शांता' व 'स्त्री आणि प्रतिभा' या दोन कथांतून दिसून येतात. सुरुवात उत्कंठा वाढवणारी आहे. त्यांच्या कथांमधली पात्रे फडक्यांचेच वाङ्मयविषयक विचार बोलतात हे त्यांच्या जवळजवळ प्रत्येक कथेतून दिसून येते. वरील दोन कथांपासून फडक्याच्या कथांमधून कुसुमावती, शंतनू अशी आधुनिक नावे दिसू लागली. सामाजिक प्रश्नांच्या बाबतीतली कालसापेक्षता फडक्यांच्या कथेने पाळली नसली तरी पात्रांची नावे आणि त्याचे पोशाख यांच्या बाबतीतील कालसापेक्षता आणि आधुनिकता मात्र फडक्यांनी कसोटीने पाळली असे त्यांच्या कथा वाचताना प्रकर्षाने जाणवते. इथून पुढे फडक्यांची नायिका सुंदरच असू लागली. विविध विभ्रम ती करू लागली. त्यांच्या कथेत प्रणयकूजनाला जास्त वाव मिळू लागला. त्यांच्या कथेतील पात्रे एकमेकांशी कोट्या करत लडिवाळ संवाद बोलू लागली. एकंदरीत गुंतागुंत, निरगाठ, उकल अशी त्यांच्या कथेची रचना ठरुन गेली आणि 'फडके पॅटर्न' तयार झाला.

फडक्यांच्या कादंबऱ्याप्रमाणेच त्यांनी कथांसाठीही वेगवेगळ्या पार्श्वभूमी योजली. 'लोला' कथेसाठी सर्कसची पार्श्वभूमी योजली आहे. 'मनोहर स्वप्न', 'कारवारची गोष्ट', 'आकाश-दिवे' यांसारख्या कथामधून कारवार प्रदेशाची, जादूगारीच्या वातावरणाची पार्श्वभूमी वापरली आहे. रहस्य, गुंतागुंत, उत्कंठा या त्यांच्या तंत्रातील तंत्रघटकांचा उपयोग 'दृष्टीआड सृष्टी', 'अंधारातली तारका', 'खोटी प्रेमकथा' यांसारख्या अनेक कथांमध्ये कुशलतेने केलेला आढळतो. पुढे त्यांच्या कथालेखनात सुबकपणा आला, सराईतपणा देखील आला, मात्र

आशयघनता असलेली, वाचकला अंतर्मुख बनवणारी कथा त्यांनी अभावानेच लिहिली. त्यांच्या कथेत बदल जाणवला तो नवकथेच्या उदयानंतरच. १९६२ मध्ये त्यांच्या 'बावनकशी' या संग्रहात ज्या कथा आहेत त्या 'फडके पॅटर्न' पेक्षा वेगळ्या स्वरुपाच्या आहेत. कदाचित नवकथेचा हा परिणाम असावा किंवा नवकथाकारांनी फडक्यांच्या तंत्रावर घणाघाती टीका केली त्याचाही हा परिणाम असावा. या संग्रहातील 'शल्य' किंवा 'जाऊ देणार नाही तुम्हाला' या कथांवर नवकथेचा प्रभाव दिसून येतो.

फडके यांच्याबरोबरीने खांडेकरही कथालेखन करत होते. खांडेकरांच्या सुरुवातीच्या कथांवर हरिभाऊंच्या लेखनपद्धतीचा प्रभाव दिसून येतो. तसेच कोल्हटकर - गडकरी यांच्या वाङ्मयाची छाप खांडेकरांच्या मनावर होती त्यामुळे सुरुवातीच्या त्यांच्या लेखनात कोट्यांची पखरण आणि अलंकारांचा सोस आढळतो. अशा लेखनपद्धतीमुळे त्यांच्या लेखनात कृत्रिमतेचा दोष निर्माण झाला आहे. १९२९ मध्ये 'वकील की शिक्षक' ही त्यांची कथा छापून आली होती. त्यातून हे सारे दोष दिसून येतात. 'यशवंत' मधून छापून आलेली 'भावाचा भाव' ही कथा अतिशय भावविवशतेने नटलेली आहे. या कथेबरोबरच 'हिरा तो भंगला', 'विजय कोणाचा?', 'केशवसुतांची कविता' या सर्वच कथांतून गोष्टीवेल्हाळपणा, अतिरंजितता, भावविवशता दिसून येते. कथानकात घटनांची गर्दी आढळून येते, थोडक्यात कादंबरीचा मालमसाला त्यांनी कथेच्या कथानकात पुरेपूर भरण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. १९३० नंतरच्या कथांमधून खांडेकरांचे लेखनकौशल्य दृष्टीस पडू लागले. त्यांची कथा स्वतःची वैशिष्ट्ये दर्शवू लागली. त्याचे कारण खांडेकरांनी स्वतःच सांगितले, कोल्हटकर - गडकऱ्यांच्या कल्पनारम्यतेची व कोटिबाजपणाची मोहिनी उतली आणि स्वतःच स्वतःच्या लेखनाचे टीकाकार झाल्यामुळे त्यांच्या कथालेखनाचा बाज बदलला. सुरुवातीच्या कथालेखनात असलेले दोष १९३० नंतरच्या कथांतून सौम्य झालेले आढळतात. कथानकाची रेखीव बांधणी, आकर्षक सुरुवात व परिणामकारक शेवट असे खांडेकरांच्या कथेचे स्वरुप झाले. 'मुके प्रेम', 'फाटका शर्ट', 'देवदूत', 'गार वारा' अशा अनेक कथांमधून हे स्वरुप दिसून येते. त्यांच्या कथेतील निवेदनपद्धतीचे स्वरुपही बदललेले दिसते. या पद्धतीत पत्रांचा, डायरीच्या पानांचा उपयोग केलेला दिसतो. तसेच मित्रमंडळीच्या संभाषणाच्या ओघात एखादा विषय निघून कुणीतरी एखादी आठवण सांगणे असा निवेदनप्रकार खांडेकरांना अधिक प्रिय होता. ही पद्धती त्यांनी 'दुसरी आक्का', 'अकल्पिता', 'कल्चर्ड मोती', 'जुना कोट' अशासारख्या इतरही कथांतून यशस्वी रीतीने वापरलेली दिसते. खांडेकरांच्या कथा तंत्रकौशल्यापेक्षा त्यातल्या जीवनदर्शनामुळे अधिक लोकप्रिय झाल्या. गरीब - श्रीमतांच्या जगातील भेद, संसारातील - जीवनातील मोहाचे प्रसंग, ध्येयाच्या पाठी धावणाऱ्या व्यक्ती, स्त्रीजीवनविषयक अनेक प्रश्न असे अनेक विषय त्यांच्या कथांतून आले आहेत. हे

पाहता खांडेकरांची कथा केवळ करमणूक करत नाही, तर त्या काही ना काही एक विचार पुरवतात, असे दिसते. तसेच स्वातंत्र्याप्राप्तीनंतर देशात अनेक घटना घडल्या, अनेक बदल घडून आले, या सर्व गोष्टींचे पडसाद खांडेकरांच्या कथांमधून उमटलेले दिसतात.

खांडेकरांनी आणखी एक वैशिष्ट्यपूर्ण भर मराठी कथेच्या दालनात घातली. इसाप व विष्णुशर्मा यांनी पूर्वी वापरलेल्या रुपककथेचा प्रकार खांडेकरांनीही हाताळला. त्यांची काव्यात्म वृत्ती, सूचकता व कल्पनाविलास यांचा प्रत्यय त्यांच्या रुपककथांतून येतो. कलिका, मृगजळातील कळ्या हे त्यांचे रुपककथासंग्रह प्रसिद्ध आहेत. इतरही संग्रहांतून त्यांच्या रुपककथा दिसून येतात. 'आरसेमहाल', 'तीन कलांवत', 'पृथ्वी', 'घरटे', 'धरणीकंप' इत्यादी काही रुपककथा वाचल्या तरी छोट्या कथेतून काव्यात्म रीतीने जीवनदर्शन घडवण्याचे व आशय ध्वनित करण्याचे त्यांचे कौशल्य उल्लेखनीय आहे.

खांडेकरांच्या कथेत क्वचित पाल्हाळ असेल, अद्‌भूतता, कल्पनारम्यता आढळेल, भाषेचा अवाजवी वापरही दिसेल, तंत्राचा ढिसाळपणा देखील जाणवेल; परंतु त्यांच्या कथा जीवनानुभूतीने नटलेल्या आहेत, हे नाकारता येत नाही. त्यांनी जे अनुभवले, त्यांना जे आतून जाणवले ते ते त्यांनी आपल्या कथेतून सांगायचा प्रयत्न केला. त्यामुळे कदाचित कथेत सांकेतिकता येत असेल, कथेतील पात्रे प्रतीकात्मक - प्रातिनिधिक होत असतील, तरीही या कथांमधून जाणवणारा जिव्हाळा, तळमळ वाचकाच्या अंतर्मनाला भिडल्याशिवाय राहात नाही आणि खांडेकरांच्या कथा लोकप्रिय होण्याचे रहस्य यातच आहे, असे वाटते.

कथेला पारंपरिकतेच्या कचाट्यातून मुक्त करण्याचे पहिले श्रेय वामनराव चोरघडे या लेखकाकडे जाते. चिंतनशील मनोवृत्ती व काव्यात्म आविष्कार यांमुळे त्यांच्या कथा वेगळ्या वाटतात. अशा पद्धतीच्या कथा लिहिण्यासाठीची आवश्यक ती काव्यदृष्टी चोरघडे यांच्याकडे होती. त्यामुळे विषय, वातावरण, स्वभावचित्रे यांबाबतीत त्यांच्या कथेतून विविधता आढळते. सुषमा ते प्रदीप पर्यंतचे त्यांचे सात कथासंग्रह त्यांचे सारे लेखनविशेष दर्शवतात. या संग्रहातील कथांमध्ये नाजूक वैयक्तिक भावनेपासून तीव्र सामाजिक भावनेपर्यंत विविध छटा त्यांनी अत्यंत कुशलतेने चित्रित केल्या आहेत. मानवी जीवनातील कोणतीही सूक्ष्म भावछटा त्यांच्या नजरेतून सुटू शकत नाही. ती दु:खाची असो, सुखाची असो, उदात्ततेची असो वा उदासीनतेची असो. या नाजूक धाग्याभोवती ते अतिशय कलात्मक रीतीने आपली कथा गुंफतात. त्यामुळे त्यांच्या कथांतून घटनेपेक्षा या भावछटेला अधिक प्राधान्य मिळते, तिचे काव्याशी जवळचे नाते आहे असे दिसते. काव्यात्म वृत्ती आणि अंतर्मुखता ही चोरघडे यांच्या कथालेखनाची प्रवृत्ती आहे, तिला चिंतनशीलतेची जोड मिळाली आहे. कथेतून व्यक्त झालेल्या जीवनभाष्यामुळे कथेला निराळे

सामर्थ्य, सौंदर्य प्राप्त झाले आहे. 'अम्मा', 'अतिथी देवो भव', 'भाकरी', 'समुद्राचे पाणी', 'अमरवेल', 'त्याग', 'रीतभात', 'आनंदग्रंथी' यांसारख्या कथा उदाहरणे म्हणून पाहता येतील. नाजूक हाताने भावछटांचे काव्यात्म चित्रण करत मानवी जीवनातील शाश्वत मूल्यांचे दर्शन घडवणे व वाचकावर संस्कार करणे हे त्यांच्या कथेचे मुख्य कार्य आहे. नव्या - जुन्याच्या संगमावर उभी असलेली चोरघडे यांची कथा वाचकाला आकृष्ट केल्याशिवाय राहात नाही.

१९४५ ते १९६० मधील महत्त्वाचे कथाकार :

मराठी कथेच्या क्षेत्रात महत्त्वाचे बदल हरिभाऊ आपटे यांच्यानंतर नवकथेने केलेले दिसतात. हरिभाऊंनी आधुनिक मराठी कथेची जडणघडण केली, तर नवकथेने कथेकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला. १९४५ पासून मराठी कथेतील बदललेल्या मूल्यांची कल्पना स्पष्टपणे येऊ लागली. 'सत्यकथा', 'अभिरुची', 'साहित्य' यांसारख्या मासिकांमधून प्रामुख्याने नवकथा दिसू लागल्या. गंगाधर गाडगीळ, अरविंद गोखले, प. भा. भावे आणि व्यंकटेश माडगूळकर हे चार बिनीचे नवकथाकार. सर्वांनी साधारणतः १९४० च्या आसपास कथालेखनास सुरुवात केली.

अरविंद गोखले हे या कालखंडातले महत्त्वाचे मानकरी होत. त्यांनी वि. स. खांडेकर, वामनराव चोरघडे, य. गो. जोशी यांच्यासारख्या जुन्या कथाकारांचे संस्कार घेऊन कथालेखनास सुरुवात केली, पण त्यांचे अंधानुकरण मात्र केले नाही. जुन्यातील आवश्यक तेवढे घेतले, पण नव्या जाणिवा आणि नवी अनुभूती यांना वेगळा आविष्कार देऊन त्यांनी स्वतःच्या कथेचे नवेच विश्व निर्माण केले. १९४५ साली सत्यकथेत प्रसिद्ध झालेल्या 'कोकराची कथा' या कथेने वाचकांचे लक्ष वेधून घेतले. परमनप्रवेशाच्या सामर्थ्याचा प्रत्यय या कथेतून इतका विलक्षण येतो की त्यामुळे ही कथा नवकथेची अग्रदूती ठरली आहे. मराठी कथा नव्या दिशेने वाटचाल करु लागली ती याच कथेपासून. १९४५ साली प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या 'नजराणा' या कथासंग्रहापासून १९६९ मध्ये प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या मंत्रमुग्धा या कथासंग्रहापर्यंत त्याचे एकवीस कथासंग्रह चाळले तरी त्यांचे कथाविश्व किती व्यापक आहे व समाजातील विविध थरांचे चित्रण त्यांनी किती सामर्थ्याने केले आहे हे दिसुन येते. व्यक्ती ही गोखल्यांच्या कथेचे केंद्र आहे आणि त्या व्यक्तीही समाजातील सर्व पातळीतील असतात. वडारवाड्यातील सुन्कीपासून तो प्रथमच सासरहून माहेरी आलेल्या आक्कापर्यंत सर्व प्रकारच्या व्यक्ती त्यांच्या कथाविश्वात भेटतात. या सर्वांच्या अंतरंगात गोखले शिरतात. त्यांच्या विश्वाशी ते एकरुप होतात, त्यांच्या भावनांची विलक्षण गुंतागुंत आपल्या हलक्या व नाजूक हाताने ते सोडवतात आणि त्यांच्या मनातील व्यथा व भावकल्लोळ परिणामकारक रीतीने व्यक्त करतात. परमनप्रवेशाचे सामर्थ्य त्यांच्याइतके फार थोड्या लेखकांना लाभले असेल. 'मीलन', 'नकार', 'दिव्य' यांसारख्या कथांमधून गोखले यांच्या

कथालेखनकौशल्याचे प्रत्यक्ष दर्शन घडते. 'मंजुळा' सारख्या कथेतुन त्यांनी औद्योगिकीकरणाच्या उंबरठ्यावर शहरातील माणसांची होणारी कोंडी आणि नव्या - जुन्या संस्कारांच्या सीमारेषेवर वावरण्यावर स्त्रीच्या मनाची उलघाल दाखवली आहे. गोखले यांचा पिंड अधिक भावनाप्रधान आहे. त्यांचे माणसांवर प्रेम आहे. त्यामुळे त्यांची कथा मानवी मूल्ये जपण्यावर भर देते. मात्र त्यांच्या नैतिकतेच्या कल्पना ह्या पारंपरिक आणि स्थूल नाहीत.

गंगाधर गाडगीळ हे नवकथेच्या दालनातील दुसरे मानकरी होत. त्यांची बेडर प्रयोगशीलता, स्तीमित करणारी अंतर्विरोधाची मांडणी, निरनिराळ्या पातळीवरुन अनुभव घेण्याची पद्धती, अभिव्यक्तीचे अगदी वेगळे तंत्र, अद्‌भूताचा अनेकदा घेतलेला आश्रय व अनुभवांच्या समृद्धीचा त्यात येणारा प्रत्यय या साऱ्यामुळे गाडगीळांच्या कथेचा घाट अगदी निराळा झाला आहे. विविधता व वैचित्र्य हेच त्यांच्या कथांचे विशेष आहेत. 'किडलेली माणसे', 'वारा भरलेले शीड', 'सुखी माणसे', 'मृत्यूचे संजीवन', 'कांगावा', 'शिकवण', 'सलामी' यांसारख्या कथांमधून जीवनाच्या विविध पातळीवरुन जीवनानुभव घेण्याचे गाडगीळांचे प्रतिभासामर्थ्य दृष्टीस पडते. तसेच 'बिनचेहेऱ्याची संध्याकाळ', 'माणूस - परी कासव', 'पावसाळी हवा', 'वर्षा' यांसारख्या कथांमधून गाडगीळांची प्रयोगशीलता दिसुन येते. त्यांच्या कथेत घटनांपेक्षा मनोविश्लेषणाला जास्त महत्त्व असते. मानवी वर्तनाच्या मुळाशी असलेल्या कामप्रेरणेचा कसून शोध घेणे हे त्यांच्या कथेचे आणखी एक वैशिष्ट्य आहे. वैयक्तिकता विसरायला लावून माणसांना बाहुल्याप्रमाणे नाचवणारी समाजव्यवस्था हाही त्यांच्या चिंतनाचा विषय आहे. ते उघडपणे सामाजिक चिंतन करत नसले तरी मानवी व्यवहारांना जखडून ठेवणाऱ्या सामाजिक चौकटी त्यांच्या कथेत स्पष्ट रुपाने व्यक्त होत असतात. मोडणारी सरंजामशाही आणि बदलणारे गाव यांचे विवरण ते 'उद्‌ध्वस्त विश्व' सारख्या कथेत करतात. एकत्र कुटुंबातील राजकारण ते कडू- गोड मध्ये मांडतात, तर पुरुषप्रधान व्यवस्थेत होणारी स्त्रीची घुसमट भागलेला चांदोबा मध्ये व्यक्त करतात. पुरुषप्रधानता हा विषय १९८० नंतर स्त्रियांच्या कथेत मोठया प्रमाणावर यायला लागला. पण त्याच्या कितीतरी आधी गाडगीळांनी मोठ्या कलात्मक पद्धतीने तो या कथेत मांडलेला होता.

पु. भा. भावे यांची कथा गोखले व गाडगीळांपेक्षा वेगळी आहे. उद्दाम भावना व कणखर आणि प्रभावी भाषा यातून त्यांनी आपले कथाविश्व फुलवले आहे. प्रणयभावनेच्या विविध छटा त्यांच्या कथांमधून दिसून येतात. 'सतरावे वर्ष' ही कथा यादृष्टीने पाहण्यासारखी आहे. 'प्रतारणा' ही कथाही प्रेमाच्या गुंतागुतीचे कलात्मक रीतीने विश्लेषण करणारी आहे. याबरोबरच सामाजिकतेचा आविष्कार घडवणाऱ्याही अनेक कथा भावे यांनी लिहिल्या आहेत. 'पाषाण', 'संस्कृती', 'पापी माणसे', 'पहिले पाप' यांसारख्या कथा वाचकांना विचारप्रवृत्त करतात. सामाजिकतेबरोबर

त्यांनी जीवन, मृत्यू याबाबतचे चिंतन करणाऱ्या कथाही लिहिल्या आहेत. 'झोप', 'अखेर' अशासारख्या त्यांच्या कथांतून हे चिंतन व्यक्त झालेले आहे.

व्यंकटेश माडगूळकरांची कथा वरील कथाकारांपेक्षा निराळ्या मार्गाने जाताना दिसते. त्यांच्या माणदेशी माणसांमधील कथांमधून त्यांनी एक निराळीच सृष्टी उभी केलेली आहे. अनेकांनी ग्रामीण जीवनाचे चित्रण कथांतून केले आहे. त्या सर्वांच्या कथांतून कृत्रिमता आली, पारंपरिक संकेत आले, पण माडगूळकरांची लघुकथा माणदेशच्या अस्सल कसदार मातीतून निर्माण झाली आहे. माणगंगेच्या परिसरातील व्यक्तीचे दारिद्र्य, त्यांचा भोळेपणा, त्यांची कणखर वृत्ती, त्यांच्या अडाणीपणा व विकारसुलभता, त्यांच्या समजुती व त्यांच्या मनात दडून राहिलेला मानवतेचा अंश या सर्वांचे दर्शन त्यांनी आपल्या कथाविश्वातून परिणामकारक रीतीने घडवले आहे. माणदेशातील व्यक्ती रंगवताना केवळ दैन्य व दु:ख यांनी अगतिक झालेली स्वभावचित्रे ते रंगवतात असे नव्हे, तर त्यांच्या स्वभावचित्रणात विविधता आहे. कणखर, दुबळी, उत्साही, निराश, इमानी, बदमाष, भोळीभाबडी, धूर्त, उन्मत्त, लोभी अशा भिन्न प्रकृतींची माणसे त्यांनी माणदेशी माणसे मध्ये रंगवलेली आहे. त्यांच्या लेखणीचे कसब हे, की ही बहुरंगी स्वभावाची माणसे रंगवताना त्या व्यक्तीबद्दल वाचकाच्या मनात जिव्हाळा उत्पन्न करतात. बन्याबापूसारखा तालेवार ब्राह्मण, मरायला टेकला असतानासुद्धा काळ्या आईवरच्या निष्ठेने कबूल करुनही जमीन न विकणारा म्हातारा आप्पा, खोंडाला मारुन मेजवानी उडवण्याचा बेत करणारे सद्या व इटुबा अशी त्यांनी रंगवलेली व्यक्तिचित्रे पाहिली की माडगूळकरांच्या कथालेखनातील वैविध्य स्पष्टपणे दिसून येते. त्यांच्या कथालेखनातील सामर्थ्य त्यांच्या अशा व्यक्तिदर्शनात आहे. पण केवळ ते व्यक्तिदर्शन करुन थांबत नाहीत, तर ज्या वातावरणात त्यांच्या व्यक्ती वावरतात त्या माणदेशचे वातावरण तितक्याच परिणामकारकरीतीने ते रंगवतात.

या चार कथाकारांनी जे महत्त्वाचे कार्य केले त्याचाच विस्तार करण्याचे कार्य त्यांच्या नंतरच्या काळातल्या अनेक कथाकारांनी केले. १९४५ ते १९६५ हा कालखंड असा आहे की त्यात जुने कथाकारही लेखन करत होते. या संदर्भात दि. बा. मोकाशी हे नाव पुढे येते. गोखले यांच्या आधीपासून त्यांचे लेखन सुरु होते. लामण दिव्यातील त्यांचे लेखन प्रयोगावस्थेत असले तरी कथामोहिनीमध्ये मात्र ते बरेच पुढे गेलेले दिसतात. व्यक्तिमनाचा वेध घेण्याचे त्यांचे कौशल्य गोष्टीची मोहिनी, रहस्यकथेचा दिवस यांसारख्या कथांतून जाणवते. 'बुवा आणि मी', 'शरावती', 'अश्व म्हणजे घोडा' या त्यांच्या विशेष उल्लेखनीय कथा आहेत. सदानंद रेगे यांची कथा देखील व्यक्तींच्या अंतर्मनाचा वेध घेणारी आहे, तरल आहे. 'काळोखाची पिसे', 'चांदणे', 'चंद्र सावली कोरतो' यांसारख्या कथांतून रेगे यांच्या बहुरंगी व्यक्तित्वाची साक्ष पटते. 'मिनी', 'पायगुण', 'एक होता उंदीर' या कथा पाहता त्यांच्यातील अद्भुताची आवड दृष्टीस पडते. पु. शि. रेगे ह्या कविमनाच्या

कवीने रुपककथेमध्ये काही कथा लिहिल्या आहेत. त्यांतून त्यांच्या कविमनाचे नाजूक पदर दिसून येतात. अत्यंत मोजक्या शब्दांत समर्थपणे भाव व्यक्त करण्याची कला त्यांना साधली आहे, हे या कथांतून दिसून येते. त्यांनी व्यक्त केलेल्या भावानुभवातील सहजता वाचकाच्या मनाचा ठाव घेते.

१९५५ च्या आसपास आणि नंतर मराठी कथेच्या क्षेत्रात विविध प्रयोग करुन तिच्या कक्षा रुंदावण्याचा प्रयत्न करणारे अनेक कथालेखक पुढे आले. काहींचे कथालेखन नवकथाकारांच्या काळापासूनच सुरु झाले होते. आपले असे निराळेपण टिकवण्याचा त्या काळातही त्यांनी प्रयत्न केला. त्या लेखकांत शशिकांत पुनर्वसु, गो. रा. दोडके आणि पंडित शेटे या लेखकांचा समावेश होतो. व्यक्तिमनात खोलवर शिरुन त्यांच्या अंत:करणातील शल्य समजून घेण्याचे आणि ते परिणामकारक रीतीने मांडण्यांचे कौशल्य या तिघाही कथाकारांच्या कथांतून दिसते. शशिकांत पुनर्वसु यांच्या संध्याकाळच्या सावल्या, शांती, पुष्करिणी या तीन संग्रहातील कथा पाहता त्यांचे लेखनकौशल्य दृष्टीस पडते. दोडके व शेटे यांच्याही कथांमधून स्वत:चे अनुभवविश्व विस्तारण्याचे प्रयत्न चाललेले दिसत होते. मात्र या तीन गुणवान लेखकांचा अकाली मृत्यू झाला त्यामुळे मराठी कथेचेही काही प्रमाणात नुकसान झाले. शांताराम यांनी देखील १९५० च्या आसपासच लेखनाला सुरुवात केली होती. मात्र त्यांची कथा १९५५ पासुन रुप घेऊ लागली. त्यांच्या छळ, राधाबाई, उद्रेक यांसारख्या कथा वाचल्या म्हणजे व्यक्तिचित्रणाची सूक्ष्मता, भावनेची तरलता यांचा प्रत्यय येतो. याच कालखंडात दोन कथाकारांचा उल्लेख करायला हवा. ते म्हणजे गाडगीळानंतर कथेच्या क्षेत्रात विलक्षण सामर्थ्याने नवे नवे प्रयोग करणारे जी. ए. कुलकर्णी. दुसरे लेखक म्हणजे विद्याधर पुंडलिक होत. १९६० नंतर यांच्या कथालेखनाला बहर आलेला आहे. परंतु त्यांच्या कथालेखनाची सुरुवात नवकथेच्या काळातच झालेली आहे. गोखले - गाडगीळ यांची नवकथा प्रगतीच्या मार्गाने नेण्यात १९५५ ते १९६५ या कालखंडात अनेक लेखकांनी हातभार लावला होता. त्यातील पुंडलिक आणि जी. ए. हे होत.

१९६० पर्यंतच्या कथेचे तंत्र :

नवकथेचा उदय आणि तिचा मुख्य प्रवाहात स्वीकार या दोन घटनांना काही प्रमाणात सामाजिक परिस्थिती कारणीभूत ठरली , तर काही प्रमाणात त्या काळातील वाङ्मयीन वातावरण कारणीभूत ठरले. नवकथेने मराठी कथेला अधिक सूक्ष्म आणि अंतर्वेधी बनवले. नवकथेने केलेल्या बदलांचा विचार केल्याखेरीज मराठी कथेचा इतिहास सुस्पष्टपणे आणि सुसंगततेने अभ्यासता येत नाही.

अरविंद गोखले यांची कथा घटनाप्रधान आहे. त्यांचे कथाविश्व व्यापक आहे. त्यात विविध जातींची व थरांची माणसे आहेत. जातीय दंगे, फाळणी, महागाई इत्यादी घटनांची पार्श्वभूमी त्यांच्या कथांना आहे. त्याच्याबरोबर स्त्रीजीवनाचे

दर्शनही त्यांनी कथेतून हळूवारपणे घडवले आहे. डॉ. इरावती, कमळण, मेधा, मंजुळा, मिथिला, उमा इत्यादी त्यांनी रंगवलेल्या स्त्रियांची चित्रे विशेष उठावदार झालेली आहेत. परमनप्रवेशाच्या सामर्थ्यामुळे त्यांची कथा व्यक्तिवादी झालेली दिसते. व्यक्तिचित्रणाबरोबर त्यांची निवेदनशैलीही आकर्षक आहे. जीवनातील बहुविध अंगाशी एकरुप होण्याचा ते प्रयत्न करताना दिसतात त्यामुळे त्यांच्या कथेचा विस्तार वाढला आहे. त्यांच्या कथा पाहता असे दिसते की, अजून बरंच पाहायचं आहे, खूप कमवायचं आहे, ही जाणीव त्यांना उल्हसित करते. या जाणिवेमुळेच त्यांचे लेखन ताजेतवाने वाटते.

नवकथापूर्वकाळात मराठी कथा आशय आणि अभिव्यक्ती या दोन्ही संदर्भात साचेबंद झाली होती. नवकथेने कथेचे रुढ तंत्र नाकारले आणि नवे आकृतिबंध निर्माण केले. पहिल्या-दुसऱ्या महायुद्धानंतर पाश्चात्त्य देशातील वाङ्मयातही आमूलाग्र बदल झाले होते, होत होते. दादाईझमसारखी बंडखोर प्रणाली आणि अस्तित्ववादासारखार जीवनातील अर्थ व त्यातील व्यस्तता शोधणारे तत्त्वज्ञान साहित्यातून व अन्य कलाप्रकारांतून व्यक्त होत होते. कलाकृतीबद्दलच्या पारंपारिक संकल्पना आणि घाट उधळून लावले जात होते. याच काळात दळणवळणाच्या साधनांचा विकास झाला होता. त्यामुळे जग जवळ येत होते. पाश्चत्य जगात चालू असलेल्या घडामोडी इथल्या लेखकांपर्यंत पोहोचत होत्या. नवकथेच्या जडणघडणीत या जागतिक वाङ्मयीन वातावरणाचाही प्रत्यक्षाप्रत्यक्ष परिणाम होत होता. नवकथाकारांना नवा आशय नव्या रुपात कथेच्या मुख्य प्रवाहात आणायचा होता. जुने साचे मोडायचे होते. साहजिक सुरुवातीला नवकथाकारांना आग्रही आणि आक्रमक भूमिका घ्यावी लागली. गंगाधर गाडगीळांनी ही भूमिका अतिशय दमदारपणे निभावली. त्यांनी नव्या आशयाचे आणि नव्या रुपांचे थक्क करणारे अनेक प्रभावी आविष्कार कथेच्या माध्यमातून दाखवले. हे करत असतानाच त्यांनी नवकथेची आवश्यकता आणि तिचे मर्म सांगणारी समीक्षा लिहिली आणि नवकथेची बाजू सक्षम केली. कथेचे नवे वळण विकसित करण्याचे सर्वात अधिक श्रेय गंगाधर गाडगीळ यांच्याकडे जाते. कथारचनेच्या दृष्टीने गाडगीळांच्या कथांमध्ये जी विविधता आढळते ती अन्य नवकथाकारांच्या लेखनात आढळत नाही. गाडगीळ कधी आपल्या कथांतून बालमनाची चित्रे रेखाटतात, तर कधी किशोरांच्या मनोव्यथा व्यक्त करतात. जीवनानुभवाचे दर्शन घडवताना कधी कधी त्यांची कथा भावकाव्याच्या पातळीवर जाते (तलावातले चांदणे), तर कधी जीवनातील क्षुद्रता, साचलेपणा व दैन्य बघून उपरोधिक बनते. गाडगीळांपूर्वीची कथा व्यक्तीची होती तिला त्यांनी समूहाची बनवले. संज्ञाप्रवाही लेखन, स्वप्नांचा आणि प्रतीकांचा वापर, फँटसीचा आधार असे विविध प्रयोग गाडगीळांनी कथालेखनात केले. जीवनातील दुःख, माणसाचा एकटेपणा आणि पराजितता यांचे चित्रण केले. अनेक नमुन्यांची माणसे कथांतून उभी केली. सुष्ट-दुष्ट, प्रकृती–विकृती असे व्यक्तिचित्रणातील हवाबंद

कप्पे संपवून टाकले. पण असे करुनही त्यांची कथा सिनिक बनली नाही. जीवनातील विविध रुपांचे अनेकविध पैलू साकार केल्यामुळे ती साचेबंद बनली नाही. प्रतिमा-प्रतीकांच्या जंजाळात सापडून ती दुर्बोध झाली नाही.

पु. भा. भावे यांच्या कथेचे स्वरुप विविधांगी आहे. त्यात कधी प्रणयाची उद्दाम भावना आढळते तर कधी सामाजिक मनाचे दर्शन घडते. त्यांच्या व्यक्तिचित्रणात वैविध्य आहे, मनोविश्लेषणात सूक्ष्मता आहे व निवेदनशैलीत सामर्थ्य आहे. त्यात क्वचित पाल्हाळ, आढळला, अतिरंजितता आढळली तरी भावे यांच्या लेखनकौशल्यामुळे हे दोष मागे पडतात. पूर्वपरंपरेच्या अभिमानातून त्यांच्या मनात आग्रहीपणा आला असला तरी माणुसकीच्या मर्यादांचीही त्यांना जाणीव होती. त्यामुळेच त्यांचे कथाविश्व गोखले-गाडगीळांपेक्षा निराळे वाटते. सकस भाषाशैली, परिणामकारक भावचित्रण व विशेष म्हणजे कणखरपणा, निरोगीपणा व मोकळेपणा या त्यांच्या व्यक्तिविशेषांचे त्यात होणारे दर्शन यांमुळे त्यांच्या कथाविश्वात एक निराळेच आकर्षण निर्माण झालेले आहे.

'माणदेशी माणसं' यातून माडगूळकरांनी एक वेगळी कथासृष्टी उभी केलेली दिसते. अगदी थोडक्या शब्दांच्या साहाय्याने त्या त्या व्यक्तीचे चित्र वाचकांसमोर उभे करण्याचे त्यांचे कौशल्य अपूर्व आहे. ते बाह्यचित्राबरोबरच त्या व्यक्तीचे अंतरंगही मोठ्या कौशल्यानेही रंगवतात. माणदेशातील जीवनाने माडगूळकरांची कथा अंतर्बाह्य रंगलेली दिसते. त्यांचे कथाविश्व मर्यादित असले तरी ते विलक्षण संपन्न आहे, वैचित्र्याने नटलेले आहे.

प्रस्तुत कालखंडातील लेखक व त्यांची लेखनवैशिष्टये पाहता लक्षात येते की, नवकथेपूर्वी मराठी कथेत कथानाकाला महत्त्व होते. नवकथा कथानुभव सांगण्यावर, मनोविश्लेषणावर व जीवनाचा अन्वयार्थ लावण्यावर अधिक भर देते. मराठी कथेतील आशय जितका व्यामिश्र होत गेला तितकी ती तंत्रदृष्टया विकसित होत गेली. बहुपेडी, बहुस्तरीय आशय व्यक्त करण्यासाठी लागणारा आकृतिबंध देखील लवचिक व बहुकक्ष असावा लागतो हे या कालखंडातल कथेच्या प्रवासाने दाखवून दिले.

१९२० ते १९६० या चाळीस वर्षामधील कथेच्या विकासाचा अभ्यास करण्यासाठी सुरवातीलाच १९२० च्या आधीच्या कथेचा विचार केलेला आहे. कथेच्या बदलाचे, विकासाचे टप्पे असे पडतात-हरिभाऊ आपटे, वि. सी. गुर्जर, दिवाकर कृष्णा, फडके-खांडेकर, नवकथा असे ठळक टप्पे पडतात. हरिभाऊपूर्वकालीन कथा रंजनवादी होती, तिला त्यांनी वास्तववादाकडे आणले. दिवाकर कृष्णांच्या कथेच्या रुपाने मराठी कथेला निखळ सौंदर्यवादी परिमाण लाभले आहे. हरिभाऊंनंतर त्यांच्या कथेत दिसणारी आदर्शवादी प्रवृत्ती खांडेकरांच्या कथालेखनात दिसते. परंतु त्यांच्या कथेतील आदर्शवाद हरिभाऊंप्रमाणे

वास्तववादाच्या पायावर उभा नाही, तर भाबडेपणाच्या आणि स्वप्नरंजनाच्या पायावर उभा आहे. यानंतरच्या कथेला फडके यांनी रंजनवादी व सुखवादी बनवले. नवकथेने हरिभाऊंच्या वास्तववादाचे पुरस्करण करत नव्या वळणाने मराठी कथेला विकसित केले. म्हणजे असे की, हरिभाऊंच्या स्फुट गोष्टीपासून नवकथेपर्यंतच्या प्रवासात मराठी कथेने जी वळणे घेतली ती कथेला विकासाच्या दिशेने नेणारी होती. हरिभाऊंच्या कथेला स्वतःच्या पृथगात्मतेची जाणीव नव्हती. गुर्जरांनी तिला संपूर्ण गोष्ट बनवले व तिचे तंत्र कादंबरीपेक्षा वेगळे आहे, याची जाणीव करुन दिली. ना. सी. फडके यांनी कथेच्या तंत्राचा अभ्यास करुन लघुकथेला लोकप्रियता मिळवून दिली. नवकथाकारांनी तिला तंत्राच्या कचाट्यातून सोडवले. जीवनानुभवांचे अस्सल दर्शन घडवणारी व तंत्राच्या बाह्यबंधनातून मुक्त असलेली कथा किती विविध रुपे धारण करु शकते याचा प्रत्यय नवकथाकारांनी आणून दिला.

इथे गोष्ट मुद्दाम नमूद करण्याजोगी आहे की, नवकवितेप्रमाणे नवकथेनेही मराठी साहित्याचे अंतःप्रवाह पार बदलून टाकण्याचे, मुख्य म्हणजे साहित्यस्वरुप आतून समृद्ध करण्याचे ऐतिहासिक कार्य केले. याचा परिणाम मग मराठी एकांकिका, नाटक, कादंबरी, आत्मचरित्रे इत्यादी वाङ्मयप्रकारांवर झाला व तेही परिवर्तनसन्मुख झाले. १९६० नंतर भालचंद्र नेमाडे, भाऊ पाध्ये इत्यादी कादंबरीकारांनी मराठी कादंबरीचे स्वरुप आमूलाग्र बदलण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. यामागे नवकथेने कथात्मसाहित्याविषयी जे नवे भान आणून दिले ते आहे. नवकथेने नवकादंबरीची वाट मोकळी करुन दिली. १९६० नंतर मराठी कथेची जी संपन्न रुपे दिसतात त्यांची पायाभरणी नवकथेने केलेल्या बदलांनीच झाली.

स्व-अध्ययन :

१. १९२० ते १९४५ मधील कथांची वैशिष्टये लिहा.
२. १९६० पर्यंतच्या कथेचे तंत्र उदाहरणासहित स्पष्ट करा.
३. नवकथेचे स्वरुप स्पष्ट करा.
४. १९२० ते १९६० मधील कथा वाङ्मयाचा आढावा घ्या.

❖❖❖❖

६

कादंबरी (१८७४ - १९२०)

प्रा. संध्या शहापुरे

उद्दिष्टे :

- १८७४ पूर्वीच्या कादंबरी लेखनाचा परिचय करून घेणे.
- हरिभाऊ यांच्या कादंबरी लेखनाचे विशेष समजून घेणे.
- हरिभाऊ आणि समकालीन कांदबरीकार यांचे कादंबरीलेखन अभ्यासणे.
- १८७४ ते १९२० या कालखंडातील कादंबरी लेखनाचे विशेष लक्षात घेणे.

प्रास्ताविक :

कादंबरी हा कथनात्म वाङ्मयप्रकार आहे. या वाङ्मयप्रकाराचा उदय अठराव्या शतकात युरोपात झाला. अर्वाचीन भारतीय कादंबरीने युरोपीय कादंबरीचा वारसा स्वीकारलेला आहे. भारतात कादंबरी हा वाङ्मयप्रकार जेव्हा उदयास आला तेव्हा भारतीय समाज इंग्रजांच्या अंमलाखाली पारतंत्र्यात होता. स्वातंत्र्याची चाहुल लागलेल्या या भारतीय समाजव्यवस्थेत तत्कालीन काळात अनेक स्थित्यंतरे होत होती. पेशवाईच्या अस्तापासून इंग्रजी शिक्षणाचा प्रसार मुद्रणव्यवस्था, पाश्चात्य साहित्याचा परिचय अशा अनेक बाबींचा परिचय महाराष्ट्राला होत होता. त्यातूनच अनेक सामाजिक, सांस्कृतिक बदल घडून येत होते. एकोणिसाव्या शतकातील हे बदल कादंबरी या वाङ्मय प्रकाराच्या उदयास अनुकूल ठरलेले दिसतात. १८७४ ते १९२० या कालखंडातील कादंबरी वाङ्मयाचा अभ्यास करण्यापूर्वी आपण १८७४ पूर्वीच्या कादंबरी लेखनाचा विचार करू.

१८७४ पूर्वीची कादंबरी :

मराठी कादंबरी या वाङ्मय प्रकाराचा जन्म हा एकोणिसाव्या शतकात झालेला दिसतो. जॉन बन्यनच्या 'पिलग्रीम्स प्रोग्रेस' (Pilgrims Progress) या कादंबरीचे भाषांतर हरि केशवजी यांनी 'यांत्रिकक्रमण' असे केले होते. ही कादंबरी इ. स. १८४१ साली प्रसिद्ध झाली. ही मराठीतील पहिली कादंबरी आहे. परंतु ती भाषातरित असल्याने स्वतंत्र कादंबरीचा मान बाबा पद्मनजी यांच्या 'यमुना पर्यटन' (१८५७) या कादंबरीला द्यावा लागतो. मराठीतील ही पहिली स्वतंत्र कादंबरी म्हणून

तिचा उल्लेख केला जातो. या कादंबरीचा हेतू ख्रिस्ती धर्माचा प्रचार करणे हा आहे. तसेच यमुनेच्या कथेसह तिच्या पर्यटनाच्या निमित्ताने तिला भेटलेल्या विधवांच्या कथा कथन केल्या आहेत. या कादंबरीतील ख्रिस्ती प्रभावामुळे तिला पहिल्या कादंबरीचा मान काहींनी नाकारला आहे. आणि इ. स. १८६१ मध्ये लक्ष्मण मोरेश्वर हळबे यांच्या 'मुक्तामाला' या कादंबरीला तो देण्याचा प्रयत्न केला आहे. असे असले तरी कादंबरी या साहित्यप्रकाराच्या अपेक्षांची पूर्ती 'यमुना पर्यटन' या कादंबरीने होते. म्हणून तिलाच मराठीतील पहिली कादंबरी म्हणून ओळखले जाते.

मराठीतील कादंबरीलेखनावर 'मुक्तामाला' (१८६१) या कादंबरीनेही आपला ठसा उमटविलेला दिसतो. या कादंबरीमुळे अद्‌भूतरम्य रंजनवादी कादंबरीचा एक प्रवाहच त्या काळात निर्माण झालेला दिसतो. हळबे यांची 'रत्नप्रभा' (१८७८) ही कादंबरीदेखील 'मुक्तामाला' या पठडीतील असल्याचे दिसते. लक्ष्मण मोरेश्वर हळबे यांच्यासारखेच अद्‌भूतरम्य कादंबरी लेखन करणारे अनेक कादंबरीकार उदयास आले. इ. स. १८६८ साली नारो सादाशिव रिसबूड यांची 'मंजूघोषा' ही कादंबरी आली. 'मुक्तामाला' ही रंजनपर आणि 'मंजूघोषा' ही अद्‌भूतरम्य कादंबरी आहे. रिसबुडांची 'विश्वासराव' ही कादंबरी १८७० मध्ये प्रसिध्द झाली. या कादंबरीतील विश्वासराव हा सरदारपुत्र उत्तर हिंदुस्थान जातो. आणि तेथील राजाला तो दुष्ट लोकांच्या वाईट कारस्थांनापासून वाचवण्यात यशस्वी होतो. असे याचे सरळ कथानक आहे. रिसबूडांप्रमाणेच या काळात केशव लक्ष्मण जोरवेकर यांच्या 'विचित्र पुरी' (१८७०) या अद्‌भूतरम्य कादंबरीनेही लोकप्रियता मिळविलेली दिसते.

प्रस्तुत कालखंडात अद्‌भूतरम्य, रंजनपर कादंबऱ्यांबरोबर भाषांतरित कादंबऱ्याही प्रसिध्द झालेल्या दिसतात. संस्कृत, इंग्रजी, अरबी, फारशी अशा भाषांमधून मराठी मध्ये अनेक कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या. हरि केशवजी यांनी 'पिलग्रिम प्रोग्रेस' चे 'यांत्रिक क्रमण' असे भाषांतर केलेले दिसते. कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनी 'अरबी भाषेतील सुरस व चमत्कारिक गोष्टी' (१८६१) असे भाषांतर केले. तसेच 'वेताळ-पंचविशी', 'सिंहासनबत्तिशी', 'पंचोपाख्यान' यांसारखी पुस्तके मराठीत आली. एकूण भाषांतरित कादंबऱ्यामध्ये चमत्कारिकता, अद्‌भूतता, वैचित्र्यपूर्णता ही वैशिष्टे असलेली दिसतात.

१८७४ पूर्वी रंजनप्रधान कादंबऱ्याबरोबर ऐतिहासिक स्वरुपाचे कादंबरी लेखन ही झालेले दिसते. मोरोबा कान्होबा विजयकर यांची 'घाशीराम कोतवाल' ही कादंबरी १८६३ मध्ये प्रसिद्ध झाली. रामचंद्र भिकाजी गुंजीकर यांनी 'मोचनगड' (१८७१) ही कादंबरी लिहिली आहे. गणपतराव आणि त्याची पत्नी गंगाबाई यांची कहाणी या कादंबरीत मांडली आहे. वि. ज. पटवर्धन यांनी '१८५७ सालचे बंडाची धामधूम किंवा हंबीरराव व पुतळाबाई' (१८७५) ही कादंबरी लिहिली आहे. यामध्ये

१८५७ सालातील बंडाच्या पार्श्वभूमीवर नानासाहेब पेशवे यांचा आश्रित हंबीरराव आणि त्याची पत्नी पुतळाबाई यांची कथा सांगितली आहे..

१८७४ ते १९२० या कालखंडातील कादंबरी :

हरिभाऊ (१८६४-१९१९) :

प्रस्तुत कालखंडाचा विचार करावयाचा तर या कालखंडात हरिभाऊ आपटे यांचे कादंबरी लेखन विचारात क्रमप्राप्त ठरते. ह. ना. आपटे यांच्या कादंबरीची प्रेरणा इंग्रजी वाङ्मय आहे. असे असले तरी पुढे त्यांच्या कादंबरी लेखनाला स्वतंत्र दृष्टिकोन प्राप्त झालेला दिसतो. उदा. 'मधली स्थिती' या कादंबरीत अव्वल इंग्रजी काळातील पाश्चात्यांच्या अंधानुकरणाचे आणि अज्ञानाने व्यसनाधीन झालेल्या समाजाचे चित्रण आले आहे. त्यांच्या कादंबरीलेखनाने मराठी कादंबरीच्या इतिहासाला एक मानदंड प्राप्त करून दिलेला दिसतो. नरहर कुरूंदकर हरिभाऊंविषयी म्हणतात, 'यमुना पर्यटन' 'शिरस्तेदार' अशा काही कादंबऱ्यांचा अपवाद वगळता मराठी कादंबरीच्या रंजनवादी आणि बोधवादी प्रवाहाच्या पार्श्वभूमीवर कादंबरीकार म्हणून ह. ना. आपटे. यांचा झालेला उदय ही एक स्वयंभू घटना म्हटली पाहिजे'. (धार आणि काठ, पृ. ४४)

ह. ना. आपटे यांनी इंग्रजी कादंबरीचे संस्कार स्वीकारत वास्तवाला सामोऱ्या जाणाऱ्या वास्तववादी कादंबऱ्या लिहिल्या. सुधारणावाद हा त्यांच्या विचारांचा गाभा असलेला दिसतो.

हरिभाऊची पहिली कादंबरी 'मधली स्थिती' ही इ. स. १८८५ मध्ये 'पुणे वैभवां'तून प्रसिद्ध झाली. या कादंबरीचे प्रेरणास्थान रेनॉल्डसची 'Mysteries of London' होती. हरिभाऊनी प्रस्तुत कादंबरीत एकोणिसाव्या शतकाच्या अखेरच्या टप्प्यातील पुण्यातील समाजजीवनाची अनेक चित्रे रेखाटली आहेत. या कादंबरी नंतर 'गणपतराव' ही कादंबरी 'मनोरंजन' आणि 'निबंधचंद्रिका' या मासिकामधून क्रमशः प्रसिद्ध होत होती. परंतु पुढे हे मासिके बंद पडल्याने ती अपुरी राहिली असावी. ती पुढे १९१९ मध्ये प्रसिद्ध झाली. प्रस्तुत कादंबरीत पुण्यातील पांढरपेशा मध्यमवर्गीय स्त्रीच्या वाटयाला येणारे दुःख गोदावरी या पात्राच्या माध्यमातून रेखाटले आहे. तसेच गणपत, नाना विष्णुपंत या पात्रांच्या माध्यमातून समाजसुधारणा विषयक चर्चा घडवून आणली आहे.

हरिभाऊ यांच्या 'पण लक्षात कोण घेतो' या कादंबरीने लेखनाचा एक आदर्श निर्माण केलेला दिसतो. ही कादंबरी 'करमणूक' या मासिकातून १८९० पासून १८९३ पर्यंत प्रकरणशःतील येत होती. प्रस्तुत कादंबरीतील यमू या पात्राद्वारे दुःखाने ग्रस्त असलेल्या तत्कालीन ब्राह्मण स्त्री जीवनाचे वास्तचित्रण आलेले आहे. यमू या पात्राच्या शोकांतिकेचे कथानक, व्यक्तिव्याक्तिंमधील गुंतागुंत, परिणामकारक व्यक्तिरेखा, भावानुकूल भाषा या गुणवैशिष्टयांमुळे ही कादंबरी उच्च

दर्जाची ठरलेली दिसते. प्रस्तुत कादंबरीमधून महाराष्ट्रातील पांढरपेशी एकत्र कुटूंब जीवनाची करूण शोकात्मिका उभी करते आणि वाचकास शोकात्म अनुभव देऊन अस्वस्थ करून चिंतन करावयास भाग पाडते.

हरिभाऊ यांनी 'पण लक्षात कोण घेतो' या कादंबरीनंतर 'यशवंतराव खरे', 'मी', 'मायेचा बाजार', 'जग हे असे आहे', 'भयंकर दिव्य', 'आजच', 'मायेचा बाजार' या सामाजिक कादंबऱ्या लिहिल्या. प्रस्तुत कादंबरी लेखनातून हरिभाऊंचे मन सामाजिक सुधारणावादी असल्याचे प्रत्ययास येते. वास्तवाबरोबरच आदर्श जगाचेही चित्र त्यांनी उभे करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. तसेच 'भयंकर दिव्य', 'मायेचा बाजार', यांसारख्या कादंबऱ्यांमधून स्त्री शिक्षण, प्रौढ विवाह, विधवा विवाह यांसारख्या तत्कालीन काळातील अनेक समस्या मांडून समाज सुधारणा करण्याचा प्रयत्न त्यांनी केलेला दिसतो. त्यांनी सामाजिक कादंबरी लेखनातून भीषण वास्तवाचा सूक्ष्म वेध घेण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. उदा. 'पण लक्षात कोण घेतो' मधील यमू, 'मधली स्थिती' मधील दुर्गा यांच्याद्वारा सोशिकतेचे दर्शन घडते.

हरिभाऊ यांची पहिली ऐतिहासिक कादंबरी म्हणजे 'उष:काल' ही १८८५ पासून करमणूकीतून आलेली आहे. असे असले तरी मेडोज टेलरच्या 'टिपू सुलतान' या कादंबरीचा संक्षिप्त अनुवाद 'म्हैसूरचा वाघ' या नावाने ऐतिहासिक कादंबरीलेखनाला त्यांनी प्रारंभ केलेला आहे. त्यांच्या 'वज्राघात' (१९१५) या कादंबरीने मराठीतील ऐतिहासिक कादंबरीला प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. त्यांनी 'केवळ स्वराज्यासाठी', 'रूपनगरची राजकन्या', 'गड आला पण सिंह गेला' (१९०३), 'सूर्योदय' (१९०५-०८), 'मध्यान्ह' (१९०६-०८), 'सूर्यग्रहण' (१९०८-०९) या कादंबऱ्यामधून शिवकालीन इतिहास त्यांनी वाचकांसमोर ठेवलेला दिसतो. तसेच 'चंद्रगुप्त' (१९०२-०४) ही प्राचीन मौर्यकाळातील चाणक्याच्या कुटिल कारस्थानाची कथा सांगणारी आहे. हरिभाऊ यांची 'वज्राघात' ही कादंबरी ऐतिहासिक कादंबरीलेखनाचा मानदंड ठरलेली दिसते. या कादंबरीत विजयनगरच्या विनाशकालाचे चित्र, तसेच रामराजा, मेहेरजान, नूरजहान आणि रणमस्तखान यांच्या एकमेकांमध्ये गुंतलेल्या जीवनाचे शोकात्म कथन प्रभाविपणे साकारले आहे. एकूणच हरिभाऊ यांची 'पण लक्षात कोण घेतो' ही सामाजिक कादंबरी आणि 'वज्राघात' ही ऐतिहासिक कादंबरी प्रारंभीच्या काळात मराठी कादंबरीलेखनातील महत्वाची प्रेरणास्थाने ठरताना दिसतात. या दोन्ही कादंबरींना प्रारंभीच्या काळात उत्तम दर्जा प्राप्त झालेला दिसून येतो.

नाथमाधव उर्फ द्वारकानाथ माधवराव पितळे :-

प्रस्तुत कालखंडात नाथमाधव यांनी बोधवादी कादंबऱ्या लिहिल्या. त्यांच्या 'सांयकाळची करमणूक' (१९०५) 'प्रेमवेडा' (१९०५) यांसारख्या कादंबरी लेखनातून तरूणांना संयमाने वागण्याचा संदेश दिलेला दिसतो. 'प्रेमवेडा' या

कादंबरीमध्ये अविचाराने वागणाऱ्या तरूणाचे जीवन कसे उद्ध्वस्त होते ते सांगितले आहे. १९१२ ते १९२० या दरम्यान त्यांनी 'विहंगवृंद', 'सुहासिनी', 'रायक्लब', 'गृहदशेचा फेरा', 'प्रेम आणि सूड', 'दोन भांवडे', 'दैवाचा खेळ', 'देशमुखवाडी', 'डॉक्टर' या कादंबऱ्या लिहिल्या. या सर्व कादंबऱ्या बोधवादी असल्याचे दिसते. समकालीन समाजजीवनातील स्त्रीशिक्षणाचा प्रश्न त्यांच्या 'डॉक्टर' या कादंबरीत आलेला दिसतो.

नाथमाधवानी ऐतिहासिक कादंबरी लेखनही केलेले आहे. त्यांनी 'स्वराज्याचा श्रीगणेशा' (१९२१), 'स्वराज्याची घटना' (१९२५), 'स्वराज्याची स्थापना' (१९२२), 'स्वराज्यावरील संकट', 'स्वराज्याचे परिवर्तन'. इत्यादी ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिल्या. त्यांच्या 'वीरधवल' (१९१३), 'सावळ्या तांडेल' (१९१४), या दोन कादंबऱ्या अधिक गाजलेल्या दिसतात. ऐतिहासिक कादंबरी लिहिताना त्यांनी स्वराज्याच्या चळवळीला पोषक ठरेल याकडे लक्ष दिलेले दिसते. पारंतत्र्यात असल्याने आणि दुर्बल बनलेल्या जनतेला जागे करून त्यांच्यात चैतन्य आणि उत्साह निर्माण करण्याचा प्रयत्न त्यांच्या ऐतिहासिक कादंबऱ्यांनी केलेला दिसतो. तसेच इतिहासाला कल्पनारम्य बनवून वाचकांसमोर ठेवणे हे त्यांच्या ऐतिहासिक कादंबऱ्यांचे स्वरूप असल्याचे ही दिसते.

ना. ह. आपटे (नारायण हरी आपटे) (१८८९ - १९७१) :-

यांनी प्रस्तुत कालखडात 'अजिंक्य तारा' (१९०९), 'मानवी आशा विरूध्द देवाची इच्छा' (१९१२), 'लांछित चंद्रमा' (१९१४), 'रजपुतांचा जन्म' (१९१९), 'संधिकाल' (१९२२) या ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिल्या. तसेच 'वैभवाच्या कोंदणात', 'भाग्यश्री', 'याला कारण शिक्षण', 'पहाटेपूर्वीचा काळोख', 'सुखाचा मूलमंत्र' इत्यादी कादंबऱ्या आपटे यांनी लिहिल्या. त्यांची बोधवादी नीतिपर दृष्टी या कादंबऱ्यांतून प्रतित होते. तरूण पिढीला मार्गदर्शक ठरेल अशी बोधवादी विचारसरणी देण्यासाठी या कादंबऱ्यांचे लेखन झालेले दिसते. त्यांच्यामते, पाश्चात्य नवविचारांचा आणि सुधारणांचा प्रवाह थांबविला पाहिजे. म्हणूनच त्यांच्या कादंबऱ्यांमधील सनातनी पात्रे सद्वर्तनी आणि सुधारणावादी पात्रे दुर्वर्तनी असलेली दिसतात. त्यांच्या कादंबऱ्याची वैशिष्टये म्हणजे स्त्री-पुरूषांच्या प्रभावी व्यक्तिरेखा, गुंतागुंतीचे कथानक, निवेदन कौशल्य ही होत. त्यांनी मध्यमवर्गीयांचे कौटुंबिक, सामाजिक जीवन आदर्शरूपात मांडलेले दिसते. तसेच स्त्रीजीवन, स्त्रीचरित्र, स्त्रीशिक्षण या अंगाना ही त्यांनी कादंबरी लेखनात महत्त्वाचे स्थान दिलेले दिसते.

वा. म. जोशी (वामन मल्हार जोशी) :-

प्रस्तुत कालखंडात वा. म. जोशी यांची 'रागिणी' (१९१५), 'आश्रमहरिणी' (१९१६), 'नलिनी' (१९१९) या १९२९ पूर्वी तीन कादंबऱ्या प्रसिद्ध झालेल्या आहेत. असे असले तरी १९२० नंतर ही त्यांचे कादंबरी लेखन सुरू असलेले

दिसते. त्यांच्या कादंबरी लेखनातून त्यांचे तत्वजिज्ञासू मन प्रत्ययास येते. आपल्या सभोवतालच्या पांढरपेशी मध्यमवर्गीयांचे वैचारिक विश्व, त्यातील मतमतांतरे, त्यांच्या समस्या, पांढरपेशी वृत्तीचे जीवन जगणाऱ्यांचे जग याचा प्रभाव त्यांच्या कादंबरी लेखनावर पडलेला दिसतो. 'आश्रमहरिणी' या कादंबरीचा अपवाद वगळता इतर कादंबऱ्यांमध्ये तत्त्वचर्चा ही आनुषंगिक बनलेली दिसते. उत्तरा, नलिनी, रागिणी या व्यक्तिरेखा तत्कालीन वास्तवापासून कल्पित व्यक्तिरेखा रेखाटल्याचे दिसते. तत्त्वचर्चा या घटकामुळे त्यांच्या कादंबरीत विषयांतर होत असल्याचे जाणवत राहते. असे असले तरी त्यांच्या सुधारक व्यक्तिरेखांनी लक्ष वेधून घेतलेले दिसून येते. 'रागिणी', 'नलिनी' या कादंबऱ्या त्याकाळात चर्चेचा विषय ठरल्याचे दिसते.

इतर कादंबरीकार :-

अव्वल इंग्रजी कालखंडात प्रबोधनाच्या प्रेरणेचा प्रभाव अनेक कादंबरीकारावंर पडलेला दिसतो. कादंबरी या वाङ्मय प्रकारात रंजन आणि बोध या दोन उद्दिष्टयांनी १८७४ ते १९२० या कालखंडात अनेकांनी कादंबरी लेखन केले. सहकारी कृष्ण, चिं. वि. वैद्य, ना. वि. कुलकर्णी, वि वा. हडप, काशीबाई कानिटकर, बा. सं. गडकरी इत्यादी लेखकांनी कादंबरी लेखन केले.

सहकारी कृष्ण (१८८६-१९१६) यांनी 'राजकुंवर', 'शापित महाराष्ट्र' या ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिल्या. या कादंबऱ्यांना संभाजी महाराजांच्या मृत्युनंतरच्या काळातील इतिहासची पार्श्वभूमी असल्याचे दिसते. तसेच त्यांनी 'माझी कहाणी', 'हा संसार की नरकवास', 'मानापमान', 'संक्रांत' 'आधुनिक स्वयंवर' इत्यादी सामाजिक कादंबरी लेखन केले. त्यांच्या सामाजिक कादंबऱ्यामधून बोधवादी दृष्टीकोन प्रत्ययास येतो. त्यांनी उपरोक्त कादंबरी लेखनातून मध्यमवर्गीयांचे वेगवेगळे प्रश्न परिणामकारकपणे मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

बा. सं. गडकरी (बाळकृष्ण संतुराम गडकरी) यांनी 'सुधारणेचा मध्यकाल' (१९०५-०६), 'दुर्देवी प्रेमयोग', 'पुष्पमाला', 'शालिनी' (१९१६), 'विद्वान सोबती की कुशल गृहिणी' (१९१४) या कादंबऱ्या लिहिल्या. त्यांच्या कादंबऱ्याचे स्वरूप हे बोधपर, संदेश देणारे असलेले दिसते. उदा. 'सुधारणेचा मध्यकाल' या कादंबरीमध्ये पुनर्विवाह हा विषय त्यांनी हाताळला आहे. या कादंबरीने गडकऱ्यांचे कादंबरीकार म्हणून नाव झाले.

चिं. वि. वैद्य (१८६१-१९३५) कादंबरीकार , नाटककार, निबंधकार मार्मिक संशोधक, भारतीय संस्कृती व साहित्य यांचे अभ्यासक आणि संस्कृत, प्राकृत, हिंदी, उर्दू, मराठी या भाषांचा व्यासंग असलेले अष्टपैलू व्यक्तिमत्व. १९१४ मध्ये 'दुदैवी रंगू' ही ऐतिहासिक कादंबरी त्यांची प्रसिध्द झाली. प्रस्तुत कादंबरीमध्ये पानिपतच्या इतिहासाशी रंगू या पात्राची सांगड घालून प्रत्येक घटनेला रंगूच्या दुर्देवी

जीवनाची पार्श्वभूमी दिली आहे. रंगूची दुर्देवी कथा आणि पानिपतची दुर्देवी कथा या दोन कथांना चिं. वि. वैद्य यांनी एकजीव करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

श्रीधर व्यंकटेश केतकर यांनी 'गोंडवनातील प्रियवंदा', 'परागंदा', 'आशावादी', 'ब्राह्मणकन्या', 'गावसासू', 'विलक्षण', 'भटक्या' या कादंबऱ्या लिहिल्या. अनेक वादविवादांचे, मतभेदांचे प्रश्न त्यांनी आपल्या कादंबरी लेखनातून उपस्थित केलेले दिसतात. न. चि. केळकर यांनी 'नवलपूरचा संस्थानिक', 'बलिदान', 'कोकणचा पोर', 'कावळा आणि ढापी' या कादंबऱ्या लिहिल्या. ना. सी फडके यांनी १९२० नंतर कादंबरी लेखन जोमाने केलेले आहे. असे असले तरी त्यांची 'अल्ला हो अकबर' ही पहिली कादंबरी इ. स. १९१७ मध्ये आलेली आहे. यानंतर त्यांनी 'कुलाब्याची दांडी', 'अटकेपार', 'दौलत', 'जादुगार' इत्यादी कादंबऱ्या लिहिल्या. वि. सी. गुर्जर यांनी 'देवता', 'शशांक', 'जीवनसंध्या', इत्यादी कादंबऱ्या लिहिल्या. सी. के. दामले (१८७८-१९२७) यांनी 'दोनशे वर्षापूर्वी', 'वसईचा रणसंग्राम' या ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिल्या.

प्रस्तूत कालखंडात अनेक लेखकांनी कादंबरी लेखन केले असले तरी हरिभाऊंच्या कादंबरीची उंची फारशी कोणी गाठलेली दिसत नाही. हरिभाऊ आणि वा. म. जोशी ही नावे वगळता अनेकांनी मनोरंजनात्मक कादंबरी लेखन केलेले दिसते. या कालखंडात स्त्रीयांनी देखील कादंबरी लेखन केलेले आहे. अव्वल इंग्रजी कालखंडात साळूबाई तांबवेकर यांनी 'चंद्रप्रभा विरहवर्णन' (१८७३), 'हिदुस्थानातील तारा' (१८९४), 'रंगराव' (१९०३), 'पालखीचा गोंडा' (१९२८) या कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या आहेत. 'चंद्रप्रभा विरहवर्णन' या साळूबाई तांबवेकराच्या चार विभागात विभागलेल्या अद्‌भूतरम्य, गुंतागुंतीच्या कथानकातून लेखिकेची कल्पनाशक्ती, वर्णनात्मकता आणि आदर्शाचं असलेले आकर्षण ठळकपणे दिसून येते. या कादंबरीने स्त्री लेखिकांना पुढे प्रोत्साहन दिलेले दिसते. तसेच गोदावरीबाई पंडित यांनी 'प्रीतीचा मोबदला', 'पुष्पगुच्छ', 'वनमाला' असे १८९० च्या दरम्यान कादंबरी लेखन केलेले आहे. १९११ मध्ये इंदिराबाई हरिपूरकर यांनी 'दैवलीला' ही कादंबरी लिहिली आहे. जानकीबाई देसाई यांनी 'गृहलक्ष्मी' (१९१५), 'सौभाग्यतिलक' (१९१८), 'ताजमहाल' (१९१६), 'प्रेमळ सवत' (१९१७), 'पातिव्रत्याची कसोटी' (१९१९) अशा कादंबऱ्या लिहिल्या. त्यांच्या कादबऱ्यांत बोधवादी दृष्टिकोन असल्याचे दिसते. त्यांच्या 'गृहलक्ष्मी' या कादंबरीत हुंडापद्धतीची अनिष्टता मांडण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे.

१८७४ ते १९२० या कालखंडातील कादंबरीची वैशिष्टये :-

प्रस्तुत कालखंडात इंग्रजी वाङ्मयाच्या प्रेरणेतून अनेक कादंबरीकारांनी कादंबरी लेखन केलेले दिसते. हरिभाऊ, वा. म. जोशी, ना. ह. आपटे, नाथमाधव यांसारख्या लेखकांबरोबर स्त्री लेखिकांनीही कादंबरी लेखनाचे प्रयत्न केलेले दिसतात. कादंबरी लेखनाच्या दृष्टीने प्रस्तुत कालखंड महत्वाचा ठरल्याचेही दिसते.

या काळात सामाजिक, ऐतिहासिक विषयांवर कादंबरी लेखन अधिक झाल्याचे दिसते. प्रस्तुत कालखंडातील कादंबरी लेखानाची काही प्रमुख वैशिष्टये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) प्रस्तुत कालखंडात हरिभाऊ आपटे यांचे नाव सर्वश्रेष्ठ कादंबरीकार म्हणून घ्यावे लागते. त्यांनी सामाजिक, राजकीय, आर्थिक समस्या आणि स्त्री-सुधारणा विषयक विचार आपल्या कादंबरी लेखनातून मांडण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. तसेच बाबा पद्मनजी यांच्या नंतर हरिभाऊंनीच ज्वलंत समाजवास्तवाला वाचकांसमोर आणल्याचे प्रत्ययास येते उदा. बालविवाह, केशवपन इत्यादी

२) प्रस्तुत काळात समाजसुधारणेला पोषक असलेल्या ध्येयवादाचा प्रचार करणे हा हेतू कादंबरीकारांनी बाळगलेला दिसतो. उदा. परंपरेच्या विळख्यात अडकलेल्या स्त्रीला मुक्त करण्याचा प्रयत्न कादंबरीकारांनी केलेला दिसतो.

३) तत्कालीन समाजाला पारतंत्र्याची जाणीव करून देत त्यांच्यामध्ये देशाभिमान जागृतीचे कार्य प्रस्तुत काळात कादंबरीकारांनी केलेले दिसते. ऐतिहासिक कादंबरीलेखनातून हे कार्य कादांबरीकारांनी केलेले दिसते. त्यासाठी मराठेशाहीचा विशेषतः स्फुर्तिदायक शिवकाळाचा आश्रय कादंबरीकारांनी घेतल्याचे प्रत्ययास येते.

४) स्त्री लेखकांनी तत्कालीन काळातील अनेक स्त्री प्रश्नांवर, समस्यांवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. उदा. हुंडापद्धती, पतिव्रत्य, सुशिक्षित स्त्रीयांचे प्रश्न, स्त्री दुःख, इत्यादी विषयांना वाचा फोडण्याचे कार्य स्त्री कादंबरीकारांनी काही प्रमाणात केलेले दिसते. तसेच स्त्रियांचे प्रबोधन व्हावे, त्यांना शिक्षणाचे महत्व पटावे असा हेतू स्त्री कादंबरीकरांचा असल्याचे दिसते.

५) प्रस्तूत कालखंडात हरिभाऊ यांच्या प्रभावाखाली अनेक कादंबरीकार त्यांचे अनुकरण कमी-अधिक प्रमाणात करताना दिसतात. असे असले तरी गुणवत्तेच्या दृष्टीने हरिभाऊंच्या समकालीन लेखकांना फारसे जवळ जाता आलेले दिसत नाही.

६) हरिभाऊंप्रमाणे वा. म. जोशी यांच्या कादंबरी लेखनाने मराठी कादंबरीत मोलाची भर पडलेली दिसते. त्यांच्या कादंबरी लेखनामध्ये कादंबरीच्या रूपाची, घटकतत्वाची जाणीव होत राहते.

७) १८७४ ते १८२० या कालखंडामध्ये इंग्रजी राजवटीतून उदयाला आलेल्या नव्या धर्मभावनेचा, विज्ञानाचा व्यक्तिस्वातंत्र्यादी नव्या मूल्यांचा विचार कादंबरी लेखनातून झालेला दिसतो.

८) हरिभाऊनी मराठी कादंबरीला प्रतिष्ठा आणि लोकप्रियता प्राप्त करून दिली. प्रस्तुत काळातील कादंबरीलेखन हे प्रामुख्याने समाजसुधारणेला पोषक असल्याचे दिसते. त्यामुळे रंजन आणि बोध ही दोन प्रमुख उद्दिष्टे कादंबरी लेखनामागे असलेली दिसतात.

सारांश :

१८७४ पूर्व कालखंडात मराठीतील पहिली कादंबरी 'यमुना पर्यटन' (१८५७), लिहिली गेली याबरोबरीनेच १८७४ पूर्वीच्या कादंबरी लेखनामध्ये अद्‌भूतरम्यता, 'रंजनवादी' कादंबरीचा एक प्रवाह निर्माण झालेला दिसतो. उदा. 'मुक्तामाला', 'मंजूघोषा', 'रत्नप्रभा', 'विचित्रपुरी' इत्यादी. तसेच संस्कृत, इंग्रजी अरबी, फारशी यांसारख्या भाषांमधून अनेक कादंबऱ्या मराठी भाषेत रूपांतरित, भाषांतरित होऊ लागलेल्या दिसतात. १८७४ ते १९२० या कालखंडात कादंबरी लेखनामध्ये हरिभाऊंच्या कादंबरी लेखनाचा एक प्रवाह उदयास आलेला दिसतो. हरिभाऊ यांच्या कादंबऱ्यांमधून सामाजिक ऐतिहासिक, राजकीय, स्त्री सुधारणा यांसारखे विषय हाताळलेले दिसतात. त्यांच्याच पावलावर पाऊल ठेवण्याचा अनेक लेखकांनी प्रयत्न केलेला दिसतो. उदा. नाथमाधव.

प्रस्तुत कालखंडात हरिभाऊ यांच्या कादंबरी लेखनाबरोबर वा. म. जोशी यांचे कादंबरी लेखन प्रभावशाली आणि तत्त्वचर्चात्मक झालेले दिसते. हरिभाऊ आणि वा. म. जोशी यांच्या कादंबरी लेखकाने मराठी कादंबरी लेखनाला एक दिशा प्राप्त झाल्याचे प्रत्ययास येते. या लेखकांबरोबरच अनेक कादंबरीकार या काळात उदयास आले. तसेच स्त्री कादंबरीकार म्हणून ही अनेक स्त्रीयांनी स्त्रीविषयक प्रश्नाला वाचा फोडण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. प्रस्तुत काळात अनेक कादंबरीकार हे मनोरंजन आणि उद्‌बोधन या अनुषंगाने कादंबरीलेखन करताना दिसतात. असे असले तरी हरिभाऊंच्या 'पण लक्षात कोण घेतो' या सामाजिक कादंबरीची आणि 'वज्राघात' या ऐतिहासिक कादंबरीची उची गाठणे त्यांना शक्य झालेले दिसत नाही. तरीही १८७४ ते १९२० या कालखंडातील सर्व कादंबरीकरांची कादंबरी वाङ्‌मयातील ही कामगिरी भरीव आहे, हे लक्षात घ्यावे लागते.

स्व-अध्ययन :-

१) १८७४ पूर्वीच्या कादंबरी लेखनाचे स्वरूप सांगा.
२) हरिभाऊ आपटे यांच्या कादंबरी लेखनाचा आढावा घ्या.
३) हरिभाऊ यांच्या कादंबरी लेखनाचा प्रभाव समकालीन लेखकांवर कसा पडलेला दिसतो ते विशद करा.
४) १८७४ ते १९२० या कालखंडातील कादंबरी लेखनाचा परामर्श घ्या.
५) १८७४ ते १९२० या कालखंडातील कादंबरी लेखनाची वैशिष्टये लिहा.

संदर्भग्रंथ :-

१) प्रदक्षिणा (खंड पहिला), कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, १९९३.

२) मराठी कादंबरी पहिले शतक (भाग १), कुसुमावती देशपांडे, मुंबई मराठी साहित्य संघ प्रकाशन, मुंबई , १९५३.

३) मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड पाचवा भाग पहिला, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, १९७३.

४) आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास, भाग पहिला, अ. ना. देशपांडे, व्हीनस प्रकाशन, पुणे, १९७४.

५) हरिभाऊ, डॉ. ल. म. भिंगारे, स्कूल व कॉलेज बुक स्टॉल, कोल्हापूर, १९५६.

❖❖❖❖

७

कांदबरी (१९२० ते १९६०)

प्रा. समीर जाधव

उद्दिष्टे :

- १९२० ते १९६० या कालखंडातील कांदबरी लेखनाचे स्वरुप समजून घेणे.
- १९२० ते १९६० या कालखंडातील राजकीय, सामाजिक परिस्थितीच्या या कालखंडातील कादंबरी लेखनावर काय परिणाम झाला याचा आढावा घेणे.
- या कालखंडातील कादंबरी लेखनामागील प्रेरणा, प्रवृत्तींचा शोध घेणे.

प्रास्ताविक :

१९२० ते १९६० या कालखंडातील कादंबरी लेखनाचा आढावा घेताना १९२० ते १९३९ आणि १९४० ते १९६० या दोन भागांमध्ये हा आढावा घेतला आहे. कारण १९२० ते १९३९ आणि १९४० ते १९६० या कालखंडातील कादंबरी लेखनामागील प्रेरणा आणि प्रवृत्ती वेगवेगळ्या आहेत.

१९२० ते १९३९ हया कालखंडाचा संबंध पहिल्या महायुध्दाशी येतो. पहिले महायुध्द १९१९ साली संपले आणि १९२० साली टिळक युगाचा अस्त होऊन स्वातंत्र्यलढा तीव्र झाला. ही पार्श्वभूमी १९२० ते १९३९ च्या कालखंडाची आहे. १९४० ते १९६० या कालखंडाचा संबंध दुसऱ्या महायुध्दाशी आहे आणि त्याचबरोबर स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंतचा हा कालखंड आहे. म्हणूनच कादंबरी लेखनाचा आढावा या दोन भागांमध्ये घेण्यात आला आहे.

१९२० ते १९३९ या कालखंडातील कादंबरीलेखन

१९१९ साली पहिले महायुध्द संपले. १९२० साली टिळक युगाचा अस्त झाला. स्वातंत्र्यलढा तीव्र गतीने सुरु झाला. गांधीजींचा अध्यात्मवादी दृष्टिकोण, समाजाबरोबर व्यक्तीच्या मनाच्या परिवर्तनाची गरज असल्याचा त्यांचा आग्रह, त्यांच्या अहिंसेच्या मार्गाने चाललेल्या आंदोलनाचा प्रभाव या कालखंडातील लेखकांवर पडलेला आहे. तसेच फ्रॉइडप्रणीत मानसशास्त्रातील नव्या संकल्पनांचा प्रभाव पडू लागला. कथानक, व्यक्तिचित्रण याबरोबर मनोविश्लेषणाचा विचार होऊ लागला. या कालखंडातील कांदबरीलेखनावर नव्या तंत्रविषयक जाणिवेचा जसा

प्रभाव आहे तसा गांधीवाद, मार्क्सवाद, समाजवाद, फ्रॉइडचे मानसशास्त्र इ. प्रभाव आहे.

फडके-खांडेकर माडखोलकर यांच्या कादंबऱ्यामुळेच या कालखंडातील कादंबरी लेखन आकार आलेले असले, तरी काही अन्य कादंबरीकारांचे लेखन लक्षणीय होते. मागील कालखंडातील वा.म.जोशी यांच्या 'सुशीलेचा देव' (१९३०) आणि 'इंदू काळे व सरला भोळे' (१९३५) या दोन कादंबऱ्या लक्षणीय ठरल्या. डॉ. केतकर यांचेही कांदबरीलेखन लक्षणीय आहे. 'गोंडवनातील प्रियंवदा' (१९२६), 'परागंदा' (१९२६), 'आशावादी' (१९२७), 'गावसासू' (१९३०), 'ब्राम्हणकन्या' (१९३०), 'विलक्षणा' (१०३६), या दोन कादंबरीलेखकांच्या कादंबऱ्या या कालखंडात लक्षणीय ठरल्या, असल्या तरी फडके, खांडेकर, माडखोलकर यांच्या कादंबरी लेखनाने हा कालखंड गाजला.

ना. सी. फडके यांची १९१७ साली पुस्तकरुपाने अवतरली ती 'अल्ला हो अकबर' ही व्याजौतिहासिक कादंबरी त्यानंतर १९२५ साली 'कुलाब्याची दांडी' ही कादंबरी आली. 'जादूगर' (१९२८), 'दौलत' (१९२९), 'अटकेपार' (१९३१), 'निरंजन' (१९३२), 'शाकुंतल' (१९४२), 'कलंकशोभा' (१९३३), 'उध्दार' (१९३५), 'काश्मिरी गुलाब' (१९३६), 'इंद्रधनुष्य' (१९४१), 'गुप्त प्रायश्चित्त' (१९४१). दुसऱ्या महायुद्धापर्यंतच्या या कालखंडातील कांदबरीलेखनावर या ना त्या रीतीने प्रा. फडके यांच्या कादंबरीलेखनाचा प्रभाव आहे. कथानकाची रेखीव गुंफण, वर्णनातून आणि संवादातून पात्रे सजीव करण्याची रीत, कादंबरी चित्रवेधक व्हावी म्हणून योजलेली प्रसन्न व प्रवाही भाषाशैली आणि तरुण मनाला मोहवील असे प्रणय चित्र हे त्याच्या कादंबरीलेखनाचे विशेष आहेत. हे विशेष आत्मसात करून घेण्याचा प्रयत्न अनेक मराठी कादंबरीकारांनी केला. हे जरी खरे असले तरी वेगळ्या वळणाने काही कादंबरीकार लिहित होते. या कालखंडात खळबळजनक राजकीय घटना घडत होत्या. सामाजिक जीवनही बदलत होते. कौटुंबिक जीवनाचे चित्रही पालटत होते. रुढ चाकोरी सोडून विचार करणारी विवेकवादी लेखकांची पिढी उदयाला येत होती. त्यातील श्री. पु.य.देशपांडे हे महत्त्वाचे कादंबरीकार होय. 'बंधनाच्या पलीकडे' (१९२६). 'सुकलेले फूल' (१९३०) 'सदाफुली' (१९३३). 'विशाल जीवन' (१९३९) 'काळी राणी' (१९४१), 'नवे जग' (१९४१) या कादंबऱ्यातून सामजिक कौटुंबिक जीवनाचे चित्रण पु. य. देशपांडे यांनी रेखाटले.

फडके यांच्या कलावादी भूमिकेला विरोध करणारे आणि फडके यांच्याप्रमाणे विविध आणि विपुल लेखन करणारे या कालखंडातील दुसरे महत्वाचे लेखक म्हणजे वि.स.खांडेकर 'ह्रदयाची हाक' (१९३०), 'कांचनमृग' (१९३१), 'उल्का' (१९३४), 'दोन ध्रुव' (१९३४), 'दोन मने' (१९३८), 'हिरवा चाफा' (१९३८), 'रिकामा देव्हारा' (१९३९), 'सुखाचा शोध' (१९३९), 'पांढरे ढग' (१९३९),

'क्रौंच वध' (१९४२). या सर्व कादंबऱ्यांतून त्यांनी मध्यमवर्गाचे चित्रण केले आहे. त्यांच्या कांदबऱ्यातून ते मध्यमवर्गाला भोगाव्या लागलेल्या दु:खाची, पराभवाची जशी मिमांसा करीत आहेत तशी त्याने उराशी धरलेल्या स्वप्नांचे, मूल्यांचे, आदर्शाचेही चित्रण करीत आहेत. खांडेकरांच्या कादंबऱ्यांच्या जडण-घडणीचे घटकतत्व उदात्तीकरण हेच आहे. आपल्या कादंबऱ्यांतून काही ना काही प्रश्न मांडण्याचा प्रयत्न खांडेकर करीत होते. पहिल्या प्रेमाच्या स्वप्नाळू, अतिरंजित किंवा एकांगी स्वरुपाचे विश्लेषण 'पहिले प्रेम' (१९४०), या कांदबरीत तर 'जळलेला मोहर' (१९४०) या कादंबरीतून संसारसुख प्रमाणशीर देहसुखावर अवलंबून असते. असे सांगतात. खांडेकरांची कादंबरी ही मराठी कादंबरीच्या वाटचालीतील एक महत्त्वाची दिशा आहे हे नाकारता येणार नाही.

गजानन त्रंबक माडखोलकरांची 'मुक्तात्मा' (१९३३) मध्ये प्रसिद्ध झाली. त्यानंतर 'भंगलेले देऊळ' (१९३४), 'शाप' (१९३६), 'कान्ता' (१९३९), 'दुहेरी जीवन' (१९३४), 'डाक बगला' (१९४२), 'नागकन्या' (१९४१), 'नवे संसार' (१९४१), 'चंदनवाडी' (१९४३) 'महात्मा गांधी' आणि गांधीवाद यांविषयी माडखोलकरांच्या मनात जे दुराग्रह आहेत ते राजकीय चित्रणात असल्यामुळे कांता, मुखवटे इ. कांदबऱ्यांतून राजकारणाचे दर्शन घडते ते एकांगी स्वरुपाचे आहे. आपल्याजवळ फारशी कल्पकता नाही, आपण जे पाहिले ते लिहितो, ते इतरांना अस्वाभाविक वाटते त्याला इलाज नाही, असे माडखोलकर म्हणतात. पण असे म्हणत वास्तावाचा आभास निर्माण करण्याची या कालखंडाची 'फॅशन' च होती. कारण कादंबरीतील 'वास्तवाभास' लपून जाण्यासारखा नव्हता.

फडके-खांडेकर-माडखोलकर यांच्या कांदबऱ्यांनीच प्रामुख्याने या कालखंडातील कांदबरी लेखनाला आकार आलेला असला तरी काही अन्य कादंबरीकारांचे लेखनही आकार आलेला असला तरी काही अन्य कादंबरीकारांचे लेखनही लक्षणीय होते. नाट्यक्षेत्रात कर्तृत्व गाजविणाऱ्या वरेरकरांची 'चिमणी' (१९२६) ही पहिली कादंबरी 'विधवा कुमारी' (१९२८), 'परतभेट' (१९३४), 'गोदू गोखले' भाग १ वर (१९३२-३३), 'फाटकी वाकळ' (१९४१), 'मी-रामजोशी', 'धावता धोटा' (१९३३) वरेरकरांची कादंबरी सवंग स्वप्नरंजन करणारीच होती. लघुकथेत नवीन प्रयोग करणारे य. गो. जोशींनी 'होमकुंड', 'त्रिदोष', 'श्रीकान्त' इ. कादंबऱ्या लिहिल्या. श्रीपाद कृष्ण यांनी शामसुन्दर, दुटप्पी की दुहेरी तर 'नवलपूरचा संस्थानिक', 'बलिदान', 'कावळा' आणि 'ढापी', 'कोकणचा पोर' इ. कादंबऱ्या लिहिणारे न. चि. केळकर तर सुधारणेचा मध्यकाल लिहिणारे 'बा.सं.गडकरी' याच कालखंडातले आहेत. याच कालखंडात 'थोरली आई' (१९३४), 'आईची कृपा' (१९३८) लिहिणारे श्री. दा. न. शिखरे तसेच 'रामायण कर्ते' (१९२६) 'तुळजापूरकर', 'जन्माचा बंदिवास' (१९३१) लिहिणारे वा. वि. जोशी, महाराष्ट्र-कुटुंब मालेतील 'कसे दिवस जातील', 'मातृसेवा' इ.

अनेक कादंबऱ्यांचे लेखक ना. वि. कुलकर्णी इ. कादंबरीकारांना कादंबरी साधनरुप वाटत होती.

वरील कादंबरी लेखकांपेक्षा काही इतर कादंबरीकारही याच कालखंडात लेखन करीत होते. त्यांची यादी पुढीलप्रमाणे.

कादंबरीकार	**कादंबरी**
वि.वि. बोकील	फोल आशा (१९३०)
	झंझावात (१९४०)
मो. ग. रांगणेकर	मृगजळ (१९३७)
दिवाकर कृष्ण	किशोरीचे ह्रदय (१९३०)
	विद्या व वारुणी (१९४४)
भ. दि. गांगल	आसवांची माळ (१९३४)
	पिंजऱ्यातील पक्षी (१९३८)
गं. भा. निरंतर	जीवननृत्य (१९३७)
	अंधारातील दिवे (१९३६)
दत्त रघुनाथ कवठेकर	विखुरलेले प्रेम (१९३५)
	भावना (१९३७)
	रेशमाच्या गाठी (१९४२)
रघुवीर सांमत	प्रवासातील सोबती (१९३८)
	अभ्रपटल (१९३९)
	आकाशगंगा (१९४०)
कमलाताई सोहनी	वादळापूर्वी (१९३४)
शांताबाई नाशिककर	लग्नाचा बाजार (१९३०)
कमलाबाई बंबेवाले	बंधमुक्ता बाजार (१९२९)
पिरोज आनंदकर	माझं बाळ ते (१९२७)

यांच्या जोडीने कादंबरी लिहिणाऱ्या महत्त्वाच्या कादंबरीकार म्हणजे विभावरी शिरुरकर या होय. हिंदोळ्यावर (१९३४), 'विरलेले स्वप्न' (१९३५) या दोन कादंबऱ्या या कालखंडातील आहे. हिंदोळ्यावर या कादंबरीत आलेल्या अचलेच्या दु:खाचे आणि तिच्या हिंदोळ्यावर हलकावे खाणाऱ्या मनाचे चित्र विलक्षण सामर्थ्याने रेखाटले आहे.

स्त्री स्वातंत्र्याशी निगडित असलेल्या वेगवेगळ्या समस्या गीता साने यांना जाणवतात. 'निखळलेली हिरकणी' (१९३६), 'हिरवीखाली' (१९३६), 'वठलेला

वृक्ष' (१९३६), 'लतिका' (१९३७) इ. त्यांच्या कादंबऱ्यांतून कौटुंबिक संबंध, स्त्रियांच्या आर्थिक स्वातंत्र्याचा पति-पत्नी संबंधावर होणारा परिणाम. आर्थिक स्थितीचा संततीसंख्येशी असलेला संबंध या समस्या हाताळल्या आहेत.

या कालखंडातील कादंबरी लेखनावर फडके-खांडेकर प्रणीत कादंबरीचाच प्रभाव आहे. रंजनाचे किंवा उद्‌बोधनाचे साधन म्हणून कादंबरीकडे पाहिले जात असावे.

१९४० ते १९६० या कालखंडातील कादंबरी लेखन :

१९३५ च्या आसपास मराठी कादंबरीला नवी चालना देणारे विभावरी शिरुरकर, सानेगुरुजी यांसारखे अपवादात्मक लेखक आढळतात. आधीच्या काळातील श्रीधर व्यंकटेश केतकर, वामन मल्हार जोशी, नारायण सीताराम फडके, विष्णु सखाराम खांडेकर, गजानन त्र्यंबक माडखोलकर यांच्या कादंबऱ्या ह्या काळात प्रकाशित होणाऱ्या होत्या. वाचकांमध्ये ते लोकप्रियही होते. भा. वि. वरेरकर, रघुवीर सामंत, द. र. कवठेकर, इ. लेखकांचाही ह्या काळातील लोकप्रिय कादंबरीकारांमध्ये समावेश करता येईल. १९३९ मध्ये प्रकाशित झालेली विश्राम बेडेकर यांची 'रणांगण' ही नवकादंबरीची सुरुवात मानता येईल. पाठोपाठ र. वा. दिघे यांची 'पाणकळा' (१९४०) आणि मर्ढेकरांची 'रात्रीचा दिवस' (१९४२) हया कादंबऱ्या प्रकाशित झाल्या. पुढे दिघे यांची 'सराई' (१९४३), श्री. रा. बिवलकर यांची 'सुनीता' (१९४८), श्री. ना. पेंडसे यांची एल्गार (१९४९) इ. कादंबऱ्यातून नवतेची चिन्हे दिसतात.

१९५० मध्ये विभावरी शिरुरकर यांची 'बळी', श्री. ना. पेंडसे यांची 'हद्दपार' आणि वसंत कानेटकर यांची 'घर' ह्या तीन लक्षणीय कादंबऱ्या प्रकाशित झाल्या. कविता आणि कथा ह्या क्षेत्रात जो उत्साह आढळतो तो कादंबरीच्या क्षेत्रात आढळत नाही. १९४५ ते १९६० ह्या काळात कविता, कथा ह्या वाङ्‌मयप्रकारात नवनव्या कवी-कथाकारांनी भर टाकलेली दिसते, तशी भर घालणारे फारसे नवे कादंबरीकार नाहीत. वि. वा. शिरवाडकर यांच्या 'वैष्णव' (१९४६), 'जान्हवी' (१९५२), गो. नी. दांडेकर यांच्या 'तुडवलेले घरकुल' (१९४८), 'सिंधुकन्या' (१९४९), अण्णाभाऊ साठे यांची 'चित्रा' (१९५१), वा. ब. कर्णिक यांची 'वाडगीण' (१९५९), बा. भ. बोरकर यांनी 'भावीण' (१९५०), इ. उल्लेखनीय कादंबऱ्या आहेत. १९३५ ते १९५०या कालखंडातील महत्त्वाची गोष्ट म्हणजे बंगाली कादंबरीकार शरच्चंद्र चट्टोपाध्याय यांच्या कादंबऱ्याचे भा. वि. वरेरकर यांनी केलेले अनुवाद मराठी कादंबरीतील जीवनक्षेत्र हे किती मर्यादित आहे हे अनुवादांनी दाखवून दिले.

१९४० ते १९५० ह्या काळातले बेडेकर,मर्ढेकर आणि दिघे हे तीन महत्त्वाचे कादंबरीकार आहेत. त्यांच्या लेखनाचा परामर्ष घेण्यापूर्वी १९५१ ते १९६० ह्या काळात कोणते कादंबरीकार उदयाला आले व त्यांच्या कोणत्या कादंबऱ्या प्रकाशित झाल्या ते पाहूया. श्री. रा. बिवलकर 'शुभ्रा' (१९५१), श्री. न. पेंडसे-गारंबीचा बापू (१९५२), 'हत्या' (१९५४), यशोदा (१९५६), वसंत कानेटकर-'पंख' (१९५५), गो. नी. दांडेकर - 'शितू' (१९५३), 'पडघवली' (१९५५), 'कुणा एकाची भ्रमण गाथा' (१९५७), 'माचीवरला बुधा' (१९५८), शरच्चंद्र मुक्तिबोध - 'क्षिप्रा' (१९५४), गंगाधर गाडगीळ - 'लिलिचे फूल' (१९५५), व्यंकटेश माडगूळकर - 'बनगरवाडी' (१९५४), दि. बा. मोकाशी - 'देव चालले' (१९५७) अण्णा भाऊ साठे - 'फकिरा' (१९५९) उध्दव शेळके - 'धग' (१९६०), भाऊ पाध्ये - 'डोंबाऱ्याचा खेळ' (१९६०) ह्याच काळात पु. भा. भावे यांची 'अकुलीना' (१९५१), रणजित देसाई यांची 'बारी' (१९५९) ह्या नव्या लेखकांच्या उल्लेखनीय कादंबऱ्या आणि आधीच्या पिढीतील वि. स. खांडेकर यांची 'ययाती' (१९५९) ही महत्वाची मानली गेलेली कादंबरी, ह्या प्रकाशित झाल्या.

१९४० च्या सुमारास प्रकाशित झालेल्या 'रणांगण', 'पाणकळा', 'रात्रीचा दिवस', हया कादंबऱ्यातून नवकादंबरीच्या घडण्याची प्रक्रिया सुरु झाली असे दिसून येते. 'रणांगण' चे लेखन, प्रकाशन दुसऱ्या महायुद्धाच्या पार्श्वभूमीवर झालेले आहे. रणांगणमध्ये जर्मनीतून हाकलल्या गेलेल्या ज्यूच्या यातनाग्रस्त स्थितीचे चक्रधर आणि हँर्टा यांच्या विफल प्रेमाच्या संदर्भात, चित्रण केले आहे. या कादंबरीबद्दल नरहर कुरुंदकरांनी म्हटले आहे. "या कादंबरीत व्यक्त झालेले अनुभव भिन्न संदर्भ सूचित करीत असतात. आणि तरीही तिच्यातील अनुभवाचा सलग एकजीवपणा बाधीत होत नाही. अशा कक्षा विस्तारल्या जाणाऱ्या अनुभवांचे तेवढ्याच सामर्थ्याने चित्रण करणारी 'रणांगण' ही मराठीतील पहिलीच कादंबरी होती." 'रणांगण' ही भावकथा आहे. ही भावकथा आहे तशीच ती शोकात्मिकाही आहे असे गंगाधर गाडगीळ यांना वाटते. आशय आणि अभिव्यक्ती ह्या दोन्ही दृष्टींनी 'रणांगण' ही मराठीतील एक अत्यंत महत्त्वाची कादंबरी आहे. मर्ढेकरांची 'रात्रीचा दिवस' ही कादंबरी संज्ञाप्रवाहात्मक पद्धतीने लिहिलेली आहे. या कादंबरीत दिक्पाल ह्या एकाच पात्राच्या मानसिक पातळीवरील विचार-भावांचे चित्रण केलेले आहे. व्यक्ती बाह्य व्यवहार करीत असताना आत अनंत संगत-विसंगत असे विचार, जाणिवा घेऊन वावरत असते. वास्तवाचे चित्रण करताना केवळ बाहय, भौतिक वास्तवाचेच नव्हे, तर व्यक्तीच्या आंतरिक वास्तवाचे, बाहय भौतिक वास्तवाच्या आंतरिक प्रतिक्रियेचेही चित्रण झाले पाहिजे अशी वास्तवतेविषयीची एक नवी जाणीव मर्ढेकरांच्या हया कादंबरीने दिली.

र. वा. दिघे यांची 'पाणकळा' ही प्रादेशिक कादंबरीची सुरुवात आहे. मर्ढेकरांच्या 'तांबडी माती' आणि 'पाणी' ह्या कादंबऱ्यांनाही ग्रामीण जीवनाचा संदर्भ

आहे. खेड्यातील माणसे, त्यांचे संथ व साधेभोवळे जीवन, त्यांची मराठमोळी संस्कृती आणि गावरान गोडवा असलेली ग्रामीण भाषा यांनी ह्या कादंबऱ्यांचा मोठा भाग व्यापलेला आहे. श्री. रा. बिवलकर यांच्या 'सुनीता' ह्या कादंबरीत फाळणीनंतर झालेल्या हत्याकांडाचे, नौखालीतल्या जीवनाचे, हत्याकांडाचे मागच्या मानवी मनोवृत्तीचे चित्रण केलेले आहे. राजकीय सामाजिक वास्तवाचे काहीसे पसरट आणि पाल्हाळीक चित्रण हया कादंबरीत झालेले आहे. श्री. ना. पेंडसे यांची 'एल्गार' ही पहिली कादंबरी होय. रघू आणि कादर हया भिन्न-धर्मिय मित्रांच्या जीवनावर फाळणीनंतरच्या जातीय विद्वेषांचा झालेला परिणाम ह्या कादंबरीत चित्रित झालेला आहे.

१९४० ते १९५० ह्या काळातील काही कादंबऱ्यानी नवी वाट चोखाळण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. पुढे साठपर्यंत प्रदेशिक आणि मनोविश्लेषणात्मक हेच दोन प्रवाह राहिलेले दिसतात. त्यातही प्रादेशिक हा प्रमुख प्रवाह आणि मनोविश्लेषणात्मक हा गौण प्रवाह असे म्हटले पाहिजे. पेंडसे, दांडेकर, माडगूळकर, मोकाशी, साठे, शेळके यांनी ही नवी प्रादेशिक कादंबरी घडवलेली आहे. श्री. ना. पेंडसे यांच्या 'एलगार', 'हद्दपार' नंतर त्यांची 'गारंबीच्या बापू' ही कादंबरी प्रसिद्ध झाली. नवी मराठी कादंबरी प्रामुख्याने श्री. ना. पेंडसे यांच्या लेखनातून साकार होत गेली. 'हद्दपार' पासून ते प्रकाशाच्या झोतात खेचले गेले आणि गारंबीचा बापू ह्या कादंबरीत त्यांनी आपल्या यशाचा उच्चांक निर्माण केला असे नरहर कुरुंदकर यांनी म्हटले आहे. १९६० पर्यंत पेंडसे यांच्या 'हत्या', 'यशोदा', 'कलंदर' ह्या कादंबऱ्या प्रकाशित झाल्या, तरी मराठी कादंबरीच्या क्षेत्रात त्यांच्या 'गारंबीचा बापू' याच कादंबरीला विशेष लोकमान्यता मिळाली.

१९६० पर्यंतच्या दांडेकरांच्या कादंबऱ्यांपैकी 'पडघवली' मध्ये निसर्गसंपन्न प्रदेशातील ग्रामजीवनाची दुर्दशा आलेली आहे. तर 'मातीवरला बुधा' मध्ये मुंबईसारख्या गजबजलेल्या आणि यांत्रिक जीवनक्रम असलेल्या शहरातून निसर्गाच्या सान्निध्यात राण्यासाठी येणारा बुधा दिसतो.

व्यंकटेश माडगूळकर यांची 'बनगरवाडी' मौज दिवाळी अंकातून प्रथम प्रकाशित झाली तेव्हाच तिने वाचकांचे लक्ष खेचून घेतले. शहरातून एक मास्तर धनगरांची वस्ती असलेल्या बनगरवाडीला बंद पडलेली शाळा चालविण्याच्या निमित्ताने येतो आणि तिथल्या लोकजीवनाचा साक्षीदार बनून राहताना त्याचा एक भाग होऊन जातो. माडगूळकरांच्या कादंबरीतील चित्रणाचा प्रदेश जरी ग्रामीण असला तरी त्यातल्या मनुष्यजीवनाच्या स्थितिगतीतून ते मानवी वर्तनाचे चित्र काढतात असा प्रत्यय येतो. 'प्रादेशिक' ह्या वर्गात जरी त्यांच्या कादंबऱ्यांना बसवले तरी त्यांचे निवेदन आणि आशयाची अभिव्यक्ती ह्या दृष्टीने त्यांनी मराठी कादंबरीला नव्या शक्यतांचे भान दिले असे म्हणता येईल.

शरदच्चंद्र मुक्तिबोध यांची 'क्षिप्रा' ही त्यांच्या कादंबरीत्रयीतील पहिली कादंबरी १९५४ साली प्रकाशित झाली. गंगाधर गाडगीळ यांची 'लिलीचे फूल' १९५५ ही कादंबरी तत्कालिन मराठी कादंबरीहून वेगळी होती. 'लिलीचे फूल' ही एक फॅन्टसी आहे. तिच्यात बाहय विश्वापेक्षा मानसिक विश्वाचे चित्रण केलेले आहे. त्यामुळे ह्या कादंबरीतील भाषते प्रतिमांचा प्रयोजक वापर लेखकाने केलेला आहे. कादंबरीच्या रुढ निवेदन पद्धतीचा त्याग करुन आशयानुरुप ती वास्तव / कल्पित ह्या दुभंग जगाचे दर्शन घडवील अशी योजलेली आहे.

१९५० ते १९६० हा कालखंड म्हणजे नेहरुयुग. राष्ट्रीय पातळीवर प्रबोधनाच्या मल्यव्यवहाराशी नाते सांगणारी भूमिका भारताने स्वीकारलेली होती. वातावरणात समाजवाद होता. स्वातंत्र्यपूर्वकाळातील स्वातंत्र्य चळवळीने निर्माण केलेले भावनांना आवाहन करणारे वातावरण पूर्णपणे लोपले नव्हते. आदर्शवाद, स्वप्नाळूवृत्ती, मध्यमवर्गीय मर्यादा यांच्या चौकटीत मराठी साहित्य आणि मराठी कादंबरी अजूनही वावरत होती. स्वातंत्र्यपूर्वकाळातील महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या कादंबरीकारांची प्रतिष्ठा शाबूत होती.

तरीही महत्वाची परिवर्तने हळूहळू आकार घेऊ लागली होती. १९४७ नंतरचा पण त्यालगतचा कालखंड मराठी कादंबरीच्या संदर्भात अवकाशाच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्वाचा आहे. मराठी कादंबरी या कालखंडात जणू काही नव्या अवकाशांच्या शोधात निघाली होती. महाराष्ट्रातील विविध भूप्रदेशांचे चित्रण कादंबरीतून येऊ लागले. श्री. ना. पेंडसे यांच्या कादंबरीतून हर्णे, श्रीवर्धन, मुरुड, दापोली या परिसरातील चित्रण येऊ लागले. वर उल्लेखिलेले लेखक भिन्न प्रवृत्तीचे आहेत. आपापल्या लेखनामध्ये अवकाशाचा उपयोगही त्यांनी भिन्न पद्धतींनी केला आहे. मात्र, त्यांच्या लेखनातून जाणवणारा अवकाशाचा ठसठशीतपणा हे या सर्वांतील समान सूत्र आहे. विशिष्ट प्रदेशातील डोंगर, दऱ्या, वनस्पती, पिके, बोली, पोशाख पद्धती, रस्ते, नद्या, पूल, घरांची रचना इ. तपशील वास्तववादी दृष्टिकोनातून टिपण्यामधून कादंबरीतील अवकाशाचे प्रतिरुपण विशिष्ट प्रदेशाचे आहे हे वाचकाला ओळखू येत.

स्व-अध्ययन :

१) १९२० ते १९३९ या कालखंडातील महत्त्वाच्या कादंबरी लेखकांचा आढावा घ्या.

२) ना. सी. फडके यांच्या कादंबरीलेखनाचा थोडक्यात आढावा घ्या.

३) ग. त्र्य. माडखोलकर यांच्या कादंबरी लेखनाचा थोडक्यात आढावा घ्या.

४) १९४० ते १९६० या कालखंडातील कादंबरी लेखनाचे स्वरुप स्पष्ट करा.

५) विश्राम बेडेकर यांच्या कादंबरी लेखनाचा थोडक्यात आढावा घ्या.

६) १९२० ते १९६० या कालखंडातील महत्त्वाच्या कादंबरी लेखकांचा आढावा घ्या.

७) १९२० ते १९६० या कालखंडातील कादंबरी लेखनाचे स्वरुप स्पष्ट करा.

संदर्भग्रंथ :

१) प्रदक्षिणा खंड पहिला, कॉन्टिनेंटल प्रकाशन पुणे, आवृत्ती पाचवी १९७२.

२) आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास, भाग २, अ. ना. देशपांडे, व्हीनस प्रकाशन, पुणे - १९७०.

३) मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड ५ व ६, मसाप, पुणे.

❖❖❖❖

८

नाटक (१८७४ ते १९२०)

प्रा. वैशाली जावळेकर

उद्दिष्टे :

- मराठी नाटकाची पूर्वपीठिका अभ्यासणे - विष्णुदास भावे यांच्या पौराणिक नाटकांच्या परंपरेची ओळख करुन घेणे.
- १८४३ ते १८७९ या काळातील मराठी नाटक आणि रंगभूमीसंदर्भात घडणारे स्थित्यंतर अभ्यासणे, भाषांतरित वाङ्मयाचा नाट्यावरील परिणाम स्पष्ट करणे.
- १८८० ते १९२० या काळात संगीत नाटकांचे युग निर्माण करणाऱ्या अण्णासाहेब किर्लोस्कर यांच्या युगप्रवर्तक कामगिरीचा आढावा घेणे.
- १८८५ ते १९२० या टिळक - आगरकर युगाचा नाट्यवाङ्मयावर झालेला परिणाम अभ्यासणे.
- १८८५ ते १९२० या काळातील नाटकाची जडणघडण करणाऱ्या देवल, कोल्हटकर, खाडिलकर, गडकरी या नाटककारांच्या वाङ्मयीन कार्याचा आढावा घेणे.
- १८७४ ते १९२० या काळातील नाट्यविषयक स्थित्यंतराचा सारांश मांडणे.

प्रास्ताविक :

सादरीकरणाच्या हेतुने निर्माण केलेली संहिता म्हणजे 'नाटक'. संस्कृत नाटकांची परंपरा इ.स. दुसऱ्या शतकापासून भारतात अस्तित्वात होती, हे 'नाट्यशास्त्र' या ग्रंथावरुन आपल्याला कळते. मराठी नाटकाचे मूळ हे लोककला प्रकारांमध्ये आढळते. भारुड, लळित, दशावतारी खेळ, कीर्तन आख्यानांसारख्या लोककला प्रकारांमधून नाटकातील सादरीकरणाची बीजरुपे आढळतात. मराठी लोकनाट्यांचे संकेत 'तमाशा' रंगभूमीने रुढ केले असे म्हणायला हरकत नाही. उपलब्ध प्राचीन लिखित नाटक म्हणून 'लक्ष्मी नारायणकल्याण' या तंजावरी नाटकाचा उल्लेख केला जातो. ततंवरी नाटकाच्या प्रभावातूनच १८४३ मध्ये विष्णुदास भावे यांनी 'सीतास्वयंवर' हे नाटक मराठी रंगभूमीवर सादर केले. या

नाटकाने पौराणिक नाटक आणि नाटक मंडळीच्या नाट्यव्यवसायाची पायाभरणी केली. या नाटकापासून मराठी साहित्य संस्कृतीमध्ये 'पौराणिक' नाटकांचे नवे युगच अवतरले. विष्णुदास भावे यांच्या पौराणिक नाटकाचे स्वरुप समजुन घेऊ.

विष्णुदास भावे यांचे पौराणिक नाटक : विष्णुदास भावे यांचे 'सीतास्वयंवर' हे मराठीतील पहिले नाटक मानले जाते. कानडी भागवत नाटकाचे रुप किंचित तमाशाचा ढंग आणि सादरीकरणावर हरिदासी कीर्तन परंपरेची छाप अशा संमिश्रणाने युक्त असे हे आद्य मराठी नाटक होते. पौराणिक कथाभागाची आणि दैवी विभूतिंची ओळख प्रेक्षकांना करुन देणे आणि मनोरंजन करणे हे या नाटकाचे प्रमुख कार्य होते. पौराणिक कथानक, पात्रयोजना, अनेक प्रवेश, संगीत हे घटक विष्णुदास भावे यांच्या नाटकात दिसतात. नाट्यपूर्ण उत्कट प्रसंग रंगमंचावर दाखवून कथानकाचा बाकीचा भाग प्रेक्षकांनी कल्पनेने जाणून घ्यावा असे या नाटकाचे स्वरुप दिसते. विष्णुदास भावे यांचे नाटक म्हणजे 'दशावतारी खेळांचे' संस्कारित रुप होते.

शैशवावस्थेतल्या या मराठी नाटकाचे बीजारोपण विष्णुदास भावे यांनी केले, पण महाराष्ट्रात नाटक रुजविण्यामध्ये विविध नाटक मंडळ्यांची कामगिरी महत्त्वाची होती. १८४३ पासून ते १८९५ -१८९६ पर्यंत महाराष्ट्रात विविध नाटक मंडळ्या अस्तित्वात होत्या. यामध्ये धोंडोपंत सांगलीकर, राघोपंत इचलकरंजीकर, नरहरबुवा कोल्हापूरकर या नाटक मंडळींनी रंगभूमीवर पौराणिक नाटके सादर करुन बराच नावलौकिक मिळविला.

१८४३ पासून नाटक आणि रंगभूमी संदर्भात घडणारे स्थित्यंतर :

विष्णुदासी परंपरेतले नाटक म्हणजे कथासूत्र सलगपणे मांडलेल्या पद्यरचना होत्या. दोन पद्यांच्या मध्ये कथेचा विकास करणारे गद्य संवाद असत. जे सुचतील तशा पद्धतीने म्हटले जात. १९ व्या शतकात महाराष्ट्रात इंग्रजांची सत्ता स्थिर झाली. इंग्रजांनी आपल्या रंजनाच्या गरजेतून शेक्सपियरचे नाटक, 'ऑपेरा' चे खेळ भारतात आणले. मुंबईत नाट्यगृह बांधली. भारतातील पारशी मंडळींनी इंग्रजी नाटकाच्या अनुकरणातून पारशी रंगभूमीवर विविध नाटके आणली. विष्णुदासी नाटक, पुढे संस्कृत - इंग्रजी नाटकांचा प्रभाव, शोकात्म नाटकांचे सादरीकरण अशा विविध नाट्यपरंपरांचे आकलन करुन घेत मराठी रंगभूमीचा विकास उत्तरोत्तर घडत होता. या काळात नाटकातील नेपथ्य, अभिनयाला महत्त्व आले. इंग्रजी आणि संस्कृत नाटकांच्या भाषांतरित नाटकांमुळे रंगभूमीला विविध नाट्यसंहिता उपलब्ध झाल्या. नाटकांसाठी 'रंगसंहिता' तयार करणे ही रंगभूमीच्या विकासातील महत्त्वाची पायरी म्हणायला हवी. विष्णुदासी नाटकाला नवी दिशा देण्यासंदर्भात भाषांतरित नाटकांच्या स्वरुपवैशिष्ट्यांचा आढावा घेणे गरजेचे ठरते.

बुकिश नाटके किंवा भाषांतरित नाटके :

१८०० ते १८७४ हा कालखंड भाषांतरयुग म्हणून ओळखला जातो. कारण या काळातले वाङ्मय हे भाषांतरित रुपांतरित वा आधारित स्वरुपाचे होते. बहुतेक निर्मिती शालोपयोगी वाङ्मय निर्माण करण्याच्या हेतूने झालेली होती. 'दक्षिणा प्राईज कमिटी' सारख्या संस्थांनी पाठशाळेतील विद्वान शास्त्री पंडितांकडून मोबदला देऊन संस्कृत नाटकांची मराठी भाषांतरे करवून घेतली. मुद्रणकलेच्या विकासामुळे ही नाटके छापली जात होती. म्हणूनच या भाषांतरित नाटकांना 'बुकिश नाटके' म्हटले जाई. अशी भाषांतरे संस्कृत नाटकांप्रमाणेच इंग्रजी नाटकांचीही झाली. मुख्य म्हणजे ही नाटके रंगभूमीवर प्रयोगरुपाने सादरही केली जाऊ लागली.

मराठी नाट्यकृतीच्या भाषांतराच्या कार्याला सुरुवात 'प्रबोध चंद्रोदय' या सदाशिव बजाबाशास्त्री अमरापूरकर आणि रावजी बापूजीशास्त्री बापट (१८५१) यांनी केलेल्या संस्कृत नाटकाच्या भाषांतराने झाली. संस्कृत नाटकांची सर्वाधिक भाषांतरे परशुरामतात्या गोडबोले यांनी केली आहेत. त्यांनी 'वेणीसंहार' (१८५७), 'उत्तररामचरित' (१८५९), 'शाकुंतल' (१८६१), 'मृच्छकटिक' (१८६२), 'नागानंद' (१८६५), 'पार्वती परिणय' (१८७२) ही संस्कृतमधून मराठीत केलेली भाषांतरे होत. कृष्णशास्त्री राजवाडे यांनी 'विक्रमोर्वशीय' (१८६१), 'मालतीमाधव' (१८६१), 'मुद्राराक्षस' (१८६७), 'शांकुतल' (१८६९) आणि 'गणेशशास्त्री' लेले यांनी 'जानकी परिणय' (१८६५), 'मालविकाग्निमित्र' (१८६७), 'कर्पूरमंजरी' (१८७७) ही नाटके संस्कृतमधून मराठीत भाषांतरित केली.

संस्कृत नाटकांची कथानके इतकी लोकप्रिय होती की त्यांची भाषांतरे अनेक झाली. यातील लोकप्रियतेचा उच्चांक 'शाकुंतल' नाटकाने गाठला. संस्कृत नाटकांच्या भाषांतरांनी नाट्यसंहीतांच्या उपलब्धतेमुळे मराठी रंगभूमीला उर्जितावस्था आणली.

१८५७ साली स्थापन झालेल्या मुंबई विद्यापीठातील, नवशिक्षित भारतीयांनी रंगभूमीच्या जडणघडणीला हातभार लावला. विद्यापीठातील इंग्रजी शिक्षणाच्या प्रभावातून आणि या नाटकांचा भारतीय प्रेक्षकांना परिचय करुन देण्याच्या गरजेतून इंग्रजी नाटकांचे मराठीत भाषांतर घडले. यामध्ये 'ऑथेल्लो' (१८६७), 'टेम्पेस्ट' (१८७५) या महादेवशास्त्री कोल्हटकर आणि नी. ज. कीर्तनेतकृत भाषांतरे महत्त्वाची आहेत. शेक्सपियरच्या नाटकातील आशय भारतीय प्रेक्षकांना आणि त्यांच्या चालिरितीना जुळवून घेण्याच्या प्रयत्नातून इंग्रजी नाटकांची मराठी रुपांतरे झाली. यामध्ये 'जूलियस सीझर' चे 'विजयसिंग' (१८७२) हे विष्णु मोरेश्वर महाजनी आणि 'सिंबलाइन'चे 'तार' हे रुपांतर उल्लेखनीय आहे. 'तारा' आणि 'कॉमेडी ऑफ एरर्स' चे बजाबा रामचंद्र प्रधान यांनी रुपांतरित केलेले 'भ्रांतिकृत चमत्कार' ही नाटके नाट्यप्रयोग या दृष्टीनेही यशस्वी दिसतात.

अशा प्रकारे संस्कृत आणि शेक्सपियरच्या अनुवादाची नाटके अशा दोन्ही प्रवाहाची नाटके या काळात लिखित आणि प्रयोगरुपाने सादर केली जात होती. त्यामुळे नाटकाचा 'कथानकांच्या अंगाने विकास होत होता. मात्र प्रयोगदृष्ट्या ही नाटके पौराणिक विष्णुदासी परंपरा आणि संस्कृत नाटकाच्या धर्तीवर सादर होत होती. सूत्रधार, विदूषकाचा नाटकभर संचार, नमनपर पदे, अशाप्रकारचे नाट्यतंत्र आकार घेत असल्याचे दिसते. संस्कृत आणि इंग्रजी नाटकांच्या भाषांतरांनी भारतीय प्रेक्षकांच्या अभिरुचीला वळण लागले.नाटक एक व्यवसाय म्हणून रंगभूमीवर स्थिर होण्याचा प्रयत्न करत होते. भाषांतरित नाटकांप्रमाणेच स्वतंत्र नाट्यलेखनाचा प्रयत्नही या काळात झाला. वि. ज. कीर्तने यांनी लिहिलेली 'थोरले माधवराव पेशवे' (१८६१) ही पहिली स्वतंत्र मराठी नाट्यकृती होय. कीर्तने यांनी पौराणिक आख्यानपर कथानकाऐवजी 'ऐतिहासिक' व्यक्तिमत्त्व आणि परिस्थितिचे चित्रण आपल्या नाटकातून घडवले. शेक्सपियरच्या शोकात्मिकेच्या प्रभावातून माधवराव पेशवे शोकात्म नायक म्हणून नाटकात रंगविले आहेत. ऐतिहासिकता आणि वर्तमानकालीन स्थिती यांचा उचित मेळ त्यांच्या नाटकात घडलेला दिसतो. 'जयपाळ' (१८६५) या त्यांच्या दुसऱ्या नाटकातून त्यांनी वृद्धतरुणी विवाहाची अनिष्टता आणि प्रीतिविवाहाची इष्टता या दोन समाजसुधारणेच्या गोष्टी मांडल्या आहेत. नाटकातून पुरोगामी विचारसरणी आणि नवविचाराचे दर्शन घडविणारे उल्लेखनीय असे दुसरे नाटककार म्हणजे मनोहर बाळकृष्ण चितळे त्यांचे 'मनोरमा' (१८७१) हे नाटक नाटकाच्या स्थित्यंतराच्या प्रवासात महत्त्वाचे आहे. समकालीन समाजवास्तवाला प्रतिक्रिया देणारे 'मनोरमा' सारखे नाटक स्त्री सुधारणाविषयी पुरोगामी भूमिका स्वीकारते. 'स्वैरसकेशा' (१८७१) ह्या रघुनाथशास्त्री अभ्यंकर यांच्या नाटकातील नवविचारसरणीला विरोध दर्शविणारी, रुढीवादी भूमिका समाजस्थितीतला अंर्तविरोध ठळक करतो. समकालीन नाटकाच्या स्थित्यंतराचा वेध घेताना मनोहर बाळकृष्ण चितळे यांचे 'मनोरमा' नाटक नाट्यरचना आणि नाट्यलेखनामागची प्रेरणा या दोन्ही दृष्टीने स्पृहणीय ठरते.

१८४३ ते १८७९ या कालखंडातील स्थित्यंतराचे निष्कर्ष :

- १८४३ ते १८७९ हा संथपणे घडणाऱ्या बदलांचा कालखंड आहे. या काळात विष्णुदास भावे यांच्या नाट्यपरंपरेचा विस्तार होताना दिसतो.
- संस्कृत नाटके, पारशी रंगभूमीवरील नाटके आणि हरिदासी परंपरेतील, तमाशा - दशावतारी खेळाच्या सादरीकरणाला अनुसरणारे विष्णुदास भावे यांचे नाटक यांच्या संस्कारातून मराठी नाटकाचे नाट्यसंकेत, गुणविशेष आकार घेत होते.
- केवळ भाषांतरित नव्हे तर 'स्वकपोलकल्पित' नाट्यलेखनही या काळात घटत होते.

- नवशिक्षित, उदारमतवादी तरुण नाटककार पिढीने 'नाटक' हे केवळ मनोरंजनाचे साधन न मानता नवविचारांच्या प्रसाराचे माध्यम मानले. समकालीन वास्तव परिस्थितिशी नाटकाचे नाते निर्माण होणे ही नाटकाची आशयदृष्ट्या विकासाची अवस्था मानायला हवी.

मराठी नाटक 'व्यवसाय' म्हणून या काळात उत्कर्षाच्या अवस्थेला पोहोचला होता. नाटकाचा प्रवास हा रसपूर्ण प्रयोगाच्या दिशेने होत होता. या कालखंडाच्या उत्तरार्धातील लक्षणीय घटना म्हणजे कै. अण्णासाहेब किर्लोस्कर यांच्या नाट्य कारकिर्दीचा उदय. त्यांचे सुरुवातीचे 'शांकरदिग्विजय' (१८७३) हे नाटक विष्णुदासी पौराणिक नाटकांच्या अनुकरणातून जन्माला आले होते. मात्र या कालखंडाच्या उत्तरार्धात किर्लोस्करांनी पौराणिक नाटकाला नवे 'संगीत नाटकाचे' वळण दिले. कथानकाचा विकास, स्वभावचित्रणावर भर, संगीताचा वापर, उत्कृष्ट संवादलेखन ही गुणवैशिष्ट्ये निर्माण करुन त्यांनी पुढील दोन दशकामध्ये पौराणिक संगीत नाटकाचे एक नवे युग निर्माण केले. यादृष्टीने नाटककार अण्णासाहेब किर्लोस्कर यांच्या वाङ्मयीन आणि रंगभूमीविषयक कामगिरीचा आढावा घेणे आवश्यक ठरते.

अण्णासाहेब किर्लोस्करांचे मराठी संगीत नाटक :

मराठी संगीत रंगभूमीचे जनक अशा शब्दात अण्णासाहेब किर्लोस्कर यांना गौरविले जाते. विष्णुदासांच्या कालखंडापासून नाट्याविषयक स्थित्यंतराचे एक परिणत रुप म्हणजे १९८० साली रंगमंचावर सादर झालेले किर्लोस्करांचे 'शांकुंतल' नाटक. शास्त्रीय व मधुर संगीताचा साज चढवलेले हे नाटक लोकप्रिय तर झालेच पण संगीत नाटकाचे एक नवे युग या नाटकाने निर्माण केले.

अण्णासाहेब किर्लोस्कर यांनी 'शांकर दिग्विजय' (१८७३), 'शाकुंतल' (१८८०), 'सौभद्र' (१८८२), 'रामराज्यवियोग' (१८८४) अशी पूर्ण - अपूर्ण एकूण पाच नाटके लिहिली. लिखित पौराणिक नाटकाचा नवअवतार म्हणजे अण्णासाहेब किर्लोस्कर यांचे संगीत नाटक. 'सौभद्र' हे किर्लोस्करांचे नाटक वाङ्मयीन आणि प्रयोगदृष्ट्या क्रांतिकारक ठरले. या नाटकाने अपूर्व लोकप्रियता मिळविली. 'संगीत सौभद्र' या नाटकातील कथा पौराणिक आहे. पण ती आधुनिक प्रेक्षकांच्या मनाची पकड घेते. याचे एक कारण म्हणजे कृष्ण - बलराम, सुभद्रा, रुक्मिणी, अर्जुन ही पात्रे पौराणिक राजवंशातील न वाटता कौटुंबिक वातावरणातल्या लौकिक व्यक्तिरेखा वाटतात. हास्य, करुण आणि शृंगार या रसांचा नाटकातील परिपोष हे देखिल या नाटकाच्या यशाचे कारण आहेत. "सौभद्रचे चिरंतनत्व व्यक्तिदर्शनात आहे. रसविर्भाव आणि व्यक्तित्वदर्शन यांचा सुरेख समतोल इथे साधला आहे. भूमिकांच्या स्वभावावर प्रकाश पाडणारे आटोपशीर आणि चटकदार संवाद हे सौभद्रचे मोठे वैशिष्ट्य म्हटले पाहिजे." (श्री. ना. बनहट्टी, : मराठी रंगभूमी

: मराठी नाटक घटना आणि परंपरा) अशा शब्दात 'सौभद्र' नाटकाचे वैशिष्ट्य श्री. ना. बनहट्टी यांनी सांगितले आहे. यावरुन 'संगीत सौभद्र' या नाटकातील कथानक, स्वभावचित्रण, संवाद यांचे सुसंघटित रुप व्यक्त होते. पौराणिक नाटकाच्या परंपरेत ही वैशिष्टये नवता निर्माण करणारी होती.

'रामराज्यवियोग' (१८८४) हे नाटक किर्लोस्करांच्या अकाली मृत्यूमुळे अपूर्ण राहिले. संस्कृत नाटकाच्या अनुसरणातून संगीताचा वापर किर्लोस्करांनी आपल्या नाटकांमधून केला. पण काव्यात्म पदरचना आणि सुमधुर चाली ज्या लावणी, कीर्तन, रागदारी संगीत अशा विविध ठिकाणांहून निवडलेल्या होत्या. त्यामुळेच किर्लोस्करांच्या पौराणिक नाटकांचा कणाच संगीत होता. किर्लोस्करांची नाट्यपदे घरोघरी पोहोचली; ज्यामुळे किर्लोस्करांची नाटके चिरस्मरणीय ठरली. किर्लोस्करांची नाट्यसंस्था "किर्लोस्कर नाटक मंडळी म्हणजे नाटके करुन दाखविणाऱ्या नटांचा समुदाय नसून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनात एका अभिजात कलाप्रकाराला मानाचे स्थान मिळवून देणारी ती एक क्रांतीकारक घटना होती." अशा शब्दात श्री. मु. श्री. कानडे किर्लोस्कर नाटक मंडळीचा गौरव करतात.

विष्णुदास भावे यांच्या नाट्यपंरपरेहून अण्णासाहेब किर्लोस्कर यांचे संगीत नाटक स्वत:चे स्वतंत्र स्थान कसे निर्माण करते याचा शोध पुढील मुद्यांच्या आधारे घेता येईल.

१) अण्णासोहबांनी विष्णुदास भावे यांच्या पौराणिक नाट्यपरंपरेला नाट्य संगीताची जोड दिली. अत्यंत कौशल्याने परंपरेचा धागा जराही न दुखावता त्यांनी मराठी रंगभूमीच्या विकासाचा प्रयत्न केला.

२) पौराणिक नाटकांमधून पात्रांचा स्वभाव परिपोष अत्यंत सामान्यपणे होत असे. अण्णासाहेब किर्लोस्करांची पौराणिक नाटकातील दैवी पात्रांचे मानुषिकरण केले. स्वभाव रेखाटनाला महत्त्व दिले.

३) वर्तमान आणि पौराणिक जीवन यातले अंतर शक्य तोवर कमी करुन, प्रेक्षकांना स्वानुभवाच्या पातळीवरुन पात्र आणि परिस्थितीच्या अंतरंगात शिरत आत्मियतेने रसास्वाद घेता येईल असे चित्रण अण्णासाहेबांनी नाटकातून केले.

४) उठावदार, रसपरिपोषक प्रसंगांची मालिकाच नाटकात आणली. नाट्यप्रवेश विस्तृत झाले आणि कथानकातही सुसूत्रता आली.

५) नाटकाची भाषा अधिकाधिक पात्र आणि प्रसंगानुरुप केली.

६) मराठी बोलीच्या जवळचे संवादलेकन, आणि सुबोध सरळ पद्यरचना केली.

७) पद्यांना प्रसंगानुकूल चाली दिल्या. या चाली देताना त्यांच्यातील संग्राहक वृत्तीचा परिचय होतो. विविध लोककलाप्रकार आणि शास्त्रीय संगीताची सांगड घालून कौशल्यपूर्ण चाली लावलेल्या दिसतात.

अण्णासाहेब किर्लोस्करांच्या नाटकाची जडणघडण ज्या कालखंडात झाली तो कालखंड विष्णुशास्त्री चिपळुणकरांच्या राष्ट्रवादी जाणिवेचा होता. १८८२ रोजी विष्णुशास्त्री चिपळुणकरांचे निधन झाले. १८८५ पासून लोकमान्य टिळक आणि गोपाळ गणेश आगरकर या विष्णुशास्त्री चिपळुणकरांच्या अनुयायींची कारकीर्द सुरु झाली. १८८५ मध्ये राष्ट्रीय सभेची स्थापना झाली. न्या. महादेव गोविंद रानडे यांचे कार्यकतृत्त्व, आगरकरांच्या 'सुधारक' चा (१८८८) जन्म, संमतिवयाचा वाद (१८९१), लोकमान्य टिळकाच्या राजकीय नेतृत्वाचा उदय अशा घडामोडी महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय जीवनात पुनरुत्थान घडवित होत्या. या सामाजिक परिस्थितीचा नाट्य वाङ्मयाच्या प्रयोग आणि वाङ्मयीन स्वरुपावर कोणता प्रभाव पडला याचा थोडक्यात आढावा घेऊ.

लोकमान्य टिळक आणि सुधारक आगरकर यांचा नाट्यवाङ्मयावरील प्रभाव :

लोकमान्य टिळक हे कट्टर राष्ट्रवादाचे पूरस्कर्ते, मराठी मनावर लोकमान्यांच्या व्यक्तित्वाचा आणि कतृत्त्वाचा विलक्षण प्रभाव होता. मराठीतील राष्ट्रवादी प्रवाहाला त्यांच्यामुळे विशेष चालना मिळाली. ऐतिहासिक नाटके आणि ऐतिहासिक नाटकांमागील राष्ट्रवादी विचारांचे भरणपोषण लोकमान्यांच्या विचार, कार्यकतृत्वाने झालेले दिसते. नाटककार कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांच्यावर टिळकांच्या विचारांचा प्रभाव होता. राष्ट्रवादी जाणिवा संस्कारित करण्यासाठी नाटक हे त्यांनी माध्यमच मानले. नाटकमंडळ्या या लोकशिक्षणाची प्रभावी साधने मानून टिळक किर्लोस्कर नाटकमंडळीची आस्थेवाईक विचारपूस करीत.

लोकमान्य टिळकांच्या तुलनेने आगरकरांचे कार्य मानवतावादी व्यापक विचारांच्या प्रबोधनावर आधारलेले होते. त्यांनी महाराष्ट्रात पुरोगामी, लोकशाहीनिष्ठ मानवतावाद रुजविला. 'हॅम्लेट' नाटकाचे 'विकारविलसित' (१८८३) हे भाषांतर आणि त्या निमित्ताने अनुवादित नाट्यकृतीच्या मराठी रंगभूमीवरील प्रयोगासंबंधीचे धोरण आणि अपेक्षांविषयी आगरकरांनी सविस्तर केलेले विवेचन हे त्यांची नाट्याभिरुची दर्शविते. किर्लोस्कर - देवलांची नाटके ही राष्ट्रवाद आणि सुधारणावाद यांचे संतुलन साधणारी दिसतात.

अण्णासाहेब किर्लोस्करानंतर त्यांच्या संप्रदायातील नाटककारांनी मराठी नाटक हे सामाजिक विचाराचे वाहक बनवले. यांमध्ये अण्णा मार्तंड जोशी यांच्या 'संगीत सावित्री' (१८८८), 'सौभाग्यरमा' (१८९०) या स्त्रीशिक्षण आणि प्रौढविवाह या सुधारणांचा पूरस्कार करणाऱ्या नाटकांचा उल्लेख करता येईल.

आगरकरांच्या विचारसरणीच्या प्रभावातून स्त्रीशिक्षण आणि स्त्रीसुधारणा विषयक विचारांचा पुरस्कार करणारी नाटके रंगमंचावर येत होती. तर स्त्री सुधारणांविषयी 'केसरी' या वृत्तपत्रामधून जी परंपरानिष्ठ भूमिका लोकमान्य टिळक मांडत होते त्या भूमिकेचा प्रसार करणाच्या दृष्टीनेच नाटककार नारायण बापूजी कानिटकरांची नाट्यनिर्मिती घडत होती. 'तरुणीशिक्षण नाटिका' (१८८६), 'संमति कायद्याचे नाटक' (१८९२), 'न्यायविजय' (१८९२) या तीन नाटकांचा उल्लेख यादृष्टीने महत्त्वाचा आहे. त्यांच्या या नाटकांना नावलौकिकही चांगला मिळाला.

टिळक आणि आगरकर यांच्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा या कालखंडावर इतका ठळक होता की तत्कालीन वैचारिक गद्यावर लोकमान्य टिळकांच्या विचारांचा प्रभाव दिसतो. तर नाटक, कादंबरी या ललित साहित्यावर आगरकरांचा १८८५ ते १९२० या काळातील नाटककार कोल्हटकर, देवल, गडकरी यांच्यावर आगरकरांच्या वास्तववादी सामाजिकतेचा प्रभाव होता. खाडीलकरांचे नाटक टिळक संप्रदायी म्हणता येईल. यादृष्टीने देवल, कोल्हटकर, खाडीलकर, गडकरी या प्रमुख नाटककारांच्या नाट्य कामगिरीचा आढावा घेऊ.

गोविंद बल्लाळ देवल :

नव्या संगीत नाट्यप्रथेची बैठक पक्की करुन २ नोव्हेंबर १८८५ रोजी अण्णासाहेब परलोकवासी झाले. त्यांच्या मृत्यूनंतर नाटककार या नात्याने गोविंद बल्लाळ देवल आणि श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांनी किर्लोस्कर नाटक मंडळीची धुरा वाहिलेली दिसते.

गोविंद बल्लाळ देवल किर्लोस्करांना गुरुस्थानी मानीत. त्यांची सुरुवातीची नाटके रुपांतरितच होती. 'दुर्गा' (१८८६) हे 'इझाबेला' या इंग्रजी नाटकावरुन लिहिलेले शोकात्म नाटक, तर 'मृच्छाकटिक' (१८८६) हे शूद्रकाच्या नाटकाचे रुपांतर आणि कालिदासाच्या नाटकाचे 'विक्रमोर्वशीय' (१८८९), बाणभट्ट्यांच्या कादंबरीचे 'शापसंभ्रम' (१८९३) हे केलेले रुपांतर प्रासादपूर्ण आहे. शेक्सपिअरच्या 'ऑथेल्लो' चे 'झुंझारराव' (१८९०) आणि मर्फीच्या 'ऑल इन दि रॉग' या प्रहसनावरुन देवलांनी 'संगीत संशयकल्लोळ' (१९१६) हे रुपांतर केले. देवलांची ही नाटके जरी रुपांतरित असली तरी देवलकृत वैशिष्ट्य त्यातून प्रकट होते. मूळ संस्कृत वा इंग्रजी नाटकांना भारतीय चालीरीतींचा, आचारविचार, कल्पनांचा साज चढवलेली ही रुपांतरे स्वतंत्र नाटके वाटण्याइतकी सहज वाटतात.

इ.स. १८९९ मध्ये त्यांचे सर्वस्वी स्वतंत्र असे 'शारदा' नाटक प्रसिद्ध झाले. बालावृद्ध विवाहाची कथा हा सामाजिक विषय घेऊन देवलांनी तो इतक्या भावपूर्वक आणि कल्पनापूर्वकतेने रंगविला की, त्यामुळे सामाजिक नाटकाच्या जनकत्वाचा मान नकळत त्यांच्याकडे जातो. सामाजिक जाणिव आणि कलात्मकता यांचा अपूर्व संगम 'शारदा' नाटकामधून दिसतो.

गोविंद बल्लाळ देवल यांच्या नाटकांचे विशेष :

१) देवलांच्या 'शारदा' या नाटकामुळे मराठी रंगभूमी जीवनविषयक प्रश्नांना सामोरी जात असल्याचे दिसते. नव विचारसरणी, सुधारणावादी विचारांचा पुरस्कार आणि सनातनी विचारांचे खंडन करीत असताना कलात्मकतेचा तोल ढळू न देण्याइतके मराठी नाटक सक्षम झालेले दिसते.

२) देवलांनी किर्लोस्करांच्या संगीत नाटकांची परंपरा यशस्वीपणे चालवून हे संगीत अधिक अर्थपूर्ण आणि भावपूर्ण बनविले.

३) सामाजिक विषयावर नाटक लिहिताना भावनात्मकतेची जोड देऊन पात्रांचे स्वभावरेखन केले.

४) मराठी नाटकाची भाषा कशी असावी याचा आदर्श वस्तुपाठ त्यांनी आपल्या नाटकातील संवादाद्वारे घालून दिला. त्यांच्या सर्वच नाटकांमधून रसानुकूल, लयबद्ध, स्वाभाविक भाषा व्यक्त झाली आहे.

श्रीपाद कृष्ण कोल्हटकर :

आगरकरांच्या सामाजिक सुधारणाविषयक विचारसरणीचे पूरस्कर्ते, लेखक, टीकाकार, नाटककार म्हणून श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांचा नावलौकिक होता. देवलांच्या 'शापसंभ्रम' (१८९३) या नाटकाचे चिकित्सक परीक्षण करुन त्यांचा किर्लोस्कर नाटक मंडळीशी परिचय झाला होता. १८९६ ते १९१० पर्यंत ते किर्लोस्कर नाटक मंडळीचे एकमेव नाटककार होते. 'वीरतनय' (१८९४), 'मूकनायक' (१८९७), 'गुप्तमंजूष' (१९०१), 'मतिविकार' (१९०६), 'प्रेमशोधन' (१९०८), 'वधूपरीक्षा' (१९१२), 'सहचारिणी' (१९१७), 'परिवर्तन' (१९१७), 'जन्मरहस्य' (१९१८), 'शिवपावित्र्य' (१९२१) 'श्रमसाफल्य' (१९२८), 'मायाविवाह' (१९२८) अशी बारा नाटके त्यांनी आपल्या कारकिर्दीत लिहिली. कोल्हटकरांच्या या सर्वच नाटकांमधून सामाजिक सुधारणाविषयक हेतुगर्भता दिसते. उदाहरणार्थ - 'वीरतनयात' - विधुरविवाह पुरस्कार, 'मूकनायकात' - दारुचे दुष्परिणाम, गुप्तमंजुषात - स्त्री शिक्षणाची थोरवी, तर 'मतिविकारा' मध्ये पुनर्विवाहाची बाजू मांडणे, त्यांच्या 'मूकनायक' नाटकाला 'संगीत सौभद्र' इतकीच लोकप्रियता लाभली.

श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांच्या नाट्यकतृत्वाचे विश्लेषण :

१) पौराणिक किंवा पौराणिक सदृश्य कथानके कोल्हटकरांनी वर्ज्य मानली. त्यांच्या सर्व नाटकाची कथानके स्वतंत्र आहेत.

२) पौराणिक नाट्यविषयांना कंटाळलेल्या प्रेक्षकांना कोल्हटकरांचा नाट्यसृष्टीतले सांसारिकतेचे दर्शन भावले. पात्रांच्या स्वभावरेखाटनात स्वाभाविकता सहज

आणता आली असती. पण कोल्हटकरांच्या प्रतिभेने कृत्रिमता आणि काल्पनिकतेचा आश्रय घेतला. यामुळे ही नाटके बऱ्याचअंशी कृत्रिम, बोजड वाटतात. तरीही किर्लोस्कर नाटक मंडळीनी त्याचे यशस्वी प्रयोग केले आहेत.

३) विष्णुदासी नाटकांची अभिरुची मावळलेल्या काळात सुशिक्षित तरुण पिढीला कोल्हटकरांचे नाटक भावले. याचे कारण त्यातील कल्पनाविलास, तार्किक युक्तिवाद आणि कोटिबाजपणा यांनी ते मोहून गेले.

कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर :

कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांच्या नाट्यलेखनाची सुरुवात साधारणपणे कोल्हटकरांसोबतच झाली. 'सवाई माधवराव यांचा मृत्यू' (१८९३) हे त्यांचे पहिले नाटक तर शेवटचे नाटक 'त्रिदंडी संन्यास' (१९३६). दरम्यानच्या ४२ वर्षांमध्ये खाडिलकरांनी ७ गद्य, ८ संगीत अशी १५ नाटके लिहिली. १९०१ साली त्यांचे 'कांचनगडची मोहना' हे नाटक महाराष्ट्र मंडळीने रंगभूमीवर आणले तेव्हापासून खाडिलकरांचे प्रभाविपणे रंगभूमीवर पदार्पण झाले असे म्हणायला हवे. १९२० पर्यंत त्यांनी जी नाटके लिहिली त्यांनी मराठी रंगभूमीवर सुवर्णयुग निर्माण केले 'कीचकवध' (१९०७), 'भाऊबंदकी' (१९०९), 'मानापमान' (१९११), 'संगीत विद्याहरण' (१९१३), 'सत्वपरीक्षा' (१९१४), 'स्वयंवर' (१९१६) या त्यांच्या नाटकांनी 'खाडिलकर युग' निर्माण केले. त्यांच्या 'कीचकवध' नाटकाला मराठी रंगभूमीच्या इतिहासात मानाचे पान मिळाले आहे. तत्त्वनिष्ठा आणि राष्ट्रभक्ती ह्या दोन प्रेरणा त्याच्या वर उल्लेखलेल्या नाटकांमधून दिसतात. कीचकवध या नाटकात त्यांच्या नाट्यलेखनाची सारी वैशिष्ट्ये साररुपाने प्रकट झाली आहेत. पौराणिक कथानकावर आधारलेले असले तरी ते एक राजकीय रुपक आहे. पुराणकथेचा वापर करुन, वर्तमानकालीन जीवनातील राजकीय घटनांवर भाष्य करीत लोकजागृती साधणे असे खाडीलकरांच्या नाटकाचे स्वरुप दिसते.

लोकमान्य टिळकांचे राजकीय तत्त्वज्ञान आणि स्वराज्य विषयक ध्येयप्रवणता यांचे प्रतिबिंब खाडिलकरांच्या सर्व नाटकांमधून दिसते. 'भाऊबंदकी' नाटकातले रामशास्त्री प्रभूणे यांचे व्यक्तिचित्रण, स्वभावरेखाटनावर लोकमान्य टिळकांच्या व्यक्तिमत्त्वाची छाया स्पष्ट जाणवते. खाडिलकरांचे नाटक हे स्वातंत्र्य चळवळीला अनुकूल असा राजकीय संदेश देते.

खाडिलकरांची नाटके रंगभूमीवर यशस्वी होण्यामागे गायन अभिनयाने निपुण असे बालगंधर्व, विनायकराव पटवर्धन, गंगाधरपंत लोंढे असे गायक नट उपलब्ध असणे महत्त्वाचे कारण आहे. खाडिलकरांच्या नाटकांना चाली पुरविणारे गोविंदराव टेंबे, भास्करबुवा बखले आणि मास्टर कृष्णराव यांनीही खाडीलकरांचे नाटक अजरामर केले आहे. खाडिलकरांची सर्वच नाटके किर्लोस्कर आणि गंधर्व नाटक मंडळीनी रंगभूमीवर आणली.

कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांच्या नाट्यकतृत्त्वाचे सामर्थ्य :

१) खाडिलकरांची नाटके लोकप्रिय होण्यामागची दोन सामर्थ्य स्थळे म्हणजे 'संगीत' आणि 'विनोद' खाडिलकरांनी केवळ विरंगुळा देण्याकरता विनोदाची निर्मिती केली नाही. तर विनोदापेक्षा उपहासगर्भ, विडंबनात्मक आणि अतिरंजित चित्रण करण्याचा त्यांचा हेतू दिसतो. उदा. कीचकवधातील मैत्रेय, भाऊबंदकीमधील नमकशास्त्री आणि चमकशास्त्री ही पात्रे वर्तमानकालीन समाजजीवनातल्या प्रवृत्तीची निदर्शके आहेत.

२) तत्त्वनिष्ठा आणि राष्ट्रभक्ती यांचे अधिष्ठान खाडिलकरांच्या नाटकाला असल्यामुळे ओज आणि वैचारिकता ही त्यांच्या भाषेची स्वाभाविक अंगे झालेली दिसतात. मात्र संवादासाठी जी भाषा वापरली जाते ती बरीचशी बोली असते.

३) पौराणिक आणि ऐतिहासिक कथानकांची निवड केल्यामुळे रुपकात्मकतेने वर्तमानकालीन परिस्थितीवर भाष्य करता आले. राजकीय व सामाजिक तत्त्वज्ञान प्रेक्षकांना आकलन करण्यास सुलभ झाले.

४) नाटकात प्रबळ आणि उत्कट संघर्षाचे चित्र दिसते. नाटकातला संघर्ष व्यक्तिंचा नसून तत्त्वांचा असतो. नाटक परिणामकारक होण्यासाठी 'संघर्ष' हे महत्त्वाचे साधन मानलेले दिसते.

राम गणेश गडकरी :

श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांच्या नाटकाचा आणि विनोदाचा गडकऱ्यांवर विलक्षण प्रभाव होता. त्यांचा शिष्य म्हणवून घेण्यात त्यांना धन्यता वाटे. राम गणेश गडकरी, यांचे पहिले नाटक 'प्रेमसंन्यास' (१९१२), त्यानंतर 'पुण्यप्रभाव' (१९१६), 'एकच प्याला' (१९१९), 'भावबंधन' (१९१९) आणि 'राजसंन्यास' (अपूर्ण १९२२). अल्प काळातच मराठी रंगभूमीवर राम गणेश गडकरी अपूर्व तेजाने चमकून गेले. काव्यात्मकता, विनोद आणि भाषाशैली ही त्यांच्या नाटकांची वैशिष्ट्यपूर्ण अंगे होती.

गडकऱ्यांच्या नाटकातील विनोद बौद्धिक चमत्कृती, शाब्दिक कोट्या आणि कल्पकतामूलक अतिरंजन यांनी तो संपन्न असलेला दिसतो.

कोल्हटकरी परंपरेनुसार नाटकांची कथानके बांधीव असून कारस्थानस्वरुपी आहेत. प्रेमसंन्यास, पूण्यप्रभाव आणि भावबंधनमध्ये खलपुरुषांची योजनाच दिसते. गडकऱ्यांच्या नाटकात सामाजिकता बेताचीच आहे. अद्‌भूतरम्यता अतिरंजितता हा त्यांच्या नाटकांचा स्वभावधर्म दिसतो. 'एकच प्याला' सारखे नाटक म्हणजे मराठीत परिणामकारकतेने साकार झालेले शोकात्म नाटक. कृत्रिमता, अतिरंजितता, अनुचितता असे दोष गडकऱ्यांच्या नाटकात असूनही या नाटकांनी

प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवले. मानवी स्वभावाचे आणि भावनांचे चित्रण त्यांच्या नाटकात उत्कटतेने, सामर्थ्याने झालेले दिसते.

देवल, कोल्हटकर, खाडिलकर, गडकरी या नाटककारांप्रमाणेच विविध प्रवृत्ती, गुणवैशिष्ट्य धारण करणारे इतरही नाटककार या कालखंडामध्ये मराठी नाटक आणि रंगभूमीच्या विकासाला हातभार लावताना दिसतात. यामध्ये शिरवळकर मोडककृत 'राणा भीमदेव' (१८९२), खरेशास्त्रीकृत 'शिवसंभव' (१९१९) ही नाटके लोकप्रिय झाली. शिरवळकरांची संतचरित्रपर नाटके संवादलेखन आणि सरस नाट्यप्रसंगामुळे रंगभूमीवर गाजली. शां. गो. गुप्ते आणि बि. गो. शेट्ये यांनी आपल्या नाटकांमधून समकालीन राजकीय विचारांचे सूचन केले. रण-रागिणी, संधिसंग्राम ही गुप्ते यांची ऐतिहासिक, पौराणिक नाटके तर 'लोकशासन' आणि 'रक्षाबंधन' ही शेठ्ये यांची नाटके. दोघांनी खाडिलकरांची नाट्यपरंपरा सांभाळलेली दिसते.

राजकीयदृष्ट्या १८८५ ते १९२० हा काळ जसा धामधुमीचा होता तसा नाटकाच्या दृष्टीनेही बहराचा काळ होता. आपल्या विचारप्रणालीचा प्रसार करण्यासाठी रंगभूमीकडे वळणाऱ्या राजकीय क्षेत्रातील कित्येक मान्यवरांची गणती 'नाटककार' म्हणून या काळात घडते. उदा. शि. म. परांजपे, न. चि. केळकर, वि. दा. सावरकर. कृ. प्र. खाडिलकर तर या काळातले प्रभावी नाटककार होते. केळकरांची 'तोतयाचे बंड' आणि 'कृष्णार्जुनयुद्ध' ही नाटके मराठी रंगभूमीवर भूषणभूत ठरली आहेत.

अशा प्रकारे आपण १८४३ ते १८७९, १८८० ते १८८५ आणि १८८५ ते १९२० अशा कालक्रमाने मराठी नाटक आणि रंगभूमीच्या विकासाचे, बदलाचे टप्पे अभ्यासले. १८७४ ते १९२० हा नाटकाचा एकूण काळ म्हणजे मराठी नाटकाचा शैशवावस्थेकडून प्रौढत्वाकडे किंवा बहराच्या कालखंडापर्यंतचा प्रवास आहे. या कालखंडातील इतर नाट्यप्रवृत्तीचा तसेच नाट्य वाङ्मय आणि रंगभूमीच्या विकासाची थोडक्यात मांडणी पुढील मुद्यांच्या आधारे करु.

- १८७४ नंतर भाषांतरित नाटकाचा पगडा कमी होऊन पौराणिक, ऐतिहासिक अद्‌भुतरम्य, सामाजिक नाटक असे कथानक आणि रचनात्मकदृष्ट्या नाटक विकसित होऊ लागले.
- नाट्य वाङ्मय हेतुपूर्ण झाले. स्वइतिहास, स्वराज्य विषयक जाणिवांना वळण लावणे. सामाजिक सुधारणेसाठी विचारजागृती घडवणे अशा हेतुपूर्वकतेमुळे मराठी नाटक आशय आणि परिणाम या संदर्भात अन्वर्थक, कालोचित कामगिरी करताना दिसते.

- नाटकातील संवादांची सहजता, संवादात्मकतेमध्ये कोटिबाजपणा, उत्तरप्रत्यत्तरे, विशिष्ट लकबी अशी वैशिष्ट्यपूर्णता आली. कोल्हटकर, गडकरी यांच्या नाटकांचा इथे आवजूर्न उल्लेख करता येईल.
- व्यक्तिरेखा तिचे स्वभावचित्रण, स्वभावानुसार भाषेचा, वापर अशा व्यक्तिवैशिष्ट्यांना महत्त्व प्राप्त झाले. खाडिलकरांच्या नाटकांमधून याचा प्रत्यय येतो.
- सामाजिक नाटके संगीतमय जशी झाली तशीच पौराणिक नाटके गद्य स्वरुपात झाली. पौराणिक नाटकाचा, संस्कृत नाटकाचा साचा मोडत अनेक प्रवृत्तींची सरमिसळ या काळातील नाटक व रंगभूमी संदर्भात झाली.
- पारशी रंगभूमी, उर्दु रंगभूमी, पाश्चात्य रंगभूमी आणि संस्कृत रंगभूमी, लोकनाट्य अशा विविध परंपरेतून देवाणघेवाण या काळातील नाटकांत झालेली दिसते.
- नवतेच्या शोधात फार्स, शोकात्म नाटक, संतचरित्रपर नाटके, अशी आशयसमृद्ध नाटके या काळातील नाट्यपरंपरेत दिसतात. यामध्ये शिरवळकर, पाटणकर यांच्या 'राणा भिमदेव' नाटकांच्या परंपरेचा उल्लेख महत्त्वाचा आहे.
- रंगमंच, नेपथ्य, स्त्रीपात्राची भूमिका अशा प्रयोगनिष्ठ घटकांसंदर्भातही रंगभूमीचा विकास १९२० या कालखंडापर्यंत झाला.

स्व-अध्ययन :

१. विष्णुदास भावे यांच्या पौराणिक नाटकाचे स्वरुप सांगा.

२. १८४३ या कालखंडापासून मराठी नाटक आणि रंगभूमी संदर्भात घडणारे स्थित्यंतर स्पष्ट करा.

३. बुकिश नाटकांचे स्वरुप सांगा.

४. सुशिक्षित उदारमतवादी तरुण नाटककारांनी मराठी नाटकाला कशा प्रकारे वळण दिले ?

५. अण्णासाहेब किर्लोस्करांचे मराठी संगीत नाटक युगप्रवर्तक कसे ठरते ?

६. टिळक - आगरकरांचा मराठी नाटकांवर कोणता प्रभाव पडला ?

७. गोविंद बल्लाळ देवल यांच्या नाटकाचे विशेष सांगा.

८. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांच्या नाटकांची वैशिष्ट्यपूर्णता स्पष्ट करा.

९. लोकजागृती घडवणे हे कृ. प्रा. खाडिलकर यांच्या नाटकांचे वैशिष्ट्य कसे ठरते ?

१०. राम गणेश गडकरी या नाटककाराचा वाङ्मयीन परिचय द्या.

११. १८४३ ते १८७९ या काळातील नाटकांमध्ये घडलेले बदल सांगा.

१२. १८८५ नंतरच्या कालखंडातील सामाजिक आणि राजकीय प्रेरणा नाटकाच्या निर्मितीला पूरक कशा ठरल्या ते सांगा.

१३. १८७४ ते १९२० या कालखंडात नाटक आणि रंगभूमी संदर्भात घडलेले बदल सांगा.

संदर्भसूची

१. नाट्यशोध - डॉ. मु. श्री. कानडे

२. मराठी नाट्यसृष्टी - वि. पां. दांडेकर

३. मराठी वाङ्मयाचा इतिहास - प्रा. रा. श्री. जोग, खंड पाच, भाग दोन

४. मराठी रंगभूमी : मराठी नाटक - घटना आणि परंपरा - के. ना. काळे, वा. ल. कुलकर्णी, वा. रा. ढवळे.

५. संक्षिप्त मराठी वाङ्मयकोश आंरभापासून १९२० पर्यंतचा कालकंड - प्रभा गणोरकर, जया दडकर,

६. आधुनिक मराठी वाङ्मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी - गो. म. कुलकर्णी

❖❖❖❖

९

नाटक (१९२० ते १९६०)

प्रा. संदीप कदम

उद्दिष्टे :

- १८७४ ते १९२० या कालखंडातील नाट्यवाङ्मयाचा थोडक्यात परिचय करुन घेणे.
- १९२० नंतर मराठी रंगभूमीला लागलेली ओहोटी स्पष्ट करुन अत्रे, वरेरकर, रांगणेकर, प्रभृतींचे कार्य व नाट्यलेखनातील वेगळेपण स्पष्ट करणे.
- १९२० ते १९६० या कालखंडातील इतर नाटककार व त्यांची नाट्यवाङ्मयातील कामगिरी समजावून घेणे.
- नाट्यमन्वंतर, नाट्यनिकेतन, इ. संस्थाचे कार्य अभ्यासणे.
- स्त्री-नाटककार आणि एकांकिकालेखन यांचा परिचय करुन घेणे.
- १९२० ते १९६० या कालखंडातील नाटककारांचे योगदान अभ्यासणे.

प्रास्ताविक :

मराठी साहित्यात अनेकविध साहित्यप्रकार आहेत. त्यामधील 'नाटक' या साहित्यप्रकाराला प्रदीर्घ प्राचीन परंपरा आहे. विष्णुदास भावे यांच्या 'सीता स्वयंवर' या नाटकाने मराठी नाट्यवाङ्मयात मोलाची कामगिरी केली. १८७४ ते १९२० या कालखंडात किर्लोस्कर, देवल, खाडिलकर इत्यादी नाटककारांनी नाटक या साहित्यप्रकारामध्ये विपुल नाट्यलेखन केले. १९२० ते १९६० या कालखंडात नव्या जाणिवा घेऊन नाटक या साहित्यप्रकाराकडे नाटककारांनी पाहिलेले दिसते. प्रस्तुत कालखंडात राजकीय, सामाजिक, आर्थिक, वैचारिक, वाङ्मयीन परिवर्तन घडत होते. या पार्श्वभूमीवर कालमानाप्रमाणे नाटके आकाराने छोटी होत गेली. १९२० ते १९४५ या काळातील नाट्यवाङ्मयावर इब्सेनच्या नाट्यतंत्राचा प्रभाव पडलेला दिसतो. १९४५ ते १९६० या काळात रुपांतरीत, अनुवादीत नाटके लिहिण्यावर नाटककारांनी भर दिला. तसेच समकालीन विविध प्रश्नांचा, समस्यांचा मागोवा नाटककारांनी आपल्या नाट्यवाङ्मयातून घेतलेला दिसतो.

नाटक : एक वाङ्मयप्रकार :

नाटक हा रंगभूमीशी निगडित असलेला वाङ्मयप्रकार आहे. नट-नाचणे, अभिनय करणे या शब्दावरुन 'नाटक' हा शब्द आला आहे. अभिनय करणाऱ्याचे जे कृत्य ते नाटक असे म्हणता येईल. भरतमुनींच्या 'नाट्यशास्त्र' या ग्रंथापासून सखोलपणे नाटक या वाङ्मयप्रकाराची चिकित्सा झालेली दिसते. मनोरंजन व चतुर्विध पुरुषार्थाचे साधन, असे दुहेरी हेतू प्राचीन काळापासून भारतीय नाट्यपरंपरेत मानले गेले आहेत. पाश्चात्य देशांमध्येही 'नाट्य' विषयाची सखोल चर्चा झालेली आहे. रोमन काळातील ग्रंथकार सिसेरोने यांनी नाटकाची व्याख्या 'Drama is mirror of life' (नाटक म्हणजे जीवनाचा आरसा) अशी केली आहे. मराठी नाटकांचा उदय पोवाडे, भारुडे, दशावतारी खेळे, इत्यादींपासून झालेला दिसतो. प्रयोगरुपाने सादरीकरण हे नाटकाचे व्यवच्छेदक लक्षण आहे. नाटकाचे माध्यम शब्द असून त्यामध्ये पात्रे असतात. त्यांचे एकमेकांशी संबंध येतात. त्या संबंधातून कथानक आकार घेते आणि या कथानकातच विचारवस्तू वा अनुभव असतो. नाटक हे प्रयोगप्रधान असल्याने त्यातील पात्रे-प्रसंग नटांमार्फत रंगमंचावर प्रेक्षकांसमोर सादर होते. नाटक हे पात्रांच्या कृति-उक्ती मार्फत परस्पर घडविलेले एका अनुभवाचे दर्शन असते. एका प्रसंगातून दुसरा प्रसंग या क्रमाने नाटकात प्रसंगांची किंवा घटनांची सलग मालिका तयार होते. यातूनच नाटक व्यक्त होत असते.

नाट्यकृतीत नाट्यांतर्गत संघर्ष असतो. हा संघर्ष दोन विरोधी शक्तींचा असतो. व्यक्ती विरुद्ध व्यक्ती, व्यक्ती विरुद्ध परिस्थिती आणि एकाच व्यक्तीच्या अंतर्मनातील दोन विरोधी प्रवृत्ती असे संघर्षाचे प्रकार असतात. यामधील कोणत्याही एका प्रकाराचे अस्तित्व नाट्यकृतीत प्रकर्षाने जाणवते. कथानक, पात्रे, आणि विचारवस्तू किंवा अनुभव हीच नाटकाची मूलद्रव्ये असून त्यातून नाटकाचे रुप सिद्ध होते. नाट्यांतर्गत कृतीला एकात्म रुप प्राप्त करुन देण्याच्या दृष्टीने नाटकाचे विचारवस्तू महत्त्वाचे असते. नाटकाचे विचारवस्तू वा आशयसूत्र हे एकंदर कृतीतून व्यक्त होणारा अर्थ किंवा जीवनविषयक अनुभव असतो.

मराठी नाट्यवाङ्मय :

मराठी नाटकाचा आरंभ विष्णुदास भावे यांच्या नाट्यकार्याने झाला असे आपण मानतो. पण त्याआधी लोकरंगभूमी आणि तंजावरील नाटक अस्तित्वात असलेले दिसते. असे असले तरी मराठी रंगभूमीची मुहूर्तमेढ विष्णुदास भावे यांच्या 'सीता स्वयंवर' (१८४३) या नाटकाच्या सांगली येथील प्रयोगाने झाली असे आपण मानतो. अण्णासाहेब किर्लोस्कर यांनी १९८० साली 'संगीत शाकुंतल' चा पहिला प्रयोग पुणे येथे केला. १८८२ मध्ये 'संगीत सौभद्र' हे त्यांचे स्वतंत्र नाटक रंगभूमीवर येऊन आधुनिक मराठी नाटक रसिकांना अनुभविण्यास मिळाले.

किर्लोस्कर, देवल यांच्या नंतर खाडिलकर, गडकरी आणि वरेरकर यांच्या नाटकांनी मराठी रंगभूमीवर मोलाची कामगिरी बजावली. चित्रपटाच्या आगमनानंतर मराठी रंगभूमीला विपन्नावस्था येण्यास सुरुवात झाली. याच सुमारास अत्र्यांच्या नाटकांनी काही काळ मराठी नाट्य व्यवसायास उभारी आणण्याचा प्रयत्न केला. युद्ध काळात मो. ग. रांगणेकरांची 'नाट्यनिकेतन' ही एकच संस्था कार्यशील असलेली दिसते.

१९२० ते १९६० मधील घटनांचा नाटयवाङ्मयावरील परिणाम :

राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, साहित्यिक अशा विविध क्षेत्रांमध्ये अनेक घटना प्रसंगांमुळे बदल होत होते. १९२० मध्ये लोकमान्य टिळकांच्या निधनानंतर स्वातंत्र्यालढ्याचे नेतृत्व महात्मा गांधी यांच्याकडे आले. त्यांनी अहिंसा, सत्य, सर्वधर्मी समानता यांसारखी मूल्य विचारप्रणाली स्वीकारली होती. १९३० मध्ये मीठाचा सत्याग्रह झाला. १९३९ मध्ये दुसऱ्या महायुद्धाचा भडका उडाला. १९४२ मध्ये चलेजाव आंदोलन सुरु झाले. १९४७ ला भारत स्वतंत्र झाला. १९४७ मध्येच भारत-पाक फाळणी झाली. १९५० मध्ये राज्यघटना अस्तित्वात आली आणि भारत या प्रजासत्ताक राष्ट्राची निर्मिती झाली. १९५० मध्ये स्वतंत्र महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. या सर्व राजकीय घटनांचे पडसाद मराठी नाट्यक्षेत्रावर उमटलेले दिसतात. ज्याप्रकारे राजकीय क्षेत्रातील हे बदल नाट्यभूमीवर परिणाम करीत होते तसेच कलाक्षेत्रातील बदल ही लक्षात घ्यावे लागतात. कलेच्या क्षेत्रात मूकपट आणि बोलपट निर्मितीला सुरुवात झालेली होती. दादासाहेब फाळके यांनी जनतेसमोर एक नवे माध्यम रुजविण्याचा प्रयत्न केला. मूकपट आणि बोलपट यांमुळे मराठी प्रेक्षक रंगभूमीपासून काही प्रमाणात दुरावलेला दिसतो. १९२० नंतरच्याच कालखंडात पहिले आणि दुसरे महायुद्ध झाले. त्यामुळे जीवनाकडे जगाकडे, पाहण्याचे दृष्टीकोन बदलले. जीवनशैली मध्ये बदल होत गेल्याने साहित्य, नाट्य यांच्या निर्मितीवर परिणाम झालेले दिसतात. विसाव्या शतकाच्या पहिल्या दोन दशकात साहित्यिक क्षेत्रामध्ये केशवसुत, बालकवी, राम गणेश गडकरी यांचे निधन झाले. याचाही परिणाम साहित्य क्षेत्रावर पडलेला दिसतो. या कालखंडात नाट्यक्षेत्राकडे वरेरकरांनी जाणीवपूर्वक पाहून नाट्यव्यवसायाला बदलत्या काळाबरोबर सावरण्याचा प्रयत्न केला. समाजातील समाजपरिवर्तन लक्षात घेता मानवी जीवन, मानवी व्यवहार समाजाबरोबर बदलत होते, तशीच नाटक या क्षेत्रातही बदलांची जाणीव होत होती. त्यातूनच पुढे एक अंकी, एक प्रवेशी अशी आटोपशीर नाट्यरचना आलेली दिसते. तत्कालीन काळ आणि परिस्थितीबरोबर राजकीय, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, आर्थिक, शैक्षणिक संदर्भ नाट्यवाङ्मयातून उमटलेले दिसतात. तत्कालीन समाजातील अनेक घटनांचा, प्रसंगाचा समस्यांचा वेध नाटककारांनी आपल्या नाट्यलेखनातून घेण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

१९२० पूर्व नाट्यवाङ्मय :

किर्लोस्करपूर्व कालखंडात बुकिश नाटकांद्वारे शेक्सपियर आणि विदग्ध संस्कृत अशी दोन नाट्यतंत्रे मराठी रंगभूमीवर आलेली होती. या दोन नाट्यतंत्रांचा मिलाफ संगीताच्या साहाय्याने अण्णासाहेब किर्लोस्करांनी साधला. 'शाकुंतल' (१९८०), 'सौभद्र' (१८८२) यांसारख्या पौराणिक नाटकांना एक नवा अवतार किर्लोस्करांनी दिलेला दिसतो. यातूनच मराठी रंगभूमीवर संगीत नाटकाची परंपरा सुरु झाली. ही परंपरा गो. ब. देवल, ('संशयकल्लोळ', 'मृच्छकटिक') कृ. प. खाडिलकर ('स्वयंवर', 'मानापमान') यांनी वापरलेली दिसते. १९१५ ते १९२० या कालखंडाच्या आसपास खाडिलकर, कोल्हटकर, गडकरी, न. चि. केळकर यांच्या प्रभावी नाट्यकृतींनी मराठी रसिकांना रिझविले होते.

१९२० ते १९६० या कालखंडातील नाटक :

कृ. प्र. खाडिलकर (कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर) यांनी गद्य - पद्य नाट्यलेखन केले. 'स्वयंवर', 'मानापमान', 'भाऊबंदकी', 'कांचनगडची मैना', 'कीचकवध' इ. त्यांच्या या गद्य, पद्य नाटकांनी त्यांना 'नाट्याचार्य' ही पदवी प्राप्त करुन दिली. त्यांचे 'सवाई माधवरावाचा मृत्यू' हे पहिले नाटक असून ते शेक्सपिअरीयन नाट्यरचना तंत्र अनुसरणारे आहे. १९२० मध्ये त्यांनी गांधीवादाचा पुरस्कार केला. 'केसरी' नंतर 'नवाकाळ' ची सूत्रे हाती घेतली. या कालखंडातील खाडिलकरांची नाटके ही पौराणिक कथासूत्रांभोवती गुंफलेली दिसतात. परिचित कथावस्तुतून अभिप्रेत तत्त्वविचार त्यांनी मांडला आहे. 'संगीत विद्याहरण' या नाटकात संप्रदायनिष्ठा व अपत्यप्रेम यांच्या संघर्षात सापडून दारुचे व्यसन आणि अविवेकीपणाने वागणारा शुक्राचार्य त्यांनी उभा केला आहे. तसेच दारुचे दुष्परिणाम दाखविणे, कचाद्वारे सद्सद्विवेकीबुद्धीने वागणारे तरुण त्यांनी उभे केले आहेत. पूर्वीच्या नाटकांप्रमाणे ('सवाई माधवरावाचा मृत्यू', 'कीचकवध', 'भाऊबंदकी') त्यांच्या 'संगीत द्रौपती', 'मेनका', 'सावित्री', 'सवतीमत्सर', 'त्रिदंडी संन्यास' या नाटकांमध्ये आवेशी, ओजस्वी लय दिसत नाही.

राम गणेश गडकरी :

यांची 'भावबंधन' (१९१९), 'एकच प्याला' (१९२१), 'राजसंन्यास' (१९२२), 'वेड्यांचा बाजार' (१९२३), 'प्रेमसंन्यास', 'पुण्यप्रभाव' ही नाटके बलवंत संगीत मंडळी यांनी रंगभूमीवर आणली. त्यांच्या प्रस्तुत नाटकांनी या कालखंडास चांगली सुरुवात झालेली दिसते. शेक्सपिअर पद्धतीच्या शोकात्मिकेची अंतर्बाह्य वैशिष्ट्ये मराठीत रुजविण्याचा प्रयत्न गडकरी यांनी केला. गडकऱ्यांच्या नाटकातील खलपुरुष हे शेक्सपिअरच्या खलनायकांचा प्रभाव असलेले दिसतात. नाट्यबांधणीचे तंत्र, संवादपद्धती, विनोद, स्वगतांची काव्यात्म लय, जीवनाचे विविध

आविष्कार, व्यापक जीवनाशय ही शेक्सपिअर यांची नाट्यतंत्रे गडकऱ्यांनी वापरलेली आहेत. 'एकच प्याला' या नाटकाने शोकात्मिका हा नाट्यप्रकार रुजविला. या नाटकाचा प्रभाव दीर्घकाळ जनमानसावर राहिलेला दिसतो. प्रस्तुत नाटकातील सिंधू या पात्राची भाषा हा गडकरी शैलीचा एक उत्तम नमुना म्हणता येईल. तसेच जुन्या वळणाच्या गृहिणींच्या तोंडची अस्सल मराठी बोली इथे पाहावयास मिळते. प्रस्तुत नाटकात आधुनिक मध्यमवर्गीय महाराष्ट्राचे एक अंतर्भेदी व स्वयंपूर्ण चित्र आलेले आहे. गडकऱ्यांचे 'एकच प्याला' हे शोकात्म नाटक म्हणून गाजले तर 'भावबंधन' हे विनोदामुळे आणि 'राजसंन्यास' हे भाषावैभवामुळे लोकप्रिय झाले. 'भावबंधन' नाटकातील कामण्णाची विनोदी भूमिका आणि धुंदिराज ही विनोदी व्यक्तिरेखा यांमुळे प्रस्तुत नाटक गाजलेले दिसते. गडकऱ्यांच्या नाटकातील विनोद हा स्वभावनिष्ठ, प्रसंगनिष्ठ व शब्दनिष्ठ आहे. 'प्रेमसंन्यास' या नाटकातील विसरभोळा गोकुळ हे पात्र मराठी रंगभूमीवरील अविस्मरणीय विनोदी पात्र आहे. 'प्रेमसंन्यास', 'एकच प्याला', 'राजसंन्यास' ह्या गडकऱ्यांच्या शोकात्मिका आहेत आणि 'पुण्यप्रभाव', 'भावबंधन' ह्यांचा आत्मा शोकात्मिक असला तरी शेवट गोड झाला आहे. त्यांची नाटके मानवी मनातील सुष्ट आणि दुष्ट प्रवृत्तींचे एकमेकांत गुंतलेले भावबंध उलगडण्याचा प्रयत्न करणारी आहेत. तसेच मानवी मनाच्या अंतरंगाचा शोध घेण्याचा प्रयत्न करताना दिसतात.

१९२० ते ३० या काळात गडकऱ्यांची प्रतिभासंपन्न नाटके खूप गाजली तसेच खरेशास्त्री यांचे 'शिवसंभव' (१९२०), वि. ह. औंधकर यांचे 'बेबंदशाही' (१९२४), वा. वा. भोळे यांचे 'अरुणोदय' (१९२३), शं. पं. जोशी यांचे 'मायेचा पूत' (१९२३), 'खडाष्टक', त्र्य. सी. कारखानीस यांचे 'राजाचे बंड' अशी नाटके महाराष्ट्र नाटक मंडळी यांनी या दशकात रंगमंचावर आणली.

१९३२ मध्ये चित्रपट बोलपट बनून उदयास आला त्यामुळे प्रस्तुत कालखंडात रंगभूमीची परिस्थिती बिकट झालेली दिसते. महायुद्धाच्या आर्थिक मंदीमुळे दिवसेंदिवस नाटकमंडळ्या चालविणे आर्थिकदृष्ट्या अवघड बनत गेले. परिणामी १९३०-३३ च्या आसपास नामवंत नाटकमंडळ्या बंद पडल्या. अशा बिकट परिस्थितीत अ. ह. गद्रे यांनी नाटिका लिहिण्यास प्रारंभ केला. त्यांनी 'प्रेमदेवता', 'पूर्ण स्वातंत्र्य', 'घटस्फोट', 'कुमारी ३१', 'आई', 'पुणेरी जोडा' अशा अनेक नाटिका लिहिल्या.

नाट्यमन्वंतर :

१९३३ साली 'नाट्यमन्वंतर' या नाट्यसंस्थेची स्थापना झाली. या संस्थेच्या स्थापनेमागे इब्सेनच्या नाट्यतंत्राची प्रेरणा होती. मूळचा नार्वेजियन नाटककार असलेल्या इब्सेनने आपल्या नाट्यकृतीद्वारे मानवी व्यक्तिमनाचे मूलधर्म शोधण्याचा सतत प्रयत्न केलेला आहे. "Intitution of psychological

wholeness" हे त्यांचा नाट्यकृतीचे सूत्र आहे. इब्सेनच्या नाट्यकृतींनी व नाट्यतंत्राने पाश्चात्य रंगभूमीवर क्रांतीची चर्चा मराठीमध्ये के. ना. काळे, डॉ. ग. त्र्य. चिटणीस, अनंत काणेकर, श्री. वि. वर्तक इत्यादीनी केली आहे. नाट्यमन्वतंराच्या स्थापनेमागे ही चर्चा कार्यरत होती असे म्हणता येईल. नाट्यमन्वंतरचे पहिले नाटक रुपांतरित होते. वर्तक यांनी यॉर्नसनचे 'गॉटलेट' चे रुपांतरित 'आंधळ्यांची शाळा' या नावाने केले. या नाटकाचा पहिला प्रयोग ०२ जुलै १९३३ ला मुंबईत रिपन थिएटरमध्ये झाला.

यानंतर श्री. वि. वर्तक यांचे 'लपंडाव' हे स्वतंत्र विनोदी नाटक नाट्यमन्वंतरने रंगमंचावर आणले, पुढे त्यांनी इब्सेनच्या 'warrior's of Helegeland' या नाटकाचा 'तक्षक्षिला' या नावाने अनुवाद केला. श्री. ना. बेंडे यांचे 'बुवा' हे नाटक मोलियरच्या 'टार्टूफ' चे रुपांतर आहे. ना. धो. ताम्हनकरांची 'उसना नवरा' ही नाटिका जॉन्सनच्या 'हर स्टेफ हजबंड' चे स्वैर रुपांतर आहे. ही दोन नाटके तक्षक्षिला या नाटकानंतर रंगमंचावर आली. एकूण भारतीय रंगभूमीची स्थिती पाहाता नाट्यमन्वंतराचे यश मोठे ठरते. हीच नाट्यमन्वंतराची परंपरा पुढे अत्रे, आळतेकर, वरेरकरांच्या काही नाटकांनी चालविलेली दिसते. तसेच १९३३ मध्येच पौराणिक विषयाशी निगडित 'ब्रम्हकुमारी' हे चित्रपटाच्या तांत्रिक आकर्षतेचा वापर करणारे, गो. रा. शिरगोपीकरांचे 'गोकुळचा चोर', ऐतिहासिक व्यक्तिचित्रणावर आधारित व.शा. देसाई यांचे 'अमृतसिद्धी', भा. वि. वरेरकरांचे 'जागृती ज्योत' आणि अत्र्यांचे 'साष्टांग नमस्कार' ही सर्व नाटके रंगमंचावर आली.

१९३३ मध्ये वर्तकांनी मराठी नाट्यतंत्रात मन्वंतर घडवून आणण्याचा प्रयत्न जाणीवपूर्वक केलेला दिसतो. त्यांनी 'आंधळ्यांची शाळा' (१९३३), 'लपंडाव' (१९३३) व 'तक्षक्षिला' (१९३३) ही नाटके एकाच वर्षात लिहिली. मराठी नाट्यवाङ्मयाच्या इतिहासात 'आंधळ्यांची शाळा' या नाटकाला मानाचे स्थान आहे. कारण प्रस्तुत नाटकाने इब्सेनच्या नाट्यतंत्राची मराठी प्रेक्षकांना ओळख करुन दिली.

प्र. के. अत्रे (प्रल्हाद केशव अत्रे) :

कवी विंडबनकार, उत्कृष्ट शिक्षक आणि डोळस समाजनिरीक्षक म्हणून अत्र्यांचे व्यक्तिमत्त्व आपल्यासमोर उभे रहाते. १९३३ ते १९४३ हा मराठी रंगभूमीवरील 'अत्रे कालखंड' म्हणून ओळखला जातो. त्यांच्या 'साष्टांग नमस्कार' या नाटकाने त्यांना एका रात्रीत नाटककार ठरविले.

शालेय रंगमंचासाठी अत्र्यांनी 'गुरुदक्षिणा' (१९३०) 'संगीत वीरवचन' (१९३१) ही नाटके लिहिली. त्यानंतर त्यांचे प्रत्यक्ष रंगभूमीवर पदार्पण झाले. 'साष्टांग नमस्कार' या फार्सिकल कॉमेडीने 'साष्टांग नमस्कार' हे नाटक १० मे १९३३ रोजी बालमोहन नाटक मंडळीने रंगमंचावर आणले. त्यांच्या 'घराबाहेर' या

नाटकावर इब्सेनचा प्रभाव आहे. 'घराबाहेर' नाटकातील निर्मला घराबाहेर पडण्याचा धाडसी निर्णय घेते. तिचा पती दुबळा असून मुलगा लाडापायी बेताल वागणारा आहे. आणि सासरा जुलमी आणि विषयांध आहे या साऱ्याची परिणती तिच्या घर सोडून जाण्याच्या निर्णयात होते. घराबाहेर पडलेल्या निर्मलेला तिच्यातील मातृत्व घरी परतण्यास भाग पाडते. प्र. के. अत्रे यांच्या या नाटकाने मराठी रंगभूमीला एक नवे चैतन्य बहाल केले. 'घराबाहेर' (१९३४) या नाटकाद्वारे प्र. के. अत्रे यांनी सामाजिक प्रश्नांकडे लक्ष वेधून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. गंभीर विषयावर आधारलेल्या या नाटकाने आधुनिक नाट्यतंत्राचा अवलंब केला आहे. नाटयानुभव, व्यक्तिरेखा आणि समस्या या सर्वच दृष्टीने या नाटकात नव्या तंत्राचा वापर केला आहे. "पाश्चात्य नाट्यवाङ्मयाच्या व्यासंगाने प्रभावी नाट्यकृतीला जन्म देण्यासाठी माझी सृजनशक्ती त्यावेळी उतावीळ झाली होती. ह्या मानसिक अवस्थेतूनच 'उद्याचा संसार' चा जन्म झाला". असे 'उद्याचा संसार' (१९६४) या नाटकाच्या प्रस्तावनेत त्यांनी सांगितले आहे. प्रस्तुत नाटकात तत्कालीन महाराष्ट्रीय हिंदू समाजातील संसाराचे चित्र अत्र्यांनी साकारले आहे. त्यांचे 'लग्नाची बेडी' (१९३६) हे नाटक लग्नाचे बंधन जसे आवश्यक असते, तसेच पत्नीचे शृंगारिकत्व पतीला ताब्यात ठेवण्यासाठी आवश्यक असते. या कथाबीजाला साकारते. या नाटकात स्त्री - पुरुष संबंध, वैवाहिक प्रश्न, लग्नसंस्थेची आवश्यकता इ. प्रश्नांकडे अत्रे खेळकर वृत्तीने पाहात विवाहपद्धतीमधील दोषांचा दंभस्फोटही करतात. 'भ्रमाचा भोपळा' (१९३५), 'पराचा कावळा' (१९३८) ही त्याची नाटके प्रसंगप्रधान आहेत. या नाटकांमध्ये 'लग्न' हे ध्येय ठरवून त्यादिशेने प्रसंगांची मांडणी केलेली दिसते. या दोन्ही नाटकांमध्ये अत्र्यांनी गडकऱ्यांची परंपरा सांभाळलेली असली तरी विनोदाचे सर्वस्पर्शित्व मात्र मोलियरचा प्रभाव दर्शविणारे आहे. 'पाणिग्रहण' (१९४५), 'कवडी चुंबक' (१९५१) ही त्यांची विनोदी नाटके आहेत. तर समाजातील निरनिराळ्या प्रवृत्तीच्या व्यक्तींद्वारे उपहास, कोटिबाजपणा, विनोद, विसंगती इ. साहाय्याने नाटकातील वास्तव रंगविणे हा मोलियरचा विशेष अत्र्यांच्या 'वंदे मातरम्' (१९३७), 'मी उभा आहे' या नाटकांत आढळतो. १९३८ ते ४० या काळातील सामाजिक, राजकीय पक्षांचे राजकारण, निवडणूकांत होत असलेला गैरप्रकार हे या नाटकाचे विशेष नोंदविता येतील.

प्र. के. अत्रे यांनी विनोदी व गंभीर प्रवृत्तीचे नाट्यलेखन करताना प्रेक्षकांच्या अभिरुचीला महत्त्व दिल्याने त्यांची सर्व नाटके रंगभूमीवर लोकप्रिय ठरली. प्रेक्षकांना विडंबन- विनोदाने सतत हसविणे; हेच त्यांच्या नाटकांचे ब्रीद ठरलेले दिसते. सामाजिक संस्था, व्यक्ती, मानवी स्वभावातील मूलभूत विसंगती अशा स्थूल व सूक्ष्म अनेक पातळ्यांवर त्यांच्या नाटकात विनोद सहजरित्या संचार करताना दिसतो. विनोदाचे सर्वस्पर्शीत्व आणि लवचिक रुप ही अत्र्यांनी मराठी रंगभूमीला दिलेली मोलाची देणगी आहे.

अंनत काणेकर :

पत्रकार, लेखक, कवी, प्राध्यापक आणि मर्मज्ञ नाटककार म्हणून अंनत काणेकर यांचा उल्लेख करावा लागेल. त्यांनी मुख्यतः रुपांतरित स्वरुपाचे नाट्यलेखन केले आहे. इब्सेनच्या 'Doll's House' चे 'घरकुल', निशिकांताची नवरी (१९३८), फांस (१९५१), 'पंतगाची दोरी' (१९५१), 'झुंज' (१९५४) ही रुपांतरित नाटके त्यांनी लिहिली आहेत. 'निशिकांताची नवरी' हे गोल्डस्मिथ यांच्या 'she stoops to conquer' चे स्वैर रुपांतर आहे. तर सर जेम्स बेरी यांच्या 'what every women knows' चे 'पतंगाची दोरी' हे रुपांतर आहे. प्रस्तुत नाटकातील राजाभाऊ या पात्राला आवरुन धरणारी मनू ही या नाटकातील पतंगाची दोरी आहे. 'फांस' हे डब्ल्यू. ओ. सोमिन यांच्या 'अटेन्शन' या नाटकाचे रुपांतर आहे. प्रस्तुत नाटक तीन अंकी असून मीरा आणि अमृत ही दोनच पात्रे नाटकात असणे हा या नाटकाचा विशेष आहे. 'झुंज' हे नाटक जॉन गाल्सवर्दीच्या 'स्ट्राइफ' या नाटकाचे रुपांतर आहे. साखर कारखान्याचे संस्थापक बाबासाहेब सुभेदार आणि संपाचा पुढारी जाधव यांच्यातील अटीतटीची झुंज हा या नाटकाचा विषय आहे.

भा. वि. वरेरकर (भार्गवराम विठ्ठल वरेरकर) :

मराठी रंगभूमीच्या तीन पिढ्यांशी भा. वि. उर्फ मामा वरेरकर यांचा संबंध आला आहे. वरेरकर यांनी १९६० पर्यंत सातत्याने नाट्यलेखन केले. 'कुंजविहारी' (१९०८) हे त्यांचे पहिले नाटक असले तरी त्यांचे खरे नाट्यलेखन 'हाच मुलाचा बाप' (१९१६) या नाटकापासून सुरु झालेले दिसते. 'संन्याशाचा संसार' (१९१९), 'तुरुंगाच्या दारात' (१९२३), 'सत्तेचे गुलाम' (१९२७), 'पापी - पुण्य' (१९३१), 'सोन्याचा कळस' (१९३२), 'सदा बंदिवान' (१९३३) ही त्यांची पहिल्या टप्प्यातील नाटके आहेत. त्यांचे 'करीन ती पूर्व' (१९२७) हे एकमेव ऐतिहासिक नाटक आहे. प्रस्तुत नाटकाकडे नाट्यरचना चातुर्याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणून पाहता येते. 'सोन्याचा कळस' या नाटकाद्वारे त्यांनी कामगार-मालक संघर्षावर आधारित कामगारवर्गाला रंगभूमीवर स्थान मिळवून दिले. परिस्थितीनुसार अभिनयानुकूल संवाद हे वैशिष्ट्य वरेरकरांनी आपल्या नाटकांतून जोपासलेले दिसते. त्यांच्या 'जागती ज्योत', 'समोरासमोर' या नाटकातून उद्योगधंद्यातील समस्या त्यांनी मांडल्या आहेत. 'स्वयंसेवक', 'चला लढाईवर' या नाटकांबरोबर 'कोरडी करामत' हे दारुबंदीच्या प्रचारासाठी लिहिलेले नाटक ही खूप गाजले. यामध्ये त्यांनी दारुबंदीबरोबर प्रतिष्ठितांची पोल खोलण्याचे चातुर्य दाखविले आहे. 'उडती पाखरे' आणि 'सारस्वत' या नाटकांनी वरेरकरांमधल्या नाटककाराची वाङ्मयीन श्रेष्ठता सिद्ध केली आहे. या नाटकामध्ये नवनाट्यांचे तंत्र त्यांनी हाताळले आहे. 'सिंगापुरातून ' (१९४४) हे नाटक राजकीय वातावरणाशी निगडित आहे. प्रस्तुत नाटकात जपानच्या मदतीने हिंदुस्थान स्वतंत्र करण्याचे स्वप्न,

सुभाषचंद्राचा उल्लेख, तत्कालीन राजकीय वाद इत्यादींचे स्पष्ट चित्रण त्यांनी केले आहे. तर ग्रामीण वातावरणाशी निगडीत असलेल्या 'जिवाशिवाची भेट' (१९५०) या नाटकाने त्यांना बहुजनसमाजापर्यंत यशस्वीपणे पोहोचविले. 'भूमिकन्या सीता' (१९५०) या नाटकात त्यांनी स्त्री स्वातंत्र्याबद्दलचा विचार सीतेच्या दु:खातून उभा केला आहे. 'द्वारकेचा राजा' (१९५२) या नाटकातून पौराणिक विषय हाताळला आहे. प्रस्तुत नाटकात श्रीकृष्ण आणि जरासंध यांचा लढा दाखविला आहे. 'नवा जमाना', 'जागती ज्योत' या नाटकांतून जागृत स्त्री वर्गाचे नेतृत्त्व आणि तडफदार वृत्तीची स्त्री चित्रित केली आहे.

थोडक्यात, वरेरकरांच्या नाटकातून आशय आणि तंत्र यामध्ये अद्ययावत व प्रगतशील वृत्ती दिसून येते. वरेरकरांची महत्त्वाची कामगिरी म्हणजे कामगार रंगभूमीचा उदय. त्यांच्या नाटकातून कामगार रंगभूमीचे स्वरुप, आंतरगिरणी शासकीय स्पर्धा यांचे स्वरुप दिसते. विद्धत्ता आणि अविद्धत्ता यातील मध्यबिंदू वरेरकरांनी गाठलेला दिसतो. संवाद, यथार्थ व मार्मिक स्वभावरेखाटन, नाट्यविषयाची स्वच्छ व स्पष्ट तर्कशुद्ध मांडणी यांसारख्या गुणांमुळे त्यांची नाटके मनोरंजक व परिणामकारक झालेली दिसतात. वरेरकरांचे नवीनतेचे प्रयोग फारसे यशस्वी झाले नसले तरी त्यांनी मराठी नाट्यसृष्टीला दिशा देऊन पुढील वाटचालीला मार्ग दाखविला. हे त्यांचे मराठी नाट्यसृष्टीतील योगदान नाकारता येणार नाही.

मो. ग. रांगणेकर (मोतीराम गजानन रांगणेकर) :

'नाट्यनिकेतन' या नाट्यसंस्थेची स्थापना १९४१ मध्ये करुन मो. ग. रांगणेकर यांनी नाट्यक्षेत्रात प्रवेश केला. पत्रकार, कवी, कादंबरीकार, नाटककार, दिग्दर्शक, निर्माता, नेपथ्यकार असा विविध तऱ्हेचा जीवनप्रवास करणारे प्रयोगशील व्यक्तिमत्त्व रांगणेकरांचे होते. मराठी नाट्यसृष्टीत एक नवा प्रवाह आणणारे नाट्यप्रवर्तक म्हणून रांगणेकर हे आजही नाट्यरसिकांना आठवतात. 'आशिर्वाद' हे त्यांचे पहिले नाटक १९४१ मध्ये रंगभूमीवर आले. प्रस्तुत नाटकात मिळवत्या मुलीचा प्रश्न त्यांनी मांडला आहे. तर 'कुलवधू' (१९४२) नाटकातून कलावंत स्त्रीच्या प्रश्नांचा विचार - विमर्श केला आहे. 'कन्यादान' (१९४३), 'अलंकार' (१९४४), 'माझे घर' (१९४५) ही त्यांची तंत्रानुसारी नाटके आहेत. या नाटकातील वातावरण संवादातून साकारले जाताना दिसते.

'नंदनवन' (१९४९), 'एक होता म्हातारा' (१९४८), 'कोणे एके काळी' (१९५०) या नाटकांत विविध समस्यांचा विचार रांगणेकरांनी केलेला दिसतो. प्रेम आणि विवाह यांच्या जागा चुकल्याने निर्माण होणारी समस्या 'नंदनवन' या नाटकातून मांडली आहे. तसेच 'कोणे एके काळी' या नाटकातून नायकिणीच्या मुलीचा प्रश्न हाताळला आहे. १९४१ ते १९५० हे दशक रांगणेकरांच्या

नाट्यकामगिरीचे महत्त्वपुर्ण दशक आहे. '१७ वर्षे', 'वहिनी', 'माहेर' या नाटकांमध्ये इब्सेनचा आणि नवतंत्राचा वापर केलेला दिसतो. 'रंगा', 'जयजयकार', 'लिलाव' ही रंजनवादी नाटके ही त्यांनी लिहिली. औपरोधिक, खोचक परंतु फारसा न झोंबणारा विनोद निर्माण करण्यात रांगणेकर यशस्वी झाले आहेत. सर्वसाधारण समाजाच्या प्रकृतीचे दर्शन, परंपरा आणि नवीनता यांच्यातील संघर्ष, खटकेबाज संवाद, रंजकता, चित्तवेधक व नाट्यपूर्ण प्रसंगाची निर्मिती ही त्यांच्या नाट्यवाङ्मयाची वैशिष्ट्ये सांगता येतील.

मा. ना. जोशी (माधव नारायण जोशी) :

मा. ना. जोशी यांनी आपल्या नाटकातून समाजजीवन चित्रित करण्यावर लक्ष केंद्रित केलेले होते. नाट्यलेखनाच्या क्षेत्रात त्यांनी पौराणिक नाटके लिहून पदार्पण केले. १९१०-११ च्या सुमारास त्यांनी 'कर्णार्जुन' आणि 'कृष्णविजय' ही दोन पौराणिक नाटके लिहिली. प्रस्तुत नाटके एकनाथ, मोरोपंत, वामनपंडित आणि कवींच्या ग्रंथाचा अभ्यास करुन लिहिलेली दिसतात. अभ्यासपूर्णतेने लिहिलेली ही नाटके रंगभूमीवर मात्र अपयशी ठरली. या अपयशानंतर त्यांची लेखणी विनोदी प्रकृतीच्या सामाजिक नाटकांकडे वळली. 'विनोद' (१९१४) हे त्याचे पहिले विनोदी सामाजिक नाटक आहे. त्यानंतर त्यांनी 'करमणूक' (१९१७), 'हास्यतरंग' (१९२७), 'वऱ्हाडचा पाटील' (१९२८), 'गिरणीवाला' (१९२९), 'संगीत पुनर्जन्म उर्फ सावित्री' (१९३१), 'वशीकरण' (१९३२), 'पैसाच पैसा' (१९३५), 'प्रोफेसर शहाणे' (१९३६), 'सत्त्वसाफल्य' (१९४६), 'मनोरंजन' (१९४६), याबरोबरच 'नामधारी राजे', 'मोरांचा नाच', 'राजा उदार झाला', 'प्रेमळ लफंगे', 'आनंद' इ. नाटके लिहिली. आपल्या नाट्यविषयक भूमिकेचे समर्थन करण्याकरिता त्यांनी बहुतांशी नाटकांमध्ये सूत्रधार - नटीच्या प्रवेशाचा उपयोग करुन घेतलेला आहे. कथानकाची गुंफण आणि व्यक्तिदर्शन या दृष्टीने जोशी यांची नाटके सदोष आहेत. म्हनूणच वि. पा. दांडेकरानी त्यांच्या नाटकांतील कथानकामध्ये रचनाचातुर्य नाही व व्यक्तिदर्शनात सूक्ष्मता, मार्मिकता वा रेखीवपणा नाही हे स्पष्ट शब्दात सांगितले आहे. असे असले तरी त्यांचे नाट्यलेखन मराठी रंगभूमीला महत्त्वाचे योगदान देणारे आहे असे म्हटल्यास ते वावगे ठरु नये.

शं. प. जोशी (शंकर परशराम जोशी) :

यांनी 'मायेचा पूत' (१९११), 'विचित्रलीला' (१९१६), 'खडाष्टक'(१९२७), 'तो आणि ती' (१९३९) ही चार नाटके लिहिली. यातील 'खडाष्टक' हे अधिक लोकप्रिय व यशस्वी ठरले. प्रस्तुत नाटकात लहान लहान गोष्टीवरुन तात्विक व शाब्दिक भांडणे करणाऱ्या माणसाचा समाचार घेतला आहे. 'मायेचा पूत' या नाटकात अनैसर्गिक सामाजिक रुढींवर विनोदी पद्धतीने नाटककारांने हल्ला चढविलेला दिसतो. 'विचित्रलीला' या नाटकात इष्ट व अनिष्ट

सुधारणा विनोदी पद्धतीने दाखविली आहे. तर 'खडाष्टक' या नाटकात स्वभावनिष्ठ, प्रसंगनिष्ठ व शब्दनिष्ठ विनोद साधला आहे. प्रस्तुत नाटकात विनोदाच्या माध्यमातून सामाजिक टिका करण्यात अधिक औचित्य आणि कलात्मकता दाखविलेली दिसते.

वीर वामनराव जोशी :

यांच्या नाट्यलेखनात प्रामुख्याने वीर आणि रौद्र रसाचा आविष्कार आहे. 'राक्षसी महत्त्वाकांक्षा' (१९१४). हे त्यांचे नाटक खूप गाजले. 'रणदुदुंभि' (१९२७), 'धर्मसिंहासन' (१९२९), 'शीलसंन्यास' ही नाटके जोशी यांनी लिहिली. त्यात अनुक्रमे स्वामिनिष्ठा विरुद्ध स्वामिद्रोह, राष्ट्रनिष्ठा विरुद्ध स्वार्थांधता आणि लोकशाही विरुद्ध राजसत्ता असे अटीतटीचे संग्राम अत्यंत उत्कट व भीषण रंगविलेले आहेत.

वा. वा. भोळे (वासुदेव वामन भोळे) :

सामाजिक नाटककार म्हणून त्यांची नाट्यलेखन विषयक कामगिरी मोलाची आहे. त्यांनी 'अरुणोदय' (१९२३), 'सरलादेवी' (१९३१). ही दोन नाटके लिहिली. या दोन नाटकांनी त्यांना नाट्यवाङ्मयात मानाचे स्थान मिळवून दिले आहे. 'अरुणोदय' नाटकातून स्वातंत्र्याच्या चळवळीला कारणीभूत ठरणारा प्रजेचा वाढता असंतोष चित्रित केला आहे. तर 'सरलादेवी' हे त्यांचे नाटक कुमारी मातांच्या प्रश्नाभोवती गुंफलेले आहे.

इतर नाटककार :

प्रस्तुत कालखंडात मराठी वाङ्मयात अनेक नाटककारांनी मोलाची भर घातलेली आहे. त्यातील काही नाटककारांच्या नाट्यवाङ्मयाचा येथे परिचय करून घेऊ.

न. ग. कमतनूरकर : यांनी 'श्री' (१९२६), 'सज्जन' (१९३१), 'स्त्री - पुरुष' (१९३३) ही तीन नाटके लिहिली. 'श्री' या नाटकात घोड्याच्या शर्यतीच्या नादापायी स्वतःचा सर्वनाश ओढवून घेतलेल्या श्रीकांत आणि त्याची पत्नी यांच्या संसाराची करुण कहाणी चित्रित केली आहे. या नाटकावर गडकऱ्याची छाप पडलेली दिसते. 'सज्जन' या नाटकामध्ये सज्जन पण वर्तनाने दुर्जन असलेल्या कैलास या दृष्ट माणसाचे चित्र रंगविले आहे. 'स्त्री-पुरुष' हे नाटक नारदाच्या पौराणिक कथेवर आधारित आहे. एकूणच कमतनूरकर यांची भाषा गडकरी वळणाची असून ती अनुप्रासात्मक आणि कल्पनाप्रचुर आहे.

ग. कृ. फाटक (गणेश कृष्णशास्त्री फाटक) :

यांनी सामाजिक आणि पौराणिक नाट्यलेखन केले आहे. यांचे नाट्यलेखन संख्यात्मकदृष्ट्या अधिक आहे. त्यांनी 'संगीत क्रांतिकौशल्य' (१९२२), 'पंताची सून' (१९२८), 'माझी जमीन' (१९३०), 'नानांची माया' (१९३१), 'डेक्कन क्वीन' (१९३३), 'मोटारवाला' (१९३४), 'घर जावई' (१९३५), 'सासूरवास' (१९५०) ही सामाजिक नाटके लिहिली आणि 'संगीत स्वरसाम्राज्य' (१९१७), 'श्रीकृष्णदान' (१९२५), 'संगीत बालगोपाल' (१९२६), 'संगीत स्वरसुंदरी' (१९३१), 'लाडकी लक्ष्मी' (१९३२) ही पौराणिक नाटके फाटक यांनी लिहिली. त्यांच्या सामाजिक नाटकांनी सामान्य अभिरुचीच्या प्रेक्षकांची करमणूक करण्यात यश मिळविले परंतु कलात्मकतेच्या अंगाने त्यांची नाटके मागे पडली. त्यांची पौराणिक नाटकेही सामान्य दर्जाची असलेली दिसतात.

स. अ. शुक्ल (सदाशिव अनंत शुक्ल) :

'संगीत स्वर्गावर स्वारी' (१९२८), 'संगीत साक्षात्कार' (१९३०), 'संगीत साध्वी मीराबाई' (१९३३) ही पौराणिक नाटके शुक्लांनी लिहिली. 'सौभाग्य लक्ष्मी' (१९२५), 'लोक सिंहासन' (१९४६) ही सामाजिक नाटके लिहिली. पौराणिक नाटकांतून सामाजिक जाणिवेचा नवा अर्थ देण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. प्रचलित राजकीय व सामाजिक सूचनांचा धागा पौराणिक विषयात गुंफण्याची कला त्यांनी नाटकातून वापरलेली दिसते. त्यांच्या चार एकांकिकाही 'चार चांदण्या' या नावाने प्रकाशित झालेल्या आहेत.

गो. स. टेंबे (गोविंद सदाशिव टेंबे) : '

संगीत पटवर्धन' (१९२४), 'संगीत तुलसीदास' (१९२८), 'संगीत वत्सलाहरण' (१९२९) ही पौराणिक नाटके यांनी लिहिली आहेत.

वि. ह. औंधकर (विठ्ठल हरी औंधकर) :

यांचे 'महारथी कर्ण' (१९३४) हे नाटक कुमारी मातेचा प्रश्न या विषयावर आधारित आहे. तर 'बेबंदशाही' (१९२४) या नाटकात त्यांनी संभाजी महाराजांचे दुर्दैवी जीवन रेखाटले आहे. मराठी रंगभूमीवर हे नाटक विशेष गाजले. 'आगऱ्याहून सुटका' (१९३१) हे नाटक दमदार संवाद आणि नाट्यप्रसंगांनी उत्तम साकारलेले आहे. नाट्यरचनेच्या बाबतीत खाडिलकरांचे आणि भाषेच्या संदर्भात गडकऱ्यांचे संस्कार औंधकर यांच्यावर दिसतात. खाडिलकरांप्रमाणे परिणामकारक नाट्यप्रसंग यांची निवड करुन कथानकाची नेटकी रचना त्यांनी केली असली तरी त्यांची नाटके वाङ्मयीनदृष्ट्या कमी दर्जाची असल्यामुळे रंगभूमीवर ती फार काळ यशस्वी होऊ शकली नाहीत.

य. ना. चिटणीस (यशवंत नारायण टिपणीस) :

पौराणिक, सामाजिक आणि ऐतिहासिक असे त्रिविध प्रकारचे नाट्यलेखन त्यांनी केले आहे. मराठी रंगभूमीवर नट आणि नाटककार अशी दुहेरी भूमिका टिपणीसांनी भूषविली. 'मत्स्यगंधा' (१९१२), 'राधामाधव' (१९१४), 'जरासंध' (१९१६), 'नारद' ही पौराणिक नाटके तर 'चंद्रग्रहण' (१९१८), 'शहाशिवाजी' (१९२५), 'शिक्काकट्यार' (१९२७), 'शिवाजीला शह' (१९३३), 'दख्खनचा दिवा' (१९३६) ही ऐतिहासिक नाटके लिहिली. 'कमला' (१९११), 'रामरंजन' (१९२५), 'आशानिराशा' (१९२३), 'स्वस्तिक बँक' (१९३२) ही सामाजिक नाटके त्यांनी लिहिली. नाटककार व नट अशी दुहेरी भूमिका निभावणाऱ्या टिपणीसांची नाटके रंगभूमीवर परिणामकारक ठरली आहेत.

द. ग. सारोळकर :

'पेशव्यांचा पेशवा' (१९२५), 'पराक्रमाचा पाया' (१९२९), 'दर्यासारंग' (१९२९) ही ऐतिहासिक नाटके तर 'वीर सौभद्र' (१९२९), 'राजांचा राजा' (१९३१), आणि 'जनता जनार्दन' (१९२२), 'देहान्त प्रायश्चित' (१९२८), 'शुभमंगल' (१९२९), 'सम्राटाचा सूड' (१९३०), 'पदवीधर' (१९३२) ही सामाजिक नाटके सारोळकर यांनी लिहिली.

शां. गो. गुप्ते :

'संगीत रक्तध्वज' (१९२१), 'संगीत शिवसम्राट' (१९३०), 'सवतासुभा' (१९३१), 'तंट्या भिल्ल' (१९३७), 'सीमांतपूजा' (१९४४), 'संगीत दख्खनचा मोहरा' (१९४९), 'संगीत वेणुनाद' (१९२२), 'संधि संग्राम' (१९२४), इत्यादी पौराणिक, ऐतिहासिक सामाजिक विषयावर गुप्ते यांनी नाट्यलेखन केले.

श्रीधर कृष्ण ओक :

'यज्ञमंडप' (१९३५) हे एकमेव पौराणिक नाटक ओकांनी लिहिले. 'पराक्रमी पेशवा' (१९४१), 'जिंजीहून सुटका', 'स्वातंत्र्यवीर' (१९४४), 'चिडलेला छावा' (१९४६), 'समझुंजार', 'समरधुरंधर' (१९४८), 'संगीत रणगर्जना' (१९४९) ही ऐतिहासिक नाटके लिहिली. त्यांच्या नाटकांमध्ये फारसे कलागुण नसले तरी गिरणी कामगारांच्या मनोरंजनासाठी स्थापन केलेल्या नाट्यसंस्थांना ओकांनी नाटके पुरविली. हा त्यांचा विशेष सांगाता येईल.

ना. वि. कुलकर्णी :

'पार्थप्रतिज्ञा' (१९१७), 'डाव जिंकला' (१९२२), 'संत कान्होपात्रा' (१९३१) ही पौराणिक नाटके आणि 'भाईसाहेब' (१९२२), 'क्षमेची क्षमा'

(१९३२), 'तिकडची शोभा' (१९३३), 'मंगलभूवन' (१९३४), 'नवीन कल्पना' (१९४२) ही सामाजिक नाटके त्यांनी लिहिली.

वि. गो. शेट्ये (विश्वनाथ गोपाळ शेट्ये) :

'लोकशासन' (१९१९), 'जुगारी जग' (१९२१), 'रामरहीम' (१९२४), 'रक्षाबंधन' (१९२९), 'संगीत पंढरपूर' (१९४०) हे नाट्यलेखन शेट्ये यांनी केले. त्यांच्या नाटकातील कथावस्तू कल्पनारम्य असून गुंतागुंतीच्या घटनांनी व्यापलेली आहे.

वि. स. खांडेकर (विष्णू सखाराम खांडेकर) :

कथा, कादंबरी या वाङ्मयप्रकारात अग्रेसर असलेल्या वि. स. खांडेकरांनी नाट्यवाङ्मय निर्मिती ही केली आहे. 'रंकाचे राज्य' (१९२८) हे त्यांचे नाटक उपलब्ध आहे. याशिवाय प्रा. मा. का. देशपांडे यांनी खांडेकरावरील ग्रंथात 'रमणीरत्न', 'स्वराज्याचे ताट', 'शोलशोधन', 'मोहनथाळ', 'शांतीदेवता', 'मृगलांच्छन' ही नाटके त्यांनी लिहिली आहेत असे म्हटले आहे. 'रंकाचे राज्य' या नाटकात म्युनिसिपालीट्यांतून जे इष्ट - निष्ट प्रकार चालतात त्यावर त्यांनी टीका केली आहे.

ना. सी. फडके (नारायण सीताराम फडके) :

फडके यांनी 'युगान्तर' (१९३१), 'संजीवन' (१९३४), 'तोतया नाटककार' (१९३८), 'काळेगोरे' (१९४५), 'जानकी' (१९५०) ही सामजिक नाटके लिहिली असून 'जडावाची देवी' (१९३१) 'आगलावी' (१९३७), 'क्षमेसाठी अपराध' (१९३८) या तीन एकांकिका त्यांनी लिहिल्या आहेत. त्यांच्या नाट्यनिर्मितीवर गडकऱ्यांचा प्रभाव असलेला दिसतो. त्यांच्या 'युगांतर', 'संजीवन', 'जानकी' या नाटकांचे स्वरुप गंभीर आहे तर इतर नाट्यकृती विनोदप्रधान आहेत.

ना. धों. ताम्हणकर :

यांचे 'ब्रह्मर्षि' (१९१९) हे पहिले नाटक होय. त्यांनी बोधप्रद नाटके लिहून नाट्यवाङ्मयात मोलाची भर घातली. 'विद्यार्जन' (१९२१), 'गुरुदक्षिणा' (१९२२), 'मृत्युंजय' (१९२३), 'मित्रभाव' (१९२४), 'पितृभक्ति' (१९२५) ही उपदेशात्मक नाटके लिहिली आहेत. 'उसना नवरा' (१९३३), 'गोड गोंधळ' (१९३५), 'नवा रंग' (१९३६), 'प्रतापी पंत' (१९३७), 'साक्षात्कार' (१९४०), 'दाजी धडपडे' (१९५०) ही स्त्री - पुरुषपात्रयुक्त नाटके लिहिली. तर 'चतुरशांता' (१९३३), 'नवऱ्याला वेसण' (१९३४), 'बोलघेवड्या' (१९३९), 'विदुषी' (१९४२), 'पहिली पायरी' (१९४९) ही स्त्रियांसाठी लिहिलेली नाटके आहेत. पुरुष

भूमिका विरहित नाटके हे या नाटकांचे वैशिष्ट्य आहे. करमणूकीबरोबर स्त्रीवर्गाला सामाजिक सुधारणा सहज पचनी पडतील अशा दृष्टीने या नाटकांचे लेखन ताम्हणकरांनी केले आहे.

ग. कृ. बोडस :

यांनी १९३५ ते १९५० या काळात मराठी वाङ्मयात ऐतिहासिक नाटके लिहिली. 'धर्मवीर संभाजी', 'झाशीची राणी', 'वीर नेताजी', 'संगीत भगवा झेंडा', 'पूज्य गांधीजी', 'राणा प्रताप', 'छत्रपतीचा छावा', 'संगीत अटकेपार' अशी विपुल नाटके बोडसांनी लिहिली

मा. आ. कामत :

'प्रतिज्ञा कंकण', 'तोफेच्या तोंडी', 'बंडाचे निशाण', 'धर्मांतर', 'चाकणची फितुरी' ही ऐतिहासिक नाटके आणि 'वरपरीक्षा', 'तीन तासांत', 'सैतानी स्वार्थ', 'हिरव्या नोटा', ही सामाजिक नाटके कामतांनी लिहिली.

वि. वा. शिरवाडकर (विष्णू वामन शिरवाडकर) : मराठी नाट्यनिर्मितीला वृद्धिंगत करणारे शिरवाडकर यांचे नाट्यवाङ्मय १९४६ ते १९५४ या काळातील आहे. 'दूरचे दिवे' (१९४६), 'दूसरा पेशवा' (१९४७), 'वैजयंती' (१९५०), 'कौंतेय' (१९५३), 'राजमुकुट' (१९५४) ही नाटके प्रस्तुत कालखंडात शिरवाडकरांनी लिहिली आहेत. यामधील 'दुसरा पेशवा' आणि 'कौंतेय' या स्वतंत्र नाट्यकृती आहेत. आणि इतर नाट्यकृती रुपांतरित आहेत.

'दूरचे दिवे' ही नाट्यकृती ऑस्कर वाईल्ड यांच्या 'आयडियल हसबंड' या नाट्यकृतीवर आधारलेली आहे. प्रस्तुत नाटकात आदर्शत्वाच्या कल्पना दुरुनच पाहाव्या ही मध्यवर्ती कल्पना आहे. 'राजमुकुट' हे नाटक शेक्सपिअरच्या 'मॅक्बेथ' या नाट्यकृतीचा अनुवाद आहे. वैजयंती हे नाटक मॉरिस मेटरलिंक यांच्या 'मोनाव्हेना' याचा अनुवाद आहे.

'दुसरा पेशवा' हे एक ऐतिहासिक नाटक आहे. यामध्ये बाजारीवाच्या व्यक्तिरेखेचे प्रत्ययकारी दर्शन घडविले आहे. प्रेम आणि पराक्रमाच्या गुणांच्या पार्श्वभूमीवर बाजीरावाच्या मनाचा वेध घेतला आहे. प्रस्तुत नाटकातील प्रसंग, पात्रे, पात्रांची भाषणे या सर्वाचा रोख बाजीरावाच्या व्यक्तित्वाला उठावदार करण्याकडे झालेला दिसतो. बाजीरावाची मस्तानीबद्दलची रसिकता, अपंग पत्नीबद्दलचे प्रेम, बंधूबद्दलचा प्रेमादरभाव, शाहूराजांविषयी निष्ठा, आत्मविश्वास, शौर्य, स्वतःच्या दुर्गुणांची जाणीव या सर्व त्यांच्या व्यक्तित्व विशेषांचे प्रत्ययकारी दर्शन नाटककाराने घडविले आहे. 'कौंतेय' नाटकात कर्ण आणि कुंती यांच्यातील संबंधाचे सूत्र घेऊन नाटकाची उभारणी केली आहे. कुंतीला कर्णाबद्दल वाटणारे प्रेम, आणि कुंती ही

आपली आई आहे याचे कर्णाला होणारे ज्ञान या दोन बाबींवर नाटकातील नाट्यवस्तूचा विकास आधारलेला आहे. प्रस्तुत नाटकातील कर्णाचे व्यक्तिचित्रण उदात्त आणि प्रभावी आहे. खाडिलकर, गडकरी यांची नाट्यपरंपरा शिरवाडकरांनी पुढे चालू ठेवली. 'चंद्र जिथे उगवत नाही', 'आमचं नाव बाबुराव', 'कैकयी', 'मुख्यमंत्री', 'ययाती - देवयानी', 'वीज म्हणाली धरतीला', 'नटसम्राट' अशी अनेक नाटके त्यांच्या लेखणीतून अवतरली आहेत. एकूणच मराठीतील ऐतिहासिक, पौराणिक, नाट्यवाङ्मयाच्या परंपरेत शिरवाडकरांनी नवे चैतन्य आणल्याचे दिसते.

पु. ल. देशपांडे (पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे) :

नाटक, एकांकिका, प्रवासवर्णन, व्यक्तिचित्र लेखन, विनोदी, ललित लेखन असे विविध प्रकारचे वैविध्यपूर्ण लेखन पु. ल. देशपांडे यांनी केले आहे. त्यांची जनमानसात विनोदी लेखक ही स्थिरावलेली प्रतिमा आहे. सामाजिक वास्तवाचे उपरोध, उपहास, विनोद यांच्या साहाय्याने अधिक कल्पकतापूर्ण चित्रण त्यांच्या नाट्यवाङ्मयात झालेले आहे. 'तुका म्हणे आता' (१९४८) या नाटकाने पु. ल. देशपांडे यांनी नाट्यलेखनात पदार्पण केले. प्रस्तुत नाटकामध्ये संत तुकाराम यांचे सर्वसामान्यांमध्ये असणारे अनन्यसाधारण स्थान दाखविले आहे. संत तुकाराम यांच्या अभंगगाथा लोकगंगेने तारल्या. हे विचारसूत्र नाट्यरचनेच्या केंद्रस्थानी आहे. 'अंमलदार' (१९५२) हे नाटक एका रशियन कथेवर रचलेल्या नाटकाचे स्वैर रुपांतर आहे. पु. ल. चे वाचन चौफेर असल्यामुळे त्यांच्या नाटकाचे विषय पाश्चात्य साहित्यकृतीतून जन्माला येत होते. 'भाग्यवान' (१९५३) हे नाटक सॉमर सेट ऑम यांच्या 'शेपी' या कथेवरुन पु. ल. नी लिहिलेले आहे. मूळ कथेतील शेपी ज्या परिस्थितीत सापडला तसा आपल्याकडील शिदबा सापडला तर काय होईल या कल्पनेतून नाटकाचा जन्म झाला आहे. शिदबा या रद्दीविक्रेत्याला वर्तमानपत्रातील शद्बकोडे बरोबर सोडविल्यामुळे बक्षिस मिळते. हीच वृत्ती तत्कालीन वर्तमान समाजातील झटपट श्रीमंत होण्याची कल्पना पु. ल. नी प्रस्तुत नाटकात वापरली आहे. सामाजिक वास्तवाचे उपरोध, उपहास, विनोद यांच्या साहाय्याने कल्पकतापूर्ण चित्रण, त्यांनी केले आहे. 'तुझे आहे तुजपाशी' (१९५७) हे पु. ल. देशपांडे यांचे स्वतंत्र नाटक आहे. या नाटकात त्यांनी काकाजी आणि आचार्य अशी दोन पात्रे कल्पून जीवनातील आसक्ती आणि विरक्ती व्यक्त केली आहे. प्रस्तुत नाटकातील विविध विलोभनीय व्यक्तिरेखा, प्रेमसंवाद, विडंबन, गतकालची गहिरी स्मृती या प्रत्येकानुसार बदलणारा संवादाचा पोत आणि दोन पात्रांमधील संघर्ष यामुळे हे नाटक समृद्ध झाले आहे. रुडॉल्फ बेसार यांच्या 'बॅरट्स ऑफ विपेंल स्ट्रीट' या नाटकावरुन त्यांनी 'सुदंर मी होणार' हे नाटक लिहिले, तसेच 'तीन पैशांचा तमाशा', 'ती फुलराणी', 'एक झुंज वाऱ्याशी' अशी अनेकविध नाटके पु. ल. देशपांडे यांनी लिहिली आहेत. भाषांतरीत, रुपांतरीत आणि स्वतंत्र अशी त्रिस्तरीय नाट्यरचना त्यांनी निर्माण केलेली आहे. 'तीन पैशांचा तमाशा' हे नाटक बर्टाल्ट

ब्रेश्टच्या 'थ्री पेनी ऑपेरा' या नाटकावरुन रचले आहे. या नाटकाच्या निमित्ताने ब्रेश्टच्या रंगभूमीचा परिचय मराठी रसिकांना झाला.

नाना जोग :

'चित्रशाळा' (१९४८), 'सोन्याचे देव' (१९४९), 'भारती' (१९५२) ही नाटके नाना जोग यांनी लिहिली. प्रचलित समाजव्यवस्थेचे विदारक विश्लेषण करुन जोगांनी कथावस्तू उभारल्या आहेत. वस्तुस्थितीचे मर्म न जाणू शकणाऱ्या प्रकाश नावाच्या चित्रकाराच्या कलादृष्टीवर परिस्थितीने केलेला आघात आणि त्या आघातामुळे त्याच्या कलादृष्टीत होणारी परिवर्तनशीलता हा 'चित्रशाळा' या नाटकाचा विषय आहे. निर्घुण भांडवलशाही ही जातिवंत कलानिर्मितीची गळचेपी करते याचा प्रत्यय प्रस्तुत नाटकात होत राहातो. सत्यनिष्ठेपासून भ्रष्ट होण्यास भाग पाडणारी विदारक वस्तुस्थिती 'सोन्याचे देव' या नाटकातून चित्रित केली आहे. भांडवलशाहीचा हस्तक असलेला भालेराव प्रस्तुत नाटकाचा सूत्रधार आहे. सोने हा त्याचा देव आहे. सोने हे त्यांच्या जीवनाचे नियमन करणारे एकमेव मूल्य आहे. त्यांच्या 'भारती' या नाटकात अल्पवयीन तरुण मुलगी पत्नी म्हणून हस्तगत करणाऱ्या वयस्कांची, वृद्धांची वास्तविक अमानुषता अत्यंत भीषणतेने प्रत्ययकारी स्वरुपात नाटककाराने मांडलेली आहे. प्रा. अ. ना. देशपांडे यांनी जोगांच्या नाट्यलेखनासंदर्भात मांडलेले विचार महत्त्वपूर्ण आहेत. ते म्हणतात - "उच्च वैचारिक व समाजाभिमुख भूमिकेवरुन लिहिलेल्या जोगांच्या कलासंपन्न नाट्यकृतींनी मराठी नाट्यसृष्टीच्या विकासक्रमांतील नव्या वैभवशाली पर्वास प्रारंभ केला आहे हे मान्य करणे म्हणजे जोगांची अवास्तव स्तुती करणे नसून वस्तुस्थितीचा यथार्थ कानोसा घेणे आहे."

वसंत कानेटकर :

वसंत कानेटकर यांनी मराठी रंगभूमीवर सातत्याने दर्जेदार वैशिष्ट्यपूर्ण आणि प्रयोगदृष्ट्या यशस्वी नाटके रंगभूमीला दिली. सार्त्र आणि कामू या लेखकांच्या साहित्य आणि विचार यांच्या प्रभावाने कानेटकर प्रभावित होते. 'वेड्याचे घर उन्हात' (१९५७) या नाटकाने त्यांच्या नाट्यलेखनाला प्रारंभ झाला. प्रस्तुत नाटकात दादा या पात्राचा आंतरिक संघर्ष आणि व्यवहारीवृत्तीचा पश्चाताप याच्या ताणामुळे मानसिक तोल ढळतो, हे नाटकांचे सूत्र आहे. मध्यवर्ती पात्राला उठाव देणारी पात्र, ताणाचे प्रमाण कमी करण्यासाठी योजनाबद्ध केलेला विनोद, खटकेबाज संवादात्मकता ही या नाटकाची बलस्थाने म्हणता येतील. प्रस्तुत नाट्यकृतीने मराठी रंगभूमीवर मनोविश्लेषणात्मक नाट्यलेखनाचे परिमाण निर्माण केले. 'देवाचे मनोराज्य' (१९५८) या नाटकात मानवाच्या भवितव्याचा वेध घेणाऱ्या वैचारिक अंत:सूत्राची कानेटकरांनी कल्पक, चमत्कृतिपूर्ण योजना केली आहे. 'प्रेमा तुझा रंग कसा?' (१९६१), 'रायगडाला जेव्हा जाग येते' (१९६२), 'अश्रूंची झाली फुले'

(१९६६), 'हिमालयाची सावली', 'मीरा मधुरा', 'गरुड झेप', 'कस्तुरी मृग', 'इथे ओशाळला मृत्यू', 'दोन ध्रूवावर दोघे आपण' इत्यादी नाट्यकृती कानेटकरांनी लिहिल्या. कानेटकरांनी पौराणिक व्यक्तिचरित्रांवर जशी नाटके लिहिली तशी आधुनिक काळातील व्यक्तिचरित्रांवरही नाट्यलेखन केले आहे.

विजय तेंडूलकर :

कथा, कादंबरी, पटकथालेखन असे विविध प्रकारचे लेखन करणाऱ्या तेंडुलकरांनी 'माणूस नावाचे बेट' (१९५६) लिहून रंगभूमीवर पदार्पण केले. त्यांनी तीस स्वतंत्र आणि चार भाषांतरित नाटके लिहिली. 'गृहस्थ' आणि 'श्रीमंत' हे पहिल्या टप्प्यातील त्यांचे नाट्यलेखन कौंटुबिक स्तरावरचे आणि मध्यमवर्गीय जाणिवांच्या कक्षातले आहे. 'गृहस्थ' 'श्रीमंत' (१९५७), 'माणूस नावाचे बेट', 'मधल्या भिंती' (१९५८), 'चिमणीच घर होत मेणाचं' (१९६०) इ. नाटकातून मध्यमवर्गीय माणसांच्या अस्तित्वाचा तेंडूलकर शोध घेताना दिसतात. यानंतर त्यांनी 'बेबी', 'गिधाडे', 'कमला', 'शांतता कोर्ट चालू आहे', 'सखाराम बाईंडर', 'घाशीराम कोतवाल', 'कन्यादान', 'मित्रांची गोष्ट', 'अशी पाखरे येती', 'सरी ग सरी', 'कावळ्यांची शाळा', ही नाटके लिहिली.

मध्यमवर्गीय माणसांची सुख-दुःखे त्यांची स्वप्ने आणि सभोवतालच्या परिसर यातून त्यांचे नाट्यविश्व साकारलेले असे. त्यांच्या नाट्यशैलीचा एक महत्त्वपूर्ण विशेष म्हणजे लहान लहान वास्तववादी अर्थवाही संवाद हे होय. त्यांच्या नाटकांत घटना - प्रसंगापेक्षा पात्रचित्रणाला महत्त्व असलेले दिसते.

१९२० ते १९६० या कालखंडातील नाट्यलेखनाचे विशेष :

१९२० ते ६० या कालखंडातील नाट्यलिखानाचे ठळक विशेष सांगायचे झाले तर असे म्हणता येईल की, १९२० ते ६० या कालखंडात विविध विषयांवर विपुल नाट्यलेखन झालेले दिसते. १९२० पूर्व कालखंडात दिसणारे पौराणिक कथावस्तूंचे प्राचुर्य नष्ट होवून कौटुंबिक व सामाजिक परिस्थितीचे, समस्यांचे वास्तव नाटककारांनी या काळात कलात्मक अंगाने मांडलेले दिसते. १९२० नंतरच्या नाट्यवाङ्मयावर कोल्हटकर, खाडिलकर गडकरी या नाटकारांच्या नाट्यतंत्राबरोबरच इब्सेनियन नाट्यतंत्राचाही प्रभाव आढळतो. वा. वा. भोळे यांच्या 'सरलादेवी' (१९३२) या नाटकातून तो केला गेला. अत्रे, वरेरकर आणि रांगणेकर हे या काळातील तीन प्रमुख नाटककार असून या तीन नाटककाराचा ठसा या काळातील नाट्यवाङ्मयावर उमटलेला दिसतो. विविध भाषांतील (जर्मन, रशियन, ब्रिटीश इ.) नाटककारांच्या नवनव्या प्रवृत्तीचा प्रभाव मराठी नाटककारांवर पडला. यामधून प्रेरणा घेवून काही वृत्ती - प्रवृत्ती मराठी नाटकांतून स्वतंत्रपणे आलेल्या दिसतात. हे या कालखंडाचे एक वैशिष्ट सांगता येईल. बदलत्या जीवनाची चाहूल

तत्कालीन कालखंडाला लागलेली होती. त्यामुळे जागतिक विचारांचे साद - पडसाद नाटकांमधून उमटलेले दिसतात. त्यातूनच नाट्यानुभवाला एक प्रकारची सखोलता प्राप्त झाली. नाट्यमन्वंतर (१९३३) या संस्थेचे पहिले नाटक 'आंधळ्यांची शाळा' या नाटकाने आशय व आविष्कारदृष्ट्या वास्तवाचे नवे भान नाटक या साहित्यप्रकाराला दिलेले दिसते. रांगणेकर आणि वरेरकर यांनी जुन्या परंपरेशी समन्वय साधत नवे तंत्र जोपासण्याचा प्रयत्न केला. अत्रे यांनी विनोदाचा मार्ग स्वीकारुन जीवनातील सत्याचा वेध विनोदातून साकारला. तत्कालीन कालखंडाचा विचार करता या काळात नाटककारांनी सामाजिक विषय अधिक हाताळलेले दिसतात. त्यामध्ये आशयविषयक विविधता देखील आहे. सामाजिक प्रश्नांचे पडसाद नाटकांतून उमटलेले दिसतात. उदा. कुमारी मातेचा प्रश्न, सावकारी छळ, कामगार चळवळी, गांधीजींची स्वातंत्र्याविषयक आंदोलने इत्यादी. या काळात ऐतिहासिक व पौराणिक नाटकांचा प्रवाह दिसत असला तरी ऐतिहासिक व पौराणिक नाटके लिहिणारे भा. वि. वरेरकर, औंधकर, टिपणीस, सारोळकर, शुक्ल, शिरवाडकर असे काही मोजकेच नाटककार सांगता येतात. प्रस्तुत कालखंडाचा प्रारंभ हा मराठी रंगभूमीचा पडता काळ आहे. या कालखंडाच्या प्रारंभी मराठी रंगभूमीला पडत्या काळात इब्सेनच्या परंपरेने सावरण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. श्रीधर वर्तक, वा. वा. भोळे, मो. ग. रांगणेकर, प्र. के. अत्रे ह्या नाटकारांनी इब्सेनप्रणित वास्तववादी रंगभूमीचा परिचय मराठी नाट्य विश्वाला करुन दिला. यासंदर्भात 'सरला देवी', 'आधंळ्याची शाळा', 'घरा बाहेर' या नाटकांचा निर्देश करता येईल. १९२० ते १९४५ या काळातील सामाजिक नाटकांवर इब्सेनचा मोठ्या प्रमाणावर प्रभाव असलेला दिसून येतो. त्यामुळे सामाजिक नाटकांमधून तत्कालीन वास्तवाचे घटना - प्रसंगामधून चित्रण नाटककारांनी केलेले दिसते. १९४५ ते १९६० या कालखंडात मराठी संगीत रंगभूमी, शेक्सपियरच्या रंगभूमीचा अभिजात आदर्श ठेवून रुपांतरे करण्याचा प्रयत्न आणि समकालीन प्रश्नांचा धांडोळा घेत त्यांना नाट्यरुप देण्याचा प्रयत्न झालेला दिसतो.

सारांश :

१९२० ते १९६० या कालखंडात विविध सामाजिक, राजकीय, कौटुंबिक, पौराणिक आदी विषयांवर नाट्यलेखन झालेले दिसते. प्रस्तुत कालखंडाचा एक महत्त्वपूर्ण विशेष म्हणजे इब्सेनी नाट्यतंत्राने मराठी नाट्यसृष्टीला मोलाचे योगदान दिले. प्र. के. अत्रे, मामा वरेरकर, मो. ग. रांगणेकर या तीन नाटककारांनी नाटक या साहित्यप्रकाराकडे सकारात्मक दृष्टीने पाहिलेले दिसते. प्रस्तुत कालखंडात अनेक नाटक मंडळे उदयास आली. त्यांनी मराठी रंगभूमीचा हा पडता काळ सावरण्याचा प्रयत्न केला. १९२० नंतर मराठी रंगभूमीला लागलेली ओहोटी या काळातील अनेक लहान मोठ्या नाटककारांनी थांबविण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. तत्कालीन कालखंडाची सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय, धार्मिक

परिस्थिती समजून घेण्याचा दृष्टीने हे नाट्यलेखन महत्त्वपूर्ण ठरते. त्यांनी केलेले हे नाट्यलेखन वाङ्मयीन आणि सांस्कृतिकदृष्ट्या मोलाची कामगिरी बजावणारे आहे, असे म्हणता येईल.

स्त्री-नाटककार :

मराठी नाट्यवाङ्मयात पुरुष नाटककारांनी विपुल नाट्यलेखन केले हे सर्वज्ञात आहे. १९२० ते १९६० या कालखंडात स्त्रीनाटककारांनी देखील मराठी नाट्यवाङ्मयात मोलाची भर घातलेली आहे. परंतु त्यांचे नाट्यलेखन मराठी वाङ्मयाच्या इतिहासात दुर्लक्षित राहिलेले दिसते. स्त्रीविषयक प्रश्नांबरोबर सामाजिक प्रश्न देखील स्त्री-नाटककारांनी आपल्या नाट्यलेखनातून हाताळलेले दिसतात. समाजातील अनेक तत्कालीन प्रश्नांवर (कुटूंब, प्रेम, धर्म, हुंडा इत्यादी) प्रकाश टाकून ते मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. १९२० ते १९६० या कालखंडात गिरीजाबाई केळकर ते कुमुदिनी रांगणेकर अशी स्त्रीनाटककारांची एक परंपरा असलेली दिसते.

आद्य स्त्री-नाटककार :

१९२० ते १९६० या कालखंडातील स्त्री–नाटककरांच्या नाट्यवाङ्मयाचा विचार करण्यापूर्वी १९२० पूर्व स्त्री-नाटककार आणि नाट्यवाङ्मय याचा विचार करणे रास्त ठरेल. काशीबाई फडके यांनी 'संगीत सीताशुद्धी' (१८८७) हे नाटक लिहिले आहे. त्यांचे हे नाटक त्यांच्या वडिलांनी १८९७ मध्ये प्रकाशित केले. सोनाबाई केरकर यांचे 'संगीत छत्रपती संभाजी' (१८९६) हे पाच अंकी ऐतिहासिक नाटक आहे. त्यांचे हे नाटक मुद्रित पुस्तकरुपात इ.स. १८७६ मध्ये प्रकाशित झालेले असल्याने ते मराठी स्त्री-नाटककारांमधील आद्य स्त्री-नाटककार म्हणून लक्षात घ्यावे लागते. त्यांनतर काशीबाई फडके, हिराबाई पेडणेकर यांनी नाट्यलेखन केलेले दिसते.

१९२० ते १९५० मधील स्त्री-नाटककार :

गिरिजाबाई केळकर :

१९२० पूर्वी यांचे 'गृहिणीभूषण', 'संगीत पुरुषांचे बंड' ही दोन नाटके प्रकाशित झाली आहेत. असे असले तरी १९२० नंतर नाट्यक्षेत्रात त्यांनी मोलाची कामगिरी केलेली दिसते. त्यांचे 'संगीत आयेषा' (१९२१), 'राजकुंवर' (१९२४), 'हीच मुलाची आई' (१९३२), 'मंदोदरी' (१९५७) ही नाटके प्रकाशित आहेत. त्यांचे 'संगीत पुरुषांचे बंड' हे नाटक सर्वाधिक गाजलेले आहे. प्रस्तुत नाटकात स्त्री वर्जित पुरुष राज्य स्थापन करण्याची कल्पना आहे. 'संगीत आयेषा' हे पहिले ऐतिहासिक नाटक त्यांनी लिहिले आहे. 'राजकुंवर' या नाटकातून संभाजीची बहीण

राजकुंवर ही विसाव्या शतकातील स्वतंत्र विचार करणाऱ्या स्त्रियांचे प्रतिनिधित्व करणारी आहे. 'मंदोदरी' हे गिरिजाबाईंचे पौराणिक नाटक आहे.

मालती तेंडुलकर :

मालती तेंडुलकर यांनी 'मराठ्यांचा राजा' (१९३३), 'अर्धांगी' (१९३३) ही दोन नाटके एकाच वर्षी लिहिली आहेत. 'अर्धांगी' नाटक घटस्फोटाच्या कायद्याची आवश्यकता ह्या सूत्राला साकारते. परंतु घटस्फोटाचा कायदा स्त्रीला पूर्ण सुरक्षितता देऊन स्वैर पुरुषी वर्तनाच्या मनस्तापापासून वाचवेल असे नाही, या विचाराच्या प्रभावामुळे त्यांचे हे नाटक परंपरेलाच शरण जाताना दिसते.

आनंदीबाई किर्लोस्कर :

त्यांचे 'नव्या वाटा' हे नाटक १९४३ मध्ये प्रकाशित झाले असून हे नाटक नवयुगाला योग्य मार्ग सुचवू पाहणारे आहे. पारंपरिक स्त्रीजीवनाला नव्या वाटा दाखविण्याचा प्रयत्न या नाटकातून झालेला दिसतो. वैवाहिक जीवनात यशस्वीता प्राप्त झाली नाही तर घटस्फोट घेऊन सुखाने जगता येते हा मार्ग प्रस्तुत नाटकातून स्त्री वर्गाला दाखविलेला दिसतो. स्त्रीयांना सुखाने जगण्याचा संदेश दाखवू पाहणारे हे नाटक आहे. प्रस्तुत नाटक पुरुष पात्रविरहित आहे. प्रचलित विवाह पद्धतीतील दोष काढून टाकून यमू या पात्राच्या आधारे कलात्मकपूर्णतेने नव्या वाटा कशा स्वीकाराव्या हे दाखविण्याचा प्रयत्न केला आहे.

मालतीबाई बेडेकर :

यांचे 'पारध' (१९४५) हे नाटक परित्यक्त्या स्त्री जीवनावर आधारित आहे. प्रस्तुत नाटकातून परित्यक्त्या स्त्रीयांच्या समस्या मांडण्याचा प्रयत्न झाला आहे. प्रस्तुत नाटकातून रमेसारख्या परित्यक्त्या हिंदू स्त्रीला जगावे लागणारे असहाय आणि अप्रमाणित जीवन वस्तुनिष्ठपणे मालतीबाईंनी दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे. कौटुंबिक जीवन आणि समाजरचना यामुळे परित्यक्त स्त्रीची होणारी ससेहोलपट या नाटकातून चित्रित झाली आहे. परित्यक्त स्त्रीच्या आर्थिक, भावनिक, शारीरिक गरजांचा वेध घेवू पाहाणारे हे नाटक आहे.

सुधा साठे :

यांनी 'संगीत एकच गाठ' (१९४८) हे नाटक लिहिले आहे. प्रस्तुत नाटकात वधुपरीक्षेच्या विविध पद्धती, पारंपरिक चालीरिती यावर भाष्य केले आहे. मुलीला माणूस म्हणून न पाहता एक वस्तू म्हणून पाहून तिचे मूल्यमापन करणारी समाजव्यवस्था, पारंपरिक दृष्टिकोन यावर परखडपणे भाष्य करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

कमला प्रभू -

यांचे 'संगीत घराकडे' (१९४८) हे सामाजिक नाटक आहे. प्रस्तुत नाटकातील सुरेखा हे पात्र एक माणूस म्हणून जगण्यासाठी न्याय मिळवू पाहणारी नायिका आहे. स्त्री - पुरुष नात्यामधील नव्या मानवतावादी मूल्यांची जपणूक करणारे हे एक प्रमुख नाटक म्हणता येईल.

शंकुतला परांजपे :

यांनी 'सोयरीक' (१९३६), 'चढाओढ' (१९३६) ही दोन नाटके फ्रेंच भाषेमधून मराठीत रुपांतर केलेली विनोदी नाटके आहेत. तसेच 'पांघरलेली कातडी' या नाटकातून मनुष्य स्वभावाच्या दिखाऊपणावर प्रकाश टाकण्याचा त्यांनी प्रयत्न केलेला दिसतो.

उमाबाई सहस्त्रबुध्दे :

'संगीत काहूर' (१९४८), 'संगीत लोकराज्य' (१९४८) ही दोन नाटके त्यांनी लिहिली आहेत. प्रस्तुत नाटकांमधून स्त्री जीवनातील समस्यांचे चित्रण करुन स्त्री जीवनावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

कृष्णाबाई मोटे :

यांनी 'माझी गुणाची पोर' (१९५०) हे नाटक लिहिले आहे. प्रस्तुत नाटकातून कौटुंबिक विषय त्यांनी हाताळलेला आहे. नव्या - जुन्याची सांगड घालून कौटुंबिक स्थितीचे चित्रण केले आहे.

विमल काळे -

जागृक स्त्रीची शिक्षणविषयक भूमिका आणि समाजकार्याची ओढ 'भूमीला भार' (१९५०) या नाटकातून त्यांनी दाखविली आहे. हे नाटक स्त्रीला घर सांभाळून समाजकार्य करण्याचा मार्ग दाखवू पाहणारे आहे. कोणत्याही स्त्रीने भूमीला भार होवू नये हा संदेश प्रस्तुत नाटक देते. त्यांनी 'मृगजळ' (१९६०) हे नाटक ही लिहिले आहे.

पद्मा गोळे :

'नवी जाणीव' (१९५०) या नाटकातून बदलू पाहणाऱ्या स्त्रीचे जीवन यशस्वीपणे मांडण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. पारंपरिक जीवन जगणाऱ्या स्त्रीने प्रगल्भ होवून विचार करावा हा संदेश प्रस्तुत नाटकातून दिला आहे.

१९२० ते १९५० मधील इतर स्त्री नाटककार :

१९२० ते १९५० या कालखंडात स्त्री-नाटककारांनी स्त्रीविषयक प्रश्नांना वाचा फोडण्याचा प्रयत्न आपल्या नाटकांमधून केलेला दिसतो. स्त्री जीवनाशी संबंधित अनेक विषयांची मांडणी या कालखंडात स्त्री-नाटककारांनी केली. भागीरथीबाई वैद्य यांचे 'ब्रह्मात्म बोध' हे अध्यात्माचा विचार मांडणारे नाटक त्यांनी लिहिले. क्षमाबाई राव यांचे 'केवळ ध्येयासाठी' (१९२६), चंद्राबाई शिंदे यांचे 'गृहिणीधर्म' (१९२६), इंदिराबाई पेंडसे यांचे 'कुलभूषण' (१९३२), वनिता देसाई यांचे 'प्रेमरहस्य' (१९३४) व 'म्हारीची पोर' (१९३६), मनोरमा लेलेबाई यांचे 'प्रणय प्रचिती' (१९३५), माई वरेरकरांचे 'काकांची शशी' (१९३५), द्वारका दत्तात्रय गुप्ते यांचे 'प्रेमाचा होम' (१९४०), अनुसूया वाघ यांचे 'बालसंवाद' (१९४१), विमल घैसास यांचे 'नंदादीप' (१९४९) व 'मदिरा' (१९४९), इंदूमती देशमुख यांचे 'शीला' (१९४९) यांसारखी नाटके प्रस्तुत काळात स्त्री नाटककारांनी लिहिलेली आहेत. या नाटकांद्वारे अध्यात्म, प्रेम, कुटुंब, धर्म, समाजातील परंपरा यांसारख्या अनेक विषयांवर स्त्री नाटककारांनी प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

१९५० ते १९६० मधील स्त्री-नाटककार:

१९५० नंतर नाटकांमध्ये आशय, अभिव्यक्ती, यांबरोबर नाटक या साहित्यप्रकाराकडे स्त्री नाटककारांनी जाणीवपूर्वक पाहिलेले दिसते. तसेच कुटुंबप्रधान नाटकांचे पारंपरिक स्वरुप बदलून वास्तव जीवनदर्शन, मानवी स्वभावदर्शन नाटकांमधून घडविण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

मुक्ता दीक्षित :

जुगार (१९५१), 'अवलिया', 'संसार' (१९५६) ही नाटके यांनी लिहिली आहेत. मुक्ताबाईंच्या नाटकांची बांधणी, कथावस्तू नेटकेपणाने असल्याचे दिसते. त्यांच्या नाटकातील व्यक्तिचित्रे प्रभावी आहेत. स्त्रीच्या दृष्टिकोनातून प्रेमविवाह, स्त्रीची मानसिक अवस्था मांडण्याचा प्रयत्न 'जुगार' या नाटकात केलेला आहे. 'जुगार' हे नाटक प्रस्तुत काळात खूप गाजलेले दिसते. प्रस्तुत नाटकाचे हिंदीमध्ये 'जुआ' कानडी मध्ये 'जुजू', असा या नाटकाचा अनुवाद झालेला आहे. प्रस्तुत नाटक मराठी व्यतिरिक्त इतर भाषांत भाषांतरित होऊन मुंबई विद्यापीठ, गुजरात विद्यापीठ, उस्मानिया विद्यापीठ यांच्या अभ्यासक्रमातही हे नाटक लावण्यात आलेले होते.

मालतीबाई बेडेकर :

'पारध' (१९४७), 'हादलेलं घर' (१९५७), 'अलौकिक संसार' (१९५८), 'कलियुग ग बाई कलियुग' (१९६६), ही नाटके त्यांनी लिहिली आहेत. 'अलौकिक संसार' या नाटकातील नायिका सुनीताचा पती गोवा मुक्ती संग्रामात सहभागी होवून कारावासत गेल्यानंतर आपले कुटुंब काटकसरीने चालविण्याचा आणि घराची जबाबदारी पुर्णपणे स्वतः सांभाळण्याचा प्रयत्न करणारी स्त्री-व्यक्तीरेखा म्हणून साकारली आहे. हे स्त्रीपात्र घरातील स्त्रीयांना विद्यमान परिस्थितीची जाणीव करुन देते आणि स्वतः गोवा मुक्ती संग्रामात सहभागी होते. प्रस्तुत नाटकातून स्त्रीची जाणीव क्षमता, स्त्रीची प्रगल्भता त्याचबरोबर कुटुंबाबरोबर समाजासाठी, देशासाठी झगडणाऱ्या स्त्रीचे चित्रण आलेले आहे.

'हादलेल घर' या नाटकामध्ये पौंगडावस्थेथील मुलामुलींच्या बेछुट वर्तनामुळे येणारी कुटुंबातील उद्ध्वस्तता परिणामकारकपणे दाखवली आहे. स्त्री प्रश्नांची मांडणी, स्त्रीचे भावविश्व याचबरोबर बदलते जीवन याचे दर्शन मालतीबाई बेडेकर यांनी आपल्या नाट्यलेखनातून घडविण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

तारा वनारसे :

यांनी 'कक्षा' हे नाटक १९५५ मध्ये लिहिले आहे. प्रस्तुत नाटकातून मानवी स्वभावातील, वृत्तीतील गुंतागुंत शोधण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. कथानकाची बांधणी, नेटके आणि आटोपशीर प्रसंग या नाटकाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य सांगता येईल.

कुमुदिनी रांगणेकर :

यांची 'आंधळी कोशिंबीर' (१९५५), 'बच्चू लछमन' (१९५९), 'दारीच्या चिमण्या उडुनी जाती' (१९६१) ही नाटके प्रकाशित आहेत. 'आंधळी कोशिंबीर' या नाटकामध्ये आर्थिक जबाबदाऱ्या पार पाडणाऱ्या प्रौढ कुमारिकांच्या कुचंबनेचा प्रश्न मांडला आहे. 'बच्चू लछमन' नाटक अपत्यविहीन जोडप्याचे जीवन या मध्यवर्ती घटनेवर आधारलेले आहे. विनापत्य जोडप्यांनी दत्तकाचा मार्ग स्वीकारावा हा विचार या नाटकातून देण्याचा प्रयत्न होताना दिसतो. विनापत्य जोडप्यांनी दत्तक मूल घेऊन जीवनाकडे सकारात्मक दृष्टीने पाहण्यास सांगणारे हे बोधवादी नाटक आहे.

उमाबाई भट :

यांचे 'पत्त्यांचा बंगला' (१९५८) हे हुंडा या विषयावर आधारित नाटक आहे. प्रस्तुत नाटकातील मालती या स्त्री-पात्राचे इंजिनिअर प्रकाशवर प्रेम असूनही हुंड्याच्या भीतीने ती त्याच्यापासून दूर रहाते. ही बाब प्रकाशच्या लक्षात येताच तो

तिच्या मनातील ही भीती पत्त्यांच्या बंगल्याप्रमाणे दूर करतो. प्रस्तुत नाटकातून हुंडापद्धतीला विरोध दर्शविण्याचा संदेश नाटककार देऊ पाहते. तसेच सुशिक्षित व्यक्तींनी हुंडापद्धती संपुष्टात आणण्यसाठी पुढे यावे असे आवाहनही हे नाटक करताना दिसते.

इतर स्त्री-नाटककार :

'सौभाग्यकांक्षिणी' (१९५४) हे प्रौढ व कौटुंबिक अडचणींमुळे अविवाहित राहणाऱ्या स्त्रीच्या मनातील कोंडमारा दाखविणारे मनोविश्लेषणात्मक नाटक शांता मिसळ यांनी लिहिले आहे. शशिकला आळंदकर यांनी 'संगीत तारु लागले किनारी' (१९५९) हे नाटक लिहिले आहे. सुमतीदेवी धनवटे यांचे 'धुळीचे कण' (१९५९) हे बाह्य सौंदर्यापेक्षा आंतरिक आत्म्याचे सौंदर्य श्रेष्ठ असते हा संदेश देणारे नाटक आहे. सरिता पदकी यांनी 'बाधा' (१९५६) हे नाटक लिहिले आहे. ज्योत्स्ना भोळे यांनी 'आराधना' (१९६०) हे संगीत प्रधान नाटक लिहिले आहे. आनंदीबाई लोणकर यांचे 'पारिजातक' (१९५३), चंद्राबाई कर्नाटकी यांचे 'शबरी' (१९५७), लीलावती आठवले यांचे 'संगीत कलिप्रताप' (१९५८) ही नाटके प्रस्तुत कालखंडात लिहिली गेलेली नाटके सांगता येतील.

स्त्रियांचे एकांकिका लेखन :

१९२० ते १९६० या कालखंडात नाट्यवाङ्मयामध्ये स्त्री नाटककारांनी पुरुष नाटककारांप्रमाणेच मोलाची भर घातलेली दिसते. १९२० ते ३० च्या दरम्यान इंग्रजी वाङ्मयातील 'वन ॲक्ट प्ले' च्या धर्तीवर एकांकिका लेखन मराठीत झालेले दिसते. कमीतकमी कलाद्रव्य आणि अवकाश यामध्ये आपला विषय नाटककारांनी एकाकिंकामधून मांडणाचा प्रयत्न केला आहे. अनंत काणेकर, मो. ग. रांगणेकर, आळतेकर यासारख्या पुरुष नाटककारांबरोबर स्त्री नाटककांरानीही एकांकिका लेखन करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

दया पटवर्धन :

यांनी १९२८ ते १९३८ या दरम्यान एकांकिका लेखन केलेले दिसते. 'सात पाहुण्या' हा त्यांचा एकांकिकासंग्रह आहे त्यांनी दैनंदिन जीवनातील प्रसंगावर आधारित मनोरजंनात्मक एकांकिका लिहिल्या आहेत. प्रेम, प्रेमविवाह, संसार, स्त्री - शिक्षण हे विषय प्रामुख्याने त्यांच्या एकांकिका लेखनाचे आहेत. 'प्रेम वेडा', 'गैरसमज', 'लांबलेले लग्न', 'प्रेमाचे पूरक', 'बंड गार्डनवर', 'श्रीमंत पतीची राणी', 'नीला निमकर' या त्यांच्या एकांकिका आहेत. पात्रांच्या व्यक्तित्वाला योग्य अशा संवादांची योजना केल्यामुळे त्यांच्या एकांकिका प्रयोग सुलभ झाल्या आहेत.

प्रेमा कंटक :

यांचा 'भ्रान्त जीवन' हा एकांकिका संग्रह आहे. या एकांकिका संग्रहात 'क्रांती', 'कायदा', 'उद्धार', 'जयकाली' आणि 'प्रेमपंथ' या पाच एकांकिका आहेत. गांधीजीच्या प्रभावाने प्रेरित असलेली ही स्त्री नाटककार समाजसुधारणेच्या अनुषंगाने लेखन करताना दिसते. प्रस्तुत कालखंडावर महात्मा गांधी यांचा प्रभाव पडलेला असल्यामुळे मनोरंजनातून समाजप्रबोधन करावे हा हेतू त्यांचा लेखनातून दिसतो. एकांकिकांमधून भारतीय संस्कृती जपण्याचा, गांधीजीच्या विचारांना पाठिंबा दर्शविण्याचा हेतू असल्याचे दिसते. तसेच स्त्रीयांच्या विविध प्रश्नांची मांडणी करुन ती सोडविण्याचा आणि कायदा व शिक्षण याविषयीचे महत्त्व पटवून देण्याचा प्रयत्न कंटक यांनी आपल्या एकाकिंकातून केलेला दिसतो.

इन्दुमती देशमुख :

यांनी 'शील' ही एकांकिका लिहिली आहे. प्रस्तुत एकांकिकेत जिचा पती भ्रमिष्ट झालेला आहे अशा पत्नीवरील अन्यायपूर्ण परिस्थितीला वाचा फोडण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. कायदा जर स्त्रीच्या बाजूने नसेल तर कायदेभंग करण्याची ताकद स्त्रीमध्ये यायला हवी. अशी प्रोत्साहनपर आणि काळाच्या पुढचा विचार करणारी प्रस्तुत एकांकिका आहे.

कुमुदिनी प्रभावळकर - रांगणेकर :

यांनी 'जागवू या मंगळागौर', 'हादगा' या एकांकिंकाचे लेखन १९४० ते १९५० च्या दरम्यान केलेले आहे. 'जागवू या मंगळागौर' या एकांकिमध्ये सासू - सुनेचे संवादी आणि विरोधी नाते चित्रित केले आहे. 'हादगा' या एकांकिमध्ये स्त्रियांच्या समूहात खेळल्या जाणाऱ्या विविध प्रकारच्या खेळांची माहिती दिली आहे.

लीला दाते :

यांनी 'अमृत वाटे फिकै', 'देव जाणिले कुणी', 'अबोल झाली माया' या एकाकिंकाचे लेखन केले आहे. प्रस्तुत एकाकिंका कौटुंबिक समस्यांकडे मानवतेच्या आणि प्रगत दृष्टिकोनातून पाहण्याचा संदेश देऊ पाहणाऱ्या आहेत.

मालती दांडेकर :

यांचा 'यशोधरा आणि इतर एकांकिका' हा एकांकिकासंग्रह आहे. मनोरंजन आणि उद्‌बोधनात्मकता हा त्यांच्या एकांकिकाचा विशेष आहे. मनोरंजनातून विद्यार्थ्यांवर सुसंस्कार व्हावे या हेतूने शाळा, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी या एकांकिका लिहिल्याचे जाणवते.

सुधा देशपांडे :

यांची 'अहो मी नाटक लिहितोय' ही एकांकिका आहे. या एकांकिकेत साहित्यनिर्मितीच्या वेळी लेखकाच्या मेंदूत कोणते बदल घडतात याचे आधुनिक यंत्रानी परीक्षण करण्याचा प्रयत्न अनिल हे पात्र करते. नाविण्यपूर्ण कल्पनेवर आधारित कथानकाची योजना करीत रंजकप्रधानता आणण्याचा प्रयत्न केला आहे.

सुशीला मराठे :

यांनी 'अन् झालं भलतचं', 'हुंदका हिमातून हसला', 'परक्या भिती' या एकांकिकांचे लेखन केले आहे. वास्तव जीवनातील एखादा गंभीर प्रसंग घेऊन त्याला नाट्यरुप देणारी मराठे यांची शैली असल्याचे दिसते.

मालती जोशी यांची 'सुशिक्षित सासुरवास' (१९५२) **लीला घोलप** यांची 'वरदान' (१९५५), **शशिकला आळंदकर** यांची 'आकाशदिवा' (१९५६), **आशा सुतार** यांची 'कर्तव्याची जाणीव', **वसुधा पाटील** यांचा 'पियानो आणि इतर एकांकिका', **तारा वनारसे** यांचा 'नर्सेस क्वार्टस आणि इतर एकांकिका' यांसारखे १९२० ते १९६० च्या दरम्यान एकांकिका लेखन झालेले दिसते. या काळात कौटुंबिक जीवन आणि सभोवतालच्या सामाजिक जीवनामधील प्रश्नांची मांडणी स्त्री-नाटककारांनी आपल्या एकांकिका लेखनामधून करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. तसेच पांढरपेशा समाजातील परिचित विषय मनोरंजनपर आणि बोधवादी स्वरुपात मांडण्याचा प्रयत्नही केलेला दिसतो. एकांकिका लेखनातील स्त्रीयांनी ही सुरूवात संख्यात्मक आणि गुणात्मकदृष्ट्या समाधानकारक म्हणावी लागेल.

१९२० ते १९६० या कालखंडातील स्त्री-नाटककारांच्या नाट्यवाङ्मयाचा आढावा घेतल्यानंतर पुढील काही ठळक बाबी नोंदविता येतात.

स्वातंत्र्यपूर्वकाळात स्त्रियांनी केलेले नाट्यलेखन संख्येने अल्प आहे. आणि स्वातंत्र्योत्तर काळात संख्यात्मकता आणि गुणात्मकता या अंगाने स्त्री नाटककारांचे नाट्यलेखन अधिक झालेले दिसते. बदलत्या जीवनशैलीचा परिचय करुन देणे, समाजाकडे नव्या दृष्टीने पाहाणे, मानसिक उन्नयन करणे, स्त्री अन्यायाला वाचा फोडणे, स्त्रीयांच्या प्रश्नांची मांडणी करुन त्यांची सोडवणूक करणे यांसारखी अनेक प्रयोजने स्त्री नाटककारांच्या नाट्यनिर्मितीच्या मागे असलेली दिसतात. तसेच बोध देणे हे उद्दिष्ट नजरेसमोर ठेवून मनोरंजनाद्वारे शिक्षण देणे हा हेतू असलेला दिसतो. या काळातील स्त्री नाटककार स्त्रीजीवनातील विविध विषयांना त्यांच्या नाट्यलेखनाचा नाट्यविषय बनविताना दिसतात. स्त्रियांचे प्रश्न, त्यांची कुंचबना, त्यांची मानसिकता इत्यादींना सहानुभूतीपूर्वक समजून घेऊन ती मांडण्याचा प्रयत्न स्त्री नाटककारांनी केलेला दिसतो. तसेच स्त्रीजीवन विशिष्ट प्रश्नांना मांडण्याचा

प्रयत्न स्त्रियांनी केला आहे. बहुतांश स्त्री नाटककार या मध्यमवर्गीय, पांढरपेशा स्तरातील आहेत. त्यामुळे त्यांच्या नाटकांचे विषय हे मध्यमवर्गीय स्त्री जीवनाशी निगडित आहेत. स्त्रियांचे प्रश्न, त्यांची मांडणी आणि समस्या निवारण्याची शैलीहे याच चौकटीतील असल्याचे दिसते. जुन्या - नव्याचा समन्वय साधण्याची शैली ही स्त्री नाटककाराच्या नाटकातून जाणवते.

सारांश :

प्रस्तुत कालखंडात बालविधवा, प्रौढ कुमारिका, घटस्फोट, परित्यकता, कमावत्य स्त्रिया यांसारख्या अनेक स्त्री जीवनाशी निगडित समस्यांवर नाटके लिहिली गेलेली दिसतात. त्यांच्या नाटकांची भाषा ही कौटुंबिकतेकडून प्रौढ व गंभीरतेकडे वळणारी दिसते. यातून त्या ग्रांथिक भाषेकडे वळलेल्या दिसतात. त्यामुळे त्यांच्या लेखनात वस्तुनिष्ठता, मुद्देसूदपणा, स्वतंत्र शैली आलेली दिसते. स्त्रीसमस्यांच्या आकलनाची व्याप्ती वाढत जाऊन माणूसपणाच्या परिप्रेक्ष्यातून स्त्रीप्रश्नांचे आकलन स्त्री नाटककार करताना दिसतात. १९२० ते १९६० या कालखंडात नाटक या वाङ्मयप्रकाराबरोबर स्त्रीनाटककारांनी एकांकिका लेखन ही केले. सामाजिक प्रश्नांचा वेध घेत सभोवतालच्या स्त्रीजीवनावर त्यांनी प्रकाश टाकलेला दिसतो. मनोरंजनाबरोबर समाजप्रबोधन हा विशेष स्त्री नाटककारांच्या नाट्यलेखनातून दिसतो. त्यांचे नाट्यलेखन हे तत्कालीन काळाचा सर्वांगीण विचार करता संख्यात्मक आणि गुणात्मकदृष्ट्या महत्त्वपूर्ण आहे.

एकांकिका लेखन :

एकांकिका हा स्वतंत्र आणि स्वयंपूर्ण नाट्यप्रकार आहे. त्याचे स्वत:चे असे विषय आणि तंत्र आहे. नाट्यवस्तूला आटोपशीर आणि सुटसुटीत बनविण्याच्या प्रयत्नातून एकांकिका नाट्यप्रकाराचा उदय झाला आहे. नाटक आणि एकांकिका यांची मूलतत्वे समान आहेत. या दोहोंत आशय आणि अभिव्यक्ती यांच्यात कुलसाम्य आहे. असे असले तरी या दोन्ही नाट्यप्रकारातील नाट्याचे जातिधर्म आणि आविष्कारपद्धती भिन्न आहेत. मराठी साहित्यात एकांकिका हा स्वातंत्र्योत्तर काळातील एक प्रमुख नाट्यप्रकार आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात एकांकिका या प्रकाराला आरंभ झाला. संस्कृत, इंग्रजी नाट्यवाङ्मयाशी त्यांच्या प्रेरणा असलेल्या दिसतात. आरंभीच्या काळात या नाट्यवाङ्मय प्रकाराकडे फारसे गांभीर्याने पाहिलेले दिसत नाही. स्वातंत्र्योत्तर काळात या नाट्यवाङ्मय प्रकाराकडे पु. ल. देशपांडे, विजय तेंडूलकर इ. नी लेखन केलेले दिसते.

एकांकिका नाट्यप्रकाराचे स्वरूप :

"स्थलकालाच्या मर्यादित अवकाशात आपल्या सर्व नाट्यशक्ती एककेंद्रित करणारा आणि परिणाम साधणारा स्वयंपूर्ण एक अंकी नाट्यप्रकार म्हणजे एकांकिका असे म्हणता येईल."

एकांकिका हा एक अंकी नाटक प्रकार असून त्यामध्ये एक घटना, एक प्रसंग यावर भर दिलेला असतो. मोजकी पात्रे आणि प्रभावी परिणाम साधणारे संवाद यांना एकांकिकेत महत्त्व असते. एकांकिका ही काव्यात्म, प्रहसनात्मक, रहस्यमय, तत्त्वचिंतनात्मक अशा अनेक रूपात असते. एकावेळी एकच आशयरुप ती केंद्रस्थानी ठेवत असते.

मराठीतील तंजावरच्या ग्रंथसंग्रहालयात आढळलेल्या हस्तालिखितांत एकांकिका आहेत. 'श्री लक्ष्मीनारायण कल्याण नाटक' (अंदाजे इ.स. पहिले शतक) ही मराठीतील पहिली एकांकिका मानली जाते. स्वातंत्र्यपूर्वकाळात एकांकिका लेखनाला प्रारंभ झालेला दिसतो. त्याची प्रेरणा संस्कृत आणि इंग्रजी नाट्यवाङ्मयाशी निगडित होती. आरंभीच्या काळात या नाट्यप्रकाराकडे फारसे गांभीर्याने पाहिलेले दिसत नाही. अनुवाद, रूपांतर स्तरावरील काही मोजके प्रयत्न झालेले दिसतात. वुल्यम वॅटमोर यांच्या 'धी सिक्रेट' चा अनुवाद 'संशयी शिपाई' या नावाने किरात यांनी केला. तसेच माधव मनोहर यांनी 'द डिअर डिपार्टटेड' याचा 'आजोबाच्या मुली' आणि 'कमिंग थ्रू द रे' याचा 'जन्मापूर्वी' हा अनुवाद केला. नाट्यछटाकार दिवाकर यांनी मेटलिंकच्या नाट्यकृतीवरुन 'आंधळे' ही एकांकिका लिहिली. राम गणेश गडकरी यांनी 'दीडपानी नाटक', 'सकाळचा अभ्यास' अशा प्रकारचे एकांकिका प्रकारच्या जवळपास जाणारे लेखन केले आहे. पाश्चात्य नाट्यलेखनाच्या प्रभावातून मो. ग. रांगणेकर, अनंत काणेकर, दत्तू बांदेकर, शं. बा. शास्त्री आदीनी एकांकिका लेखन केले. १९३०-३५ नंतर हा एकांकिका प्रकार पाश्चिमात्य नाट्यवाङ्मयाच्या प्रभावातून आला आहे. स्वतंत्र नाट्यप्रकार व त्याची लेखनतंत्रे याची ओळख मराठी नाटककारांना पाश्चिमात्य नाट्यवाङ्मयातून झालेली दिसते. व्यावसायिक रंगभूमीवर एकांकिका ह्या नाटक प्रकाराला स्थान मिळवून देण्याचा प्रयत्न मो. ग. रांगणेकरांनी 'नाट्यनिकेतन' द्वारा केला.

मो. ग. रांगणेकर यांनी 'तुझं माझं जमेना', 'सतरा वर्षे', 'फरारी', 'बडे बापके बेटे', 'आजचे संसार' या एकांकिकांचे लेखन केले आहे. यामधील 'सतरा वर्षे' ही एकांकिका गंभीर प्रवृत्तीची आहे. ही एकांकिका करुणरसप्रधान असून ती रचनादृष्ट्या निर्दोष कलाकृति आहे. त्यांच्या एकांकिका लेखनामध्ये इब्सेनी नाट्यतंत्राचा वापर करण्यात आला आहे. 'तुझं माझं जमेना' या एकांकिकेचा विषय लहानपणीच्या परिचयाच्या प्रेमाचे विवाहात रूपांतर होते. यामध्ये थिल्लर विनोदाचा वापर केला आहे. त्यांची 'फरारी' ही विनोद आणि गांभीर्य यांचे मिश्रण असणारी

एकांकिका आहे. म. म. आळतेकर यांचा 'कोथिंबिरीच्या काड्या' (१९४६) हा एकांकिकासंग्रह प्रकाशित आहे. त्यांच्या या एकांकिकांमध्ये मांडलेल्या आशयात मौलिकता बेताचीच आहे, आणि पात्रचित्रणात कृत्रिमता असल्याचे दिसते.

प्रस्तुत कालखंडात पु. ल. देशपांडे यांनी एकांकिका प्रकार अधिक हाताळलेला दिसतो. त्यांच्या 'सारे कसं शांत शांत', 'मोठे मासे छोटे मासे', 'विठ्ठल तो आला आला', 'सदू आणि दादू', 'पूर्वज', 'आम्ही लटिके ना बोलू' इत्यादी एकांकिकांचे उल्लेख करता येतील. त्यांच्या 'सदू आणि दादू', 'सारे कसं शांत शांत', 'छोटे मासे मोठे मासे' या तीन एकांकिकांमध्ये विनोद अधिक आहे. त्यांच्या या एकांकिकांमधून शहरातील यांत्रिक व स्वयंकेंद्रित मनोवृत्तीचे दर्शन घडते. 'सदू आणि दादू' या एकांकिकेत धकाधकीच्या वातावरणामुळे एकमेकांवर त्रागा करणारी, रागावणारी मानवी वृत्ती चित्रित झाली आहे. प्रस्तुत एकांकिकेत अशी रागावणारी माणसे एका पुस्तकामुळे कशी बदलतात आणि एकमेकांशी प्रेमाने, सौजन्याने वागल्याने कशी चांगली वाटतात हे दाखवण्याचा प्रयत्न झाला आहे. 'छोटे मासे मोठे मासे' या एकांकिकेत माणसांची दुटप्पी वृत्तीवर श्रीमंतानी गरीबांना लुबाडण्याचा, फसवण्याच्या वृत्तीवर भाष्य केले आहे. पु. ल. देशपांडे यांचे एकांकिका लेखन हे या नाट्यप्रकाराला प्रोत्साहन आणि प्रगतीकडे नेणारे आहे.

वि. वा. शिरवाडकर यांनी 'दिवाणी दावा', 'नाटक बसते आहे', 'देवाचे घर' या तीन एकांकिका लिहिल्या आहेत. त्यांचे हे एकांकिका लेखन प्रासंगिकच राहिलेले दिसते. ते एकांकिका लेखनामध्ये प्रयोगशील राहिलेले दिसत नाहीत. हा लेखनप्रकार हाताळून पाहण्याची, प्रयोग करण्याची उर्मी त्यांच्या या लेखनात दिसत नाही.

विजय तेंडुलकर यांनी 'रात्र', 'ओळख', 'काळोख', 'मादी', 'अजगर आणि गंधर्व', 'खालित्यांची लढाई', 'काही खरे नव्हे', 'झपूर्झा' यांसारख्या अनेक एकांकिकांचे लेखन केले आहे. त्यांच्या या एकांकिका लेखनामधून मध्यमवर्गीयांच्या जीवनातील विविध प्रश्नांना, त्यातील अनुभवाना त्यांनी नाट्यरुप दिले आहे. स्त्री पुरुषातील नातेसंबंध, गुंतागुंत, प्रेमजीवन याचे भेदक चित्रण त्यांनी करण्याचा प्रयत्न केला आहे. एकूणच मानवी नातेसंबंधाचा सूक्ष्मपणे शोध घेण्याचा प्रयत्न तेंडुलकरांनी केलेला दिसतो. तेंडुलकरांनी आपल्या लेखनातून एकात्म, एकजिनसी स्वरुपाचा नाट्यानुभव परिणामकारकपणे साधला आहे. दोन शब्दांतील, वाक्यातील अबोलता त्यांनी सूचकपणे प्रेक्षकांपर्यंत पोहचविली. त्यांची 'माही' ही एकांकिका पात्रांच्या मनातील विचार आणि भावना यावर असलेली दिसते. दोन पात्रांची असलेली ही एकांकिका संवादावर अधिक भर देते.

तेंडुलकरांचे सुरुवातीचे एकांकिका लेखन हे नभोनाट्य स्वरुपात झालेले दिसते. उदा. 'रात्र' ही एकांकिका. १९५० नंतर त्यांच्या एकांकिका लेखनाला एक दिशा प्राप्त झालेली दिसते. नाट्यलेखनातील कृतिशीलता ही शब्द संवादानंतरच

एक महत्त्वपूर्ण शक्ती असते हे जाणून त्या अंगाने शब्दांवर त्यांनी भर दिलेला दिसतो. शब्दांचे भान तेंडुलकर आणि त्यांच्या समकालीनांनी काही प्रमाणात ठेवलेले दिसते.

वसंत कानेटकर यांनी सुमारे वीस एकांकिकांचे लेखन केले आहे. 'असही एक सौभद्र', 'फक्त एकच कारण' या दोन एकांकिका सोडल्या तर बाकी सर्व विनोदी स्वरुपाच्या आहेत. त्यांच्या एकांकिकांमध्ये विडंबनातून विनोद आलेला दिसतो. लोकप्रिय नाटक, नाटकातील लोकप्रिय प्रसंग हे त्यांच्या विडंबनाचे विषय असलेले दिसतात. 'आनंदीबाई आणीबाणी पुकारतात', 'आपलं तेच खर' या राजकीय विषयाशी एकांकिका आहेत. यामध्ये त्यांनी राजकीय विषय विनोदी पद्धतीने हाताळलेला आहे. 'स्मगलर सम्राटांच्या न्यायालयात रामशास्त्री', 'गायवाडीत उतरलाय पाकिस्तानी गनीम', 'व्याप कुणाचा ताप कुणा', 'जा मुला दिल्या घरी तू सूखी रहा', 'एक सती दोन पती', 'नजराणा' या सारख्या वेगवेगळ्या विषयांवर त्यांनी एकांकिका लेखन केलेले आहे. 'फक्त एकच कारण', 'मद्रासीने केला मराठी भ्रतार' ह्या वैचारिकता प्रकट करणाऱ्या एकांकिका आहेत. तीन दशकांहून अधिक काळ कानेटकरांनी नाटकांच्या बरोबरीने एकांकिका लेखन केले आहे.

१९२० ते १९६० या कालखंडात एकांकिका लेखन विपुल प्रमाणात झाले नसले तरी त्यात भर पडताना दिसते. शाळा, महाविद्यालये, हौशी नाट्यमंडळे, एकांकिका स्पर्धा यामधून एकांकिकांचे प्रयोग होत राहिले. अनंत काणेकर यांनी 'दूर', 'पैजार', 'आत्महत्या', 'संप' अशा एकांकिका लिहिल्या. शामराव ओक यांनी 'मानापमान', 'पुरवणी अंक', 'अंधारातील संवाद' या एकांकिका लिहिल्या. व्यकंटेश वकील यांनी जवळपास वीस एकांकिका लिहिल्या आहेत. दारुबंदीकरिता 'जळती घरे' या पुस्तकात त्यांचा समावेश आहे. गंगाधर गाडगीळ यांच्या पाच एकांकिका 'पाच नाटिका' या नावाने प्रकाशित आहेत. ना. सी. फडके यांनी 'जडावाची देव', 'आगलावी', 'क्षमेसाठी अपराध' या एकांकिकांचे लेखन केले आहे. प्रस्तुत कालखंडात निरनिराळ्या विषयांवर एकांकिका लेखन करण्याचा प्रयत्न झालेला दिसतो. १९५१ मध्ये भारतीय विद्या भवन या संस्थेने मुंबईत एकांकिका स्पर्धा भरविल्या होत्या त्यानिमित्ताने एकांकिका लेखनास चालना मिळाल्याचे दिसते. या स्पर्धेदरम्यान एकांकिका लेखनाचे सूत्र अनेक लेखकांना सापडले. त्यातूनच वाङ्मयमूल्य आणि रंगमूल्य यांचा परस्परसंबंध लेखकांना अधिक स्पष्टपणे होऊ लागला. एकांकिका लेखनाचा प्रवास स्थूलाकडून सूक्ष्माकडे होत गेलेला दिसतो. १९५५ नंतर पु. ल. देशपांडे, विजय तेंडुलकर इत्यादी लेखकांनी एकांकिका लेखनाला समृद्ध करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. प्रस्तुत कालखंडात स्वभावनिष्ठ व बराचसा प्रसंगनिष्ठ स्वरुपाच्या विनोदाचा वापर एकांकिका लेखनात झालेला दिसतो. व्यक्तिदर्शनातील सूक्ष्मता आणि प्रसंग चित्रणातील उत्कटता यादृष्टीनी फारच थोड्या एकांकिका या काळात लिहिल्या गेलेल्या दिसतात.

सांराश :

मराठी नाट्यवाङ्मय प्रकारात एकांकिका हा लेखन प्रकार आरंभी अनुवाद, रुपांतर या स्वरुपात आलेला दिसतो. आरंभीच्या काळात नाटककारांनी एकांकिका या नाट्यप्रकाराकडे फारसे गांभीर्याने पाहिलेले दिसत नाही. दिवाकर कृष्ण, राम गणेश गडकरी, मो. ग. रांगणेकर, अनंत काणेकर इत्यादीनी इंग्रजी नाट्यवाङ्मयाच्या प्रभावातून हा नाट्यप्रकार हाताळलेला दिसतो. पुढे पु. ल. देशपांडे, वि. वा. शिरवाडकर, विजय तेंडुलकर यांनी या नाट्यप्रकारात लेखन केले. राजकीय, सामाजिक विषयांवर प्रस्तुत नाटककारांनी एकांकिका लेखन विनोदी शैलीने केलेले जाणवते. १९२० ते १९६० या काळात विपुल एकांकिका जरी नसल्या तरी मराठी नाट्यवाङ्मयात मोलाची भर घालणारे एकांकिका लेखन आहे, हे लक्षात घेणे आवश्यक ठरते.

स्वअध्ययन :

१. 'नाट्यमन्वंतर' या नाट्यसंस्थेची कामगिरी लिहा.

२. प्र. के. अत्रे यांचे नाट्यवाङ्मय सविस्तर लिहा.

३. १९२० ते १९६० या कालखंडातील नाट्यवाङ्मयाचा आढावा घ्या.

४. १९२० ते १९६० या कालखंडातील नाटक या साहित्यप्रकाराचे स्वरुप-विशेष सोदाहरण स्पष्ट करा.

५. १९२० ते १९५० या कालखंडातील स्त्री-नाटककारांचे मराठी नाट्यसृष्टीतील योगदान लिहा.

६. १९५० ते १९६० मधील स्त्री-नाटककारांचे वेगळेपण लिहा.

७. स्त्रियांचे एकांकिका लेखन उदाहरणातील स्पष्ट करा.

८. १९२० ते १९६० या काळातील एकांकिका लेखनाचा आढावा घ्या.

संदर्भ ग्रंथ :

१. प्रदक्षिणा - खंड पहिला, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे - १९४१.

२. आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास (भाग दुसरा), अ. ना. देशपांडे, व्हीनस प्रकाशन, पुणे - १९५८.

३. मराठी एकांकिका, वाङ्मयीन टीपा आणि टिप्पणी, वा. ल. कुलकर्णी, १९७०.

४. मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड सहावा, (भाग पहिला), महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे - १९८८.

५. आजचे नाटककार, संपादक डॉ. दत्तात्रय मुंडे, डॉ. स्नेहल तावडे, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे - १९९५.

६. भारतीय रंगभूमीची परंपरा - डॉ. माया सरदेसाई, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, १९९६.

७. मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड सातवा, (भाग दुसरा), महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे - २०१०.

८. स्त्री – साहित्याचा मागोवा, खंड दोन. संपादक डॉ. मंदा खांडगे व इतर साहित्य प्रेमी भगिनी मंडळ, पुणे.

❖❖❖❖

१०

चरित्र - आत्मचरित्र (१८७४ ते १९६०)

डॉ. धनाजी गुरव

उद्दिष्टे :

- चरित्र - आत्मचरित्र या वाङ्मयप्रकारांची ओळख करुन घेणे.
- चरित्र लेखनाचे तंत्र विशद करणे.
- आत्मचरित्र ही संकल्पना समजून घेणे.
- १८७४ ते १९६० या कालखंडातील चरित्र - आत्मचरित्र लेखन अभ्यासणे.

प्रास्ताविक :

मराठी वाङ्मयात कविता, नाटक, कथात्मक साहित्य, या साहित्यप्रकारांसोबतच 'चरित्र' हा वाङ्मयप्रकार विकसित झालेला दिसून येतो. परंतु या वाङ्मय प्रकाराच्या स्वरुपापेक्षा चरित्र आणि आत्मचरित्र या वाङ्मय प्रकाराचे स्वरुप भिन्न आहे. १९६० नंतर मराठी साहित्यात उदयास आलेल्या वेगवेगळ्या वाङ्मयीन प्रवाहातील मैलाचा दगड ठरलेल्या 'दलित साहित्या' तील आत्मकथनांमुळे 'चरित्र' हा वाङ्मयप्रकार मराठीत नावारुपाला आला. चरित्र वाङ्मयाचा अभ्यास करताना आपणाला त्यांच्या तंत्राचा सुध्दा नीटपणे अभ्यास करावा लागतो. कारण 'चरित्र' या वाङ्मयप्रकाराभोवाती जी जी गृहितके फिरतात ती सर्व आपणाला या तंत्रांद्वारेच उलगडून दाखवता येतात. चरित्र आत्मचरित्रात होत गेलेले बदल चरित्र आत्मचरित्र कोणी लिहावीत?, कुणाची लिहावीत?, कशासाठी लिहावीत?, का लिहावीत? या गोष्टींचा अभ्यास करण्याआधी चरित्र म्हणजे काय आणि आत्मचरित्र म्हणजे काय समजून घेतले पाहिजे.

चरित्र (१८७४ - १९६०) :

The history of the life of an individual as a form of literature अशी ऑक्सफोर्डच्या कोशात चरित्राची व्याख्या केली आहे. म्हणजेच चरित्र म्हणजे 'एक व्यक्तीच्या जीवनाचा इतिहासच' अशी ढोबळ मानाने आपणाला व्याख्या करता येते.

चरित्रनायकाच्या जीवनातील अनेक घटना किंवा प्रसंग हे चरित्रनायकाच्या व्यक्तिमत्वविकसासाठी कसे पोषक ठरत गेले. व या घटना, प्रसंगांचा समाजावर काय परिणाम झाला याचा शोध घेणे चरित्रकाराच्या दृष्टीने महत्त्वाचे असते. चरित्रनायक ज्या कालखंडात, ज्या समाजात वावरत असतो, त्या कालखंडाचा, समाजपरिस्थितीचा अभ्यास चरित्रलेखकाला डोळसपणाने करावा लागतो. काळाकडे, समाजाकडे दुर्लक्ष केले गेले तर त्याचा विपरीत परिणाम चरित्रनायकाच्या उभारणीत चरित्रलेखकाला जाणवल्याशिवाय राहणार नाही. या संदर्भात प्रा.अ.म.जोशी यांनी 'चरित्र आणि काल' हा शब्दप्रयोग चमत्कारिक आहे. वि.सी.सरवटे यांनी, "ज्या ग्रंथात एखाद्या व्यक्तीच्या जन्मापासून मृत्युपावेतोंचा वृत्तांत सत्याला धरुन सांगितला आहे असा ग्रंथ" अशी चरित्राची व्याख्या केली आहे. याशिवाय 'सिडने ली' या प्रसिद्ध ग्रंथकाराने चरित्राचा हेतू 'a truthful transmission of personality'[5] (व्यक्तीचे सत्यपूर्ण चित्रण) असा सांगितला आहे.

मराठी भाषेतील शब्दकोशात 'चरित्र' या शब्दाचे अर्थ वेगवेगळ्या कोशाभ्यासकांनी दिलेला आहे. कृ.पां. कुलकर्णी यांनी मराठी व्युत्पतीकोशात चरित्र या शब्दाची व्युत्पती 'चरित्र-आचरण, जीवनयात्रा, कृती, पराक्रम' असा दिला आहे. तर प्र.न.जोशी यांनी आदर्श मराठी शब्दकोशामध्ये 'चरित्र' म्हणजे -

१. चरित्र, कृत्य, आचरण, वर्तन

२. अवस्था, स्थिती, प्रकार.

३. देवाचे, वीरांचें पराक्रम.

४. इतिहास, कथा, गोष्ट प्रकार.

५. व्यक्तीचा आयुष्य सांगणारा ग्रंथ असा दिला आहे. सदा कऱ्हाडे यांनी चरित्र या शब्दाच्या व्युत्पतीविषयी 'चरित अथवा चरित्र' हे शब्द संस्कृतमधील 'चर' या धातूपासून सिद्ध झालेले आहेत. या धातूचे जे अनेक अर्थ आहेत. त्यात 'करणे' (to do) 'सिद्धीस नेणे' (to perform) वर्तन (Behave) हे अर्थ महत्त्वाचे आहेत. चरित्र या शब्दाचा अर्थही 'आचरलेले' (acted behaved) असा आहे. आणि चरित्र या शब्दाचा अर्थ चालचलवणूक किंवा वागण्याची तऱ्हा (Behaviour) 'वर्तन' (Conduct) संपादणूक (Performance) असे आहेत, असे म्हटले आहे.

चरित्र लेखनाचे नेमके तंत्र कोणते? याचा शोध आपणाला सुप्रसिद्ध इंग्रजी लेखक 'लिटन स्ट्रॅची' याने लिहिलेल्या चरित्रवाङ्मयाच्या आधारे घ्यावे लागते. स्ट्रॅचीच्या मतानुसार चरित्रकाराने चरित्र लिहिताना काहीतरी एक दृष्टी ठेवली पाहिजे. पण तो दृष्टिकोन आदराचा, प्रेमाचा किंवा सहानुभूतीचा असलाच पाहिजे असे नाही असे म्हटले आहे. 'चरित्रकाराला काहीतरी विशेष जाणवणे' हेच चरित्रलेखनाचे मूळ तंत्र होय. हे 'विशेष' शोधून काढण्याची दृष्टी चरित्रकाराजवळ असायलाच हवी. म्हणजेच 'चरित्रनायक' निवडतांनाच चरित्रकाराने विषयाची

व्याप्ती निश्चित करावी. कारण चरित्रविषयाची व्याप्ती निश्चित करणे हीच चरित्रलेखनाची पहिली आणि सर्वात कठीण पायरी आहे. चरित्रांत कोणत्या गोष्टींना महत्त्व द्यावयाचे, कोणत्या घटना-प्रसंगांवर विशेष भर द्यावयाचा, कोणत्या गोष्टींचा निव्वळ ओझरता उल्लेख करावयाचा याची निश्चिती चरित्रकाला करावी लागते.

चरित्र हे जिवंत व्यक्तीचे असल्यामुळे (होऊन गेलेल्या) त्याचा आदी, अंत, मध्य, यानुसारच तो यावयास पाहिजे. प्रारंभीच त्या व्यक्तीचे जीवनरहस्य सांगण्यापेक्षा बालपणापासून त्याच्या जीवनाचा विकास कसा कसा होत गेला, त्याच्या स्वभावावर निरनिराळे संस्कार कसे होत गेले, त्याच्या जीवनाला कशामुळे वैशिष्टय प्राप्त झाले. त्याचा क्रमवार पट उलगडून दाखविल्यास ते अधिक चित्तवेधक होते. आठवणी, पत्रे, दैनंदिनी, ऐतिहासिक कागदपत्रे, स्वभावचित्रे, मृत्यूलेख गौरवअंक या सर्वाबद्दलची विश्वासाहर्यता तपासूनच त्यावर भाष्य करावे. या साधनसामुग्रीमधून चरित्रनायकाविषयी काही गुण-दोष दिसत असतील तर त्याचे स्पष्टपणे तपशील देणे कधीही योग्यच. चिपळूणकरांनी डॉ.जॉन्स्न' चे चरित्र लिहिले आहे. त्यात त्यांनी प्रांजळपणे जॉन्सनचे दोष सांगितले आहेत.

मराठी वाङ्मयातील मध्ययुगीन काळातील काही संतचरित्रातून आपणाला त्यातील कलात्मकता अनुभवास येते. त्यामध्ये आपणाला महानुभाव संप्रदायातील लीळाचरित्र, वारकरी संप्रदायातील नामदेवाचे आदितीर्थावळीचे अभंग, तुकारामांचे आत्मविनेदनपर अभंग यांचा उल्लेख करता येतो. कलात्मकतेच्या निर्मितीप्रक्रियेत अतिरंजितपणा, अद्‌भुतता, काल्पनिकता इत्यादी दोष चरित्रकाराने टाळणे गरजेचे असते.

मराठीतील चरित्र वाङ्मयाची पार्श्वभूमी आपणाला थेट बाराव्या-तेराव्या शतकापर्यंत नेऊन पोहचवता येते. या शतकात सामाजिक विषमता व वैदिक कर्मकांडाविरुद्ध बंडाचा झेंडा फडकाविलेल्या महानुभाव संप्रदायातील 'लीळाचरित्र' हा ग्रंथ मराठीतील आद्य चरित्रग्रंथ म्हणून ओळखला जातो. यामध्ये महानुभाव संप्रदायाचे संस्थापक श्रीचक्रधरस्वामी यांच्या लीळा (आठवणी) त्यांच्या शिष्याने म्हणजे म्हाइंभटाने संकलित चरित्ररुपाने मांडल्या. म्हाइंभटांनी वेगवेगळ्या ठिकाणी जाऊन चक्रधराच्या सहवासात राहिलेल्या पंथीयांकडून या लीळा गोळा करुन त्या नागदेवाचार्याकडून तपासून घेऊन हे चरित्रलेखन केलेले आहे. लीळाचरित्राची विभागणी एकांक, पूर्वार्ध व उत्तरार्ध अशा तीन विभागात असून एकूण लीळांची संख्या १५०९ इतकी आहे. श्रीचक्रधर आणि महानुभाव संप्रदाय यांच्याविषयी वैशिष्टयपूर्ण माहिती लीळाचरित्रामधून मिळते. तसेच तत्कालीन सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक जीवनाची माहिती त्यातून अभ्यासता येते. संप्रदायातील श्रीचक्रधराचे गुरु श्रीगोविंदप्रभू ऊर्फ गुडम राऊळ यांच्याही आठवणी म्हाइंभटानी श्रीगोविंदप्रभू चरित्रात केल्या आहेत.

मराठी गद्यात चरित्र लिहिण्याचा मान जसा म्हाइंभटाकडे जातो, तसा पद्यात्म चरित्र लिहिण्याचा मान नामदेवांकडे जातो. नामदेवांनी सुहदयाच्या जिव्हाळ्याने 'तीर्थावळी' तून ज्ञानदेवाचे चरित्र लिहिले आहे. याशिवाय नामदेवांनी 'कबीर', 'मीराबाई', 'भानुदास', 'नरसी मेहता' यांचीही छोटी चरित्रे लिहिली आहेत. एकनाथानी 'भानुदासांचे' व 'नामदेवांचे' चरित्र लिहिली आहेत. निळोबारायांनी 'संतश्रेष्ठ तुकोबारायांचे चरित्र' रेखाटले आहे. या सर्व ग्रंथात भक्तीपूजा, अद्‌भुतता, दैवी चमत्कार इत्यादी वर्णन पहावयास मिळते. तो काळच आध्यात्मिक स्वरुपाचा असल्यामुळे हे अपरिहार्य होते.

महानुभाव संप्रदायातील गद्यात्म लिखाणाकडून आपणाला थेट 'बखर' वाङ्मयाकडे वळावे लागते. प्राचीन मराठी गद्यात बखरीच्या स्वरुपातही काही चरित्रे लिहिली गेली आहेत. बखरकार हे राजाश्रयी असल्यामुळे अनेक बखरकारांनी आपआपल्या स्वामींची चरित्रे लिहिली आहेत. सतराव्या शतकामध्ये कृष्णाजी अनंत सभासद याने शिवाजी महाराजांच्या जीवनावर सभासद बखर लिहीली. ही शिवकालीन पहिली बखर होय. राजाराम महाराजांच्या आज्ञेवरुन चंदी येथे सभासदाने शिवाजी महाराजांच्या जीवनातील एकूण एकाहत्तर प्रसंगाचे निवेदन केले आहे. शिवकालीन अनेक महत्त्वाच्या घटनांचे वर्णन सभासदाने यात केले आहे. सभासदानंतर रघुनाथ यादव चित्रे ऊर्फ चित्रगुप्त' याने शिवचरित्रपर बखर लिहिली असून तिचे नाव 'शिवाजी महाराज छत्रपती जनेश्वर यांचे चरित्र' असे आहे. ही बखर स्वतंत्र नसून ती सभासद बखरीचाच अनुवाद आहे. याशिवाय 'भोसलेवंश चरित्र' लिहिले यात संपूर्ण भोसलेकुळाचे वृत्तांतकथन दिलेले आहे. 'शिवदिग्विजय (खंडोबल्लाळ) श्री शिवाजीप्रताप वाकेनिशी बखर ऊर्फ एक्याण्णव कलमी बखर' 'शिवछत्रपतीचे सप्तप्रकरणात्मक चरित्र' इ. बखरी शिवकालावर आधारीत आहेत. तर 'पानिपतची बखर', 'सोनपत पानपत येथील मराठे युद्ध', 'भाऊसाहेबाची कैफियत', 'भाऊसाहेबांची बखर' या काही बखरी दिसतात.

अव्वल इंग्रजी आमदानीच्या काळात इंग्रजी भाषेच्या प्रसाराने तत्कालीन समाजात नवशिक्षित तरुण पिढी उदयास आली. इंग्रजी भाषेच्या ज्ञानामुळे त्यांचे विचारविश्व विकसित झाले. ब्रिटीशांनी केलेली शिक्षणाची सोय, व एत्द्देशीय लोकांच्या वाङ्मय निर्मितीस केलेली मदत यातून आर्वाचीन वाङ्मयाची ओळख इथल्या नवशिक्षित तरुण पिढीस झाल्यावर काही महत्त्वपूर्ण चरित्रविषय मराठीत अनुवादित झाले. इ.स.१८५२ मध्ये कृष्णशास्त्री चिपळूणकरांनी 'सॉक्रेटिसचे चरित्र' मराठीत अनुवादित केले. या चरित्राच्या तीन आवृत्या निघाल्या. यापूर्वी १८४५ मध्ये महादेवशास्त्री कोल्हटकरांनी कोलंबसचा वृत्तांत मराठीत आणला होता. याशिवाय वि.मो. भिडेकृत 'खुसरु राजाचा इतिहास' (१८५२), कृष्णाजीपंत जोगळेकरकृत 'रुस देशाच्या क्रॅथेरिन राणीचे चरित्र' (१८६०), वि.प.रानडेकृत 'जॉर्ज वॉशिंग्टनचे चरित्र' इ. चरित्र ग्रंथ दक्षिणा प्राईज कमिटीच्या बक्षिसास पात्र

ठरले होते. वि.को. ओककृत 'पिटर धी ग्रेट' (१८७४), 'शिकदंर' (१८७५) व 'डयुक ऑफ वेलिंग्ट' (१९७६) हे चरित्रग्रंथ विकत घेऊन छापले होते.

याच दरम्यान विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी निबंधमाला सुरुवात केली. मालेच्या तिसऱ्या वर्षात म्हणजे १८७६ साली चिपळूणकर लिखित 'डॉ. जॉन्सन यांचे चरित्र' मालेतून प्रसिद्ध झाले. पूर्वीच्या ग्रंथापेक्षा अधिक उठावदार व आकर्षक म्हणून हा चरित्रग्रंथ एकदम वाचकांच्या नजरेस भरला. चिपळूणकरांनी या चरित्राद्वारे चरित्र कसे असावे यांचे एक आदर्श उदाहरण घालून दिले. शंकर तुकाराम शाळीग्राम यांनी संशोधन करुन 'सेनापती बापू गोखले यांचे चरित्र' १८७७ साली लिहिले. ना. वि. बापट यांनी १८७९ साली 'थोरले बाजीराव साहेब यांचे चरित्र' लिहिले. १८८३ साली लोकहितवादी यांनी पृथ्वीराज चव्हाण या पराक्रमी रजपूत राजाचे चरित्र लिहिले. वासुदेवशास्त्री खरे यांनी १९९२ साली 'नाना फडणविसांचे चरित्र' लिहीले.

एकोणिसाव्या शतकाच्या अखेरची दोन दशके ही महाराष्ट्रातील सामाजिक, राजकीय सुधारणेच्या दृष्टीने अनन्यसाधारण अशी आहेत. एकीकडे १८५७ चा अयशस्वी प्रयत्न तर दुसरीकडे सामाजिक सुधारणांचा, चळवळीचा उदय; अशा परिस्थितीत आपली भाषा, संस्कृती, धर्म, इतिहास, याविषयी समाजात मोठ्या प्रमाणात जागृती निर्माण होऊ लागली. याच काळात इतिहास संशोधन कार्यालाही चेतना मिळाली. स्वदेशाभिमानातून राजारामशास्त्री भागवतांनी शिवाजी (१८८९) संभाजी (१८९२) राजाराम (१८९९) या मराठा छत्रपतींची चरित्रे लिहिली. इंदुरचे बा.ना.देव यांनी रामशास्त्री प्रभुणे (१८९२) यांचे चरित्र लिहून प्रसिद्ध केले. वासुदेवशास्त्री खरे यांनी 'नाना फडणिसाचे चरित्र' (१८९२) हा ग्रंथ प्रसिद्ध केला. खरेच्या दोन वर्षानंतर वि.र.नातू यांनी महादजी शिंदे यांचे चरित्र लिहून प्रसिद्ध केले. यातूनच पुढे 'नाना महादजी' हा वाद सुरु झाला होता. प्रसिद्ध इतिहास संशोधक द.ब. पारसनीस यांनी 'झाशीच्या राणी लक्ष्मीबाईसाहेब' यांचे चरित्र (१८९४) मध्ये प्रसिद्ध केले. इतिहासप्रेमाने प्रेरित होऊन इतिहासप्रसिद्ध व्यक्तींची चरित्रे लिहिणाऱ्या तत्कालीन लेखकात रा.वि.टिकेकर ऊर्फ धनुर्धारी यांच्या कामगिरींचा विशेष उल्लेख करावा लागतो. त्यांनी 'शूर अबला-लक्ष्मीबाई' (१८९२), 'जवानमर्दमराठे गडी-जनकोजी शिंदे', 'जवानमर्द ब्राम्हणभाई हरिपंत फडके' (१८९४) व 'अहिल्याबाई होळकरीण' (१८९५) ही चरित्रे लिहीली. इतिहासविषयक सत्यकथनापेक्षा चरित्रविषयाचा गौरव करणे व त्यायोगे वाचकांचा स्वदेशाभिमान जागृत करणे या हेतूने ही चरित्रे लिहिलेला दिसतात. १८९४ साली चि.ग.गोगटे यांनी बाळाजी विश्वनाथ व थोरले शाहू महाराज यांची चरित्रे लिहिली. पुढील काही वर्षात गो.ना.दातारकृत 'शिवछत्रपती' (१९०६) कृ.अ. सहस्त्रबुद्धेकृत 'छत्रपती शिवाजी महाराज' (१९०६) कृ.अ. केळूसकरकृत 'छत्रपती शिवाजी महाराज' (१९११) ही तीन शिवचरित्रे प्रसिद्ध झाली. यापैकी केळुसकरांचा ग्रंथ अतिशय परिश्रमपूर्वक लिहिलेला असून शिवछत्रपतीविषयक वाङ्मयात या ग्रंथाने मोठी भर

पडली आहे. याशिवाय 'अशोक' , 'अकबर' , 'औरंगजेब', 'पृथ्वीराज चव्हाण' इ. महाराष्ट्रीयेतर थोर राष्ट्रपुरुषांची चरित्रेही या काळात लिहिलेली आहेत.

१८६० ते १९२० हा काळ महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय जागृतीचा काळ म्हणून ओळखला जातो. या काळात फुले, रानडे, टिळक, आगरकर, कर्वे, भालेकर, मुकुंदराव पाटील यांसारख्यानी महाराष्ट्रात नवजागृतीचे कार्य केले. १९२० साली टिळकांचे निधन झाले व गांधी युगाला सुरुवात झाली. टिळकांसारख्या प्रखर राष्ट्राभिमानी व्यक्तिवर त्याकाळी लहान-मोठी चरित्रे लिहिली गेली. त्यात प्रामुख्याने न.चिं.केळकर लिखित त्रिखंडात्मक टिळकचरित्राचा उल्लेख करावा लागतो. १९२२ साली सामाजिक सुधारणेचे अग्रणी नेते 'राजर्षी शाहू' यांच्या निधनांनंतर तीन वर्षानी आ.बा.लठ्ठेकृत 'श्री छत्रपति शाहू महाराज यांचे चरित्र' हा ग्रंथ लिहीला गेला. १९२४ मध्ये न्यायमुर्ती रानडे यांचे चरित्र ना.र.फाटक यांनी लिहीले. रानडेकालिन विविध वृत्तपत्रे, सोशल कॉन्फर वाङ्मय, विविधज्ञान विस्तारांचे अंक अशा अनेक साधनांतून फाटकांनी चरित्रसामग्री फार परिश्रमाने गोळा केली. लोकहितवादीचे चरित्र १९२६ साली कृ.ना.आठल्ये यांनी प्रसिद्ध केले. गांधी युगातील काही महत्त्वाच्या देशभक्तांची चरित्रे १९३०-३१ सालादरम्यान लिहीली गेली. यातील 'मोतीलाल नेहरु', 'जवाहरलाल नेहरु', 'सुभाषचंद्र बोस', 'मदनमोहन मालविया' इ. चे चरित्र बऱ्याच अंशी तत्कालीन स्फूर्तीने निर्माण झाली.

वाङ्मयीन क्षेत्रातील काही व्यक्तीवरही चरित्रे लिहीली गेली. हरिभाऊ आपटे यांच्या मृत्यूनंतर त्यांचे संक्षिप्त चरित्र आंबेकर यांनी लिहले. पुढे १९३१ साली वेणूबाई पानसे यांनी ह.ना.आपटे यांचे चरित्र प्रसिद्ध केले. वि.स.खांडेकर यांनी आगरकर-व्यक्ती आणि वाङ्मय हा छोटेखानी तर गडकरी व्यक्ती आणि वाङ्मय हा मोठा ग्रंथ प्रसिद्ध केला. दादोबा पांडुरंग तर्खडकर यांच्या आत्मवृत्ताचे नीट संकलन अ.का.प्रियोळकर यांनी केले. त्याला उर्वरित आयुष्याची जोड देऊन १९४७ मध्ये हे आत्मचरित्राच्या सहाय्याने लिहीलेले चरित्र लिहीले गणेश चिंतामण कोल्हटकर यांनी 'राम गणेश गडकरी यांचे चरित्र' १९५९ साली लिहीले. मा.का.देशपांडे यांनी 'ना.सी.फडके व्यक्ती आणि वाङ्मय', 'न.चि.केळकर व्यक्ती आणि वाङ्मय', 'वि.स.खांडेकर व्यक्ती आणि वाङ्मय' या चरित्र ग्रंथातून कलावंताच्या वाङ्मयीन जीवनाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. १९६० मध्ये दि. वि. कादे यांनी शिवचरित्र लिहीले. परंतु ब.मा.पुरंदरे यांचे 'राजा शिवछत्रपती' हे चरित्र फार लोकप्रिय झाले. मा.का.देशपांडे यांनी 'ना.सी.फडके व्यक्ती आणि वाङ्मय' (१९३९), 'न.चि.केळकर व्यक्ती आणि वाङ्मय' (१९४८) आणि 'वि.स.खांडेकर व्यक्ती आणि वाङ्मय' (१९६२) या चरित्रांतून कलावंताच्या जीवनाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. शं.पु.जोशी यांच्या 'पंजाबातील नामदेव' (१९४०) या चरित्रात नामदेवांच्या पंजाबातील कार्याची परिश्रमपूर्वक माहिती मिळवून यथायोग्य ओळख करुन दिली

आहे. १९५४ मध्ये 'शिवराम पंत परांजपे' वक्तृत्व आणि वाङ्मय' हा चरित्र ग्रंथ लिहून शि.म.परांजपे यांचा सर्वांगीण शोध वा.कृ.परांजपे यांनी घेतला आहे.

१९२० ते १९६० या कालखंडात स्त्री-चरित्रकार फारशा झालेल्या दिसत नाहीत. १९३१ मध्ये वेणूबाई पानसे यांनी 'हरीभाऊ आपटे यांचे चरित्र' लिहीले. दुर्गाबाई जोशी यांनी 'वीर वामनराव जोशी यांचे चरित्र' १९४० मध्ये लिहीले. काशीबाई कानेटकरांनी 'डॉ.आनंदीबाई जोशी यांचे चरित्र' हा ग्रंथ लिहून प्रसिद्ध केला.

याशिवाय वेगवेगळ्या क्षेत्रातील अनेक दिग्गजांची चरित्रे याच काळात प्रसिद्ध झाली. त्यात सामजिक, राजकीय, सांस्कृतिक, धार्मिक क्षेत्रातील अभ्यासक, विचारवंत, पुढारी, समाजसुधारक यांविषयींचे जीवनवृत्तांत आलेले आहे. चरित्रातून मानवी जीवनाचे सर्वांगीण सुसंबद्ध दर्शन घडावे. अशी इच्छा असते. समर्थ व्यक्तींच्या जीवनाला किती भिन्न भिन्न रुपे प्राप्त होऊ शकतात हे आपल्याला चरित्रातून पहायला मिळते. चरित्रामुळे वाचकांची जीवनजाणीव समृद्ध होण्यास मदत होते. तसेच वाचकाचे मन आणि बुद्धी परिपक्व होते. आणि कलात्मकतेने आणि अलिप्त नजरेने लिहीले चरित्र वाचकाच्या मनाचे उन्नयन करुन शकते.

आत्मचरित्र (१९२० - १९६०) :

'चरित्र-आत्मचरित्र' या दोन्ही संकल्पना भिन्न असून त्या एकाच अर्थाने वापरण्याची रुढ पद्धत मराठीत दिसून येते. त्यामुळे प्रस्तुत विवेचनात 'आत्मचरित्र' म्हणजे काय ? हे अभ्यासावयाचे आहे. तसेच 'चरित्र-आत्मचरित्र' यामधील मूलभूत फरक जाणून घ्यावयाचा आहे. "व्यक्ती स्वतःच्या आयुष्याची कहाणी जेव्हा स्वतः सांगते तेव्हा त्याला आत्मचरित्र म्हणतात."

इंग्रजी ज्ञानकोशात आत्मचरित्राची व्याख्या "The account of an individual human life written by the subject himself" अशी केली आहे. आत्मचरित्र म्हणजे स्वतःच्या जीवनाचे दूरस्थपणाने केलेले अवलोकन व त्यासंबंधीचे कथन. आत्मचरित्रामध्ये व्यक्तिच्या जीवनाचा इतिहास त्याच्या 'समुहाभावनेच्या' दृष्टीतून वाचकांसमोर अवतरत असतो. आत्मचरित्रातील 'मी' त्यांच्या सर्व गुण-दोषासहित वाचकांना प्रतीत होतो. हा 'मी' त्याच्या जीवनातील अनेक संदर्भाचा उल्लेख करीत असताना, स्वतःच्या जडण-घडणीचा, स्वीकारलेल्या विचारसरणीचा, आयुष्यातील अनेक चढ-उताराचे चित्रण करीत जातो. आत्मचरित्रकार एकप्रकारे 'स्व' जीवनाचे सिंहावलोकन करीत असतो. गत जीवनाचे सिंहावलोकन करण्याचा हेतू आत्मचरित्रामध्ये असू शकतो. आपल्या भोवतीच विश्व आणि आपलं आंतरविश्व यातील संबंधाचा मागोवा घेणं ही देखील आत्मचरित्राची प्रेरणा होऊ शकते. किंवा वृद्ध झाल्यावर भूतकाळावर एक नजर

टाकावी, कल्पनेच्या सहाय्याने परत एकदा तो भूतकाळ अनुभवावा अशी प्रेरणाही आत्मचरित्राच्या मागे असू शकते.

१८७४ ते १९२० या काळात आत्मचरित्राची निर्मिती अल्पप्रमाणात झाली. स्वत:चेच आयुष्य सांगताना पूर्वी संकोच वाटायचा. लेखन देवादिकांचे, साधुसंताचे, देशभक्तांचे व्हायला पाहिजे सामान्य माणसाचा परिचय करुन दयायचा कशाला अशी त्याकाळाची वृत्ती होती. १८७४ ते १९५० पर्यंतच्या अनेक आत्मचरित्रातून स्त्री-पुरुष विषमता, विधवाविवाह, केशवपन, राजकीय विचारप्रणाली, सामाजिक स्थित्यंतरे इत्यादी विषयावर काही आत्मचरित्रांमधून मार्मिक विवेचनही केलेले आढळून येते. याच काळात 'गृहिणी' धर्माची चौकट ओलांडून स्त्रीच्या स्त्रीत्त्वाचा शोध घेणारी काही आत्मचरित्रे मराठीत स्त्रीलेखिकांनी लिहिलेली आहेत. 'पुरुष' आणि 'स्त्री' लिखित आत्मचरित्रांची तुलना करु केल्यास पुरुषांनी लिहिलेल्या आत्मचरित्रापेक्षा स्त्रियांची आत्मचरित्रे सकस ठरणारी आहेत. स्त्रीलेखिकांनी लिहिलेल्या आत्मचरित्रांमध्ये सर्वात उठून दिसणारे आत्मचरित्र म्हणजे लक्ष्मीबाई टिळक यांचे 'स्मृतिचित्रे' हे होय. "समृतिचित्रे म्हणजे साहित्य 'लक्ष्मी' ने मराठी आत्मचरित्रात्मक वाङ्मयाच्या अंगावर घातलेला एक बहुमोल दागिना आहे" हे अ.ना.देशपांडे यांचे मत 'स्मृतिचित्रे'च्या वाङ्मयीन गुणवत्तेला न्याय देणारे आहे.

लक्ष्मीबाईं पूर्वी पार्वतीबाई आठवले यांनी 'माझी कहाणी' (१९२८) लिहून, एक दुर्देवी विधवा व अशिक्षित स्त्री संधी मिळताच किती मोठी होऊ शकते चित्रण केले आहे. आनंदीबाई उर्फ बाया कर्वे यांचे 'माझे पुराण' (१९४४) मध्ये सुरुवातीचा काही भाग काव्यमय शैलीमुळे आकर्षक तर काही भाग आत्मसमर्थनपर अशा स्वरुपात आल्यामुळे ते कंटाळवाणे ठरलेले आहे. आठवणींच्या रुपाने सांगितलेल्या संसारी जीवनातील सत्याचे, प्रामाणिकपणाचे व प्रेमळपणाचे चित्रण रमाबाई रानडेंनी आमुच्या आयुष्यातील काही आठवणी मध्ये केलेल्या आहेत. एका अल्पशिक्षित पण बुद्धिमान स्त्रीच्या लेखनात केवळ जिव्हाळ्यामुळे केवढा गोडवा निर्माण होतो. याचे उदाहरण म्हणजे हे आत्मचरित्र होय. याशिवाय लिलाबाई पटवर्धन यांचे 'आमची अकरा वर्ष', इंदिराबाई भागवत यांचे या सदाशिवा याचाही आपणाला उल्लेख करता येण्यासारखा आहे. त्याचप्रमाणे, 'माझी नृत्यसाधना' हे रोहिणी भाटे यांचे आत्मचरित्र त्याच्या कलासाधनेच दर्शन घडवते. 'ढकला रे ढकला दिन सखया' व 'उमटलेली पावले' ही दोन आत्मचरित्रे राधाबाई आपटे यांनी लिहीली आहेत. एका राजकीय कार्यकर्त्याच्या पत्नीच्या जीवनातील हे अनुभवाचे बोल आहेत.

स्त्रीलेखिकांच्या आत्मचरित्रांच्या संख्येपेक्षा पुरुषांनी लिहीलेली आत्मचरित्रे जास्ती आहेत. मराठीत अर्वाचीन वाङ्मयामध्ये आत्मचरित्र लिहीण्याचा पहिला मान दादोबा पांडुरंगाकडे जातो. दादोबा पांडुरंग यांचे आत्मचरित्र हे त्यांचे आत्मवृत्त प्रसिद्ध आहे. मराठीचे पाणिनी म्हणून दादोबा पांडुरंग ओळखले जातात. या

आत्मचरित्राचा लेखनकाल सुमारे १८७०-७१ चा असावा असे प्रो.द.वा. पोतदार यांचे मत आहे. यमुनापर्यटन या कादंबरीमुळे प्रकाशझोतात आलेले बाबा पद्मनजी यांनी 'अरुणोदय' नावाचे आत्मचरित्र लिहीले आहे. यात बाबा पद्नमजी यांनी जन्मापासून ते ख्रिस्ती धर्माचा स्वीकार इथपर्यंतचा वृत्तांत दिलेला आहे. आयुष्यभर स्त्रीशिक्षणासाठी अहोरात्र झटणारे प्रो.धोंडो केशव कर्वे याचे 'आत्मवृत्त' (१९१५ ते १९२८) हे आत्मचरित्र प्रसिद्ध आहे. स्त्रीशिक्षणामधील अनेक अडथळ्यांचे यामध्ये समालोचन आलेले आहे. विधवांच्या शिक्षणासाठी आपण करीत असलेल्या कार्याची लोकांना ओळख करुन दयावी हा त्यामागचा उद्देश होता. १९२४ साली नाना पावगी यांनी 'आत्मवृत्त' नावाचेच आत्मचरित्र लिहीले. १९३८ साली ल.रा. पांगारकर यांनी 'चरित्र चंद्र' हे आत्मचरित्र लिहीले. १९३९मध्ये न.चि. केळळर यांनी 'गतगोष्टी' हे आत्मचरित्र लिहीले. १९२७ साली 'माझी जन्मठेप' या वि.दा. सावरकरांच्या आत्मचरित्रावर बंदी घालण्यात आली. त्यानंतर त्यांनी 'काळे पाणी' या आत्मचरित्रात अंदमानमध्ये त्यांचे झालेले हाल, त्यांची शारिरीक यातना, मानसिक वेदना यांचे वर्णन केले आहे. बौद्ध धम्माच्या अभ्यासासाठी हिंदुस्थान, ब्रम्हदेश, सीलोन, अमेरिका इत्यादी प्रदेशात केलेल्या प्रवासाचे वर्णन धर्मानंद कोसंबीच्या निवेदन (१९४४) मध्ये आलेले आहे. ज्ञानार्जनासाठी अपार कष्ट झेललेल्या एका साधारण गरीब परिस्थितीतल्या विद्वान पुरुषाचे हे निवेदन तरुणांना नेहमीच प्रेरणादायी ठरणारे आहे. स्वातंत्र्यांच्या ध्येयाने झपाटलेले वि.दा. सावरकारांनी 'माझी जन्मठेप' (१९४०) नावाचे आत्मवृत लिहीलेले आहे. यामधून प्रखर राष्ट्रनिष्ठा अनुभवास येते. हा ग्रंथ ब्रिटीश सरकाने जप्त केला होता. पुढे त्याची बंदी उठल्यामुळे १९४७ साली त्याची दुसरी आवृत्ती काढण्यात आली मनमोकळेपणा, स्पृहणीय तटस्थवृत्ती, काव्यमयता, नर्मविनोद, स्वदेशअभिमान इ. गुणांनी भरलेला हा ग्रंथ वाचत असताना वाचकांच्या डोळ्यांसमोरुन सावरकारांचा संपूर्ण जीवनपटच तरळून जातो. हे त्याचे विशेष होय. संतसाहित्याचे साक्षेपी अभ्यासक ल.रा. पांगारकरांचे 'चरित्रचंद्र' हे आत्मचरित्र प्रेमळ व रसाळ कथनपद्धतीमुळे वाचनीय झाले आहे. सौंदर्यशोधक व्यक्तिमत्त्वाचे सम्यक दर्शन, आकर्षक लेखनशैलीतून आत्मचरित्रात लालित्य निर्मितीचा अनुभव ना.सी. फडके यांच्या 'माझ्या साहित्यसेवेतील काही स्मृती' (१९४१) मध्ये आपणाला पहाता येते.

'निश्चयाचे बळ । तुका म्हणे तेची फळ ।।' ही वचनोक्ती सार्थ ठरविणारे कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांनी माझ्या आठवणी व अनुभव (१९४०) सहा भागात प्रसिद्ध केले आहे. अस्पृश्यता निवारण, धर्मभावनांचा विकास व परिवर्तन, एकांत सहली, गाढा व्यासग, मूर्तिपूजा व समाजसुधारणा इत्यादी विषयीची सखोल माहिती यामधून वाचकांस होते. याच काळाअंती काही अनुवादित आत्मचरित्रे प्रकाशित झाली. इ.स.१९९० मध्ये एका क्रांतिकाराने आत्मचरित्र लिहीले. वा.बा.गोगटे यांचे हॉटसनवर रोखलेल्या पिस्त लातून हे ते आत्मचरित्र होय. त्यामध्ये बेंजामिन

फ्रॅंकलिन यांचे चरित्र (रा.गो.करंदीकर) जोसेफ मॅझिन यांचे आत्मचरित्र व राजकारण (वि.दा.सावरकर) महात्माजींचे सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथा (सी.पु.पटवर्धन) लाला लजपतराय यांचे चरित्र (ग.दे.खानोलकर) इं.चा. उल्लेख करता येतो.

समारोप :

चरित्रकार बाह्यजीवनाकडून आंतरजीवनाकडे जात असतो; आत्मचरित्रकार आंतरजीवनाकडून बाह्यजीवनाकडे जात असतो. चरित्रनायकाचे मनोविश्लेषण करता येईलच असे नाही. आत्मचरित्रकार स्वतःचे मानसशास्त्रीय विश्लेषण करु शकतो. जीवनातील कटु अनुभवांना पचवणे, वैयक्तिक रागलोभाला दूर ठेवणे आत्मचरित्रकाराला आवश्यक असते. खरे होऊन स्वत्वाचा शोध घेणाऱ्या आत्मचरित्रकाराला वैचारिक अधिष्ठान असणे आवश्यक असते. यानंतरच्या काळात आत्मचरित्र हा वाङ्मय प्रकार फारच लोकप्रिय झालेला दिसतो.

स्वअध्ययन :

१. चरित्राची व्याख्या लिहा.
२. चरित्रलेखनाची परंपरा सांगून १८७४ ते १९२० या कालखंडातील चरित्र वाङ्मयाचा आढावा घ्या.
३. १९२० ते १९६० या कालखंडातील चरित्र वाङ्मयाचे विशेष लिहा.
४. १८७४ ते १९६० या कालखंडातील आत्मचरित्र वाङ्मयाचा परिचय करुन घ्या.
५. १८७४ ते १९२० या कालखंडातील चरित्र - आत्मचरित्र वाङ्मयाचा उहापोह करा.
६. १९२० ते १९६० या कालखंडातील चरित्र - आत्मचरित्र या वाङ्मयाचा आढावा घ्या.

संदर्भ ग्रंथ :

१. अ. ना. देशपांडे - प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, भाग - १, पूर्वार्ध आणि उत्तरार्ध, पुणे, १९६६.
२. इ. रा. गोसावी - पाच भक्ति संप्रदाय, पुणे, १९७४
३. रा. श्री. जोग व इतर - प्रदक्षिणा खंड १, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे १९४१.
४. रवींद्र हानी व इतर - प्रदक्षिणा खंड २, कॉन्टिनेन्टल, पुणे १९९१.
५. मराठी वाङ्मयाचा इतिहास - खंड ५ व ६, मसाप, पुणे.

❖❖❖❖

११

ललित गद्य (१८७४ ते १९६०)

डॉ. सूर्यकांत अ. आजगांवकर

१) प्रवासवर्णन १८७४ ते १९६०

उद्दिष्टे :

- प्रवासवर्णन या वाङ्मय प्रकाराचे स्वरुप स्पष्ट करणे.
- प्रवासवर्णन या वाङ्मयप्रकाराच्या लेखनामागच्या प्रेरणा समजून घेणे.
- इ.स. १८७४ पूर्वीच्या प्रवास वर्णनांचे स्वरुप समजून घेणे.
- इ.स. १८७४ ते १९२० या कालखंडातील प्रवासवर्णनांची वाटचाल अभ्यासणे.
- इ.स. १९२० ते १९६० या कालखंडातील प्रवासवर्णनांची निर्मिती व स्वरुप समजून घेणे.
- एकूणच १८७४ ते १९६० पर्यंतच्या प्रवासवर्णनांच्या रुपांमध्ये होत गेलेल्या बदलांची नोंद करणे.
- विनोदी लेखनाची पूर्वपरंपरा विशद करणे.
- विनोदी लेखनाची आधुनिक पंरपरा व स्वरूप सांगणे. (स्वातंत्र्यपूर्व लेखन).
- स्वातंत्र्योत्तर काळातील लेखन परंपरा व स्वरूप स्पष्ट करणे.

प्रास्ताविक :

प्रवासवर्णन हा ललितगद्यात समाविष्ट होणारा वाङ्मयप्रकार आहे, त्यामुळे आधुनिक मराठी साहित्यातील महत्त्वाच्या प्रवासवर्णनपर ग्रंथाची थोडक्यात परिचय करुन घ्यायला हवा. मानवी मनाच्या एका स्वाभाविक प्रवृत्तीतून प्रवासवर्णनपर लेखन होत असते. आपण पाहिलेला प्रदेश, तेथील लोकजीवन, निसर्ग, प्रवासातील अनुभव, सुखाचे, संकटाचे प्रसंग इतरांना सांगावेत, आपला आनंदामध्ये इतरांना सहभागी करुन घ्यावे ह्या स्वाभाविक प्रवृत्तीतूनच हे लेखन होते. मराठीमध्ये भारतभ्रमण, तीर्थयात्रा व परदेश भेटी आदींच्या निमित्ताने प्रवासवर्णने लिहिली गेली आहेत. ह्या प्रवासवर्णनांतील (१८७४ ते १९६०) या काही प्रवासवर्णनांचा परिचय करुन घेणे शक्य आहे.

'प्रवासवर्णन' हा वाङ्मयप्रकार ज्या घटकांनी साकारतो त्यापैकी पहिला घटक 'प्रवासी' आहे व दुसरा घटक प्रवास आणि तिसरा घटक प्रदेश. यातील प्रवासवर्णन व प्रवासी हे अविभाज्य घटक आहेत. प्रवासी नसेल तर प्रवासवर्णनाला 'प्रवासवर्णन' म्हणून अस्तित्व प्राप्त होत नाही. प्रवास हा एका अर्थाने प्रवाशाचा वास्तव अनुभव असतो. प्रवासवर्णनात प्रवास करणारा लेखक स्वत: बोलत असतो. आपले प्रवासविषयक अनुभव 'मी' च्या भाषेत मांडणारा लेखक असतो. त्यामुळे प्रवासवर्णनातील लेखन हे स्वभावत:च प्रथम पुरुषी असले तरी त्यात असलेला 'मी' हा दोन पातळ्यांवरचा असतो. एक लौकिक पातळीवरचा 'मी' आणि दुसरा कलात्मक पातळीवरचा 'मी' लौकिक पातळीशी निगडित असलेला 'मी' वस्तुनिष्ठपणे प्रवासात वावरत असतो. त्यामुळे एक प्रवासी म्हणून तो वाचकांना परिचित होतो. पण कलात्मक पातळीवरचा 'मी' व त्याला भावणाऱ्या गोष्टी वेगळ्या असतात, त्याच प्रवासवर्णनात अपरिहार्यपणे व्यक्त व्हाव्यात अशी अपेक्षा असते.

प्रवासवर्णनचा लेखक हा नुसता लेखक नसतो तर तो 'प्रवासी' लेखक असतो. त्याने केलेल्या 'प्रवासां'चे वर्णन असते. या प्रवासवर्णनातील प्रवाशाचे चित्र 'प्रवास' घटकामुळेच उठून दिसते. 'प्रवास' या घटकतत्वामुळे स्थळवर्णनाहून व इतर वाङ्मयप्रकाराहून प्रवासवर्णन वेगळे ठरत असते. प्रवास वा प्रवासतत्व हे सतत फिरते. पण ते केंद्रिभूत राहिल्याने त्याचा वेगळा गतिशील आविष्कार प्रवासवर्णनात होत राहतो. त्यामुळे प्रवासवर्णन स्थलवर्णनासारखे स्थितीशील न राहता गतिशील राहते.

प्रवासवर्णनाला जे वाङ्मयीन मूल्य प्राप्त होत असते ते लेखकाचे व्यक्तिमत्व आणि प्रदेश यांच्या समतोल आणि कलात्मक अभिव्यक्तीतून प्राप्त होत असते. लेखकाच्या प्रदेशविषयक जाणिवेच्या आविष्काराची उत्कटता आणि अपरिहार्यता त्यामागे असते.

प्रवासवर्णनातील व्यक्त होणारा प्रदेश म्हणजे केवळ 'स्थळ' नव्हे तर प्रदेश म्हटल्याबरोबर त्याचा भूगोल, इतिहास, धर्म, कला, निसर्ग, तिथले वातावरण व इतर गोचर व अगोचर गोष्टी तसेच प्रदेशाची खास वैशिष्ट्ये यात अभिव्यक्त होतात. प्रदेश हा व्यापक असल्याने त्याला 'स्थळ' म्हणणे योग्य नाही. 'प्रदेश' हा 'प्रवासी' लेखकाला माणसासारखा भेटत असतो.

कोणत्याही प्रवासवर्णनातून जागवणारा प्रदेश, तेथील माणसे, निसर्ग, तिथला भूगोल, इतिहास, संस्कृती, धर्म, राजकारण, अर्थकारण व सामाजिक जीवन या सर्वातून जाणवत राहतो आणि प्रवास, प्रवासी व प्रदेश या मूलभूत घटकतत्वांनीच प्रवासवर्णन साकारते.

मराठीतील 'प्रवासवर्णन' या वाङ्मयप्रकाराची वाटचाल पाहण्यापूर्वी प्रवासवर्णनपर वाङ्मयनिर्मितीमागील काही प्रमुख प्रेरणा कोणत्या आहेत ते लक्षात घेतल्या पाहिजेत. प्रारंभकाळी ज्ञानदानाची व ज्ञानग्रहणाची प्रेरणा प्रमुख होती. दुसरे म्हणजे त्याकाळातील सर्व प्रवासवर्णनपर ग्रंथ हे उपयोगी व महत्त्वाची अशी माहिती त्या त्या प्रवासाबद्दल पुरवितात. त्यावेळच्या वाचकांची ती गरज होती. या प्रेरणांबरोबर त्या काळातील इंग्रजी व परकी भाषांतून प्रवासविषयक महत्त्वाच्या ग्रंथांची भाषांतरे करण्याची प्रेरणा दिसून येते. तसेच ज्ञानाचा व मनोरंजनाचा हेतूही या प्रवासवर्णनामागे होता. याशिवाय राष्ट्रवाद, राजकीय, आर्थिक, व सामाजिक परिस्थितीचे वास्तवचित्रण, आत्मविष्कार, अशाही काही प्रेरणा दिसून येतात.

इ.स. १८०० ते १९५० या कालखंडात निव्वळ एकशेतीस प्रवासपर ग्रंथ आणि सुमारे एकशेआठ ग्रंथकार सापडतात. तर १९७१ ते १९६५ या कालखंडात सुमारे एकशेवीस प्रवासपर ग्रंथ व सुमारे सत्याहत्तर ग्रंथलेखकांची नोंद सापडते हे खरे, पण अर्वाचीन मराठीतील प्रवासवर्णन या वाङ्मयप्रकाराची वाटचाल कशी झाली, त्याच्या रंगरुपात भर टाकणारे ग्रंथ आणि ग्रंथकार कोण आहेत हे कालानुक्रमे पाहणे इष्ट ठरेल.

सुरुवातीच्या काळातील (इ.स. १८०० ते १८२२) प्रवासवर्णन या साहित्यप्रकारात समाविष्ट होणारे काही ग्रंथ आहेत.

इंग्लंड देशाचे वर्णन – हे नाना नारायण यांनी भाषांतरित केलेले (१८३५) पहिले प्रवासवर्णन होय. तर 'काशीप्रवास' म्हणजे महायात्रावर्णन हे (१८५२) शामराव मोरोजीचे प्रवासवर्णन आहे. भाषांतरयुगातील हा स्वतंत्र ग्रंथ पहिले प्रवासवर्णन म्हणून ओळखण्यात येते. मराठी भाषेतील हे पहिले प्रवासवर्णन होय. तर कप्तान कुक यांनी लिहिलेले व सदाशिव गणेशशास्त्री लेले यांनी भाषांतरित (१८५३) केलेले पुस्तक हे प्रवासवर्णनात समाविष्ट होणारे आहे. करसनदास (मुळजी यांचे गुजराथी भाषेतील 'इंग्लडातील प्रवास' ह्या पुस्तकाचे भास्कर हरि भागवत यांनी मराठीत भाषांतरित केलेले (१८६७) हे पुस्तक भाषांतरयुगाचे प्रतिनिधित्व करणारा ग्रंथ आहे. या ग्रंथात 'प्रवास' ग्रंथभर असून त्यातून ग्रंथलेखक व इंग्लडमधील प्रदेशाचे चित्र पाहावयास मिळते.

या काळातील दुसरा महत्त्वाचा भाषांतरित ग्रंथ हा 'राणीचे पुस्तक' हा आहे. श्री. गणपत मोरोबा पितळे (इ.स. १८७१) यांनी या ग्रंथाचे भाषांतर केले. वृतांत किंवा माहिती देणे हाच या ग्रंथाचा उद्देश दिसतो. तर गोकर्ण महाबळेश्वराचे याचे प्रकरणी वृत्तांत – ले. जगन्नाथ विठोबा क्षत्री (इ.स. १८६३) याच्या ग्रंथातील वृत्तांत हा निश्चितपणे साहित्यिक पातळीवर गाठणारा आहे. तसेच लेखकाने पर्यटनाचे महत्त्व या ग्रंथातून सांगितले आहे. 'काशीयात्रा' – (इ.स. १८७२) ले. हरि गणेश पटवर्धन यांचे हे प्रवासवर्णन मराठीतील पहिले पत्ररुप प्रवास वर्णन आहे.

एकूणच या कालखंडातील प्रवासवर्णने ही एका साच्यातील दिसत नाहीत. त्यांच्या रुपामध्ये विविधता आढळते.

इ.स. १८८३ ते १९०० या कालखंडात प्रवासवर्णनपर वाङ्मयाच्या रुपाकडे झुकणारी तेरा-चौदा प्रमुख ग्रंथ आढळतात. या सर्व प्रवासवर्णनकारांनी (लेखक) प्रवासवर्णनाच्या वाङ्मयीन रुपाच्या घडणीला हातभार लावला नसला तरी काहींची प्रवासवर्णने ही निश्चितच हातभार लावणारी आहेत.

सन १८५७ च्या बंडाची हकीकत सांगणारे लेखक विष्णुभट गोडसे वरसईकर यांचे 'माझा प्रवास' (इ.स. १८८३) हे महत्त्वाचे प्रवासवर्णन आहे. १८५७ च्या बंडाचा प्रवासानुभव गोडसेंना अनुभवायला मिळाला, तो मांडताना त्यांचा चौकस, साहसी, रोखठोक, हजरजबाबी स्वभाव साकार झाला आहे. तसेच झाशी, बुंदेलखंड आदी प्रदेश व समाज-संस्कृती साकार झाली आहे. पंडिताबाई रमाबाई यांचे 'इंग्लडंचा प्रवास भाग पहिला' (इ.स. १८८३) हे अस्सल प्रवासवर्णन आहे. हे पत्ररुप असे प्रवासवर्णन प्रवासाचे विलोभनीय दर्शन घडविते. त्याचबरोबर लेखिकेच्या प्रवासातील मनोवस्थेचे, चिंतनशीलतेचे दर्शन घडविते.

गणेश सदाशिव शास्त्री लेले यांनी इ.स. १८८५ साली लिहिलेल्या 'तिर्थयात्रा – प्रबंध' हा ग्रंथ म्हणजे इतिहास आहे. नावाप्रमाणे या ग्रंथाचे रुप प्राबंधिक आहे. देशप्रेमाच्या प्रेरणेतूनही प्रवासवर्णनपर ग्रंथ लिहिले आहेत. "युनायटेड स्टेटस्ची लोकस्थिती आणि प्रवासवृत्त – भाग १" हा पंडिता रमाबाई यांचा (इ.स. १८८५) ग्रंथ त्यातला एक आहे. अमेरिकेच्या तत्कालीन साक्षेपी माहितीने हा ग्रंथ भरलेला आहे.

या कालखंडातील आणखी एक महत्त्वाचे प्रवासवर्णनकार म्हणजे श्री. गोविंद जोशी हे होय. त्यांनी 'थोडासा प्रवास' (इ.स. १८९१) 'लाहोरचा प्रवास' (इ.स. १८९५) आणि 'माझे प्रवासाची हकीकत' (इ.स. १८९६) लिहिलेली प्रवासवर्णने महत्त्वाची आहेत. 'थोडासा प्रवास' हे पुस्तक प्रवासवर्णन पत्ररुप आहे. तर माझे प्रवासाची हकीकत हे रोजनिशी स्वरुपाचे आहे.

लोकमान्य टिळकांचे 'मद्रास, सिलोन व ब्रह्मदेश येथील प्रवास' (इ.स. १९००) हे प्रवासवर्णन व्याख्यानरुप आहे. त्या व्याख्यानातून लोकमान्यांचे व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडते. एक समाजनिरीक्षक, सामाजिक कार्यकर्ते असे टिळक व्याख्यानातून समोर येतात.

इ.स. १८८३ ते १९०० या कालखंडातील प्रवासवर्णने ही एका स्वरुपाची दिसत नाहीत. व्याख्यानरुपापासून कवितेसारख्या तरल रुपापर्यंत अशी वेगवेगळ्या रुपातील प्रवासवर्णने या कालखंडात लिहिलेली आहेत. इ.स. १९०१ ते १९२० या दोन दशकाच्या कालखंडातही अनेक दर्जेदार प्रवासवर्णने लिहिली आहेत.

या कालखंडातील उल्लेखनीय प्रवासवर्णनकार म्हणजे प्रा. गोविंद चिमणाजी भाटे, प्रा. पांडुरंग दामोदर गुणे, सौ. पार्वतीबाई चिटनवीस हे होय. यांच्याशिवाय यादव शंकर बावीकर यांचे 'दोनशे वर्षापूर्वी पृथ्वीप्रदक्षिणा करणाऱ्या प्रवाशाचे हिंदुस्थानातील प्रवासवृत्त' (इ.स. १९०१) साळूबाई बलवंत कलभंडे यांचे काशीयात्रा (इ.स. १९०७), ग.पां. नाटेकर उर्फ हंस यांचे "कैलासमानसरोवर दर्शन" (इ.स. १९१०), माईसाहेब घोरपडे यांचे 'आमचा विलायतचा प्रवास' (इ.स. १९१४), नर नारायण बाबासाहेब इचलकंरजीकर यांचे 'ब्रिटिश लोकांचा जीवनक्रम व चारित्र्य' (इ.स. १९१९) आणि रामचंद्र शामराव माने यांचे 'युरोपच्या प्रवासाचे सिहांवलोकन' (इ.स. १९२०) ही महत्त्वाची प्रवासवर्णने आहेत.

श्री भाटे, व पार्वतीबाई चिटनवीस व नाटेकर यांचा अपवाद सोडल्यास वीस वर्षातील ही प्रवासवर्णनेही वृतांतवजा असून तीर्थयात्रांची, स्थानांची माहिती देणे हेच त्यांचे कार्य आहे.

सौ. पार्वतीबाई चिटनवीस ह्या जग फिरणारी पहिली मराठी स्त्री व प्रवासलेखिका होय. त्यांचे "आमचा जगाचा प्रवास" (इ.स. १९१५) हे महत्त्वाचे प्रवासवर्णन आहे. या प्रवासवर्णनात प्रवास केंद्रिभूत ठेवून प्रदेश व लेखिका यांचे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व जाणवत राहाते. अकृत्रिम, अनकलंकृत भाषा हे या प्रवासवर्णनाचे वाङ्मयीन यश आहे. निवेदनामध्ये नितळ पारदर्शीपणा व प्रसादिकपणा असल्याने हे संपूर्ण प्रवासाचे साधेपणाने काढलेले शब्दचित्र असेच ह्या प्रवासवर्णनाचे वर्णन करता येते.

डॉ. पांडुरंग दामोदर गुणे यांचे 'माझा युरोपातील प्रवास' (१९१५) हे या कालखंडातील आणखी एक महत्त्वाचे प्रवासवर्णन आहे. डॉ. गुणे जर्मनीत शिकत असताना त्यांनी इ.स. १९१० ते इ.स. १९१३ पर्यंत युरोपमध्ये प्रवास केला होता त्या प्रवासाचे पत्राद्वारे वर्णन केले होते. त्या पत्रांतूनच हा ग्रंथ सिद्ध झाला. ह्या प्रवासवर्णनातून एक पंडित, एक रसिक, एक सूक्ष्म निरीक्षणशक्तीचा भारतीय अभ्यासू लेखक आपल्यासमोर उभा राहतो.

इ.स. १९०१ ते १९२० या कालखंडातील प्रवासवर्णनांच्या निर्मितीचे स्वरूप बऱ्याच प्रमाणात इतिहास वा वृत्तांतवजा असेच आहे. या काळातील प्रवासवर्णनपर वाङ्मयनिर्मितीचा आलेख बराचसा उंच गेलेला दिसत असला तरी गुणात्मक दृष्टीने हा आलेख बराच खाली आलेला दिसून येतो.

इ.स. १९२१ नंतरच्या कालखंडातही उल्लेखनीय असे प्रवासवर्णनपर लेखन झालेले आहे. प्रा. गो. चि. भाटे हे या काळातील एक महत्त्वाचे प्रवासवर्णनकार होत. त्यांनी इ.स. १९२१ ते १९४४ च्या दरम्यान त्यांनी प्रवासवृत्तमाला पुष्प – १, पुष्प – २, हिंदुस्थानचे नंदनवन आणि इतर अशी पंधरा प्रवासवर्णने लिहिली. एका

विशिष्ट ध्येयाने एखाद्या विषयावर सतत ग्रंथनिर्मिती व त्यासाठी फिरती करणारा हा लेखक महत्त्वाचा आहे. श्री भाटे यांनी आपल्या पंधरा ग्रंथामधून प्रदेश आणि स्थलांचे चित्रण प्रभावीपणे केल्यामुळे त्यात लेखक दिसत नाही तर लेखकाची बहिर्मुख दृष्टी दिसून येते.

श्रीमंत संपतराव गायकवाड (बडोदे) हे आणखी एक प्रवासवर्णनकार पण यांचा उल्लेख प्रवासवर्णनकारापेक्षा इतिहास वा वृत्तांतवजा लिहिणारे ग्रंथकार म्हणून केला जातो. त्याच्या लेखनातून राजे लोकही प्रवासाबद्दल व पाहिलेल्या देशांबद्दल काही लिहू शकतात असा पुरावा या लेखनातून सापडतो.

वरील लेखकांव्यतिरिक्त या कालखंडात श्री. बा. ग. चव्हाण यांचे 'काश्मिरी फुलांची पखरण', श्रीमती शांता नासिककरांचे म्हैसूरकडील प्रवास वि. कृ. जोशी यांचे 'माझा विलायतचा प्रवास', नानासाहेब शिंदे यांचे, 'मी युरोपात काय पाहिले' हे दैनंदिनी स्वरुपातील प्रवासवर्णनही इतिहासात नोंद होण्याजोगी आहेत.

साहित्यसम्राट न. चिं. केळकर यांचे 'विलायतची बातमीपत्रे' (इ.स. १९२२) हा ग्रंथ म्हणजे अनेक पत्रांतून साकार झालेले प्रवासवर्णन आहे. केळकरांनी लंडनवरून 'केसरी' साठी स्वतः लिहिलेली बातमीपत्रे या पुस्तकात एकत्र केलेली आहेत. या बातमीपत्रांत लेखकाने बोटीवरुन दिसणारा प्रदेश चित्रित केला आहे. पण लंडनचे खास व्यक्तिमत्व साकार झालेले दिसत नाही.

केळकरांच्या या 'विलायती बातमीपत्रे' या ग्रंथाला प्रवासवर्णनाचे केवळरूप नाही, तो राजकीय अहवालाच्या स्वरुपाकडे वळणारा पत्ररुप ग्रंथ आहे. प्रवासवर्णन आणि राजकीय पत्ररुपातील अहवाल यांचे मिश्रण झालेले दिसून येते. श्री. केळकर हे सव्यसाची लेखिका असल्याने बातमीपत्रांना वाङ्मयीन रुची प्राप्त झालेली दिसते. या प्रवासवृत्तांतास नर्म विनोदाची झालर आणि राजकीय आशयाचा पोत प्राप्त झालेला दिसून येतो.

श्री. श्री. रा. टिकेकर यांची 'सिंहाला शय' (इ.स. १९३०) 'ब्रह्मी बंडाळीचे ब्रह्मपुराण' (इ.स. १९३१), 'मुसलमानी मुलुखातील मुशाफरी' (इ.स. १९३१) ही तीन प्रवासवृत्ते न. चिं. केळकर यांच्या प्रेरणेमुळे टिकेकरांनी लिहिलेली होती. हे तिन्ही ग्रंथ वेगवेगळ्या देशावर आधारित आहेत. त्यामुळे अन्य देशांविषयीची माहिती. वा अन्य देशात काय चालले आहे हे कुतुहल, उत्सुकता त्यांचे समाधान होते.

'सिंहाला शह' हे पुस्तक अफगाणिस्थान व वायव्य सीमाप्रांत या प्रातांचे ऐतिहासिक व वर्णनात्मक विवेचन करणारे आहे. तर 'मुसलमानी मुलखातली मुशाफरी' हे पत्ररुप प्रवासवर्णन आहे. पत्रात्मक शैलीमुळे वाचकाला वर्तमानकाळाचा प्रत्यय येत राहतो. तर 'ब्रह्मी बंडाळीचे ब्रह्मपुराण' या ग्रंथात ब्रह्मदेशातील तत्कालीन

बंडाळीचे ब्रह्मपुराण कथन करणारा आहे. वक्रोक्तीपूर्ण व उपहासात्मक भाषाशैलीमुळे हा ग्रंथ लक्षणीय झालेला आहे.

थोडक्यात टिकेकर हे राजकीय प्रवासवृत्तांचे पहिले निर्माते आहेत. प्रवासवर्णनाच्या रुपप्रकारात टिकेकरांनी ओजस्वीपणे राजकीय आशयाचे पोत धरले आहेत.

'थालिपीठ उर्फ विलायतविहार' हे गणेस सदाशिव मराठे यांचे मराठीतील पहिले विनोदी प्रवासवर्णन होय. या प्रवासवर्णनात विनोदाची धार पहिल्या प्रकरणापासून शेवटच्या प्रकरणापर्यंत आहे. 'विलायतविहार' वाचकांना तेथील प्रदेशाचा विनोदपूर्ण रीतीने प्रत्यय घडवितो. तसेच जर्मन येथील विद्यार्थ्यांचे द्वंद्वयुद्ध, बोनमय येथील नाताळ, व्हेनिस, फ्लॉरेन्स, इटाली येथील कलावादी रसिक जीवनाचा प्रत्यय येतो.

श्री. म. म. काणे यांचे 'युरोपचा प्रवास' (इ.स. १९३८) हे पत्ररुप प्रवासवर्णन ह्या कालखंडातील महत्त्वाचे प्रवासवर्णन आहे. त्यांनी प्रवासात नऊ-दहा देशांना भेटी दिल्या. तिथली शहरे पाहिली त्याबद्दलची टिपणे लिहून ते आपल्या मुलांना पत्राद्वारे पाठवित. या प्रवासवर्णनाची शैली रसिकाची आणि पंडिताचीही आहे. त्यामुळे हे प्रवासवर्णन एका पंडिताचे प्रवासवर्णन आहे.

वरील सर्व प्रवासवर्णन पाहिली की लक्षात येते की, माहिती, ज्ञान व मनोरंजन हे आजवरील बऱ्याचशा प्रवासवर्णनांचे आद्य हेतू आहेत. त्याकरिताच त्यांची निर्मिती झालेली आहे. भाटे, काणे, गुणे यांची प्रवासवर्णने ही या कालखंडातील महत्त्वाची प्रवासवर्णने आहेत. हा प्रवासाच्या दृष्टीने 'प्रबोधन युगांचा' कालखंड होता.

इ.स. १९४० ते १९६५ ह्या कालखंडातील 'प्रवासवर्णन' ह्या वाङ्मयप्रकाराच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा कालखंड म्हणावा लागेल. या कालखंडात प्रवासवर्णनाच्या निर्मितीच्या उच्चांक गाठलेला दिसतो. तसेच वाङ्मयीन दृष्टीने लिहिलेली प्रवासवर्णने आपल्या कलात्मक उंचीचा प्रत्यय देताना दिसतात. प्रवासवर्णन हा एक स्वतंत्र ललित वाङ्मयप्रकार याच कालखंडात रुढ झाला. या कालखंडात अनेक श्रेष्ठ प्रवासवर्णनकार प्रवासवर्णनाची निर्मिती केलेली दिसून येते. त्याचा आढावा घेता येईल.

'धुक्यातून लाल ताऱ्याकडे' (१९४०), 'आमची माती आमची माणसे' (१९५०), 'निळे डोंगर तांबडी माती' (१९५७), 'सोनेरी उन्हात पाचूची बेटे' (१९५९), 'रक्ताची फुले' (१९५९), 'खडक कोरतात आकाश' (१९६४) इत्यादी, प्रवासवर्णने इ. स. १९४० ते १९५९ कालखंडात प्रकाशित झाली.

प्रा. काणेकरांनी प्रदेश वैशिष्ट्ये व निसर्ग वैशिष्ट्ये हेरून आपल्या प्रवासवर्णनापर पुस्तकांना नावे दिलेली आहेत. त्यामुळे पुस्तकांच्या शीर्षकातही काव्यात्मता आहे. 'धुक्यातून लाल ताऱ्याकडे', 'सोनेरी उन्हात पाचुची बेटे' व 'खडक कोरतात आकाश' ह्या तिन्ही प्रवासवर्णनांमध्ये अनुक्रमे युरोप व रशिया, कोलंबो व हॉगकाँग-मलाया आणि अमेरिका या देशांतील प्रदेश आणि प्रवास चित्रित झालेला दिसून येतो. तर 'आमची माती आमचे आकाश', व 'निळे डोंगर', 'तांबडी माती' ह्या प्रवासवर्णनात उत्तर आणि दक्षिण भारताचा प्रवास चित्रित झालेला आहे.

काणेकरांच्या 'धुक्यातून लाल ताऱ्याकडे' या प्रवासवर्णनात त्यांचे व्यक्तिमत्व प्रदेश व प्रवास यांत मिसळून व्यक्त होते, पण तरीही त्यात कलात्मक तटस्थता राखलेली दिसून येते. त्यामुळेच एका अपूर्व प्रवासवर्णनाचा दर्जा ह्या प्रवासवर्णनास मिळालेला आहे. तसेच काणेकरांचे 'आमची माती आमचे आकाश' हे उत्तर भारताच्या प्रवासावर आधारलेले प्रवासवर्णन काणेकरांची अभिजात कलादृष्टी व्यक्त करते. तसेच त्यांची बहुश्रुतताही व्यक्त करते.

मराठीतील प्रवासवर्णनकारांमधील आणखी एक महत्त्वाचे प्रवासवर्णनकार म्हणून काकासाहेब कालेलकरांचा आवर्जून उल्लेख केला जातो.

'लोकमाता अर्थात भारतवर्षातील नद्यांचे वर्णन' (१९३८), 'हिमालयातील प्रवास' (१९३९), 'आमच्या देशाचे दर्शन' (१९४३), 'भक्तिर कुसुमे' (१९४४), 'लाटांचे तांडव' (१९४५), 'जीवनलीला' (१९५८), 'भारत दर्शन खंड १ ते ४' (१९६१-१९६६), ही त्यांची प्रवासवर्णने आहेत.

त्यांच्या प्रवासवर्णनपर लेखनाचा खास विशेष म्हणजे राष्ट्रवादाच्या प्रेरणेतून हे लेखन झालेले आहे. त्यातून भारत देशाची संस्कृती साकार झालेली दिसून येते.

कालेलकरांचा वरील प्रवासवर्णनांपैकी 'जीवनलीला' हा ग्रंथ त्यांच्या प्रवासलेखनाचे प्रभावीपणे प्रतिनिधित्व करताना दिसतो. तसेच काकासाहेब कालेलकरांच्या व्यक्तिमत्वाचे सखोल दर्शन 'जीवनलीला' तून घडते. एक प्रगल्भ विचारवंत, एक तत्त्वचिंतक, कवी, साधक, भाषामर्मज्ञ हे त्यांच्या व्यक्तिमत्वातील पैलू ह्या प्रवासवर्णनातून साकारलेले आहेत. त्यामुळे 'जीवनलीला' हा ग्रंथ मराठी प्रवासवर्णनाच्या वाटचालीतील महत्त्वाचा टप्पा मानला आहे. श्री. कालेलकरांनी प्रवासवर्णन या वाङ्मयप्रकाराला खास पृथगात्मता मिळवून तर दिली, पण त्याचबरोबर एक प्रगल्भ वाङ्मयप्रकार म्हणून त्याची महत्ता वाढविली.

आपल्या वेगळ्या प्रवासवर्णनांनी वेगळी वाट चोखाळणारे रा. भि. जोशी हे याच कालखंडातील महत्त्वाचे प्रवासवर्णनकार आहेत. त्याच्या 'वाटचाल' (१९५३) आणि 'मजल – दरमजल' (१९६१) या ग्रंथानी प्रवासवर्णन या वाङ्मयप्रकाराला एक खास रुप प्राप्त करून दिले. रा. भि. जोशीच्या तटस्थ संयत व अभिजात वृत्तीचे प्रतिबिंब त्यांच्या लेखनात पडलेले दिसते.

'वाटचाल' मध्ये रा. भि. जोशी यांनी 'प्रवास' हा घटक केंद्रिभूत ठेवून आपल्या संयत शैलीने जे स्थलप्रदेश चित्रण केले आहे. त्यामधून एका तटस्थ कलावंताची भूमिकाच स्पष्ट होते. रा. भि. जोशी उत्तम निवेदक, भाष्यकार, सुक्ष्म निरीक्षक, असून त्यांनी गतिमान व शब्दचित्रात्मक शैलीचा वापर केल्याने हया लेखनास कलात्मता प्राप्त झालेली दिसून येते.

'मजल दरमजल' या प्रवासवर्णनातून रा. भि. जोशी यांनी प्रवासलेखन हा वृतांतात्मक, भाष्ययुक्त, व ललित निबंधाला जवळ जाणारा एक वेगळा वाङ्मयप्रकार आहे याची जाणीव करून दिली. तसेच केलेला प्रवास शब्दात कसा पकडावा, त्या प्रवासाचे हुबेहूब प्रत्ययकारी चित्र कसे काढावे, त्यासाठी गतिशील, भाषाशैलीचा वापर कसा करावा, तसेच एखाद्या अज्ञात खेड्यालासुद्धा त्याचे अस्मितादर्शक गहिरे रूप कसे द्यावे याचा उत्तम नमुना म्हणजे वरील प्रवासवर्णन होय.

रा. भि. जोशीची ही दोन्ही प्रवासवर्णने कलापूर्ण तर आहेत. पण ती वेगळी वाट चोखाळणारी आहेत.

प्रवासवर्णन या वाङ्मयप्रकाराच्या जडणघडणीला हातभार लावणारे महत्त्वाचे लेखक म्हणजे गंगाधर गाडगीळ होय. त्यांची 'गोपुरांच्या प्रदेशात' आणि साता समुद्रा पलीकडे ही दोन गाजलेली प्रवासवर्णने, कलापूर्ण व नवतापूर्ण आहेत.

'गोपुरांच्या प्रदेशात' मध्ये दक्षिण भारतातील निळ्याभोर आकाशावरील देखावे आणि त्यावरील शिल्पे, त्यांची गोपुरे यात गाडगीळ हरवून जातात. एक लेखरुप व प्रदीर्घ लेखरुप प्रवासवर्णन यांचे मिश्रण 'गोपुरांच्या प्रदेशात' या प्रवासवर्णनात झाले आहे. प्रवासविषयक व प्रदेश विषयक उत्कट जाणिवेचा आविष्कार प्रस्तुत प्रवासवर्णनात झालेला दिसून येतो.

गाडगीळांचे 'सातासमुद्रापलीकडे' हे प्रवासवर्णन म्हणजे मराठी वाङ्मयातील प्रवासवर्णनपर कलाकृतीचा एक उत्तम नमुना ठरावा इतक्या उंचीचे हे प्रवासवर्णन आहे. या प्रवासवर्णनातून गंगाधर गाडगीळ एक उत्कट कवी, एक भाष्यकार, एक निवेदक, व एक उत्तम भाषाशैली लाभलेला लेखक म्हणून सामोरे येतात. तसेच अलिप्तपणे आपलेपण न्याहाळून पाहाणारा, वेध घेणारा व जीवनातील छोट्या – मोठ्या विसंगतीवर बोट ठेवून विनोदनिर्मिती साधणारा लेखक म्हणून आपल्या समोर येतात.

प्रस्तुत प्रवासवर्णनातील प्रवास युरोप, अमेरिका आणि आशिया खंडातील जपान या देशांवर आधारित आहे. पण बराचसा भाग अमेरिकेतील चित्रणाने व्यापलेला आहे. 'सातासमुद्रापलिकडे' मधील अनुभव गाडगीळ जितक्या गांभीर्याने वर्णन करतात, तेवढेच ते विनोदी पद्धतीने चितारताना दिसतात.

श्री. पु. ल. देशपांडे यांची 'अपूर्वाई' (१९६०) व 'पूर्वरंग' (१९६३) ही दोन्ही प्रवासवर्णने या प्रवासवर्णनवाङ्मयप्रकाराच्या वाटचालीतील अपूर्व अशी प्रवासवर्णने आहेत. प्रदीर्घ लेखरुप प्रवासवर्णने हे 'अपूर्वाई'चे खास वैशिष्टय आहे.

'अपूर्वाई'तील प्रवास हा प्रामुख्याने मध्यमवर्गीय मराठी माणसाचा प्रतिनिधीत्व प्रवास आहे. युरोपातील इंग्लंड, पॅरिस, जर्मनी, स्कॉटलँड हया देशाचा हा प्रवास आहे. या देशांतील नवलविशेष निरागस मनाने टिपल्यामुळे 'अपूर्वाई'त एक वेगळी भर पडली आहे.

'अपूर्वाई'त पाश्चात्य जीवनाचे वर्णन केल्यानंतर 'पूर्वरंग' मध्ये पु.ल.नी पौर्वात्य जीवनाचे रंग रंगविले आहेत. हे प्रवासवर्णन पूर्वेकडील देशांवर आधारलेले प्रदीर्घ लेखरूप प्रवासवर्णन आहे. पु.ल.देशपांडे याच्या दोन्ही प्रवासवर्णनांकडे पाहिले असता असे लक्षात येते की या प्रवासवर्णनांनी मराठी प्रवासवर्णनात विनोदी प्रवासवर्णनांची एक परंपरा नव्याने सुरू केलेली दिसते.

प्रवासवर्णन या वाङ्मयप्रकारावर आपली स्वतंत्र सौंदर्यवादाची मुद्रा उमटवणारे श्री. प्रभाकर पाध्ये यांचे कार्य लक्षणीय आहे. त्यांचे तोकोनोमा (इ.स. १९६१) हे खूप गाजलेले प्रवासवर्णन आहे. त्याशिवाय 'नवे जग नवी क्षितिजे' (१९५४) 'अगस्तीच्या अंगणात' (इ.स. १९५७) 'उडता गालिचा' (१९५९) 'हिरवी उन्हे' (१९६४) ही त्यांची काही प्रवासवर्णने आहेत. 'तोकोनोमा' मध्ये पाध्ये यांनी जपान वस्तुनिष्ठ व भौगोलिक रीतीने रंगविलेला नसून, जपानमधील प्रवासात त्यांना जाणवलेला जपानच रेखाटलेला आहे. जपानमधील वेगवेगळ्या प्रदेशातून हिंडताना, वेगवेगळ्या स्थळांना भेटी देताना पाध्यांना भेटलेला जपानी माणूस हा उद्यमशील, राजभक्त, हाडाचा रचनाकार, व्यापारवृत्तीचा, रसिक कलाप्रिय, साहित्यप्रेमी, फिरस्ता देवभोळा, भूतवेडा, अतिथ्यशील, त्यागी तसाच व्यसनी, व भोगी असा अनुभवास येतो. जपानी स्त्री तर त्यांना मूर्तिमंत संस्कृती वाटते.

इ.स. १९४० ते इ.स. १९६५ या कालखंडातील प्रमुख नावारुपास आलेल्या काही प्रवासवर्णनांचा व लेखकांचा आपण आढावा घेतला. याच कालखंडात इतरही काही प्रवासवर्णनकरांनी प्रवासवर्णने लिहिली आहेत.

श्रीमती कमला फडके यांची 'त्रिवेंद्रमची सफर' (इ.स. १९४७) व उटकमंडची यात्रा (इ.स. १९६७) ही दोन प्रवासवर्णने आहेत. ही दोन्ही प्रवासवर्णने भाषाशैलीच्या दृष्टीने उत्तम व गतिशील आहेत. 'नर्मदेच्या तटाकी' (इ.स. १९४९) हे श्री. गो. नि. दांडेकरांचे प्रवासवर्णन असून या प्रवासवर्णनात नर्मदेच्या तटावरील भ्रमंती चित्रित केलेली आहे.

श्री वासुदेव बळवंत कर्णिक यांची 'लोकशाहीचे माहेर' (इ.स. १९५६) व 'विषवृत्ताच्या पलीकडे' (इ.स. १९५७) ही दोन्ही प्रवासवर्णने अनुक्रमे डेन्मार्कचे सामाजिक जीवनचित्रण व ऑस्ट्रेलिया व न्यूझीलंडचे चित्रण करणारी आहेत.

'उब आणि गारठा' (इ.स. १९५७) हे श्री. शशिकांत पुनर्वसू यांचे प्रवासवर्णन काव्यात्म व्यक्तिमत्वाने भारलेले व सौंदयासक्त मनाने लिहिलेले आहे. तर 'लोक आणि लौकिक' (इ.स. १९५८) हे श्री. जयवंत दळवींचे प्रवासवर्णन त्यांच्या नर्म विनोदी शैलीतून अमेरिकेन जीवनाचा परिचय करून देते.

श्री. अरविंद गोखले यांचे 'अमेरिकेस जावे पाहून' (इ.स. १९५९) हे प्रवासवर्णन कथाकाराची ओळख करून देते.

'भिंक्षूच्या प्रदेशात' (इ.स. १९६२) व 'लाल नदी निळे डोंगर' (इ.स. १९६४) ही डॉ. वसंत अवसरे लिखित प्रवास वर्णने त्यांच्या काव्यात्म शैलीचा परिचय करून देतात.

'थंडीचे दिवस' (१९६३) व 'नवरंग' (१९६३) ही श्री रमेश मंत्री यांची दोन्ही प्रवासवर्णने त्यांच्या विनोदी शैलीचे दर्शन घडवितात. तसेच प्रा. बाळ गाडगीळ यांच्या 'सिगरेट आणि वसंत ऋतू' (१९६४) या प्रवासवर्णनात अमेरिकन जीवनाचा वेध घेतला आहे. त्याचबरोबर विनोदी शैलीचा वापर केल्याने त्याला लक्षणीयत्व प्राप्त झाले आहे.

या कालखंडातील पंडित महादेव शास्त्री जोशी यांचे 'तीर्थरुप महाराष्ट्र' भाग १ -२, व 'महाराष्ट्राची धारातीर्थ' भाग १ व २ ही प्रवासवर्णन आहेत. त्याचबरोबर काकासाहेब गाडगीळ यांचे 'मुठा ते मेन' हे जर्मन देशाच्या भेटीवरील प्रवासवर्णन, श्रीपाद जोशी यांचे 'दक्षिणेतील यक्षभूमी', 'बाळवंटातील चंद्रकोर', 'तांबडी माती... हिरवे माड','पूर्वाचलाची मुशाफरी' 'भारतभ्रमण' (भाग १ ते ७) अशी प्रवासवर्णने लिहिली आहेत. श्री ज्ञानेश्वर नाडकर्णी यांचे 'विलायती वारी' हे प्रवासवर्णन त्याच्यातील समीक्षक, कथाकाराचे दर्शन घडविते.

वरील कालखंडातील निरनिराळ्या प्रवासवर्णनकारांनी लिहिलेली प्रवासवर्णने उल्लेखनीय प्रवासवर्णने आहेत. तसेच मराठी वाङ्मयातील प्रवासवर्णन या वाङ्मयप्रकाराची यशस्विता स्पष्ट करणारी आहेत.

२) मराठी विनोदी लेखनाची वाटचाल(१८७४ ते १९६०)

प्रास्तविक :

'विनोद' हा विविध वाङ्मयप्रकारांमधून प्रकट होतो., हे खरे असले तरी विनोद हा वाङ्मयप्रकार आहे असे ठामपणे म्हटले जात नाही. त्याचप्रमाणे विनोद हा एक वाङ्मयप्रकार नव्हे असे ठामपणे सांगितले जात नाही. विनोद हा कविता, नाटक यांच्याप्रमाणे स्वत:चे एक आत्मतत्त्व, स्वत:चा परिवेष असणारा वाङ्मयप्रकार नाही. तर कथा, कविता, नाटक, कादंबरी प्रकारातून प्रकट होणारा धर्म आहे. पण या वाङ्मयप्रकारांतून प्रकट होताना त्या त्या वाङ्मयप्रकारांशी, वाङ्मय रूपांशी सुसंगत राहून तो प्रकट होतो.

विनोद हा स्वतंत्र वाङ्मयप्रकार आहे. अशी ठाम भूमिका घेतलेली नसली तरी 'विनोदी वाङ्मय' असे प्रकरण वाङ्मयाच्या इतिहासात समाविष्ट केलेले दिसते. या पाठीमागे विनोद हा वाङ्मयप्रकार नसला तरी विनोदाचे वाङ्मयप्रकारांशी काही एक नाते असल्याची धारणा यामागे असावी.

कोणताही वाङ्मयप्रकार असो, त्या वाङ्मयप्रकारातील कलाकृतीमध्ये आशय आणि अभिव्यक्ती हे दोन घटक तिच्यात असतातच. विनोद ह्या प्रकारात सुखात्म जाणीव निर्माण करणे हे विनोदाच्या आशयाचे अपरिहार्य वैशिष्ट्य आहे, तर भिन्न पातळ्यांवरील आकलनांचा परस्पराधार प्रत्ययाला आणून देणे हे अभिव्यक्तीचे वैशिष्ट्य आहे, हे लक्षात घेऊन विनोदाची व्याख्या केलेली दिसून येते.

"वेगवेगळ्या पातळ्यांवरील दोन विभिन्न आकलनांचा परस्पर आघात प्रत्ययाला आणून हास्यामध्ये अथवा स्मितामध्ये पर्यवसित होणाऱ्या जीवनविषयक सुखात्म जाणिवेची प्रतीती देणारा धर्म म्हणजे विनोद अथवा विनोदात्मता होय. आणि या धर्माने युक्त असणारे लेखन म्हणजे विनोदी वाङ्मय होय."

विनोदामध्ये सुखात्म जाणिवेचा आविष्कार वेगवेगळ्या प्रकारे होऊ शकतो. या आविष्कारभेदामुळे विनोदाची तीन मुलभूत रूपे कल्पिली आहेत. १) उपहासात्मक विनोद. २) केवळ विनोद ३) कोटीरूप विनोद.

विनोदाची ही तीनही रूपे जीवनदर्शनाचे कार्य करतात, तसेच मनोरंजनाचेही कार्य करतात. जीवनदर्शन घडविणे आणि रंजन करणे या दोन प्रेरणा विनोदनिर्मितीच्या मागे असलेल्या दिसतात. उपहासपर विनोद आणि केवल विनोद यांच्या निर्मितीमागे रंजनाची प्रेरणा प्रधान असून जीवनदर्शन मात्र क्षीण असते.

विनोदीलेखन पूर्व परंपरा :-

विनोद हा जीवनाशी संबध्द असल्याने तो प्राचीन मराठी वाङ्मयातूनही प्रकट झालेला दिसतो. महानुभाव पथांच्या वाङ्मयात विनोदाला अल्पसे स्थान लाभलेले दिसते. 'लिळाचारित्र' या मराठीतील आद्यचरित्रग्रंथामध्ये श्री चक्रधर स्वामींच्या विनोदात्म वृत्तीचा आविष्कार झालेला दिसतो. ज्ञानेश्वरांनी आपल्या अनेक ओव्यांमधून माणसाच्या विपरीतपणावर उपहासात्मक टीका केलेली आढळून येते. संत तुकाराम यांच्या काव्यात उत्तम विनोद स्थळे सापडतात. तर एकनाथांच्या भारूडांमध्ये सर्वार्थाने व्यापक अशी उपहासात्मकता भरलेली आढळते. कवी नागेशाने 'सीता स्वयंवर' काव्यामध्ये हास्यजनक घटना रंगवून विनोदनिर्मिती साधलेली आहे. तसेच अमृतराय कवीचें 'शुकचरित', रघुनाथ पंडितांचे 'दमयंती स्वयंवर', मोरोपंताचे 'कच-देवयानी आख्यान' यांमधून विनोदनिर्मिती साधलेली आहे. शाहीर रामजोशी यांचे 'छेकापन्हुती' पठ्ठेबापुराव यांच्या शृंगारिक लावण्या, मानवी स्वभावातील व्यंगाचे वर्णन करणाऱ्या परशुरामाच्या लावण्या यांमधून विनोदातील सूक्ष्म छटाच व्यक्त झालेल्या आहेत.

प्राचीन साहित्यातील धर्मपुरूषांच्या, संतपुरूषांच्या विनोदाला आध्यात्माचे, नैतिकतेचे अधिष्ठान असल्याचे दिसते. तसेच काव्य व शाहिरी मधील विनोदाला एक तात्विक अधिष्ठान लाभलेले दिसते.

विनोदी लेखन आधुनिक परंपरा - स्वातंत्र्यपूर्व लेखन

ब्रिटीश सत्तेच्या आगमनानंतर इंग्लिश साहित्याचा व संस्कृतीचा प्रभाव इथल्या सामाजिक, सांस्कृतिक व वाङ्मयीन जीवनावर पडला. त्यामुळे कथा, कादंबरी, कविता यासारख्या आधुनिक साहित्यप्रकाराची निर्मिती झाली. त्याचप्रमाणे विनोदी साहित्याचे दालन विसाव्या शतकाच्या सुरूवातीस उघडले.

मराठी साहित्यात विष्णूशास्त्री चिपळूणकर यांनी निबंधमालेमधून (१८७४) उपहासपर लेखन सुरू केले. त्यांनी विनोद आणि महदाख्यायिका हया सदरातून चुटके व आख्यायिकांद्वारे विनोदनिर्मिती केली असे असले तरी विनोदी वाङ्मय या नावाने ओळखला जावा असा स्वतंत्र वाङ्मयाचा एक विभाग विसाव्या शतकात आरंभी निर्माण करण्याचे श्रेय मात्र श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांच्याकडेच जाते.

कोल्हटकरांनी १९०२ पासून स्वतंत्र विनोदीलेखनास सुरूवात केली. साक्षीदार (१९२०) हा त्यांचा पहिला विनोदी लेख, त्यानंतर 'सुदाम्याचे पोहे' अर्थात अठरा धान्याचे कडबोळे (१९१०) हया विनोदी लेखसंग्रहाची पहिली आवृत्ती व सुदाम्याचे पोहे अर्थात सिंहासन बत्तीशी (१९२३) ची तिसरी आवृत्ती प्रसिध्द झाली. याशिवाय कुलूप, भीष्म प्रतिज्ञेचा विजय, लग्नसमारंभ, श्रावणी, गणेशचतुर्थी धर्मातंर या लेखनातून हिंदू धर्मात वाढत चाललेल्या अपप्रवृत्ती इतर अवडंबरे यांची

रेवंडी उडवणे, वर्णव्यवस्था व जातिव्यवस्था यांचे विडंबन करणे, सनातन धर्माचारांची रंजकपणे टवाळी उडविणे ही शैली वैशिष्ट्ये दिसून येतात. जीवनदर्शन व मनोरंजन या प्रेरणांमधुन त्यांनी उपहास व कोटी ही दोन्ही विनोदरूपे साधली आहेत. त्याद्वारे सामाजिक जीवनातील व्यंगाचे भेदक, विनोदात्मक चित्रण करून व्यंगविरहित जीवनाची जाणीव वाचकांना देणे ही जीवनाच्या दर्शनाची मुख्य प्रेरणा उपहासगर्भ विनोदाच्या मुळाशी दिसते. चोरांचे संमेलन, साहित्य संमेलनाची तयारी, गवई, वर्तमानपत्रकर्ता या लेखांतून वाङ्मयीन व सांस्कृतिक क्षेत्रातील साचेबंदपणा, व्यंगे याचा उपहास केलेला आहे.

श्रीपाद कृष्ण कोल्हटकर हे समकालीन वास्तवाला आणि जीवनाला मूल्यनिष्ठ दृष्टीने सामोरे जाणारे असल्याने त्यांच्या लेखनाला सकसता प्राप्त झालेली दिसून येते. धार्मिक, सामाजिक तसेच सांस्कृतिक क्षेत्रातील उपहास विषय निवडतना त्यांच्या मनात मूल्यभाव होताच. जीवनातील व्यंगाचा उपहास करून व्यंगरहित जीवन निर्माण करणे हा त्यांच्या लेखनाचा हेतू होता. सुदामा, पांडुतात्या, बंडुनाना ही त्याची दैनंदिन जीवनात पदोपदी दृष्टीस पडणारी काल्पनिक पात्रे निर्माण करून विविध घटना-प्रसंगांमधुन चित्रित केली. विनोदासाठी स्फूट विषय निवडले व भेदक, चुरचुरीत लेखन करून खऱ्या अर्थाने विनोदी लेखनाचा पाया घातला.

कोल्हटकरांच्या नंतरचे महत्त्वाचे विनोदी लेखक म्हणजे नाटककार रात्र गणेश गडकरी होय. त्यांनी विनोदी लेखक म्हणून ही लोकप्रियता मिळविली. मराठी रंगभूमीवरील विसंगतीचे दर्शन घडविण्याच्या निमित्ताने राम गणेश गडकऱ्यांनी प्रथम लेख लिहिले 'बाळकराम' या टोपणनावाने त्यांनी मासिक 'मनोरंजन' मध्ये उपहासात्मक लेखन केले. त्यांचे सुरूवातीचे लेखन 'रिकामपणाची कामगिरी' (१९२१) या पुस्तकात समाविष्ट करण्यात आले. पुढे त्यांचे सर्व विनोदी लेखन 'संपूर्ण बाळकराम' या पुस्तकांत संग्रहीत करण्यात आले. सूक्ष्म, तरल निरीक्षण शक्ती, उत्तम कल्पनाशक्ती आणि भाषाप्रभुत्वामुळे गडकऱ्यांच्या नाटकातील आणि स्फुट लेखनातील विनोद लोकप्रिय ठरला.

लग्नाच्या मोहिमेची पूर्व तयाती, नाटक कसे पाहावे, छोट्या जगूचा रिपोर्ट, स्वयंपाक घरातील गोष्टी या गोष्टींतून गडकरी यांनी माणसांच्या व्यावहारिक व्यंगावर प्रहार केले आहेत. त्यांचा उपहास केला आहे. वर संशोधन, लग्न मोडण्याची कारणे यामधून विवाह संस्थेला प्राप्त झालेल्या बाजारुपणाचा उपहास केलेला आहे.

तिंबूनाना हे गडकऱ्यांचे महत्वाचे पात्र, लोकांची चांगली करमणूक करते. तंबाखूचे व्यसन असलेला 'आबा भटजी' चतुरस्त्र ज्ञानाची फुशारकी मारणारा बारक्या, अनेक शारीरिक व्यंगे असणारी 'ठकी' भित्र्या स्वभावाचे भांबुराव हया पात्रनिर्मितीमधून गडकऱ्यांनी माणसाचे विविध स्वभावच साकारले आहेत.

'हिंदुपेच' नियतकालिकातील ब्राम्हण-ब्राम्हणेतरवाद, शुक्लकृष्णभेद, स्त्रियांची व्रते लेखन, तसेच समाजातील भंपकपणाचे, खोटारडेपणाचे वर्णन करणारे काळ नियतकालिकातील शिवरामपंत परांजपे यांचे वक्रोक्तीपूर्ण लेखन महत्वाचे आहे. तसेच पुराणकथांची शैली घेऊन बळवंत कोल्हटकरांनी 'संदेश' नियतकालिकांत केलेले विनोदीलेखन हे अभिरूची वाढविणारे आहे. याच काळात आणखी काही विनोदीलेखन झालेले दिसते.

१९०८ साली कोल्हटकरांच्या 'गुप्तमंजूष' नाटकावर उपरोधिक टीका करणारे स.ना.ठोसर यांनी लेखन करुन तसेच ग.स.मराठे यांनी 'थालिपीठ' हा विनोदी लेखसंग्रह लिहून मराठी विनोदात भर घातली. ना.के.बेहरे यांचे 'बोथटव्रण', मो.वा.जोशी यांचे 'बगू नानाचे आत्मचरित्र', का.ना.पटवर्धन यांचे 'नाटक्याचे तारे' यांनी ही विनोदी लेखन परंपरेत भर टाकली.

न.चि.केळकर यांनी मराठी विनोदाला एक उच्च दर्जा प्राप्त करून दिला. 'माझी जीवनयात्रा' या आत्मचरित्रात प्राध्यापकांची शिकविण्याची पध्दती व संपत्ती, तसेच कोकणातील माणसांचे स्वभाव याविषयी खुसखुशीतपणे लिहिले. केळकरांच्या विनोदी लेखनात गुदगुल्या, चिमटे, कोपरखळया दिसून येतात. कै.गो.ग.लिमये यांनी मॅन्युफॅक्चरिंग कंपनी, वाङ्मय हेरमंडळ, स्पेशॅलिझम, वशिलीझम - अशी चटकदार नावे देऊन, आणि व्यंगपूर्ण व्यक्तिरेखा रंगवून विकृत मनोवृत्तीवर प्रकाश टाकला. त्यांच्या सगळ्या विनोदी लेखनात उपहास, परिहास आणि विडंबन याचा प्रत्यय येतो.

ना.धो.ताम्हणकर यांनी तऱ्हेवाईकपणे वागणाऱ्या माणसांचा अभ्यास करून व स्वैरकल्पना शक्तीचा वापर करून विनोदनिर्मिती साधलेली आहे. त्याकरिता दाजी, गोटया, चिंगी अशी पात्रनिर्मिती केलेली आहे. मुलांसाठी लिहिणे ही तशी कठीण गोष्ट असली तरी ताम्हनकरांना मुलांचे मानसशास्त्र चांगले माहीत असल्याने त्यांचे लेखन खुमासदार झालेले आहे. त्यांचे 'निवाडे' हे पुस्तक पापपुण्य, धर्माचरण, सत्यासत्य, नीतीच्या कल्पना, विद्येबाबतची जाण, माणसांमधील भ्रामकता यावर प्रकाश टाकणारे आहे.

यानंतरचे महत्त्वाचे विनोदी लेखक म्हणजे चिं.वि.जोशी. विशुध्द विनोद हे विनोदाचे रूप मराठी वाङ्मयात त्यांनी प्रथमतः साकार केले. 'चिमूताईचे लग्न' मध्ये अनेक गंमतीजमतीची रेलचेल दिसते, तर 'यु कीडणे' 'आय.सी.एस्.' या कथेत त्यांनी माणसांतील भंपकपणांचे दर्शन घडविले आहे. 'वरसंशोधन' कथेत माणसांमधील अहमंन्यतेमुळे होणारे घोटाळे चित्रित केले आहेत.समाजात नव्या टूम निघतात त्यावर भाष्य करणाऱ्या कथा चिं.वि.नी लिहिल्या आहेत. तर 'आणखी चिमणराव' या पुस्तकांत रोग निदानकाराप्रमाणे मानवी स्वभावांचे दर्शन घडवले आहे. माणूस आणि त्याच्या स्वभावातील गुणदोषांचे रंग त्यांच्या लेखनातून प्रकार झालेले

दिसतात. त्यांच्या लेखनात स्पष्टवक्तेपणा दिसतो. रावसाहेब चिमणराव, स्टेट गेस्ट कॅप्टन, चिमणराव स्काऊट मास्तर यु किडणे असली आकर्षक शीर्षके देऊन चिं.वि.नी अंगभूत विनोदबुद्धीचे दर्शन घडविले आहे.

चिं.वि.च्या विनोदाने उपहास, उपरोध, वक्रोक्ती व अतिशयोक्ती याद्वारे प्रबोधन केलेले आहे. लंकावैभव (१९४७) या पुस्तकात वृत्तपत्र क्षेत्रातील गंमतीजंमतीची खिल्ली उडविलेली आहे. उपरोध साधलेला आहे. 'एरंडाचे गुऱ्हाळ' (१९३२), 'वायफळाचा मळा' (१९३६) या पुस्तकांतील लेखनामधून शब्दनिष्ठ व उपहासरूप विनोदनिर्मिती केलेली आहे. त्यातून माणसाबद्दलचा सहृदय दृष्टिकोनच प्रकट झालेलेला आढळतो.

'चिमणरावांचे चऱ्हाट' (१९३३) पासून 'चौथे चिमणराव' (१९५८) पर्यंत चिमणराव व त्यांच्या इतर गोतावळ्यातून महाराष्ट्रातील मध्यमवर्गीयांचे, त्यांच्या तीन पिढयांचे विपुल चित्रण येते. 'टीकाकार' आणि 'न्हावी', म्युशियन वाङ्मयाचा परिचय, माझा मुंबईचा प्रवास या लेखनातून मानवी स्वभावातील अनेक दोषांचे त्यांनी विडंबन केलेले आहे. 'गुंडयाभाऊ' हे चिं.वि.चे महत्त्वाचे पात्र असले तरी भीमा आजी, हणमंतराव, हवालदार, या व्यक्तिरेखाही लक्षणीय ठरल्या आहेत.

विनोदनिर्मिती करणाऱ्या तांत्रिक वैशिष्टयांचा उपयोग करून वास्तव जीवनाचे चित्रण करणारे विशुध्द विनोदीलेखन. करणे हे त्याच्या विनोदीलेखनाचे खास वैशिष्टय आहे. चिं.वि.नी विनोदीलेखनात भाषेचे कृत्रिम वळण मोडून घरगुती पध्दतीची, पात्रांची बौध्दिक क्षमता लक्षात घेऊन भाषा वापरलेली आहे.

आचार्य अत्रे हे चतुरस्त्र विनोदी लेखक म्हणून ते सर्वज्ञात आहेत. अत्रे समाजातल्या अपप्रवृत्तींवर घणाघाती हल्ला चढवून प्रतिपक्षाला घायाळ करून सोडणारे प्रचंड ताकदीचे लेखक होते. त्यांच्या लेखनात वर वर वात्रटपणा असल्यासारखे वाटले तरी तो खरा उपहासच असतो. माणसातला मूर्खपणा, व त्याचे इतरांशी व्यवहार करतांना होणारे घोटाळे यांचे मार्मिक चित्रण अत्रे यांनी लेखनातून केले आहे. त्यांनी विनोदाचा आविष्कार हा स्फुट लेखनापेक्षा नाटक, चित्रपट यांमधून अधिक केलेला आहे. पण विनोदी लेखनाचा प्रभावशाली आविष्कार त्यांच्या 'झेंडूची फुले' (१९२५) या विडंबनपर कवितांमधून झाला. 'साखरपुडा' (१९४२), 'ब्रॅण्डीची बाटली' (१९४४), तसेच 'वामकुशी', 'बत्ताशी', 'मूर्खांचा बाजार' या लेखनात त्यांनी व्यापक जीवनदृष्टीचे दर्शन घडविले आहे. जांबुवंत दंतमंजन, बाजारात तुरी, माधुरी, फोटोग्राफर, सोन्याचा कळस, मला नको जा, बायको, पिलभट स्वर्गाला जातो या कथातील विनोद अतिशयोक्ती, कल्पना चमत्कृती व उपहास यावरच आधारलेला आहे. या लेखनातून अत्र्यांची सूक्ष्म समाज निरीक्षण शक्ती व्यक्त होते.

अनुभवांचे व्यंगपूर्ण आकार शोधून त्यावर मर्मग्राही लिहिणे हे अत्र्यांचे खास वैशिष्ट्य आहे. चमत्कृतिप्रधानता, वेधक कोटीबाजपणा ही सुध्दा त्यांच्या लेखनाची वैशिष्ट्ये आहेत. त्याच्या विनोदाचा मुक्त आविष्कार 'साष्टांग नमस्कार' (१९३३), 'भ्रमाचा भोपळा' (१९३५) या नाटकातून व 'ब्रम्हचारी', 'पायाची दासी' या चित्रपटांतून झालेला दिसतो.

अत्र्यांनी हिंदू समाजातील मुंज, सोडमुंज, लग्नाची वरात व इतर अन्य रूढीची रेवडी उडविणारे असे विनोदी लेखन केले. 'झेंडूची फुले' या विडंबन काव्याखेरीज 'कषाय पेय पात्र' पतित मक्षिके प्रत, मोहरममधील मर्दुमकी, सखे बोलबाल अशी विडंबन काव्ये रचून त्यांनी विनोदबुद्धीचे दर्शन घडविले आहे. एकूणच अत्रे यांनी विडंबन, नाटक, चित्रपट, आणि व्याख्याने यांव्दारा महाराष्ट्रात विनोद लोकप्रिय करण्याचे कार्य केले.

स्वातंत्र्योत्तर विनोदी लेखन :-

स्वातंत्र्योत्तर काळातील विनोदी लेखनाचा विचार करताना एक गोष्ट नमूद केली पाहिजे की, ती, या कालखंडात नवनवीन वाङ्मयरूपांतून विनोद आविष्कृत झालेला आहे. जीवनदर्शन या प्रेरणेतून, मूल्यनिष्ठेतून काही चांगल्या दर्जाचा विनोद निर्माण झालेला आहे. स्वातंत्र्योत्तर काळातील महत्वाचे आणि लोकप्रिय विनोदी लेखक म्हणजे पु.ल.देशपांडे. याच कालखंडातही विनोदी लेखन करणारे आणखी काही लेखक आहेत. शामराव ओक यांनी 'गलोल', 'बाभळवनात', 'मालगाडी', 'धोक्याचे फळे', 'कोपरखळ्या', 'परिहास' या कथासंग्रहातील विनोदीकथा व्यापक विश्वाचे दर्शन घडवितात. त्यांच्या विनोदीकथांमध्ये स्त्रीपुरूष प्रेमसंबंधातील हास्यकारक प्रसंग अनेकदा आलेले आहेत. व्यसनीपणाचा उपहास करणाऱ्या कथा मा.दी.पटवर्धन यांनी लिहिल्या. कल्पकता, मार्मिकपणा हा पटवर्धनाच्या लेखनाचा केंद्रबिंदू आहे. दत्तू बांदेकरांच्या 'सख्याहरी' ने वर्तमानपत्राच्या सृष्टीत खळबळ माजवली. 'चिरीमिरी' हे त्यांचे गाजलेले पुस्तक आहे.

य.गो.जोशी यांच्या कथांमध्ये सुधारणावादी कार्यकर्त्यांची टवाली केलेली आहे. राजकीय सोंगढोंगाची खिल्ली उडविणाऱ्या 'देशभक्ती, आणि मग्नेशिया,' मेव्हणा आणि लिमिटेड कंपनी या कथा मनोरंजकच आहेत. चित्रपटक्षेत्रातील गंमतीजमतीवर अधारलेल्या राधाकृष्ण गोपाळकृष्ण चलचल रे नवजवान या कथामधून मिष्किलतेचा अनुभव येतो.

पु.ल.देशपांडे यांचे विनोदी साहित्यातील स्थान श्रेष्ठ दर्जाचे आहे. कोटीप्रधान, शब्दनिष्ठ, अनेक श्लेषार्थ हा त्याच्या लेखनाचा गाभा आहे. पु.ल.नी सुरूवातीस माझे आत्मचरित्र (आगामी), (कच्चा खर्डा) लोकमाता असे विडंबनपर

लेखन केलेले आहे. या लेखनाच्या जोडीने 'खोगीरभरती' (१९४९), 'नसती उठाठेव' (१९५२) या लेखसंग्रहातून स्फुट स्वरूपाचे, विनोदी लेखन केलेले आहे. चितळे मास्तर, अंतूबर्वा, नाथा कामत, नारायण यांसारख्या व्यक्तिचित्राद्वारे (व्यक्ती आणि वल्ली,-१९६२) पु.ल.नी व्यक्तिरेखा सुध्दा विनोदी करता येतात हे दाखवून दिले. त्यांच्या नारायण, अंतुबर्वा या व्यक्तिरेखा माणुसकीचा प्रत्यय देणाऱ्या आहेत. 'बटाटयाची चाळ' (१९५८) हे त्याचे गाजलेले विनोदी लेखन आहे. त्यात चाळीमधील कनिष्ठ मध्यमवर्गीयांच्या सामूहिक जीवनाचे विनादाच्या अंगाने चित्र रेखाटले आहे.

पु.ल.अपूर्वाई (१९६०), पूर्वरंग (१९६५) ह्या महत्त्वाच्या विनोदात्म प्रवासवर्णानांनी विनोदी वाङ्मयामध्ये भर घातलेली आहे. तसेच 'तुज आहे तुजपाशी' (१९५७) या नाट्यकृतीमध्ये पु.ल.च्या विनोदनिर्मितीचा आविष्कार दिसून येतो. त्यांच्या लेखनात कोटीक्रमांची रेलचेल दिसून येते.

आणखी एक लोकप्रिय विनोदी लेखक द.मा.मिरासदार होत. 'विरंगुळा' (१९६१), 'बापाची पेंड' (१९६१) हे सुरूवातीच्या काळातील विनोदी लेखन आहे. विनोदात्मक निवेदनशैली, आणि अनपेक्षित स्वरूपाचा धक्कादायक शेवट हे त्यांच्या लेखनाचे विशेष सांगता येतील. ग्रामीण जीवन ही त्यांच्या विनोदीलेखनाची सामग्री आहे. त्यातून त्यांनी एक वेगळे विश्व उभे केले आहे. हे विश्व खटयाळ, मिष्किल, अशिक्षित पण हुशार, बेरकी आहे. तसेच गरिबीने गांजलेले, अडाणी माणसांनी गजबजलेले आहे. त्या लहानशा ग्रामीण जगात ही सारी माणसे समरसून राहत आहेत. त्या जीवनात रंगून जात आहेत. त्यांच्या लहान-मोठ्या महत्त्वाकांक्षा आहेत. लांडया-लबाड्या, कुलंगड्या आहेत. लहान मोठे डाव आहेत, पण ही एका मातीतली माणसे आहेत.एका परिसरातील असल्याने प्रेमाने एकत्र बांधलेली आहेत. मिरासदारांनी जीवन कलहात दंग असलेल्या, अडाणी, भोळसट बऱ्याचशा मिष्किल पण सदैव आनंदी असलेल्या माणसांचे एक वेगळेच जग निर्माण केले.

मिरासदारांनी 'कोटी' या विनोदरूपाला कथेचे रूप देणे हे महत्त्वाचे कार्य केले आहे. माझ्या बापाची पेंड, व्यंकूची शिकवणी यांसारख्या उपहासरूप व कोटीरूप कथा आहेत.

गंगाधर गाडगीळ यांनी विनोदच्या क्षेत्रात केलेली कामगिरी खूप मौलिक स्वरूपाची आहे. त्यांनी मराठी विनोद समृध्द करून मराठी वाचकांची अभिरूची घडविली. त्याकरिता त्यांनी 'विक्षिप्त' स्वरूपाचा आणि 'कोटी'च्या स्वरूपाचा विनोद निर्माण केला. बंडू आणि स्नेहलता या जोडगोळीच्या अनेक कथा गाडगीळांनी लिहिल्या. (खरं सांगायचे १९५४, बंडू-१९७५) या कथांमध्ये बंडू आणि स्नेहलता या पात्रांना वेगवेगळ्या प्रसंगात गोवलेले आहे. त्या दोघांच्या स्वभाव वैशिष्टयांमुळे त्यांना नवरा-बायको या वर्गाचे प्रतिनिधी केले आहे. पण बंडूला मात्र स्वतंत्र

व्यक्तिमत्व दिलेले आहे. थोडा बावळट, खूप धांदरट पण सदैव विनोदी असा बंडू उभा केलेला आहे. अनपेक्षित प्रतिक्रिया व्यक्त करणारा व विनोदनिर्मितीचे कारण ठरणारा 'बंडू' हे व्यक्तिचित्र लक्षणीय ठरते.

गाडगीळांनी घेतलेल्या अनेकांच्या फिरक्या (१९७६) हे मुक्तशैलीतील विनोदीलेखन आहे. काही फिरक्या ह्या कथारूप, प्रसंगचित्रण करणाऱ्या आहेत. ह्या 'फिरक्यांनी आत्मपर, खुमासदार, आल्हाददायक विनोदाचे निर्माण केलेले दालन मराठी विनोदी साहित्यात भर घालणारे आहे.

जयवंत दळवी यांनी लक्षवेधक असे विनोदीलेखन केलेले आहे. 'सारे प्रवासी घडीचे' (१९६४) या पुस्तकातील व्यक्तिचित्रणात्मक लेखनातून कोकणातील नमुनेदार व्यक्तिरेखा चित्रित करून विनोद निर्मितीबरोबर ग्रामीण वास्तव उभे केले आहे. तसेच ललित या मासिकातून 'ठणठणपाळ' या टोपणनावाने दळवीनी साहित्य विश्वातील गंमती जमती बद्दल लेखन केले आहे. हे लेखन त्यांच्या खेळकर व निर्मळ वृत्तीतून निर्माण झालेले आहे.

१९५० नंतर शंकर पाटील यांनी ग्रामीण जीवन-संस्कृती वर लिहिलेल्या कथा ह्या विनोदात्म स्वरूपाच्या आहेत. वळीव (१९५८), टिपिशन, आफत या कथा कलात्मक पातळी गाठतात. याशिवाय 'धिंड' सारख्या कथा लिहून त्यांनी निखळ विनोदनिर्मिती साधलेली आहे. त्याकरिता ग्रामीण वास्तवाचा यथायोग्य आधार शंकर पाटील यांनी घेतलेला आहे.

या कालखंडात वामन होवाळ हे एकमेव दलित लेखक विनोदी लेखन करताना दिसतात. त्यांनी 'बेनवाड' (१९७३) ह्या कथासंग्रहात ग्रामीण जीवन, तिथली तऱ्हेवाईक, इरसाल माणसे ह्यांचे विनोदी पद्धतीने चित्रण केले आहे. वामन होवाळांनी 'येळकोट' वाडा 'आडवारा', 'वारसदार' या कथासंग्रहातून विनोदी कथा लिहिलेल्या आहेत. माणसाचा लोभीपणा, लबाडपणा, दुटप्पीवृत्ती अशा स्वभावविशेषांचा वास्तव पातळीवरून पण विनोदाच्या तंत्राचा अवलंब करून दर्शन घडविले आहे.

सारांश :

प्रस्तुत कालखंडात अनेक लेखकांनी विनोदीलेखन केलेले आहे. मराठी विनोदाचा विकास केला. तसेच विपूल विनोदी साहित्यकृती निर्माण करून विनोदी वाङ्मयाला समृद्धता प्राप्त करून दिली. काही लेखकांनी विनोदाची रुपे नव्याने साकारली. त्याद्वारे व्यक्तिचित्रे पूर्णपणे विनोदात्म करता येतात. तसेच प्रवासवर्णन व आत्मचरित्रलेखनही विनोदपूर्ण करता येते. कोटीरूप विनोदाचा आविष्कार कलात्मक कथारुपात घडविणे शक्य असते. राजकीय विषयावरील लेखनाला

निखळ विनोदात्म व साहित्यिक विषयांना आल्हाददायक रोचक बनविता येते. अशा प्रकारची विनोदाची नवी आविष्कार रूपे निर्माण करून मराठी लेखकांनी विनोदी लेखनाला वाङ्मयीन गुणवत्ता व कलात्मकता प्राप्त करुन दिलेली आहे.

स्वअध्ययन :

१) इ.स. १८७४ ते १९२० मधील प्रवासवर्णनपर लेखनाचा थोडक्यात आढावा घ्या.

२) इ.स. १९२० ते १९६० मधील प्रवासवर्णनांवर सविस्तर लिहा.

३) मराठी विनोदी लेखनाची पूर्वपरंपरा उदाहरणांसह स्पष्ट करा.

४) स्वातंत्र्यपूर्व मराठी विनोदी लेखनाचे स्वरुप विशद करा.

५) स्वातंत्र्योत्तर कालखंडातील विनोदी लेखनाची नवी आविष्कार रुपे.

संदर्भ :

१) कुलकर्णी भीमराव - प्रदक्षिणा खंड - १, सहावी आवृत्ती कॉन्टिनेन्टल प्रकाशन - १९७६.

२) पवार गो. मा. - विनोद तत्त्व आणि स्वरूप पहिली आवृत्ती, मौज प्रकाशन, २१ डिसेंबर, २००६.

❖❖❖❖

१२

नियतकालिके (१८७४ते १९६०)

डॉ. सुहासिनी कीर्तीकर

उद्दिष्टे :

- नियतकालिकांचे वाङ्मयीन महत्त्व समजावून घेणे.
- नियतकालिकांचे ऐतिहासिक कार्य समजावून घेणे.
- नियतकालिकांचा सामाजिक, राजकीय चळवळीतील योगदानाची नोंद करणे.

प्रास्ताविक :

नियतकालिक म्हणजे ठराविक काळाच्या अंतराने उपलब्ध केले जाणारे मुद्रित (वा हस्तलिखित स्वरुपातील) वाङ्मय म्हणजे केवळ साहित्यिक मूल्य ज्याला आहे असे लिखित रुप नव्हे; तर तात्कालिक महत्त्वाचे कालसापेक्षता असणारे बातमीवजा किंवा शेरेवजा तपशीलही त्यात अंतर्भूत करावे लागतात. पण त्याचबरोबर काही चिरस्थायी महत्त्व असलेले लेखन किंवा निर्मितीमूल्य असलेला मजकूरही त्यात प्रसिद्ध होत असतो. अशा मजकुरात काळाचा इतिहास जिवंत होऊन त्यात पडलेल्या लौकिक घटना आपल्याला पहाता येतात. त्या घटनांवरील किंवा तात्कालिक विचारांवरील भाष्य वाचावयास मिळते. वाचकांच्या त्या त्या काळाचे पडसाद दाखवणाऱ्या प्रतिक्रिया येतात. व्यवहारोपयोगी शास्त्रे किंवा विद्या यांची माहिती, व्यक्ती व तिचे कार्य, सामाजिक - सांस्कृतिक घडामोडीचा आढावा, अर्थविचार, स्फुट असा जीवनविचार, राजकीय धोरणावर प्रकाश असे नाना प्रकारचे साहित्य नियतकालिकातून प्रसिद्ध होत असते. रा. श्री. जोग म्हणतात. त्याप्रमाणे 'एकच मजकूर' इष्ट त्या संख्येने, ठराविक वेळी वाचकांना सादर करता येणे हे नियतकालिकांचे मुख्य काम असते. अशा नियतकालिकांचा अभ्यास करणे म्हणजे विशिष्ट वाचकवर्गाचा अभ्यास करणे ठरते. म्हणूनच वाङ्मयेतिहासात. सांस्कृतिक जीवनाच्या अभ्यासात नियतकालिकांचा अभ्यास अत्यंत आवश्यक ठरतो. राजकीय इतिहासाच्या अभ्यासाला अस्सल पत्रांचा आणि जंत्र्यांचा असा पूरक उपयोग होतो तसाच नियतकालिकांचा उपयोग वाङ्मेयेतिहासात एखाद्या व्यक्तीच्या चरित्रात्मक अभ्यासाला, होतो. नियतकालिके यादृष्टीने एक निश्चित विश्वसनीय प्रमाण असते. म्हणूनच वाङ्मयाच्या अभ्यासात नियतकालिकांचा अभ्यास अत्यंत आवश्यक ठरतो.

१८७४ ते १९२० या कालखंडाचा विशेष म्हणजे इंग्रजांच्या सत्तेमुळे वाङ्मयीन, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रात झालेल्या नवीन सुधारणा झाल्या. ह्या सुधारणांपैकी एक महत्त्वाची सुधारणा म्हणजे मुद्रणकला ही होय. या मुद्रणकलेबरोबर युरोपियनांनी वृत्तपत्रांची सुरुवातही भारतात केली. त्याआधी पंधराव्या शतकाच्या अखेरीस युरोपातील व्यापाऱ्यांनी पूर्वेकडील देशांशी व्यापार सुरु केला होता. या व्यापाऱ्यांबरोबर धर्मप्रसारक, डॉक्टर, वकील वगैरे लोक असत. त्यांनी व्यापारविषयक बातम्या देणारी छापील बातमीपत्रे सुरु केली होती. 'यातच हिंदी नियतकालिकांचे बीज पेरले गेले' वर्तमानपत्राची कला भारतात आणण्याचा दुसरा प्रयत्न व्यापारांखालोखाल मिशनरी लोकांनी केला. १७९३ मध्ये डॉ. कॅरे हिंदुस्थानात आला आणि त्याने येथील धर्म, भाषा, राहणी यांचे सम्यक् ज्ञान मिळवून धर्मप्रचारासाठी पुस्तके छापण्यास सुरुवात केली. भारतीय नियतकालिकांचे बीज म्हणून ही घटनाही पार्श्वभूमीदाखल महत्त्वाची मानावी लागते. नंतर हळूहळू इंग्रजी भाषेत आधीच रुढ असलेली नियतकालिकांची प्रथा ओळखीची झाली. वृत्तपत्रे प्रसिद्ध होऊ लागली. पुस्तके मुद्रित स्वरुपात मिळू लागली. ज्ञानाची ओढ वाढली. इंग्रज सरकारने सन १८०० सालच्या सप्टेंबर महिन्याच्या सोळा तारखेला, मराठी टाइप पाडण्याबद्दल 'ग्रे आणि कंपनी'शी करार केला. ह्या कराराची अंमलबजावणी करताना, टाइप तयार करताना हिंदी कारागिरांची मदत घेतली. श्रीरामपूरच्या प्रेससाठी निरनिराळ्या भाषेचे सुमारे वीस हजार टाइप पाडलेले होते. या सगळ्या घडामोडींमुळे भारतातील बंगाल, गुजरात इत्यादी विविध प्रान्तात नियतकालिके, पाक्षिके, साप्ताहिके, वृत्तपत्रे निघाली. 'जेम्स ऑगस्टस् हिकी' नावाच्या इंग्रजाने "बेंगॉल गेझेट" नावाचे १७८० मध्ये भारतातील पहिले वृत्तपत्र काढले. भारतातील पहिले मासिक सुरु करण्याचा मान 'श्रीरामपूर मिशन'कडेच जातो. १८१८ मध्ये या मिशनने 'समाचार दर्पण' हे साप्ताहिक सुरु केले. 'दिग्दर्शन' मासिकही काढले. हे साप्ताहिक व मासिक दोन्ही बंगाली भाषेतच होते. १८२१ मध्ये राजा राममोहन रॉय यांच्या प्रेरणेने लोकांच्या प्रगतीला वाहिलेले 'संवाद कौमुदी' हे पत्र सुरु झाले. यानंतर बंगालमध्ये 'समाचारचंद्रिका', 'वंगदूत', 'संवादसुधारक', 'सुधा राजेन्द्र', 'रत्नावलि', 'संवाद प्रभाकर' इत्यादी वृत्तपत्रे 'संवाद कौमुदी' च्या थाटाने, अनुकरण करुन निघू लागली.

कोणतीही चळवळ वा सुधारणा बंगालमध्ये व्हावी आणि महाराष्ट्रात तिचे अनुकरणात्मक पडसाद उमटावेत असेच इंग्रज राजवटीतील इतिहासात घडत गेले आहे. राजकीय हक्कांची मागणी करणारी पहिली राजकीय संस्था कलकत्त्याला निघाली. तिचे अनुकरण करुन मुंबईत 'बॉम्बे असोसिएशन' निघाले. बंगालच्या ब्राम्होसमाज्याच्या धर्तीवर मुंबईत प्रार्थना समाज निघाला. राजा राममोहन रॉय यांनी पुरस्कारलेल्या विधवाविवाह, स्त्रीशिक्षणादी चळवळी मुंबई पुण्यात सुरु केल्या. तद्वतच बंगालमध्ये निघणाऱ्या वृत्तपत्र, पाक्षिक, मासिकाच्या धर्तीवर मुंबईत नियतकालिके निघू लागली.

‘दर्पण’ :

‘समाचार दर्पण’ या नावाशी साम्य असणारे ‘दर्पण’ नावाचे मराठी वृत्तपत्र १८३२ साली निघाले. हेच मराठीतील पहिले वृत्तपत्र. बाळशास्त्री जांभेकर यांनी ते काढले. ‘दर्पण’ निघण्यापूर्वी दहा वर्षे म्हणजे १८२२ साली ‘मुंबई समाचार’ हे गुजराती भाषेतील पहिले वृत्तपत्रही मुंबईतच निघाले होते व ते फर्टुनजी माझ्झबान नावाच्या पारशी गृहस्थांनी काढले होते. त्यानंतर ‘मुंबई वर्तमान’ नावाचे गुजरातीच वर्तमानपत्र निघाले होते. पहिले ॲक्टींग जज्ज जनार्दन वासुदेव आगासकर यांनी ‘मुंबई समाचार’ चे काही वर्षांनी संपादन केले. त्यांचे बंधु ट्रान्सलेटर विनायक वासुदेवजी हेही त्यात कार्यरत होते. या दोन मराठी माणसांनी ‘मुंबई समाचार’ जसा चालविला तसेच बाळशास्त्री जांभेकरांच्या ‘दर्पण’ ला साहाय्य केले. त्यांची आर्थिक बाजू सांभाळली. इंग्रज सररकाने ‘मुंबई समाचार’ प्रमाणे ‘दर्पण’ च्याही पन्नास प्रती घेऊन मदत करावी या अर्थाचे पत्र सरकार दरबारी लिहिले. सरकारने दर अंकाची एक प्रत घेतली. ‘दर्पण’ चा इंग्रज लोकातही प्रचार व्हावा म्हणून आणि देशी लोकांना इंग्रजी भाषेचा सराव व्हावा म्हणून ‘दर्पण’ मधील अर्धा मजकूर इंग्रजीत असे. म्हणजे मजकूर मिश्र भाषेत असे. नावही ‘दर्पण’ व ‘The Bombay Durpan’ असे होते. म्हणून एतद्देशीयांनी पश्चिम भारतात सुरु केलेले ‘दर्पण’ हे पहिले इंग्रजी पत्र होते, असे म्हणण्यास वाव आहे. इंग्रजी मजकूर बाळशास्त्री गंगाधर जांभेकर लिहित आणि जनार्दन वासुदेवजी त्याचे मराठी भाषांतर करीत. ‘दर्पण’ पत्राचे सुरुवातीचे अंक ‘काळबादेवी स्ट्रीट’ वर मेसेंजर प्रेसमध्ये छापले गेले. नंतर कूरियर लेनमध्ये छापले गेले. पुढे ‘दर्पण’ ने स्वत:चा छापखाना काढला. छापखाना स्वत:चा असण्याचा मराठी वर्तमानपत्राचा पहिलेपणाचा मानही ‘दर्पण’ चाच म्हणावा लागतो. प्रथम ‘दर्पण’ पाक्षिक होते, पुढे लवकरच त्याचे साप्ताहिकात रुपांतर झाले. ते अखंडपणे आठ, साडेआठ वर्षे चालले. १८४० च्या जूनमध्ये काही अडचणींमुळे ते बंद पडले. ‘लैबेल केस होऊन ते नष्ट झाले’ असे के. सी. भवाळकरांनी आत्मचरित्रात नमूद केले आहे.

‘स्वदेशीय लोकांमध्ये विलायतेतील विद्यांचा अभ्यास अधिक व्हावा आणि या देशाची समृद्धी व येथील लोकांचे कल्याण यांविषयी स्वतंत्रेने व उघड रीतीने विचार करावयास स्थल व्हावे’ असा ‘दर्पण’ काढण्यामागचा स्पष्ट हेतू पहिल्या अंकात दिला आहे. मनोरंजन करणे, चालते काळची वर्तमान कळविणे, आणि योग्यतेस येण्याचे मार्ग दाखवणे हे ‘दर्पण’ वाल्यांचे संपादकीय धोरणच होते. आठ, साडेआठ वर्षातील काळात ‘दर्पण’ ने हे धोरण जाणीवपूर्वक पाळलेले दिसते. ‘दर्पण’ च्या लेखांची सूची पाहिली तरी त्यात स्त्रीशिक्षणाला महत्त्व दिलेले आढळते. पुनर्विवाह, जातिभेद, हिंदू व ख्रिश्चन धर्म इत्यादी त्याकाळच्या सामाजिक विषयांचा, समस्यांचा विचार ‘दर्पण’ ने केला आहे. ‘नाकशाळेस प्रोत्साहन’ सारखा विषयही त्यात आढळतो. ‘गुडगुडी ओढणे’ इत्यादीसारखे विषय त्यात येऊन गेले. मुख्य म्हणजे इंग्रज सरकारवर

टीकालेख लिहिले, भाष्य केले. ग्रंथपरीक्षणे केली. मृत्यूलेख लिहिले. विशेष म्हणजे 'जनमनाचा कानोसा' सारखे वाचकपत्रांना जागा देणारे सदर त्या काळात चालवले. म्हणूनच आपल्या अल्प कारकीर्दीत 'दर्पण' ला मतपत्र म्हणून वाचकात, प्रतिष्ठित - सुशिक्षित समाजात मान्यता लाभली. याचे सारे श्रेय बाळशास्त्री जांभेकरांना द्यावे लागते. जांभेकर व्युत्पन्न होते. संस्कृत, मराठी, गुजराती, लॅटिन, इंग्रजी यांसारख्या आठदहा भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते. ते गणिती पंडित होते. भूगर्भशास्त्र, पदार्थविज्ञान, इतिहाससंशोधन अशा अनेक विषयात त्यांना गती होती. त्याचा ठसा 'दर्पण' मध्ये पडला. पुण्याला एका सरकारी खात्यात काही अफरातफर झाली. लगेच जांभेकरांनी त्यावर संपादकीय लेख लिहिला. अवतीभोवतीच्या घटनांचा ते वेध घेतच. पण माहितीपूर्ण मजकूरही कटाक्षाने देत. एका अंकात 'वाफेचे यंत्र, पृथ्वी, धूमकेतू व गृहगोल व तारे' ह्यावर लेख लिहिला आहे. वृत्त म्हणून मुंबई, कलकत्ता, मद्रास येथील 'सुप्रीम कोडता' चे महत्त्वाचे निर्णयही 'दर्पण' मध्ये छापले जात. जज्ज जनार्दन वासुदेव 'दर्पण' मध्ये होते; हे देखील याचे एक कारण असू शकेल. त्यावेळचे गव्हर्नर मि. क्लेअर ह्यांना 'दर्पण' चे उद्दिष्ट रुचले होते. 'त्याला शक्य ते प्रोत्साहन मी देईन.' असे उद्‌गार त्यांनी काढले. 'दर्पण' च्या कामगिरीमुळे बाळशास्त्री जांभेकरांना 'जस्टीस ऑफ द पीस' ही पदवी जेन्स कर्नाक यांनी दिली; असे दादोबा पांडुरंग आपल्या आत्मचरित्रात लिहितात. 'दर्पण' ची प्रशंसा 'Bombay Native Observer' नेही त्या काळी केली. या पत्राचे एकूण २८० वर्गणीदार होते. शिवाय इतर अनेक लोक 'दर्पण' मिळवून वाचत ते वेगळे. दर्पणने 'जात' या विषयावर चर्चा घडवून आणली. एखाद्या लेखकाने या चर्चेत हीन पातळी गाठल्यावर 'पत्र लिहिणाऱ्यांस उत्तरे' वा सदरात त्याला संपादकांनी समज दिलेली दिसते. 'दुसरे किंवा एक पत्र लिहिणारांने दुसऱ्याची वर्मे काढावी हे आमचे मनास येत नाही, आणि असे ज्या पत्रात असेल ती सर्व छापली जाणार नाहीत' असा इशारा अगदी पहिल्या वर्षातच संपादक देतात. डॉ. विल्सन यांनी या इशाऱ्याबद्दल आणि जांभेकरांच्या नि:पक्षपातीपणाबद्दल त्यांचे अभिनंदन केले होते. पहिले मराठी पत्र पोट भरण्याच्या इराद्याने न निघता साहित्यिक दर्जाचे निघाले. म्हणून लोकशिक्षण साधले गेले. त्याकाळच्या पहिल्या इंग्रजी वर्तमानपत्राच्या ('हिकीज गॅझेट') किंवा पहिल्या गुजराती ('मुंबई समाचार') वर्तमानपत्राच्या तुलनेत मराठी पहिले वर्तमानपत्र उच्च दर्जाचे होते व त्यामुळे मराठीत चांगल्या पत्रांची परंपरा तयार होण्यास मदत झाली.

सन १८३५ मध्ये आनंदराव विठोबा नावाचा सज्जन 'पूना वार्तिक' या वर्तमान पत्राकरिता बोर्ड ऑफ डायरेक्टरर्सकडे परवानगी मागतांना आढळतो. परंतु हे वर्तमानपत्र निघाले किंवा नाही याविषयी कुठे उल्लेख आढळत नाहीत. दर्पणचा शेवटचा अंक २६ जून १९४० साली निघाला आणि त्याआधी १ मे १९४० ला जांभेकरांनीच नवीन 'दिग्दर्शन' नावाचे पत्र काढले 'दर्पण' आणि 'दिग्दर्शन' याची उद्दिष्टे एकच होती.

'दिग्दर्शन' :

'दर्पण' मासिक दोन भाषात होते. 'दिग्दर्शन' हे केवळ मराठी भाषेतलेच पहिले मासिक होते. अर्थात् त्याचेही संपादक बाळशास्त्री जांभेकरच असल्याने पहिले मराठी मासिक काढण्याचा मान बाळशास्त्रींकडेच जातो. १८४० मध्ये 'दिग्दर्शन' सुरु झाले तरी १८३९ मध्ये 'बॉम्बे टाईम्स' च्या अंकात त्याविषयीचे जाहीर निवेदन वाचावयास मिळते. त्यातला मजकूर सर्वसाधारणपणे असा आहे. - 'दिग्दर्शन' म्हणजे मराठी भाषेत सर्व विषयांचा संग्रह. या पुस्तकात बातमीचे सार, इतिहास, भूगोल, पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र याविषयी थोडा थोडा मजकूर जो जुन्या ग्रंथातून संकलित केलेला असेल किंवा नवा लिहिलेला असेल. 'दगडावर छापलेले' नकाशे, चित्रे त्यात असतील. २४ ते ३२ पाने असलेले हे एक 'लहान पुस्तक' असेल. किंमत आठ आणे. - लक्षात येते की हा आराखडा 'दर्पण' बरहुकूम आहे. फक्त तो केवळ मराठीतून असेल एवढाच पण प्रमुख बदल त्यात आढळतो. 'दिग्दर्शन' चे अंक सुरुवातीला गणपत कुष्णाजींच्या छापखान्यात शिला ('दगड') प्रेसवर छापले गेले व पुढे 'प्रभाकर' छापखान्यात खिळे जुळवून छापले जाऊ लागले. विशेष म्हणजे केवळ मराठीतून निघणाऱ्या ह्या मासिकाचे शंभर वर्गणीदार हे युरोपियन होते, दोनशे अंतरदेशीय व शिवाय मुंबई सरकार दरमहा वीस अंक (प्रती) घेत होते. 'दर्पण' प्रमाणेच या अंकाला लोकाश्रय व राजाश्रय मिळून प्रोत्साहन मिळाले. तरीही 'दिग्दर्शन' चे प्रकाशन नियमित होऊ शकले नाही. त्याउलट 'दर्पण' मात्र नियमित निघत होते. 'दर्पण' च्या शेवटच्या अंकात वाचकांचा रीतसर निरोप संपादकांनी घेतला होता. 'दिग्दर्शन' मात्र अर्ध्यावरच चार वर्षात बंद पडले. 'मराठी मासिकांचे पहिले शतक' मध्ये लेखक बा. द. सातोस्कर जी माहिती देतात त्यात 'दिग्दर्शन' ची अनियमितता फारच आहे. 'फेब्रुवारी १८४२ चा अंक ऑगस्ट १८४२ मध्ये म्हणजे सहा महिने उशीरा तर डिसेंबर १८४२ चा अंक मार्च १८४४ मध्ये म्हणजे १५ महिने उशीरा निघाला! असे नोंदविले आहे. 'दिग्दर्शन' हे मासिकाचे नाव बंगालीतील 'दिग्दर्शन' वरुनच उचलले असावे. मात्र हे नाव ठेवण्यामागचा हेतू 'इतर व्यवहारोपयोगी जी शस्त्रे व विद्या राहिल्या त्याचे दिग्दर्शन म्हणजे दिशा' दाखवण्याचा होता. शिवाय 'कर्मणुके'चाही हेतू होताच. मुखपृष्ठावर 'दिग्दर्शन म्हणजे मराठी भाषेत सर्व विषयांचा संग्रह' असे छापलेले आहे. लंडनमधील इंडिया ऑफिसच्या संग्रहातील 'दिग्दर्शन' च्या सूचीत या अंकाचे वर्णन - 'A monthly Encyclopaedia of useful Knowledge' असे येते. मात्र १८६० पर्यंत मासिकातून 'कर्मणूक' असली तरी त्यात कथासाहित्य येत नव्हते. पुढे ते 'बालमित्रा' तून आले.'

'दिग्दर्शन' च्या काही अंकातील विषय पहाण्यासारखे आहेत. त्यात 'शिवाजीचे वर्तमान' आहे. जस्ताचे झाड करण्याची कृती, मोरचुदातील तांबे काढण्याची कृती, उदाची फुले करण्याची कृती, सणांची उत्पत्ती, सूक्ष्मदर्शक यंत्र,

चीन देशाचे वर्णन, मुंबईचे वर्णन यांसारखे लेख एकाहाती लिहिलेले दिसतात. पुढे गोविंद विठ्ठल कुंटे तथा भाऊ महाजन यांनीही 'दिग्दर्शन' च्या लेखनाला हातभार लावला. 'दिग्दर्शन' मध्ये 'साधारण विषय' या सदरात मनोरंजक, विनोदी चुटकेवजा माहिती येई. 'वर्तमान' नावाचे सदरही असे. तात्कालिक घडामोडींचा आढावा त्यात असे.

मुंबई अखबार :

'दिग्दर्शन' निघाले त्याच सुमारास 'वर्तमान' देण्यासाठी 'मुंबई अखबार' निघाले. सूर्याजी कृष्णाजी हे 'मुंबई अखबार'काढीत असत. ३ जुलै १८४० ला याचा पहिला अंक निघाला. हे साप्ताहिक होते व दर शनिवारी प्रसिद्ध होई. 'गाव खात्यासंबंधी नेमणुका' नावाच्या सदरात सरकारी अधिकाऱ्यांच्या बदल्या, बढत्यांची नोंद होई. इंग्रजी वृत्तपत्रातील वृत्तांची भाषांतरे केली जात. हवामान सांगितले जाई. 'पत्र लिहिणाऱ्यास उत्तरे' दिली जात. तसेच संपादकांस जी पत्रे छापण्यायोग्य वाटत नसत, ती छापली जात नसत. उदा. 'एका शेणवी ब्राह्मणा' ने अखबारकर्त्यांस पत्र लिहिले. ते छापण्याजोगे नाही या सबबीखाली संपादकांनी छापले नाही, असा संदर्भ आढळतो.

मात्र 'अखबार'पत्र फार काळ चालले नाही. 'मुंबई अखबार' ची दखल एवढ्यासाठीच घ्यायची की 'दिग्दर्शन' प्रमाणेच केवळ मराठीतील असे हेही पहिलेच पत्र मानावे लागते.

'ज्ञानचंद्रोदय' :

'दिग्दर्शन' नंतर जवळजवळ सहा महिन्यांनी 'ज्ञानचंद्रोदय' हे मासिक सुरु झाले. याचाच अर्थ १८३२ ला 'दर्पण' सुरु झाल्यानंतर सात आठ वर्षात नियतकालिकांची, वर्तमानपत्रांची निवड शिक्षितांना भासू लागली. 'प्रेस' उपलब्ध होऊ लागले. सरकारी प्रोत्साहन काही अल्प प्रमाणात मिळू लागले. वर्तमान, अखबार यांच्या नावातच त्यांचा उद्देश लपलेला आहे. तो उद्देश सफल करण्याकरिता शिक्षित, विद्वान मंडळी धडपडू लागली. या वर्तमानाबरोबर ज्ञानप्रसार करणे, 'कर्मणूक' करणे हा नियतकालिकांचा हेतू होता. १८४० च्या दरम्यान 'अखबारपत्र' आले, 'दिग्दर्शन' आले तसेच 'ज्ञानचंद्रोदय' आले. इथून पुढे प्रसिद्ध होणाऱ्या अनेक नियतकालिकांच्या शीर्षकात 'ज्ञान' येते व ते नियतकालिकाचे उद्दिष्ट स्पष्ट करुन जाते. 'दिग्दर्शन' चेच अनुकरण 'ज्ञानचंद्रोदय' ने केलेले दिसते. मात्र ते बाह्यरुपाचेच. म्हणजे आकार, किंमत याबाबतीत ते अनुकरण होते. त्याचे अंतरंग मात्र बरेचसे वेगळे होते. जुनी मराठी कविता मुद्रित करुन तिचा प्रसार करणे हे प्रामुख्याने ज्ञानचंद्रोदयचे उद्दिष्ट होते. अगदी पहिल्या अंकापासून 'कृष्णलीलामृत' हा ओवीबद्ध ग्रंथ या पत्रात छापायला सुरुवात झाली. ज्ञानेश्वर, बामनपंडित, मोरोपंत,

मुक्तेश्वर इत्यादी कवींची कविता ज्ञानचंद्रोदयने मुद्रित केली. पांडुरंग बापू जोशी पावसकर हे ज्ञानचंद्रोदयचे संपादक होते. ते गणिताचे शिक्षक असूनही कवितांच्या मुद्रणावर त्यांनी आपल्या पत्रातून भर दिला.

ज्ञानोदय :

वर उल्लेखिल्याप्रमाणे 'ज्ञान' सूचक शीर्षक घेऊन जी पत्रे निघाली त्यातले 'ज्ञानोदय' हे मराठीतील तिसरे मासिक होय. अमेरिकन ख्रिस्ती मिशनऱ्यांनी हे मासिक चालवले. पुढे त्याचे पाक्षिक झाले. 'निबंधमाले' च्या जन्मापर्यंत या मासिकाने काळदृष्ट्या मजल गाठली आणि नंतरही हे धर्मप्रसारक मासिक निघत राहिले. ए. ॲबट हे 'ज्ञानोदय' चे पहिले व्यवस्थापक होते. यांनी धर्मप्रसाराचा उद्देशाचा सूज्ञपणे कोठेही उल्लेख केला नाही. मात्र ख्रिश्चन धर्माच्या श्रेष्ठतेविषयीचे लेख प्रसिद्ध केले. हिंदू धर्मातील अनिष्ट प्रथा, अंधश्रद्धा, ब्राह्मणांची मिरासदारी यांवर आपल्या पत्रातून त्यांनी तीव्र शब्दांत टीका केली. त्यामागचा हेतूही त्यांनी संपादकियातून स्पष्ट केला आहे. 'या देशात ज्या वाईट गोष्टी आहेत त्याविषयी तुम्ही कशाला लिहिता असे कोणी म्हणेल तर त्याचे कारण असे आहे की, त्याविषयी आम्हाला दु:ख वाटते आणि ती बंद व्हावी, या देशाचे कल्याण असावे असे आम्ही इच्छितो... आम्ही स्वदेश सोडून या देशी आलो तेंव्हा हाच आमचा देश असे आम्ही मानतो.' हा 'ज्ञानोदय' सुरुवातीला अहमदनगरच्या मिशनरी केंद्रातून निघाला आणि नंतर मुंबईत स्थिरावला.

'उपदेशचंद्रिका' :

ज्ञानाचा उदय झाल्यावर आगेमागे १८४० च्या सुमारास जी नियतकालिके निघाली त्यात १८४४ च्या जानेवारीपासून 'उपदेशचंद्रिका' सुरु झाली. हे नियतकालिक अवघ्या सोळा पानांचे होते आणि त्याची किमंत चार आणे होती. बाळशास्त्री जांभेकरांच्या मदतीने मोरभटजी दांडेकर हे पत्र चालवीत. या पत्राच्या शीर्षकात सांगितल्याप्रमाणे ही उपदेशचंद्रिका होती. पण तिचा उद्देश 'ज्ञानोदया' तील धर्मप्रसाराला शह देण्याचा होता. विशेषत: धर्मान्तरास आळा घालण्याचा होता. 'हिंदु लोकही तुम्हास माहीतच आहे की या देशात पाद्रींचा संचार होऊ लागल्यापासून आपले पवित्र धर्मास धक्का येत चालला आहे. आपले लोकास धर्माचे ज्ञान नसते. त्यामुळे कित्येकास हिंदुधर्माचा कंटाळा येऊन ख्रिस्ती धर्म खरासा वाटू लागला आहे. तेव्हा लोकहो हा अनर्थ फार विस्तृत होण्याचे पूर्वी तत्प्रतिबंधार्थ काहीतरी तजवीज या प्रसंगी योजणे अवश्य आहे की नाही?' असा प्रश्न विचारुन मोरोपंत आपल्या संपादकियात 'उपदेशचंद्रिकेचा' उद्देश स्पष्ट करतात. 'पाद्री लोकांना दबविणे' हा त्यांचा प्रयत्न होता. पण वाचकांनी मात्र मोरोपंतांच्या धडपडीला फारसा प्रतिसाद दिला नाही असे दिसते. त्यामुळे तीन एक वर्षांनी हे नियतकालिक बंद पडले. ज्या 'ज्ञानोदया' ला शह देण्यासाठी 'उपदेश चंद्रिका' निघाली होती; त्या 'ज्ञानोदया' ला

अर्थातच हायसे वाटले. त्यांनी चंद्रिकेच्या बंद पडण्याची दखल उत्साहाने आपल्या पत्रात घेतली. 'ज्ञानोदय' पत्र म्हणते, 'दोन तीन वर्षांनी चंद्रिकेचा अगदी खग्रास झाला आणि दे दान, सुटे गिराण असे तिच्या कर्त्यांनी बहुत आरोळ्या मारल्या तरी ती फिरुन आपल्या निराश भक्तांच्या कधी दृष्टीस पडली नाही.'

'प्रभाकर' :

'वर्तमान', 'अखबारपत्र' ही ज्ञानात्मक मजूकर देणारी पत्रे बंद पडल्यावर त्यात गुंतलेल्या काही मंडळीनी 'प्रभाकर' काढले. 'अखबार' फार दिवस चालले नाही. मात्र 'प्रभाकर' ने आपले स्थान चांगलेच स्थिर केले व ते पुढे जवळजवळ वीस, एकवीस वर्षे चालले. याचे श्रेय गोविंद विठ्ठल तथा भाऊ महाजन कुंटे यांना जाते. २४ ऑक्टोबर १८४१ मध्ये त्यांनी 'प्रभाकर' हे नियतकालिक सुरु केले आणि लोकहितवादींच्या 'शतपत्रां' मुळे ते गाजले. 'प्रभाकर' चा आकार 'दर्पण' पेक्षा थोडा मोठा आणि त्याची वार्षिक वर्गण बारा रुपये म्हणजे 'दर्पण' च्या दुप्पट होती. संपादन थोडे मिश्र स्वरुपाचे असे. 'ज्ञानोदय', 'मुंबई वुईटनेस', मद्रासचे 'युनैटेड सर्विस गॅझेट', कलकत्याचे 'इंग्लिशमन', 'आग्रा अखबार', 'बंगाला हरकारु', मुंबईतील जामेसमशेद अशा विविध ठिकाणच्या इंग्रजी, मराठी, गुजराती भाषांतील वृत्तपत्रातील बातम्या 'प्रभाकर' मध्ये संकलित केलेल्या असत. इतकेच नव्हे तर बातम्यांबरोबर इतर मजकूरही संकलित होई. मात्र या जोडीने माहितीपूर्ण विचारांना चालना देणारे लेख हे 'प्रभाकर' चे वैशिष्ट्य होते. फ्रेंचाच्या बंडाचा इतिहास, ग्रेट ब्रिटनची माहिती यातून प्रसिद्ध झाली. विशेष म्हणजे इंग्रजी राज्यधोरणांवर प्रखर टीका या पत्रातून येऊ लागली. सातारचे गाजलेले राज्यप्रकरण 'प्रभाकर' मधून येऊ लागले. यंत्रशक्तीची ताकद 'प्रभाकर' मधून व्यक्त होत होती. हिंदू धर्मातील विसंगती आणि सुधारणेसाठी आवश्यक बदल यावर 'प्रभाकर' बोट ठेवू लागला. अर्थार्जनाचे नवे मार्ग, शिक्षणाचा आग्रह, वृतपत्रव्यवसायाची शक्ती, भाषेविषयीची जाणीव, ज्ञानाचा प्रसार, ब्राह्मणाची व्याख्या, इत्यादी विविध गोष्टींना 'प्रभाकरा' त प्राधान्याने स्थान दिले गेले. 'चार हिंदु एकत्र येऊन यज्ञयाग करण्यापेक्षा चार मजूर एकत्र येऊन रस्ता बांधणे' अधिक पुण्यकारक होय याची जाणीव 'प्रभाकरा' तूनच लोकहितवादींनी करुन दिली. 'प्रभाकर' व 'धूमकेतू' या पत्रांनी मराठी जाणणाऱ्यांस चटक लावली असे अरुणोदयकार बाबा पद्मनजींनी लिहून ठेवले आहे. भाऊ महाजनांनी 'प्रभाकरा' बरोबरीने वर्तमानपत्री बातम्या देण्यासाठी व विशेषत: 'वर्तमानदीपिका' या पत्राला तोडीसतोड म्हणून कमी किंमत लावून 'धूमकेतू' ही चालवले होते. 'प्रभाकर' हे वृत्तपत्रीय परंपरेला साजेसे बाणेदार वृत्तपत्र होते. पाश्चात्यांच्या इंग्रजी भाषेचा योग्य तो गौरव करुन त्यांच्या दांभिकपणावर त्यांनी कोरडे ओढले. विष्णुबोवा ब्रम्हचारी सुधारकावर महाजन जशी टीका करतात, तद्वत् मिशनऱ्यांच्या आक्रमणाचाही बीमोड होईल असे लेखन करतात. बिटिशांच्या राजवटीचे फायदे डोळ्यांवर कातडे ओढून ते स्वीकारत नाहीत तर फायद्यांबरोबर

तोट्यांचाही ते रोखठोकपणे उल्लेख करतात. त्यांनी लोकहितवादींची 'शतपत्रे' निर्भयपणे आणि बाणेदारपणे छापली. कारण 'शतपत्रांविषयी ज्या प्रतिक्रिया येत त्या अनेकदा नाराजीच्या आणि तीव्र असत. पण विचारांचा समतोल भाऊ महाजनांनी नेहमीच राखला म्हणूनच त्याकाळच्या शिक्षित पिढीला 'प्रभाकर' वाचण्याची ओढ लागली. 'अरुणोदयात तसा स्पष्ट उल्लेख आहे. 'प्रभाकर' चे संपादकीय स्पष्ट व समतोलच असे. पुनर्विवाहविषयी संपादकियात ते म्हणतात, — हर एक गोष्ट जेवढी चांगली असती तिचा गैर उपयोग केला असता तेवढी वाईट होती. छापखान्यांस मोकळीक असणे ही गोष्ट इंग्रज सरकारचे राज्यात फार मोठी गोष्ट आहे, व हे हर एक उत्तम नीती, विद्या, कलाकौशल्ये वगैरे प्रसुत करण्याचे मोठे साधन आहे. परंतु त्याचाच गैर उपयोग केला असता अनीती, दुर्भाषणे व शिव्यागाळी लावण्या वगैरे यांचाही प्रसार करण्याचे कामाकडेस छापखाना लावला तरी तो बिचा निर्जीव पदार्थ काही मनाई करीत नाही. असे म्हणून पुनर्विवाहाविषयी उलटसुलट प्रतिक्रिया व्यक्त करणारी दोन्ही प्रकारची पत्रे आपण का छापत आहोत; ते त्यांनी सांगितले आहे. भाऊ महाजनांचा वृत्तपत्रीय बाणा आणि समाजसेवक, म्हणून दृष्टिकोन लक्षणीय होता.

'मराठी ज्ञानप्रसारक' :

१८४७ च्या सुमारास 'उपदेशचंद्रिका' बंद पडल्यावर त्याप्रकारचे मासिक काही काळ निघाले नाही. १८५० च्या एप्रिलमध्ये 'मराठी ज्ञानप्रसारक' निघाले. हे १८३२ पासूनचे मराठीतील हे पाचवे मासिक होय. पुढे सोळा वर्षे ते प्रसिद्ध होत होते. त्याचे संपादन 'उपयुक्त ज्ञानप्रसारक सभा' ही संस्था करीत असे. ही शैक्षणिक कार्यात रस घेणारी, साहित्याबद्दल आस्था असलेली पहिली सार्वजनिक संस्था. 'उपयुक्त म्हणजे व्यवहारादिकात उपयोगी पडणाऱ्या ज्ञानाचा फैलाव करणे अशी 'उपयुक्त ज्ञानप्रसारक' सभेच्या उद्दिष्टांची फोड एका अंकात केली आहे. या संस्थेचे अध्यक्ष दादोबा पांडुरंग होते आणि उपाध्यक्ष महादेव गोविंदशास्त्री होते. महिन्यातून दोनदा या सभासदांची सभा भरे आणि त्यात निंबधवाचन व चर्चा होई. हे निबंध छापून काढण्यासाठी 'मराठी ज्ञानप्रसारका' ची स्थापना झाली. या पत्रात इतिहास, 'प्रसिद्ध पुरुषचित्रे', भूगोलवर्णने, 'मनोरंजक व नीतीपर गोष्टी व नवले' इत्यादी विषयांवरचे निबंध छापले गेले. आजच्या मासिकाचे स्वरुप पाहिले तर त्याची बीजे 'मराठी ज्ञानप्रसारका'त आढळतात. शिवाय या पत्राची किंमत माफक म्हणजे चार आणे होती. विशेष हा की 'मराठी ज्ञानप्रसारक' सचित्र छापला जाई. नकाशा, आलेख असेच पण 'नवला' त म्हणजे दीर्घ कथेत उचित अशी प्रसंगचित्रे देण्यात आली आहेत. गोविंद नारायण माडगावकरांचे लेखन या ज्ञानप्रसारकातून प्रकाशित होत असे. पत्रावळी, अन्न, वस्त्र यांवर जसे त्यांचे लेख आहेत तसेच त्यांचे व्यवहार उपयोगी नाटक ही ज्ञानप्रसारकातून क्रमशः प्रसिद्ध झाले. माडगावकरांच्या जोडीने विनायक, हरिश्चंद्रजी, केशव पुनाळेकर, गोवर्धन लक्ष्मण छत्रे, नानाभाई पांडुरंग

आदी लेखक ज्ञानप्रसारकातून लिहिते झाले. मात्र 'प्रभाकर' मधून येणाऱ्या वैचारिक सडेतोडपणाची सर या लेखनाला नव्हती. साहित्यविषयक चळवळीला ज्ञानप्रसारकाने पुढे नेले आणि जाणीवपूर्वक डोळस कार्य केले ही त्याची जमेची बाजू आहे. 'ज्ञानप्रसारका'नेच कालिदासाच्या 'विक्रमोर्वशीयम्' चे भाषांतर क्रमशः प्रसिद्ध केले. याच ज्ञानप्रसारकाच्या सुरुवातीच्या अंकातून 'उपदेशपर कथा' नावाची लघुकादंबरी क्रमशः प्रसिद्ध झाली. त्याचा लेखक कोण ते कळत नाही. मात्र ऐतिहासिकदृष्ट्या 'यमुनापर्यटन' च्याही आधीची ही लघुकादंबरी आहे याची नोंद आपण घेतली पाहिजे. ऐतिहासिक दृष्ट्या पहिली लघुकादंबरी जशी ज्ञानप्रसारकाने छापली तसेच महानुभाव पंथाविषयी माहिती जमवून प्रसिद्ध करण्याचा पहिला प्रयत्नही या पत्राने केला. 'कविता म्हणजे काय?' या पत्रात छापलेल्या लेखात नवीन विचार मांडलेला दिसतो. चमत्कारीक कल्पना हा काव्याचा आत्मा होय, शैलीमुळे निबंधाला शोभा येते, भाषांतर हे साहित्यविचारांना चालना देते अशी अनेक तत्त्वे वा विधाने, विचार या पत्रात येतात. 'जयपाल', रत्नप्रभा या ललित ग्रंथांची तसेच 'यशोदा पांडुरंगी', 'डाक्टर विल्सन यांनी केलेली इंग्रजी आणि मराठी केकावलि', 'कविचरित्र' या पुस्तकांची परीक्षणे काटेकोरपणे केलेली आढळतात.' १८६७ साली निघालेल्या 'विविधज्ञानविस्तारा' ने एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आणि विसाव्या शतकाच्या पहिल्या दोन दशकात पुढे जी महत्त्वाची वाङ्मयीन कामगिरी बजावली तिची सर्व पूर्वतयारी १८६७ पूर्वीच 'मराठी ज्ञानप्रसारका' ने केली होती असे स्पष्ट दिसते. या अर्थाने 'मराठी ज्ञानप्रसारका' चे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

इतर मासिके :

१८४० ते १८६० हा याप्रकारे मराठी मासिकांच्या प्रयोगावस्थेचा व धडपडत प्रगती करण्याचा काळ मानावा लागतो. त्यात 'मराठी ज्ञानप्रसारक' हे विशेष लक्षणीय ठरले. या दोन दशकांच्या कालखंडात छोटी, छोटी अनेक मासिके 'दिग्दर्शन' च्या अनुकरणाने निघाली व अल्पकाळात नाहीशी झाली. तरीही त्यातील काही ठळक मासिकांचा इथे उल्लेख केला पाहिजे.

अ) चंद्रिका - १८५४ मध्ये 'चंद्रिके' चा पहिला अंक निघाला. विशेष म्हणजे 'व्यापारादी कृत्ये करुन महाराष्ट्राने आत्महित साधावे' या विचाराने 'चंद्रिका' सुरु झाली. कदाचित व्यापार या विषयाला वाहिलेले मराठीतील हे पहिले व एकमेव मासिक. मराठी जनता व्यापारात मागे असल्यामुळे दरिद्री राहिली आहे म्हणून जनतेने आत्मविकास करुन व्यापार साधला पाहिजे हा विचार 'चंद्रिके' ने रुजवला.

व्यापार वाढवावा, त्यावांचूनि नाही अन्य गति लोकां।
नुमजाल आज मनिं जरि द्याल तुम्ही आत्मसंततीस धोका।।
व्यापारदिक कृत्ये ज्यापासुनि होइ आत्महित सकल
त्यांची व्यक्तीकरणे व्हावी उद्देश हा असे प्रबळ।।

अशा 'आर्ये'त आपला पत्र काढण्यामागचा उद्देश संपादकांनी व्यक्त केला आहे.

मात्र व्यापारविषयक फार लेख 'चंद्रिके' ने छापले नाहीत. इतर बातम्या, कविता, नाटक, 'नीतिपर कादंबरी' ही क्रमशः येणारी दीर्घकथा असा इतर मजकूरच 'चंद्रिके' त जास्त आढळतो. काटकसरीच्या धोरणामुळे याची 'कवरे' (कव्हर्स) आधीच छापून ठेवली होती. 'चंद्रिके' चे व्यापारी उद्दिष्ट आणि प्रसिद्ध झालेला मजकूर यांची फारकत झालेली असली तरी 'चंद्रिके' चे महत्त्व आपल्यापरीने निश्चितच आहे.

ब) 'प्रभोदय' - 'ज्ञानोदय' च्या धर्तीवर 'प्रभोदय' व 'उदयप्रभा' ही दोन मासिके निघाली. त्यांचा उद्देशही 'ज्ञानोदय' प्रमाणे ख्रिश्चन धर्मप्रसाराचाच होता. १८५६ मध्ये 'प्रभोदय' चा पहिला अंक निघाला. टॉमस ग्रॅहम हे मिशनरी त्याचे संपादक होते. वार्षिक वर्गणी एक रुपया होती. 'आपण बरे करताना थकू नये, कारण की न थकलो तर यथाकाळी पीक पावू.' असे बोधवाक्य पहिल्या पानावर लिहिलेले असे. 'हिंदू धर्माचा उत्पत्तीविषयी', 'ख्रिस्ती व हिंदूधर्म यांची तुलना', 'धर्माविषयी संभाषण' अशा मथळ्यांचे लेख यातून प्रकाशित होत. हिंदु धर्माच्या चालीरीतींवर प्रखरपणे टीका 'ज्ञानोदय' करीत नसे. त्यात छुपेपणा असे. मात्र 'प्रभोदया' त हिंदुधर्मापेक्षा ख्रिश्चन धर्मच श्रेष्ठ आहे असा उघड प्रचार असे. 'Probhodaya or Rising of Light' असे मुखपृष्ठावर छापण्यात येत असे.'

क) दुसरे मासिक म्हणजे 'उदयप्रभा' होय. हे देखील 'प्रभोदय' काळीच म्हणजे १८५६ मध्ये निघाले. या मासिकाचे संपादक 'अरुणोदय' वाले बाबा पदमनजी होते. 'प्रभोदय', 'ज्ञानोदय', 'उदयप्रभा' ही मासिके ख्रिस्ती धर्मप्रसाराचा हेतू ठेवून निघत होती. 'उदयप्रभा' हे पत्र पदमनजींनी काढले होते. प्रथम बापू हरशेट हे मुद्रित करीत; पण हिंदु धर्माच्या निंदेने भरलेल्या या पत्रास हरशेटनी नकार दिला व नंतर ते टॉमस ग्रॅहम मुद्रित करु लागला. मात्र पदमनजींच्या चटकदार भाषेव्यतिरिक्त यात फारसे काही आढळत नाही.

ड) विचारदर्पण हे ज्ञातिविषयक पहिले मासिक म्हणता येईल. हे १८६० साली सुरु झाले. मुंबईच्या 'क्षत्रिय स्टुडंटस् सोसायटी'ने आपल्या समाजाच्या विकासासाठी हे मासिक सुरु केले. पुढे ते बंद पडले. १८५५ मध्ये 'केवळ स्त्रियांसाठी' 'सुमित्रा' हे मासिक एका पुरुषाने काढल्याचा उल्लेख आढळतो. हे जसे पहिले ज्ञातिय मासिक 'विचारदर्पण' होते तसे १८८६ मध्ये 'आर्यभगिनी' हे

'स्त्रियांकरिता उपयुक्त मासिक' माणिकबाई लाड यांनी काढले. जाता जाता त्याची नोंद घेणे आवश्यक ठरते.

इ) सर्वसंग्रह - १८६० मध्ये मुंबईतून निघालेले एक महत्त्वाचे मासिक म्हणजे 'सर्वसंग्रह'. प्राचीन मराठी काव्य, संपादन आणि संशोधन करुन 'सर्वसंग्रहा' ने प्रथम जनतेपुढे आणले. तसा उल्लेखही सर्वसंग्रह मुखपृष्ठावर करीत असे अशा कवीचे काव्य 'शुद्ध करुन लोककल्याणार्थ' छापले. पुढे याचा राजवाडे, पांगारकर आदींना संशोधनास पूरक म्हणून फायदा झाला. जुन्या काव्याचे संपादन व संशोधन माधव चंद्रोबा व अनंत चंद्रोबा या डुकले बंधुंनी केले. खरे तर हे व्यापारी व डॉक्टर होते. परंतु यांनीच रस घेऊन 'सर्वसंग्रह' काढले व त्याकाळी ते संग्रहणीय ठरले. या संशोधनकामी त्यांना परशुरामतात्या गोडबोले यांचे सहाय्य झाले. जवळजवळ आठ वर्षे चालणाऱ्या या अंकांतून मोरोपंतांचे आर्याभारत, रामायणे, मंत्रभागवत, केकावली त्यांनी संपादित केली. वामन, तुकाराम, रामदास, मुक्तेश्वर, ज्ञानेश्वर आदींची कविता शुद्ध करून आणि अर्थनिर्णायक टीपा देऊन मांडली; प्रसिद्ध केली. मात्र 'सर्वसंग्रहा'ने जुन्या कवींच्या कवितेशिवाय इतर कोणत्याही मजकुराला प्राधान्य दिले नाही. परशुरामतात्या गोडबोले यांनी या प्रयत्नातूनच 'नवनीत' पुस्तक काढले होते.

विविधज्ञानविस्तार :

डुकले बंधुंचे 'सर्वसंग्रह' १८६७ साली बंद पडले आणि त्याचवर्षी 'विविधज्ञानविस्तार' सुरू झाले. १८६७ ला मुंबई विद्यापीठात मराठी भाषा शिकवणे बंद करण्याची घटना घडली. या घटनेचा निषेध म्हणून रा. भि. गुंजीकरांनी 'विविधज्ञानविस्तार' हे नियतकालिक सुरु केले. मात्र आपले नाव त्यांनी संपादक म्हणून न छापता प्रकाशक म्हणून छापले. 'सत्काळक्षेपार्थ, विश्रांतीस्तव आणि कल्याणार्थ' असे हे मासिक सुरु झाले.

या नियतकालिकाचा लेखकवर्ग सुधारणावादी नवविचारांचा होता. प्रामुख्याने ललित साहित्याला या अंकांतून प्राधान्य देण्यात आले. अनेक दृष्टीने 'विविधज्ञानविस्तार' चे महत्त्व आजही आहे. एकोणसत्तर वर्षे हे मासिक चालले हेही विशेषच. 'श्री विविधज्ञानविस्तार' 'A Monthly Magazine of Marathi Literature for Ladies & Gentlemen' असे मुखपृष्ठावर मराठी इंग्रजीत लिहिलेले असे व त्याखाली 'कुलस्त्रिया व गृहस्थ याकरिता पुस्तक' असे छापले जाई. 'विविधज्ञानविस्तार' ने प्रथमच मराठी नियतकालिकांच्या इतिहासात जोडअंक प्रकाशित केले. मलपृष्ठावर वर्गणीदारांची नावे व जाहिराती असत. 'सांप्रत अशा मासिक पुस्तकांची आपल्या लोकांस, विशेषतः स्त्रियांस किती आवश्यकता आहे' म्हणून व लोककल्याणार्थ हे मासिक सुरू केले. जोडअंकाप्रमाणे 'विस्तारा' ला पंचवीस वर्षे, पन्नास वर्षे पूर्ण झाल्याबद्दल कार्याचा आढावा घेण्यासाठी प्रथमच

विशेषांक प्रसिद्ध झाले. रा. भि. गुंजीकर मग हरी महादेव पंडित, पु. गो. नाडकर्णी, मोरमकर, मंगेश जीवाजी तेलंग, रामचंद्र काशीनाथ तटणीस यांनी समर्थपणे संपादन केले.

मनोरंजन, स्फुट, (निबंधसंग्रह लिहून आलेला विषय), विश्वचमत्कार, विद्यालय, शास्त्रीय ज्ञान, शालोपक्रम, सुबोध संवाद, आरोग्यरक्षण, कविता, निबंधभांडार, विचारमाधुरी, मराठ्यांच्या इतिहासाची साधने, पत्रे इत्यादी सदरे नियमितपणे येत होती. अलंकार, वृत्तरचना यांचाही विचार विस्ताराने केला. 'भाषा व व्याकरण' संबंधीचे निबंध प्रसिद्ध केले 'नूतन पुस्तकाची परीक्षा' केली. रावसाहेब मोरमकर संपादक झाल्यावर म्हणजे १८९८ मध्ये 'महाराष्ट्र साहित्य पत्रिके' चा समावेश विस्तारात झाला आणि विस्ताराचे सर्वविषय संग्राहक असे धोरण पुढे बदलले.

मुंजीकरांची 'मोचनगड' ही पहिली ऐतिहासिक मराठी कादंबरी तसेच त्यांचीच 'ठगाची जबानी' या कादंबऱ्या प्रकाशित झाल्या. 'सवाई माधवरावाचा मृत्यु' हे खाडिलकरांचे नाटक, 'शाकुंतल', 'रोमिओ जुलिएट' नाटकांची भाषांतरे, कोल्हटकरांचे 'मूकनायक' हे नाटक, स्त्रीपुरुषांनी सन्मार्गमार्गी व्हावे म्हणून केलेले गोष्टीरुप कथालेखन, लेंभे - मोगरे, गिरीश, यशवंत, रेंदाळकरांच्या कविता, 'समूह लहरी' हे वासुदेव कानिटकरांचे खंडकाव्य, श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांच्या 'सुदाम्याचे पोहे' मधील बारा लेख, 'कृष्णकुमारी' हे वासुदेव कानिटकरांचेच दुसरे खंडकाव्य असे महत्त्वपूर्ण ललित साहित्य 'विस्ताराने' जाणीवपूर्वक प्रसिद्ध केले. या निर्मितक्षम साहित्याबरोबरच विविधज्ञान विस्ताराने चरित्रवाङ्मय जोपासले. व्यक्तिचित्रे (त्यातील एक रा. भि. गुंजीकरांचे), आठवणी, प्रवासवर्णन अशा विविध वाङ्मयप्रकारांना वाव दिला.

याच विविधज्ञानविस्तारात न. र. फारक यांचे रामदासांवरील लेख प्रसिद्ध झाले. अमात्यांची आज्ञापत्रे, सदाशिव खंडो आळतेकरांनी संपादिलेली रामदासांची करुषाष्टके, महाबळेश्वर प्रवासवर्णन इत्यादी विविध साहित्य प्रकाशित झाले. वा. गो. आपटे, पांडुरंग काणे, वि. रा. शिंदे, चिंतामणी वैद्य, वासुदेवशास्त्री अभ्यंकर, काशीबाई कानिटकर असे अनेक लेखक वि. ज्ञा. विस्ताराचे लेखक होते. कन्नड, बंगाली, संस्कृत भाषांचा परिचय, इतिहास विषयक लेख, पुस्तकपरीक्षणे, टीका, न. चिं. केळकर यांचा 'सुभाषित आणि विनोद' वरील मीमांसा करणारा लेख अशा विविधांगांना विविधज्ञानविस्ताराने स्थान दिले. समीक्षेच्या निमित्ताने अनेक वाङ्मयीन प्रश्न म्हणजे नाटक कसे असावे, कादंबरीची रचना कशी असावी इ. प्रश्न लेखनात विचारात घेतले गेले. द. के. केळकरांचे 'काव्यालोचन', मोरोपंतांच्या कवितेतील वाद, मुक्तेश्वरवाद विविधज्ञानविस्तारातूनच प्रसिद्ध झाले.

मराठी भाषेचा सर्वांगीण विचार वि. ज्ञा. विस्ताराने केला. म. मो. कुंटे यांच्या 'राजा शिवाजी' चे परीक्षण रा. भि. गुंजीकरांनी प्रदीर्घ असे विस्ताराच्या तीन अंकातून केले आहे. 'गंगावर्णन' चे परीक्षण करतांना विविधज्ञानविस्ताराने म्हटले आहे. 'महाराष्ट्र कवितेने इंग्रजी झगा परिधान केला म्हणून आंग्लभौम कवितावधूची मनोहर व मोटदार वृत्ती आपल्या अंगी आणण्यास का झटू नये हे आम्हास समजत नाही. आमच्या रीतीभातीस जुळणारे असे इंग्रजी कवितेतील विचार मराठीत उतरले पाहिजेत. इंग्रजी कवितेतील सौंदर्य मराठी कवितेत आणण्याचा प्रयत्न कुणी केलेला आढळत नाही. याकडे मराठी भाषेचे हितचिंतक लक्ष देतील तर बरे होईल....'

ललित साहित्याबरोबरच सामाजिक प्रश्नही 'विस्तार' हाताळताना दिसतो. 'विद्यावृद्धी', 'उपयुक्त ज्ञानाचा प्रसार करण्याची आवश्यकता', 'स्त्रियांचे अधिकार', 'तंबाखू आणि तिचे वाईट परिणाम', 'स्त्रीशिक्षण', 'बालविवाह', 'बालशिक्षण', 'स्त्रियांचा पुनरुद्धार' अशा प्रश्नांचा विचार विविधज्ञानविस्ताराने केला आहे.

तसेच 'प्रसूतीविषयक विचार', 'गृहवैध', 'बालकांची जोगवण', 'रक्तपितीवर औषध' इत्यादी डॉ. सखाराम यांचे आरोग्यविषयक लेख क्रमशः प्रसिद्ध झालेले आहेत.

'वाचनाविषयी', 'व्यसन', 'पोहोण्याची विद्या', 'देशी आगकाड्यांची पेटी', 'युद्धप्रसंग' इत्यादींवर स्फुटे आढळतात. याचाच अर्थ नित्य व्यवहारात आवश्यक ते ते विविधज्ञान विस्ताराने प्रसिद्धीसाठी निवडले आहे.

इतिहास संशोधनात्मक लेखही 'विस्तारा'त येतात. ग्रॅन्ट डफचा इतिहास कसा दिशाभूल करणारा आहे यावर पुराव्यानिशी लेखन नि. ज. कीर्तनेंनी केले. विस्तारातून प्रसिद्ध झालेल्या वादविवादामधूनच अस्सल कागदपत्रे उजेडात आली. 'इतिहासशास्त्र' ही लेखमालाच 'विस्तारा' ने सुरू केली.

'विस्तारा' च्या रुपाने एक अखंड ज्ञानसत्रच महाराष्ट्रात १८६७ पासून १९३७ पर्यंत चालू राहिले. पुढच्या काळातील मासिकांना 'ज्ञान प्रसारक' व 'विविधज्ञानविस्तार' हे आदर्श ठरले. विविधज्ञानविस्तार आणि निबंधमाला यांच्या दरम्यानच्या काळात प्रसिद्ध झालेली काही मासिके थोडक्यात पहायला हवीत.

१) जैनबोधक - १८६८ मध्ये निघाले. हे जैन धर्माचा विचार करणारे नियतकालिक होते.

२) १८६८ मध्येच 'कल्पतरु' निघाले. शास्त्रे, कला, हुन्नर, व्यापार वगैरे विषयाची परिभाषा, शब्दांचे अर्थ यात विस्ताराने देण्यात येई. एक प्रकारे दरमहा प्रसिद्ध होणारा हा बृहद्कोशच होता. सर्व शब्दांची रचना अकारविल्हे देण्यात येई. याचे

कर्ते आ. के. सांबारे हे होते. पहिल्या वर्षाचा बारा अंकात 'अ' या अक्षरापासून 'उत्पति' या शब्दापर्यंत कोश पोहोचला होता. इतका बारकाईने हा विचार केला जात होता.

३) आनंदलहरी - गोमंतकात याची निर्मिती झाली हे विशेषच. सूर्याजी सदाशिव महात्मे यांनी हे 'पत्र' पणजी येथे सुरु केले.

४) दंभहारक - 'स्त्रीपुरुषांच्या सत्काळक्षेपार्थ उपयुक्त विषयसंग्रह' म्हणून दंभहारक, १८६१ मध्ये निघाले. वि. ज्ञा. विस्तारात लिहित असताना गुंजीकरांना तिखट भाषेत लिहिता येत नसे. मग ते 'विस्तारा' तून बाहेर पडले. गुंजीकर, हरि महादेव पंडित, वामन दाजी ओक, रामचंद्र सदाशिव वगैरेंनी 'व्यावहारिक पातळीवरुन लेख देण्यासाठी' हे नवे मासिक काढले. 'Exposer of Hypocrisy' हे 'दंभहारक' चे इंग्रजी नाव होते. त्यावरुन या पत्राचे उद्दिष्ट सूचित होते. 'पीडा जना यथेच्छ परि द्या मज मोकळीक योजाया। मुद्रायंत्रास्त्राते तुमचा निःशेष गर्व पळवाया!' अशा स्वरुपाची एक सहा ओळींची कविताही मुखपृष्ठावर उद्दिष्ट स्पष्ट करण्यासाठी छापली जाई. वि. ज्ञा. विस्ताराचेच धोरण या तेथेही लिहित असलेल्या मंडळीनी 'द महारकर' साठी स्वीकारले. 'ख्रीस्ती दांभिकपणा', 'बाप्तिस्माचे मूळ आणि हिंदूंचे गुरुत्व', 'अर्ध्या हळकुंडाने पिवळे', 'स्वभाषेची अनास्था व अपमान', 'शास्त्रापुढे परमार्थ कोठला?' इत्यादी शीर्षकांचे लेख यात आलेले आहेत.

या अशा लेखांबरोबरच 'सुविचारी कुटुंब', 'परागंदा झालेल्या गृहस्थाची कन्या' इत्यादी गोष्टी यात येत. पुस्तकपरीक्षणे येत. या पत्रातून ख्रिस्ती मिशनऱ्यांवर तोफ डागली जात असे. याबद्दलची नाराजीची प्रतिक्रिया निबंधमालेने प्रसिद्ध केली आहे. लगेच दंभहारकाने चिपळूणकरांकडे रोख वळविला आहे. चिपळूणकरांची भाषा 'दंभहारका' ला 'धरसोड व मळमळीतपणा असलेली' वाटली.

५) 'ज्ञानसंग्रह' : अकोला येथे १८७२ ला हे मासिक सुरु झाले. हे विविधज्ञानविस्ताराचेच अनुकरण करणारे होते. यात चित्रकलेवर एक लेख आहे. रसग्रहणात्मक 'मनुष्याचे चित्र काढण्याची प्रमाणे' हा लेख छापून 'ज्ञानसंग्रह' ने नवीन पायंडा पाडला. 'ज्ञानसंग्रह'ने सचित्र लेख छापले.

६) देशसुधारणेच्छु : नावातून उद्दिष्ट स्पष्ट करणारे हे मासिक नोयाश गर्सिण या युरोपियन गृहस्थांनी १८७२ साली सुरु केले. मुंबईबाहेरचे हे तिसरे मासिक रायबंदरहून निघत असे. आत्माराम नारायण सुखटणकर हे त्याचे संपादक होते. 'वि. ज्ञा. विस्तार', 'दंभहारक' यानंतर वर उल्लेखिलेल्या काही मासिकांचा थोडक्यात परामर्श घेतल्यानंतर प्रामुख्याने विचार करावा लागतो तो 'निबंधमाले' चा.

'निबंधमाला' :

'निबंधमाला' हा मासिकांच्या वाटचालीतील एक महत्त्वपूर्ण टप्पा मानावा लागतो. त्याआधी 'सत्यदीपिका', 'बाळबोधमेवा' ही १८७३ साली मासिके निघाली. 'बाळबोधमेवा' हे खऱ्या अर्थाने मुलांचे मासिक म्हणावे लागते. या दोन मासिकानंतर १८७४ साली 'निबंधमाला' निघाली. 'निबंधमाले' तील सगळे लेखन विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी एकशती, एकटाकी केलेले आहे. 'मराठी भाषेच्या घडणीवर परिणाम करणारे व मराठी मनाच्या घडणीवर संस्कार करणारे एकमेव मराठी मासिक म्हणजे 'निबंधमाला' होय. '१८७४ ते १८८३ हा माले' चा कालखंड. ही 'माला' पुणे येथून प्रसिद्ध होई. सद्भिरुचीचा प्रसार व वाचनाची गोडी लावणे हा 'माले' चा उद्देश होता. या काळात उद्धार व सुधारक हा वाद चालू होता. विधवा पुनर्विवाह शास्त्रसिद्ध की अशास्त्र यावर वाद झाला. मिशनऱ्यांनी 'हिंदु' धर्माविरुद्ध मोहीम उघडली. विष्णुबुवा ब्रम्हचारी यांनी त्याविरुद्ध व्याख्याने दिली. एकूणच सामाजिक, वैचारिक मंथनाच्या काळात वादपूर्ण वातावरणात 'निबंधमाले' चा अंक सुरू झाला. वैचारिक क्रांतीचे साधन म्हणून 'माला' सुरू झाली. चिपळूणकरांनी ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या टीकेवर कडक शब्दात हल्ला केला. मेकॉलेच्या इंग्रजी धाटणीचे अनुकरण करून मराठी भाषेचे सामर्थ्य व्यक्त केले.'

'माले' त सर्वसाधारण विषयांवरील निबंध, चरित्रात्मक निबंध, टीकापर निबंध, प्रसिद्ध झाले. 'सुभाषित', 'साहित्य', 'चमत्कारीक माहिती', 'भाषापरिज्ञान', 'विनोदमहदाख्यायिका', 'निबंधासंबंधीच्या पत्रव्यवहार' अशी विविध सदरे असत. विदग्ध वाङ्मयाची चर्चा असे. निबंधात परिच्छेदांची रचना विधान, स्पष्टीकरण, प्रमाण, आक्षेप, उत्तर, निर्णय अशी शास्त्रशुद्ध असे - वाचन, वक्तृत्वसारखे वाङ्मयीन लेख चिपळूणकरांनी लिहिले तसे 'इतिहास', 'आमच्या देशाची स्थिती' सारखे राजकीय लेख त्यांनी दिले. लोकभ्रम, संपत्तीचा उपभोग ही काही त्यांच्या सामाजिक विषयावरील निबंधांची उदाहरणे आहेत. 'डॉ. जॉन्सन' हे चरित्र लिहून विष्णुशास्त्री यांनीमराठीतील चरित्रलेखनाला एक नवीन वळण दिले. लोकभ्रम, संपत्तीचा उपभोग ही काही त्यांच्या सामाजिक विषयावरील निबंधांची उदाहरणे आहेत. विष्णुशास्त्री यांनी 'डॉ. जॉन्सन' हे चरित्र लिहून मराठीतील चरित्रलेखनाला एक नवीन वळण दिले. तेथे त्यांनी निखळ बोधवादी भूमिका घेतली आहे. त्यांनी १८७६ सप्टेंबर पासून जुलै १८७७ पर्यंत एकूण आठ लेख डॉ. जॉन्सनवर लिहिले आहेत. डॉ. जॉन्सनमधील खराखुरा माणूस त्यांनी लेखमालेतून उलगडून दाखवला.

भाषाविषयक अनेक गोष्टींचा चिपळूणकरांनी गंभीरपणे विचार केला आहे. मराठी भाषेची सांप्रतची स्थिती, भाषादूषण, लेखनशुद्धी, भाषापद्धती, भाषांतर या विषयांवर लेख लिहून ते आपला दृष्टिकोण स्पष्ट करतात. निबंधमालेच्या

लेखनशैलीत वक्तृत्वगुण, ओजोगुण, उपहास - उपरोध, सुभाषिते आदींचा प्रत्यय येतो. अनेक संदर्भ देत त्यांची शैली नेमके मुद्दे मांडतांना दिसते. त्यांनी काही नवीन शब्द नव्याने तयार केले. उदाहरणार्थ खाविंदाचरणी मिलींदायमान, चिखलवृष्टी, इलाखाधिपती इत्यादी असे शब्द मुद्दाम 'गंगजमनी' केले आहेत असे विष्णुपंत म्हणतात. म्हणूनच सार्थपणे त्यांनी 'मराठी भाषेचा शिवाजी' असे म्हणवून घेतले.

विष्णुशास्त्री - चिपळूणकरां नंतरच्या लेखकांवर फार प्रभाव पडला. वि. ल. भावे, वि. का. राजवाडे, वा. म. जोशी, न. चिं. केळकर, ह. ना. आपटे आदींवर चिपळूणकरी शैलीचा, लेखनाचा प्रभाव दिसतो.

'माले' चा व 'मालाकार' चिपळूणकरांचा अंत जवळजवळ एकाच वेळी झाला. पण त्याआधीच माला बंद करण्याचा निर्णय चिपळूणकरांनी घेतला होता. 'आमच्या देशाची स्थिति' हा त्यांचा प्रसिद्ध 'निबंधमाला' हा 'साप्ताहिक महामंत्र' समाप्त झाला.

'निबंधमाले' नंतर मराठी मासिके स्थिरावली आणि कितीतरी मोठ्या संख्येने निघू लागली. 'माले' चे हे यशच होते. त्या काही मासिकांची थोडक्यात नोंद घेणे भाग आहे.

१) १८७६ ला 'उपयुक्त ज्ञानसार' निघाले.

२) त्याच वर्षी 'वेदार्थयत्न' निघाले. वेदांचे मराठी भाषांतर देण्याचा या मासिकाचा प्रयत्न असे. विशेष म्हणजे शंकर पांडुरंग पंडित त्याचा इंग्रजी अर्थही देत असत. त्यामुळे भारताबाहेरही हे मासिक उपयुक्त ठरु लागले. या मासिकाचे सर्वात जास्त वर्गणीदार जर्मनीमधले होते. पंडित स्वतः ओरिएन्टल ट्रान्सलेटरच्या पदावर सरकारी नोकरीत असल्याने त्याचा चांगला फायदा पाश्चात्य अभ्यासकांना होऊ शकला.

३) १८६४ साली 'गृहिणी मित्र' बंद झाल्यावर 'अबलमित्र' हे खास स्त्रियांसाठी मासिक निघाले रावजी हरी आठवले यांनी ते सुरू केले. पतिव्रता स्त्रियांच्या मनोरंजक पौराणिक कथा, पाकशास्त्र, स्त्रीशिक्षणावर मजकूर, 'बालावृद्धाविवाहविटंबन' सारखी नाट्यकृती, 'साध्वीचे भ्रतारवियोग दुःख' सारखी कादंबरी इत्यादी यात प्रकाशित झाले. हे मासिक सुमारे पाच वर्षे चालले.

४) काव्येतिहाससंग्रह - १८७८ मध्ये बखरी, कैफयती, दप्तरे देण्यासाठी म्हणजेच मराठी / महाराष्ट्र इतिहासाची साधने देण्यासाठी हे मासिक सुरू झाले. जनार्दन बाळाजी मोडक आणि काशिनाथ नारायण साने हे याचे संपादक होते. सभासदकृत शिवाजीच्या बखरी, मल्हार रामराव चिटणीसकृत संभाजी शाहू, रामराजे यांची चरित्रे, पेशव्यांची बखर इत्यादी संशोधन करुन काशिनाथ साने यांनी 'काव्येतिहाससंग्रहात' प्रसिद्ध केले. मोडक यांचेही कार्य या संपादनात

महत्त्वाचे मानावे लागते. जनार्दन बाळाजी मोडक यांनी भूषण कवीकृत 'शिवराज भूषण' हे शिवाजी महाराजांचे काव्यमय संपादित केले. हे मासिक बारा वर्षे चालू होते.

५) नाट्यकथार्णव - शंकर मोरो रानडे व नारायण व्यंकाजी खोत यांनी १८७९ साली हे मासिक सुरू केले. नाट्य आणि कथा साहित्याचा अर्णव (= सागर) हे याचे अन्वर्थक ठरणारे नाव होते कारण यात कादंबऱ्या आणि नाटके क्रमशः प्रकाशित झाली. वासुदेव बाळकृष्ण केळकर यांच्या भाषांतरीत नाटकांमुळे हे मासिक गाजले. या मासिकातून शेक्सपिअरी नाटके भाषांतरीत झाली. पुढे त्यांचे रंगभूमीवर प्रयोग झाले. या मासिकातून काही संस्कृत नाटकांचेही भाषांतर झाले.

६) निबंधचंद्रिका - निबंधमालेच्या सामप्रीनंतर विष्णुशास्त्री चिपळूणकरांवर प्रेम करणाऱ्या न्यू इंग्लीश स्कूलमधील त्यांच्या सहकाऱ्यांनी 'निबंधचंद्रिका' हे मासिक १८८३ मध्ये सुरू केले. 'चंद्रिका' हे 'माले' चे अनुकरण करणार असल्याचे पहिल्याच अंकात घोषित केले गेले. मात्र यात 'निबंधमाले' ची भाषा आढळत नाही. शंकर बाळकृष्ण दीक्षित यांचे ज्योतिष्शास्त्रावरील काही लेख यात आले. पुढे चार वर्षांनी निबंधचंद्रिका क्षीण झाली आणि १८८७ पासून 'मनोरंजन' या मासिकात विलीन होऊन 'मनोरंजन व निबंधचंद्रिका' या जोडनावाने निघू लागली.

७) केरळ कोकीळ - जरा वेगळ्या स्वरुपाचे हे १८८६ मध्ये निघालेले मासिक म्हणून याची दखल घ्यावी लागते. विशेष म्हणजे कोचीनहून प्रकाशित होणाऱ्या या मासिकाचे वर्गणीदार तीन हजाराच्या घरात होते. कृष्णाजी नारायण आठवले हे याचे संपादक होते. 'केरळमित्र' या मल्याळी भाषेतील वृत्तपत्रावरुन 'केरळकोकीळ' हे नाव सुचले असावे. मुंबईत या मासिकाचे व्यवस्थापन दत्तात्रय कृष्ण सांडू व जनार्दन महादेव गुर्जर पाहात असत. 'केरळकोकीळ' मध्ये भरपूर चित्रे येत. पुस्तक परीक्षणे येत आणि 'कलमबहादुरांस शेलापागोटे' हे नर्म विनोद करणारे सदर येई.

या सदरातील भाषा आक्रमक, उपहासपूर्णही असे. 'ललित' मधील 'ठणठणपाळ' चा हा पूर्वज म्हटला पाहिजे. या 'केरळकोकीळा' ची आणि आठल्यांची दखल 'वि. ज्ञा. विस्ताराने' सुद्धा घेतली. मात्र 'पंच' सुद्दश भाषेतील 'शेलापागोटे' त्यांना सदभिरुचीशून्य वाटले.

काव्यरत्नावली :

आधुनिक कवींचे काव्य प्रसिद्ध करणारे हे मराठीतील पहिले मासिक म्हणावे लागते. म. गो. कुंटे यांच्या 'राजा शिवाजी' या महाकाव्युसद्दश कवितेनंतर

प्रयोगशील कविता पुढे येऊ लागली. इंग्रजी कवितेचे अनुकरण करणारी पण तरीही स्वतंत्र कविता अनेकजण लिहू लागले. त्या कवितेला जागा देण्यासाठी 'काव्यरत्नावली' निघाली. अलीकडील कविमंडळींनी चालविलेले कवितेचे मासिक पुस्तक असे शब्द मुखपृष्ठावरच छापलेले असत. नारायण नरसिंह फडणीस यांनी हे मासिक ना. वा. टिळक, वामन दाजी ओक इत्यादींच्या सल्याने सुरू केले. केशवसुत, विनायक, दत्त, 'बी' चंद्रशेखर, अनंततनय, ना. वा. टिळक, लक्ष्मीबाई टिळक, बा. अ. भिडे, कान्होबा रणछोडदास कीर्तिकर, मोगरे, के. स. रिसबूड, आनंदराव टेकाडे, गिरीश यशवंत, वा. भा. पाठक, साने गुरुजी, राहाळकर, ना. के. बेहरे इत्यादी मोठमोठ्या दर्जेदार कवींची कविता या 'काव्यरत्नावली' मध्ये येत असे. नवीन प्रयोगक्षम कविंतेची दखल घेणारे मासिक म्हणून याला फार महत्त्व आहे.

शालापत्रक :

वि. ज्ञा. विस्तार सर्वात अधिक म्हणजे अडुसष्ट वर्षे चालला. पण 'शालापत्रक' चे आयुष्य त्याहीपेक्षा मोठे होते. अत्यंत नियमितपणे ते प्रसिद्ध झाले. दर महिन्याच्या एक तारखेस 'शालापत्रक' न चुकता निघे. याचे संपादन वासुकाका जोशी करीत. यांनीच पुढे 'चित्रमयजगत्' सुरू केले. 'शालापत्रका'च्या मुखपृष्ठावर ध्येयवाक्य येई ते असे.'

'येथे शब्द नाही शिष्यांसी। अवधे सद्गुरुपाशी।
सद्गुरू पालटी अवगुणांसी। नाना यत्ने करोनी।।'

रामदासांच्या श्लोकाबरोबर पुढे जे जे आपणासी ठावे। हळुहळु शिकवावे। शहाणे करुन सोडीचे। सकळा जना।। हे त्यांचेच वचन जोडले गेले.

व्याकरण भूगोल, गणित आदी विषय कसे शिकवावे याचे मार्गदर्शन या 'पत्रकात' असे. मराठी शिक्षकांनी आपले अनुभव पाठवावेत, मजकूर लिहावा यासाठी 'पत्रका' तून आवाहन करण्यात येई. विद्याप्रसारास विद्याखात्यातील लोकांचे विद्याविषयांवरचे जे नवीन विचार असतील ते परस्परांस समजले पाहिजेत हा या 'शालापत्रक' चा स्पष्ट हेतू होता. परीक्षापद्धती, नवीन - पुस्तकांची ओळख, रसायनशास्त्रासारख्या कठीण शास्त्राचा सुलभ परिचय, कविता कशी शिकवावी याचे मार्गदर्शन, संपादक व शिक्षक यांचा सतत चालणारा पत्रव्यवहार, सामाजिक स्थितीचा शैक्षणिक आढावा या 'पत्रकात' घेतला जाई. एक आवश्यक असे वेगळे स्वरूप या 'पत्रकां'ने स्वीकारले होते आणि त्याचे वाचकांकडून स्वागत झाले.

बालशिक्षण सुधारणेसाठी काय करावे. स्त्रीशिक्षणात कोणता दृष्टिकोन स्वीकारावा याचा उहापोह शालापत्रक वरचेवर करीत असे. एकूणच शिक्षणविषयक इंग्रजांच्या धोरणाला मातदेशीयांनी करता प्रतिसार दिला त्याचे प्रतिबिंब या 'शालापत्रका'त आपल्याला पहाता येते.

१८९० च्या सुमारास 'लोकमित्र', 'महाराष्ट्र कोकीळ', 'हितचिंतक' सारखी आणखीही मासिके निघाली.

या सुमाराला निघालेले नोंद घेण्याजोगे महत्त्वाचे मासिक म्हणजे 'मासिक मनोरंजन' - १८९५ मध्ये हे निघाले आणि १९३५ पर्यंत चालते. का.श.मित्र यांनी ते सुरु केले. नवीन पद्धतीने कथा, कविता, विनोद या 'मनोरंजना' ते येत असे. नवीन प्रकारे मांडणी आणि नवीन प्रकारचे मुद्रितरुप हे 'मनोरंजन' चे वैशिष्ट्य. 'मनोरंजना'ला सुरुवातीलाच हजार वर्गणीदार मिळाले होते. 'पुस्तक लोकांस आवडेलसे करावे' हा एकमेव हेतू मनोरंजन' कार मित्रांचा होता, आणि तो पूर्णपणे सफल झालेला आढळतो. गुजराथी, बंगाली साहित्याची ओळख त्यांनी करून दिली. विशेष म्हणजे बालावृद्धविवाह, स्त्रीशिक्षण सुधारक व सनातनी काँग्रेसमधील जहाल व मवाळ पक्ष अशा तत्कालीन विषयावर व्यंगचित्रे 'मनोरंजन' ने दिली. या व्यंगचित्रांच्या जोडीने विनोदी गोष्टी, चुटके, कविता येत. नवीन लेखकांना हुडकून काढण्याचे श्रेयस्कर कार्य मित्रांनी केले. वामन मल्हारांची 'रागिणी' आळतेकरांची 'मुक्तबंध' व 'शांताराम' या कादंबऱ्या, 'वज्राघात' ही ह. ना. आपटे यांची कादंबरी अशा चांगल्या दर्जेदार कादंबऱ्या 'मनोरंजन' मधून प्रसिद्ध झाल्या.

वि.सी. गुर्जर आणि रेंदाळकर या साहित्यिकांचे संपादन साहाय्य का. र. मित्रांना मिळाले. स्वतः का. र. मित्रांच्या मनोविश्लेषणात्मक कथा, रहस्यमय वाटणाऱ्या तंत्रशुद्ध अशा गुर्जरांच्या कथा, दिवाकर कृष्णांच्या कथा, स्त्रीजीवनावरील वेगळ्या कथा यांना 'मनोरंजन' ने प्रसिद्धी दिली. मराठी भाषेला राजमान्यता मिळवण्यासाठी 'मनोरंजन' कारांनी सातत्याने प्रयत्न केले.

रा. ग. गडकऱ्यांच्या विनोदी एकांकिका, श्रीपाद कृष्णांचे विनोदी लेखन, 'बाळकराम'चे विनोदी लेखन 'मनोरंजन' मधूनच प्रसिद्ध झाले. प्रवासवर्णन, दिवाकरांच्या नाट्यछटा मित्रांनी आवर्जून प्रसिद्ध केल्या. रेंदाळकर, केशवसूत, बा. अ. भिडे, ना. वा. टिळक, विनायक प्रभृतींनी कविता लिहिण्यासाठी 'मनोरंजन' चा आश्रय घेतला. अनेक वाचकांपर्यंत पोहचणारे, प्रयोगशीलतेला महत्त्व देणारे, साहित्य चळवळीत भाग घेणारे, सरकारशी वाद खेळणारे सुजाण मनोरंजन करणारे हे मासिक या काळातील फार महत्त्वपूर्ण मासिक मानावे लागते.

चित्रमयजगत् :

या मासिकाचा उल्लेख मागे केलेला आहे. पुणे येथून प्रसिद्ध होणारे हे मासिक स्वभाषा, स्वदेश यांच्या सेवेसाठी सुरु झाले. द. अ. आपटे, ज. स. करंदीकर, देवगिरीकर हे मासिक चालवीत असत. महायुद्धाची हकिकत कृ.प. खाडिलकर यात लिहित. पुस्तकपरीक्षणे येत. याच मासिकातून शि. म. परांजपे यांचे लेखन प्रसिद्धीस आले. शास्त्रीय माहिती सचित्र देण्यास 'चित्रमयजगत्' नेच सुरुवात केली.

इतर नियतकालिके :

'नवयुग' १९१३ ते १९२३ या कालखंडात प्रसिद्ध झाले. विठ्ठल नाडकर्णी यांचे संपादन असलेले मासिक बोधप्रद व मनोरंजक होते.

'उद्यान' - (१९१० ते जुलै १९२०) गणेश विठ्ठल कुळकर्णी याचे संपादन करीत.

'महाराष्ट्र वाग्विलस - जानेवारी १९०६ मध्ये हे मासिक डॉ. श्री. व्यं. केतकर यांनी सुरू केले. मनोरंजन हाच याचा हेतू होता.'

'महाराष्ट्रसाहित्य' - १९१९ मध्ये गो. गो. अधिकारी यांनी सुरु केले.

'अरविंद' - खरे तर या मासिकाचा कालखंड १९२० पुढला आहे. पण १९२२ मध्येच त्याचा अस्त झाला म्हणून या पत्राची दखल याच काळखंडात घेणे योग्य ठरते. लोकमान्य टिळकांच्या निधनानंतर त्यांचे स्मारक म्हणून मुंबईच्या डॉ. अमृत नारायण भालेराव यांनी हे पत्र सुरु केले. भा.रा. तांबे, 'केशवकुमार' यांच्या कविता यातूनच प्रसिद्ध झाल्या.

सारांश :

वाचनाप्रियता वाढवावी, दर्जेदार साहित्य निर्माण करावे, ज्ञानदायक माहिती द्यावी, 'करमणूक' करावी या हेतूने अनेक मासिके चांगल्या विचारवंतानी सुरु केली. ज्ञानोदय, 'ज्ञानप्रसारक', 'विविधज्ञानविस्तार', 'मनोरंजन', 'करमणूक', 'उपदेशचंद्रिका', 'ज्ञानचंद्रिका', 'महाराष्ट्र वाग्विलास' वगैरे शीर्षकातूनच मासिकांचे उद्दिष्ट लक्षात येते.

जवळ जवळ सगळ्याच संपादकांसमोर विशिष्ट ध्येय होते. प्रयोगशीलता होती. तत्कालीन गरज ते जाणत होते. म्हणूनच या नियतकालिकांतून अनेक नामवंत लेखक, संशोधक, भाषाशास्त्रज्ञ, इतिहासकार, चित्रकार, टीकाकार, विचारवंत निर्माण झाले. तत्कालीन वाङ्मयेतिहास या नियतकालिकांनी घडवला. पुढील काळातील आधुनिक वाङ्मयप्रकारांची पायाभरणी, या नियतकालिकांनी केली. भाषांतर, पुस्तक परीक्षण, जुन्या साहित्याचे संशोधन व संपादन यांवर या नियतकालिकांनी भर दिली तो ही या पायाभरणीस कारणीभूत झाला. अपवादात्मक का होईना पण व्यापार, ज्योतिष, आरोग्य, शिक्षण यासाठी काही नियतकालिके निघाली. ही सर्वच नियतकालिके ज्ञानसंवर्धावर भर देताना दिसतात. वाङ्मयतिहासाबरोबर महाराष्ट्राचा सांस्कृतिक परिवर्तनाचा इतिहासही या नियतकालिकांतून दिसतो. साहित्यविचार या नियतकालिकातूनच रुजवला गेला हे विशेष. मराठी भाषेचा इतर भाषांच्या तुलनेत विचार (तौलनिक विचार) करण्याचे प्रगत दर्शन नियतकालिकांतून घटते. मराठी भाषेचे व्याकरण, भाषाशास्त्र समजून

घेतांना ही विचारवंत मंडळी नियतकालिकातून दिसतात. पुस्तके निघण्यापेक्षा नियतकालिकातून प्रगत विचार मांडण्याकडे विचारवंताचा अधिक काळ दिसतो. त्यामुळे या नियतकालिकांनी एक फार मोठी ऐतिहासिक, सांस्कृतिक, वाङ्मयीन कामगिरी पार पाडलेली दिसते. याचा फायदा पुढे येणाऱ्या अधिक प्रगल्भ नियतकालिकांना निश्चितपणे झाला.

१९२० पासून वाङ्मयेतिहासात सर्वच वाङ्मय प्रकारांच्या बाबतीत एक नवीन टप्पा सोयीकरिता मानला जातो. १९२० पासून वाङ्मयीन, सांस्कृतिक प्रवाहविचारांच्या बाबतीत वेगळे वळण घेतांना आढळतात. नियतकालिकांचा आढावा घेण्याआधी अगदी थोडक्यात हे विचारप्रवाह आणि त्यांचे सामाजिक परिणाम पाहावे लागतात. कारण नियतकालिकांच्या विकासाची बीजभूमी म्हणजे हे बदलते विचारप्रवाह आणि सांस्कृतिक प्रगल्भता आहे, असे दिसते.

१९२० हा पहिल्या महायुद्धाच्या वातावरणाचा, परिणामाचा काळ होता. १९१९ मध्ये पहिले महायुद्ध संपले. राजकीय स्थित्यंतर पाहिले तर जाणवते की, याच सुमरास स्वातंत्र्य संग्रामात भारतात टिळकयुग संपून गांधीयुग अस्तित्वात येत होते. इंग्रजी शिक्षणाला भारतात स्थैर्य आले होते. या शिक्षणामुळे समाज आधुनिक विचारांना सामोरा जात होता. वैचारिक सामाजिक, वाङ्मयीन, सांस्कृतिक विचारांमध्ये इंग्रजी अनुकरण होत होते आणि त्यामुळे आधुनिकीकरणाला समाज सामोरा जात होता. अर्थकारणाचाही गांभीर्याने विचार होत होता. महायुद्धामुळे दारिद्र्य, मानवनिर्मित वस्तूंचा दुष्काळ, आर्थिक असमतोल, स्त्रीच्या भूमिका, जीवनाकडे पाहाण्याचा बदलता दृष्टिकोण, जगण्यातील भयाणता याची जवळून ओळख, मराठी मनाला होत होती आणि 'संगिनीला लोंबे, छान, छोटे आतडे,' असे समाजाचे विदारक दर्शन घडत होते. 'मरण स्वस्त होत' असल्याची जाणीव माणसाला शूद्रत्व आणत होती. 'मी एक मुंगी तू एक मुंगी' च्या जाणिवेचा आविष्कार साहित्यातून होऊ लागला. त्यामुळे वाङ्मयप्रकारामध्ये या काळात बदल झालेले आढळतात.

या पार्श्वभूमीवर नियतकालिकांचा अभ्यास केला तर त्यात नाविन्याचे, बदलांचे पडसाद उमटलेले दिसतात.

रत्नाकर :

१९२५ साली सुरू झालेले हे एक प्रमुख नियतकालिक आहे. आरंभीच्या काळात ना. सी. फडके हे याचे संपादक होते. साहजिकच पुण्याहून ते प्रसिद्ध होई. 'रत्नाकर' मासिकाचा उद्देश व्यापक पातळीवर वाचकांपर्यंत पोहोचण्याचा होता. कल्पितावर आधारित वाङ्मय म्हणजे कथा, कादंबऱ्या, सर्वांगीण चर्चा करणारे

वैचारिक वाङ्मय, स्त्री ह्या घटकाला महत्त्व देऊन तिच्या मनोरंजनासाठी विशेष साहित्य, वाङ्मयीन नवप्रवाहांची नोंद अशा विविधतेने 'रत्नाकर' नटले आहे. वाङ्मयीन रत्नांचा 'आकार' असलेले हे नियतकालिक म्हणूनच त्याकाळातील विशेष, सर्वस्पर्शी मासिक समजले जाते. वाङ्मयीन दर्जाला 'रत्नाकर'ने प्राधान्य दिले. इतर दृश्य कलांवर चर्चा, निरुपण 'रत्नाकर'ने केले. जुन्या मान्यवरांबरोबरच नवीन लेखन करणाऱ्या चळवळ्या लेखकांनाही 'रत्नाकर'ने आपल्या विश्वात जागा दिली. वेळोवेळी होणारे नाट्यप्रयोग, जलसे यांची दखल 'रत्नाकर' घेत असे. आधीच्या नियतकालिकांप्रमाणे 'रत्नाकर'ही ग्रंथपरीक्षणे देत असे. इतिहाससंशोधन, लघुचरित्रे यांना कायमस्वरुपी मूल्य आहे, हे जाणून 'रत्नाकर' ने त्यांनाही आवर्जून स्थान दिले.

याशिवाय लघुनिबंध, विनोदी लेख, नीतीचर्चा, शिक्षणविषयक टीकालेख, आरोग्यविषयक सदर, खेळांची नोंद, औद्योगिक जगतातील घडामोडी, व्यापारविषयक नव्यानेच उद्‌भवणारे प्रश्न यांचे महत्त्व जाणून रत्नाकरने आपले स्वरूप नेहमीच सर्वविषयस्पर्शी ठेवले. विशेष म्हणजे यासाठी त्या त्या क्षेत्रातील अधिकारी व्यक्ती, विद्वान, विचारवंत यांना गाठून त्यांच्याकडून 'रत्नाकर' ने हे सगळे लिहून घेतले. म्हणजेच येईल ते साहित्य न छापता स्वतःचा वेगळा दृष्टिकोन 'रत्नाकर' ने ठेवला. काही लेखक-कवींची यादी आपण पाहिली तरी या दृष्टिकोनामुळे 'रत्नाकर' चा उंचावलेला दर्जा लक्षात येतो.

दिवाकरांच्या कथा, नाट्यछटा 'रत्नाकर' मधून प्रसिद्ध झाल्या. त्यांच्या बरोबरीने वि.स.खांडकेर 'रत्नाकरातून लिहित. वि.सी. गुर्जर, वि. वा. हडप, स. आ. जोगळेकर, ना. ह.आपटे, व.शां. देसाई, सरस्वतीकुमार, कमलाबाई टिळक, कानिटकर या बुजुर्गांचे लेखन 'रत्नाकरांतून प्रसिद्धीस आलेच, पण त्याचबरोबर त्याकाळात नवीन असलेल्या कृष्णाबाई मोटे, वि. द. घाटे, य.गो.जोशी यांचेही लेखन आले. लघुनिबंध आकारास यायचा होता. विष्णुशास्त्री चिपळूनकरांनी निबंधाला वळण दिले होते, पण वाचकांशी संवादगोष्टी करणारा (ललित) लघुनिबंध 'गुजगोष्टी'च्या रुपाने ना. सी. फडके यांनी 'रत्नाकर' मधूनच दिला. त्यांच्या 'जादुगार' व 'दौलत' या कादंबऱ्या 'रत्नाकर' मधूनच क्रमशः प्रकाशित झाल्या. तसेच वा. म. जोशी यांची 'सुशिलेचा देव' ही कादंबरी प्रकाशित झाली फडके यांच्या कादंबऱ्या या स्वप्नरंजनावर भर देणाऱ्या सौंदर्यवादी कादंबऱ्या होत्या तर वामन मल्हारांची कादंबरी विचारांना चालना देणारी होती. 'रत्नाकर' ने एकच वाङ्मयप्रकार देतानाही असे वैचित्र्य राखले. 'पाश्चात्य पुरुषश्रेष्ठ' हे श्री. म. माटे यांचे व्यक्ती चरित्रात्मक लेख 'रत्नाकर' मधूनच आले.

वाङ्मयीन विचारमंथन महत्त्वाचे मानून चर्चामंत्राची उपलब्धता 'रत्नाकर' ने दिली. भा.रा.तांबे यांची प्रदीर्घ मुलाखत प्रसिद्ध केली. प्रा. पारसनीस यांचे कथा,

कादंबरीचे विवेचक लेख, दि. वि. आमोणकर यांचे कथासमीक्षेचे लेख, माधव मनोहर, वि.ह. कुलकर्णी, पळशीकर यांचे लेख, दिवाकरांच्या नाट्यछटेवरील चर्चा, संगीत नाटकांची समीक्षा, परखड ग्रंथपरीक्षणे, टीका यांमुळे आजही वाङ्मय अभ्यासकाला 'रत्नाकर' उपयोगी ठरतो. पाच विशेषांक 'रत्नाकर' ने काढले आणि मनोरंजनसाठी असलेली परंपरा चालू ठेवली. न. चिं. केळकर विशेषांक, गंधर्व विशेषांक, महिला विशेषांक, शिवोत्सव विशेषांक, सयाजीराव गायकवाड विशेषांक असे विविध विशेषांक 'रत्नाकर' चे निघाले. ना. सी. फडके, के. नारायण काळे, रा. ग. हर्षे, न. रा. पारसनीस, प्र. के. अत्रे, वि. बा. आंबेकर असे अतीरथी संपादक या नियतकालिकाला लाभले.

'रत्नाकर' चा काळ १९२५ ते १९३३ असा आठ वर्षाचाच होता. या अल्पावधीत त्याने केलेली कामगिरी विशेषच महत्त्वाची ठरते.
या कालखंडातील काही इतर नियतकालिके.

विद्यासेवक (१९२४ ते १९२९) :

महाराष्ट्रीय ज्ञानकोशमंडळाचे मुखपत्र म्हणून 'विद्यासेवक' पुण्याहून निघत असे. यशवंत रामकृष्ण दाते हे याचे संपादक होते. आणि श्रीधर व्यंकटेश केतकर प्रकाशक होते. ज्ञानकोशाला साहाय्यक होईल अशा साहित्याला साहजिकच प्राधान्य या दुयांनी दिले. केतकरांच्या कादंबऱ्या यातून प्रसिद्ध झाल्या.

अरुणमाला : मो. ग. रांगणेकरांनी हे नियतकालिक मुंबईतून कथा, कविता, परीक्षणांसाठी १९२४ पासून ३० पर्यंत सहा वर्षे चालविले.

रसवन्ती : पुण्याहून प्रसिद्ध होई. विशेष म्हणजे गोपाळ गोविंद अधिकारी संपादक असलेल्या या मासिकाने कवितांना प्राधान्य दिले. रसवन्तीच्या जुलै १९२५ च्या अंकात केशवकुमारांच्या काही विडंबनकविता प्रसिद्ध झाल्या. अगदी सहा, सात महिने हे मासिक चालले.

यशवंत : 'रसवन्ती' मध्ये कवितांना खास स्थान होते, तर 'यशवंत' ने लघुकथांना प्राधान्य दिले. वाचकांचा बहुश्रुतफणा वाढावा म्हणून आणि स्वदेश, स्वधर्म, स्वभाषा यांना जगात मान मिळावा या उद्दिष्टाने, स. आ. जोगळेकर, वा. प्र. ओक, य. रा. फडके यांनी हे मासिक १९२८ मध्ये काढले. १९५० पर्यंत हे चालले. १९३१-३२ मध्ये मराठीतील पहिली लघुकथा स्पर्धा 'यशवंत' ने घेतली. मराठीतील पहिला कथा विशेषांक काढला.

प्रगति (१९२९ ते १९३२) :

हे साप्ताहिक होते. कर्नाटक संघातर्फे हे प्रसिद्ध होई. गं. दे. खानोलकरांच्या साहाय्याने त्र्यं. शं. शेजवळकरांनी हे संपादीत केले. वैचारिक क्रांती हे या साप्ताहिकाचे उद्दिष्ट होते. पुढे सरकारी रोष होऊन ते साप्ताहिक बंद पडले.

प्रतिभा : जानेवारी १९३३ मध्ये म्हणजे 'प्रगति' बंद पडल्यावर गं. दे. खानोलकरांच्या संपादकत्वाखाली 'प्रतिभा' हे पाक्षिक निघाले. खरे तर 'गं. दे.' बरोबर के नारायण काळे, वि. ह. कुलकर्णी हे दोघेही संपादक होते. साहित्य समीक्षा, वाङ्मविषयक प्रश्नांची चर्चा करण्यासाठीच खास या पाक्षिकाचा जन्म झाला. हे मुंबईहून प्रसिद्ध होई.

'प्रतिभे' चे वाङ्मयीन कार्य मोठे आहे. मर्ढेकर, यशवंत, पु. शि. रेगे, अनिल, इदिरा संत यांच्या कविता 'प्रतिभे' तून प्रसिद्ध झाल्या. १९३० नंतर वाङ्मयीन दर्जेठदार लेखन होऊ लागले होते. त्याची साक्ष 'प्रतिभे' तून काढता येते. वामनराव चोरघडे, वि. स. खांडेकर, य. गो. जोशी, ना. सी. फडके, कुसुमावती देशपांडे, पु. भा. भावे इत्यादी चांगल्या कथाकरांच्या कथा 'प्रतिभे' त आवर्जून प्रसिद्ध झाल्या. कॅप्टन लिमये यांच्या विज्ञानकथा, भा. रा. भागवत यांच्या बालकथा, रशियन ब्रिटीश अमेरिकन कथांची भाषांतरे, विनोदी कथा, वामन मल्हार जोशी यांची 'इंदू काळे- सरला भोळे' ही महत्त्वपूर्ण कांदबरी, प्रभाकर पाध्यांची समीक्षा असे विविध स्वरुपाचे महत्वाचे लेखन 'प्रतिभे' ने प्रसिद्ध केले. सावरकरांवर-केतकरांवर विशेषांक काढले. वेगवेगळे वाङ्मयीन वाद या पाक्षिकातून खेळले गेले. वाङ्मयातील श्लीलाश्लील वाद, कला जीवनवादी की रंजनकलावादी इत्यादी वाद फारच गाजले. वा. ना. देशापांडे यांनी 'प्रतिभेच्या न्यायमंदिरात रामशास्त्री' हे सदर चालवून वाङ्मयीन घडामोडीची सातत्याने दखल घेतली हे विशेष.

साहित्येतर कला आणि त्या त्या प्रांतातील घडामोडींचाही आढावा 'प्रतिभा' घेत असे.

विहंगम :-

जुलै १९३३ मध्ये म्हणजे 'प्रतिभे' च्याच कालखंडात नागपूरहून हे नियतकालिक सुरु झाले. यांचे संपादक यादव मुकुंद पाठक होते. १९३८ पर्यंत म्हणजे पाच वर्षाच्या या कालिकांच्या आयुष्यात 'विहंगम' ने अनेक सदरे चालविली. भाषांतर रुपांतरावर भर दिला. 'प्रमुख मराठी नियतकालिकांच्या ध्येयधोरणांचे विहंगमावलोकन' 'नागपुरातील काही अस्तगंत मासिके' इत्यादी लेख प्रसिद्ध करुन नियतकालिकांच्या इतिहासाची दखल घेतली. नियतकालिकांच्या अभ्यासकला उपयोगी असे हे चांगले लेख आहेत. 'मी आणि माझे कादंबरीलेखन' असा विषय घेऊन निर्मितीप्रक्रियेचा शोध घेणारी चर्चा या मासिकाने केली. या चर्चेत ना. सी.

फडके, वि. स. खांडेकर, वामन मल्हार, ग. त्र्यं. माडखोलकर प्रभृती सहभागी झाले. 'विहंगम'ने गुजरात अंक, वंकिम-बंग असे विशेषांकही काढले.

याच काळातील इतर नियतकालिके पाहाण्याआधी थोडे थांबून वेगळे वाङ्मयप्रवाह मराठीत आणणाऱ्या काही मोजक्याच नियतकालिकांची दखल थोडक्यात घ्यायला हवी.

दलितांची नियतकालिके:-

दलितांच्या सामाजिक जीवनांचे पुनरुत्थान घडविण्याच्या भूमिकेतून दलितांचे पहिले मासिक १९०८ साली निघाले.

१) सोमवंशीय मित्र : १ जुलै १९०८ रोजी शिवराम जानबा कांबळे यांनी या मासिकाची स्थापना केली. दोन वर्षे हे चालले. 'पर दु:ख जाणे तोचि मित्र खरा' तुम्ही त्याला धरा ह्दयी हो! हे याचे बोधवचन होते. ब्रिटीशांचे राज्य हे हिंदू अस्पृश्यांना मिळालेले एक वरदान आहे, ही संपादकांची ठाम भूमिका होती. 'आमच्या सुधारणेसाठी सरकारने काय करावे?' 'फुकट आणि सक्तीचे शिक्षण' इत्यादी अग्रलेख शिवरामांनी लिहिले. 'व्यभिचार', 'विवाहोत्पत्ती', 'बहुभार्यत्व', 'बहुभर्तृकत्व' इत्यादी विषयांचे विवेचन यातून आले. यात 'प्रासंगिक विचार' येत हाकता, कवितांना प्रसिद्धी दिली जाई. पदे, कटाव, लावणी असे कवितावैचित्र्य प्रसिद्ध झालेल्या कवितांत आढळते. प्रबोधन व मनोरंजन हा हेतू होता. 'दारुवरची लावणी' ('बाटबाईची आरती' इत्यादी मद्यपान निषेधाच्या कविता; यात प्रसिद्ध झाल्या. 'मनाला आपल्या आधीन करून घेण्यासाठी विद्यसारखी दुसरी वस्तु नाही', 'आपल्या प्राप्तीकडे पाहून खर्चाचे भान ठेवा' इत्यादी सुविचार ठळकपणे देण्यात येत. 'सोमवंशीय मित्र' ला महार समाजाप्रमाणेच चांभार समाजानेही आश्रय द्यावा, अशी पत्रे यात छापली गेली. लोक काय बोलतात हे बातम्यांचे सदर त्यात असे - या बातम्यात भाष्यही काही वेळा असे. उदा.: 'येवल्यास एका पन्नास वर्षाच्या म्हाताऱ्या रंगाऱ्याने दहा वर्षाच्या मुलीबरोबर मोहोतर लावले. रंगारी ज्ञातीत प्रौढविधवा नाहीत काय? असा प्रश्न येतो.

२) निराश्रित हिंद नागरिक हे साप्ताहिक किसन फांगू बंदसोडे यांनी साप्ताहिक याच काळात चालवले. दलितोद्धारकांची भाषणे यात प्रसिद्ध होत. वाचकांची पत्रे येत. ही पत्रे प्रामुख्याने 'मूकनायक' या पाक्षिकाची पार्श्वभूमीच म्हणावी लागते.

३) मूकनायक : १९२० मध्ये मुंबईला डॉ. भीमराव आंबेडकरांनी 'मूकनायक' हे पाक्षिक सुरू केले. वर्षानुवर्ष गुलामगिरी सहन करणाऱ्या समाजाचे नेतृत्व या नियतकालिकाने मोठ्या निर्धाराने केले.

"काय करु आता धरुनिया भीड ! नि:शंक हे तोंड वाजविले, नव्हे जगी कोणी मुकियांचा जाण ! सार्धक लाजून नव्हे हित ।" हे या नियतकालिकाचे ब्रीद्वाक्य होते. हिंदूसमाजातील अनिष्ट परंपरांवर वैचारिक हल्ला करण्यासाठी या पाक्षिकाचा जन्म झाला. याचे संपादकद्वय भटकर आणि घोलप होते. परंतु पहिले तेरा संपादकीय लेख बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिले होते. 'हे स्वराज्य नव्हे, हे तर आमच्यावर राज्य !' यांसारख्या लेखांनी हे पाक्षिक गाजले. अन्यायाविरुद्ध बंड करण्याचे बळ 'मूकनायक' ने दिले.

४) बहिष्कृत भारत :- १९२० साली अमरावतीहून म. अ. गवई यांनी हे मासिक सुरू केले. त्याचा पहिला अंक नमुना अंक म्हणून प्रसिद्ध झाला. पहिल्या अंकात सनातनी ब्राम्हणांना टोले देणारी वचने होती, आक्रमक चित्र होते. लोकांना ते प्रक्षोभक वाटले असावे. दुसऱ्या अंकापासून वचने, चित्रे बंद झाली आणि मुद्रणस्थळही बदलले. बाबासाहेबांनी तेहतीस अग्रलेख, एकशे पन्नास स्फुटलेख यात लिहिले. महाडच्या चवदार तळ्याच्या चळवळीनंतर तीन अग्रलेख लिहिले. 'महार आणि त्यांचे वतन' वर चार अग्रलेख, 'अस्पृश्यनिवारणाचा पोरखेळ,' 'समाजसमतेचे विरोधक' आदी लेख लिहिले. प्रासंगिक स्फुटलेखनात 'ब्राम्हण उष्टे खाल्यान स्पृश्य ते स्पृश्यच' सारख्या लेखांच्या समावेश होतो.

'विचारविनिमय' आणि 'विविधविषयसंग्रह' ही लोकोपयोगी प्रबोधनात्मक दोन सदरे यात असत. या सदरात अन्य अस्पृश्योद्धरक लेखन करीत, डॉ. मुंजे, तात्यासोहब केळकर, स्वामी श्रद्धानंद, बट. जयकर, म. शिंदे, लाला लजपतराय, पानगल राजा यांसारख्या दलितांविषयी कणव असणाऱ्या व्यक्ती, त्यांचे परखड विचार आणि प्रसंगी काहींची भाषणे; यांचाही या सदरात समावेश करण्यात आला. विशेष म्हणजे 'लोकहितवादींची पत्रे' या स्वतंत्र सदरातून 'प्रभाकर' मधील आठ ? ? पुनर्मुद्रित केली. 'आत्मपरिचय', 'आमची जखम' ही आणखी काही सदरे. यात विचार प्रवर्तक कोपरखळ्याही असत. उदा.: 'नागपूरच्या भिडे कन्याशाळेत अस्पृश्य मुली शिकण्यास आहेत..... मुंबईकर हा धडा घेतील काय ?' इ.

५) १९२४ साली तीन नियतकालिके उदयास आली. शिवराम जानबांचे 'आदिहिंदू' हे साप्ताहिक, मुंबईच्या म. अ. कांबळे यांचे 'आत्मोद्धार' हे मासिक आणि दा. ना. पटवर्धन यांचे 'अस्पृश्यतानिवारण' (मुंबई) हे साप्ताहिक अशी ही तीन कालिके निघाली.

६) १९२६ साली दा. म. शिर्के यांनी कोल्हापूरहून 'गरूड' साप्ताहिक सुरू केले. हे बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांना वाहिलेले होते. ते बावीस वर्षे चालले.

७) 'बहिष्कृत भारता' नंतर बाबासाहेबांनी 'समता' पाक्षिक सुरु केले.

समता : 'समाज-समता संघा' चे मुखपत्र म्हणून १९२७ साली सुरू झाले. पहिल्यास अंकात पहिल्या पानावर संपूर्ण पानभर 'समतेचा उदय' ही कविता प्रसिद्ध झाली. प्रत्येक अग्रलेखाचा शिरोभागी महाभारतातील 'यदन्यैविहितं नेच्छेदात्मनः कर्म पुरुषः । .... ' हा श्लोक बायबलमधील संदेश असे. वेदाचा अर्थ आणि समतेचा मार्ग, 'शहाण्याच्या वेडगळ कुशंका,' 'समतेच्या तत्वांची चर्चा' असे अग्रलेख यातून प्रसिद्ध झाले. 'शुद्धीचे खूळ' हिंदुसमाजाला जडलेला महारोग' इत्यादी लेख वाचनीय आहेत. 'वेगळा मतदारसंघ का? चा ऊहापोह या कालिकातून झाला. पण 'समता' ही अल्पायुषी ठरले.

८) दलितबंधु : 'दलितबंधु' हे साप्ताहिक पां. ना. राजभोज यांनी पुण्याहून १९२७ साली सुरू केले ते वीस वर्षे चालले.

पद्दलित तितुका मेळवावा । जातिभेदही नष्ट करावा।
समतेचा पुकार करावा । राष्ट्रोन्नतीसाठी ।। हे याचे ब्रीदवाक्य होते.

'आंबेडकरांची मनोवृत्ती' सारख्या लेखातून धर्मांतराच्या चळवळीवर प्रकाश टाकला आहे. 'स्फुटविचार', हे 'दलितबंधु,' ने चालविलेले सदर लोकप्रिय होते. 'धर्मांतराचा बॉम्ब,' 'दिल्ली फार लांब', सारखी वेधक शीर्षक आढळतात 'दलितवार्ता' प्रसिद्ध होत.

९) या शिवाय सव्वीस वर्षे चाललेले 'जनता', १९३१ साली सुरु झालेले 'चोखामेळा,' १९३६ मध्ये केशव नारायण देव उर्फ पतितपावनदास यांनी नागपूरहून सुरु केलेले 'पतितपावन' नावाचे साप्ताहिक यांची नोंद घ्यावी लागते.

पतितपावन : वितळोनिं भेदसार स्पृश्यास्पृश्यासि ऐक्य नांदून पतितपावना होवो भूमाता ही प्रसन्न स्वाधीन' हे वचन प्रत्येक अंकावर छापलेले असे. 'बहिष्कृत भारत' बंद पडल्यामुळे 'पतितपावन'ला आपल्या खांद्यावर धुरा घ्यावी लागली असा संपादकांचा दावा होता.

१०) दलितसेवक : १ जून १९४१ रोजी काकासाहेब बर्वे यांनी हे मासिक धुळे येथे सुरू केले. हरिजन सेवा संघातर्फे ते प्रसिद्ध होई. महात्मा गांधीच्या विचारसरणीच्या पुरस्कार करत हे मासिक वीस वर्षे चालले. सामाजिक समस्यांवर यातून भर दिला जाई. अठ्ठावीस पानांचे हे मासिक पुढे चार, सहा पानांचे पाक्षिक झाले. 'भंगीकाम कधी सुधारणार', 'हरिजनांची सनद', 'धर्मसमीक्षा', 'धर्म आणि व्यवहार' इत्यादी लेख यांतून प्रसिद्ध झाले. विशेष म्हणजे या कालिकातून भाषाविचार झाला. 'लोकभाषांतून शिक्षण', 'इंग्रजीच्या अभ्यासाचा प्रश्न', 'भाषिक प्रांत का हवेत?' इत्यादी लेख प्रसिद्ध झाले. याचबरोबर 'दलितसेवक'ने; काही कथा, बऱ्याचशा कविता, काही एकांकिका, काही कीर्तने प्रसिद्ध केली. त्यात अर्थातच

दलित समस्यांचा विचार असे. रविन्द्रनाथ टागोरांच्या कथांचा स्वैर अनुवाद 'पहिले पूजा', 'जात नको, पाणी हवे', 'श्री रामानुजाचार्य' इत्यादी कथांतून आला आहे. 'प्रभातफेरी गीते', ही 'दलितसेवक' देत असे. 'स्वातंत्र्य सौख्य लाभो', 'मानवताधर्म,' 'उच्चनीच नाही कुणी' इत्यादी प्रभातफेरीगीते लोकप्रिय होती. 'पाणी पाजा', 'एकनाथ महाराज' इत्यादी एकांकिका प्रभावी होत्या.

दलित नियतकालिकांचे सार : या सगळ्याच नियतकालिकांतून विविध स्तरावरील जागृती करण्याचा दलित पत्रकारांचा प्रामुख्याने प्रयत्न होता. विवाहसंस्थेविषयी विचार, रुढी-परंपरांचा निषेध, सरकारला विनंती, विद्येचे महत्व, स्त्रीशिक्षणाचे महत्त्व, समतेचा आग्रह, उणिवांचे उच्चाटन, व्यक्तीपरिचय करणे वैचारिक घुसळण करणे यांभोवती ही नियतकालिके फिरतांना दिसतात. ब्रिटीश सरकार हे त्यांना वरदान ठरले. 'सोमवंशीय मित्र' मधून स्त्रीजीवनाची दुर्दशा सांगणारी शीवुबाई जाधव अअणि सुंदराभाई यांची म्हणजे स्त्रियांची पत्रे प्रकाशित झाली, हे विशेष मानावे लागते. १९०८, १९०९ मध्ये ही पत्रे प्रकाशित झाली आहेत, एकूणच या दलितांच्या नियतकालिकांचा रोख आत्मोद्धर हा आहे. त्यासाठी वैचारिक जाग ते आणतात, सुधारणांचा आग्रह धरतात. कथा, कविता हे प्रकारही याच बाबींचे माध्यम म्हणून येतात.

यानंतर १९३५ च्या आसपास निघालेल्या महत्त्वाच्या काही नियतकालिकांची माहिती करून घेऊ.

परिजात - जानेवारी १९३४ ते फ्रेब्रुवारी १९३५ या कालावधीत हे नियतकालिका निघाले र. ज. सामंत, वा. रा. ढवळे आणि वा. ल. कुळकर्णी ही संपादकत्रयी मुंबईला हे 'परिजात' प्रसिद्ध करीत असे. वाङ्मयाला प्राधान्य देऊन अभिरूची तयार करण्यासाठी या कालिकाने प्रयत्न केले. वा. ल. कुळकर्णी, वा. रा. ढवळे यांनी वाङ्मयीन प्रश्नांवर टीपणे केली आहेत. 'कोल्हटकर विशेषांक 'पारिजात' ने काढला.

मनोहर-१९३४ पासून किर्लोस्करवाडीहून शं. वा. किर्लोस्कर 'मनोहर' प्रसिद्ध करू लागले. कौटुंबिक स्वरुपाला प्राधान्य देऊन त्यांना 'किर्लोस्कर', 'स्त्री' काढले, तसेच 'मनोहर'ही काढले. कुटुंबातील मंडळींचे मनोरंजन करणे आणि विनोदवृत्तीचा परिपोष करणे या हेतुने हे मासिक सुरू झाले. याचा गोमंतक साहित्य-विशेषांक उल्लेखनीय आहे. या कालिकातील प्रवासवृत्त, लेख, परभाषासहित्यवृत्त या कालिकातील वाचनीय होती.

कला-१९३५ एफ. बाबूराव आगशीकर यांनी हे नियतकालिक १९३५ मध्ये पणजीहून चालवले. काणेकर व फडके यांचे लघुनिंबध यातूनच प्रकाशित झाले. वाङ्मयीन प्रश्न हाताळण्यासाठी 'फूल आणि काटा' हे सदर असे. 'महिला विशेषांक' या मासिकाने काढला. दिवाळी अंक निघे. १९६० पर्यंत हे चालले.

सह्याद्रि - हे मासिकही १९३५, सालीच पुण्यातून सुरू झाले. संशोधनलेख, विनोद, संभाषणे, नाट्य, प्रवासलेख, कल्पित प्रसंग, परीक्षणे, चर्चा, निंबध, कविता असे विविध प्रकारचे लेखन यात येत असे. १९५७ पर्यंत हे चालू राहिले, मध्ये खंड पडून पुढे १९५४ मध्ये ते पुन्हा सुरू झाले. 'सह्याद्रि' ने भरपूर विशेषांक काढले. 'भाषा-भागिनी विशेषांक', 'कला विशेषांक', 'महारष्ट्र रंगभूमी अक', 'केळकर अंक' अशी विविधता त्यात होती.

ज्योत्स्ना - १९३६ च्या मे मध्ये अनेकांनी पुढाकार घेऊन हे मासिक मुंबईला सुरू केले. वि. स. खांडेकर, खं. सा. दौंडकर हे सुरूवातीचे संपादक होते. त्यांच्याबरोबरीने वा. रा. ढवळे, ना. त्र्यं. माडखोलकर, प्रभाकर पाध्ये, वि. हा. कुलकर्णी, कवी यशवंत संपादन विभाग सांभाळीत, साक्षेपी दृष्टिकोन असलेले हे मासिक संपूर्ण वाङ्मयाला वाहिलेले होते. विविध भाषांतील साहित्यविचार, औपरोधिक विचार, वाङ्मयविचाराचा मागोवा ही 'ज्योत्स्ना' ची वैशिष्ट्ये होती. 'हिरवा चाफा', ही खांडेकरांची, वि. वा. आंबेकरांची 'काळे ढग' या कांदबऱ्या 'ज्योत्स्ने' मधून क्रमशः प्रकाशित झाल्या. कवितांना 'ज्योत्स्ने त आवर्जून स्थाने दिले जाई. अनंत काणेकर, मुक्तीबोध, अनिल, कुसुमाग्रज, पु. शि. रेगे, बा. भ. बोरकर इत्यादी या काळात गाजलेल्या कविंच्या कवितांना, 'ज्योत्स्ना' ची बैठक होती. लघुकथा यातून प्रसिद्ध झाल्या. नाट्यछटाकार दिवाकर, लोकनायक अणे, माधवराव पटवर्धन यांच्यावर 'विशेषांक' 'ज्योत्स्ना' ने काढले.

समीक्षक - १९४० ते १९४१ सप्टेंबर या कालखंडात हे पाक्षिक होते. पुढे १९४१ च्या ऑक्टोबरपासून १९४६ पर्यंत हे मासिक म्हणून निघू लागले. दि. वि. आमोणकर, गं. दे. खानोलकर यांनी संपादकांची धुरा वाहिली. हे मुंबईहून निघत असे. साहित्यातील नवविचारांना चालना देणे, हा याचा हेतू होता. साहित्यसंमेलनाची भाषणे टीपांसह प्रसिद्ध करणे, वाङ्मयीन समालोचन करणे, साहित्यिकांशी मुलाखतवजा गप्पागोष्टी करणे हे 'समीक्षक' चे कार्य होते. पुढे संपादकमंडळात वा. ल. कुळकर्णी आले. आणि ललित साहित्याला अधिक प्राधान्य मिळू लागले. ना. मा. संत, कुसुमावती देशपांडे यांचे ललितंनिंबध 'समीक्षक' मधून प्रसिद्ध झाले. अनिल, यशवंत, ना. घ. देशपांडे, कुसुमाग्रज, बोरकर, निकुंब यांच्या कविता 'समीक्षक' मधून आल्या. 'साहित्यातील विवादस्थळे' हे वा. ल. कुळकर्णीचे सदर वैशिष्ट्यपूर्ण होते - रा. ग. गडकरी यांच्यावर 'नाट्यसंमेलना'वर 'लघुकथे'वर 'समीक्षक' चे विशेषांक निघाले. 'समीक्षा', 'ज्योत्स्ना', 'अभिरुची' सारख्या वाङ्मयीन मासिकांनी 'सत्यकथे' ची पार्श्वभूमी तयार केली.

अभिरुची - (१९४३ ते जानेवारी १९५१)

पु. आ. चित्रे, विमल चित्रे, मंगेश विठ्ठल राजाध्यक्ष हे यांचे संपादक होते. बडोद्याला नोकरी निमित्ताने गेल्यावर चित्रे मदतीने राजाध्यक्ष यांनी यांच्या

'अभिरूची'ची कल्पना मांडली आणि हे मासिक बडोद्याहून सुरू केले. साहित्य व कला यांना वाहिलेले हे मासिक होते. कथा, कविता, विविध भाषांतील साहित्य, नव्या साहित्यावर अभिप्राय, मते-मतांतरे, पत्रे, कलास्वाद यांतून प्रसिद्ध होई. अनिल, पोवळे निकुम्ब, पु. शि. रेगे यांच्या कविता अभिरुची' तून पुढे आल्या. उत्कृष्ट कथालेखनासाठी या मासिकाने बक्षिसे ठेवली. व्यंकटेश माडगूळकर यांची 'काळ्या तोंडाची' ही अभिनव कथा, गंगाधर गाडगीळ यांची कथा बक्षिसपात्र ठरल्या. अभिरुचीने विनोदी लेखनासाठी अभिनव प्रयोग केला. अळुरकर, मंगेश विठ्ठल राजाध्यक्ष आणि पु. ल. देशपांडे यांनी 'पुरुषराज अळूरपांडे, मौजे पारलई' या नावाने सामाईक विनोदी लेखन केले. वा. लं. चा गडकऱ्यांवरील समीक्षात्मक चिकित्सालेख फार गाजला. 'अभिरुची' ने मराठी वाचकांवर वाङ्मयीन संस्कार केले.

'साहित्य' - जानेवारीच्या १९४७ मध्ये 'मुंबई मराठी साहित्य संघा'तर्फे हे सुरू झाले. १९५० पर्यंत चालले. पुन्हा १९६१ मध्ये सुरू होऊन आजही हे त्रैमासिक या स्वरुपात चालू आहे. सुरुवातीला हे द्वैमासिक होते. वाङ्मयीन व्यासपीठावरील भाषणे, साहित्य संमेलनातील अध्यक्षीय भाषणे, इतर भाषातील वाङ्मयप्रकाराचा आढावा घेणे, हे कार्य; 'साहित्य'ने वा. रा. ढवळे यांच्या संपादकत्वाखाली केले. दर्जेदार सुटसुटीत असे हे द्वैमासिक संघाचे मुखपत्रही होते. यात खांडेकर, गुर्जर, काणेकर, गाडगीळ यांच्या कथा त्या काळात प्रसिद्ध झाल्या. यात 'व्यासपीठ' नावाचे सदर येई. त्यात नवकथेवर चर्चात्मक विवेचन प्रसिद्ध झाले. रा. भि. जोशी यांचे प्रवासवर्णनात्मक 'वाटचाल' मधील लेखन 'साहित्य' मधून प्रसिद्ध झाले. गो. वि. करंदीकरांचे मोजकेच ललित निंबधही प्रसिध्दीस आले. साहित्य संघाला नाट्याविषयी आस्था असल्याने 'साहित्य' ने नाट्यमहोत्सव विशेषांक प्रसिद्ध केले. साहित्यिकांची एक एक फळी घेऊन 'पहिल्या पिढीचे आत्मकथन', 'दुसऱ्या पिढीचे आत्मकथन' अशा साहित्यनिर्मितीचा मागोवा घेणाऱ्या, नामवंत लेखकांच्या प्रतिक्रिया प्रसिद्ध केल्या. काही लेखांचे, काही भाषणांचे पुनर्मुद्रण केले.

युगवाणी - १९४६ पासून सुरू झालेले हे मासिक मध्यंतरी खंडीत होऊन पुढे १९६७ पासून परत चालू झाले. अमरावतीहून हे प्रसिद्ध होई. संपादक वा. ना. देशपांडे होते. 'बी' कवींचा विशेषांक निघाला. साहित्यिकांचा परिचय, प्रबंध यातून प्रसिद्ध होत. या काळातच पुढे (१९४५) पासून अनुराधा, स्त्री, ललना, माहेर, प्रपंचसारखी घरगुती मासिके निघाली - स्त्रीजीवनाशी निगडीत विषय घेऊन कथा-कविता इ. मनोरंजनासह काही दिग्दर्शन करणे, हा या नियतकालिकाचा हेतू असे.

नवभारत - ऑक्टोबर १९४७ पासून चालू असलेले हे मासिक स्वतःची मोहोर उठवणारे. १९४० नंतर 'मर्ढेकर'युग आले. साहित्यातील सौंदर्याचा वेगवेगळ्या तऱ्हेने अभ्यास सुरू झाला. कांट-हेगेलची सौंदर्यमीमांसा मराठी साहित्यात आली.

या अंगाने विचार करणे, समीक्षा करणे ही 'नवभारत' ची विशेष कामगिरी होय. शं. द. जावडेकर, स. ज. भागवत, हरी कृष्ण सोहनी, वि. म. बेडेकर हे याचे संपादक मंडळ, यांनी पुण्याहून 'नवभारत' सुरू केले. याची मालकी 'सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाले'च्या विश्वस्त मंडळाकडे होती. लेख, लघुकथा, कविता, एकांकिका, चर्चा, परिचय व परीक्षण इत्यादी लेखन यातून प्रसिद्ध झाले आहे. महाराष्ट्रातील जीवनाचा आणि संस्कृतीचा विकास करण्याचा हेतूने हे सुरू केले. साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून 'नवभारत'ने आचार्य जावेडकर विशेषांक काढला.

'सत्यकथे' ची पार्श्वभूमी :

'ज्योस्ना', 'साहित्य', 'अभिरुची', 'प्रतिभा' इत्यादी मासिकांनी फार मोठे साहित्यिक कार्य केले. नियतकालिकांची प्राथमिक अवस्था संपून त्यांना स्वतःचे व्यक्तिमत्व प्राप्त होण्याचा हा (१९४० नंतरचा) कालखंड होता. त्याला सामाजिक, सांस्कृतिक पार्श्वभूमीही होती. जीवनमूल्ये, जीवननिष्ठा बदलण्याचा हा काळ होता. प्रत्येक क्षेत्रात नवीनता, पडझड, चढाओढ निर्माण झाली होती. आयुष्य अधिक गतिमान होत होते. यंत्राबरोबर बांधले गेले होते. नागरसंस्कृती तयार होत होती. शिक्षणाच्या नव्या दिशा कळत होत्या. आर्थिक उत्क्रांती होत होती. स्वातंत्र्यसंग्रामाला जोश होता. जातीयता विषासारखी भिनत होती, मधूनच उफाळत होती. एकूणच माणसाचे, मराठी माणसाचे अनुभवविश्व बदलत होते. अधिक समृद्ध होत होते. नैराश्य, व विराणताही ग्रासत होती. रोखठोकपणाकडे अभिव्यक्तीच्या कल झुकत होता. माणसाला समजून प्रादेशिकता येत होती. साहित्यात पाश्चात्य साहित्याचा चिकित्सक अभ्यास घडत होता. नवीन दिशा मिळत होत्या. नवीन लेखक, समीक्षक घडत होते.

एकूणच मराठी साहित्यजगत् वेगळे रूप धारण करत होते, याची साक्ष 'ज्योत्स्ना', 'अभिरुची' आदी मासिके देतात.

या पार्श्वभूमीवर अगदी अलीकडेपर्यंत म्हणजे गेल्या दशकापर्यंत चाललेल्या 'सत्यकथा' या द्वैमासिकाचा विचार करावा लागेल.

सत्यकथा :

नोव्हेंबर १९३३ला हे मासिक मुंबईहून मो. ग. रांगणेकर यांनी सुरू केले. सुरुवातीला याचे स्वरुप थोडे वेगळे व प्राथमिक अवस्थेतील होते. मानवी जगातील अद्‌भुतरम्य घटनांवर आधारलेल्या सत्यकथांचा यात अंतर्भाव होता. मनोरंजन करणे आणि अद्‌भुत वाटणारी माहिती देणे, हे 'सत्यकथे' चे कार्य होते. पुढे तीन वर्षांनी भागवत बंधुद्वयांनी 'सत्यकथा' विकत घेतले. आर्थिक संक्रमणाचा हाही परिणाम दिसतो. भागवतबंधुंना चित्रपट क्षेत्रातील साहित्यप्रेमी ग. रा. कामत मदत करीत. पुढे १९४३ पासून 'सत्यकथा' आमूलाग्र बदलली.

१९४३ पासून नवप्रयोगांना 'सत्यकथे' त स्थान मिळू लागले. १९४५ चा दिवाळी अंक हा 'कथाविशेषांक' आहे. त्याआधीचा १९४४ चा दिवाळी अंक 'चित्रपट विशेषांक' आहे. नाट्यमहोत्सवाला संपूर्ण अंक देणे, भाषांतरीत कथांना विशेष स्थान देणे, 'आजकालचे कवी', 'आजकालचे लेखक' सारखी खास लेखमाला देऊन समीक्षेला समृद्ध करणे, हे 'सत्यकथेने जाणीवपूर्वक केले. बा. सी. मर्ढेकरांची कविता, त्यांची टीपणे, इंदिरा संत, मंगेश पाडगावकर, 'संजीवनी', शांता शेळके, बा.भ. बोरकर, पु. शि. रेगे, कुसुमाग्रज आदी कवींच्या कविता 'सत्यकथे'तून सातत्याने आल्या आणि त्यांनी मराठी कविता घडवली. कथेच्या बाबतीतही तेच झाले. वामन चोरघडे, वि. सी. गुर्जर, वि. स. खांडेकर यांच्या कथांना 'सत्यकथे' ने प्रसिद्धी दिलीच, पण त्याच जोडीने नव्या दमाने लिहिणाऱ्या नवकथाकारांना प्रकाशात आणले. व्यंकटेश माडगूळकरांना लिहिते केले 'सत्यकथेने'. गंगाधर गाडगीळ, पु. भा. भावे, अरविंद गोखले हे बिनीचे नवकथाकार 'सत्यकथे' तूनच पुढे आले. वैचारिक, सामाजिक चिंतन करणाऱ्या लेखांना, चित्र - संगीत इत्यादी कलांवरील नवीन विवेचनावर भर देणाऱ्या लेखांना 'सत्यकथा' प्रसिद्धी देई. वाङ्मयीन पुरस्काराच्या बातम्या छापी. साहित्यिकवाद प्रसिद्ध करी. एकूणात जाणीवपूर्वक साहित्यविषयक विशिष्ट भूमिका घेऊन, सत्यकथेने कामगिरी बजावली.

इथून पुढे अनेक मासिके निघालेली दिसतात. 'किर्लोस्कर', 'स्त्री' च्या उल्लेख केलेलाच आहे. विशिष्ट ज्ञातीपुरती मर्यादीत अशी मासिकेही निघाली. उदा. १९२३ साली 'पाठारे प्रभु', ज्ञातीकरिता मुंबईत, 'प्रभुप्रभात' व 'प्रभुतरण' अशी मासिके निघाली. आजही ती चालू आहेत.

'मुंबई मराठी साहित्य संघा'च्या 'साहित्य' चा उल्लेख केला. तसेच रूप 'महाराष्ट्र साहित्य परिषदे' च्या मुखपत्राला 'महाराष्ट्र साहित्य पत्रिके' ला आहे. ही पत्रिका त्रैमासिक आहे. 'मराठी साहित्य परिषद', 'आंध्रप्रदेश' चे मुखपत्र 'पंचधारा' हेही त्रैमासिकच आहे. म्हणजेच साहित्यासंबंधी अनेक महत्त्वाच्या संस्थांनी आपापली मुखपत्रे चालवून, वाङ्मयीन परंपरा सांभाळली आहे. विशेष दिवाळी अंक निघू लागले. म्हणजेच 'वार्षिका' ची परंपराही या कालखंडात सुरू झाली. आज या दिवाळी अंकामध्ये वैविध्य व विपुलता आढळते. दत्तप्रसन्न काटदऱ्यांनी 'वसंत' मासिक वैचारिक दिशा घेऊन चालविले.

सारांश:

१९२० पासूनचा विस्तृत कालखंड अनेक ऐतिहासिक वैशिष्ट्यांमुळे लक्षात रहातो.

१) 'यशवंत', 'प्रतिभा', 'अभिरुची', 'सत्यकथा', अशी दर्जेदार मासिके या कालखंडात निघाली.

२) विविध साहित्यकांना शोधून काढून प्रोत्साहन दिले ते याच मासिकांनी.

३) कथा, कविता, एकांकिका, समीक्षा, चर्चा, मुलाखती, भाषांतर, नवीन साहित्य प्रवाहांविषयी विवेचन, वैचारिक लेखन असे वैविध्य साहित्यात आढळतेच; पण अनेक ही प्रयोग केलेले आढळतात. भाषेचा मूलभूत विचार सौंदर्याच्या अंगाने केलेला दिसतो.

४) वाचकांमध्ये साहित्यविषयक जाण वाढीला लावण्याचे व कुतूहल निर्माण करण्याचे महत्त्वाचे काम या काळातील मासिकांनी केले.

५) कलेकरीता कला की जीवनाकरिता कला, नवमतवाद, साहित्यातील श्लील अश्लीलता, पुरोगामी साहित्य कोणते, यांवर या मासिकांतून वाद खेळले गेले.

६) कादंबरी म्हणजे दीर्घ कथा नव्हे याचे भान या मासिकातून आले. वाङ्मयीन प्रश्नांना दिशा मिळाली.

७) या काळातील मासिकांनी खास 'विशेषांक' प्रसिद्ध केले. गोष्ट, गुजगोष्ट, लघुकथा, नवकथा हा प्रवास कथा विशेषांकातून लक्षात आला किंवा एखादा लेखक विशेषांकातून वेगवेगळ्या दिशांनी तपासला गेला. तीच गोष्ट एकांकिकेसंदर्भात घडला. नाट्यछटा मागे पडली, लोकनाट्याचा बाज पुढे आला.

८) केवळ 'ज्ञानविस्तार', विविध ज्ञानविस्तार हा हेतू वा 'मनोरंजन' हा उद्देश जाऊन वाङ्मयीन 'साहित्या'ची 'अभिरुची' घडत होती, 'प्रतिभा' पाहिली जात होती. वाङ्मयीन प्रकारांचा 'रत्नाकर' वाचकांना सापडत होता. पु. शि. रेंगे यांनी 'सत्यकथेच्या' तोडीचे 'छंद' मासिक चालविले होते. (१९५४)

९) म्हणजेच वाङ्मयीन संस्कृतीची वाटचाल या नियतकालिकांच्या इतिहासातून पाहाता येते.

१०) काही मासिके सहा महिने किंवा चार वर्षे चालून बंद झाली. तरीही त्यांचे वाङ्मयीन व सांस्कृतिक महत्त्व कमी होत नाही.

११) 'सत्यकथे' ने मासिकांचे नवीन युग सुरु केले. ना. सी. फडक्यांचे 'अंजली' हे केवळ कादंबरी देण्यासाठी षण्मासिक निघत असे. (१९५० पासून) १९६० नंतर केवळ वेगवेगळ्या वाङ्मयीन रुपांना वहिलेली मासिके सुरू झाली ती या काळखंडाच्या घडणीमुळे होय.'समीक्षेसाठी वाहिलेले आलोचना' १९६२ मध्ये वसंत दावतरांच्या संपादकत्वाखाली सुरु झाले. ग्रंथजगतातील माहिती देणे आणि प्रचार करणे या साठी 'मॅजेस्टिक' ने १९६४ मध्ये 'ललित' सुरु केले. 'अस्मिता दर्श', आदि साहित्याला वेगळेपणाने स्थान देणारी नियतकालिके निघाली. १९७३ मध्ये 'नाट्यदर्पण' हे नाट्याला वाहिलेले मासिक सुरु झाले.

आज संख्येने विविध प्रकारची मासिके निघत आहेत. त्यांना भक्कम भूमी १९२० ते १९६० मधील मासिकांनी दिली हे या नियतकालिकांचे महत्त्व अनन्यसाधारण म्हणायला हवे.

संदर्बग्रंथ सूची :

१) वृत्तपत्रांचा इतिहास - विनायक कृष्ण जोशी - युगवाणी प्रकाशन, रामचंद्र केशव लेले १९५१.

२) मराठी नियतकालिकांचा इतिहास - रा. गो. कानडे - कर्नाटक पब्लिशिंग हाऊस, मुंबई - १९३८.

३) मराठी मासिकांचे पहिले शतक - बा. द. सातोस्कर - शुभदा सारस्वत पब्लिकेशन, पुणे - १९८६.

४) मराठी नियतकालिकांचा वाङ्मयीन अभ्यास खंड १ (१८३२ ते १८८२) संपादक व दी. कुळकर्णी - श्रीविद्या प्रकाशन, पुणे १९८७.

५) मराठी वाङ्मयाचा इतिहास - संपादक रा. श्री. जोग, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, १९७३.

६) मराठी नियतकालिकांची सूची (१८०० ते १९५०) संपादक शं.ग.दाते काळे, बर्वे, मुंबइ मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई १९६९.

७) विविधज्ञानविस्तार : इतिहास व वाङ्मयविचार - वा. ळ. कुळकर्णी, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई १९७६.

८) मराठी ज्ञानप्रसारक इतिहास व वाङ्मयविचार - वा. ळ. कुळकर्णी, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई १९६५.

९) नियतकालिके (१८७४ - १९२०) - डॉ. शुभांगी वाड यांनी मुंबई विद्यापीठाकरिता काढलेली मार्गदर्शनपर पाठपुस्तिका.

१०) मराठी नियतकालिकांचा वाङ्मयीन अभ्यास खंड दुसरा - (१८८३ - १९३७), संपा. डॉ. उषा मा. देशमुख मुंबई विद्यापीठ आणि स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे १९९४.

११) मराठी नियतकालिकांचा वाङ्मयीन अभ्यास, खंड तिसरा, संपा. डॉ. उषा मा. देशमुख मुंबई विद्यापीठ, मराठीचे अध्यासन; भाषा व साहित्य विभाग आणि स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे १९९५ या खंडातील फक्त 'केरळकोकीळ' हा डॉ. चंद्रकान्त वर्तक यांचा लेख.

❖❖❖❖

१३

साहित्यविचार - साहित्यसमीक्षा (१८७४ ते १९६०)

डॉ. भारती निरगुडकर

उद्दिष्टे :

- १८७४ ते १९४० या कालखंडातील साहित्याविचाराचे, व समीक्षाविचाराचे स्वरूप समजावून घेणे.
- १८७४ ते १९६० या कालखंडात झालेल्या प्रत्यक्ष समीक्षेचे स्वरूप समजावून घेणे.
- या कालखंडातील साहित्याविचार, समीक्षाविचार व प्रत्यक्ष समीक्षा यांवरील संस्कृत व पाश्चात्य सौंदर्यविचाराचा प्रभाव लक्षात घेणे.
- या कालखंडातील विविध वाङ्मयीन वाद समजावून घेणे.
- या कालखंडातील विविध समीक्षकांचे योगदान लक्षात घेणे.
- या कालखडातील साहित्यानिर्मिती व समीक्षा यांतील परस्परपूरकत्व जाणून घेणे.

प्रस्तावना

१८७४ ते १९६० हा कालखंड आधुनिक मराठी साहित्य निर्मितीचा कालखंड म्हणून ओळखला जातो. या कालखंडातील साहित्यविषयक व जीवनविषयक आधुनिक प्रेरणांमुळे साहित्याचे स्वरूप बदललेले दिसते. त्या बदललेल्या, स्वरूपाचा उहापोह अन्य प्रकरणांमध्ये करण्यात आला आहे. नव्या प्रेरणा / जाणिवांतून निर्माण होणाऱ्या साहित्याचे आकलन, मूल्यमापन योग्य रीतीने व्हावे यासाठी साहित्याची समीक्षाही लिहिली जाते. साहित्याच्या एकंदरच स्वरूपाविषयी, निर्मिती व प्रयोजन इ. विषयी मूलभूत प्रश्न उपस्थित केले जातात. तसेच समीक्षेचीही तात्विक बाजू चर्चाविषय होते. या सर्व प्रयत्नांतून त्या त्या काळातील साहित्यविचार, समीक्षाविचार व प्रत्यक्ष समीक्षा यांचा उगम होता.

अव्वल इंग्रजीच्या कालखंडातील साहित्याविचार व समीक्षा

१८७४ ते १९६० या काळातील साहित्यविचार व समीक्षा यांचे स्वरूप पाहण्यापूर्वी १८७४ पूर्वीच्या अशा स्वरपाच्या लेखनाचा परामर्श थोडक्यात घेणे आवश्यक आहे. १८७४ पूर्वीच्या म्हणजे इंग्रजीच्या काळातील साहित्यसमीक्षा संस्थेने अल्प व त्रुटित स्वरूपाची आहे. ती प्रामुख्याने मराठी ज्ञानप्रसार, विविध ज्ञानविस्तार, दंभहारक इ. नियतकालिकांमध्ये सुरू झालेली दिसते. त्याचे स्वरूप प्रामुख्याने पुस्तक परीक्षण हेच होते. 'जयपाळ' नाटकाचे परीक्षण, 'रत्नप्रभा' कादंबरीचे परीक्षण यात परीक्षणाकर्त्यांना त्यात्या वाङ्मयप्रकाराची उत्तम जाण होती हे दिसते. पाश्चात्य साहित्यदृष्टीचा प्रभावही आढळतो. काव्याकडे, भाषांतराकडे पाहण्याच्या दृष्टीवरही हाच पाश्चात्य वाङ्मयाच्या परिशीलनांतून आलेला दृष्टिकोण दिसतो. इतरेच नव्हे तर 'राजा शिवाजी' काव्याची, 'जयपाल' नाटकाची प्रस्तावना या अशा इतर काही प्रस्तावना इंग्रजीत लिहिलेल्या गेलेल्या आढळतात. इंग्रजी भाषेच्या व साहित्यदृष्टीच्या प्रभावातून बाहेर पडण्याचे प्रयत्नही या काळातील अनेक विद्वानांनी केलेले दिसतात. न्या. रानडे यांनी घेतलेला मराठी वाङ्मयाचा आढावा हा मराठी साहित्याचे मोठेपण, वेगळेपण निदर्शनास आणून देणारा व स्वभाषेचा अभिमान जागवणारा महत्वाचा आढावा ठरतो. (१८६५ व १८९८)

रा. भि. गुंजीकर यांनी "काव्यविचार" या लेखमालेसह वाङ्मयविषयक विस्तृत लेखन 'विविध ज्ञान-विस्तारा 'तून केले. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी संस्कृत कविपंचकांचे, मूल्यमापन शालापत्रकातून केले तर दारोबा पांडुरंगांनी मोरोपंतांच्या 'केकावली' वर 'यशोदा पांडुरंगी' ही टीका लिहिली. परशुमपंततात्या गोडबोले यांनी केकादर्श ही टीकाही त्याच सुमारास (१८६७) लिहिलेली दिसते. जुन्या-नव्या काव्याच्या समालोचनाबरोबरच, म्हणजे प्रत्यक्ष टीकेबरोबरच वाङ्मयाविषयक प्रश्नांची संस्कृत भाषेते झालेली जी चर्चा आहे. त्याची विस्तृत चिकिस्ता करणारे काही ग्रंथही या काळात निर्माण झालेले दिसतात. उदा. कृष्णशास्त्री राजवाडे - अलंकारविवेक (१८५३), दाजी शिवाजी प्रधान रसमाधव (१८६८), गणेश शास्त्री - साहित्यशास्त्र (१८६२) परशुरामपंत गोडबोले - वृत्तदर्पण (१८६०) इं. अशा प्रकार पुढील कालखंडातील साहित्य समीक्षेची तुरळक स्वरूपात सुरूवात अव्वल इंग्रजीच्या काळात झालेली दिसते.

१८७४ ते १९६० या कालखंडातील साहित्यविचार व समीक्षा :-

प्रस्तुत काळातील साहित्यविचार १) स्फुट-लेख स्वरूपात, तसेच ग्रंथांच्या प्रस्तावना, ग्रंथपरीक्षणे इ. माध्यमातून २) स्वतंत्र ग्रंथातून खंडन मंडनात्मक पध्दतीने, साद्यंत स्वरूपातही मांडला गेलेला दिसतो. या दोन्ही मार्गांनी साहित्य विषयक उपपत्तींची चर्चा व चिकित्सा हिरीरीने घडलेली दिसते. विष्णुशास्त्री

चिपळूणकरांची 'निबंधमाला' ही जशी आधुनिक मराठी ग्रंथाच्या नव्या पर्वाची सुरूवात ठरते. तशीच ती साहित्याविचार व समीक्षेच्या नव्या पर्वाची सुरवात ठरते.

साहित्य व समीक्षा विचार (तात्विक स्वरूप) आणि प्रत्यक्ष समीक्षा असे सदर विषयाचे दोन वेगळे भाग अभ्यासाच्या सोयीसाठी गृहीत धरता येतील.

साहित्य व समीक्षा विचार :-

विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी 'निबंधमाले' मध्ये 'ग्रंथावर टीका', 'विद्वत्व आणि कवित्व', 'वाचन' 'भाषांतर' इ. निबंधाद्वारे तात्विक समीक्षेचा पाया घातलेला दिसतो. त्यांनी आपल्या वाचकांना वाङ्मयविषमक नवी दृष्टी दिली. अभिजात संस्कृत तसेच पाश्चात्य साहित्यकृतींच्या परिशीलनातून निर्माण झालेली त्यांची साहित्यदृष्टी त्यांच्या या लिखाणातून प्रकर्षाने व्यक्त झालेली दिसते. 'विद्वत्व आणि कवित्व' हा त्यांचा गाजलेला निबंध होय. त्यात त्यांनी कवीचे लक्षण सांगितले आहे. कवींच्या अंगी कोणते गुण प्राधान्याने असावयास हवे त्याची चर्चा केली आहे. वर्णविषयाचा प्रत्यक्ष अनुभव कवीला असला पाहिजे अशी आग्रही परंतु विवाद्य भूमिका त्यांनी मांडली आहे. चिपळूणकरांचे आरंभीचे निबंधलेखन 'शालपत्रका' तून प्रसिध्द झाले. त्याच 'केसरी'तून गो. ग. आगरकर यांनी लक्षणीय असा साहित्याविचार मांडला. 'कवी, काव्य, काव्यरती', हा त्यापैकी महत्वाचा निबंध होय. काव्याचे स्वरूप, मोठेपण व काव्यानंद यांची चर्चा त्यांनी स्वंतत्र दृष्टीने केली आहे. 'जी रचना वाचकांच्या अंत:करणात अनुकूल संवेदना उत्पन्न करण्याकरिता केली असते, तो काव्य होय' अशी व्याख्या करून संवेदनांचा काव्याशी असणारा संबंध ते प्रथमच दाखवतात. काव्यातील सत्य व शास्त्रीय सत्य यांतील भेद हा महत्वाचा विषयही त्यांनीच प्रथम हाताळलेला दिसतो. शेक्सापिअरच्या 'हॅम्लेट' नाटकांचे 'विकारविलसित' हे भाषांतर करून, त्याला लिहलेल्या प्रस्तावनेत त्यांनी नाटकांची भाषा / भाषांतर याविषयीचे मूलगामी विचार मांडले आहेत. 'नाटकात मनोवृत्तीचे जे चित्रण असते ते नेहमी सत्याहून अधिक असते..... व त्याशिवाय नाटकात अलंकार वा रस उत्पन्न करता येणार नाही' असे त्यांनी म्हटले आहे.

ह. ना. आपटे यांचेही टीकालेखन 'केसरी' तून सुरू झाले आधुनिक मराठीतील पहिले लेखक-समीक्षक म्हणून त्यांचे नाव आदराने घेतले पाहिजे. हरिभाऊंनी कथा व कांबरीच्या क्षेत्रात जी बहुमोल कामगिरी केली आहे. त्यामागे त्यांची जी साहित्याविषयक चिंतनशीलता होती ती त्यांच्या या स्वरूपाच्या लेखनात प्रत्यक्षगत होताना दिसते. त्यांनी परीक्षणात्मक टीकालेखन स्वतंत्र लेखाद्वारे व प्रस्तावनांद्वारे केले आहे. तसेच आपल्या कांदबऱ्यांच्या प्रस्तावनातूनही एखाद्या वेगळा साहित्याविचार दिल आहे. परंतु त्यांचे कलाविचारातील खरे योगदान 'विदग्ध वाङ्मय' हे भाषण होय. लोकशिक्षण हाच विद्ग्ध वाङ्मयाचा हेतू ते मानतात. मधुर अनुपानातून सत्याचे औषध दिले पाहिजे. साहित्यतून सत् व सन् मार्ग दाखविले गेले

पाहिजेत. सौंदर्योत्पादन व आल्हादकारकता हीच खरी अंतिम कलमूल्ये होत. वैद्ग्ध्य हे रस व अर्थ यांची अभिव्यक्ती करणारे असते. मराठी साहित्याविचारात पुढे जे कालावादी (आनंदवादी) व जीवनवादी (बोधवादी) प्रवाह वेगळे झाले. ते हरिभाऊंच्या विवेचनात एकत्रच नांदत होते असे दिसते.

हरिभाऊंच्या वरील भाषणाइतकांच गाजलेला व महत्वाचा निबंध म्हणजे वि. का. राजवाडे यांचा 'कांदबरी' हा निबंध होय. कांबरीचे अद्भुत व वास्तविक असे दोन वर्ग कल्पून दोन्ही प्रकारच्या कांदबऱ्यांचे स्वरूप, सखोल रीतीने स्पष्ट केले आहे. मराठीतील दोन्ही प्रकारच्या कांदबऱ्यांचा ऊहापोह करून त्यांनी युरोपातील कादंबऱ्यांशीही तुलना केली आहे.

राजवाड्यांनी जशा कांबरी या साहित्यप्रकाराची तात्त्विक चर्चा केली तशीच वा. ब. पटवर्धन यांनी 'काव्य आणि काव्योदय' या दीर्घ निबंधात कविता या साहित्यप्रकाराची, त्यातील वेगळेपणाची, सामर्थ्य व सौंदर्याची चिकित्सा केली. कविता म्हणजे शब्दांची केवळ तालबध्द मांडणी नव्हे. काव्याच्या आत्म्याला अनुरूप अशी शब्दयोजना हवी. ही त्यांची मते त्यांच्या अभिजात रसिकतेची व तर्कशुध्दतेची द्योतक आहेत. याबरोबर त्यांनी कविप्रतिभा, तिचे अनत्यसाधारणत्व काव्य निर्मितीची बाहय परिस्थितीजन्य कारणे इ. ची सविस्तर चर्चा केली आहे.

श्रीपाद कृष्ण कोल्हटकर हे टीकालेखनाला प्रतिष्ठा देणारे महत्वाचे टीकाकार होत. स्वतंत्र निबंध व पुस्तक प्रस्तावनांबरोबर त्यांनी साहित्यसंमेलन, कविसंमेलन इ. च्या अध्यक्षीय भाषणांतून तात्विक चर्चा सातत्याने केली आहे. साहित्याच्या मूल्यमापनाचे निकष ते 'मराठी ग्रंथसंग्रह' या निबंधात देतात. कल्पना, विचार व भाषा यांच्या सौंदर्यावर ललितवाङ्मयाची योग्यता ठरविली पाहिजे. न. चि. केळकर यांच्या 'तोतयांचे बंड' या नाटकावरील परीक्षणात त्यांनी नाट्यरचनाशास्त्र, ललितकाव्याचे स्वरूप, ललितवाङ्मय व शास्त्रीय वाङ्मय यातील भेद, काव्यानंदमीमांसा इ. अनेक विषयाचा स्वतंत्र प्रज्ञेने वेध घेतला आहे. वाङ्मयाचे १) साररचत (Literature of Power) ललित २) गाणपत (Literature of Knowledge) शास्त्रीय असे विशिष्ट परिभाषा वापरून ते दोन वर्ग काल्पितात. रसिकांना आनंद देणे हाच त्यांच्या मते काव्याचा खरा हेतू होय. बोध आणि काव्य या कल्पनाच विरोधी आहेत. असे सांगून ते आनंदवादाचा नि:संदेह पुरस्कार करतात.

न. चि. केळकर यांनी 'केसरी' चे संपादन करता करताच वाङ्मयाविषयक चर्चा केली आहे. अर्थातच त्यांचे हे लेखनही सामान्य वाचकांना जेव्हा पुढे ठेवून केलेले असल्याने वाचनीय झालेले आहे. वाचकांना वाङ्मयाची गोडी लावणे, त्यांच्या ठिकाणी जिज्ञासा निर्माण करणे हे कार्य त्यांच्या लेखनाने सहजपणे केले आहे. वाङ्मयाच्या प्रयोजनविचारात त्यांनी स्पष्टता आणली हे त्यांचे महत्वाचे योगदान होय. १९२१ साली बडोदा येथे भरलेल्या साहित्यसंमेल्नाच्या अध्यक्षीय भाषणात,

त्यांनी 'शुध्द, निरपेक्ष आनंद हाच कलेचा हेतू व हेच फळ' हा विचार स्पष्टपणे मांडत. काव्य सुंदर असून त्यात नीतिबोध निघाल्यास दुधात साखर, पण कलिदास किंवा शेक्सपिअर यांनी नीतिबोध देण्याच्या हेतूने नाटके लिहिली नाहीत हे त्यांनी स्पष्ट केले. 'कलाविलासाच्या मागे हेतुसंशोधनाचा गुप्त पोलीस लावून दिला तर अनर्थकारक परिणाम झाल्याशिवाय राहणार नाहीत.' असा स्पष्ट इशारा दिला, याच संमेलनात न. चि. केळकर यांनी वाङ्मयविषयक सविकल्प समाधीचा महत्त्वाचा सिद्धांत मांडला. खरी सविकल्प समाधी निर्माण करू शकते ते खरे वाङ्मय असे सांगून वाचकाला स्वतःच्या मनोभूमिकेची जाणीव तर असतेच पण लेखकाने दाखवलेल्या इतर भूमिकाही त्यात समाविष्ट होऊ शकतात असे वाचकाच्या आस्वादप्रक्रियेचे स्वरूप त्यांनी स्पष्ट केले. 'हास्यविनोद मिमांसा' इ. त्यांचा विनोदाची चिकित्सा करणारा ग्रंथ मूलगामी आहे.

कोल्हटकर व केळकरांतकाच गंभीरपणे व मूलभूत स्वरूपाचा साहित्याविचार वा. म. जोशी यांनी मांडलेला दिसतो. त्यांचे लेखनही स्फुट स्वरूपाचे, प्रस्तावना, व्याख्याने या स्वरूपाचे आहे. ते 'विचारविलास', 'विचारविहार' व 'विचारसौदर्य' या संग्रहांत संगृहीत करण्यात आले आहे. वा. म. जोशी स्वतः कांबरीकार होते. त्यामुळे त्यांनी केलेली चर्चा सहजिकच निर्मात्याच्या अंगानेही साकारलेली आहे. त्यांनी साहित्यविषयक अनेक प्रश्नांची चर्चा अत्यंत अस्थापूर्वक व अभिनेवेशनाविरहित पध्दतीने केली आहे. मडगाव येथील साहित्यसंमेलनात (१९३०) केलेल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी वाङ्मयाचे दोन वर्ग कल्पिले आहेत. १) अबुध्दिपुरस्स / अबोधपूर्व २) बुध्दिपुरस्स / बोधपूर्व. त्यांच्या मते एखाद्या अनुभवाने निर्मात्याच्या मनात क्षोभ निर्माण झाला, म्हणजे त्या अवस्थेत निर्मिती होत नसते, तर अनुभवातील व्यक्तिसापेक्षता, तात्कालिक प्रतिक्रिया इ. गळून गेल्यावर, त्यातील सौंदर्य प्रतीत झाल्यावर कल्पनाशक्ती निर्मितीला प्रवृत्त होते. केवळ प्रत्यक्ष अनुभव जसाच्या तसा मांडला म्हणजे उत्तम साहित्य निर्माण होत नाही, यावर ते भर देतात. वा. म. जोशी यांनी बा.सी.मर्ढेकरांच्या 'वाङ्मयीन महात्मता' या ग्रंथात लिहिल्या प्रस्तावनेतून, तसेच 'विचारविहार' या लेखसंग्रहातील लेखांतूनही त्यांची साहित्याकडे एक कला म्हणून पाहण्याची दृष्टी दिसते. कलेच्या स्वायत्ततेची चाहूलही त्यांच्यात विचारांमध्ये प्रथम दिसून येते. वाङ्मयाच्या हेतूविषयाचे त्यांचे 'क्षुद्र जीवनाचा विसर व उच्च जीवनाचा अनुभव' हे विचार त्यांच्यातील तत्वचिंतकवृत्तीचे द्योतक आहेत.

ना.सी फडके हे याकाळातील महत्वाचे विचारवंत मानले जातात. आपल्या 'अभिजात मराठी वाङ्मय' या १९२६ मधील लेखातून किंवा 'प्रतिभासाधन (१९३२)', 'प्रतिभाविलास', 'वाङ्मयविहार', 'साहित्य आणि सार', 'लघुकथा', 'तंत्र आणि मंत्र' या पुस्तकांतून त्यांनी केवळ मूलभूत साहित्यिक प्रश्नांची चर्चा केलेली नाही, तर एकूणच नवीन लेखकांनी प्रतिभेची साधना कशी करावी, तंत्रशुध्द

लेखन कसे करावे, याचे मार्गदर्शन केले आहे. मात्र तंत्र हे साध्य नसून साधन आहे. लेखकाच्या अंत:करणात रसपूर्ण अनुभव तयार होणे महत्वाचे आहे. अशी त्यांची भूमिका आहे. फडक्यांच्या मते साहित्यकृतीचा हेतू वाचकाला आनंद देणे हा आहे. परंतु आनंद म्हणजे वाचकांना सुखावणे, त्यांचे रंजनकरणे इतकेच त्यांना अभिप्रेत आहे.

वि. स. खांडेकरांनी आस्वादक समीक्षा केली आहे. तसेच 'अभिषेक' या लेखसंग्रहात साहित्यविचारही प्रकट केला आहे. कलेने प्रचार करू नये पण सत्य, शिव, सौदर्य यांचे संस्कार करावेत असे त्यांचे मत आहे.

पाश्चात्य साहित्यशास्त्राच्या परिणामातून, 'कलेसाठी कल' की 'जीवनासाठी कला' हा वादा मराठी समीक्षकांनी हिरीरीने खेळलेला दिसतो. त्यामध्ये ना. सी. फडक्यांनी कलावादी तर खांडेकरांनी जीवनवादी भूमिका घेतली होती असे मानले जाते.

एकीकडे न. चि. केळकरांपासून, सुरू झालेला व ना. सी. फडके यांनी पुरस्कार केलेला 'कलावादी' साहित्याविचार मराठीत रूजत असतानाच लालजी पेंडसे यांचे 'साहित्य आणि समाजजीवन' (१९३५) हे मार्क्सवादी विचार मांडणारे पुस्तक प्रसिध्द झाले. त्यांच्या मते साहित्य हे तत्कालीन समाज-जीवनाचे प्रतिबिंब असते. आणि साहित्यात उमटणारे विचार समाज-जीवनातील अंतर्विरोधांशी जुळणारे असतील तर ते साहित्य पुरोगामी, अन्यथा प्रतिगामी म्हणावे लागेल. प्रतिष्ठा पारलेले साहित्य हे सत्ताधीश वर्गाच्या आकांक्षा तृप्त करणारे असते. म्हणूनच त्याचे स्वरूप वर्गीय असते. पु. य. देशपांडे यांनी 'साहित्य आणि समाजजीवन' ही लेखनमाला 'प्रतिभा' पक्षिकात लिहून लालजी पेंडसे यांच्या विचारांवर कडाडून टीका केली आहे. त्यांच्या मते व्यक्तिविकास आणि वर्ग विरोधजन्य प्रचलित व प्रतिष्ठित सामाजिक जाणिवा यांच्या संघर्षातूनच कलेचा जन्य होतो (पुढे प्रभाकर पाध्ये यांनी 'कलेची क्षितिजे' या पुस्तकात पु. य. देशपांडे यांची कलेची व्याख्या मान्य केली आहे. 'खरी कला मानवाच्या जाणिवेत काही नवी भर टाकते व म्हणून ती प्रगतीकारक असते'. असे त्यांचे मत आहे. साहित्य ही एक ललितकला आहे, कला ही लैकिक असली तरी तिच्यापासून मिळणारा आनंद व्यवहारिक आनंदापासून वेगळा असतो. असा स्पष्ट कालवादी दृष्टीकोन रा. श्री. जोग यांनी 'सौंदर्यशोध आणि आनंदबोध' (१९४३) या ग्रंथात मांडलेला दिसतो. सौंदर्यांचे वर्णन कोणत्याही एका तत्वाच्या आधारे करता येणार नाही असे सांगून रस, ध्वनी, अलंकार, औचित्य अशा संस्कृत साहित्यशास्त्रातील अनेक सौंदर्य कल्पनांचा ते पुरस्कार करतात. रा. श. वळिंबे 'साहित्यमीमांसा' (१९५५) यांनी केलेल्या साहित्यस्वरूप चर्चेतून त्यांनी सौदर्य आणि जीवनदर्शन या दोन्ही घटकांना सारखेच महत्व दिलेले आढळते त्यांच्या मते साहित्याचे कार्य केवळ आनंद देणे हे नसून जीवनाचे मर्म उलगडून दाखवणे हेही आहे.

कलेच्या स्वायत्ततेची ठामपणे मांडणी करणारे बा. सी. मर्ढेकर यांचे लेखन Arts & Man (1937) व 'वाङ्मयीन महात्मता' आणि 'सौदर्य' आणि 'साहित्य' (१९५५) या पुस्तकांमध्ये संगृहीत झालेले आढळते. वाङ्मयीन महात्मता ही लेखमाला मुळात 'सह्याद्रि' 'नियतकालिकात' (१९३६) प्रसिध्द झाली. त्यात त्यांनी मराठी वाङ्मयाच्या अपुरे असल्याची वसुस्थिती निदर्शनास आणून देऊन त्याला महानता कशी प्राप्त होईल याचे दिशा दिग्दर्शन केले आहे. मराठी साहित्य केवळ इंग्रजी जीवन व भाषा यांच्या नमुन्यावर उभारले असून त्यातही कल्पनात्मक प्रतिक्रियांचा संकुचितपणा, आणि त्यावरील प्रतिक्रियांमध्येही गंभारतेचा अभाव ही दोन कारणे त्यांना आढळतात. 'मराठी साहित्य हे पुरेसे परपुष्ट असल्याने पुरेसे परिपुष्ट नाही.' असे मार्मिक निरीक्षण ते नोंदवतात. वाङ्मयाच्या निर्मितीत लेखनपूर्व आत्मनिष्ठा व लेखनगर्भ आत्मनिष्ठा असामान हवी. या मताची ते आग्रहपूर्वक सविस्तर मांडणी करतात. तसेच भावार्थ घटकांतील संवाद, विरोध व समतोल लय यावर आधारित रचना हे साहित्यातील सौंदर्याचे व रूपबंधाचे गमक ते मांडतात. कलाकृतीचे सौंदर्य हे अविष्कारामध्ये नसून आशयामध्ये, आशयाने धारण केलेल्या घाटांमध्ये असते असे त्यांचे स्पष्ट मत आहे. मराठीतील रूपवादी समीक्षाविचाराचा पाया घालण्याचे श्रेय मर्ढेकरांकडे जाते.

पाश्चात्य समीक्षेतून आलेल्या कलावादी / रूपवादी भूमिकेचा प्रभाव मराठी समीक्षाविचारावर व प्रत्यक्ष समीक्षेवाही मोठ्या प्रमाणावर पडला. वा. ला. कुलकर्णी, माधव आचवाल, गंगाधर गाडगीळ, गो. वि. करंदीकर यांच्या विचारांवर तो स्पष्टपणे जाणवतो. मर्ढेकरांच्या विचारांचाही इतका खोलवर परिणाम मराठी समीक्षेवर पडला की मर्ढेकरपूर्व व मर्ढेकरोत्तर समीक्षा असे ठळक टप्पे मानावे लागतात.

या सर्व समीक्षकांचे लेखन १९६०-७० च्या दशकात बहरले, मात्र त्यांच्या लेखनाची सुरूवात १९५० ते ६० या दशकात झालेली आहे. त्यामुळे त्यांच्या कार्याची प्रारंभिक नोंद आपण करू शकतो.

वा. ल. कुलकर्णी यांच्या मते साहित्यकृती ही जीवनातून स्फुरली असली तरी विश्व स्वयंपूर्ण, अनन्यपरतंत्र असते, तिला नियंत्रित करणारी तत्वे तिच्यातच वसत असतात. माधव आचवाल यांचीही भूमिका स्पष्टपणे कालावादी आहे. कलाकृतीत जाणवणारे चैतन्यतत्त्व हे प्रत्यक्ष जीवनातील चैतन्यवाहु वेगळे असते असे ते मानतात, गंगाधर गाडगीळ खडक आणि पाणी (१९६०) यांनी रसचर्चेत अडगळ ठरवून पाश्चात्य सौंदर्य विचाराच्या आधारेच साहित्य विचार मांडलेला दिसतो. नवकथा व नवकाव्य यांचे समर्थन त्यांनी हिरीरीने केले आहे. व त्यासाठी लघुकथाकारांशी वादही घातले आहेत. तेथेही त्यांची रूपबादी समीक्षादृष्टी स्पष्टपणे दिसते. गो. वि. करंदीकर यांच्या समीक्षाविचार घाट, लय या संकल्पनांचा प्रभाव दिसतो. ज्या साहित्यात उत्कटता व व्यापक जीवनदर्शन एकत्रितपणे आढळते ते

साहित्य त्यांना श्रेष्ठ वाटते. या रूपवादी समीक्षकांपेक्षा दि. के. बेडेकर 'साहित्य निर्मिती आणि समींक्षा' (१९५०) यांचा विचार वेगळा आहे. त्यांच्या मते कलेची मूल्ये सामाजिक आहेत. कलस्वरूपशास्त्र व समाजशास्त्र यांनी परस्परांशी सहकार्य करावे असे त्यांना वाटते. मनोरंजन करणे व जगण्यातील अर्थ पाहण्याची शक्ती देणे ही साहित्याची दोन प्रयोजनने त्यांना महत्वाचा वाटतात, कुसुमावती देशपांडे यांनी कलामूल्यांच्या जोडीत सार्वकालिक अशा जीवनमूल्यांचा विचार केला पाहिजे, अशी भूमिका मांडली आहे. या सर्व मर्ढेकरोत्तर समीक्षांचे तात्विक विचार लेख रूपान १९६० पूर्वी आहे. तरी संग्रह रूपाने ने १९६० नंतर / १९७० च्या दशकाने प्रसिध्द झालेले दिसतात.

साहित्याकडे पाहण्याची विशिष्ट दृष्टी देणारे, जाणीवपूर्वक लेखन करणारे साहित्यचिंतक व त्यांची मतमतांतरे आपण क्रमशः पाहिली. परंतु या सूत्राच्या बाहेरही अनेक प्रकारचे ग्रंथलेखन, साहित्यचर्चा व वाङ्मयीन वाद निर्माण झालेले दिसतात. त्यांचा परामर्श घेतल्याशिवाय या काळातील साहित्य विचाराचर्चेचा जिवंतपणा लक्षात येणार नाही.

संस्कृतातील रस, गुण, अलंकारविचाराचा परिचय करून देणारी अनेक पुस्तके आरंभीच्या काळात लिहित गेलेली दिसतात. 'अलंकारादर्श' - जगन्नाथ विष्णु दामलेशास्त्री, अलंकारदर्पण - रामकृष्ण तळेकर, अलंकारमीमांसा - राजारामशास्त्री भागवत, अलंकारप्रकाश लक्ष्मणशास्त्री लेले, भाषासौंदर्यशास्त्र - सदाशिव बापूजी कुलकर्णी, सुलभ अलंकार - रा. भि. जोशी इ. पुस्तके ही मूळच्या संस्कृत अलंकारशास्त्रावरील एकेका ग्रंथांच्या आधारे, विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरावीत या प्रकारे रचली गेली आहेत. संस्कृत साहित्यविचाराचा हा परिचय पुढे संस्कृत साहित्यशास्त्राचे मराठी टीकेत उपयोजन होण्यात विकसित झालेला दिसतो. 'रसप्रबोध' हा बळवंत कमळकर माकोडे यांचा ग्रंथ, त्यानी रससंख्या १२ पर्यंत नेऊन ठेवल्याने उल्लेखनीय ठरतो. छंदशास्त्रावर स्वतंत्र ग्रंथ नसला तरी स्वतंत्र व ऐतिहासिक दृष्टीने चिकित्सा करणारा निबंध 'मराठी छंद' या नावे वि. का. राजवाडे यांनी सिध्द केलेला दिसतो.

संस्कृतसाहित्यशास्त्राची पुर्नमांडणी करणारे अतिशय महत्वाचे ग्रंथ रा. श्री. जोग (अभिनव काव्यप्रकाश (१९३०), द. के. केळकर (काव्यालोचन-१९३१), डॉ.के. ना. वाटवे (रसविमर्श - १९४२) यांनी लिहिले आहेत. या ग्रंथाद्वारे एकूणच संस्कृतातील सौंदर्यसिध्दांतांना मराठी साहित्याभ्यासाच्या सन्मुख करण्याचा प्रयत्न या विचारवंतांनी केलेला दिसतो. 'अभिनवकाव्यप्रकाश' मध्ये जोग यांनी संस्कृत विचारांवर व थांबता अष्टरसाक व्यवस्थेत पाश्चात्य मानसशास्त्रीय आधारही शोधण्याचा प्रयत्न केला. तसेच मराठी काव्यप्रकारांचीही स्वतंत्रपणे मांडणी केली. 'सौदर्यशोध आणि आनंदबोध' व 'काव्यविभ्रम' हे त्यांचे ग्रंथ संस्कृत

साहित्यशास्त्रावर पोसलेल्या त्यांच्या अभिजात समीक्षादृष्टीचे निदर्शक आहेत. 'काव्यालोचन' मध्ये द. के. केळकरांनी काव्यशास्त्रातील व्यापक व तात्विक प्रश्नाची सांगोपांग चर्चा केली आहे. वक्रोक्ती, रीती, ध्वनी, रस या सिध्दांताची परिचय करून देऊन रसविषयक अनेक प्रश्नांची स्वतंत्र चर्चाही त्यांनी केली आहे. रसत्व, रससंख्या, काव्यानंद यांची विस्तृत चिकित्सा त्यांनी केली आहे. करूणरसामुळे आनंद कसा प्राप्त होतो हे सांगताना ते स्वायत्त तादात्म्याची संकल्पना मांडतात. 'कल्पनेने वाटलेल्या वस्तूशी तादात्म्य करून घेता येते, इतकेच नव्हे तर हे तादात्म्य किती अंशाने व किती काळापर्यंत कायम ठेवायचे हे सर्व आपल्या ताब्यात राहते' यालाच ते स्वायत्त तादात्म्य म्हणतात. 'प्रत्यक्ष व्यवहारात दु:खावर ताबा नसतो पण रसास्वादात तो असतो. हाच लौकिक सृष्टी व कलासृष्टी यांतील मुख्य फरक होय'. 'रसविमर्श' या के. ना. वाटवे यांच्या ग्रंथात रसविषयक अनेक प्रश्नांची सखोल चर्चा पहायला मिळते. संस्कृतातील व्यापक रसचर्चेचे मानसशास्त्र व सौदर्यशास्त्र या दोन्ही दृष्टीने परीक्षण करण्याचा प्रयत्न येथे दिसतो. रसव्यवस्थेतील एकरस - हास्यरस यावर न. चिं. केळकरांनी 'हास्यविनोदमीमांसा' हा संपूर्ण ग्रंथ रचला आहे. हास्यरसाची सांगोपांग चर्चा करणारा व विनोदी वाङ्मयाची चिकित्सा करणारा हा पहिल ग्रंथ होय.

रसविषयक चर्चेमध्ये काव्यानंदाची किंवा करूण रसाने वाचका प्रेक्षकांना आनंद कसा होतो याची चर्चा, अनके विचारवंतांनी सातत्याने केलेली दिसते. आगरकरांनी 'कवि, काव्य, काव्यरति,' या निबंधात (१८८६), काव्य दु:खपर्यवसायी असते किंवा सुखपर्यवसायी असते, त्यातील रसापासून उत्पन्न होणारा आनंद सारखाच असतो असे मत मांडले आहे. कोल्हटकरांनी 'ललित वाङ्मयातील दु:खकारक प्रसंगांत, स्वार्थाचा काही संबंध नसल्यामुळे त्याचा चांगला प्रत्यय येतो' असे सांगून करूणरसापासून आनंदच होतो हे स्पष्ट केले आहे. न. चिं. केळकर यांनीही 'साविकल्प समाधीची' संकल्पना मांडताना वाङ्मयापासून मिळण्याऱ्या आनंदाची वेगळी उपपत्ती दिली आहे. (१९२१) या नंतरच्या काळातही सदर विषयावर भरपूर चर्चा रंगलेली दिसते. रा. श्री. जोग, द. के. केळकर, के. ना. वाटवे, श्री. कृ. कोल्हटकर, वा. म. जोशी, भा. रा. तांबे, माधवराव पटवर्धन, कृ. पां. कुलकर्णी, द. सी. पंगू, काकासाहेब कालेलकर इ. अनेक विचारवंतांनी करूणरसमीमांसा केलेले आहे. 'विविध ज्ञानाविस्तार', 'लोकशिक्षण', 'सहयाद्रि', 'ज्योत्स्ना' इ. नियतकालिकांतून रसचर्चा साकारली.

पुढे काव्यापासून होणाऱ्या आनंदाची चर्चा स्वतंत्रपणे बा. सी. मर्ढेकर यांनीही केलेली दिसते. त्यापैकी महत्वाचे विवेचन पाहू. श्री. कृ. कोल्हटकर हे करूणरसापासून निर्विवादपणे आनंद होतो. असे ठामपणे सांगतात. भावनांच्या तृप्तीचा आनंद व नवरसांच्या अनुभवापासून होणारा आनंद हा ललित वाङ्मयाचा

विशेष होय. ललित वाङ्मयातील दु:खकारक प्रसंगांत स्वार्थाचा काही संबंध नसल्याने आनंदाचा चांगला प्रत्यय येतो असे ते सांगतात.

वा. म. जोशी यांनी केळकरांच्या 'सविकल्प समाधी' या माडणीला विरोध केला आहे. मुळात तादात्म्याच्या सिध्दांतावरच ते आक्षेप घेतात. शोकगंभीर नाटकांमुळे आनंद होतो. ते तन्मयता अपूर्ण असते म्हणूनच. पूर्ण तन्मयता झाल्यास शोकरस उत्पन्न न होता शोक उत्पन्न व्हायाचा असे त्यांना वाटते. ॲरिस्टॅटनच्या कॅथार्लिस सिध्दांताचा आधार घेउन ते सांगतात की शोकगंभीर नाटक पाहताना आपली एकदंर वृत्ती उच्चतर होते व न्यायाचा प्रत्यय येऊन व त्याची योग्यता पटून आपल्याला समाधान होते. त्यांनी या संदर्भात आत्यौपम्य व परकायाप्रवेश हे दोन मुद्दे मांडत आहेत. आपण दुसऱ्याच्या जागी आहोत अशी कल्पना करून परकायाप्रवेशाने आपण आस्वाद घेतो. आस्वादांचे 'सहानुभूतिपूर्व ताटस्य' हे वैशिष्ट सांगून रा. श्री. जोगांनी करूणरसाचा अनुभव व नर्मळ सुखाचा नसून दु:खमिश्रित असतो असे आपले वेगळे विचार मांडले आहेत. ना. सी. फडके यांनी वाङ्मयाच्या वाचनामध्ये वाचकाला स्वत:च्या कोणत्यातरी अनुभवाचा पुन:प्रत्यय येतो व पुन:प्रत्ययाचा आनंद अवर्णनीय असतो अशी पुन:प्रत्ययवादी मांडणी केली आहे. तर काव्याच्या वाचनाने वाचकाला क्रीडारूप आत्माविष्काराचा आनंद मिळतो आहे. के. ना. वाटवे प्रतिपादितात, वा. भा. पाठक 'टीका आणि टीकाकार' या ग्रंथात संयमशील सहानुभावच वाङ्मयानंदात कारणीभूत होतो असे सांगतात. माधवराव पटवर्धनांनी या संदर्भात 'जिज्ञासू ताटस्थ्याची' व 'कुतुहलपूर्ती' ची संकल्पना माडली आहे. 'जिज्ञासू ताटस्थ्यावाचून कलेचे स्वारस्य पूर्णपणे कळणार नाही'. असे सांगून साहित्यांतून नवीन जिव्हाळ्यांचे, अनुभवमय ज्ञान होत असते. अनुभवांच्या ज्ञानात भावनेचा संबंध येतो. असे मत नोंदवले आहे. बा. सी. मर्ढेकरांनी काव्यानंदाची चिकित्सा केली आहे. त्यांच्या मते जीवशास्त्रीय भावनांचात्भावप्रत्यय (Feeling tone) स्थिर नसतो, कधी तो सुखपूर्ण तर कधी दु:खपूर्ण असतो. याउलट सौंदर्यभावनेचा प्रत्यय नेहमीच सुखपूर्ण व याअर्थाने स्थिर असतो. आणि याचे कारण सौंदर्यभावनेचा संबंध परिस्थितीच्या अर्थाशी नसून संवेदनादींच्या गुणात्मक संरचनेशी असतो म्हणून मर्ढेकरांची भूमिका रस आनंदरूप असतो असे मानणाऱ्या अलैकिकतावादी काव्यमीमांसकांशी जुळणारी आहे.

वाङ्मयीन वादांच्या निमित्ताने साकारलेला साहित्याविचार :

मराठी कवितेला आपली स्वत:ची अशी प्राचीन परंपरा आहे. या पार्श्वभूमीवर आधुनिक मराठी कविता पाश्चात्य काव्याच्या, काव्यविचाराच्या प्रेरणेतून नवे रूप धारण करू लागल्याने अभिरूचिभिन्नतेतून काव्यमीमांसकामध्ये वाद निर्माण झालेले दिसतात. ज. रा. आजगावकर यांनी प्रथम 'प्राचीन व अर्वाचीन कवींवर' लेख लिहून अर्वाचीन कवींवर आक्षेप घेतले. वा. अ. भिडे यांनी 'काव्यदोहन' च्या प्रस्तावनेत त्यांचा समाचार घेतात. व आपली रसिकता किती व्यापक आहे ते दर्शविले. त्यांनी

समतोल भूमिका घेऊन अर्वाचीन कवितेचे मर्म उलगडून दाखवले. कवी चिंतामणी पेठकरांनी 'गंगावणीना' च्या प्रस्तावनेत यमकांची कवितेत गरज नाही. छदांची, श्लेषादी आलंकरांचीही आवश्यकता नाही असे मत ठामपणे मांडले. यमके न वापरल्यामुळे काव्यविषयी प्रतिकूल मत वि. मो. महजनींनी मांडले तर वासुदेवशास्त्री खरे, वि. म. लंभे, रेंदाळकर इ. नी यमके साधणे हा दुराग्रह असल्याचे मत मांडले. काव्यविषययीचा विचार बाह्य रचनेपाशीच फिरत होता असे लक्षात येते. यावर मध्यममार्गी न. चि. केळकरांनी अतिरेकी सयमक रचना टाकून एक-दोन अक्षरांचे यमक साधण्याचा सल्ला दिला (विविध ज्ञान विस्तार १९१२) बालकवी व अनंततनय यांच्यात आधुनिक कवितेच्या स्वरूप वैशिष्टयांसदर्भात मोठा वाद घडला. बालकवींनी केसरीतील 'मराठी कविता-तिचे स्वरूप' लेखामध्ये आधुनिक काव्याची बाजू आवेशाने मांडली तर अनंततनयांनी त्याला जोरदार विरोध केला. पुढे श्री. नी. चापेकरांनीही आधुनिक काव्यातील अनेक प्रवृत्तींवर प्रस्तावनांच्या माध्यमातून टीका केली आहे. आधुनिक काव्याच्या विरोधकांची काव्यदृष्टी अभिजात, पंडिती काव्याच्या आस्वादावर पोसली गेलेली दिसते. पण या वादांतूनच आधुनिक कवितेचे स्वरूप व तिला मिळणारी वाचकप्रियता स्पष्ट होत गेली.

मर्ढेकरांच्या कवितेवर दुर्बोधतेचा आरोप करुन रा. श्रा. जोगांनो 'मुख्यार्थाची कैफियत' मांडली तर गंगाधर गाडगीळ मर्ढेकरांच्या नवकवितेच्या समर्थनार्थ लिहू लागले. मर्ढेकरांवर जंतुवादी कवी हा आरोप परतवून लावत त्यांनी मर्ढेकरांना क्रांतिकारी कवी-'दुसरा केशवसुत' असल्याचे सिध्द केले आणि कवितेकडे, तिच्यातील अनुभव घेण्याची पध्दत, प्रतिमा, भाषा इ. कडे पाहण्याची नवीन दृष्टी दिली.

१८७४ ते १९६० या कालखंडातील समीक्षा :

आधुनिक मराठी समीक्षेचाही पायाही विष्णुशास्त्री चिपळूणरांनीच 'निबंधमाले' तून घातला. मराठी भाषेबरोबर साहित्याविषयी त्यांना जो अत्यंत अभिमान होता; त्यातून त्यांनी मोरोपंतांसारख्या पंडित कवीच्या काव्याचे सविस्तर विवेचन अत्यंत आत्मीयतेने केलेले दिसते व मोरोपंतावरील, आक्षेपांचे सप्रमाण खंडन केलेले दिसते. शब्दालंकारांना अर्थलंकारांच्या सानिध्यात 'अपूर्व शोभा' प्राप्त होते असे मत व्यक्त केले आहे. काही शब्दांच्या अर्थाचे 'अनेकार्थित्व' स्पष्ट केले आहे. भाषांतरित नाटकांच्या रूपाने प्राश्चात्य नाटकांचा परिचय मराठी वाचकांना होत होता. नवनव्या विषयावरील पुस्तके मराठीत प्रथमच तयार होत होती. त्यांचा साक्षेपाने परिचय करून देणे, गुण-दोषांचे दिग्दर्शन करून नवनिर्मितीला व वाचकांच्या अभिरूचीला चालना देणे हे काम त्यांनी 'द टेम्टेस्ट' आणि 'तारा' या नाटकांच्या भाषांतरांवरील टीकालेखांतून केले. प्रत्यक्ष समीक्षेत परिमाणिक शब्दांचा वापर गुणदोष दिग्दर्शन, विशिष्ट निकषांच्या आधारे मूल्यमापन करणे. आवश्यक तेथे अवतरणे देणे, या समीक्षेतील सर्व महत्वाच्या घटकांचा अवलंब व आरंभ विष्णुशास्त्री

चिपळूणकर यांनीच केलला आहे. त्यांच्या समीक्षेवर संस्कृत तसेच पाश्चात्य साहित्यदृष्टीचा प्रभाव आहे. चिपळूणकरांच्या समीक्षेचा प्रभाव पुढे श्री. कृ. कोल्हटकरांवर पडलेला आहे. कोल्हटकरांची समीक्षा 'विविधज्ञान विस्तारात' प्रसिध्द झाली व पुढे ती 'कोल्हटकर लेख-संग्रहात' वाचावयास मिळते. नाटक, कथात्म वाङ्मय, चरित्रे, इ. वर त्यांनी सविस्तर लिहिले आहे. सं. 'सौभद्र', 'तोतयाचे बंड' पण लक्ष्यात कोण घेतो? इ. वरील त्यांचे लेखन तसेच काही ग्रंथाच्या प्रस्तावना यातून त्यांची साहित्यकृतीच्या घटकांचे विश्लेषण करण्याची दृष्टी दिसून येते. घटनांची लैकिक संभाव्यता व कथाहेतू या दोन्हींची चर्चा करतात. संवाद व स्त्री पात्रांची भाषा या घटकांचाही ऊहापोह करतात. विश्लेषणाची पध्दत त्यांच्या लेखनातूनच मराठी समीक्षेत प्रथम अवतरलेली दिसते.

कोल्हटकरांच्या काळातील दुसरे, महत्वाचे समीक्षक म्हणजे न. चि. केळकर होत. 'मतविकार', 'मेनका', 'बायकांचे बंड' इ. नाटकांची त्यांनी केलेले रसग्रहणे महत्वाची आहेत. रसग्रहण करताना साहित्यिक (कलात्मक) तसेच सामाजिक निकष ते वापरतात. लेखकाच्या सामाजिक दृष्टिकोणाचीही चर्चा करतात. नाटकातील संविधानक, स्वभावरेखाटन, भाषा, पदे इ. ची ते वस्तुनिष्ठपणे व रसिकतेने चिकित्सा करतात. नाटकाच्या भाषेची चिकित्सा करताना त्यांच्या मनात गोल्डास्मिथ या इंग्रजी समीक्षकाच्या समिक्षेचा दृष्टीकोन जागा आहे हे लक्षात येते. 'कुलकर्णी-लीलमृत', वरील लेखात त्यांची उपरोधपूर्ण लेखनशैली प्रकर्षाने व्यक्त होते. भा. रा. तांबे, ना. वा. टिळक, गोविंदाग्रज यांच्या काव्यसंग्रहांना त्यांनी ज्या प्रस्तावना लिहिल्या आहेत, त्यातही कवीच्या रचनेतील, कल्पना, अलंकाररचना यांतील गुणदोषांची मार्मिकपणे चर्चा केली आहे. एकूणच केळकरांनी पाश्चात्य आणि पौर्वात्य वाङ्मयाच्या संस्कारातून आलेल्या टीकादृष्टीतून लेखन केलेले दिसते.

वा. म. जोशी यांचे टीकालेखन 'विचार विहार' या लेखसंग्रहात समाविष्ट झाले आहे. 'भंगलेले देऊळ' या कादंबरीची चिकित्सा करताना कथानक, स्वभावचित्रण, वातावरण, भाषा इ. घटकांचे विश्लेषण करतात. तर मूल्यमापन करताना पात्रे व वास्तवातील व्यक्ती वेगळ्या असतात याची स्पष्ट जाणीव ते वाचकांना करून देतात. कलाकृतीच्या सौंदर्याची आंतरिक जाण त्यांना होती व कलामूल्ये व नैतिक मूल्ये वेगळी असतात याचा स्पष्ट निर्देश त्यांच्याच लेखनात प्रथम आढळतो.

साहित्यनिर्मितीचे नेटके तंत्र मांडणाऱ्या 'कलावादी' ना. सी. फडके यांनी जी प्रत्यक्ष समीक्षा केली आहे; त्यातही साहित्य कृती च्या रचनेचा, परिणामकारकतचा विचार करण्यावर, त्यांच्या भर असतो. हे लक्षात येते. उदा. 'कीचकवध' नाटकावर लिहिताना कथानकाची पक्की बांधणी, स्वभावपरिपोषासाठी वापरलेल्या युत्या, विस्मय व उत्कंठा यांची सतत ठेवलेली जागृती या निकषांवर या

नाटकाला आदर्श, सुंदर कलाकृती ठरवतात. फडक्यांच्याच काळात सातत्याने रसग्रहणवर लेखन करणाऱ्या वि. स. खांडेकरांचे या स्वरूपाचे लेखन 'रंग आणि गंध', 'रेषा आणि रंग' या संग्रहात तसेच 'गडकरी व्यक्ती आणि वाङ्मय' मध्ये वाचावयास मिळते. त्यात त्यांचे प्रायः नाटकावरील लेख आहेत. प्रतिपाद्य विषयावरील वैयक्तिक प्रतिक्रिया, संलग्न आठवणी सांगत व उपमा रूपके वापरून शब्दांकन करण्याची त्यांची पथा आहे. रस, रसपारिपोष, संभाव्यता, अपरिहार्यता इ. रूढ समीक्षादृष्टीतूनच ते मूल्यमापन करतात.

रा. श्री. जोग (केशवसुत काव्यदर्शन) आणि रा. शं. वळिंवे (साहित्यमीमांसा) यांच्या समीक्षेवर संस्कृत साहित्यदृष्टीचा स्पष्ट प्रभाव दिसतो. दोघांची समीक्षादृष्टी अतिअभिरूचीसंपन्न आहे. त्यातूनच जोगांनी नवकवितेवर दुर्बोधतेचे आक्षेप घेतले, 'मुख्यार्याची कैफियत' मांडली व कवितेचा भावार्थ सांगून विषयाची मांडणी मुद्देसूद असल्यास ती चांगली असे मानले. तर वाळिंबे यांनी, विशेषतः गडकऱ्यांच्या वाङ्मयाचा अभ्यास करताना चरित्रात्मक तपशीलांचा व साहित्यातील प्रतिमांचा संबंध जोडून चरित्रात्मक समिक्षेचा रीतसर पाया घातलेला दिसतो.

रूपवारी समीक्षाविचार मराठीत रूजवणाऱ्या बा. सी. मर्ढेकरांनी 'खेड्यातील रात्र' या बालकवींच्या कवितेच्या सग्रहण करताना रूपवादाची तत्वे अवलंबून दाखवली आहेत. साहित्यकृतीच्या घटकांचे सूक्ष्म विश्लेषण करून त्यातील परस्परसंबंध शोधण्याची पद्धत त्यातील रूजू केलेली दिसते.

वा. ल. कुलकर्णी यांनी आशय व अभिव्यक्तीचे ऐक्य या निकषांतर्गत रूपवादी, समीक्षाविचार उपयोजलेला दिसतो. लेखकाचे व्यक्तिमन लक्षात घेणे व निर्मात्याच्या अंगाने साहित्यकृतीचे विशेष उलगडून दाखवणे ही त्यांची समीक्षा पद्धती आहे. माधव आचवल घटकांतील संवाद-विरोध, घाट, लय, सेंद्रिय एकता या निकषांचा अवलंब करतात तसेच साहित्यकृतीच्या सौंदर्याचा वाचकाच्या मनावर जो परिणाम होतो. त्यावर भर देतात. गंगाधर गाडगीळ यांनी समकालीन कवी मर्ढेकर किंवा नवकथाकार व्यंकटेश माडगूळकर यांच्या साहित्याचे जे मर्म उलगडून दाखवले आहे, त्यातही त्यांनी अनुभवाच्या घटकांची विविधतापूर्ण रचना व घाट, असंकेतिकता, नवता यांच्या संदर्भातच समीक्षा केली आहे. मर्ढेकरांना ते दुसरे केशवसुत संबोधतात. गो. वि. करंदीकर यांनी मर्ढेकरांच्या कवितेतील धाटांची विविधता सूक्ष्मपणे टिपली आहे. व ते करताना अनेक नवीन परिभाषिक शब्द समीक्षेत रूढ केले आहेत. त्यांची समीक्षाही रुपवादी, आहे.

दि. के. बेडेकर यांनी 'जुळा' या अरविंद गोखले यांच्या कथेवर लिहिताता समाजशास्त्रीय ज्ञानातून अलेली सौंदर्यदृष्टी व कलावाद यांचे एकत्रीकरण केलेले दिसते. कुसुमावती देशपांडे यांनी केशवसुतांच्या कवितांवर लिहिताना

आशयाबरोबरच कविवृत्तीत विशालता व जीवनाविषयांची, व्यापक दृष्टी यांकडे लक्ष वेधले आहे. 'मराठी कादंबरीचे पहिले शतक' (१९५३) मध्ये त्यांची कलादृष्टी व ऐतिहासिक दृष्टी एकत्रित झालेले दिसते.

समारोप

१८७४ पूर्वी तुरळक स्वरूपात सुरू झालेल्या साहित्यविचारचर्चेला खऱ्या अर्थाने भक्कम पाया लाभला तो विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या निबंधमालेतील लेखांनी. तात्त्विक मांडणी व प्रत्यक्ष समीक्षा या दोन्ही प्रकारांमध्ये चिपळूणकरांनी भरीव योगदान दिले व नवी दिशा दिली. संस्कृत बरोबरच पाश्चात्य साहित्यकृतीचे स्वागत, परिचय व परीक्षण करून आपल्या मराठी वाचकांची, अभिरूची घडवण्याचे काम त्यांनी प्रयत्न पूर्वक केले. कोल्हटकरांनी त्याच मार्गाने पुढे प्रवास केला- आणि अनेक माध्यमांतून आनंदवादी साहित्यविचार रूजवण्यास प्रारंभ केला. न. चि. केळकर यांनी वाङ्मयाकडे निखळ वाङ्मयीन दृष्टीने पाहण्याचा आग्रह धरला व ही दृष्टी पुढे मराठी साहित्यविचारात घट्ट रूजली. त्यांच्या सविकल्प समाधीच्या संकल्पनेने साहित्य चर्चेचा वेगळे वळण दिले. नव्या साहित्याच्या निर्मितीबरोबरच नवा साहित्याविषयक दृष्टकोण दृढमूल करण्याचे महत्वाचे कार्य या काळात विचारवंतानी केले. कलेच्या स्वयत्ततेचा आग्रह वा. म. जोशी यांच्या लेखनामध्ये धरला गेला. पुढे मर्ढेकर, वा.ल. कुलकर्णी, गंगाधर गाडगीळ, माधव आचवल इ. समीक्षकांना कलावादाच्या जोरदार पुरस्कार केला. ना. सी. फडके, वि.स. खांडेकर यामध्ये कलावाद विरूध्द जीवनवाद असा वाद रंगला तरी व्यापक दृष्टीने पाहता दोन्ही समीक्षकांची भूमिका साहित्य हे मनोरंजन वा बोध देण्याचे साधन हीच राहिली. याच फडके-खांडेकर किंवा फडके-गाडगीळ यांच्या वादांतून साहित्य-सांस्कृतिक क्षेत्र जिवंत, चैतन्यमय राहिले. लालजी पेंडसे यांनी साहित्याकडे पाहण्याचा वेगळा आयाम मार्क्सवादी साहित्याविचाराच्या रूपाने दिला. साहित्य व समाजजीवन या दोन्ही अक्षांवर सारखाच भर देणारी दृष्टी दि. के. बेडेकर, गो. वि. करंदीकर, कुसुमावती देशपांडे यांनी दिली. एकूणच पाश्चात्य समीक्षाविचारातील रूपवादाचा अवलंब आणि कलावादाबरोबरच जीवनातील व्यामिश्रतेचे, गुंतागुंतीचे भान ठेवून साहित्याला जीवन सन्मुख करण्याची दृष्टीही या कालखंडाने हिरीरीने दिली. एकूणच सदर कालखंडातील वाङ्मयनिर्मितीला पूरक, पोषक असाच साहित्याविचार मांडला गेला व प्रत्यक्ष समीक्षाही लिहिली गेली.

स्व-अध्ययन :

१) १८७४ ते १९६० या कालखंडातील साहित्यविचार व समीक्षाविचारावर संस्कृत व पाश्चात्य सौंदर्यविचाराचा प्रभाव कसकसा पडला ते सोदाहरण लिहा.

२) १८७४ ते १९६० या कालखंडातील प्रत्यक्ष समीक्षेची वाटचाल महत्वाच्या समीक्षकांच्या योगदानासह सविस्तर सांगा.

३) विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी आधुनिक समीक्षेचा पाया रचना या विधानाचा साधार परामर्श घ्या.

४) बा. सी. मर्ढेकरांनी मराठी साहित्यविचार व समीक्षेमध्ये केलेल्या आमूलग्र बदलाचे स्वरूप व महत्त्व विशद करा.

५) मर्ढेकरोत्तर समीक्षेचे वेगळेपण मर्ढेकरपूर्व समीक्षेच्या संदर्भात सोदाहरण स्पष्ट करा.

६) १८७४-१९६० या काळात जे अनेक वाङ्मयीन वाद खेळते गेले त्याचे स्वरूप व महत्त्व विशद करा.

❖❖❖❖